# महादेवभाईंची डायरी - खंड २१

(१४ एप्रिल १९३६ ते १० जानेवारी १९३७)

गुजराती भाषांतरकार आणि संपादक

**महेंद्र वालजीभाई देसाई**

मराठी अनुवादः

**ब्रिजमोहन  हेडा**

# वाचकांना

श्री महादेवभाईंच्या हस्तलिखित डायऱ्यांमधील हा तेविसावा खंड आहे. आणि त्यांच्या प्रकाशित ग्रंथात हा एकविसावा खंड आहे. यातील नोंदी ११ एप्रिल १९३६ ते १० जानेवारी १९३७ पर्यंत आहेत. आणि या खंडातील नोंदी १७ जानेवारी १९३७ ला थांबतात.

१० जानेवारी १९३७ ला गांधीजींबरोबर पुण्याहून निघून महादेवभाई त्रावणकोरला गेले. ते तिथे सात दिवस होते. त्यानंतरच्या नोदीचा २२ खंडात समावेश करण्याचे ठरवले आहे. याचे कारण या खंडांमधील संक्षिप्त परंतु महत्त्वाचा भागात मंदिर प्रवेश, अस्पृश्यता आणि सर्वधर्मभावाची चर्चा येते. आणि यानंतरच्या डायरीच्या सुरुवातीच्या भागात याच विषयांची चर्चा सुरू राहते. प्रकाशित खंड २२ अशा प्रकारे १० जानेवारी १९३७ ते १९ नोव्हेंबर १९३७ चा होईल.

डायरी सलग लिहिलेली आहे. यात विषय, काळ, चर्चा आणि प्रसंग बदलत जात असतात. त्याचे चिन्ह म्हणून अनेकदा महादेवभाईंनी स्वतः दिलेला मथळा, तर काही वेळा चांगली आडवी ओळ आढळून येत असते. या हस्तलिखित प्रतीतील लेखनाचे वेगवेगळे असे ७७ विभाग केले आहेत. आणि या खंडांचे वर्णन अथवा विषयनिर्देश आणि पृष्ठसंख्या आणि मथळे जे दिसतात ते सर्व मी दिलेले आहेत. या ७७ विभागात जे साहित्य आहे ते मुळाप्रमाणे शब्दशः देण्याचा मी प्रयत्न केला आहे. जे जे लेखन इंग्रजीतून भाषांतर करून घेतले आहे तशी त्याची नोंद टिपणात केली आहे (मराठी अनुवादात मी या टिपा मूळ भागातच घेतल्या आहेत. - अनुवादक).

महादेवभाईंचे अक्षर मोत्याच्या दाण्यासारखे सुंदर, सुगठित आणि सुवाच्य आहेत. जिथे नोंदी घाईघाईत केल्या आहेत तिथेसुद्धा त्यांची उकल करणे कठीण जात नाही. क्वचितच एखादी चूक आढळून येते हे खरे आहे, तर काही ठिकाणी अर्थ समजण्याकरिता एखादा शब्द जोडावा लागतो. लिखाणात काही विशिष्ट भाग नसेल आणि तो जर जोडला असेल तर तो चौकोनी कंसात दाखवला आहे. जसे-

[निवृत्तीच्या वेळी],

वा [बाजूच्या समासात],

त्यांचे मन खूप शक्तिशाली [न]व्हते,

[बाजूच्या समासात]

यांच्या [? मीराबहेन] बरोबरच्या प्रार्थनेत,

[६ - ५ - ३६],

मला माहीत आहे की ही [आशा] व्यर्थ आहे.,

यांच्या [शहाणपणामुळे] आपल्यामध्ये भांडण होऊ नये.,

साप तो साप, तो [गुणवान] प्राणी असूच शकत नाही.,

गांधीजींच्या शब्दांचा अर्थ तुम्हांला आज कळू शकतो आहे परंतु वाट पाहा आणि [तुमच्या लक्षात येईल की] हे शब्द लेता [म्हणजे उच्चारताना] घृणा वाटते.,

लोकांची फसवणूक करणाऱ्या जळजळीत प्रश्नांवरून लक्ष वळवण्यासाठी [जी जेलमुक्ती] दाखवली जाते ती डोळे धुवायच्या पाण्यासारखी आहे.,

ओळख नसलेल्याला [सल्ला देणे] हे माझ्या दृष्टीने शुद्ध धार्ष्ट्य आहे.

गप्पागोष्टी आणि चर्चाधीन विषय समजणे सोपे व्हावे म्हणून म्हणून टिपा आणि परिशिष्ट दिले आहेत. यामुळे गांधीजींच्या दैनंदिनीत ज्या महत्त्वाच्या व्यक्तींचा उल्लेख आला आहे त्यांचा परिचय, आवश्यक ठराव आणि दस्तावेज आहेत. यामुळे या डायरीतील पृष्ठ २२२ नंतरचा सर्व भाग मुळात नाही. या सामग्रीमुळे पुस्तकाची प्रतवारी उंचावली आहे आणि वाचण्याचे मूल्यही वाढते. याच कारणामुळे वाचकांना मदत करण्याकरिता हे सर्व साहित्य दिले आहे. अशा प्रकारची सुधारणा आणि वाढ करण्याच्या उपयोगितेचा उल्लेख जुलै १९४८च्या 'बुद्धिप्रकाश'मध्ये नगीनदासभाई पारेख यांनी केली होती. यात जे काही कमीअधिक करण्याबद्दल इतर वाचक जर सूचना करतील तर त्यांचे स्वागत केले जाईल.

अशा डायऱ्यांमधून जीवनचरित्र लिहिण्याचा कच्चा माल मिळू शकतो. गांधीजींची भाषणे आणि चर्चांचा सार देण्याचे महादेवभाईंचे कौशल्य पाहिले की असे वाटते की त्यांच्यात पत्रकाराचे कौशल्य आहे. गांधीजींच्या विचारांशी आणि त्यांची वर्तणुकशी ते किती एकरूप झाले होते हे सर्व इथे लिहिणे आवश्यक नाही, कारण या हकिगतीचे अनेक दृष्टांत आणि त्यावरील विद्वत्तापूर्ण भाष्य आपल्याला नारायण देसाईंनी लिहिलेल्या गांधीजींच्या जीवनगाथेतून, 'अग्निकुंडातून फुललेला गुलाब'मधून (महादेवभाई शताब्धी समिति,

अमदाबाद, ३८००२७,किंमत ३ रुपये ५०, १९९३) आढळतील. सचिवाच्या सगळ्या जबाबदाऱ्या अहर्निश पार पाडत असताना ते जनसेवाही करत होते. आणि ते हे जे सर्व काम करत होते ते करत असतानासुद्धा त्यांची दृष्टी संपादकाप्रमाणे, पत्रकाराप्रमाणे वा वृत्तविवेचकाप्रमाणे असायची. याशिवाय ते अनेक पुस्तके वाचत असायचे. त्यामधून आवडलेली सूत्रवचने, शब्द आणि उतारे ते वहीत टिपून ठेवत असत.

'मँचेस्टर गार्डियन'चे अर्धशतक युगदर्शी संपादक राहिलेले चार्ल्स प्रेस्टविक स्कॉटचे जे चरित्र १९३४ मध्ये प्रकाशित झाले होते त्यातून घेतलेल्या भरगच्च उताऱ्यांनी या डायरीची सुरुवात झाली आहे. आपल्याला नवल वाटेल की इतर अनेक जबाबदाऱ्यांचे दडपण असतानाही त्यांनी इतके मोठे पुस्तक कसे वाचून टाकले असेल? आणि इतके लांब मार्मिक उतारे उतरवून घेण्याकरिता कसा वेळ काढला असेल? हेमंडला हे सगळे लिहिण्याकरिता एक वर्ष लागले होते. इथेच आपल्याला महादेवभाईंचा व्यक्तिमत्वाचे नवीन पैलू पाहायला मिळतात, आणि त्यांच्या घडणीवर आणि चरित्रावर प्रकाश पडतो. उत्तम वर्तमानपत्र चालवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा जणू काय याद्वारे पूर्ण केली जात होती. स्कॉटचासुद्धा राजकारणात शेवटपर्यंत रस होता. ऑक्सफर्डमधील शासन राजकीय धोरणाच्या शिक्षकांपासून तर लॉईड जॉर्जसारखे ब्रिटनचे प्रधानमंत्री आणि फ्रांसचे अध्यक्ष इलेमांसो त्यांचे मित्र होते. अशा प्रकारच्या राजकारणी लोकांकडन माहिती वा मत मिळवण्याशिवाय त्यांची दुसरी कोणतीही अपेक्षा नसायची. या शतकाच्या सुरुवातीला ते स्वतःच ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य झाले होते. असे असतानाही त्यांनी यांना सांगून एखादी पदवी वा मानमरातब मिळवले नाही वा त्यांच्या हातून स्वीकारले नाही. लॉईड जॉर्जसह ब्रिटनच्या राज्यकर्त्यांनी त्यांचा सन्मानार्थ सत्कार करण्याची तीनदा इच्छा व्यक्त होती, परंतु त्यांनी नकार दिला होता. संपादकपद सोडायच्या वेळी ब्रिटनच्या राजाने, पंचम जॉर्जने पत्र लिहून सन्मान करण्याच्या गोष्टीला त्यांनी स्पर्शही केला नाही कारण स्कॉटचे स्वातंत्र्यप्रेम आणि कोणत्याही राज्यकर्त्याच्या उपकारात न येण्याची त्यांची महदेच्छा.

यामुळे या डायरीत महादेवभाईंनी स्कॉटच्या जीवनचरित्राची जे काही उतारे घेतले ते त्यांनी पूर्ण दिले आहेत. परिशिष्टात अमदाबादमध्ये भरलेल्या साहित्य सभेत पत्रकारत्व विभागाचे अध्यक्ष म्हणून नोव्हेंबर १९३६ महादेवभाईंनी जे भाषण दिले होते ते भाषणसुद्धा जयंत पंड्या आणि कांती शाहनी तयार केलेल्या 'शुक्रतारक सभा महादेवभाई' (पहिली आवृत्ती, महादेवभाई जन्मशताब्दी समिती, अमदाबाद ३८००२७, मूल्य ४०रुपये, १९९१) मधून साभार उद्धृत केले आहे. हे भाषण संपादक, विवेचक आणि पत्रकारांनी तर निश्चितच

वाचायला पाहिजे परंतु आजच्या काळात तरुणतरुणींनी जर हे भाषण वाचले तर समाजात बातम्यांचे महत्त्व, नियतकालिकांचे स्थान जीवनमूल्यांबद्दल त्यांना मार्गदर्शन मिळेल.

महादेवभाईंना वाचनाचा किती नाद होता ते या ग्रंथामधून कळते. लखनौमध्ये प्राध्यापक मुकर्जींकडे ते जेव्हा रात्रीच्या मुक्कामाकरिता गेले होते तेव्हा त्याचा लाभ घेत त्यांनी किती तरी इंग्रजी आणि संस्कृत पुस्तकांचा शोध घेतला, त्यांच्यावर नजर फिरवली आणि त्यात आहार, अस्पृश्यता वा स्वच्छतेविषयी जे काही होते ते सर्व त्यांनी वाचून काढले, इतकेच नाही तर ते त्यांनी उतरवून आत्मसातसुद्धा केले. गांधीजींनासुद्धा त्यांनी हे सर्व सांगितले होते.

महादेवभाईंच्या जीवनाच्या केंद्रस्थानी गांधीजी विराजमान झालेले होते हे याचे कारण आहे. गांधीजींच्या विचारांचा मथितार्थ त्यांच्या शब्दांतून कळत असतो. गांधीजींचे नवीन काम श्रद्धापूर्वक हातात घेतल्यानंतर 'सत्प्रवृत्तीचे परिणाम दिसायला युगेही लागू शकतात.' त्यांचा विश्वास होता की 'हिंदुस्थानातील' स्त्रियांचे कल्याण स्त्रियांच्या त्यागाने आणि ज्ञानानेच होऊ शकेल. सीता नसती तर राम कुठे असता? इतरांना स्वतःपेक्षा कमी वा वेगळे समजण्याऐवजी 'भ्रातृभाव समजून घेतला तर हे दोष क्षणात दूर होतील.'

अस्पृश्यांचा प्रश्न गांधजींच्या मते अस्पृश्यांचा नव्हता तर त्यांचे शोषण करणारांचे विचार आणि आचार बदवण्याचा होता - माझ्या मते तर हा प्रश्न प्रायश्चित्त घेण्याचा आणि (अस्पृश्यांच्या) ऋणातून मुक्त होण्याचा आहे. 'अस्पृश्यतेविषयी मी काय सांगू? हा एक शाप आहे, कलंक आहे आणि हे असे जहाल विष आहे की जे हिंदुधर्माचा लवकरच नाश करील. . . . मी तुम्हांला सांगू इच्छितो की काशीविश्वानाथचे मंदिर एका जरी अस्पृश्याकरिता बंद असेल तर तिथे ईश्वर राहणार नाही.' गांधीजींची मान्यता होती की हे विचार लोकांना कळले पाहिजे आणि ते सर्वमान्य व्हायला पाहिजे. यामुळे ते म्हणतात, 'मला तुम्हांला खादीचे वेड लावायचे आहे, मृत्यूचे वेड लावायचे आहे.'

यापुढे जाऊन ते दावा करतात की परिवर्तन करणे जर शिकायचे असेल तर माझ्याजवळ या. इतर लोकांच्या मान्यतेबद्दल ते उदासीन नव्हते. याचे कारण, 'मी लोकशाहीवादी आहे. असे मी समजतो. असे जरी असले तरी माझ्या या दाव्याला हास्यास्पद ठरवणारे अनेक आहेत. याचे एक कारण हे आहे की याकरिता संख्येला नाही तर गुणवत्ता असलेल्या लोकांना महत्त्व आहे.' त्यांचे आग्रहपूर्वक म्हणणे आहे की ही गोष्ट केवळ संतांकरिता आहे आहे असे म्हणू नका. हा आदर्श संपूर्ण मानवजातीकरिता आहे. आणि जे लोक क्रांती करू

इच्छितात त्यांनी विचार करण्याकरिता माझा आदर्श आहे. स्वतःविषयी ते म्हणतात की मला कोणत्याही प्रकारची भीती वाटत नाही कारण मानवजातीच्या स्वभावावर माझा विश्वास आहे. आपले भविष्य उज्ज्वल आहे. याचे कारण असे आहे की माणसाला राक्षस व्हायचे की संत हे ठरवण्याचा अधिकार आहे. परंतु साप तर सापाच्या गुण असलेलाच प्राणी असू शकतो. तो स्वतःची घडण बदलवू शकत नाही.' स्वतःच्या शक्तीबद्दल त्यांच्यात खोटी नम्रता नव्हती. 'माझी वेळ येईल तेव्हा मला कोणत्याही प्रकारची आवश्यकता राहणार नाही. मी जेव्हा बाहेर पडेन तेव्हा जग थक्क होईल.' आणि ते आपण नसू तेव्हाचाही विचार करत असत. - 'मी तर यमराजाला समोर ठेवून बसलो आहे.' आणि 'मी तर दोनचार दिवसांचा प्रवासी आहे.'

जवाहरलाल नेहरूबद्दल तुमच्या मनात पक्षपात आहे असा आरोप कनैयालाल मुंशींनी केला होता. उत्तरात ते म्हणाले, जवाहरबद्दलचे प्रेम त्याच्या स्पष्ट दृष्टिकोनामुळे, कॉंग्रेसच्या हिताकरिता वा जवाहरलालच्या स्वार्थाचे प्रतीक नाही तर 'देशाकरिता आहे.' आपल्या लोकांमधील दोष पाहताना ते म्हणाले, 'आज जो आळशीपणा आला आहे तो आपला दोष आहे.' अशी स्पष्ट गोष्ट जवाहरने लिहिली असल्याचे आढळेल. - 'कार्यकारिणीच्या सदस्यांनी जर असहिष्णुता दाखवण्याचा अपराध केला असेल तर त्यात तुमचा वाटा सर्वांत मोठा आहे, कारण त्याहून अधिक असहिष्णुता तुमच्याकडूनच झाली आहे. आणि जर तुम्ही एकमेकांना सहन करू शकत नसाल तर त्याकरिता देशाने सहन करायला नको.' खाली पडायला पाहिजे... 'आपल्या स्वार्थी वर्तणुकीमुळे ते अस्वस्थ होतात . . .आणि आपली चूक होऊच शकत नाही अशी यांची मान्यता नसते आणि इतरांचे दोष आपल्याला चांगेल माहीत आहेत असा त्यांना मिथ्या अहंकार नसतो अशा घटनांपासून जवाहरलाल आपला बचाव करतात. यावर गांधीजी म्हणतात, 'तुझ्या स्पष्टीकरणाने माझे समाधान होत नाही.'

धर्म आणि धर्मांतराबद्दलचे गांधीजींचे विचारही इथे तितक्याच स्पष्टपणे व्यक्त होतात. एका मुलाखतकाराला ते विचारतात की तुम्ही सत्याचा ठेका घेतला आहे काय? दुसऱ्याला ते म्हणतात हिंसेचा सतत विचार करत राहणे हे हिंसक प्रवृत्तीकरिता फार वाईट आहे. विदेशी धर्मप्रचारकांनी आपला अहंकार, अभिमान इंग्रजी राज्याची भीती दाखवणे बंद करून 'मालक म्हणून नाही तर स्वयंसेवक होऊन यायला पाहिजे. तुम्हांला शिक्षण द्यायचे असेल तर ते हिंदुस्थानी पद्धतीने द्या. हिंदुस्थानात यायचे असेल तर शिकवण्याकरिता या, कारण एकमेकांवर परिणाम होणार नाही अशा कुंपणात धर्म बंदिस्त नसतो.' जास्तीत जास्त 'माझी तक्रार आहे की तुम्ही कॅथॉलिक अभिमानी आहा.' गांधीजींना जर एखाद्याला दोष द्यायचा असेल

तर तोसुद्धा ते हलक्या फुलक्या, खेळकर पद्धतीनेही देऊ शकत असत. राजकुमारी अमृतकुवरला त्यांनी लिहिले होते — 'तू जर मनमानेल तसा पैसा उधळला नाही, तर तुला राजकुमारी कोणीही म्हणणार नाही.'

अस्पृश्यतानिवारण, अंत्यजोद्धार, ग्रामोद्योग वा ग्रामस्वराज्य ही नावे जरी गांधीजींनी वापरली असतील तरी गांधीजींच्या दृष्टीने या सर्व गोष्टींचा धर्मातच समावेश होतो. धर्माचे हे कालानुरुप तात्कालिक कर्तव्य समजा की याला सनातन नीती समजा. आणि धर्मरूपी वृक्षाच्या जशा डहाळ्या विकसित होत असतात तशाच दृष्टीने गांधीजी ख्रिश्चनांच्या, मुसलमानांच्या, बौद्धांच्या, यहुदींच्या म्हणजे ज्यूंच्या धर्माकडे पाहतात. ते प्रत्येक धर्माकडे समभावाने पाहू शकत असत. यामुळेच त्यांनी आंबेडकरांना उत्तर दिले की 'तुम्ही कोणता धर्म स्वीकारावा असा सल्ला मी तुम्हांला कसा देऊ शकतो?' परधर्म शंकास्पद, घृणा करण्यासारखा, तसेच धिक्कारण्याच्या पात्रतेचा असतो असे धर्मपरिवर्तन करणारांची वृत्ती आहे. याच गोष्टीची जाणीव ठेवून गांधीजी ख्रिश्चन मिशनरींना येशूने स्थापन केलेल्या धर्माबद्दल समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. येनकेन प्रकारे हरिलाल गांधींच्या निर्बलतेचा गैरफायदा घेणाऱ्या धर्मपरिवर्तनकारांबद्दलही गांधीजी उदारता आणि प्रेम दाखवू शकले हे त्यांनाही माहीत होते. "हा आणि यानंतरचा त्रावणकोर यात्रेचा संपूर्ण वृत्तांत वाचल्यानंतर, गांधीजींच्या मते हिंदू धर्माचे तत्त्व काय आहे आणि भारतीय संस्कृती नेमकी कशात सामावलेली आहे याविषयी गैरसमज निर्माण करणे म्हणजे जाणूनबुजून गैरसमजुतीत पडण्यासारखे होईल.

डायरीच्या संपादनाचे काम अनुभवाने सुलभ व्हायला पाहिजे. परंतु केव्हा केव्हा योगायोग असा येत असतो की हेच काम कठीण होऊन जाते. एक तर उमाशंकर जोशी आणि नगीनदास पारेख यांच्यासारखे विद्वान भाषांतरकार आपल्यामध्ये आता राहिलेले नाहीत. यांची सरळ मदत आणि टीका जरी नसती तरी त्यांची कृपादृष्टीसुद्धा राहिलीच असती. अशाच प्रकारच्या संपादनाचे जे काम देशपरदेशात सुरू आहे ते पाहिले की मनात विचार येतो की तिकडे हे काम किती सावधगिरीने, मेहनतीने आणि चिकाटीने केले जात आहे, भारतातसुद्धा अशा प्रकारचे वातावरण निर्माण होईल अशी अपेक्षा केली पाहिजे. दरम्यान प्रयत्न असा राहिला पाहिजे की नरहरिभाई पारेख यांनी सुरू केलेले आणि चंदुभाई दलालनी पुढे नेलेल्या या कामाचा वारसा जपला पाहिजे आणि तो अधिकाधिक समृद्ध केला पाहिजे.

हे मोठे काम मला सोपवून नाराणभाई देसाईंनी मला गांधीजींचे ऋण फेडण्याची संधी दिली आहे. याकरिता मी त्यांचा आभारी आहे. जटिल प्रश्न उभा झाला की त्या त्या प्रसंगाविषयी वा व्यक्तीविषयी व्यवस्थित माहिती देऊन आणि तटस्थ मार्गदर्शन करण्याकरिता हरिदेव शर्मांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच

होतील. बदलत्या परिस्थितीत आणि विशेषतः मोहनलाल परीख यांच्या मृत्यूनंतरही ज्या उत्साहाने सुरुची मुद्रणालयाने छपाईचे काम पूर्ण केले आहे त्याकरिता तेथील कार्यकर्ते बंधुभगिनींचा मी आभारी आहे. संपादनाच्या या कामात जर काही उणीव आढळली तर ती माझ्यातील अपूर्णतेमुळे.

महेंद्र वालजीभाई देसाई

दिल्ली,

गांधी जयंती, १९६४

चरखा जयंती, संवत २०५०

# आभार प्रदर्शन

साठेक वर्षांपूर्वीचे प्रसंग, आणि त्या ऐतिहासिक दिवसात महादेवभाईंच्या संपर्कात आलेल्या विषयांची माहिती जुळवण्याकरिता अनेक मित्रमैत्रीणींनी स्वतःहोऊन भरपूर मदत केली आहे. याकरिता श्री छगनलाल जोशींचे सुपुत्र भाई सत्येंद्र, दादा धर्माधिकारींचे सुपुत्र न्यायमूर्ती धर्माधिकारी, श्री अंबालाल साराभाईंचे सुपुत्र भाई गौतम आणि जन्मभूमी प्रवासीचे संपादक भाई हरेंद्र दवे या सर्वांचा इथे उल्लेख करून आभार मानायलाच पाहिजे.

- महेंद्र वालजी देसाई

महादेवभाईंच्या दैनंदिनीच्या संपादनाचे भगिरथ प्रयत्न

सुरू करून मैत्रीला जनताभिमुख रूप देऊन

गांधी साहित्यात अतुलनीय भर घालणाऱ्या

नरहरी द्वारकादास परीखच्या चरणी

# अनुक्रमणिका

वाचकांना

महादेवभाईंची डायरी

परिशिष्ट १ - गांधीजींची दैनंदिनी

परिशिष्ट २ - व्यक्तीपरिचय

परिशिष्ट ३ - वृत्तविवेचन आणि वृत्तविवेचक

परिशिष्ट ४ - गांधीजी आणि देशी राजे

परिशिष्ट ५ - हरिलालभाई

परिशिष्ट ६ - देशी राज्य आणि कॉंग्रेसचे राज्य

परिसिष्ट ७ - टिपा

# महादेवभाईंची डायरी

खंड २१

१४ एप्रिल १९३६ ते १० जानेवारी १९३७

मरायचे असेल, तर मरा
तुटतील सर्व शृंखला.
असे मरण काय चांगले?
की ज्यामुळे
लागते मरावे दिवसात शेकडो वेळा

जोवर आहे देहात तुझ्या श्वास घेण्याची शक्ती सुधारका
तोवर तू धुत जा, धूत जा,
तुझी शक्ती क्षीण न होऊ देला, धुत राहा, धूत राहा
वापरुन तुझे संपूर्ण बळ तू तुझा धूत राहा, धूत राहा
हे सुधारका ठेवून फार मोठ्या अपेक्षा, होऊ नकोस अधीर
निघेल जसजसा मळ, तसतशी करत जा अजूनच तू साफसफाई.

नारायण देसाई

हरिॐ

# १. जे. एल. हेमंडनी लिहिलेले सी. पी. स्कॉटचे जीवन चरित्र

दिल्लीतील मुक्कामादरम्यान (हे मोठे पुस्तक वाचून पूर्ण केले.) इतके आकर्षक, माहितीने, ज्ञानाने भरलेले, आणि एक सुद्धा व्यर्थ भूतकीलीन घटना नसलेले असे जीवनचरित्र पुष्कळ दिवसांनी वाचण्यात आले नव्हते.

मी तर हे वाचले पत्रकारांची दृष्टी मिळावी म्हणून. परंतु ईश्वर कृपाळू आहे. आणि सुरुवात केल्यानंतर हे ठेववतच नव्हते. जीवनचरित्र वाचल्यानंतर हे संतचरित्र वर्तमान पत्रकाराचे आहे हे वाचून आदर अजूनच वाढला.

## सी. पी. स्कॉट

पत्रकाराचे काम उथळपणाचे आहे हे स्कॉट ना मान्य नाही. फटाफट अभिप्राय देणारा माणूस ही गोष्ट विचारपूर्वक करत नाही. त्याची दृष्टी संकुचित असते; दीर्घ विचार करून एखाद्या गोष्टीचा खरा अर्थ समजून घेण्याची ताकद त्याच्यात नसते. यामुळे त्याने दिलेला अभिप्राय ठोस ठरत नाही. वाळूच्या घड्याळातील वाळू जशी हळूहळू खाली घसरत जाते, तसेच त्याच्या मनातले विचार त्याच्याकडून निसटून जातात; कारण आपल्या विचारांना शब्दबद्ध करण्याची कला त्याच्यात नसते. असा माणूस चांगला पत्रकार होऊ शकत नाही, हे स्पष्ट आहे. आपली बाजू सर्वाधिक परिणामकारक रीतीने समर्थित करणारे शब्द वा उदाहरण, त्याच्या लगेच लक्षात यायला पाहिजे. संकटाची जाणीव वेगवेगळ्या लोकांवर वेगवेगळ्या प्रकारे परिणाम करते — कुणाला गोंधळवून टाकते, तर कुणाला सावध बनवते. मात्र लिखाण करणारा पत्रकार कोणत्याही अकल्पित प्रसंगासाठी सदैव तयार असला पाहिजे. तो कितीही प्रतिभावान असला तरी अशा प्रकारे गोंधळून जाणाऱ्या माणसाचे इतर गुण ईश्वरी गुण अस्थानी ठरतात.

१९२३ साली स्कॉटला कॉर्पस महाविद्यालयाचे फेलो बनवण्यात आले होते. त्याबद्दल सर मायकल साईसर यांनी लिहिले - “तुम्ही ‘मँचेस्टर गार्डियन’ला एका विश्वविद्यालयाचे रूप दिले असून त्याद्वारे ऑक्सफर्डमध्ये शिकलेल्या लोकांना तुम्ही लेखनकलेच्या कौशल्याचा परिचय करून देत असता.”

“जो कोणी सत्तेत आहे त्याच्याकडे ‘गार्डियन’ने कधीही कोणतीही मागणी केली नव्हती. याचा मला सर्वार्थाने अभिमान वाटतो.”

एडिंबरोत आंतरराष्ट्रीय कायद्याच्या प्राध्यापकाने सूचना केली होती की विवादग्रस्त प्रश्नावरील सर्व निर्णय एका सर्वराष्ट्रीय संमेलनात घेण्यात यावे आणि युद्धरत राष्ट्रांनीसुद्धा त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. यावर स्कॉटनी लिहिले - "हवेत किल्ले बांधण्याचा कधीही लाभ होत नसतो. ज्यामुळे खऱ्या प्रश्नावरून वरवरच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले जाते ती तर नियमाविरुद्ध प्रवृत्ती समजायला पाहिजे."

अशा सर्व लोकांना काय वाटेल याच्या चौकशीच्या भानगडीत न पडता वाचकांसमोर उदारमतवादी विचार ठेवण्यासंबंधात 'मँचेस्टर गार्डियन'चे संपादक कृतसंकल्प होते. यांना घेऊन ब्रिटनचा १८९३-१८९७ या काळातील इतिहासाचा कोणी जर अभ्यास केला तर ब्रिटनच्या उत्तरेकडील भागाचे सामाजिक जीवन आणि इंग्लंडचे राजकारण कटुतेपासून बरेचसे वाचले होते हे कोणीही नाकबूल करणार नाही.

उद्योगधंद्यात लवचिक आणि संकोची भूमिका घेतली जाण्याचा कोणता प्रश्न असेल तर तो मजुरांच्या मजुरीचा आहे. इतके की बहुजन समाजाचे जीवनधोरण, साधनसोयी आणि संस्कृतीचे पालन थोड्याफार प्रमाणात करता आले तर पुरेसे आहे हा विचार डोक्यातून काढून टाकला पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर करारात जरी हा विचार उतरला नसेल तरी ताळेबंदी आणि पहिला संप जेव्हा झाला तेव्हापासून जीवनमानानुसार मजुरी मिळाली पाहिजे हा सिद्धांत प्रगती करत गेला आहे, विकसित होत गेला आहे. यामुळे भविष्यात मजुरीत जर काही फेरबदल करायचा असेल तर त्यावर या सिद्धांताचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. ही गोष्ट पूर्णपणे समर्थनीय आहे. आज अशाच परिस्थितीत योग्य वाटेल तेव्हा सरकार जो हस्तक्षेप करते असते त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. भविष्याकरिता आता ही गोष्ट स्थिरावली आहे. ही या कराराची सर्वांत समाधानकारक गोष्ट आहे. एक जुनी पण चुकीची समजूत अशी आहे की अशा बाबतीत सरकारने आपले डोके खुपसू नये. परंतु ही शंका सरकारविषयी कोणत्या तरी एखाद्या विचित्र कल्पनेवर आधारलेली आहे. जवळजवळ कुणाच्याही विरोधाशिवाय सरकारने ही वाईट परंपरा मोडून काढली आहे.

*　　　*　　　*

मजुरांच्या प्रश्नासंबंधी अग्रलेख लिहिण्याचे विशेष काम एन्सरकडून काढून घेऊन स्कॉटने ते आपल्या मुलावर, लॉरेन्सवर सोपवले. असे करताना स्कॉटने लिहिले - "सामाजिक प्रश्नावर तुझी फारशी पकड नाही. यावरील उपाय यासंबंधात काम करणे आणि अनुभव मिळवणे हाच आहे. तू ज्याप्रमाणे चित्रकलेचा आणि

नाटकांचा अनुभव घेतला तसेच हे आहे. आजपर्यंत तर तुला कार्यालयातील सामान्य जबाबदारीशिवाय अशा एकदोन मोठ्या विषयांचाच परिचय झाला आहे.

“मानवजातीची उपासना ही एक सखोल उच्च भावना आहे या समजाच्या आधारेच मी माझ्या जीवनाची सुरुवात केली आहे. यामुळे मला बराच लाभ झाला आहे तसेच या विचारामुळे मला प्रत्येक विषयात रस वाटू लागला आहे. तू जर मनमोकळेपणाने याकरिता प्रयत्न केला तर कदाचित तू अशाच परिणामांवर वा अशाच परिस्थितीत पोहोचशील. याची दुसरीसुद्धा पद्धत आहे. (मूलभूत सिद्धांतापासून सुरुवात करून) विशेष प्रश्नाकडे जाण्याऐवजी याची अंशतः चाळण करत करत वरचा माळा बांधत जाणे. तसे पाहिले तर मानवजातीविषयी तुझ्या मनात खऱ्या भावनांचा अभाव आहे वा मनुष्यजीवनाच्या भव्यतेबद्दल वा त्याला शब्दबद्ध करण्याबद्दल तुझ्यात रस घेण्याच्या क्षमतेचा अभाव आहे असे मला क्षणभरसुद्धा वाटले नाही. आपल्यामध्ये जी माणुसकी असते तिला इतर गोष्टींप्रमाणेच पोषण आणि व्यायाम मिळायला पाहिजे. एन्सर सुटला की तुला मजुरांशी संबंधित विषयांवर लिहावे लागेल. याकरिता तयारी करण्याकरिता सर्व प्रकारची भरपूर मेहनतीची आवश्यकता आहे. प्रयत्नपूर्वक वाचन करावे लागेल. गरीब कसे राहतात आणि अती गरीब लोकांना कसकशा यातना भोगाव्या लागतात याचा जर तुला अनुभव मिळाला तर तुझा खूप फायदा होईल याबद्दल शंका नाही. . . . मजुरांच्या पुढाऱ्यांशी तू ओळख करून घ्यायला पाहिजे (त्यांना आर. सी. मदत करतो तशा पद्धतीने). विशेषेकरून मालकमजुरात जेव्हा विसंवाद निर्माण होतो तेव्हा. यासंबंधात तू श्री आणि श्रीमती वेबचे मजूर मालकाचा इतिहास आणि सहकारी प्रवृत्तीशी संबंधित कोणतेही पुस्तक वाचू शकतोस.”

* * *

बोअर युद्धाच्या वेळी स्कॉटने घेतलेल्या खूप चांगल्या भूमिकेमुळे अनपेक्षित प्रमाणात लोकांचे त्याच्याकडे लक्ष वेधले गेल्याशिवाय राहू शकले नाही. त्याच्या घरावर आणि कार्यालयावर सतत पोलिसांचा विशेष पहारा ठेवावा लागत होता. त्यांनी क्रुगरकडून लाच घेतली आहे असे दाखवणारे व्यंगचित्रही (वर्तमानपत्रात) प्रकाशित झाले होते. परंतु त्यांच्यासारखा (शांत) स्वभावाचा माणूस यामुळे मुळीच डगमगला नाही वा त्याने कोणत्याही प्रकारे वैरभावाचे प्रदर्शनही केले नाही. हे तर स्थितप्रज्ञाचे चिन्ह आहे असेच म्हणावे लागेल !

परंतु जे लोक त्यांच्यावर अशा प्रकारे टीकेचा वर्षाव करत होते त्याच लोकांनी पंचवीस वर्षांनंतर एपस्टाईनच्या हस्ते (स्कॉटचा) पुतळा उभारण्याकरिता दान देणारांचे नाव नोंदवण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा स्वतःहोऊन नाव नोंदवणारे अजूनही जिवंत आहेत.

स्कॉटला लिहिलेल्या पत्रात बोयसे म्हणतात, “ज्यांच्याकडून चांगल्या वर्तनाची आधी खूप अपेक्षा होती त्यांनी अपेक्षाभंग केला. त्या वेळी ब्रिटिश वर्तमानपत्रांमध्ये जवळपास तूच असा एकटा होता की जो न्याय आणि औदार्याच्या भूमिकेवर टिकून होता ही गोष्ट मी कधीही विसरू शकत नाही.”

नवीन प्रकारची पत्रकारिता उद्भवू लागली होती. धक्का बसावा अशा शब्दांत याचे वर्णन करत लॉर्ड सॅलिसबरी म्हणाले, “श्री हार्म्सवर्थ यांनी असे एक वर्तमानपत्र काढले आहे की जे ते वाचतात परंतु त्यावर विचार करत नाहीत. आणि अशा इतर लोकांकरिता आहे की जे पाहतात परंतु तेही त्यावर करत नाहीत.” पैसेवाल्यांचा नवीन प्रकारचा जो वर्ग निर्माण झाला आहे त्यांच्याकरिताच हे वर्तमानपत्र आहे असे या वर्तमानपत्रांचे थोडक्यात वर्णन करता येते. स्कॉटची महात्त्वाकांक्षा जर अशा प्रकारचे वर्तमानपत्र काढण्याची असती तर ते सहजपणे अशा वर्तमानपत्रांच्या मालकांचे नबाब झाले असते. नफा मिळवण्याच्या वृत्तीने अथवा अशा दृष्टीने वर्तमानपत्राचे संचालन करू इच्छिणारांकडून झालेल्या त्रासाबद्दल स्कॉटला अनेकदा किंमत चुकवण्याची तयारी ठेवावी लागली होती. परंतु स्कॉटने त्यांचे आव्हान स्वीकारले होते. पैसा आणि अवडंबर हेच मोठे बक्षीस वाटणाऱ्या लोकांबद्दल स्कॉटला तिरस्कार वाटत होता. आधीपासूनच स्कॉटने नियम केला होता की ठराविक पगार घ्यायचा, वर्तमानपत्राच्या नफ्यात भाग घ्यायचा नाही. अशा प्रकारे स्कॉटने राखीव निधी उभा केला आणि (संपादक म्हणून) स्वतःची स्वायत्तता जपता यावी म्हणून ‘गार्डियनला आर्थिकदृष्ट्या समर्थ बनविण्याची संधी मिळाल्यावर त्याने तिचा योग्य लाभ घेतला.

* * *

पत्रकाराच्या सर्वस्पर्शी कर्तव्याविषयी मी जे लिहिले होते त्यासंबंधाततील उतारा थोड्या वेळेपूर्वीच बोल्डविनने परत वापरला होता. बोल्डविन म्हणतो -

“बसायच्याआधी, जर मी तुम्हाला तुमच्या व्यवसायाच्या आदर्शांविषयी विद्यमान पत्रकारांमधील श्रेष्ठतम पत्रकराने सांगितलेले शब्द सांगितले तर ती चूक होणार नाही. पत्रकारितेबद्दल आणि वर्तमानपत्र कसे चालवावे याबद्दल ते म्हणाले होते — 'मुळात पहिली गोष्ट तर ही आहे की पत्रकारितेत प्रामाणिकपणा,

स्वच्छता, धैर्य, न्यायदृष्टी, वाचकांबद्दलचे प्रेम आणि समाजाबद्दलची कर्तव्यभावना असणे आवश्यक आहे. (विचार पसरवण्याचा) एकाधिकार आपल्या हाती आहे असे वाटणे स्वाभाविक आहे. यामुळे सर्वात आधी पहिले कर्तव्य तर एकाच्याच हाती सत्ता एकवटल्यामुळे जी प्रलोभने समोर उभी राहण्याची परिस्थिती वर्तमानपत्रांमध्ये स्वाभाविक आहे. त्यापासून वर्तमानपत्राने दूर राहिले पाहिजे. वर्तमानपत्राची पहिली जबाबदारी तर बातम्या गोळा करण्याची आहे. बातम्यां गोळा करताना स्पर्धेपासून मुक्त तर राहयलाच पाहिजे परंतु त्याचबरोबर त्या देणाराचा आत्माही कलुषित असायला नको. हा बातम्यांचा आत्मा आहे. ज्या काही बातम्या वर्तमानपत्र वाढते वा प्रकाशित करतसुद्धा नाही अथवा ते ज्याप्रकारे बातम्या प्रकाशित करते ते करत असताना सत्याच्या मुखकमलावर डाग लागायला नको. टीका मनमोकळेपणाने करा, परंतु बातम्या पवित्र आहेत. (बातम्या दाबून) खोटा प्रचार करणे तिरस्करणीय गोष्ट आहे. शत्रूंच्या आवाजालाही मित्राच्या कथनाइतकाच अधिकार आहे. तोसुद्धा ऐकला गेला पाहिजे. टीका करा परंतु संयमित वृत्तीने. स्पष्टवक्ते अवश्य व्हा. परंतु या सर्वांचा सार हा आहे की अन्याय करू नका."

त्यांनी पाहिले की संपादक म्हणून अग्रलेख लिहिण्यात मजा वाटते आणि ती वाढतच जात असते. पहिल्या महायुद्धापासून नवीनच निर्माण झालेली ही पद्धत स्कॉटनी सुरूच ठेवली. १९१९साली त्यांनी लांब ११७ अग्रलेख लिहिले होते. त्याशिवाय लहान टिपणेही लिहिली होती. १९२९ साली त्यांनी १२३ अग्रलेख लिहिले. संपादकाची जबाबदारी बजावल्यानंतरही दर पंधरवाड्यात ते पाचेक मुख्य अग्रलेख लिहायचे. एखाद्या गंभीर प्रसंगावर ते जवळपास पंधराएक दिवस अग्रलेख लिहायचे. अशा प्रश्नांची निवड करण्याकरिता काळजीपूर्वक अखंड अभ्यासाची मागणी असते. स्कॉटचे वय वाढले, परंतु, परंतु त्यांची परिश्रम करण्याची क्षमता अखंड होती. ऐंशी वर्षाचे झाल्यानंतरही सरकारी दस्तावेजांचा अभ्यास करण्याकरिता ते पूर्ण सकाळ घालवू शकत असत. तेसुद्धा रात्रपाळीत शरीराची भुगाभुगा होईल अशी मेहनत केल्यानंतर. त्यांची बुद्धी स्पष्ट पाहू शकणारी आणि चपळ होती. मित्रांबरोबर सार्वजनिक प्रश्नावर चर्चा करणारा त्यांचा पत्रव्यवहार तर सतत सुरूच असायचा. ब्राईस, हॉबहाऊस, डिल्लन, लोरबर्न अशा लोकांच्या मताबद्दल त्यांच्या मनात फार आदर होता.

भावनांध्ये खळबळ निर्माण होईल असे लेखही ते लिहू शकायचे, परंतु त्यांना लोकांना विचारमग्न करील असे लेख लिहिणेच विशेष आवडायचे. श्रद्धेय मुत्सद्दी म्हणून ते राजकारणाच्या जगात वावरायचे. राजकारणातील लोकांना भेटायला ते नेहमीच उत्सुक असायचे. त्यांच्याबरोबर ते चर्चा करत राहायचे आणि

कधीकधी मध्यस्थीही करायचे. स्कॉट इतके काही काम करायचे की तितक्या कामाचा थकवा फार कमी लोक सहन करू शकतील. ऐंशी वर्षाच्या वयात त्यांचे चोवीस तास असे निघून जात असत. सायंकाळी ऑफिसचे काम आटोपून लंडनला जाण्याकरिता ते रात्रीची ट्रेन पकडायचे, त्यांच्या एखाद्या दिवसाचा कार्यक्रम असा असायचा - लॉईड जॉर्जबरोबर न्याहरी करणे, श्री वेनीझोलोझबरोबर बाल्कन राष्ट्रांची चर्चा करण्यात सकाळचा सगळा वेळ घालवणे, लॉर्ड सेसिलबरोबर जेवण करून ट्रेनने परत मँचेस्टरला जाणे आणि तिथून सायंकाळी कार्यालयात गेल्यानंतर लांब अग्रलेख लिहिणे. हा तर केवळ एक नमुना आहे. . . .

१९१३ साली मारकोनीची बदनामी करणारा कट रचण्यात आला होता. त्यासंबंधात त्यांनी लॉईड जॉर्जला असा सल्ला दिला - “मला तर वाटते की तुम्ही पूर्ण कबुली द्यावी आणि जे काही पश्चात्ताप करण्यासारखे असेल त्याबद्दल निःसंकोचपणे माफी मागाची. तुम्ही माझ्याशी याबद्दल चर्चा केली यावरून मला वाटते की तुम्हाला याबद्दल पश्चात्ताप होतो आहे. तुमच्या सहकाऱ्यांकरिता आणि पक्षाकरिता अडचणीची परिस्थिती निर्माण झाली आहे ही वस्तुस्थिती आहे. . . . याचे कारण शक्य असेल तर थोडाबहुत दोष कबूल करून टाकला पाहिजे. यामुळे कोणाचेही नुकसान होणार नाही. मला तर असे वाटते की असे केल्याने हे सगळे संतापाचे आणि दोषारोपणाचे वातावरण विखरून जाईल.”

* * *

हेमंड : पुढारी तो असतो जो आपल्या अनुयायांच्या अतिशयोक्त मागण्यांना थोपवण्याचा आदेश देऊ शकतो.

* * *

भेट होऊन चर्चा होत नाही तोपर्यंत जर्मनीच्या प्रश्नावर काहीही लिहू नका अशी विनंती लॉईड जॉर्जनी केली.

* * *

सर एडवर्ड ग्रे यांचे हेमंडने केलेले वर्णन वाचून शास्त्रींचीआठवण येते. वक्ते म्हणून ग्रे यांचा जो विशेष प्रभाव आहे त्यावरूनच त्यांचा स्वभाव ओळखता येतो. लोकांवर प्रभाव टाकणारे बरेचसे व्यक्ती आपल्या श्रोत्यांकडून काहीतरी मिळवत असतात. परंतु ग्रे केवळ देतच नाही. ते आजूबाजूच्या वातावरणाने विचलित

न होता, स्वस्थचित्ताने स्वतःच्या विचारधारेचे अनुसरण करत असतात. त्यांची अनासक्ती ही एकाच वेळी त्यांच्या दुर्बलतेची तसेच शक्तीचीही प्रतीक होती. दुसऱ्यांच्या मनात कधी पाऊल न ठेवणाऱ्या व्यक्तीची ती अलिप्तता होती. ते मनातल्या मनांत मुक्तविहार करत नसत; पण निसर्गाच्या कुशीत मात्र ते विसावत असत. याचे कारण त्यांना ज्या सृष्टीत रस होता ती ईश्वराची निर्मिती होती, मानवनिर्मित नाही. दुःखाची गोष्ट ही आहे की ज्यामुळे त्यांच्या अडचणी वाढत होत्या आणि ज्या गोष्टींची त्यांच्यावर जबाबदारी होती त्या जगात ईश्वरी अंशापेक्षा माणसांची उपस्थिती जास्त होती. आणि या जगातील व्यवस्थेकरिता दुसऱ्याच्या मनात शिरण्याच्या शक्तीची सर्वाधिक आवश्यकता असते. ती शक्ती यांच्यात नव्हती.

* * *

मेलरला लिहिलेल्या पत्रामधून -

माझे दृढ मत आहे की युद्ध व्हायला नको होते, आणि आपण या युद्धात भाग घ्यायला नको होता. परंतु एकदा यात भाग घेतल्यानंतर राष्ट्राचे संपूर्ण भविष्य पणावर लागते. विजयी होण्याकरिता जे काही करणे आवश्यक असते ते केल्याशिवाय उपाय राहत नाही. अर्थातच यात सिद्धांतांची जोखीम निर्माण होते आणि देण्याघेण्याचा हिशेब चुकवावा लागत असतो. परंतु लोकांना विचार करायला वेळ मिळावा आणि शासनाचे काम सुरळीतपणे परत सुरू होईपर्यंत हे हिशेब स्थगित ठेवावे लागतील.

## युद्धप्रचार

प्रचार ही गोष्ट युद्धात आवश्यक असलेल्या गोष्टीतील एक आहे. माणसाच्या सद्गुणांचा जर आपल्याला उपयोग करता येऊ शकत नसेल तर आपण त्याच्या दुर्गुणाचा उपयोग करतो. असे ज्युनिअसचे एक प्रख्यात वाक्य आहे. लढाईच्या दुसऱ्या पद्धतीत जसे हे होते असते तसेच प्रचाराची पद्धतही बिघडत जाते. आणि माणसाच्या सद्गुणाचा कमी आणि दुर्गुणांचा अधिक उपयोग केला जातो. जशी ओढाताण वाढते तसाच अन्याय वाढतो हे पाहून न्यायप्रेमामुळे माणसाचा संताप होतो, वृत्तीने तो कठोर होतो आणि शत्रुत्वाच्या जोशात तो समोरच्याला झुकवण्याचा प्रयत्न करतो. लढाई सुरू असते तोपर्यंत प्रचार इतका काही पराकोटीला पोहोचलेला असतो की एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राबद्दल जे वाटत नसते तेही तो बोलून जातो. अशा वेळी नशिबानेच काही शिल्लक राहत असते.

## विश्वयुद्धानंतरची शांततापरिषद

अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांनी व्यक्त केलेले विचार दंश करणारे आहेत. आणि युरोपच्या राजकीय नकाशाबद्दलचे डावपेच पाहिले की आपण भयभीत होतो. अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांनी व्यक्त केलेले विचार बोचरे होते, आणि युरोपच्या राजकीय नकाशासंबंधीच्या डावपेचांमुळे ते भयभीत झाले होते . . . जर्मनीकडून युद्धात झालेल्या प्रचंड विध्वंसाची नुकसानभरपाई करून घेण्याच्या वचनांमुळे लोकांच्या अपेक्षा आभाळाएवढ्या वाढवल्या गेल्या होत्या, आणि त्या वाढवणारांमध्ये श्री. लॉइड जॉर्ज हे अग्रगण्य होते.

जर्मनीशी केलेल्या करारामुळे घरी किती नेता येईल, संधीचा व्याप किती मोठा असेल याचाच विचार त्यांच्या मनात जास्त येत होता. या भांडणानंतर जग कसे दिसेल याचा विचार त्यांच्या मनात कमी येत होता. ज्यांनी तीव्र भावना जाग्या करून त्यांचा लाभ घेतला होता त्यांच्या कैद्यासारखे लॉईड जॉर्जसमोर पाऊस ऑफ लॉर्डस पडले होते. अशाच प्रकारे कलेमांसोच्या दृष्टीसमोर फ्रांसची चेम्बर ऑफ डेप्युटीज होती, यांच्या 'विजयानंतर युरोपला लागलेले मत्यूचे जे काळे भूत उतरायला पाहिजे होते त्याचे चित्र कोणासमोर नव्हते. ओढाताणीच्या आणि वादविवादाच्या पाच महिन्यांनंतर नेहमीकरिता शांतता कायम राहावी म्हणून अथवा युरोप परत पुनर्जिवित होईपर्यंत कोणतीही सत्ता परिणामकारक बलिदान करायला तयार नव्हती. युरोपभर दुष्काळाची आणि क्रांतीची पडछाया पसरलेली होती. परंतु युद्धांच्या आणि यातनांच्या वातावरणात निष्ठुर झालेले हे मुत्सद्दी तात्त्विक चर्चेत आणि ओढाताणीत इतके काही बुडालेले होते की त्यांच्या दृष्टीसमोर ही गोष्ट येतच नव्हती.' हेमंड

मित्रांच्या हातून लॉईड जॉर्जला जे घाव सहन करावे लागले होते ते सर्वात जास्त दुःखद होते. आपल्या पुण्याईच्या बळावर अशा या वातावरणातही अग्रलेख लिहून जितका काही जोम वातावरणात भरता येईल तितका भरण्याचा आणि नीतिमत्तेचा आग्रह धरून लोकमताचे दडपण आणून सरकारला हळूहळू नमते घ्यायला लावण्याकरिता स्कॉट प्रयत्नशील होते.

ब्लॅक आणि टॅनच्या काळ्या कारभाराचा अंत घडवून आणणाकरिता प्रभावी असलेल्या घटकांत स्कॉटचे लेखनही प्रामुख्याने कारणीभूत होते.

लॉईड जॉर्जला लिहिताना ते म्हणाले की, ब्लॅक ऍन्ड टॅनच्या काळ्या कारभाराचा अंत घडवून आणणाऱ्या परिबळांमध्ये स्कॉटचे लेखनही मुख्य होते."आपण घटना अगदी वेगवेगळ्या केल्या आहेत. असे

झाले नसते तर बरे झाले असते असे मला वाटते. आयर्लंडबद्दलचे तुमचे धोरण माझ्या हृदयाला मुळीच पटत नाही. या संबंधात वा युरोपमध्ये तुम्ही उचललेल्या पावलांसंबंधात तुम्ही खरोखरी जसे आहा तसे व्यक्त होताना मला दिसत नाही. यामुळे तर गोष्ट अजूनच बिघडते आहे - “योगायोगाने तुमच्यावर काही जबरदस्त लोकांचे दडपण आले आहे. मी असे म्हणतो याकरिता मला माफ करा. तुमच्यावर माझे प्रेम नसते आणि आणि मी तुमचा प्रशंसक नसतो तर मी असे म्हणू शकलो नसतो.”

## स्कॉटच्या दृष्टीने वर्तमानपत्राचे कर्तव्य

वर्तमानपत्राला दोन बाजू असतात. इतर व्यवसायांची ज्याप्रमाणे एक बाजू तर तो एक व्यवसाय आहे अशीच असते आणि त्यापासून नफा मिळवण्याकरिता तो चालवायचा असतो आणि वर्तमानपत्राचे अस्तित्व वा अभ्युदय त्या नफ्यावर अवलंबून असते. दुसरी बाजू वर्तमानपत्राला लोकोपयोगी सेवा म्हणता येऊ शकते. हे काम चांगल्या वा वाईट प्रकाराने करता येऊ शकते. परंतु जनतेचे हितसंवर्धन केल्याशिवाय ही सेवा चालू शकत नाही. वर्तमानपत्राच्या आयुष्याचा आणि त्याच्या अस्तित्वाच्या हेतूचा विचार केला तर या दोन गोष्टी नेहमीच बरोबर जुळतात असे नाही. अनेकदा त्यांच्यात तीव्र विसंगती दिसून येते. परंतु वृत्तपत्राचे चारित्र्य आणि त्याची उपयोगिता या दोघांमधील सुसंगतीवरच आधारलेल्या असू शकतात.

## निवृत्तीच्या वेळी

स्कॉट १९२९ साली निवृत्त झाले. त्या वेळी सम्राटांनी संदेश दिला - “एक महान वृत्तपत्र चालवण्याची जबाबदारी तुम्ही ५७ वर्ष पार पाडली. तुम्ही संपादकपदाचा राजीनामा दिला याबद्दल सम्राटांना खेद होतो. परंतु पत्रकारितेच्या इतिहासात तुम्ही जी सिद्धी मिळवली आहे ती निःसंशयपणे अद्वितीय आहे. आणि याकरिता तुम्ही अभिनंदनाकरिता पात्र आहा.”

यॉर्कचे आर्चबिशप म्हणाले, “मँचेस्टर गार्डियन’च्या स्तंभांमधून प्रकाशित होणाऱ्या सामग्रीच्या संकलनात तसेच राष्ट्रांना आणि नगरांना मार्देगदर्तशन करत असताना ते कर्तव्याची तपासणी करत असत आणि आपल्यासमोर त्यांनी नीतीचा मापदंड ठेवला होता. नीतिनिर्णय घेताना अंतःकरणाला त्यांनी निर्णायक स्थान दिले होते. त्यांचा जो व्यापक प्रभाव होता त्याचा उपयोग करण्याची आपल्याला संधी मिळाली याकरिता आपण ईश्वराचे आभार मानायला पाहिजे.”

ज्या जगात आपण राहतो ते अजून चांगले व्हावे म्हणून स्कॉटने केलेल्या उदात्त कामाचा ब्रिटनच्या प्रधानमंत्र्याने उल्लेख केला. इतर अनेक लोकांनी आपले जीवन समाधानपूर्वक व्यतीत करण्याच्या प्रवृत्तीला स्कॉटने मजबूत बनवले असे जनरल स्मट्स यांनी लिहिले होते.

मँचेस्टर शहराला स्वातंत्र्याने जे सन्मानित करण्यात आले, त्याचे जे प्रश्न निकाली लावण्यात आले त्याविषयी ते म्हणतात - “घाणेरड्या विभागांची साफसफाई करण्यात आली, गर्दी असलेल्या भागातील गर्दी कमी करण्याकरिता उपाययोजना करण्यात आली. देशभर जो धुरकटपणा पसरलेला आहे तो शक्य तितका हटवण्याचा, जनतेच्या शरीरावर सूर्यप्रकाश पडून त्यांचे मन उज्ज्वलित व्हावे याकरिता त्यांनी प्रयत्न केले. . . . हे काम सोपे नाही. या महान नगरीच्या कारभारातील असे प्रश्न निकाली लावण्याची क्षमता तसेच इच्छाशक्ती त्यांच्यात होती. यामुळेच त्यांना ‘मँचेस्टरचे स्वतंत्र पुरुष’ ही मानद पदवी देण्यात आली होती.”

स्कॉट जाहिराती देणाऱ्यांची मर्जी जिंकण्याचा प्रयत्न करत नसत; तसेच त्यांना कारण नसताना नाराजही करत नसत. काही कारणास्तव त्यांची नाराजी झाली तर त्यांना त्याचे दुःख होत असे. काही खोटे किंवा फसवे छापले जाऊ नये ही दृष्टी ठेवून ते जाहिराती घेत असत. ते म्हणत की संपादकीय विभाग आणि जाहिरात विभाग यांचा जितका कमी संबंध असेल तितके वर्तमानपत्रासाठी चांगले.

एक उद्धट तरुण त्यांना म्हणाला की जाहिरातदारांच्या दबावाखाली न येता काही लेख छापणे अवघड जाईल; तेव्हा एका अनुभवी सहकाऱ्याला ते म्हणाले – “त्याला लाथ मारून जिन्याखाली ढकलून द्यावेसे वाटत होते.”

काहीशा अनिश्चित विचारसरणीमुळे, एखाद्या शब्दाचा चुकीचा उपयोग केल्यामुळे म्हणा वा आळसामुळे भाषेकडे दुर्लक्ष करताना कोणी आढळला तर त्यांचा संताप होत असे -

“असेच एक बंधू जबाबदारीचे ओझे ओढता-ओढता वारले..” ते म्हणाले – “खरं तर असे जबाबदारीचे ओझे ओढण्यासारखे त्यात काहीही नव्हते.”

चुकीचे प्रयोग आणि असंस्कृत शब्दप्रयोग ते शोधत राहायचे आणि वर्तमानपत्रांमधून त्यांची नोद करून ठेवायचे. अनेकदा चूक करणाऱ्या अपराध्याला, अनेकदा तर आपल्या सहकाऱ्याला या लहान लहान नोंदी ते पाहायला द्यायचे. विशिष्ट प्रकारची सावधगिरीची, भाषिक सौष्ठवाची ते अपेक्षा ठेवत असत. वर्तमानपत्राच्या प्रत्येक भागात, अहवालात, वाचकांच्या पत्रासहित या अपेक्षेनुरूप लेखन ठेवण्यात येत असे.

सामान्य शब्द आणि शब्दसमूहात अचूक इंग्रजी वापरली पाहिजे असा सी. पी. स्कॉटचा आग्रह असायचा. . . . त्यांची दृढ मान्यता होती की वर्तमानपत्रात एकसूत्रता जाणवत राहावी म्हणून संपूर्ण वर्तमानपत्रात अन्योन्याश्रय आणि संपूर्ण संपादनात संपादकाचे दर्शन व्हायला पाहिजे. या कारणामुळे स्वयंपूर्ण खाते तर त्यांना विवादास्पद वाटायचे. याचबरोबर दिवस असो की रात्र एखाद्या विभागाची वा विशेष लेखांची जबाबदारी जरी त्यांनी सोपवली असेल तरी त्या क्षेत्राचे वा विभागाचे संपादक पद देण्याला त्यांचा विरोध होता. . . .

फिरता फिरता त्यांच्या मनात ज्या सूचना यायच्या त्या ते मदतनिसांना करत असत आणि त्यांना प्रेरित करत असत. दररोज घडणाऱ्या घटनांविषयी त्याच दिवशी वा दुसऱ्या दिवशी ते हजारो नोंदी पाठवत असत. त्यांच्या टिपण्या अतिशय संक्षिप्त आणि समंजसपणाने भरलेल्या असायच्या - तीन पेनीचे नाणे, बायसिकल, बायकोला मिळणारा पगार, घरीच स्वयंपाक करणे, युगोस्लाव्हिया, रेशनचे तिकिट अशा कोणत्याही विषयासंबंधी या टिपण्या असायच्या. उदाहरणार्थ -

जात्यावर दळलेल्या पिठाच्या ब्रेडबद्दलचा हा अंदाज महत्त्वाचा ठरतो. गरीबांच्या घरांत ब्रेड तयार करणे अजून कितपत प्रचलित आहे आणि तंत्र शिक्षणाच्या शाळांमध्ये मुलींना ब्रेड कशी बनवायची हे शिकवतात की नाही, याबद्दलच्या माहितीसह कोणी लिहू शकेल काय? दक्षिण इंग्लंडपेक्षा उत्तर इंग्लंडमध्ये घराघरांत ब्रेड बनवण्याचे प्रमाण नक्कीच जास्त दिसते. बेक करता येत नाही किंवा करायलाच नको, असे मानणारा एकही स्वयंपाकी माझ्याकडे कधीही नव्हता. परंतु मित्रांच्या सांगण्याप्रमाणे दक्षिणेत तर ही कला जवळजवळ नाहीशी झाली आहे. एखादा चांगला जाणकार लेखक मिळाला, तर हा लेख शेवटचे पान योग्य प्रकारे भरून टाकू शकेल.

*         *         *

बापूंची किती तरी वैशिष्ट्ये स्कॉटमध्ये होती. त्यांचा विसरभोळेपणा तर त्यांच्या स्वतःच्या संरक्षणासाठीच होता. जे महत्त्वाचे असायचे त्याची त्यांना आठवण राहत असे. याचे कारण ते निरुपयोगी गोष्टी विसरून जात असत. हे ते कसे विसरतात आणि कोणाच्या लक्षातही येणार नाहीत अशा गोष्टी त्यांना कशा आठवतात हे कोणीही खात्रीपूर्वक सांगू शकत नाही. आणि यांच्या विस्मरणाचा अर्थ यांचे मन खूप शक्तीशाली नव्हते असा तर मुळीच होत नव्हता.

जगाला आवश्यक होत्या अशा किती तरी गोष्टी स्कॉटने दिल्या आहेत. क्वचितच आढळावी अशी टिकून राहण्याची शक्ती त्यांच्यामध्ये होती. आधी ते हळूहळू शांतचित्ताने पाऊल टाकतात आणि जसजशी परिपक्वता येते तसतशी यांची हिंमत आणि आत्मश्रद्धा वाढत जाते. तारुण्यात असताना अपेक्षांनी भरलेले कोणतेही चित्र यांना मोहवीत नव्हते. तर वृद्धावस्थेत समोरचे चित्र कितीही भयावह असले तरी ते त्याला किंचितही घाबरत नव्हते. ज्या लोकांना भावनांचा उकाडा आवडत नाही त्यांनाही प्रकाश मिळावा म्हणून अभ्यास करावा लागेल असे वर्तमानपत्र ते चालवत होते.

त्यांनी आयुष्यभर एका नैतिक नियमाचे पालन केले. मूलभूत प्रश्नावर ज्याने निर्णय घेतलेला असेल त्या माणसाची मानसिक शांती आणि शक्ती कायम राहते. आणि स्कॉटमध्ये ही शक्ती परिपूर्ण होती. त्यांचे म्हणणे होते की हा एका पुस्तकाचा प्रभाव आहे. तारुण्यावस्थेत असताना त्यांना सीलीचे (जॉन रॉबर्ट सीली, इंग्लंडमधील विचारवंत आणि इतिहासकार) 'एकसी होमो'मध्ये (एकसी होम हे लॅटीनमधील नाव आहे आणि येशूच्या शिकवणीचा धार्मिक पातळीवर नाही, तर नैतिक–राजकीय आणि सामाजिक प्रभावाच्या दृष्टीने विचार मांडला आहे. ख्रिश्चन धर्माचा पाया म्हणून नैतिकता आणि सार्वजनिक जीवनातील येशूच्या शिकवणुकीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पुस्तकात येशूला दैवी व्यक्ती म्हणून नव्हे तर नवीन सामाजिक–नैतिक व्यवस्था आणणारे ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व म्हणून सादर केले गेले. तेव्हा इंग्लंडमध्ये या पुस्तकाने खूप खळबळ माजवली; कारण ते ना पूर्णपणे पारंपरिक धार्मिक, ना पूर्णपणे धर्मनिरपेक्ष होते.) मार्गदर्शन आणि सुखशांती मिळाली. या पुस्तकातून त्यांनी जीवनभर मार्गदर्शन मिळवले आणि त्याचा आधार घेत राहिले. आपला स्वतःचा धर्म कसा आहे याची फार थोड्या लोकांना इतक्या साध्या, स्पष्ट आणि सरळ शब्दांत कल्पना असेल आणि सर्व शंका दूर करील अशी धर्मासंबंधीची कल्पना असेल. समोर उभ्या असलेल्या प्रश्नावर सर्वात आधी पूर्ण लक्ष केंद्रित करावे आणि नंतर दुसरी जबाबदारी हाती घ्यावी असे स्कॉटचा अंतरात्मा त्यांना सांगत असे. असे करत असताना भीती, पश्चात्ताप, आणि नैतिकतेबद्दलच्या शंकाकुशंकांनी मन दोलायमान वा ढिले होऊ देऊ नये.

प्रवाहपतित होणे ही गोष्ट त्यांना जीवनात कधीही कळली नाही. आता पुढे काय करायचे यासंबंधी लोक का निर्णय घेऊ शकत नाही हेही त्यांना कळत नव्हते. ते म्हणतात -

जेव्हा मला कठीण निर्णय घ्यायचा असतो तेव्हा मी शांतपणे विचार करत असतो. संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतो. सद्यस्थितीत सत्य काय आहे आणि असत्य काय आहे याचा शोध घेतो आणि मग निर्णयावर

येतो. नंतर मी येणाऱ्या अडचणींची मुळीच काळजी करत नसतो. विचार करून पाऊल उचलल्यानंतर मी काहीही झाले तरी निर्णय बदलत नाही. यामुळे सर्व गोष्टींचा तिथेच अंत होतो.

जवाहरला ही गोष्ट लागू पडू शकते - प्रेम आणि कार्यरतता.

पत्नीचे निधन आणि त्यानंतर दोन वर्षांनी मोठ्या मुलाचा मृत्यू या घटना अशा होत्या की त्यामुळे होणाऱ्या दुःखाचा केवळ धैर्याच्या बळावर सामना करता आला नसता. त्याकरिता काही तरी अधिक उच्च, गहन किंवा श्रेष्ठ मानसिक शक्तीची. श्रद्धेची, तत्त्वनिष्ठेची, अध्यात्मिक बळाची आवश्यकता होती. याच गोष्टी त्यांना आधार देत होत्या. कर्तव्यपरायणतेला धर्म मानून स्कॉटने या दुःखाचा सामना केला. दुःखाला घेऊन जो माणूस आपल्या कर्तव्याचे पालन करत नाही त्या माणसाला ग्लॅडस्टन भित्रा समजत असत असे किल्ब्रॅकनी सांगितले आहे. स्कॉटचीसुद्धा अशीच मान्यता होती. त्यांच्या मते कर्तव्यपालनात ढिलेपणा करणे, मागेपुढे करणे योग्य नाही. न डगमगता जीवनाच्या सर्व मागण्या पूर्ण करण्याचा निर्धार माणसाने सोडायला नको. याचा अर्थ असा आहे की तुम्ही जे पाऊल उचलता ते जर तुम्ही कर्तव्यपरायणतेने उचलत असाल आणि तुम्हांला इतर कशाचेही जर मार्गदर्शन मिळत नसेल तरी तुम्ही स्वतःवर नियंत्रण ठेवू शकता. ईश्वराने आपल्याला जे सामर्थ्य, चिकाटी, प्रतिकारशक्ती हे गुण दिले आहेत त्यांचा लाभ या जगाला देऊन आपण ईश्वराच्या ऋणातून मुक्त व्हायला पाहिजे. आघात होवो की दुःख कोसळो, जखमी झालेला माणूस दुर्बलतेमुळे जसा कधी बोलताना वा विचार करताना दिसत नाही तसेच स्कॉटच्या संबंधातही घडले होते.

अशाच प्रकारची इतर कोणतीही दुर्दैवी घटना घडली तर त्यामुळे होणारे दुःख सहन करण्याकरिता ज्या प्रकारचे धैर्य लागते तशाच प्रकारचे धैर्य दुःख वा आघात सहन करण्यासंबंधात स्कॉटमध्ये होते. स्कॉटमध्ये कोणत्याही प्रकारची भीतीची भावना नव्हती हे तर त्यांच्याबरोबर कोणीही राहिला असता तर त्याच्या लक्षात आल्याशिवाय राहू शकले नसते. इतके खरे की असे धैर्य दाखवण्याकरिता संघर्ष करण्याची आणि तो सुरू ठेवण्याची वेळ आली पाहिजे. तेव्हाच हे धैर्य दिसू शकते. असा प्रसंग आला नाही तर माणसाला क्वचितच बहाद्दूर म्हणता येईल. स्कॉटला जरी बहाद्दूर म्हणता येणार नाही तरी ते निर्भयी होते. जीवनाप्रती त्यांची निग्रही वृत्ती होती -

“आपली कर्तव्ये पार पाडणे जरी फार कठीण झाले तरी काय? यामुळे जर आपण माघार घेतली तर ते तर जणू देवाला नाकारण्यासारखेच हेईल. इतिहासाचा व्याप किती विशाल आहे? आणि तो सूड घेईल तर

तो किती भयंकर असेल ही गोष्ट माणसाने लक्षात ठेवली पाहिजे. शेवटी विजय तर आध्यात्मिक बळाचाच होत असतो. परंतु त्यासाठी किती प्रचंड संयम, श्रद्धा आणि धैर्य लागत असते !

"खऱ्या अर्थाने सांगायचे तर खोलात खोल धर्मश्रद्धा ही स्वतःच साफल्य असते. तरीसुद्धा एकंदरित पाहता अजूनच वाढत असलेल्या अनैतिकतेकडे हे जग चाललेले आहे असे जर आपण मान्य केले तर जग ईश्वराचे नाही तर सैतानाचे आहे असे मला वाटेल. मूर्खाप्रमाणे मी जेव्हा म्हणतो की या जगातून ईश्वराचा लोप झाला आहे तेव्हा त्याचा अर्थ हाच असतो. क्षणभर असेसुद्धा होऊ शकते. परंतु सर्व गोष्टींचा ठोकताळा पाहिला तर एका मार्गाचा वा एका पिढीची कुठे मोजदाद होईल? सर्व संस्कृतींचा विनाश होऊ शकतो, परंतु माणूस तर पुढेच चालला आहे. जसे आपण आहो तसे होण्याकरिता लाखो वर्षे लोटली आहेत. थोडे प्रांत जर्मनीने ताब्यात घेतले आहेत आणि थोड्या काळाकरिता जर्मनीत लष्करशाहीचा डंका वाजतो आहे म्हणून आपण निराश होऊ नये. प्रयत्नशील होण्याकरिता कठोर निर्धाराची आवश्यकता असते. जर्मनीतसुद्धा धर्मसमर्थक असतीलच.

सतत वाहणारा प्रवाह आणि पराकोटीची चीड यावी अशा घटना घडणारे प्रसंग यांमुळे शांतचित्ताने राहताच येऊ नये अशा या जीवनात ते टिकाव धरू शकले कारण त्यांच्या जीवनात अशी महान श्रद्धा होती की जिच्या बळावर ते स्वस्थ आणि शांतचित्त राहू शकत होते. त्यांच्या वर्तमानपत्रात जगाला प्रभावित करणारे गुण होते. त्याच मानसिकतेमुळे जे होते त्याने ते सहजपणे क्षुब्ध होत नसत. आणि अशीच त्यांची उदार प्रकृतीही होती.

त्यांच्या वर्तमानपत्राचा जसा देशात प्रभाव होता तसाच विदेशातही होता. चांगल्या राजकारणाकरिता पहिली निकड सत्याची असते अशी त्यांची मान्यता होती. वर्तमानपत्रे खरी असो की खोटी, कोणाची ते प्रशंसा करत असो की निंदा, परंतु यांच्या वर्तमानपत्रामुळे जे मार्गदर्शन मिळत असे ते संकुचित मनातसुद्धा उदार भावना भरून टाकत असे.

एक मित्र म्हणाला होता की शारीरिक वा आध्यात्मिक दृष्टीनेसुद्धा स्कॉटचा स्पर्श इतका काही कोमल असायचा की तितका एखाद्या स्त्रीचासुद्धा नसावा. चोहोकडून धिक्कारल्या गेलेल्या एखाद्या माणसाच्या जखमांवर त्यांच्या शब्दांचा आणि सहानुभूतीपूर्ण सांत्वनाचा असा काही परिणाम होत असे की त्यांचे मन शांत होऊन जात असे. मार्फियाच्या इंजेक्शनपेक्षाही त्यांचे शब्द जास्त शक्तिशाली होते.

त्यांच्या जिव्हाळ्यास पात्र कोणी असेल तर ते सॅलिस्बरी होते. ते 'अविचल देवपरी'चे भक्तच झाले होते. त्यांच्यात जुने व्हिक्टोरियन विचार घट्ट रुजलेले होते. जसे की कोणाला जर मंदपणा आला किंवा दुःख झाले, तर ती लाजिरवाणी गोष्ट समजावी आणि त्याचे कारण स्वतःमधीलच काही तरी दुर्बलता वा उणीव असते.

त्यांच्या धैर्याचे उदाहरण म्हणून हे पाहा - "१९३१ साली ते बोगनोरला गेले होते. रेल्वेचे रूळ ओलांडण्याच्या वेळी एका लांब बसने त्यांना सायकलवरून खाली पाडले. पडल्यामुळे त्यांच्या पायाला जखम झाली होती. पायाच्या मोठ्या हाडाला तडा गेला होता. जोडसुद्धा फाटला होता. यामुळे बहिणीला परत आणण्याधी ते एका चांभाराकडे गेले आणि जखम शिवून घेतली. त्यांची बहीण त्यांच्यापेक्षा बारा वर्ष मोठी होती. तिला काळजी वाटू नये अशी त्यांची इच्छा होती. दुसऱ्या दिवशी मुलीला घेऊन ते ऑक्सफर्डला गेले. तिथे असतानाही ते या अपघातासंबंधी कोणाशीही बोलले नाही. परंतु वेदना वाढल्या आणि अपघातामुळे झालेल्या जखमेतून रक्त वाहू लागले. जखमेतील रक्त कदाचित थांबणार नाही म्हणून त्यांनी मला एक त्रोटक चिठ्ठी लिहिली, 'उद्या परत येतो, आणि तुम्ही भेटायला आला तर आभार.' बोगनोर होते, पायाला लागले होते तरी परिस्थिती काही विशेष वाईट नव्हती. परंतु सांगायला तर पाहिजेच होते."

आपल्या जीवनाला त्यांनी धर्माशी एकरूप करून टाकले होते. आता पुढे काय होईल याचा ते नेहमी विचार करत असत आणि भविष्याबद्दल आशावादी दृष्टिकोन ठेवत असत. एकदा ते म्हणाले, "जीवनात सर्वात आश्चर्जनक गोष्ट काय असेल तर ती लहान बाळातील अपार जिजीविषा." कवितेत जर त्यांना काही विशेष आवडत असेल तर कॉलरीजच्या या दोन ओळी -

मोकळ्या हवेत सुषुप्त शिशिरात

हसऱ्या चेहऱ्यावर रमतात वसंताची स्वप्ने.

# २. एक पत्र - रामनामाचा जप

एका माणसाने मूर्खपणाने भरलेले पत्र लिहिले. तो विभागीय लेखापाल विभागात हिशेबनीस होता. आता निवृत्त झाला आहे. तो अखंड जप करत असायचा. नंतर त्याने ते सोडले. त्याचे जीवनसुद्धा विषयासक्त होते. आता ६५ वर्षाच्या वयात झोपेत त्याला विषयवासनेच्या स्वप्नांचा अनुभव येतो. भूतकाळात दिलेले वचन आणि त्यांचा केलेला भंग यांची त्याला आठवण येते आणि तो अस्वस्थ होतो. यामुळे भूतकाळाचा विसर पडावा आणि ईश्वराची जागृत व्हावी अशी त्याची इच्छा आहे. हे कसे करावे?

फिरून आलो. रस्त्यात अशा आशयाचे लांब पत्र या माणसाने दिले.

आल्यानंतर बापू म्हणाले, “हे पत्र पाहा. काय आहे?” मी म्हणालो, “खाजगी आहे ना?”

बापू म्हणाले, “हो, हे तर अगदीच मूर्खपणाचे आहे. पाहा मी पाहावे असे यात काही आहे काय?”

मी एक परिच्छेद वाचला. तो मूर्खपणाने भरल्यासारखा होता. मी विचारले, “आता फाडून टाकू?”

बापू हसत म्हणाले, “हे मीही वाचणार नाही आणि तूही वाचणार नाही असे कसे चालेल? वाचून पाहा, हा माणूस कदाचित पूर्ण मूर्खही नसेल.”

मी पूर्ण पत्र वाचले आणि त्याचा सार त्यांना सांगितला. बापूंनी मला लगेच उत्तर लिहायला लावले -

प्रिय मित्र,

तुमचे पत्र.

सुज्ञपणा समजावून सांगतो आणि अनुभव त्याचा पुरावाही देतो की झालेल्या गोष्टीचा कधीही शोक करू नये. मग ते कितीही का पापपूर्ण वा भयावह असेना. भूतकाळाची आठवण करायची ती त्यापासून लाभ घेण्याइतकीच. इतकेच की आपल्याकडून शक्य होईल तितके आपण सत्कर्मावर टिकून राहायला पाहिजे आणि आपल्याकडून जे चुकीचे वर्तन घडले त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून पूर्ण जोमाने प्रयत्न केला पाहिजे,

माझ्या दृष्टीने पश्चात्तापाचे चांगल्यात चांगले रूप हे आहे की जे पाप आपल्याकडून घडले आहे ते परत आपल्याकडून कधीही घडू नये असा निर्धार करणे. अतूट श्रद्धा आणि तिच्याबरोबर रामनामाचा जप हा एकमेव उपाय मी तुम्हाला सुचवू शकतो. यामुळे मानसिक समाधान नक्कीच मिळेल. आणि असे केल्याने तुमची इच्छा जरी नसली तरी ते तुमच्यातील पापाचा समूळ नाश करील. - मग तुम्ही ते मान्य करा वा करू नका.

# ३. अहिंसा

## अ. अहिंसेची खरी कसोटी

**११-४-(१९)३६**

सकाळी बापू प्रदर्शनात काही प्रमुख पठाणांना भेटले. त्यांचा पुढारी चोखेदुल्लाखान होता. इतर प्रमुख कार्यकर्ते मिळून ते पंचविसेक लोक होते. बापू त्या लोकांना म्हणाले की तुमच्या अहिंसेची परीक्षा घेण्याकरिता मला यायचे होते, परंतु येऊ शकलो नाही. परंतु आता तुम्ही इथे आलेला असल्यामुळे मी तुम्हांला विचारतो की खान अब्दुल गफ्फारखान म्हणतात त्याप्रमाणे तुमचा अहिंसेवर विश्वास आहे काय?

हे लोक लगेच त्यांच्याबाबतीत घडलेल्या गोष्टी सांगू लागले. कोणाला जमिनीवर पाडून मारहाण करण्यात आली होती, कोणाला पाण्यात बुडवले होते वगैरे. बापू म्हणाले, “हे तर मला माहीत आहे. परंतु माझा प्रश्न वेगळा आहे. आज तर आपल्याजवळ शस्त्र नाही. परंतु कल्पना करा की आपल्या हाती तलवार आली, आपल्यामध्ये मारण्याची शक्ती असेल तरीही तम्ही तलवार उगारणार नाही काय?” त्यांचा चेहरा उतरला. ते म्हणाले, “काँग्रेस जसा हुकूम करील तसे आम्ही करू. आम्ही तर काँग्रेसचे सेवक आहो.”

बापू म्हणाले, “ठीक आहे, पण कल्पना करा की काँग्रेसने ठराव केला की अहिंसेचा त्याग करायचा आणि तलवार हाती घ्यायची तर?”

लगेच उत्तर आले, “हो, मग आम्ही तलवार चालवू.” यावर बापू हसले, म्हणाले, “बरोबर म्हणाला. आता मी तुम्हांला सांगतो की तुमचा तो पुढारी, जो तुरुंगात बसलेला आहे, म्हणतो की काँग्रेसने जरी सांगितले तरी मी तलवार चालवणार नाही. यावरून त्यांच्या रोमारोमात अंहिसा भरलेली आहे हे स्पष्ट होते.”

यावर पहिला पठाण म्हणाला, “तर मग आम्ही तसे करू.”

बापू, “आणि कल्पना करा की अब्दुल गफ्फार खान आणि मी, आम्ही दोघेही पागल झालो आणि म्हणालो की शस्त्र चालवा तर?”

उत्तर मिळाले नाही.

बापू म्हणाले, “तरीही तुम्ही शस्त्र चालवले नाही तर ती तुमच्या अहिंसेची खरी परीक्षा होईल. तुम्हांला जर कोणी सांगितले की अब्दुल गफ्फार खाननी कलमा वाचायचे सोडून दिले तर तुम्ही सोडाल?”

“नाही.”

“तर ही गोष्टसुद्धा तुमच्याकरिता कलमासारखी सिद्धांताची गोष्ट व्हायला पाहिजे. तिचा कोणत्याही परिस्थितीत त्याग व्हायला नको. जर असे झाले तर मी म्हणेन की सरहद्दीतर्फे हिंदुस्थानला स्वराज्य मिळेल. मी तिकडे येण्याचा प्रयत्न तर फार केला, परंतु येऊ शकलो नाही. पाहू, ईश्वराची इच्छा असली तर अजूनही येता येईल.”

आधीचा पठाण म्हणाला, “सरहद्दीपर्यंत या. आम्ही तुम्हाला पंजाबमध्ये येऊन भेटू.”

## आ. वायव्य सरहद्द प्रांताची प्रजा

‘हिंदुस्थान एक विहंगावलोकन’ नावाच्या पुस्तकात लॉर्ड रोनाल्ड्सने पठाण आणि वायव्य सरहद्द प्रांतावर दोन प्रकरणे लिहिली आहेत. त्यात पठाणांच्या धोकेबाजीचे आणि थंड हृदयाने खून करण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीबद्दल लिहिले आहे. आणि मग ते लिहितात,

पठाणांची अनेक न आवडणारी वैशिष्ट्ये विरोधाभासांनी परिपूर्ण आहेत. अनेक बाबतीत ते लहरी लहान मुलांसारखे आहेत. धोका देण्याची पूर्ण प्रवृत्ती असतानाही ते आतिथ्याच्या नियमांचे कधीही उल्लंघन करत नाहीत असे म्हणता येईल. योगायोगाने हे शक्य आहे की कट्टराहून कट्टर शत्रू जरी त्यांच्या घरी पाहुणा म्हणून आला तरी यांचा जीव पवित्र होऊन जातो. आतिथ्य संस्काराच्या कारणाने जे सहजपणे शक्य असेल ते त्याच्याकरिता करतील. धोकेबाजीबरोबरच प्रामाणिक आणि निष्ठावंत राहण्याची यांच्यात आश्चर्य वाटावे अशी अपूर्व शक्ती आहे. यांच्या निष्ठेबाबतचा सर्वांत लक्षणीय दाखला कथनी येथील खैबर रायफल्समध्ये आढळून आला. एका शासकीय समालोचनात असे सांगण्यात आले आहे - “जात आणि धर्माशिवायही खूप जवळचे रक्ताचे संबंध असेलेल्यांमध्ये ज्यांचे विवाहसंबंध होत असत अशा साडेतीनशे झक्काखेड लोकांचा समूह असलेल्या अफ्रिदी लोकांच्या तुकडीलासुद्धा या पठाणांचा हल्ला झाला असता पळून यावे लागले होते. या आक्रमणात अनेक ठिकाणी भावाला भावाशी आणि मुलाला वडिलांशी लढावे लागले होते.”

## इ. पेशावर संग्रहालय

ग्रीक स्थापत्यकला आणि हिंदुस्थानी धर्मनिष्ठांचे पूर्ण लक्ष वेधले जावे अशा कृती तिथे आहेत तसेच भगवान बुद्धाच्या प्रतिमाही (मूर्त्या) तिथे आढळतात. तेथील ग्रीक प्रतिभेविषयी असे म्हणता येते कारण प्राचीन स्मारकांमध्ये या महान धर्मप्रवर्तकाच्या हुबेहूब मूर्तीचे अस्तित्व नाही. येथील त्यांची उपस्थिती सामान्य परंपरेला अनुसरून कोणत्यातरी पवित्र चिन्हात चित्रित झाली आहे. यावरून स्पष्ट होते की इथे जी देहाची आकृती दाखवली आहे ती हिंदुस्थानी परंपरेविरुद्ध आहे.

डॉ. स्पूनर सुचवतात की भगवान बुद्धाचा स्थूल देह इतका पवित्र समजला जात होता की त्याचे चित्र काढण्यात येत नव्हते. गांधारमध्ये ग्रीक शिल्पकार आले तेव्हा त्यांना सर्व वंद्य पुरुषमंडळीचा परिचय होता. ते हिंदुस्थानातील बौद्धांच्या मदतीला आले आणि त्यांनी दैवी तत्त्वाला सर्वात आधी अशा चित्रांमध्ये चित्रित करणे शिकवले.

# ४. सत्ताग्रहण

१३-४-(१९)३६

ब्रेल्वी आले आणि ते म्हणाले, “मसानी म्हणाले की मंत्रिमंडळ तयार करण्याकरिता ज्यांना आमंत्रित करण्यात आले आहे त्याचा स्वीकार न करण्याकडे तुमचे मत अधिकाधिक होत चालले आहे.” त्यांना याचे आश्चर्य वाटले आणि खरे काय आहे याचा शोध घ्या असे ते म्हणाले.

बापूंनी लिहिले- “नाही. मेजवर पडलेल्या अन्नाच्या तुकड्याकरिता मी राज्यकारभार स्वीकारणार नाही, परंतु स्पष्टपणे लाभ होत असेल तर मी सत्ताग्रहण करीन. मसानींना मी सांगितले होते की मी जे सांगतो आहे ते बाहेर सांगत बसण्याकरिता नाही. आणि मी जे सांगितले होते ते त्यांनी कबूल केले होते.”

१४-४-(१९)३६

सत्ताग्रहणाच्या ठरावासंबंधी सत्यमूर्तींना बापू म्हणाले, “तडजोड होईल असा मधला मार्ग काढणारा हा ठराव नाही. संपूर्ण विचार केल्यानंतर स्वीकार करणारा हा एकमेव ठराव आहे. आपण जर सत्ता स्वीकारण्याचा ठराव मंजूर केला असता तर सत्ताग्रहणाच्या हेतूलाच धक्का लागला असता.”

# ५. देशी राज्ये

स्वाभाविक पद्धतीने विचार केला तर स्वातंत्र्याचा लढा देशी राज्यात सुरु व्हायला पाहिजे होता.

१३-४-(१९)३६

अमृतलाल शेठ आले. त्याच्याशी खूप डोकेफोड करावी लागली. ते बापूंना म्हणाले, “संस्थानांसंबंधीचा ठराव मी पाहिला आहे. खूप विचार केल्यानंतर तो मंजूर करण्यात आला आहे. तुमचा आणि माझा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. आताच मी तुम्हाला समजावून सांगू शकणार नाही, म्हणायचे असेल तर म्हणा की काँग्रेसची वा माझी दृष्टी बरोबर नाही.”

१४-४-(१९)३६

अमृतलाल शेठ आणि बळवंतराय महेता तर कालच येऊन गेले होते. आजसुद्धा आले. आज बापूंनी त्यांना सांगितले -

बापू -“काल तुमच्या जिभेवर तुम्ही नियंत्रण ठेवले होते. तुम्ही म्हणाला होता की ‘आम्हांला तुमची कोणतीही मदत नको’ असे तुम्ही लिहून द्या. परंतु नंतर लगेच तुम्ही तुमचे शब्द बदलले. गोष्ट अशी आहे की मी तुम्हांला माझे म्हणणे पटवून देऊ शकलो नाही. तुम्ही जे धोरण अवलंबिले आहे ते माझ्या मताशी जुळत नाही. तुम्हांला आठवते? जेव्हा असहकार पुकारण्यात आला होता तेव्हा अशी सूचना आली होती की असहकार ब्रिटिश राज्यात आणि संस्थानांमध्येही होईल. परंतु मी लगेच म्हणालो होतो की ‘नाही, असे होऊ शकत नाही. आपला लढा केवळ ब्रिटिश हिंदुस्थानापर्यंतच सीमीत राहील.’”

“ठीक आहे तर मग, गोष्टच संपली” असे म्हणून शेठनी निश्वास टाकला.

बापू - “परंतु आजच तुमच्या मनातून ही गोष्ट निघाली? आजपर्यंत तर तुम्ही लोकांना चुकीचे शिक्षण देत होता?”

“परंतु अखेरीस तुम्हाला जी गोष्ट करायची आहे ती आदर्श पद्धतीने करायला काय हरकत आहे?”

बापू - “परंतु या आदर्शाचा त्याग कसा करायचा हासुद्धा प्रश्नच आहे ना?”

“स्वयंनिर्णयाचा हक्क तर तुम्ही कबूल करता ना?”

बापू - "हो, लोहारूला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे, जयपूरला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे, सर्वांना आहे, परंतु सर्वांना एकत्रितपणे नाही."

"आम्हांला तुमच्याकडून काहीही नको. तुम्ही म्हणाला होता की स्वराज्य मिळवण्याची जेव्हा वेळ येईल तेव्हा त्यात त्यांत आम्ही कोणताही अडथळा निर्माण करणार नाही. आमचे तुम्हाला सांगणे आहे की आधी तुम्ही स्वराज्य मिळवा मग आम्ही मिळवू."

बापू - "हे तर तुम्ही बोलत आहा. परंतु माझ्या शब्दांना काही किंमत असली पाहिजे ना? मी जर आज काही बोललो तर तुम्हांला फार वाईट वाटेल. मी एकट्याकरिता स्वराज्याचा विचार करू शकत नाही. तुम्हांला होकार देऊन मला खोटेपणा करायची इच्छा नाही. परंतु हे सर्व तुम्हाला कसे समजावून सांगू? परंतु इतकी गोष्ट खरी आहे की माझे धैर्य असीम आहे, आणि त्याहीपेक्षा माझा विश्वास असीम आहे."

"तुम्ही काल चिडून म्हणाला होता की लोहारूचे काय केले? तुम्ही विचारता की मैत्रीपूर्ण संबंध ठेवूनही अखेरीस काय लाभ झाला? मी जर संस्थानामध्ये राहत असतो तर सांगितले असते. मी संस्थानामध्ये जन्मलो आहे. संस्थाने तर माझ्या हाडाहाडात भरलेली आहेत. परंतु मी तर काळवेळ पाहून काम करणारा माणूस आहे. बनारसमध्ये १९१६ साली मी जेव्हा राजेरजवाड्यांना सुनावले तेव्हा ती योग्य वेळ होती. मला वाटत होते की पायाभरणी करत असतानाही मी जर माझ्या मनातील बोललो नाही तर मी सत्याग्रहाला गालबोट लावीन. गोखलेंनी माझ्या भाटाप्रमाणे मालवीयजींजवळ माझी प्रशंसा केली होती. मालवीयजींना माझ्याबद्दल सांगितले. यामुळे मला त्या लोकांनी बोलावले. आणि त्यावेळी माझी प्रसिद्धीसुद्धा फार होती असे नव्हते. यामुळे मी तर तिथे पायी चालतच गेलो होतो. चालत जायला पंचेचाळीस मिनिट लागले. यामुळे थोडासा थकलेलो होतो. आणि सर्व माझी वाट पाहत बसलेले असल्यामुळे गेल्याबरोबर मला बोलायचे होते. परंतु मी तर जे मला सुचत गेले तेच बोलत गेलो. त्या वेळेच्या माझ्या शब्दांची अजूनही देशी राजे आठवण करतात. हे लोक मला ऐकून घेतात कारण यांना माहीत आहे की या माणसाच्या मनात आमचा राग नाही, हा आमच्यावर अन्याय करणार नाही, आमचे अनहित हाल व्हावे असे इच्छिणार नाही."

बळवंतराय - "तुम्ही तर आम्हांला चागले समजून घेऊ शकता, तुमच्याबद्दल आम्हांला विश्वास वाटतो. गोलमेज परिषदेच्या वेळी आम्ही सर्व काही तुमच्यावर सोपवलेले होतेच ना? परंतु तुम्ही नसाल तेव्हा आमचे काय?"

बापू - “ही तुमची भीती खरी आहे. मी तर आजकाल एकटाच आहे. माझ्याबरोबर कोणीही नाही असे तुम्ही समजू शकता. माझी पद्धत वेगळी आहे. माझे धोरण, माझे आर्थिक धोरण वेगळे आहे. एक काळ असा होता की जेव्हा विलायतेत राजा फार जास्त खर्च करत असे. ब्रॅडला, दादाभाईंनीसुद्धा यासंबंधात मागणी केली होती. ‘पंच’ने ब्रॅडलाचे हत्त्यावर बसलेले व्यंगचित्र प्रकाशित केले. परंतु माझ्याकडे थोडेच कोणी येणार आहे. मी तर पैसे घेत असतो आणि तेही जगजाहीर पद्धतीने घेत असतो.

“माझी पद्धत वेगळी आहे. क्रांतीकरून सर्व काही मुळापासून बदलवून टाकण्याची चर्चा सुरू आहे. परंतु ही गोष्ट अंमलात आणायची शक्ती कोणामध्ये आहे? मी तर म्हणेन की परिवर्तन करणे शिकायचे असेल तर माझ्याकडे या.”

# ६. काँग्रेसची कार्यकारिणी

जवाहरबद्दल - हा चिडत असतो, संतापत असतो, असे असूनही हा सौम्य आहे. आज हा किती कठीण परिस्थितीत काम करतो आहे? याच्या डोक्यावर जणू तलवार लटकते आहे की काय असेही म्हणता येईल.

*　　　*　　　*

राजेंद्रबाबू आले. त्यांच्याबरोबर देशी राज्यांसंबंधी भयावह फेरबदलाची चर्चा झाली. अमृतलालने त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे फेरबदल ना तर राजेंद्रबाबूंना पटले ना बापूंना.

‘स्वातंत्र्याकरिता सुरू असलेल्या लढ्याची वस्तुस्थिती पाहता देशी राज्यातही हा लढा सुरू केला पाहिजे.’

यात ‘लढ्याची वस्तुस्थिती पाहता’ ऐवजी ‘प्रामुख्याने वस्तुस्थिती पाहता’ असे पाहिजे. बापूंनी याला नकार दिला. बापू म्हणाले — “तुम्हांला जर ठराव पूर्णपणे रद्द करायचा असेल, तर तो सोडून देता येईल.”

जमनालालजी म्हणाले, “यांची इच्छा असेलही, परंतु मी हा ठराव मागे घेऊ देणार नाही.”

**१४-४-३६**

जवाहर आले. फार नाराज होते. सहकार कसा चालू शकेल यासंबंधी मी बोलत असताना माझ्या एकेका वाक्याने आणि शब्दाने सर्वांना धक्का लागत होता. माझे विचार कोणाशीही जुळत नाहीत. आणि आमच्या दृष्टिकोनात फार अंतर आहे.

बापूंनी सल्ला दिला की तू बहुमत असलेल्या त्या धोरणाला बिलगून राहायला पाहिजे, आणि थोडा वेळ हा प्रयोग करून पाहिला पाहिजे.

*　　　*　　　*

राजेंद्रबाबू आणि जमनालालजींबरोबर प्रभाच्या प्रकरणाची भरपूर चर्चा केली. जमनालालजी म्हणाले की आपण निर्विकारी आहो असे जे ती म्हणते ते सपशेल खोटे आहे.

ही गोष्ट बापूंना खूप खटकली, आणि दिवसभर ते यावर विचार करत राहिले.

**१५-४-३६**

आज नऊ वाजता जवाहर, मौलाना, वल्लभभाई, राजेंद्रबाबू, राजगोपालाचारी कॉंग्रेससमोरील परिस्थितीची चर्चा करायला आले. आधीच्या दिवशी जवाहरलाल निश्चितच आपल्या हृदयावरील ओझे थोडे हलके करून गेले होते.

विषयनियामक समितीच्या बैठकीचा उपसंहार करताना ते रडू लागले. आपल्या वाईट मनःस्थितीची मला लाज वाटते असे ते म्हणाले आणि माफी मागितली. रात्री दीड वाजता कॉंग्रेस संपत असताना ते एक वाक्य म्हणाले, तीन दिवसांपासून मी या अशा मनःस्थितीत इथे बसलो. आता मी परत त्या मनःस्थितीत विलीन होईन.

सकाळी वल्लभभाई आणि राजेंद्रबाबू येऊन गेले. त्यांच्याबरोबर कार्यकारिणीसंबंधी अनेक विकल्पांची चर्चा केली. बापूंनी दुसऱ्या दिवशी बहुमत असलेल्या पक्षाच्या लोकांची समिती नेमायचा सल्ला दिला होता.

आज त्यांनी नवीनच सूचना केली. राजेंद्रबाबूंनी त्यांना हवी तशी समिती तयार करावी आणि ती त्यांच्यासमोर ठेवावी. ही गोष्ट वल्लभभाई जर पचवू शकत असतील तर त्यांना शूरवीरच म्हणावे लागेल असे राजाजी म्हणाले.

बापू म्हणाले, "नाही, ते तर इतके शूर आहेत की कोणतेही काम करू शकतात. ते जरी अल्पमतात असले तरी ते हे काम करू शकतात. यावर कृपलानीजी म्हणाले, मनात पक्की गाठ बांधून ठेवणारे आहेत. त्यांनी जर हे काम आनंदाने करायची तयारी दाखवली तर त्यांनी मनातल्या या गाठीला कामाआड येऊ दिले नाही असेच म्हणावे लागेल.

नंतर जवाहरबरोबर गोष्टी झाल्या. अबुल कलाम आझादची सूचना अशी होती की जवाहरला जे करायचे असेल ते त्यांना करू द्यायची सूट दिली पाहिजे. त्यांना हव्या त्या लोकांना ते निवडू शकतील.

बापू म्हणाले - ते लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते असल्यामुळे कार्यक्रमाकरिता जबाबदार नसतील असे सहकारी ते पसंतच करणार नाहीत. परंतु लोकशाहीवर विश्वास असल्यामुळे त्याच्या स्वभावाशी जुळणार

नाही अशा व्यक्तीला घेतल्यामुळे उभ्या राहणाऱ्या अडचणी, दृष्टिकोनातील मूलभूत अंतर आणि त्यामुळे सुरू असलेली ओढाताण यांचा सामना जवाहरलालला करावा लागेल.

*　　　*　　　*

जवाहरलालने राजेंद्रबाबूंना एक यादी तयार करायला सांगितली आणि मग त्यावर विचार करायचा ठरवले. शेवटी काही ठरले नाही तर अखिल हिंदुस्थान कॉंग्रेस समितीसमोर एक वक्तव्य द्यायचे ठरवले.

जवाहर म्हणाले, “मनमोकळेपणाने दिलेल्या वक्तव्यामुळे परिस्थिती बरीचशी सांभाळली जाईल.”

बापू, “हे खरे आहे. परंतु फार जास्त ज्यात फेरबदल करावा करावा लागेल अशा वक्तव्यावर माझा विश्वास नाही. तुम्ही आजच कोणत्याही खोडखाड आणि उणिवेशिवाय जर वक्तव्य तयार करू शकाल तर स्वाभाविक पद्धतीने करू शकाल असे नाही.‘विचारपूर्वक तयार करून काढलेले’ वक्तव्य वर्तमानपत्रात आढळेल. आणि नंतर देशाला, सहकाऱ्यांना आणि तुम्हाला स्वतःला न्याय्य वाटेल असे वक्तव्य काढा.”

शेवटी बापू म्हणाले, “वक्तव्य काढा, परंतु रागाच्या भरात कोणाची बदनामी करू नका.”

आज बापू सकाळी साडेतीन वाजताच उठले होते, आणि अर्धा तास वगळता दिवसभर कामातच होते. सायंकाळी चार वाजता म्हणाले, “ईश्वराचे आभार की मी उद्या इथून रवाना होईन.”

# ७. जवाहरलाल नेहरूंचे भाषण

**१४-४-३६**

शंकरराव देवची प्रार्थना मान्य आहे, परंतु एक अडचण फार मोठी आहे. दररोजच्या कारवाईने डोके सुन्न झाले आहे. निवड झाल्यानंतर काय होईल हे सांगता येत नाही. प्रदर्शनीच्या जवळ राहतो, परंतु चांगल्या प्रकारे प्रदर्शन पाहण्याची संधी मिळाली नाही. दोन दिवसानंतर बोलेन तेव्हा चांगल्या प्रकारे पाहीन. प्रदर्शनाबद्दल विशेष सांगू शकत नाही कारण ते पाहिल्यानंतरच मला ते फार आवडले असे सांगता येईल.

परंतु एक गोष्ट सांगतो. राजकीय काम असो की दुसरे, उद्देश अखेरीस एकच असतो. स्वराज्याचे म्हणा की ग्रामसेवेचे म्हणा की हरिजनसवेचे काम असो, हे जरी वेगवेगळे काम असतील तरी या सर्वांचा हेतु एकच आहे. हिंदुस्थानचा सर्वात मोठा आजार कसा दूर होईल याचा विचार करणे. असीम गरिबी, उपासमार, नग्नता हे सर्व दूर करायचे आहे. मुलांना खायला नाही. शिक्षणाची व्यवस्था नाही. हा आजारी देश आहे. ही काही चांगली गोष्ट म्हणता येत नाही. या आजारावर कोणता इलाज केला पाहिजे? हिंदुस्थानच्या शरीरात अशी शक्ती आली पाहिजे की ज्यामुळे त्याच्या मेंदूची शक्ती वाढेल.

भरपूर चर्चा ऐकली आहे. अनेक कायदे होत आहेत. या सर्वांचे मोजमाप याच मापदंडाने होऊ शकेल. यांनी जर हा आजार दूर करण्याकरिता मदत होऊ शकत नसेल तर या सर्व गोष्टी बेकार आहेत. गावखेड्यातील गरिबांची, जमिनीची लागवण न देऊ शकणाऱ्यांचा प्रश्न आहे, बेकारीचा प्रश्न आहे. शहरातील बेकारी शंभर टक्के आहे. गावखेड्यातील बेकारी शहरातील कारखान्यातील मजुरांच्या बेकारीसारखी नाही. शहरातील मजुरांची बेकारी शंभर टक्के आहे. परंतु गावखेड्यात काही फुटकळ काम मिळण्याची शक्यता असल्यामुळे तेथील बेकारीचे मोजमाप करणे कठीण आहे. दहा लोकांचे काम वीस लोक करून टाकतात. ही असह्य बेकारी एखाद्या दगडासारखी गळ्यात फसलेली आहे. यामुळे कंबर मोडते आहे.

मार्ग काय? मोठा अडथळा - देश गुलाम आहे. जो देश आपल्यावर राज्य करतो तो आपल्या स्वतःच्या फायद्याकरिताच सर्व कायदेकानून, व्यापार वगैरे करत असतो. त्यामागे हाच उद्देश असतो. कोणताही देश दुसऱ्या देशात आपल्या त्यागाचे प्रदर्शन करण्याकरिता जात नसतो. ही गोष्ट हिंदुस्थानला गरीब करते आहे, त्याला मिटवण्याचा प्रयत्न करते आहे. यामुळे हिंदुस्थानला आपण राजकीय पद्धतीने स्वतंत्र केले पाहिजे. स्वतंत्र देशातसुद्धा काही प्रमाणात गरिबी, बेकारी असते.

मग कशा प्रकारचे कायदे केले तर हे दुःख टळू शकेल? आजच्या शासनाचे जास्तीत जास्त ओझे गरिबांवरच पडत असते आणि त्यांचा फायदा घेत असतात वरचे नोकरशहा. लखनौ शहरच घ्या. लाटसाहेबांचे घर घ्या, तालुकदाराचे प्रासाद पाहा; आणि त्यांच्यासमोर मातीची घरे आणि खंडारे पाहायला मिळतील. नवी दिल्लीतील महाल पाहा. यांच्याकरिता करोडे रुपये खर्च झाले आहेत. आणि यांची तुलना करा खरोखरीच्या हिंदुस्थानींशी, जे मातीचे खंडारे आहेत त्यांच्याशी. शेतसाऱ्याचे जास्तीतजास्त ओझे याच वर्गावर पडत असते. इथे सगळ्यात खालच्या वर्गावर हे ओझे पडत असते.

मिठाची सर्वांना गरज आहे. तशी तर ही सर्वांना लागणारी गोष्ट आहे. यावर कर असूच नये. याकरिता तुम्ही आठ आणे खर्च कराल तर त्यातील मोठा भाग सरकारला जात असतो. तीन हजार रुपये कमावणाराला हा खर्च विशेष जाणवत नाही. परंतु गरिबाकरिता हीच मोठी रक्कम होते. त्याच्याकरिता आठ आणे देणे फार कठीण गोष्ट होत असते.

दोन्ही गोष्टी उलट्या आहेत. कमाई आणि खर्चाचे प्रमाण व्यस्त आहे, हे चूक आहे. किती तरी श्रीमंत म्हणवणारे आलेशान मोटारीत दिसतात. परंतु कलकत्ता, मुंबई हे काही हिंदुस्थान नाहीत. हे तर हिंदुस्थानरुपी समुद्रातील थेंब आहेत. हिंदुस्थानची कल्पना तर त्याच्या झोपड्यांमध्ये गेल्यानंतरच येईल. या मूलभूत गोष्टी आहेत.

यांना जर हटवण्याचा प्रयत्न केला तर फार मोठ्या अडचणी निर्माण होतील. आज जे सुरू आहे ते बदलवण्याचा जर प्रयत्न करायचा असेल तर वरच्या वर्गातील लोकांची जळजळ होईल. याचे कारण याकरिता या लोकांना अधिक कर द्यावा लागेल. सरकारला सहकार्य करणारा हा वर्ग आहे.

यावरील उपाय समाजवाद आहे. यात सर्वांना समान ओझे वाहावे लागत असते. आणि सर्वांना समान संधी मिळत असते. माझी आणि शेतकऱ्याची काय तुलना? माझ्याजवळ पैसा नसेलही, परंतु जगाचा सामना करण्याची माझ्यात कुवत आहे, बुद्धी आहे. ही माझी दौलत आहे. शेतकऱ्याला बिचाऱ्याला कोणती संधी मिळते? तो गरिबीत वाढलेला असतो. जगाची असीम प्रगती झाली आहे याची त्याला कल्पनाच नाही. हा तर बिचारा दोन हजार वर्षांपासून जे ऐकत आला आहे तेच याला माहीत आहे. शहरात हे चुकूनमाकून भटकत असतात. यांचा उदरनिर्वाह यांच्या मजुरीवर होत असतो.

प्रत्येक माणसाला लहानपणापासून शिकण्याची समान संधी मिळायला पाहिजे. सर्व सारखे नसतात. काही अगदीच मंदबुद्धीचे असतात. काही हुशार असतात. परंतु त्यांना जर संधी मिळाली तर ९९% लोक तिचा लाभ घेऊ शकतात. आज तर ९५ टक्के लोकांना हा लाभ मिळूच शकत नाही. यांच्यातील अनेक मुत्सद्दी, अभियंता, वैज्ञानिक होऊ शकतात. परंतु या लोकांना संधीच मिळत नाही. तुम्हांला दिसेल की जिथे जिथे अशी संधी मिळते तिथे तिथे नवीन नवीन झळाळी येते. प्रत्येक ठिकाणी संधी मिळायलाच पाहिजे.

परंतु स्वराज्य आल्यानंतर गरिबीची, बेकारीची समस्या आपण कशा प्रकारे सोडवू? शंभर वर्षांपासून गरिबी वाढतेच आहे कारण आपला व्यापार, व्यवसाय हे सर्व इंग्रजांच्या ताब्यात गेले आहेत. आधी तर ते आपल्या व्यवसायांशी स्पर्धा करू शकत नव्हते. परंतु या लोकांनी कायदे करून ते व्यवसाय थांबवले, नंतर अनेक अडथळे आणले. निर्यातीच्या मालावर कर, जकात लावली. यामुळे सर्व व्यवसाय मोडकळीस आले. यामुळे ते व्यवसाय मोडकळीस आले. करोडो लोक बेकार झाले. सर्व गोष्टींची सुबत्ता असलेल्या देशात बेकारांची संख्या वाढली आणि त्यांचा ताण शेतजमिनीवर पडला.

जमिनीवरील ओझे वाढत गेले. संपत्तीची निर्मिती थांबली आणि जमिनीवरील ओझे वाढले. पन्नास रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्या पाच जणांच्या ठिकाणी दहा झाले तर काय होईल? यामुळे देश अधिकाधिक गरीब होत गेला. एकही नवीन व्यवसाय राहिला नाही. ही समस्या सोडवण्याचा एक मार्ग होता. कारखाने उघडण्यात आले असते तर असे होऊ शकले असते. परंतु इंग्रज सरकारच्या धोरणाने या गोष्टी होऊ दिल्या नाही.

हे सर्व थांबवण्याचा उपाय स्वराज्याशिवाय अजून काय असू शकतो? पूर्ण आणि अर्ध बेकारांनी कामाला लागणे हाच यावरील उपाय आहे. टाळ्या वाजवून गरिबी मिटणार नाही. परंतु ही मिटवण्याकरिता अनेक पिढ्या लागतील अशी गोष्टही नाही. आपण सर्व जर या कामाला लागलो तर ही समस्या थोड्याच काळात सुटू शकेल. मध्यम वर्गातसुद्धा भयंकर बेकारी आहे. प्रत्येक वर्गात बेकारी आहे.

काम दोन प्रकारे निर्माण होऊ शकते -

(१) मोठमोठे कारखाने उघडणे आणि त्याद्वारे संपत्ती निर्माण करणे.

(२) घरगुती कामात वाढ करणे. घरातल्या घरात कामकाज चालले तर पैसा खर्च न करता या गोष्टी आपण करू शकतो.

आपल्याला दोन्ही मार्गांचे अनुसरण करावे लागेल. या दोघांमध्ये संघर्ष नाही. परंतु यातून अधिक लाभदायक काय आहे असे विचारणे म्हणजे हवाई चर्चा करणे. याचे कारण यावर जितक्या काही उपाययोजना आहेत तितक्यांचा आपण अवलंब केला पाहिजे. मोठे कारखाने उघडणे शक्य असेल तर जरूर उघडा. कोणकोणत्या घरगुती उद्योगांचा प्रसार करावा याचाही आपण विचार केला पाहिजे.

मोठे कारखाने पाहिजेच हे तर मी सांगतोच आहे. परंतु ते शोषणाचेसुद्धा साधन होऊ शकतात. याचे कारण मजुरांना मजुरी म्हणून नफ्यातील फार कमी वाटा मिळतो.

आमच्या हाती सत्ता असती तर आम्ही दोन्ही पद्धतीने या गोष्टीचा अंमल केला असता. परंतु आमच्या हाती सत्ता नसल्यामुळे आपण कारखाने कसे उभारणार? हे आपल्या क्षमतेबाहेर आहे. यामुळे आपल्या हाती एकच गोष्ट आहे. गावखेड्यांमधील कामधंद्यात वाढ करणे. याकरिताच हे प्रदर्शन आहे.

तरुण मुले बेकार होऊन बसल्यामुळे हळूहळू त्यांचा अधःपात होऊ लागला आहे. त्यांच्यामधील धैर्याचा लोप होऊ लागला आहे. त्यांच्यात केवळ हाय-हाय करण्याची क्षमता राहिली आहे. याचे कारण असे आहे की माणसाकरिता काम एक नितांत आवश्यकता आहे.त्याशिवाय माणसात आत्मशक्ती राहू शकत नाही.

यामुळे घरगुती उद्योग वाढवल्याने आपली आत्मशक्ती वाढेल. निर्माण केल्यामुळे, देशाच्या संपत्तीत वाढ करण्याच्या भावनेमुळे यामध्ये प्राण फुंकले जातील. कारागीर चार पैसे मिळवण्याचेच काम करत नसतो. तो काम निर्माणही करत असतो. ही भावनाच त्याला जिवंत ठेवत असते. याप्रमाणे घरगुती उद्योग वाढवल्याने आपल्या आत्मशक्तीत वाढ होत असते.

५५ लाखात एखादाच महात्मा असू शकतो. परंतु बहुतेक तर देशावर ओझेच आहेत. जे बेकार बसले आहेत - ते साधू, फकीर वा तालुकदार राजे असे कोणीही असो ते देशावर ओझे आहेत. पोट भरण्याकरिता कोणाच्या ना कोणाच्या संपत्तीचे ते हरण करत असतात. माणूस जितके खातो तितके तर त्याने निर्माण केलेच पाहिजे. इतकेच नाही तर त्याहून जास्त निर्माण केले पाहिजे. तो जर निर्माण करणार नाही तर तो देशावर ओझे होईल.

वकील म्हणून जर मी फी घेतली तर त्यामुळे संपत्तीत वाढ होत नाही. यामुळे तर एका खिशातून दुसऱ्या खिशात पैसा जातो. जमीनदार संपत्ती निर्माण करत नाही. उलट तो शेतकऱ्याने निर्माण केलेल्या

संपत्तीतील वाटा घेत असतो. सावकार व्याज खातो. तोसुद्धा शेतकऱ्याच्या मिळकतीतील वाटा घेत असतो. त्यामुळे देशाच्या संपत्तीत वाढ होत नाही.

आज जगाचा उलटा न्याय हा आहे की जे संपत्ती निर्माण करत नाहीत त्यांची संपत्ती वाढत चालली आहे. आजकाल अशी विचित्र प्रथा सुरू झाली आहे. ही प्रथा जगाला अजून गरीब करणारी, जगाचे दिवाळे काढणारी आहे. आज परिस्थिती अशी झाली आहे की जो झोपतो त्याची संपत्ती वाढत जाते आहे आणि जो मेहनतमजुरी करतो तो गरीब होत चालला आहे. आपल्याला तर मातीच्या घरांची दुरुस्ती करायची आहे, त्यांच्यात सुधारणा करायची आहे. याकरिता लाखो रुपये पाहिजे. हे आपल्याला हिंदुस्थानात निर्माण करावे लागतील.

सोनेचांदी ही संपत्ती नाही, ते संपत्तीचे चिन्ह आहे. तुम्हांला जर एखाद्या अनोळखी भागात टाकले तर यांची तुम्हांला मदत होणार नाही. खरी संपत्ती तर तीच असते की जी माणसाच्या मेहनतीने जमिनीमधून आणि इतर गोष्टींमधून निर्माण होत असते. शेतकरी जमिनीतून अन्न निर्माण करतो. तो संपत्ती निर्माण करत असतो. सुतार जी कारागिरी करतो त्यामुळे संपत्ती निर्माण होत असते. माणसाच्या मेहनतीत जे कौशल्य आहे, त्यामुळे जे निर्माण होते ती खरी संपत्ती आहे. आपण ही संपत्ती जितकी वाढवू तितकी तितकी संपत्ती वाढली असे म्हणता येईल. ज्या गोष्टी अन्नधान्य निर्माण करतात त्या संपत्ती निर्माण करतात, वाढवतात.

देशाची, घराची गरिबी दूर करण्याचा हा उपाय आहे. हे प्रदर्शन तर केवळ याची सुरुवात आहे. हे प्रदर्शन चांगल्या प्रकारे पाहा. तमाशाप्रमाणे याकडे पाहू नका. एखादी गोष्ट कळत नसेल तर ग्रामोद्योग संघाला विचारा. मथितार्थ हा आहे की हातपाय हालवा, खरी संपत्ती निर्माण करा. स्वतःच्या आणि देशाच्या संपत्तीत वाढ करा.

*　　　*　　　*

जमनालालजींच्या कारखान्यात किती लोक काम करतात याचा हिशेब त्यांनी सांगितला. कारखान्यांचा उपयोग स्वराज्य मिळाल्यानंतरच होऊ शकेल. गावकरी आणि तुम्ही एकजीव व्हा इतकेच माझे मागणे आहे.

**२६-४-३६**

## बोरी गाव (नागपूर जिल्हा)

माझ्या प्रांतात जाऊन शेतकऱ्यांच्या मी ज्या भेटीगाठी घेत असे त्यांची मला आठवण होते. तुमच्या आणि आमच्या शेतकऱ्यांमध्ये, तुमच्या शेतकऱ्यासंबंधात कायद्यात फरक असू शकेल. तुम्ही मंजूर केलेल्या ठरावामुळे माझ्या मनात जी गोष्ट आली ती अशी की शेतकऱ्यांसमोर एकच समस्या असते त्यामुळे सर्व त्रस्त आहेत. हा प्रश्न शहरवासीयांचा नाही, शेतकऱ्यांचा आहे.

शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवायचा असेल तर शहरांच्या समस्याबद्दल काय करायचे? हे शेतकरी नागपूरच्या जवळपासचे असो की ब्रिटिश मुंबईजवळचे असो, शेतकऱ्यांची आणि शेतीत मजुरी करणारांची सर्वांची समस्या एकच आहे.. हिंदू-मुसलमानांची भांडणे गावखेड्यात फार कमी आहेत. सर्वात मोठा प्रश्न शेतकऱ्यांच्या अडीअडचणींचा आहे. किती गरिबी आहे आणि रोजी किती कमी होत चालली आहे? कितीही मेहनत करा, प्रयत्न करा, थोडेफार ऐकून घ्या. परंतु जगात आणि देशात शेतकऱ्यांची जी परिस्थिती ढासळत चालली आहे तिच्यावर उपाययोजना करणे कठीण आहे.

तुमचे दुःख, तुमच्या अडचणी तुम्हांलाच कळू शकतात. याचे उत्तर तर तुम्हीच देऊ शकाल. तुमचे दुःख, समजून घेण्याकरिता मी तुमच्याकडे येऊ शकतो, परंतु मी तर तुम्हांला केवळ सल्ला देऊ शकतो आणि तुमच्या दुःखाचे कारण काय आहे ते सांगू शकतो. समस्या थोड्याशा गावांची वा शेतकऱ्यांची नाही, ही समस्या संपूर्ण देशाची आहे. आपल्या प्रदेशात कॉंग्रेसचे कार्यकर्ते येत असतात आणि ते स्वराज्याची चर्चा करत असतात. स्वराज्याचा अर्थ काय आहे? मी तर शेतकऱ्यांना याचा पहिला अर्थ हाच सांगेन की शेतकऱ्यांची समस्या सोडवली पाहिजे, त्यांची गरिबी दूर व्हायला पाहिजे आणि त्यांच्या हाती सत्ता आली पाहिजे.राज्यपाल बदलवून, इंग्रजांच्या ठिकाणी देशी राज्यपाल आणून परिस्थितीत सुधारणा होणार नाही. आताही अनेक देशी राज्यपाल आहेत. त्यांनी तर आपल्याला आज ज्या यंत्रणेत घातले आहे त्यात आपण भरडतच चाललो आहो. ही यंत्रणा हटवूनच शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारू शकेल.

तुमचे पीक खराब झाले तर तुम्ही वायदा कमी करण्याकरिता ठराव करता हे ठीक आहे. पीक बुडाले, अर्ज घेऊन जा. वायदा कमी होईल. परंतु एक वर्षानंतर हीच समस्या परत येऊन उभी राहते. अशा प्रकारे परत परत अर्ज घेऊन जाण्यात शेतकऱ्यांचे बरेच नुकसान होते. या समस्येवरील उपाय कोणता? हा वायदा कमी

कसा होईल? हे तर ना मी सांगू शकतो ना अजून कोणी इंग्रज. ही समस्या सोडवणे या लोकांच्याही हाती नाही. परंतु शेतकऱ्यांची ही समस्या दूर करण्याचा उपाय काय? साम्यवादानेच या सर्व गोष्टीवरील उपाय सापडेल.

मूलभूत गोष्ट ही आहे की दुःख अर्जांनी दूर होऊ शकत नाही. याचे मूळ उपटून टाकले पाहिजे. हे करण्याकरिता दोन उपाय - जे करायचे आहे ते करण्याची शेतकऱ्यांच्या हाती शक्ती आली पाहिजे - कायदा करण्याची आणि जुने कायदे रद्द करण्याची. जोपर्यंत देशातील जनतेजवळ शक्ती नसेल तोपर्यंत हे लोक कोणाला ना कोणाला दाबतच राहतील. तुमच्या हाती म्हणजे तुमच्या प्रतिनिधीच्या हाती. बऱ्यावाईट राज्यपालाकरिता इंग्रजी-हिंदीचा प्रश्न नसतो. तुमच्या हाती या प्रश्नाचे उत्तर आहे. स्वराज्य हे एक प्रकारचे पंचायत राज आहे. या पंचायतीत आपण निवडलेले प्रतिनिधी असतात; तुम्ही निवडलेले हे प्रतिनिधी असल्यामुळे तुम्ही यांना काढूनसुद्धा टाकू शकता. त्यांच्यावर मोठमोठे अंमलदार हुकूम चालवतात आणि तुम्हांला त्यांचे ऐकणे भाग पडते. मोठमोठे अंमलदार मोठमोठे पगार खातात. त्यांच्यात आणि आणि आपल्यात किती मोठे अंतर आहे? कोणी सज्जन असेल तर आपल्याला मदत करील. पटवारी वा पोलीस हे तर त्यांचे प्यादे आहेत. परंतु जे मोठे अधिकारी असतात त्यांचे काम तुम्हांला खुश करण्याचे नाही, परंतु त्याहून मोठ्या अंमलदाराला खुश करण्याचे असते. यामुळे जनता नाखूश झाली तर ती अशा अंमलदारांना काढून टाकील अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होईल तेव्हा ते तुमची सेवा करतील. आज तुमच्यात ती शक्ती नाही. हे अंमलदार वरवर पाहत असतात. त्यांच्यावरचे त्यांच्यावरच्यांकडे पाहतात. परंतु खाली शेतकऱ्यांकडे कोणीही पाहत नाही. पंचायत राज आले तर हा सगळा रंगच बदलून जाईल.

बाजूच्या समासात- मेकलागन.

महाल आणि मातीची घरे. - उच्च आणि निचांमध्ये इतका भेद असणे ही काही आश्चर्याची गोष्ट नाही. महाल, ऐशआराम आणि उपासमार अशी ज्या देशात परिस्थिती असेल त्या देशाचे भले होऊ शकत नाही. याबाबतीत आम्हीसुद्धा पापी आहो. आम्ही फार मोठी चूक केली आहे आणि आपल्याच देशातील लोकांना गुलाम करण्याचा प्रयत्न केला आहे. आश्चर्याची गोष्ट ही आहे की इतक्या दिवसांपर्यंत आपण उच्च-नीच असा भेद मान्य केला आहे. आपल्याला जर उठायचे असेल तर कोणीही आपल्याला नीच समजायला नको. सर्वांना वर चढायची, प्रगती करायची संधी मिळाली पाहिजे. सगळ्यांना खायला-प्यायला मिळायला पाहिजे, शिकायची संधी मिळाली पाहिजे. असे तर साम्यवादातच होऊ शकते.असे तर एक दिवस संपूर्ण देशात आणि जगातही होईल.

परंतु आज तुम्ही काय करायला पाहिजे? शेतकऱ्यांचे अधिकार वाढावे, शेतकऱ्यांमध्ये शक्ती यावी म्हणून शेतकऱ्यांनी कांग्रेसच्या कार्यक्रमात मदत केली पाहिजे. परंतु असे करत असताना महत्त्वाची गोष्ट ही आहे की कॉंग्रेसचे काम केल्यानंतर तुम्ही किसानसभासुद्धा तयार केली पाहिजे. तिच्या द्वारे तुमचे दुःख व्हावे म्हणून तुम्ही आंदोलन करा. स्वराज्याच्या लढ्यात पूर्णपणे भाग घ्या. असे केल्याने किसान सभेची शक्ती वाढेल.

आज तर पोलिसांचे प्यादे तुमची दमछाट करत आहेत. गिरणी मजूर तुमचे भाऊच आहेत. त्यांची एकट्याची कोणतीही शक्ती नाही. परंतु मजूर संघटनेची शक्ती वाढली आणि त्याद्वारे हे संघर्ष करत आहेत आणि त्याचा परिणामही होतो आहे. १०,००० गिरणी मजुरांसमोर गिरणी मालकाला झुकावेच लागेल. अशाच प्रकारे शेतकऱ्यांनी संघटना केली तर त्यांना कोणतीही शक्ती अडवू शकत नाही. संटनेचा अर्थ एमेकांना मदत करणे. आपल्यामध्ये सहकार्य करण्याची इतकी पद्धत नाही. गाडी तुटली तर आपल्याला मदत करणारा कोणीही सापडत नाही. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो, परंतु शेजाऱ्याचे अंगण घाणेरडे करतो. गाव घाणेरडे करून आपण रोगराई पसरवतो.

ग्रामसंघ करण्याबद्दल तुम्हांला सांगितले आहे, तेसुद्धा करा. याचाही फायदा होईल. परंतु अशा फुटकळ किरकोळ गोष्टींनी पूर्ण फायदा होणार नाही. जी यंत्रणा तुम्हांला भरडते आहे ती यांच्या ओझ्याने तुटून जाईल. दुसऱ्या देशातही जमीनदारीची प्रथा होती. परंतु आता ती नाहीशी होऊ लागली आहे. या प्रथेच्या मुळाशी असलेले कायदेकानून बदलवण्याची वेळ आलेली आहे. आज तर विदेशी लोकांचे राज्य आहे. हे राज्य बदलवण्याकरिता किती वेळ लागेल हे मी  सांगू शकत नाही. परंतु हे तुटलेल्या गाड्यासारखे आहे. तुमच्या आधारावर हे उभे आहे. तुम्ही जितक्या लवकर संघटना कराल त्यावर हे आधारवेवे आहे.

स्वराज्याची  आणि किसानांची समस्या एकच आहे. देशातील जनतेची शक्ती वाढवली पाहिजे. असे करण्यात तुम्हांला कोणतीही शक्ती अडवू शकत नाही. भीक मागून काम भागणार नाही. कोणताही देश भीक मागून मोठा झालेला नाही. तुम्ही तुमची शक्ती वाढवूनच तुमचा त्रास कमी करू शकाल. यामुळे लढाईकरिता तयारी करा. लढाईत त्रास सहन करावाच लागत असतो. परंतु त्रास तर असाही सहन करावा लागतो आहे.

# ८. प्राध्यापक होल्डेन - आहारात मीठ

**१५-४-(१९)३६**

'मानवामधील असमानता' या ग्रंथातील एका निबंधात जे. बी. एस होल्डेन श्री गांधींच्या सेंद्रीय रसायनासंबंधीच्या कार्यक्रमाची चर्चा करतात. याचे कारण 'कोणतेही जरी राज्य आले तरी या विषयाच्या विरोधातील आणि बाजूने युक्तिवाद होत राहणारच आहेत.'

युरोपातील अनेक लोकांमध्ये मीठ ही शौकाने खाण्यासारखी वस्तू आहे असे समजतात. काळ्या वा पांढऱ्या मिऱ्याप्रमाणे मसाला म्हणून ते मीठ वापरतात. खरोखर मीठ वापरायचे असेल तर ते फार कमी मीठ घेतले तरी चालते, कारण जास्त मीठ गेतले तर ते शरीरातून निघून जाते. आहारासंबंधी सुज्ञपणे विचार करणाऱ्या काही लोकांची अशी मान्यता आहे. याचा अर्थ असा नाही की कमी मीठ घेतल्याने आपल्या प्रकृतीत सुधारणा होईल. परंतु गोडधोड खाल्ल्यामुळे आपल्या शरीरात फार कमी मीठ झाले तर फार कमी मिठामुळे आपली प्रकृती बिघडते. विलायत याला अपवाद आहे तो चवीकरिता. याचे कारण हिंदुस्थानला हा नियम लागू होत असल्यामुळे तिथे हा सिद्ध होतो.

बर्मिंगहॅममध्ये आजकाल जे खननशास्त्राचे अध्यापक आहेत त्यांतील प्राध्यापक मोसेंनी आठेक वर्षांच्या अधिक काळापासून खाण मजुरांच्या आहाराचा अभ्यास केला आहे. या काळात मजुरीचे दर प्रमाणापेक्षा जास्त होते. आणि आज अशक्य वाटावे अशा प्रकारे खाण मजुरांना त्यांचा आहार आवडायचा. साधारण खाणमजूर खूप खातो. याचे कारण खाण मजुराचे काम मेहनतीचे आहे आणि मेहनतीचे काम जास्त आहाराची मागणी करत असते. परंतु खूप खोल खाणी खूप गरम असल्यामुळे तिथ काम करणारे मजूर आश्चर्य वाटावे इतके मीठ घातलेले अन्न खात असत. जसे की डुकराचे बेकन आणि लाल हेरिंग मासोळी. हे लोक वरूनसुद्धा जेवणात मीठ घेत असत. आणि काही काही तर मीठ घातलेली कमी नशा येणारी दारूसुद्धा (बिअर) पसंत करत असत. यामुळे मोसेंनी निःशंकपणे सिद्ध केले की घामातून मीठ निघून जाते, आणि त्याची उणीव भरून काढण्याकरिता जास्त मिठाची आवश्यकता असते.

जगात सर्वाधिक घाम गाळायची जी मजुरी असते तिच्यात तासाला पाव गॅलन घाम गाळला जातो असा हिशेब एका इंग्रज खाण मजुराने केला होता. आणि एका पाळीच्या कामात अठरा पौंड वजनाचा घाम गरम खाणीत गाळला जातो. इतक्या घामात अडीच तोळे मीठ असते. सामान्य इंग्रजाच्या जेवणात जितके

मीठ असते तितक्या मिठाचा हिशेब केला तर ते दीड तोळा होईल. कमी मीठ खाल्ल्याने अशक्तपणा येतो आणि पोटात खूप कळा येतात.

हिंदुस्थानात उन्हाळ्यात माणसाला दिवसभर घाम गाळावा लागतो. ती उणीव दूर करायची असेल तर दररोज माणसाने अडीच तोळे मीठ खायला पाहिजे. यामुळे जेवणात मिठाला अपरिहार्य स्थान मिळाले आहे. इंग्लंडमध्ये गव्हावर जकात कर लावला तर ते तेथील जनतेला आवडणार नाही, तसेच जीवनशास्त्राच्या दृष्टीने मिठावरील कर वांछनीय नाही. कोणी म्हणेल की विलायतेत आयात होणाऱ्या खाद्यान्नावर कर लावायचा की नाही यावर शरीरशास्त्रज्ञ निर्णायक मत देऊ शकत नाहीत. या कारणामुळे शहरातील मजुरांची कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता असेल तर ते मजूर शेतीच्या आरोग्यदायी वातावरणात कमी पगारावर काम करू शकतात.

परंतु हिंदुस्थानात मिठासंबंधी अशा प्रकारचा युक्तिवाद करता येऊ शकत नाही. इथे लोकांच्या प्रकृतीची हानी होईल हे स्पष्ट आहे. अर्थातच हा कर काढून टाकल्यामुळे सरकारच्या मिळकतीचा मोठा स्रोत वाळून जाईल. परंतु ज्या संस्कृतीत जीवनशास्त्राच्या प्रश्नांना, जीवनमरणाच्या समस्येला आर्थिक प्रश्नांना जितके महत्त्व दिले जाते त्या संस्कृतीत हा वाद उपस्थित केला जाऊच शकत नाही. खरी गोष्ट अशी आहे की मिठावरील कराच्या उत्पन्नात फार सहजपणे वाढ करता येऊ शकते, आणि हे ईस्ट इंडिया कंपनीपासून सुरू आहे. परंतु हिंदुस्थानात इंग्रज सरकारचा एकमेव बचाव हा आहे की एकूण पाहता मिठाच्या किंमती कंपनीच्या राज्यापासूनच वाढत आहेत आणि हे सर्व अशाच प्रकारे सुरू राहीले पाहिजे. जीवनशास्त्राच्या आधारावर स्वराज्यवाद्यांचा मिठावरील कर सुरू ठेवण्याबद्दलचा युक्तिवाद असा आहे.

यानंतर दारुबंदीबद्दल. शक्य आहे की कदाचित असे खात्रीपूर्वक म्हणता येत नसेल, परंतु विलायतेत परिणामकारक दारुबंदी केल्यामुळे विलायतेतील लोकांची प्रकृती अधिक चांगली झाली आहे. पहिल्या दृष्टिक्षेपात हा युक्तिवादसुद्धा हिंदुस्थानला अधिकच लागू पडतो. हिंदुस्थानात राहणारे युरोपीय सायंकाळ होईपर्यंत सामान्यपणे दारू पीत नाहीत. यामुळे येथील सामान्य मान्यतेला पुष्टी मिळते की समशितोष्ण वातावरणापेक्षा गरम हवेतील हवामानात दारूमुळे जास्त नुकसान होते. हिंदुस्थानमधील बहुजनसमाज उपासमारीच्या रेषेवर जगतो आहे. आणि त्यांच्याबद्दल असे वाटते की यांनी दारूऐवजी अन्नधान्यावर खर्च केला तर ते अधिक चांगले होईल.

कदाचित गांधी असा युक्तिवाद करत असतील. परंतु मला असे वाटत नाही की त्यांनी वा त्यांच्या अनुयायांनी नाऊरच्या दुःखद घटनेविषयी ऐकले असावे. दैनिक वृत्तपत्रांमध्ये या गोष्टीला विशेष प्रसिद्धी मिळाली नाही. याचे कारण व्यक्तिगत स्वातंत्र्यात सरकार हस्तक्षेप करत नसते हा वस्तुपाठ ते शिकले आहे. विषुववृत्ताजवळ पॅसिफिक महासागरात नाऊर वा प्लेझंट बेटे येतात. इथे भरपूर फॉस्फेट मिळते. यामुळे तेथील रहिवाशांना स्वदेशभूमीच्या तुकड्यावरून काढण्यात आले आणि जगात जिथे अन्नधान्याचे विशेष उत्पादन होते त्यातून त्यांना वाटा दिला. अशा प्रकारे त्यांना आंबवलेली ताडरसापासून तयार केलेली ताडी पिण्याची सवय लागली होती. परिणामी अनेकदा ते पूर्णपणे भानावरही राहत नसत. यामुळे त्यांची खोदकाम करण्याची क्षमता निःसंशयपणे कमी होत असे. लीग ऑफ नेशन्सच्या आदेशाप्रमाणे नाऊरवर ऑस्ट्रेलियाचे शासन होते. तेथील कल्याणकारी सरकारने ताडी पिण्याच्या विरोधात मनाई हुकूम काढला. यामुळे कदाचित तेथील लोकांची कार्यक्षमता वाढलीही असेलही, परंतु बालमरणाचे प्रमाणे मात्र पन्नास टक्क्यांनी वाढले.

शोध घेता असे आढळले की दूधपित्या मुलांना बेरीबेरी हा रोग होऊ लागला होता. याचे कारण त्यांच्या आहारात जीवनसत्त्व ब कमी होऊ लागले होते. आयांना भाताचा कंटाळवाणा एकच आहार मिळत होता. त्यातून ब जीवनसत्त्व मिळत नव्हते. परंतु ताडी ज्यापासून बनवत असत त्या यीस्टमध्ये ब जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात होते. स्वास्थ्य विभागाच्या डॉक्टरच्या नजरेत ही गोष्ट आली. आणि उचित सूट दिल्यानंतर ताडी प्यायची तेथील लोकांना परवानगी मिळाली. बालमृत्यूचे प्रमाण कमी होऊन ते सात टक्क्यावर गेले. १९३० साली रॉयल सोसायटी ऑफ मेडिसीनच्या कार्यकारिणीत नाऊर प्रकरणाविषयी एक अहवाल दिला आहे.

मध्य हिंदुस्थानात अनेक बाबतीत अशीच परिस्थिती आहे. अनेक लोक ब जीवनसत्त्वाच्या किमान पातळीवर जगत आहेत, आणि अशा प्रकारे त्यांना अनेकदा बेरीबेरी रोग होतो आहे.अशा परिस्थिती प्रौढ लोक आजाऱ्यासारखे जरी होत असले तरी टिकून राहतात. परंतु बालमृ ूत्यूचे प्रमाण वाढले आहे. नीरेपासून बनवलेल्या ताडीने थोड्या प्रमाणात का होईना ब जीवनसत्त्वाची उणीव कमी होते. ताडाची झाडे कापून टाकल्यामुळे आणि इतर कारणांमुळे तसेच श्री गांधीच्या आणि त्याच्या अनुयायांच्या प्रयत्नामुळे हिंदुस्थानातील लोकांचा ताडीचा वापर निश्चितपणे कमी झाला आहे. परंतु याला माझा विरोध तेथील लोकांच्या प्रेमामुळे असेल. तरीसुद्धा मी माझे मत जाहीर केल्याशिवाय राहू शकलो नाही. आणि तसेसुद्धा हिंदुस्थानातील बालमृत्यूचे प्रमाण कमी होत चालले आहे. गांधींवर अन्याय न करण्याकरिता मी सांगेन की मद्यामध्ये एकही जीवनसत्त्व नसते. शक्य आहे की व्हिस्की पिणे बंद केले तर हिंदुस्थानातील युरोपीय लोकांची कार्यक्षमता वाढेल.

# ९. अ - लखनौ-अलाहाबादमध्ये वाचन

संस्कृत श्लोक आणि शब्द

लखनौमध्ये डॉ. राधाकुमुद मुकर्जीकडे मुक्काम. त्यांचेकडे आंघोळ वगैरेचा कार्यक्रम होता. त्यांच्याकडे एक फार चांगला संस्कृत-जर्मन शब्दकोश पाहायला मिळाला. त्यातून अनेक चांगल्या शब्दांचा शोध लागला.

अलाहाबादमध्ये ‘राजतरंगिणी’ हे पुस्तक वाचण्यात आले. त्यात अनेक शब्द समजून घेण्यासारखे मिळाले. अस्पृश्यतेवर तर नवीनच प्रकाश पडला. त्यात किती तरी श्लोक समजून घेण्यासारखे होते. ते टिपून घेतले -

संडासाबद्दल त्यात अगदी नवीन शब्द ‘अवस्कर’ आढळला.

श्वपाकी शयनावासासन्नावस्करमंदिरे
सौचस्थितं तं निःशस्त्र ते रात्रौ प्रादुरेकदा
अवस्कर ते वर्त्मना शौचगृह - १ -६ -९९सुद्धा

‘अवस्कर’विषयी जर्मन शब्दकोशात असे आहे -

[अवस्कृ म्हणजे पाय घासणे]. -  महाभारत ३ - १४६ - ७६

विष्टा - मळ - पाणिनी - ६ - १ - १४८

पायखाना - परसाकड करण्याची जागा.

अवस्कर मंदिर - पायखाना

अवस्कर गृहमार्जित याश्वादी निचयस्थानम् ।

दिदा म्हणजे मोठी बहीण. - विद्देति गौरवात् ।

देशाकरिता प्राण द्यावा वा घ्यावा असा सिद्धांत या श्लोकात आला आहे.

धर्म - सर्वोपकार्येक क्षुद्र क्षपणमुच्यते

जघनां जगरं सोऽपि जन्तूनामन्तकं जिनः ।

दुर्वुतदमने रमामिः कृते तेजस्विनो जनात्

भूयोऽप्यधिकृतो बिम्यन्न कशिवत्वयीऽयेत्प्रजाः ।
कायस्यास्य परित्यागदन्ताजन्तवो यदि
सुखिन : स्यु रसी मातर्वणी ज्या ज्यायसी नर्कम् - २२३४-३६

एका स्त्रीच्या सद्गुणाचे वर्णन आहे :

वात्स्ते यनांन्वितं प्रेम गौरवेण प्रियः वचः
श्रीचित्येन च दाक्षिण्य सापत्यमिव यादधे ।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।
लब्धा खितितत्कृत्य कारणा पलिका करात्
तस्यान्त समया रासा श्लोके नानेन पावनी ।।

यात अस्पृश्य शब्दसुद्धा येतो -

निज चितापराधेन कुर्वन्नीतिव्यतिक्रमम्
अस्पृश्येभ्यः परिभवं भूपालो दयुपालब्धावत् ।।
कशाय मधुरं तिक्तकटुकं प्रातसत्यियत
निम्बरच तिक्त श्रेष्ठ : कषायेख दिरस्तथा ।
मधूको मधूरे श्रेष्ठ : करंच कटुके तथा
क्षौ द्रव्योपगीर्वतम् सतैलं सैन्धवैनच ।।

यानंतर सप्रमाण लेखक भावमिश्र भूतकाळाचे वर्णन अधिक सूक्ष्मपणे करतो -

अर्के वीर्य वेटे दीप्ती : करनजे विजयो भवेत्

प्लक्षे चैवार्थ संपति वदर्यां मधुरो ध्वनिः ।।
खदिरे मुखसौगंध्यं बिलवे तु विपुलंघनं
डदुम्बरेतु वाक्सिद्धिराम्रे त्वारोग्यमैव च ।
कदम्बे तु धृतिमैधा ब्रखाचम्पके च दृढामतिः
शिरीषे कीर्ति सौभाग्य भायुराग्यो मैव च ।
आपामार्ग धृति मैघा प्रज्ञाशक्तिस्तथा ध्वनिः
दाडिम्बे सुंदराकारः ककुर्ये कुरजैस्तथा
जानी तगर मन्दारै दुःस्वप्नं च विनश्यति ।।

दाताची सफाई - दांतण करण्याकरिता तुरट, गोड वा कडू चव असलेल्या झाडाची फादी वापरा - सुश्रुत

'इंडियन कल्चर' (इंडियन रिसर्च इन्स्टिट्यूट, कलकत्ता, १७० माणिकतोला स्ट्रीट कलकत्ता)

प्रकृती आणि सार्वजनिक साफसफाईवर गिरिजाप्रसाद मजमुदारचा लेख. जंतुनाशकाबद्दलचे विचार टिपून घेतले.

सुश्रुत -

मयूरपिच्छं निम्बस्य पत्राणी बृहतीफलम्
मरिच हिगु मोसीच बिजं कार्यास संभवम् ।।

यांचा धूप करा.

## ब. - निर्वाण, विषमता आणि रोगांचा अभ्यास

'बुद्धनिर्वाण - भगवान बुद्धाने कोणता उपदेश केला?' या शीर्षकाच्या लेखात आर. सी. मजमुदार 'विकायास'संबंधात अनेक गोष्टी अधोरेखित केल्या आहेत. यावरून लक्षात येते की भगवान बुद्ध निर्वाणचा अर्थ पूर्णपणे नष्ट होणे असा करत नाहीत. उदमणीत निर्वाणासंबंधीचे अनेक उल्लेख असलेल्या पहिल्या दशकातील मी एक श्लोक घेतो -

'तेव्हा पाणी किंवा पृथ्वी नव्हती. नव्हता अग्नीही. ना वारा वाहत होता. ना तारे चमकत होते आणि सूर्य दिसत नव्हता. चंद्र चांदणे पसरवत नव्हता आणि तरीही अंधकारसुद्धा नव्हता. आत्मा साध्य असेल आणि मुनी खरा ब्राह्मण असेल तर तो तिथे पोहोचतो. तो साकार आणि निराकारही असतो आणि तेव्हाच त्याच्या सुखदुःखाचा लोप होतो.'

## क. माणसांमधील विषमता

येत्या शतकात जीवविज्ञान विज्ञानाचा जसजसा विकास होत जाईल तसतशी माणसामध्ये जन्मजात जी विषमता आहे तिचा स्वीकार करावा लागेल. सध्या युनायटेड स्टेट्समध्ये ही सर्वात जास्त दिसून येते कारण तुलनात्मक दृष्टीने पाहिले तर तिथे शिक्षण मिळवण्याची संधी सर्वत्र पसरलेली आहे. सार्वत्रिक शिक्षणाच्या परिणामी समानता आढळत नाही तर शैक्षणिक भेदामुळे विषमता दिसून पडते. विज्ञानाच्या सिद्धांताप्रमाणे वैज्ञानिक दृष्टीने सुव्यवस्थित समाजात माणसांमधील विविधता नैसर्गिक म्हणून स्वीकारावी लागते. हवामान आणि ऋतूच्या फेरबदलाप्रमाणे. थोडावेळ यांच्यावर मात करता येते, परंतु यांना पूर्णपणे नियंत्रणात आणणे कठीण आहे. विलायतेत दहा मुलांमध्ये एक मुलगा जन्मतःच काही व्यंगासह जन्मत असतो. आणि इतक्याच प्रमाणात लोक आपल्या सहकाऱ्यांना फार मदत करू शकत नाहीत. यांचे कारण अंधत्व, बहिरेपण, आणि असेच इतर जन्मजात व्यंग त्यांच्यात असते. इतर ९९% लोकांचा समाज उपयोग करू शकतो.

'माणसाची कार्यशक्ती' नावाच्या पुस्तकात डॉ. स्पिअरमन म्हणतात की सामान्य पातळीवरील स्त्री, पुरुष आणि मुलात अल्प लोकांमध्ये विशिष्ट प्रतिभा असते तर इतर बाबतीत ते ढ असतात. आणि बहुतेक लोक सामान्य असतात. त्यांच्यात अशी काही प्रतिभा आहे काय याचा शोध घ्यायला पाहिजे. विशेषतः असामान्य बुद्धिमत्ता असलेल्यांचा.

## ड. आजारीपणाचा उपयोग

आगरू (स्कर्व्ही) च्या रोगाने खलाशी भाजीपाल्याच्या अभावी मरत असत. यावरून या प्रश्नाकडे लक्ष वेधले गेले, आणि त्यानंतर शंभरेक वर्षांनंतर जन्मलेली मुलांची सर्व प्रकारच्या यातनांमधून सुटका झाली आणि काही तर मरता मरता वाचले. कोणी जर रोगामुळे यातना सहन करत खितपत पडलेला असेल आणि मृत्यूला शरण जात असेल आणि इतरांच्या हिताची जर त्याला काळजी वाटत असेल तर त्याने असा विचार केला पाहिजे की त्याला ज्या यातना होत आहेत तशा यातना अजून कोणाला सहन कराव्या लागू नये. ते लोक

अशा प्रकारच्या यातनांमधून वाचले पाहिजे. मृत्यूपूर्वी आणि नंतर व्याधिग्रस्त माणसाच्या रोगांचा पूर्ण अभ्यास झाला पाहिजे. आणि विशेषेकरून असाधारण रोगाचा. डोक्यातील गाठीने कोणी माणूस मेला तर त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या डोक्याची तपासणी केली तर त्यामुळे मिळालेल्या माहितीची अनेकांचे जीव वाचवण्याकरिता मदत होईल.

# १०. खादी आणि ग्रामोद्योग

**१५-४-(१९)३६**

(सायंकाळी ६.१५ गांधीजींचे तंबूत भाषण झाले.)

ही प्रदर्शनाची पूर्णाहुती आहे.

डॉ. मुरारीलालला लोभ झाला. मला पाहून तुम्हांला काय मिळेल? मलासुद्धा थोडा लोभ झाला. थोडा पैसा मिळाला तर चांगले असे मला वाटले. तुम्हाला सांगतो, लक्ष ठेवा.

आज आलोच आहे तर प्रदर्शनाच्या मध्यवर्ती कल्पनेकडे तुमचे लक्ष वेधतो. हिंदुस्थानातील कोणतेही गावखेडे घ्या. सगळ्यांना खायला, प्यायला, कपडालत्ता पाहिजे. खाण्याचे साहित्य खूप नाही. जे लोक गहू पिकवतात, ते स्वतःसाठी लागणारा गहू ठेवून बाकीचा विकतील असे नाही. त्यांना पोटभर खायला मिळत नाही. दुसऱ्या गोष्टीही विकत घ्यायच्या असतात. पीक आले तर पीक विकून दुसऱ्या गोष्टी विकत घेतो. या सर्व गोष्टींकरिता लागणाऱ्या पैशाइतका गहू कोणाजवळ नसतो. हिंदुस्थानात शंभर बिघे जमीन असलेले शेतकरी तर नाहीत. एका कुटुंबाच्या वाट्याला साडेतीन बिघे जमीन मुश्किलीने येते. अनेकांजवळ तर जमीनच नाही. ज्यांच्या जवळ लाख रुपये आहेत त्यांना मिळवून हा हिशेब काढला आहे. कपड्यांचेसुद्धा असेच हाल आहेत. शेतीच्या कामाकरिता कायद्याची शक्ती पाहिजे. आपला माल विकल्यानंतर जो पैसा आपल्या हाती येतो, तो पूर्णपणे मिळतो तेव्हा कुठे जमिनीकरिता आपण काही करू शकतो.

कापड मात्र अशी वस्तू आहे की जी आपण हवी तितकी निर्माण करू शकतो. १९१८ साली मी खादीवर इतका भर देत नव्हतो. गिरण्या तर आहेतच. आणि सर्व गिरण्यांनी स्वदेशाभिमानाने प्रेरित होऊन गिरण्या चालवल्या तर सर्वांना पुरेल इतके कापड निर्माण होऊ शकते. या गिरण्या सुरू आहेत म्हणून मी खुश आहे, परंतु खूप खूश नाही. सर्व मिळून २० लाख मजूर मुश्किलीने काम करत असतील. अशा प्रकारे गिरणीमजूर फार थोडे आहेत. गिरणीमजुरांना किती मिळते हे तर तुम्हांला प्रदर्शनातील तक्ता पाहिला तर त्यावरून कळू शकेल. गावखेड्यातील उद्योगाचे केंद्र खादी आहे. याचे दुसरेसुद्धा एक कारण आहे. यात इतर उद्योगांचासुद्धा समावेश होतो. जे लोक कापड विणायचे काम करतात त्यांनाही थोडा पैसा मिळतो.

स्वस्त खादी देण्याचा आम्ही प्रयत्न केला. तो इतका की १० आण्याला जितकी खादी मिळत होती तितकी आता मिळू शकत नाही. ती फार नरम होती आणि तिचेच टॉवेल तयार करण्यात येत असत. ती खादी आता दोन आणे वार मिळते. इतकी स्वस्त खादी देण्याकरिता चरखा संघाला किती मेहनत करावी लागते? परंतु कताई करणारांचा आपण विचार केलाच नव्हता. या बिचाऱ्यांना एक आणा जरी दिला तरी यांच्या डोळ्याच्या पुतळ्या नाचू लागतात. खुश होण्याची ही गोष्ट नाही. ती तरआपल्यासाठी लाजेची गोष्ट आहे. एक दमडी मिळाली की हे नाचतात. यांचा आम्ही विचार केला आणि ठरवले की १७ आणे घेत होतो तेव्हाही लोक खादी तर विकत घेतच होते.

आजसुद्धा ते का घेणार नाहीत? काम करणारे म्हणाले, "इतकी महाग खादी कोण घेणार?" मी त्यांना फटकारत म्हणालो, "तासाला एक आणा नाही तर निदान एक पैसा तर द्यायला पाहिजे. परंतु हे तर असे झाले की तुम्हांला मदत करा, तुम्ही तुमचे शौक पूर्ण करा, खादीकेंद्रात जा, किती सुंदर वस्तु आहेत हे पाहत राहा. फेल्ट तर माहीत आहे ना? फेल्ट हा जपानी कापडाचा तुकडा आहे. हा तुकडा फार स्वस्त विकतात. फेल्टच्या तुलनेत तर खादी महागच पडेल. आपल्या देशाकरिता कोणती गोष्ट हितकर आहे याचा विचार करा.

साम्यवादाचे भरपूर साहित्य प्रकाशित होत आहे. सहकार्. आपल्याकरिता नाही तर सर्वांकरिता काम करा. 'सबै भूमी गोपालकी'. गोपाळ देवाचे नाव आहे. शेतकऱ्यालाही गोपाळ म्हणतात. गोपाळांना एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम करायचे आहे. असे केले तरच 'हिंदोस्तां हमारा' म्हणण्याकरिता आपण जिवंत राहू शकू.

हिंदुस्थानाकडे दरिद्रनारायणाच्या दृष्टीने पाहा, तर कळेल की खादीच स्वस्तात स्वस्त वस्तु आहे. बिपिन पाल एकदा म्हणाले होते की 'आपले हवामान इतके चांगले आहे की इथे डासही राहू शकतात आणि आम्हीही राहू शकतो, आणि गरीबसुद्धा.' युरोप, अमेरिकेत असे राहणे जमणार नाही.

यामुळे आपण जास्तीचे कपडे घालून घामेजलेल्या शरीराने का राहावे? ईश्वर म्हणतो की तुम्ही जर गरिबांचा विचार करता करता जास्त काम कराल - मग तुम्ही शीख असा की पारसी असा की मुसलमान असा - तर मला ते कळेल. माझ्या सेवकाची सेवा कराल तर ती सेवा माझ्यापर्यंत पोहोचेल. जपमाळ तर कर्माने फिरते. असा विचार कराल की नाही ते मला सांगा. बापू खराब आहे, खादी खराब आहे हे श्ब्द मला सांगू नका. माझ्याकडे कोणीही आपल्या आईवडिलांची तक्रार करत नसतो.

आम्ही म्हणजे वाचा नसलेले गरीब. शेतकरी त्याने निर्माण केलेल्या वस्तूंच्या माध्यमातून बोलत असतो — 'आम्ही तर या वस्तू तयारच करू शकतो; तुम्ही या वस्तू स्वीकाराल, तेव्हाच खऱ्या अर्थाने तुम्ही हिंदुस्थान स्वीकाराल.' या दृष्टिकोनातून तुम्ही तिकडे जाल, तर माल उपलब्ध आहेच. पण आम्हांला लुटून नेऊ नका. आणि जेव्हा महाराष्ट्रात जाल, तेव्हा त्यासाठी तयार होऊनच जा.

जवाहरलालने काय भाषण केले ते तर तुम्ही ऐकलेच आहे. ते शूर पुरुष आहेत. ते रडणारे माणूस नाहीत. त्यांना तर काय करावे हेच माहीत नाही. लोकांना कशा प्रकारे स्वराज मिळेल? ज्यांच्याबरोबर हृदय, बुद्धी जाऊ शकत नाही त्यांच्याबरोबर काम करणे कसे शक्य होईल? हे दुःख नाही. देशाशिवाय आमच्याकरिता दुसरे काहीही नाही ही गोष्ट तर आपण करून दाखवायची आहे.

हे तर कमलाला (कमला नेहरू) सोडून आलेले आहेत. अशा प्रकारे सोडून आलेले आहेत की आपल्यालाही त्याचे दुःख व्हावे. हे तिला निरोप देऊन आलेले आहेत. आल्यानंतर यांनी ज्या गोष्टी पाहिल्या त्यांनी हे व्यथित झाले आहेत. मला तर काही त्रास नाही. हे तर तुरुंगातून निघाले आणि सरळ तिथे गेले. मी तर लोकांची आशा पाहिली आहे, उत्साह पाहिला आहे. हे कार्यकारिणीचे प्रमुख आहेत, परंतु हे दुःख पाहून आले आहेत. त्यांच्या दुःखाचे कसे वर्णन करावे या विचारानेच मी व्याकूळ झालो आहे. परंतु मला बरेसुद्धा वाटते आहे. अशा परिस्थितीतही हे तुम्हांला आणि महासभेला पूर्ण मदत करत आहेत. मूक होऊन सेवा करा. ग्रामोद्योगासंबंधी हे जे एक तास बोलले ते मी ऐकले आहे.

जपानचे फेल्ट घेण्याऐवजी खादी घेतली. यात त्याग काय केला? हे समजण्याइतके तुमच्यात थोडेसे ज्ञान आले आहे. मला तर तुम्हांला गावखेड्यांचे वेड लावायचे आहे, खादीचे वेड लावायचे आहे. मला कळत नाही की या वेळी मी तुम्हांला पाहतो आहे की तुम्ही मला. मृत्युमुखात पडलो आहे, परंतु अजूनही मी माझे तोंड बंद केलेले नाही. मी फार जास्त बोललो आहे, तुम्ही त्यांतील आवडेल तितके घ्या. यामुळे तुमचे भले होईल.

# ११. सेवाग्राममध्ये

## अ. गावकऱ्यामध्ये

**१९-४-(१९)३६**

ईश्वरकृपा अपार आहे म्हणून मी येऊ शकलो. मीराबेन इथे येऊन बसल्या आहेत. आपण इथेच कायम वास्तव्य करू शकतो असे त्यांना वाटते. परंतु त्या नेहमीकरिता इथे राहू शकणार नाहीत असे मला वाटते. मी पाहिले आहे की त्या कोणतेही मेहनतीचे काम केल्याशिवाय राहू शकत नाहीत. आणि जिथे कुठे राहायचे ते माझ्याच कामाकरिता असा त्यांनी संकल्प केलेला आहे. आणि त्यांचे माझ्याशी फार घनिष्ठ संबंध असल्यामुळे इथेच राहणे माझाही धर्म होतो. इतर सर्व गोष्टी अनुकूल असतील तर जी शक्ती आज मीराबाईजवळ नाही ती जर ईश्वर मला देऊ शकला तर मी तुमच्याजवळ राहू शकेन.

मी लहानपणापासूनच ठरवले होते की जे लोक आपल्यावर नाराज आहेत आपल्या वास्तव्यामुळे ज्या लोकांना त्रास होतो तिथे राहायचे नाही. आणि मी जिथे कुठे जात असतो तो माझ्या स्वतःच्या स्वार्थाकरिता नाही तर सेवेकरिता जात असतो. परंतु आजकाल लोकांच्या मनात माझ्याबद्दल भीती निर्माण झाली आहे. आणि या भीतीचे कारण मी काही गोष्टींना माझा धर्म समजत असतो. मीराबहेन इथे आलेल्या आहेत आणि त्यांच्याकडून तुम्हांला कळले असेल की माझ्यात स्पर्शाअस्पर्शाची भावना नाही आणि माझ्याजवळ ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शुद्र, रजपूत, महार, चांभार असा कोणताही भेदभाव नाही. माझी तर पूर्ण खात्री आहे की असा कोणताही भेदभाव करणे धर्माविरुद्ध आहे. आणि या भेदभावामुळे आपले वर्तनसुद्धा खूप गलीच्छ झाले आहे.

परंतु मी इथे आहे याचा अर्थ असा नाही की मी ज्याला धर्म समजतो त्याचे बळजबरीने मी तुम्हांलाही पालन करायला लावीन. माझा धर्म तर समजावणे आहे. जसे की मी सर्वांना सांगत असतो की अस्पृश्यता गेली नाही तर हिंदू धर्माचा नाश होईल. परंतु तुम्हांला जर ही गोष्ट पटत नसेल तर तुमच्यामधील हा भेदभाव काढून टाकेन असा मी कोण आहे?

यामुळे मी येऊन तुमचे रस्ते साफ करीन. तुमची मुले माझी मुले असल्यामुळे मी त्यांची सेवा करीन. सफाई करीन. तुम्हांला औषधपाणी देईन. जे उद्योगधंदे बंद पडले आहेत त्यांना परत नवजीवन देण्याचा प्रयत्न करीन. तुम्ही जर हे करणार नाही तर तुमच्यातील मी अजून एक माणूस होईन. माझी इच्छा आहे की इथून

पळून कुठेही जायचे नाही. परंतु ईश्वराची इच्छा अशी आहे की तो मला एका ठिकाणावरून उचलून दुसरीकडे घेऊन जातो. आफ्रिका - साबरमती - वर्धा - मगनवाडी आणि आता इथे.

मी सुखशांतीकरिता पळत नसतो, कारण मगनवाडीत मला जे सुख मिळत होते तेच सुख मला इथेही मिळेल. परंतु खेड्यात जाण्याकरिता मी जेव्हा माझ्या सहकाऱ्यांना सांगतो तेव्हा मला वाटले की इतरांना सांगण्यापेक्षा मी स्वतःच एखाद्या खेड्यात जाऊन वास्तव्य का करू नये? माझी वृत्तीच अशी झाली आहे की मी जे इतरांना सांगतो ते मी स्वतःही करत असतो.

एक वृद्ध - "हे मदत करण्यासारखे कार्य असेल तर मदत मिळेल. भंग्याच्या कामात मदत मिळणार नाही. जे काम वर्षांपासून जसे सुरू आहे तसेच चालेल. आम्ही एकाच विहिरीचे पाणी प्यायला तयार नाही. मंदिरात अस्पृश्याला जाऊ देण्याची आमची तयारी नाही. मी आयुष्यभर हॉटेलमध्ये गेलेलो नाही. मी शेवभजीसुद्धा विकत घेतली नाहीत. मी माझे जीवन का बिघडवून घेऊ?"

## ब. - महादेवभाईंचे सेगावहून प्रयाण

**३०**-४-(१९)३६

मी ज्यांच्याबरोबर जायचे म्हणालो त्यावर म्हणाले 'कोणासोबत जाण्याची आवश्यकता नाही.

मग मी म्हणालो, 'मोटारीचा रस्ता दाखवायला तर कोणाला यावे लागेल ना?

त्यावर म्हणाले, 'ठीक आहे मग जा.

अखेरीस अनेक लोक तिथे राहू लागले आणि प्यारेलालला तर आग्रहपूर्वक तिथे ठेवून घेतले. मला म्हणाले, 'तुझे तर मला कधीही ओझे वाटले नाही.'

शिवाय याच दिवशी एका पत्रात लिहिले, 'जुन्या सहकाऱ्यांपैकी एकालाही सोबत ठेवायचे नाही.'

मला लिहिले, 'तुला दुःखी पाहून दुःख झाले, परंतु दुःख कशाचे?'

# १२. पत्रे

**१४-४-(१९)३६**

## १. डाह्यालालभाईंना

डाह्यालालभाईंनी आपल्या दोषांबद्दल पश्चात्ताप व्यक्त करणारे पत्र लिहिले. त्याचे उत्तर लिहिले -

तुझे पत्र आश्चर्य वाटण्यासारखे आहे, आणि ते थोडे आवडलेसुद्धा. तुझी भाषा अंतःकरणातून निघाल्यासारखी वाटत नाही. कदाचित तुझ्याकरिता ही भाषा स्वाभाविक झालेली असेल. तुझ्या जप वगैरेंबद्दलचा माझ्यावर कोणताही परिणाम झाला नाही. तू मगनवाडीतसुद्धा असेच पत्र लिहिले होते. परंतु तू अनेक व्रते घेतलेली असूनही तू विषयवासनेने भरलेला आहेस ही गोष्ट तू लपवली होतीस.

तुझ्या या पत्रातून स्पष्टपणा निथळत असताना दिसत नाही. गर्दीतून आला आहेस म्हणून दोषांची कबुली देतो आहेस. याला मी पश्चात्ताप समजत नाही. शक्य आहे की हे सर्व समजून घेण्यात माझी चूक होत असेल. शक्य आहे तू कदाचित जीवनाचा नवीन अध्याय सुरू केला असशील. माझी तर अशीच इच्छा आहे. रामजीभाईंना सर्व पत्रे दाखवशील. त्यांच्याजवळ सर्व काही कबूल कर. भाषेतील अलंकार आणि भाषेला सुशोभित करणाऱ्या सर्व गोष्टी काढून टाक. विशेषणाचा वापर कमी कर.

तुझे पहिले वाक्यच बोचते - ‘भीतीमुळे जे कबूल केले नाही ते नम्रतापूर्वक कबूल करण्याची धन्य घटिका मिळवून देण्याकरिता आपण या अंतर्यामीचे उपकार मानायला पाहिजे.’

‘आपण’ कशाकरिता? मला तर उपकार मानण्याची काही आवश्यकता वाटत नाही. तू वर्णन करतो तसे माणसात एकाएकी बद्‌ल झाल्याचे मला माहीत नाही. ‘भविष्यात घडलेल्या घटनाची पूर्णपणे चिकित्सा केली तर कदाचित मी निर्दोष सिद्ध होईन’ असे म्हणून तू तुला जो काही पश्चात्ताप झाला असेल तो तू ढिला केला आहे. साधूपुरुष जसे अणूएवढ्या दोषाला पर्वताएवढे करतात तसे तू करण्याची आवश्यकता नाही. तू तर जे होते ते लपवले आहे.

## २. 'कैदी असल्याप्रमाणे'

**२१-४-(१९)३६**

जवाहरला ते एका पत्रात लिहितात - कार्यकारिणी किती काळ टिकेल ते सांगू शकत नाही. आधीच्या अनुभवामुळे मला थोडेसे दहशतीसारखे वाटते. अंतहीन लांबचलांब चर्चांत आणि विचारविनिमयात मला रस वाटत नाही.

कैदी की मी केवळ बाचा होऊन गेलो आहे अशी भावना मनात घर करू लागली आहे.

## ३. श्रद्धा दृढ होत चालली आहे

**२३-४-(१९)३६**

जर्मनीच्या परिस्थितीचे वर्णन करून हिटलरची स्तुती करणाऱ्या कार्ल बूटोला लिहिले -

नुकताच तुमचे पत्र रस घेऊन वाचले. हो, जर्मनी आणि युरोपच्या इतर भागांमधील घटनांकडे लक्ष ठेवत असतो. त्यांचे वर्तन विश्वासार्ह नाही. तिथे भौतिक शक्तीची केवळ स्पर्धाच नाही. इतिहासात अनुभवलेली वाईटाहून वाईट प्रकारच्या चलाखीची सुद्धा तिथे कसोटी सुरू आहे. तुम्हाला माहीत आहे की माझे प्रयत्न वेगळ्याच भूमिकेतून सुरू आहेत. मी काही करून तर दाखवू शकत नाही. असे असले तरी माझी श्रद्धा दृढतर होत चालली आहे. युरौपमधील घटनांमुळे थोडी अजूनच तीव्र गतीने.

# १३. कनैय्यालाल मुंशी

कनू मुंशी लखनौ काँग्रेस विषयी लांब चर्ता करून गेले. आले तर होते भारतीय साहित्य परिषदेची चर्चा करण्याकरिता, परंतु सुरुवात लखनौच्या गोष्टींनी झाली.

असे वाटते की जणू काय १५ वर्षांचे काम धुवायला आले होते. एकदा कार्यकारिणीची प्रशंसा करत होते ती कार्यकारिणी आता एका सुराने बोलत नाही तर आता दोन सुरांनी बोलत आहे ही दुःखाची गोष्ट आहे असे म्हणत होते.

बापू - लखनौचे ठराव आणि नवीन कार्यकारिणी हा एक पूल आहे. ते दोन सुरांनी बोलत नाहीत तर एकाच सुरात बोलतात. याचे कारण बहुमताने जो ठराव मंजूर झाला आहे त्याचे पालन तर संपूर्ण कार्यकारिणीला करावेच लागेल. खरी गोष्ट तर ही आहे की कार्यकारिणी आणि समाजवादी यांच्यात मतभेद नाहीत. परंतु भेद तर माझ्या आणि जवाहरच्या विचारात आहे. कार्यकारिणीतील मोठा भाग माझ्या विचारांचा आहे असे म्हणतात. माझे विचार जर त्यांनी खरोखर पचवले असतील, विशेषेकरून अहिंसा बरोबर पचवली असेल तर सर्व काही ठीक आहे. बाकी ही तर कसोटीची वेळ आहे. जवाहरचीही आणि राजेंद्रबाबूंचीही. कार्यकारिणीच्या सर्व ठरावांची अंमलबजावणी तर राजेंद्रबाबू करायला लावतीलच.

मुंशी -'जवाहरलालबद्दलचे तुमचे अत्यधिक प्रेम हे देशाकरिता आम्हांला पक्षपातपूर्ण वाटते.'

माझे जवाहरबद्दलचे प्रेम हे जवाहरकरिता नाही तर देशाकरिता आहे. जवाहर ही फार मोठी विभूती आहे, शुद्ध सोने आहे. याचा देशाकरिता उपयोग करायचा असेल तर तो अशाच प्रकारे करता येऊ शकतो. कार्यकारिणीला समाजवादी ठेवून आपण खरी अहिंसा दाखवली आहे.

मुंशी - मार्क्स वाचलेला कोणताही माणूस असे भाषण देऊ शकेल. यात नवीन काय आहे?

बापू - हो, परंतु याने ते पचवल्यानंतर हे भाषण केले आहे. ते त्याने देशासमोर ठेवले. मी तर त्यांना सांगितले होते की १९०४ की १९०६ पासून माझा आदर्श हाच राहिलेला आहे. सकाळी उठून मला तो म्हणाला, "मला भीती वाटते की आपले गंतव्य स्थानही एकच तर नसेल?" माझे साधन आणि साध्य एकच आहे. त्याच्यासमोर साध्य सर्वश्रेष्ठ आहे. आणि मी जो साधनावर भर देतो तो त्याला पटत नाही.

याची जी परिस्थिती निर्माण करायची इच्छा आहे ती लष्कर आपले असल्याशिवाय थोडीच शक्य आहे.

मुंशी - नाही, असे तर शौकत अलीसुद्धा लष्कराला आपल्या बाजूने वळवण्याच्या वल्गना करत होते ना? परंतु काय झाले? जी गोष्ट गत पंचवीस वर्षात होऊ शकली नाही ती आज करण्याच्या गोष्टी हे लोक करत आहेत.

बापू - मीसुद्धा एक वर्षात स्वराज्य आणण्याच्या गोष्टी करत होतो, आणि त्याकरिता मी ज्या अटी ठेवत होतो तसेच हे लोकसुद्धा ठेवत आहेत.

मुंशी - यांची अट तर लोकांनी काही करावे अशी नाही. यांना वाटते की आंतरराष्ट्रीय विग्रह होऊन ते आपल्याला मदत करील.

बापू - कोणती ना कोणती अट हे लोक तर ठेवतच आहेत ना?

मुंशी - मला वाटते की कार्यकारिणीत मतभेद असल्यामुळे अखेरीस तिच्यात शैथिल्य येईल.

बापू - तर मग जवाहर राजीनामा देईल.

मुंशी - हे तर समाजवादाची पाळेमुळे नसतानाही तुम्ही त्याला पाणी घालून रुजवले आहे.

बापू - मुळे तर होतीच. आपण जर सातत्याने प्रयत्न केले, तर त्यात जे वाईट आहेत आपोआपच खुरटतील . खरी गोष्ट तर अशी आहे की अजून आपल्याला मोठी लढाई लढायची आहे. मी लढलो नाही, तरी माझ्यामागे राहिलेले लोक नक्कीच लढतील. आपण केलेल्या दांडीमार्चपेक्षाही अधिक सुंदर दांडीमार्च होऊ शकतो. तुमच्या शरीरात किती ताकद आहे? मणी तुम्हाला धक्का मारून पाडू शकतो; पण मणीला थोडीच नाटके लिहवून घ्यायची आहेत? तुम्ही हिंदुस्थानचे नाटक लिहा. मी तर तुमच्याकडून अशीच अपेक्षा ठेवतो.

मुंशी - 'राजेरजवाड्यांचे काय?' लोहारूला आपण कशा प्रकारे सन्मार्गावर चढवले असे म्हणता येईल?

बापू - लोहारूला ईश्वर सन्मती देवो अशी श्रद्धा आपण का ठेवू नये?

मुंशी - ही तर तुमची श्रद्धा आहे. तुमची श्रद्धा आमच्यात कशी येईल?

बापू - ही वेगळी गोष्ट आहे. ईश्वरसुद्धा म्हणत असतो की तुमची श्रद्धा हरवली वा गमावली असेल तर मी माझ्या कोपऱ्यात बसून राहीन. तुम्ही तीन समाजवाद्यांना किती घाबरता? आपण भयंकर राजाचेही मत परिवर्तन करण्याची अपेक्षा ठेवतो. पठाणांना वश करण्याची आशा ठेवतो. असे असताना या तीन पठाणांना तुम्ही वश करू शकत नाही काय?

# १४. भारतीय साहित्य परिषद

**२४-४-(१९)३६**

(गुजराती आवृत्तीत इथे '१९३४' आहे. बहुधा हा मुद्रण दोष असावा.)

भारतीय साहित्य परिषदेत बापूंचे भाषण अध्यक्ष म्हणून. स्वागताध्यक्ष काकासाहेब. बापूंचे भाषण 'हरिजन'च्या केवळ दोन स्तंभांइतके.

भाषण देण्याकरिता आधी जवाहरलाल आले. बापू स्वतःच उभे झाले आणि मग संपूर्ण सभामंडळातील लोक.

रात्री राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली हिंदी साहित्यसंमेलन. तिथेसुद्धा राजेंद्रबाबू आले. तेव्हा बापू उभे राहिले. मग जवाहर आले. यामुळे बापू उभे राहिले.

जवाहर ही कवायत विनाकारण का करत आहा?

बापू - व्यायाम अगदीच होत नाही म्हणून . . .

दिवसा हिंदी आणि हिंदुस्तानीवर दोनेक तास चर्चा चालली. बापूंनी हिंदी संमेलनवाल्यांबरोबर समतेने वागण्यावर भर दिला आणि ४१ मते मिळाली. मौलवी अबदुल हक आणि आकिल साहेबांनी खूप विरोध केला.

जवाहरलाल आणि मुंशींच्या वेळी वेगवेगळे घटक एकत्रित आले. जैनेंद्र म्हणाले, 'तुम्ही लेखकांना हुकूम का करता? लेखकाला तर जे जाणवेल तेच तो लिहिणार.'

जवाहरने तर नीती, राज्यपद्धती विषयीचे सिद्धांत, मास्कोतील प्रयोग हे सर्व आपल्या भाषणात आणले. आंतरराष्ट्रीय संबंध वाढवण्याचा विषयसुद्धा काढला.

मुंशी म्हणाले, "संपूर्ण साहित्य कृत्रिम आहे. मी तर अमर असल्याप्रमाणे राहत असतो. माझ्याकडून कृत्रिम लोकसाहित्य लिहवले जाणार नाही. मुनशी म्हणतात की मला जर वैदिक काळावर नाटक लिहायचे असेल तर मी ते कसा लिहू शकेन?"

राजाजी म्हणतात, "जर तुम्ही लोकांसमोर हिंदी-हिंदुस्तानी असे दोन पर्याय मांडाल, तर लोक घाबरतील. त्यांना फक्त 'हिंदुस्तानी' असे म्हणाल तरच ते ऐकतील. ते म्हणतात की ही एक राष्ट्रीय भाषा आहे. त्यांना हिंदी ही एक प्रांतीय भाषा वाटते."

# १५. संततिनियमन

राजेंद्रबाबूंची परवानगी घेऊन संमेलनाची सुरुवात होण्यापूर्वीच बापू घरी जायला निघाले. अनसुयाबाई काळे बापूंसोबत होत्या. त्यांना घेऊन बापू मोटारीने फिरायला निघाले. थकलेले होते. झोपायचे होते. परंतु त्या दिवसात उग्र रूप धारण केलेल्या प्रश्नाला बाईंनी तोंड फोडले.

यामुळे बापूंनी त्यांना पूर्ण वेळ देण्याचे ठरवले आणि शहराबाहेर मोटार घेण्याकरिता सांगितले. जवळतास एखाद तास बाहेर फिरले. रस्त्यात कुटुंबनियोजनावर जोरदार चर्चा झाली.

अनसुयाबेनने चर्चेला सुरुवात केली - आपल्या स्त्रियांना दुःखी जीवन व्यतीत करावे लागत असते. त्यांना फार मुले नको असतात हे तर तुम्हाला मान्य आहे ना?

बापू - हो, मी याच्याशी सहमत आहे.

अन. - हिंदुस्थानची लोकसंख्या पाहिजे त्यापेक्षा फार जास्त आहे हे तुम्हाला मान्य आहे काय?

बापू - नाही, हे मला मान्य नाही.

अन. - तुम्हाला असे वाटते काय की लोकसंख्या जितकी वाढत असेल तितकी ती आपण वाढू दिली पाहिजे?

बापू - असे तर म्हणालो नाही. परंतु मी इतके तर म्हणेनच की आजपेक्षा तिप्पट जरी लोकसंख्या झाली तरी आपण तिचे पोषण करू शकतो.

अन. - विश्वेश्वरैयांनी दिलेले आकडे तुम्ही मला द्याल. कारण या आकडेवारीसंबंधात तुम्हाला प्रश्न विचारावा अशी परिस्थिती नाही.

बापू - हो अभियंते आणि त्यांच्याशी संबंधित प्रश्नासंबंधात. परंतु इतर इतर बाबतीत नाही.

अन. - इतर बाबतीततसुद्धा त्यांची आकडेवारी का मान्य करत नाही?

बापू - या बाबतीत आपले मतभेद आहेत हे मान्य केले पाहिजे.

अन. मी गर्भधारणेच्या विरोधात बोलून राहिलेले नाही. परंतु मुलांच्या जन्मामध्ये अंतर असले पाहिजे असे तर मला निश्चितच वाटते. तुम्ही आत्मसंयमाबद्दल बोलता. मला मान्य आहे की हा उच्चतम आदर्श आहे.

बापू - हा उच्चतम आदर्श आहे असे जर तुम्हाला मान्य असेल तर तुम्ही तो व्यवहारत उतरवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अन. - हीच अडचण आहे. हा आदर्श साध्य करणे अशक्य आहे.

बापू - हा आदर्श संताकरिताच आहे असे तर तुम्ही म्हणू शकत नाही. हा आदर्श संपूर्ण मानवजातीकरिता आहे. असे असेल तर आपण या दिशेने काम केले पाहिजे.

अन. - इथे तुम्ही अव्यवहारी माणसाप्रमाणे बोलत आहा. मी पत्नी म्हणून मला आलेल्या अनुभवांसंबंधी बोलते आहे. मी अनेक स्त्रियांना भेटले आहे. आणि मुलांना जन्म देऊन देऊन त्या कंटाळून गेल्या आहेत. त्यांच्याकरिता उपाय कोणता?

बापू - हे आवश्यक आहे असे माझे मत नाही, तसेच तुमच्याकरिता आणि इंग्रजी शिक्षण घेतलेल्या शिकल्यासवरलेल्या स्त्रियांकरितासुद्धा ही गोष्ट आवश्यक आहे हे मला मान्य नाही. परंतु हे जरी आवश्यक वाटत असेल तरी याचे जगासमोर प्रदर्शन करायला नको.

अनु. - आम्ही कोणताही देखावा करून राहिलेलो नाही.

बापू - करत असाल तर तो सोडा. मी तर पतिपत्नी म्हणून एक पुरुष आणि एक स्त्री संततिनियमनाच्या साधनांचा जेव्हा कायदेशीर उपयोग करण्याचे ठरवतात तेव्हा त्याचबरोबर त्यांचा अनैतिक दिशेने उपयोग होण्याचा धोका असतो.

अन. - परंतु आपली अनाथालये पाहा. आणि दुर्दैवी स्त्रियांना करावा लागणारा गर्भपातही पाहा.

बापू - मला याचे काहीही वाटत नाही.

अन. - (धक्का लागून) तुमचा यावर कोणताही आक्षेप नाही?

बापू - आक्षेप या अर्थाने नाही की संततिनियमनांची साधने असो वा नसो, हे गर्भपात सुरू राहणारच आहेत.

अन. - परंतु ही गोष्ट फार भयानक वाटत नाही काय?

बापू - नाही, स्त्रियांच्या हाती निरोधाची साधने देऊन त्यांच्यात अनीतिमय जीवन जगण्याचा तुम्ही मोह उत्पन्न कराल.

अन. - आणि तुम्ही नीच लोकांना शिक्षा झाल्याशिवाय सोडून द्याल काय?

बापू - नाही. दुर्दैवी स्त्रियांवर बलात्कार करणाऱ्या माणसाला तुम्ही ठार करा. दुःखद घटना तर ही आहे की जी कोणी भगिनी गर्भपात करते ती लाजेमुळे करते. तुम्हाला तर निरोध जनतेच्या दृष्टीने मान्य करायचा आहे.

अन. - परंतु त्या नीच पुरुषांना गोळीने कोण ठार मारील?

बापू - तुम्ही कायदा करा. मी त्याला पाठिंबा देईन.

अन. - परंतु आपल्या विचारांशी कोणीही सहमत होणार नाही.

बापू - तर मग आपण एक अल्पसंख्याक वर्ग असू - पंधरा कोटी स्त्रिया आणि एक गांधी मिळून.

अन. - नाही. स्त्रियाही मान्य करणार नाहीत. आम्ही ठराव केला पाहिजे की ज्या पुरुषाची पत्नी जिवंत असेल त्याने दुसरे लग्न जर केले तर ते बेकायदेशीर असेल. तर लोक म्हणाले की एक पुरुष अनेक स्त्रियांच्या मागे लागेल.

बापू,- चांगले सांगितले. तुम्हाला म्हणायचे आहे की असे केले तर पन्नास टक्के स्त्रिया माघार घेतील.

अन. - हे शक्य नाही.

बापू - हेच दुःख आहे ना? नाही म्हणण्याचा आपल्या जो अधिकार आहे तो आपण वापरत नाही. ‘नाही’ म्हणायचे हिंमत आपल्याला आपल्या स्त्रियांना शिकवायची आहे.

परंतु मी दुसरी बाजू सांगतो. तुम्हाला असे वाटते काय की पुरुषापेक्षा स्त्रीला समागमाची जास्त इच्छा असते? मला माझ्या पत्नीबद्दल आलेल्या अनुभवावरून मी सांगू शकतो तिने मला एकदाही मोहवले नाही. आणि आम्ही एका अंथरुणावर झोपलेलो असताना तिने कधीही समागमाकरिता पुढाकार घेतला नाही. ती शिकलेली नाही आणि बुद्धिमानही नाही. परंतु याबाबतीत ती उच्च पातळीवर होती. जगात सर्वत्र असेच आहे.

आफ्रिकेतील झुलू प्रजा घ्या. हे तर अगदी उघडे नागडे फिरत असतात. युरोपीय या स्त्रियावर बलात्कार करत असतात, झुलू कधीही नाही. झुलू स्त्रियांचे प्रेम संपादन करण्याचा प्रयत्न करत असतात. आणि त्यांचा पन्नास स्त्रियाबरोबरही संबंध असू शकतो. त्यांच्यात बहुपत्नीप्रथा आहे. परंतु मानवजातीच्या इतिहासात असे कधीही होत नाही की स्त्री एकापेक्षा अधिक पुरुषांची इच्छा करत असते. जेव्हा की लफंगा माणूस पन्नासच काय शंभर स्त्रियांच्या मागे पडू शकतो. मी तर म्हणेन की स्त्रियांना तुम्ही ज्या क्षणी संततिनियमनाची साधने देता तेव्हाच तुम्ही तिला उच्च स्थानावरून उतरवता आणि पुरुषाच्या बरोबरीत आणून ठेवता. माझे म्हणणे पटत असेल तर मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की हा अवनतीचा आणि सर्वनाशाचा खात्रीपूर्वक मार्ग आहे. तुम्ही तुमच्या डायरीत लिहून ठेवा आणि पाच वर्षांनंतर तुम्हाला कळेल की गांधी म्हणत होता ते खरे आहे.

अन.- हे मी समजू शकते. परंतु आम्ही काय करावे? मी काही केवळ संततिनियमनाच्या साधनांबद्दल बोलून राहिलेले नाही. मी राष्ट्राच्या दृष्टीने विचार करते आहे, बोलते आहे. आपल्या मुलामुलींना कसे सांभाळावे? सिनेमा आहे, परस्परांच्या संबंधांबद्दल वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य मिळते. वगैरे.

तुम्ही या गोष्टी बंद करू शकता. अजून काही नाही तर स्वतःच्या जीवनात यांच्यावर बहिष्कार टाकू शकता. या अनिष्ट परिणामांपासून निदान तुमच्या मुलामुलींना तरी तुम्ही वाचवा.

अन. - काय सांगू? छत्तीसगढमधील स्त्रिया फार स्वस्तात इथे येतात आणि एक आण्यात वा सहा पैशात स्वतःला विकून आमच्या मुलांचा सत्यानाश करतात.

बापू - मग तुम्ही काय छत्तीगढच्या स्त्रियांना निरोधाचे साहित्य देऊन त्यांना तयार करू इच्छिता?

पराभूत झाल्याप्रमाणे अनसुयाबेन हसल्या. नाही, अवघड उदाहरण घेऊन वाद घालत नाही. वाईट उदाहरण घेतले तर चुकीचे कायदे होतील.

बापू - आणि तुम्ही मला वाईट कायदे तयार करायला सांगताहात. युक्तिवादात मीच श्रेष्ठ आहे हे तुम्हाला मान्य करावेच लागेल. मी फौजदारी वकील कधीच नव्हतो. पण दिवाणी वकील म्हणून माझी मोठी वकिली होती. जो दिवाणी खटल्यांत यशस्वी वकील असतो, त्याला कायदा तर कळलाच पाहिजे आणि त्याला पुराव्यांचा खरे-खोटेपणा तपासून पाहता आला पाहिजे. खरे सांगायचे तर शेकडो स्त्रियांच्या माझ्याजवळ जीवनकथा आहेत. त्यांना मात्र अशा गोष्टीची गरजच नव्हती.

अन. - परंतु आम्ही काय करावे? मी दुर्बल स्त्री आहे. माझी मुलगी तर माझ्यापेक्षाही दुर्बल आहे. पश्चिमेत स्त्री-पुरुषांचे शरीर शक्तिशाली कसे होत असेल?

बापू - मी जे कारण सांगितले आहे त्याशिवाय इतरही कारण आहेत. तेथील हवामान, आणि वातावरण. उशिरा विवाह. तसेच हे लोक जरी अनियमित जीवन व्यतीत करत असले तरी ते स्वतःच्या शक्तीची जपणूक करत असतात.

अन. - परंतु निरोधाचा परिणाम पाहा. नीला मला सांगत होती की व्यक्तिगत रीतीने कुमार्गाला लागण्याचे हे एकमेव उदाहरण नाही. अमेरिकेत तिच्यासारखे लाखो आहेत. आणि इथे जर निरोध वापरायला सुरुवात केली तर इथेसुद्धा असेच होईल.

बापू - निरोधाच्या बाजूने तुम्ही युक्तिवाद करता याचे कारण हेच आहे की श्रीमती नायडूंप्रमाणे तुम्हीही विलायतेत शिक्षण घेतले आहे.

अन. - या वर्गात मला ठेवू नका.

बापू - मग माझ्या पत्नीच्या वर्गात ठेवू? ती माझ्याबरोबर निरोधाची चर्चा करण्याच्या भानगडीत पडणार नाही. संततिनियमनाच्या चर्चेकरिता कोणतीही अशिक्षित स्त्री आणा.

अन. - आणेन. परंतु हलकट पुरुषांनी त्यांना असे करून ठेवले आहे. आम्ही काय करावे?

## १६.

दिल्लीत घडलेल्या घटनांचे टिपण नंतर करायचे राहून गेले.

# १७. [यीट्स-ब्राऊन चर्चेचा सार]

१० मार्चला यीटसब्राऊन आले होते. त्यांनी १०-१५ मिनिटांची मुलाखत घेतली. त्यांनी आपल्या मुलाखतीचा पूर्ण अहवाल ३० एप्रिलला पूर्ण केला.

ग्रामपुनर्रचनेच्या कामात अगदी मोजके विदेशी लोक हवी तितकी प्रगती करू शकत नाही असे श्री गांधी म्हणाले.

असे म्हणून जबरदस्तीने विषय संपवला, जेव्हा की बापूंनी तर या विषायवर सविस्तर दीर्घ चर्चा केली होती. सुरुवात ब्राऊननी केली. बापू म्हणाले,

“त्यांनी तयार केलेल्या बऱ्याच गोष्टी प्रदर्शन बंद झाल्यानंतर अदृश्य झाल्या. यांची लेखणी तयार आहे आणि हे चांगले प्रचारक आहेत. हे तयार करतात त्यांतील काही गोष्टी चांगल्या आहेत, तर अनेक गोष्टींना काहीही किंमत नाही. बळजबरी करून आपण बरेच काही साध्य करतो असेही नाही. परंतु प्रेमाच्या आग्रहाला बळजबरी म्हणता येऊ शकत नाही. प्रेमामुळे माझा मुलगा आज जे करतो ते उद्या समजूनउमजून करेल. बळजबरीने जर काही करायला लावले तर त्यांचे हृदय मुळीच सहकार्य करत नाही. अनुभव तेव्हाच येतो जेव्हा बळजबरी विसरली जाते आणि असे कारणे आपले कर्तव्य आहे, ही गोष्ट आपल्या विकासाकरिता आहे आणि यांतच आपले हित आहे असा विश्वास माणसाला वाटायला पाहिजे. उदाहरणार्थ सुरुवातीला साफसफाई करण्याची बळजबरी करावी लागते, परंतु नंतर तीच आवडू लागते. परंतु ही विवादास्पद गोष्ट आहे. बळजबरी जर कोणाची आपण सहन करू शकत असू तर ती आग्रहाने केलेल्या प्रेमाची. ही बळजबरी तुम्हांला फसवत नाही. ७०,००० इंग्रजांनी आपल्या बळावर स्वतःला हिंदुस्थानच्या लोकांवर लादले ही गोष्ट खऱ्या अर्थाने बळजबरी म्हणता येत नाही.

नंतर अंमलदारांनी खेड्यात राहायला पाहिजे आणि खेड्यांचा अनुभव घ्यायला पाहिजे असे त्यांनी सांगितले. ही गोष्ट या माणसाने बरोबर आपल्या मुलाखतीत आणली आहे.

नंतर यीट्सब्राऊनने विचारले - नवीन व्हाईसरायविषयी काही सांगू शकाल?

बापू फार काही म्हणाले नाही. यीट्सब्राऊन आपले बोलणे सुरू ठेवत म्हणाले, “सरकारी अंमलदारांमध्ये लष्करी अंमलदार फार लोकप्रिय आहेत. अजून कुठे नाही तर पंजाबमध्ये.” बापू आश्चर्याने

म्हणाले, “खरोखर तुम्हाला असे वाटते? याचे कारण असे असू शकेल की पंजाब हा लष्करभरती करण्याचा प्रदेश आहे आणि रंगरूट म्हणून बहुधा पंजाबी लोकांना आणि मुसलमानांनाच पसंती दिली जाते.”

नंतर नवीन संविधान तयार करण्यासंबंधात गोष्टी सुरू झाल्या. या विषयासंबंधी यीट्सब्राऊनने आपल्या मुलाखतीच्या अहवालात काहीही लिहिले नाही. उलट ठोकून दिले की घटनेप्रमाणे सनदी आणि लष्करी नोकरदारांचे हिंदुस्थानीकरण होईल. ‘या ठिकाणाची मला घृणा वाटते. इथे चरख्याचा खूप खडखडाट सुरू आहे. अंमलदार आणि समित्या गुणकपद्धतीने वाढत आहेत. एतके लांब चालत येणे हा तर त्रासच म्हणायचा ना?’ नंतर लोकशाही विषयी -

‘मी स्वतःला लोकशाही मानणारा समजतो, असे असले तरी माझ्या या दाव्याला हास्यास्पद ठरवणारे पुष्कळ आहेत.’

यीट्सब्राऊन - आगाखानना वाटते की हिंदुस्थान सरकार टिकून राहील. पण त्यांना भीती आहे की ते फारसे काम करू शकणार नाही. संत आणि तत्त्वज्ञ जर स्वयंस्फूर्तीने सत्तेचा उपयोग लोककल्याणासाठी करतील, तर ते त्यांना आवडेल.

बापू - संत आपल्या बळावर सत्ताधारी होऊ शकत नाही. संतांनी तर कर्तव्यपरायण असायला पाहिजे. ते जनतेचे लाडके असतात. असे लोक स्वार्थी कसे होऊ शकतात?

यी.. - मुसोलिनी वा हिटलरबद्दल तुम्ही काय म्हणाल?

बापू - ते त्यांच्या जनतेचे प्रतिनिधी आहेत काय? सर्व लोकांचा त्यांना पाठिंबा आहे काय? मी ४८ तास रोममध्ये होतो. तेव्हा मला आढळून आले की चांगल्या चांगल्या लोकांचा मुसोलिनीला पाठिंबा आहे. परंतु ते भयग्रस्त असल्याचेही मला जाणवले. विलायतेतीत जनता भयभीत नव्हती. तिला बोलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. इटालीत लोकांना इतकीसुद्धा सूट नाही.

यी. - इथे तुम्ही स्वार्थीपणाने वागला नाही तर लोक काही करणार नाहीत.

बापू - काही प्रमाणात हे खेरे आहे. परंतु माझ्याकरिता तर या गोष्टी स्वाभाविक झाल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेत असे नव्हते. तिथे माझ्यावर अलीमखानने हल्ला केला होता. (यानंतरअलीमखानचे वर्णन केले आहे.) त्याने मला खूप मारहाण केली होती. नंतर तो माझा अंगरक्षक झाला होता. एक चक्र पूर्ण झाले.

# १८. डॉ. आंबेडकरांबरोबर चर्चा

कालच आंबेडकरांना आपला दृष्टीकोन समजावून सांगितला. त्यांच्या धर्मपरिवर्तनाच्या परिणामी राष्ट्रीय हिताला वा हिंदुस्थानी वा हिंदी संस्कृतीला धक्का लावण्याची त्यांची इच्छा नाही. ते स्वतःला आधी हिंदुस्थानी आणि मग महार समजतात. त्रावणकोरचे त्रिजो ख्रिस्ती व्हायला तयार होते. काही मराठा तरुणांची बदला घेण्याकरिता मुसलमान होण्याची इच्छा असते. आंबेडकर त्यांच्याशी झगडले आणि म्हणाले की धर्मपरिवर्तन ही काही थट्टामस्करीची वा खेळासारखी हलकीफुलकी गोष्ट नाही.

आंबेडकर - भेटायला यायचे का कबूल केले हे सांगतो. इथे येण्याचा निर्णय घेतला कारण मला निर्णायक पाऊल उचलायचे आहे. धर्मपरिवर्तनासंबंधीचे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच माझ्या मनात या संबंधात विचार सुरू होते. माझ्या आंदोलनामुळे या संबंधीच्या माझ्या विचाराला गती मिळाली. मे महिन्यात सभा होईल. या प्रश्नाचा निर्णय घेण्याकरिता लोकमत घेण्याचा ठरावसुद्धा केला आहे. आणि २२ तारखेला संयुक्त प्रांतात (उत्तर प्रदेश) दलित वर्ग एकत्रित होणार आहे. या सभेचा पहिला उद्देश सर्व धर्मांच्या - पंथांच्या दलितांना एकत्रित आणण्याचा आहे. त्याकरिता सर्व पंथांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे.

या दोन घटना विचारात घेतल्या तर परिस्थिती तातडीची होते. मलबारच्या लोकांची ख्रिस्ती होण्याची इच्छा आहे. आपण ख्रिस्ती झालो तर इंग्रज आपल्याला जास्त मदत करतील असे त्यांना वाटते. धर्मगुरू - बिशप - डोर्नाकलचे बिशप मला भेटले होते. कोणालाही माझे मतपरिवर्तन करता येऊ नये इतका मी माझ्या मनात पक्का निर्धार केला आहे.

बापू - काय करावे यासंबंधीचा मी कोणताही निर्णय घेतलेला नाही.

आंबेडकर - तुम्ही वर्णन करता तसा मूर्खपणाचा उत्साह अजून तरी मला प्रभावित करू शकलेला नाही. काय होईल ते खरे. त्यांच्या बाजूने फार कमी लोक जातील. अखेरीस बरेचसे लोक माझेच अनुयायी असल्यामुळे ते तर माझ्याकडूनच शिकले आहेत. असेही शक्य आहे की काही थोडेसे पुढारी धर्मत्यागसुद्धा करू शकतील. याचे कारण धर्माची मुळे खूप खोलवर रुजलेली आहेत. आणि झाड उपटून टाकावे तशी सहजपणे उचलून फेकून द्यावी अशी धर्म ही गोष्ट नाही. संरक्षणाकरिता खोदलेला पहिला खंदक गमावण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा बचावाकरिता दुसऱ्या तटबंदीचा आधार घ्यायला नको काय?

धर्मांतराच्या गंभीर प्रतिक्रिया होतील, विशेषेकरून राजकीय परिस्थिती संबंधात हिंदूंच्या. माझे स्वतःचे तर मत आहे की हिंदू संस्कृतीचा नाश होणार नाही असे पाऊल उचलण्याची माझी तयारी आहे. हे खरे आहे की माझ्या अनुयायात असे काही लोक आहेत की ज्यांचे म्हणणे आहे की आपण आपला विचार करावा, हिंदू संस्कृतीचे काय होते याची आपण फिकीर करू नये. त्यांच्याशी मी सहमत नाही. मी जसा विचार करतो तसाच विचार करायला तुम्ही तयार असाल तर तुम्ही दुसरी तटबंदी वाचवू शकाल. आपण जरी वेगळे झालो तरी आपल्यामध्ये शक्य तितके तडजोडीचे वातावरण असावे असे तुम्हाला वाटत नाही काय? मी त्रावणकोर आणि लखनौ येथे जाणार आहे. मी असे सांगू शकत नाही की मी अजून निर्णय घेतलेला नाही. याचे कारण आतापर्यंत मी अशी व्यूहरचना केली आहे. आपण वेगळे जरी झालो तरी आपल्यावर काही जबाबदारी राहतेच असे जर तुम्हाला वाटत असेल तर मला तसे सांगा.

बापू - परंतु दुसऱ्या तटबंदीचे रक्षण करण्याकरिता काय केले पाहिजे हे तुम्ही मला सांगितले नाही.

आंबेडकर - वेगवेगळ्या प्रकारे करू शकता. हिंदू संस्कृतीशी खूप जुळणारे असे काही संप्रदाय आहेत - बौद्धधर्म, शीख धर्म. या धर्मात मला श्वास घेण्याचे स्वातंत्र्य मिळेल. परंतु मला स्वतःला अस्पृश्य म्हणवून घेण्याची इच्छा नाही. मी मानवजातीच्या सर्वात खालच्या पातळीवर राहणार नाही.

बापू - ही गोष्ट तर तुमच्याप्रमाणेच संपूर्ण जग मान्य करील.

आंबे. - शास्त्रातून काय अर्थ निघतो हे अप्रस्तुत आहे. लोक जो अर्थ करतात तो महत्त्वाचा आहे.

बापू - असे करायला तुम्हाला कोणीही सांगून राहिलेला नाही. उलट तुम्ही पाहत आहा की हिंदु धर्मात आमच्यासारखाही वर्ग आहे. तो तर स्वतःला अस्पृश्यांच्या वर्गात ठेवतो आहे. तो अस्पृश्यतेवर विश्वास ठेवत नाही. कदाचित तुमची इच्छा असेल की सवर्णांनी सर्व लोक समपातळीवर आहेत असा आपला दृष्टिकोन जाहीर करावा. दुःखाची गोष्ट ही आहे की अजून हा दिवस आलेला नाही. परंतु तुम्हाला जर असे वाटत असेल की कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता न स्वीकारणारे आणि तुमचे म्हणणे पूर्णपणे मान्य करणारे पुष्कळ हिंदू आहेत तर याबद्दल तुम्हाला समाधान वाटायला पाहिजे.

याशिवाय दुसरी एक परिस्थिती असू शकते. तुम्ही म्हणता, 'मला फार डिवचू नका. मला हिंदू म्हणून बोलावू नका'. उलट मी तर म्हणेन की हिंदू संस्कृतीत जगाला देण्यासारखा एक संदेश आहे. मला बोचणाऱ्या

हिंदू संस्कृतीचा वास जरी आला तरी मी दूर पळतो. अशा संस्कृतीचा मी नाश करू इच्छितो असेसुद्धा तुम्ही सांगू शकता.

आंबे. - माझ्या मताशी मिळतेजुळते विचार असणारे लोक आहेत, हे खरे आहे. पण मला खटकते ते एवढेच की याचा हिंदू धर्म आणि संस्कृतीवर संकटकारक परिणाम होईल. याचे राजकीय परिणाम गंभीर होतील हे मला माहीत नसते, तर त्यांच्या बाजूने उडी घेण्यापूर्वी मी दोनदा विचार केला नसता.

जर कोणत्याही माणसाची अशी वृत्ती असती तर फार मोठे संकट आले असते. किती मोठे प्रलोभन आहे ! मी हिंदुस्थानची चिंता करावी अशी इच्छा नसणारे माझे काही सहकारी आहेत. जनतेच्या मोठ्या समुदायाला सोबत ठेवले पाहिजे. यामुळे मला धरसोड करावी लागत असते. मी जर त्यांच्याजवळ जाऊन सांगितले की या चालीत आपल्याला महात्माजींचा पाठिंबा मिळेल आणि आपण जर असे पाऊल उचलले की ज्यामुळे त्यांचा स्नेह पूर्णपणे ओसरून जाईल तर मग या मोठ्या वर्तुळात वा त्याच्या जवळपासही आपल्याला जागा राहणार नाही. सर्वाधिक अनुकूल काय आहे याचा विचार करा. मी मौलानांना हेच सांगितले, 'आपणे वेगळे जरी पडलो तरी पण आपल्या दोन्ही पक्षात ताळमेळ चांगला आसेल तर आपण हवे ते करू शकू.' दोघांनीही प्रामाणिकपणाचा रस्ता शोधून काढला पाहिजे. प्रत्येकजण मला सांगत असतो की हिंदूंचे नुकसान कमी होईल अशा मार्गाने आपण थोडे पुढे जाऊ. तिथे गेल्यानंतर मला त्रावणकोरच्या लोकांना सांगायचे आहे की आपण अमुक दिशेने पाऊल टाकले तर आपल्या बाजूने महात्माजी आहेत.

बापू - माझ्याकडून असे सांगवले जाणार नाही.

आंबे. - माझा दृष्टिकोन स्वीकारला तरी मला समाधान वाटेल.

बापू - माझ्या या अडचणी आहेत - धर्माबाहेर असलेल्या प्रश्नांचा मी विचार करू शकत नाही. आणि धर्मात असे काही नाही की ज्यामुळे पहिला खंदक वाचवता येईल की दुसऱ्या तटबंदीचे रक्षण करता येईल. तुम्हाला असा धर्म स्वीकारायचा आहे की ज्यामुळे हिंदू धर्माशी किमान संघर्ष होईल. तर मग शीख, आर्यसमाजी, बौद्ध हे सर्व एकच आहेत असा ठराव हिंदुमहासभेने केला आहे. परंतु इतक्याने मला समाधान नाही. तुम्हाला जर धर्मपरिवर्तन करायचे असेल तर तुम्ही हिंदू धर्मापेक्षा काही तरी वेगळे केले पाहिजे.

आंबे. - मला तर असा धर्म पाहिजे की जो समानता मान्य करील. हिंदु धर्मात ही नाही. बोद्ध धर्माचा यावर विश्वास आहे.

बापू - तुम्ही जर असे म्हणत असाल की बौद्ध संस्कृती हिंदू संस्कृतीहून वेगळी नाही तर तुमचा युक्तिवाद पांगळा होतो. तुम्ही असे म्हणू शकता की सवर्ण जे काही म्हणतात त्याची मला पर्वा नाही. हिंदूधर्माचा मी त्यांच्याइतकाच चांगला प्रतिनिधी आहे, परंतु ते लोक स्वतःलाच हलके करून घेत आहेत.

मी तर इतकेच म्हणेन की ईश्वर तुम्हाला सन्मती देवो. परंतु धर्मपरिवर्तन करायचेच असेल तर तुम्ही शीख व्हावे असे मी म्हणू शकणार नाही. दररोज मी एक श्लोक म्हणत असतो. त्याचा मुख्य सिद्धांत सर्वधर्मसमभाव आहे.

आंबे. - हे तुमचे व्यक्तिगत मत आहे. हजारो जरी असे मानत असतील तरी मला त्याची काय मदत होईल?

बापू - मदत ही होईल की तुम्ही माझ्याबद्दल सहानुभूती ठेवू शकाल. तुम्ही काय करू शकता ही एक गोष्ट आहे. माझी धर्माची कल्पना वेगळी आहे.

आंबे. - तुमचे म्हणणे समजू शकतो. परंतु तुमच्या सारख्या हजारोंच्या प्रयत्नांनी आमची परिस्थिती बदलणार नाही. मग काय करायचे? दिसते तेवढ्या अंतरात कोणाचेही हृदयपरिवर्तन होणार नाही.

बापू - याला शंभर वर्षे लागणार नाहीत. थोड्याच दिवसात हिंदू धर्म जर हा दुराग्रह सोडणार नाही तर हा रोग त्याला पोखरून टाकील. तुम्ही जर असे समजत असाल की हिंदू संस्कृतीत काही सत्त्व आहे तर त्याला हा रोग होणार नाही. दुराग्रह जर एखाद्या रोगजंतुप्रमाणे असेल तर त्याचा नाश करायला पाहिजे. परंतु आपणा दोघांचेही मत आहे की हिंदू संस्कृतीचा नाश करायचा नाही.

आंबे. - माहीत नाही नंतर काय होईल.

बापू - क्षणभर कल्पना करा की हिंदू संस्कृती वाचवली गेली तर मग सामाजिक आणि राजकीय पावलांची गोष्ट येते - अशा परिस्थितीत कायद्याची मदत घ्यावी लागेल. आम्हांला तुम्ही मदत करा.

आंबे. - कायद्याने काय साध्य होईल?

बापू - तर तुमचे असे म्हणणे आहे काय की आपण सर्वांनी मुसलमान व्हावे? कायदा असूनही जर तुम्ही डोके फोडण्याचा म्हणजे हिंसक मार्गाचा विचार करणार असाल तर तो इस्लाम राहणार नाही - तो गुंडांचा पंथ होईल.

आंबे. - जीवनव्यवहारात मला बळाचा बहिष्कार करणे शक्य होणार नाही.

बापू - मी तर तुम्हाला केवळ विनंती करू शकतो आणि सहानुभूती मिळवू शकतो.

आंबे. - मला स्वतःला अस्पृश्य म्हणवून घ्यायचे नाही.

बापू - तुम्ही शीख व्हा वा बुद्ध, हिंदू तर तुम्हाला अस्पृश्यच समजतील.

आंबे. - आपण परत तिकडेच वळतो आहो.

बापू - तर परिणामी तुम्ही धर्मपरिवर्तनाशी आणि गुंडगिरीशी जोडले जाल.

गावखेड्यात जे परिवर्तन होते आहे ते पाहता मला तर नवल वाटते. मी इथे आलो आणि लोकांना अस्पृश्यतेचा त्याग करायला सांगितले तर एक वृद्ध गृहस्थ उठला आणि मला नम्रपणे म्हणाला की तुम्ही तुमच्या मार्गाने जा. मी तर आता थेरडा झालो आहे. मी तर कोणालाही माझ्या मंदिरात जाऊ देणार नाही. काही वर्षांपूर्वी लोक असे बोलून दाखवत नव्हते. सर्व सवर्ण आले आणि मीराबहेनबरोबर प्रार्थनेत सामील झाले. मी येणार नाही असे ऐकून लोक नाराज झाले. यामुळे मी तुम्हाला निरोप पाठवला की इथे माझे घर आहे, यामुळे तुम्ही मला इथेच भेटायला या. गुरुवायुरमध्ये तर काळे झेंडे पाहिले आणि मोठ्या मुश्किलीने मी जिवंत राहिलो.

जमनालाल मंदिराची गोष्ट करता तर आज हजारो लोक त्या मंदिरात येतात.

बापू. - हरिजन आणि हरिजनेतर यांच्यात गाडगे कोणताही भेदभाव करत नाहीत. त्यांनी मला ही धर्मशाळा दिली आहे. गाडगेंची गोष्ट बाजूला ठेवू. तुकडोजी बुवा २५ वर्षांचे आहेत. हजारोंच्या संख्येत त्यांचे अनुयायी आहेत. ते या गोष्टीत इतके तल्लीन होऊन जातात की लोकांचे घोळकेच्या घोळके त्याच्याकडे आकर्षिले जातात. ते येऊन माझ्याबरोबर राहिलेले आहेत. यामुळे मला वाटते की हा हिंदू धर्म शंभर वर्षे म्हणा की पन्नास वर्षे म्हणा टिकणार नाही.

आंबे. - २,००० वर्षांपासून तर असेच सुरू आहे. हे तर जुलमामुळे मरण्यासारखे आहे. अनेक हिंदूंच्या मनातील विष उतरले आहे. जगातील लोकांशी ते स्वतंत्र माणसाप्रमाणे बोलतात. हिंदू धर्म आपला आत्मा हरवून बसेल अशी मला भीती वाटते. अशा परिस्थितीत मी दुबळेपणाचे धोरण ठेवीन अशी तुम्ही अपेक्षा करू शकता.

यांनी भरपूर चर्चा केली - गुंडगिरी वगैरे. यांना काय संस्कृतीची किंमत आहे? कदाचित नाही. त्यांना जर किंमत असती तर त्यांनी संस्कृतीकरिता जीव दिला असता.

आंबे. - मी जीव देणार नाही. या संस्कृतीने मला काहीही दिले नाही. आम्हांला तर कुत्र्याप्रमाणे हडहड करत असतात.

बापू - तर मग तुम्ही याचा पूर्ण जोर लावून सामना केला पाहिजे. सवर्ण हिंदूंची निर्मिती संपूर्ण नाशाकरिता झाली असेल तर त्यांचा अशाच प्रकारामुळे नाश होईल. श्रद्धावान माणूस म्हणून मी म्हणेन की यांच्या राखेतून नवीन आणि चांगली संस्कृती जन्म घेईल.

आंबे. - हिंदू धर्माची व्याख्या सांगू शकत नाही आणि मनात येईल त्या गोष्टीचे वर्णन करता.

बापू - याची व्याख्या तर सांगितलेली आहे - नेति. तुम्हाला काय सांगू? तुम्ही असे समजता काय की किडे, कुत्रे आणि कुत्र्यांचे भक्षण करणारे सर्व एकच आहेत?

आंबे. - ज्या तत्त्वज्ञानाचा आमच्या जीवनाला स्पर्श होत नाही आणि त्या तत्त्वज्ञानाचे लोक अनुसरण करत नसतील त्या तत्त्वज्ञानाला काय अर्थ आहे?

बापू - तुम्ही हव्या त्या धर्माचा स्वीकार करू शकता, परंतु इतके तर सांगाल की ते जे तत्त्वज्ञान मान्य करतात त्याचे ते अनुसरण करत नाहीत. असे असल्यामुळे तुम्हालासुद्धा ही गोष्ट लागू होते असे असे म्हणण्यात काय अर्थ आहे? जो कोणी तुमच्याबद्दल वाईटपण दाखवण्याकरिता माझ्याकडे येतो त्याला कशाचेही काही करायचे नसते. हिंदू पुढाऱ्यांना मारून टाकण्याकरिता तुम्ही तलवार उपसाल तर मी तुमच्याबरोबर लढू शकणार नाही. माझा जर विश्वास असता हिंदू धर्मात अस्पृश्यता सांगितलेली आहे तर मी क्षणभरात हिंदू धर्म अमान्य केला असता.

ईश्वराने जी शक्ती दिली आहे तिचा विचार करा. उतावीळपणाचे रागाचे भागीदार होऊ नका. ख्रिश्चन धर्म आणि इस्लामचे या संस्कृतीशी बरेच साहचर्य आहे.

# १९. श्रद्धा आणि बुद्धी

समाजवादाचा मारा सुरू आहे, आणि याचे उत्तर देणे शक्य होऊन राहिलेले नाही. काकांनी वा किशोरीलालभाई मशरूवालांनी वा अजून कोणी जर याचे शास्त्र लिहिले तर आपमच्याकरिता ही गोष्ट सुलभ होईल असे बाळने लिहिले. उत्तरात बापूंनी बाळला लिहिले की हे काम तू स्वतः करण्यासारखे आहे. अर्थात मी जे सांगतो ते जर तू पचवले असेल तरच.

त्याचे परत पत्र आले. त्याच्या उत्तरात बापूंनी लिहिले -

चि. बाळ,

मी जे लिहिले आहे ते विचारपूर्वक लिहिले आहे. माझे विचार जर तुम्हांला खरोखर आवडले असतील तर त्याचे शास्त्र तयार करण्याची शक्ती तुझ्यात असलीच पाहिजे. पृथ्वी गोल आहे अशी खात्री पटली असेल तर तू भुगालाची पुस्तके वाचून त्याचे पुरावे शोधणार नाही, तर तू तुझ्या स्वतःच्या भाषेत तुला आढळलेले पुरावे सांगून तू तुझे विधान सिद्ध करशील. हीच गोष्ट माझ्या वा अजून कोणाच्या विचारासंबंधी आहे. अखेरीस तर धर्मामध्येसुद्धा नाही वेद, नाही गीता, नाही भागवत. अखेरीस आपली अढळ श्रद्धा आणि तिच्यातून निर्माण झालेली बुद्धी हाच पुरावा असला पाहिजे.

शंकरला 'परमानंद पारितोषिक' मिळाले ते काय काकांच्या प्रतापाने?

बापूंनी असे लिहिले. ते काही बाळला कळले नाही. त्याने पाठवलेल्या पत्राच्या उत्तरात बापूंनी परत लिहिले -

काकांच्या प्रतापाने म्हणजे तुम्हा दोन्ही भावांना काकांनी निःसंकोपणे गुजराती शिकवली. यामुळे तुम्ही गुजरातीत प्रगती केली. त्यांचे मन संकुचित असते तर तुम्हांला त्यांनी गुराती भाषेत बोलू दिले नसते आणि तुमचे पालनपोषणसुद्धा त्यांनी महाराष्ट्रातील कोणत्या तरी गावात वा शहरात केले असते. हे बरोबर आहे ना?

हे मी सेगावहून लिहून राहिलेलो आहे. आज दुसरा दिवस आहे. मला तर हे आवडले. ओरिसाचा प्रवास आठवतोना? तिथे वर्तमानपत्र मिळायची परिस्थिती होती तशीच इथे आहे. मी समाधानी आहे. माझी झोपडी तर माझ्या अनुपस्थितीत बांधण्यात आली आहे. सध्या तरी मी सरदारला घेऊन बंगलोरला जाणार नाही.

# २०. खादी यात्रा

## अ. विनोबांचे भाषण

पवनार,

१-५-१९३६

प्रिय बंधुभगिनींनो,

तुम्हांला पाहून स्फूर्तीचा समुद्र उफाळतो आहे. काल मंडळी जेवायला बसली होती. अशा पंगतीत जेवणे मला आवडत नाही. परंतु त्यांच्यामधून मी फिरत होतो. बाबासाहेब म्हणाले - 'तुम्ही सर्वांची व्यवस्था करत आहा.'

मी म्हणालो - मी सर्वांचे चेहरे पाहत होतो, आणि हे सर्व पाहून फार आनंद होत होता. गावातील मंडळी पाहून विशेष प्रकारचा आनंद होत असतो. इतर लोकांचे डोळे, कान, नाक, चेहरा काही वेगळे आहेत असे नाही. परंतु गावातील मंडळी पाहिली की मला अद्भुत आनंद होत असतो.

काल काकासाहेब म्हणाले की आपल्या तालुक्यात जो जनसमुदाय आहे तो इतर ठिकाणच्या लोकांपेक्षा थोडा जाड आहे. हे निरीक्षण खरे आहे. असे असले तरी या चेहऱ्यांमधून हिंदुस्थानच्या प्राचीन परंपरांचा इतिहास मिळतो. तो इतिहास इथे जे बुद्धिमान लोक येतात त्यांच्या चेहऱ्यातून कळत नाही. वेगवेगळ्या प्रकारचे चेहरे पाहा. परंतु गावांमधील चेहऱ्यात प्राचीन इतिहासाची झलक दिसते. त्यांची ओळख पटते आणि हजारो वर्षांपूर्वी जे मंत्र म्हणाले होते तसाच चेहरा पाहायला मिळतो.

हिंदुस्थानच्या लोकांचे हाड, मास, रक्तातून वाहणारा गरीबपणा दिसून पडतो. रूप - (१) शक्तिशाली (२) दैन्यावस्था. देवाचे दोन रूप असतात - शिव आणि घोर. एकाबरोबर सूर्याचा प्रकाश आणि अंधार येत असतो, दुसऱ्यातून शक्ती. हिला अहिंसा म्हणा.

गरिबांमधील दुसरी गोष्ट भित्रेपणा. जर कोणी असे समजत असेल की हिंदू लोक - विशेषेकरून हिंदूच - जे सात्त्विकपणाचा उत्कर्ष करत बलवान झाले होते आता त्याचे उलट केले पाहिजे. यज्ञात हस्तक्षेप करण्याची, मांस खाण्याची, हिंसा करण्याची वगैरे सूचना देण्यात येत असे की यातच खरा उत्कर्ष आहे. अशा प्रकारे हिंदुस्थानसंबंधी निराशावाद पसरला आहे. अशा लोकांनी नवीन माणूस घडवला पाहिजे. गायीला वाघ

बनवणे अशक्य आहे, तसेच जी विविध जनता एकत्रित झालेली आहे तिच्यात हिंसावाद निर्माण करायचा जे लोक प्रयत्न करत आहेत ते निराशेच्या भूमिकेची रचना करत आहेत, आशावादाची नाही. येथील जनतेजवळून शस्त्र घेऊन टाकण्यात आले होते. ते जर हाडांमध्ये असते तर कोणीही हिरावून घेऊ शकला नसता. परंतु जसे नख घेण्यात येते तसे ते घेण्यात आले. गरीब संस्कृतीची छाया - दोन व्यक्ती - भेटतात.

या प्रवासाचा उपयोग कशा प्रकारे केला पाहिजे? पू. किशोरीलालभाईंनी एक खूप चांगली विचारपूर्ण सूचना केली. एक भयानक भावना उत्पन्न होते आहे. ती व्हायला नको. सांप्रदायिक भावना - खादीवाले आणि बिगर खादीवाले - असे द्वैत उभे राहायला नको. ही भीतीची भावना योग्य आहे. परंतु आपण काय केले पाहिजे हे पाहा. आपला समाज दुधाचा सागर आहे. परंतु या दुधातून पोषक द्रव्ये मिळत नाहीत. याकरिता त्याचे दही केले पाहिजे. यामुळे आपण वेगळेच दही तयार केले पाहिजे. याकरिता आपण मोठ्या भांड्यात दुधाचे दही केले पाहिजे. असे करता करता करता मोठ्या दूधसागराचे आपण दह्यात रुपांतर करू शकू. दह्याचे भांडे दूर ठेवण्याकरिता नाही तर समुद्रातील दुधाचे दही करण्याकरिता आहे.

वेगळेपणाचा उद्देश वेगळेपण ठेवणे हा नाही.

रामदास -

महंते महंत करावे, युक्तिबुद्धीने करावे,

जाणते करावे नाना देशी.

ज्यांचा उद्देश आत्मपरीक्षण आहे त्यांना थोडा वेळ वेगळे राहावे लागेलही. ज्याप्रमाणे सूर्यनारायण जगाची समान सेवा करत असतो. आपण झोपतो तेव्हा तो झोपत नाही. तो सूर्यनारायण आत्मपरीक्षणाकरिता रात्री थोडा वेगळा होऊन बसत असतो. ज्याला जनतेची सेवा करायची असते त्याच्याकरिता, स्फूर्तिकरिता, संयमाकरिता तो वेगळा होत असतो. असे करून दुसऱ्या दिवशी तो या विश्वाला नवनवीन रंगांनी भरून टाकत असतो. त्याच्या वेगळे होण्यामागे हाच उद्देश असतो.

खादीवाल्यांचा हा वेगळा संघ नाही. परंतु ज्यांची सेवा करायची आहे त्यांची खरीखुरी सेवा करण्याकरिता हा आहे. गत वर्षात काय केले, काय नाही याचा पडताळा पाहण्याकरिता हा आहे.

बायबलची एक कहाणी - सर्व जगावर प्रेम करा असे येशूदेव म्हणतात. सुळावर चढायच्या आधीच्या दिवसाची गोष्ट आहे आहे ही. लाडक्या शिष्यांजवळच बसले होते. येशू म्हणाले, “माझ्या प्रिय मुलांनो तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. जगावर प्रेम करा, शत्रूवर प्रेम करा.” परंतु त्यांच्या आयुष्यातच असा काळ आला होता की जेव्हा ते म्हणाले होते की एकमेकांवर प्रेम करा. वैष्णवांचे वैश्वणांवर प्रेम ही वेगळी गोष्ट आहे. सजातीय वैश्वणाचे दर्शन हे प्रेमाचे नवे स्वरूप आहे. एकमेकांवर प्रेम करून पोर्चूगीज, डच इत्यादींनी ऐकी करून जगाला लुटले आणि लांडग्याप्रमाणे खाऊन टाकले. अशा हेतूने आपल्याला जगावर प्रेम करायचे नाही. परंतु सेवेकरिताच आपल्याला स्वतंत्र संघराज्य घडवायचे आहे.

सर्वत्र अनासक्तीचा उपदेश करणारी गीता जसे ‘यदि आसक्त मनः पार्थ’ असे म्हणते तसेच एका विचाराच्या लोकांनी संघात एकत्र होऊन दृढनिश्चयाने सेवा करायची आहे. चेगीजखान जसा आक्रमण करायचा तसे करून आपल्याला सेवा करायची नाही. आज आपण एकत्र आलो आहो, पण नंतर प्रत्येकाने स्फूर्तीचा साठा घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन काम करायचे आहे. आपण मणीरत्नाच्या दिव्यासारखे आहो – जिथे बसतो, तिथे प्रकाश असतोच. दिवा कधी म्हणतो काय की ‘सगळीकडे अंधार पसरला आहे’? दिवा तर अंधार ओळखतच नाही. त्याला जर अंधार दाखवला तर कदाचित तो मान्य करेलही, पण दिवा स्वतः अंधाराकडे तोंड करत नाही; उलट दिव्यामुळे अंधाराचे तोंड थोडेसे लकाकू लागते. स्फूर्तीचा रत्नदीप जवळ असता तर एकत्र जमण्याची गरजच भासली नसती. ज्या वेळेपर्यंत सूर्यनारायण प्रगट होतो तेव्हा कोणत्याही दिव्याची गरज नसते. पण सूर्यनारायण चिंतनासाठी मावळतो तेव्हा रत्नदीप स्वयंस्फूर्तीने प्रज्वलित होतो. तेव्हा संपूर्ण प्रकाश जरी मिळाला नाही तरी आनंद नक्की मिळतो. जेव्हा चळवळ तेजस्वीपणे सुरू असते तेव्हा दिव्यांची जाणीव होत नाही; पण जेव्हा चळवळ दिसेनाशी होते, तेव्हा रत्नदीप प्रकाशित होतोच.

धर्माधिकारी याला चटणीकोथिंबिरीची चळवळ म्हणतात. जीवनात जे जे घटक आहेत ते सगळेच विलक्षण महत्त्वाचे आहेत. त्यात कोणते गौण आणि कोणते प्रधान हे सांगताच येत नाही. तीन पायांचा स्टूल तीन पायावर उभा असतो. सर्व पाय सारखे असतात. याचप्रमाणे समाजाच्या उन्नतीकरिता जितके काही भाग आवश्यक आहेत त्या सगळ्यांचा विकास केला पाहिजे. आपण गावखेड्यांमध्ये जे जीवन पाहतो ते जीवनही असेच अभिव्यक्त झाले पाहिजे. या जीवनयात्रेत अमुक गोष्टीची व्यवस्था नाही असे म्हणून चालणार नाही. आपण तर प्रत्येक गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे.

एकनाथस्वामींची एक फार मजेदार गोष्ट आहे. त्यांच्या श्रीखंड नावाचा एक शिष्य होता. तो सर्वांना प्रसाद म्हणून चिमटी चिमटीभर गूळखोबरे देत असे. नाथ दोन तास कीर्तन करत असत. यामुळे नाथ म्हणाले तू प्रत्येकाला केवळ चिमुटभर प्रसाद देत असतो आणि तरीही लोक दोन तास बसतात ही किती विचित्र गोष्ट आहे ! दुसऱ्या दिवसापासून शिष्य ओंजळ भरून प्रसाद वाटू लागला. लोक उपरण्यात प्रसाद भरू लागले. यामुळे हजारो लोक येऊ लागले. नाथांमध्ये शक्ती होती. पटांगण भरू लागले. खोलीसुद्धा भरून गेली. नाथांच्या पलंगावर एक माणूस झोपून गेला - ही त्याची समाधी होती - निद्रा समाधिः स्थितिः. मजुरीच्या परिणामी जी गाढ झोप लागते ती ती झोप होती. दुसऱ्या दिवशी त्याला आंघोळ वगैरे घालून पाठवले. त्याच्यात जे प्रेम भरलेले होते त्याबद्दल काय सांगावे? अत्युत्तम आदर्श स्ययंपाक जरी केला असता तर तीसुद्धा मोठी गोष्ट झाली असती.

काल मेटापल्लीला गेलो होतो. कार्यकर्त्यांमध्येच राहिलो होतो. तिथे मला हातसडीचा तांदुळ मिळाला नाही. यामुळे खात नव्हतो. याचे कारण असे सांगण्यात आले की हा तांदूळ शिजत नाही. मी तिथे स्वयंपाक करण्याकरिताच थांबलो. तो भात खाऊन सर्वांना आनंद झाला. ब्राह्मणाला दक्षिणा मिळाली असे मला वाटले. असातसा माणूस स्वयंपाकी म्हणून आला असता तर खादीयात्रा यशस्वी झाली नसती असे मला वाटले. जीवनाचा आदर्श - हा  मार्ग सर्वांना दिसला पाहिजे. या यात्रेचा हाही एक उद्देश होता. याच दृष्टीने ही यात्रा आयोजिली होती.

मूर्ख लोक यात्रेचा जो अर्थ करतात तो अर्थ करण्याची माझी इच्छा नाही. यात्रेचा अर्थ जरी बिघडला असेल तरी यात्रेचा शुद्ध अर्थ आपण तेच काम केले पाहिजे असा आहे. घाबरून, तोफखाने सोडून पळून जाणे ही गोष्ट मला पटत नाही. यात्रासारखा शब्द आपली तोफ आहे.

माणूस म्हटला की त्याचा सर्व व्यवहार वाणीवर अवलंबून असतो. जो माणूस उत्तम शब्द बिघडवतो तो आपले जीवन कलुषित करतो. मी तर माझी तोफ घेऊन परत जाईन. हे पवित्र शब्द माझ्या मालकीचे आहेत. मी नवीन शब्द का तयार करू? नवे शब्दसुद्धा हे बिघडवतील. यामुळे जुन्या शब्दांना बिलगून राहणे हेच चांगले. यामुळे स्वच्छ अर्थानेच या शब्दांचा वापर केला पाहिजे. नैवेद्य अर्पण करायची गोष्ट. निवेदन करायची गोष्ट. सहासहा आठआठ महिने टकळीची भक्ती करायची आणि निष्ठापूर्वक जी गोष्ट उत्पन्न होते ती जनता ईश्वर आहे या दृष्टीने तिच्या दर्शनार्थ ठेवण्यात येते तिच्याकरिता नैवेद्य याहून अधिक चांगला नवीन शब्द कोणता आढळेल? न खाणाऱ्या देवासमोर नैवेद्य ठेवण्यापेक्षा जनतेसमोर ठेवणे काय वाईट आहे?

नामदेवाने देवासमोर दूध ठेवले आणि तिथून तो जातच नव्हता. शेवटी देव ते दूध प्याला असे म्हणतात. आपल्या ढोंगी भक्तांना खरोखरच दूध पिणारा देव भेटला तर नैवेद्य अर्पण करणेच बंद करतील. खऱ्या अर्थाने नैवेद्य खाणारा देव उभा आहे.

महिम्न स्तोत्रात म्हटले आहे की देवाला खाट नाही परंतु रथ आहे. बैलवाला आहे. त्याला खूप ओढावे लागते परंतु जो ओढला जात नाही. यामुळे अखेरीस तो रथ चुलीतच जाळतो. यामुळेच स्वयंभू महादेव आपली जागा सोडत नसतो. त्याला जो नैवेद्य हवा असतो तो कोणीही अर्पण करत नाही. नवीन देऊळ बांधण्यात पूण्य कमी आहे, जुन्या देवळाचा जीर्णोद्धार करण्यात जास्त आहे. यामुळे आपण जुन्या शब्दांचा जीर्णोद्धार केला पाहिजे. दगडसुद्धा घासून घासून स्वच्छ करता येतो, परंतु तो भिजत नाही. आपणसुद्धा उत्तम शब्द घासूनघासून स्वच्छ केले पाहिजे. परंतु ते भिजत नाहीत. Independence शब्दाकरिता प्रतिशब्दच मिळत नव्हता. यामुळे ‘पूर्ण’ स्वराज्य केला. वर्तुळ तर नेहमी पूर्णच असते. त्याला पूर्ण कशाला जोडायचे? परंतु स्वराज्य शब्द थोडाच सोडू शकलो.

यात्रेत दोन आणे कोण देईल? पंढरपूरवाले फुकट जेवण मागतात. ते म्हणतात, ‘मी जेवतो हीच मेहनत आहे.’ इथे तर दोन आण्यात जेवण ठेवले आहे. याचे अडीच आणेसुद्धा होऊ शकतात. हे बरोबर नाही. ही अपूर्णता येत्या काही वर्षात निघून गेली पाहिजे. जेवण स्वच्छ, उत्तम असावे. भाजी चिरायचे राहिले आहे. या यात्रेत सर्वांनी आपापला वाटा उचलला पाहिजे. दोन आणे ही आळसाची किंमत नाही.

दुसरा पाठ - इथे जे शिकायचे आहे ते जनतेसमोर मांडण्याकरिता आहे.

तिसरा पाठ - स्वच्छतेचा पाठ शिकणे.

तिसरा पाठ - सर्वांनी एकाच गोष्टीत भाग घेतला पाहिजे.

भक्ताला कर्म सहनच होत नाही. वामदेवचे चित्र ‘ध्यानस्थ’ अवस्थेत काढतो वा झोपलेल्या अवस्थेत काढतो. ऋषीचे चित्र ध्यानावस्थेत वा उपदेश करतानाच का काढतो? ‘कृषिमित्त कृषस्व’ असा उपदेश करतात. यात धनाचा ढीग निर्माण होत नाही. ‘चित्ते रमस्व बहु मान्यमान’ ही वेदाज्ञा होती. परिश्रम करून जेवायची यांना लाज वाटत होती.

माझा एक मित्र संन्यासी आहे. त्याची त्यांच्या वडिलांना भीती वाटली. यामुळे ते माझ्याकडे आले.

मी म्हणालो, “ज्याने स्वतःचे काळे पांढरे केस काढून टक्कल केले असेल तोच संन्यासी. माझे किंवा इतर कोणाचे त्यांच्यावर ओझे नाही.”

आलेले गृहस्थ म्हणाले, “मला तर यांची सेवा करावी लागते. संन्यासी बापाकडून सेवा घेतो?” संन्यास्याच्या भक्तीची ही विकृत व्याख्या काढून टाकण्याकरिता ही यात्रा आहे. कोणत्याही माणसाने अर्धा तास भक्तिभावपूर्वक परिश्रम केले पाहिजे.

कोणी तरी तुकारामला विचारले, ‘पंढरपूरला कसे जावे?’ तर तुकाराम काय म्हणाले, ‘एक काळा दगड उभा आहे. त्याला म्हणा की तू किती सुंदर उभा आहे?’ बारकाईने ते देवाच्या सौंदर्याचे वर्णन करत होते. कर्माबाई नावाची वेश्येची एक मुलगी होती. तिच्या सौंदर्याची कोणीही बरोबरी करू शकत नव्हता वा नव्हती. त्यांनी वारकऱ्यांच्या तोंडून ऐकले होते यामुळे विचारले, असा सुंदर कोण आहे? त्याला मंदिरातली चांगली ओबडधोबड मूर्ती दाखवण्यात आली. तिला धुऊन धुऊन चुन्यासारख्या तांदुळाने स्वच्छ करण्यात आले होते. त्या मुलीला तर कामक्रोधविरहित तो दगडच वर म्हणून आवडला. ‘यवन बदरिया तो अधिकारी.‘ यवन राजाला वाटले ही सुंदरी आपले जीवन व्यर्थ घालवते आहे. त्याने तिला पकडण्याकरिता शिपाई पाठवले. ती मुलगी म्हणाली की मी देवाचा निरोप घेऊन येते. भक्ताच्या कामाकरिता सिद्धहस्त देवाचे पाय या मुलीने पकडले आणि ती शवाप्रमाणे तिथे पडून राहिली.

ज्या मूर्तीने हजारो जड जीवांचा उद्धार केला तो आज माझाही उद्धार करील. तर ज्या श्रद्धेने या मुलीने भक्ती केली तशी जर आपण भक्ती केली, उपासना केली तर काहीही होणार नाही. गरिबाहून गरीब वर्णाची निरंतर सेवा करत राहणेच हिंदू धर्माचे ध्येय आहे. समाज याच पायावर उभा आहे. या पायाची सेवा करण्याकरिता हिंदू धर्म आहे. कोणीही देवाला असे म्हणत नाही की, ‘तुझ्या डोळ्यांचे वा तोंडाचे मला दर्शन दे. भक्त पायाचेच दर्शन मागत असतो. देवाचे पाय म्हणजे गरीब लोक. वेद भगवानची गंभीर वाणी महात्माजींसमोर सांगितली. एकटा खाणारा पापी होतो आणि तो पापच खात असतो. तो धनाचा - संपत्तीचा साठा करतो, संपत्ती निर्माण करत नाही.

**केवलाहो भवति केवलाही**

**सत्यं ब्रवी मि मोघमन्नं विन्दते वधेत्त्सन**

(एकटा राहणारा खरोखरच एकाकी होतो. मी सत्य सांगतो – तो व्यर्थ अन्न मिळवतो आणि अखेरीस नाश पावतो.)

असा माणूस मृत्यू मिळवत असतो असे नाही. तो वध मिळवत असतो. गरिबांचा निरंतर छळ करून जे स्वतःचे पोट भरायचा विचार करतात आणि शरीरश्रम टाळतात, बसल्या बसल्या पोट भरतात ते देवाचा छळ करत असतात. एके दिवशी ईश्वर रुद्राचे रूप धारण करून 'बुभुक्षमाण रुद्ररूपेण तिष्ठते'. संपूर्ण युरोप उपाशी माणसाप्रमाणे त्रस्त झाला आहे. हिंसावादाने ही पृथ्वी कृद्ध झाली आहे. अशी भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीमधून वाचण्याकरिता माणसाने जे महारोग आहेत ते मिटवले पाहिजे. परिश्रम करण्याकरिता दररोज अर्धा तास चरखा फिरवला पाहिजे. ज्याप्रमाणे पंढरपूरच्या दर्शनाकरिता आपण जातो त्याप्रमाणे आपण देवाच्या प्रतिष्ठेकरिता शारीरिक श्रम करण्याकरिता आपण जायला पाहिजे हे निश्चित सत्य आहे.

प्रभातकाळाची आणि सायंकाळची प्रार्थना, टकळीचे सूत्रयज्ञ, उत्तम अन्न तयार करणे.

## आ. गांधीजींचे भाषण

विनोबांनी तुम्हांला इतके काही सांगतलेले असल्यामुळे माझे श्रम वाचले. खादीयात्रेचे रहस्य त्यांनी इतके काही विस्ताराने समजावून सांगितले की याशिवाय मी दुसरे काय सांगू?

एक गोष्ट सांगायची राहून गेली ती ही आहे. आपण एकमेकांना हिशेब देण्याकरिता इथे गोळा झालो आहो. या हिशेबाची आठवण विनोबाजी बोलत होते तेव्हा मला आली.

टिकेकर मला म्हणाले की मला 'हरिजन'मध्ये लिहायचे आहे की जीन जरी बंद करावे लागले तरी प्रत्येकाने कापूसाची धुनाई करणारे एक यंत्र स्वतः जवळ ठेवले पाहिजे आणि त्याने कापूस आणि रू वाचवला पाहिजे. या गोष्टीची अखेरीस चर्चा करायची राहूनच गेली. टिकेकरसुद्धा माझ्याकडे आले नाही. परंतु आज ही गोष्ट माझ्यासमोर कशी काय आली? टकळी चालवण्याची आणि सफाईची परीक्षा सर्वांनी दिली आहे, परंतु घरी गेल्यानंतर काय? खादीयात्रेचे रहस्य तर आपल्याला घरी गेल्यानंतर जास्त कळते.

समासात - गिरण्यांच्या मूर्खपणामुळे स्वदेशी असेच म्हणावे लागेल.

असा माणूस विनोबांच्या भावनेच्या शतांशानेही जर करू शकेल तर ही यात्रा सार्थक झाली असे म्हणता येईल. परंतु आपल्या श्रद्धेचा आवाका तर जमनालालजींच्या जीनपर्यंतच जातो. वर्ध्यात तीन तारखेला

आलो तेव्हा मी मगनभाईंना विचारले होते की वर्ध्यात किती कापूस येतो याचा तुझ्याजवळ काही हिशेब आहे काय? आणि या कापसापासून खादी तयार केली तर त्यामुळे त्यांचे किती नुकसान होईल की विदेशी कापड यापेक्षा स्वस्त पडेल? ते म्हणाले की माझ्याजवळ असा हिशेब नाही. यामुळे मला वाईट वाटले. या तुलनेत महाराष्ट्र चरखा संघाचे काम परिपूर्ण आहे. तर हा हिशेब पाहिलाच पाहिजे. ज्या संस्कृतीचा उद्देश आर्थिक लाभ आहे त्या संस्कृतीच्या सामना अविश्रांत परिश्रमाशी आहे. टकळी वगैरे करा, परंतु बुद्धीनेसुद्धा काम करा. धार्मिक बुद्धीने काम कराल तर बुद्धीसुद्धा तेजस्वी होईल. चरखा शास्त्र हे लहान शास्त्र नाही. इतर शास्त्राच्या तुलनेत हे मुळीच कमी नाही. परंतु त्याकरिता तपश्चर्या पाहिजे. वर्धा तालुक्याचा वा तुम्ही ज्या गावात काम करता त्या गावाचा हिशेब मिळू शकतो की नाही? ज्यांच्याजवळ कापूस आहे ते फुकटात कापड तयार करू शकतात. हे जर जनतेसमोर ठेवू शकलो तर ही फार मोठी गोष्ट होईल. दिव्याचे उदाहरण तर अद्भुत होते. तो पाहिला तर खादीवाले खरे खादीवाले नाहीत असे होऊच शकत नाही. असे पाहिले तर खादी वेश्याही नेसते आणि सतीही नेसते. ब्रह्मचारी नेसतो आणि व्यभिचारीही नसतो. खादीचा महिमा माहीत असणारा तर नीट हिशेब ठेवील.

जमनालालजींना जीन बंद करायला सांगितले तर ते ते जिनसुद्धा बंद करतील. परंतु त्यामुळे कोणताही लाभ होणार नाही. आपल्याला तर यांच्याकडून हिशेब मिळवायचा आहे. बाहेरच्या जगात आपण ही गोष्ट विसरायला नको. आपल्याजवळ जर दिवा असेल तर आपण त्याचा प्रकाश सर्वत्र नेला पाहिजे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. नाही तर हा एक संप्रदााय होऊन जाईल. संप्रदाय होऊन आपण खुश व्हायला नको. उलट आपण अस्वस्थ व्हायला पाहिजे. आणि इतरांनासुद्धा असा रत्नचिंतामणी बनवणे आपले काम आहे. उजून काही बोललो तर तो माझा उद्धटपणा होईल.

# २१. वल्लभभाईंचे सडेतोड उत्तर - प्रतिक्रिया

आज पुण्याला जायला निघालो. माझ्याशी चंद्रशंकरविषयी बोलण्याकरिता बापू सेगावहून वेळेआधीच आले. एक दिवस आधी आले. चंद्रशंकरला पूर्णपणे मुक्त केले पाहिजे असा बापूंचा सल्ला होता.

या गोष्टी सुरू असताना वल्लभभाईंची अमृतलाल शेठ विषयीची मुलाखत 'जन्मभूमी' वर्तमानपत्रात वाचली. माझ्या तोंडून निघाले की वल्लभभाईंचे उत्तर मुद्देसूद आहे. लगेच बापूंच्या तोंडून उद्गार नाघाले, 'तुला ते आवडले? ते मुळीच चांगले नाही.'

मी कारण विचारले.

बापू म्हणाले - हे पाहा, हा उपोद्घात मागील भागाच्या अगदी विरुद्ध आहे. म्हणतात की मी यांच्यासारखा होऊ शकत नाही. असे असूनही याला हलकटसुद्धा म्हटले आहे. ठीक आहे, इतकेच करून थांबले असते तर बरे झाले असते. परंतु मौन राहायचे म्हणूनही मौन राहू शकले नाही. शिवाय असेही म्हणतात की अमृतलालचा पाणउतारा केला तर माझीही किंमत कमी होते. ही गोष्ट अगदी खोटी आहे. यांना उघड कले तर वल्लभभाईंचे तेज का बरे कमी व्हावे? उलट ते वाढेल आणि वाढायलाच पाहिजे. हे पाहा, श्यामळदासने दिलेले शीर्षक. ते सर्वांना दाखवू शकतात आणि म्हणू शकतात की मला खाली न पाडता तुमचाच पाणउतारा होईल. यातून सामान्य वाचकाच्या मनावरसुद्धा असा ठसा उमटतो की अमृतलाल फार मोठी आसामी आहे आणि यांचे फार वजन आहे.

ठीक आहे आता पाचही मुद्दे घेऊ.

माझ्याजवळ वेळ नव्हता आणि मी अधीर होत चाललो होतो.

बापू म्हणाले - नाही, परंतु ही गोष्ट तर तू समजून घेण्यासारखी आहे. अशा चर्चेत का पडायचे नाही हे तू समजून घ्यायला पाहिजे. असे उत्तर इतर कोणी दिले असते तर चालले असते. वल्लभभाईंनी असे उत्तर देणे त्यांना शोभत नाही.

हे पाहा, हा पहिला मुद्दा घे. यात अमृतलाल म्हणतो आणि वल्लभभाई म्हणतात यात काय फरक आहे? वल्लभाईंच्या बोलण्यात थोडा विवेक आहे तर अमृतलालच्या बोलण्यात उद्धटपणा आहे. परंतु

दोघांच्याही म्हणण्याचे भाषांतर इंग्रजीत सारखेच होईल. अमृतलालला चूक म्हणायचे तर वल्लभभाईंना संस्थानांचे किती ज्ञान आहे?

नंतर दुसरा परिच्छेद पाहा. यात केवळ आरोप आहे. खरे काय आहे याबद्दल अंदाज करावा लागतो. शिवाय ते म्हणतात की देशी राज्यात आम्ही काही काम करू शकत नाही ही गोष्ट बरोबर आहे, आपण लहान लहान काम तर करू शकतो. रचनात्मक काम करू शकतो.

असे तर पुष्कळ दाखवण्यासारखे आहे. शेवटचे सर्व भाग बेकार आहेत. गोष्ट अशी आहे की वल्लभभाईंचे भाषण ऐकल्याशिवाय मी याचे उत्तर देऊ शकत नाही. या उत्तराचा अर्थ असा आहे की अशा चर्चेत मी पडू शकत नाही.

अमृतलाल सांगतो ती गोष्ट जर खरी असेल तर मी गुजरात-काठिवाडचा त्याग केला पाहिजे. मी केलेल्या संपूर्ण सेवेची धूळधाण होऊन जाईल हे याचे कारण आहे. ही गोष्ट जर खोटी असेल तर मला हिचे उत्तर द्यायचे नाही. वाचकांच्या लक्षात येईल की यात काही गोष्टी अशा आहेत की ज्या अमृतलाल शेठला शोभत नाही. इत्यादी, इत्यादी.

यानंतर लीलावतीविषयी विचारले. 'ती सर्व पत्रे वाचते काय?'

मी म्हणालो, वाचत तर असते. कसे हे विचारता काय?

बापू - प्रभावतीचे पत्र हिने वाचलेले असावे. बाला ती सांगत होती की तिला हिस्टेरिया होत असतो. तू तिला पूर्णपणे मनाई केली पाहिजे. तिने पत्रात ढवळाढवळ करायला नको.

इतक्यात रामदासला लिहिलेल्या पत्राची गोष्ट निघाली, आणि बापूंनी गंभीर प्रकरणाला स्पर्श केला. . . . च्या भयंकर पतनाची गोष्ट ऐकली. शिवाय तिच्या लंगड्यापांगळ्या बचावाची गोष्ट ऐकली. पतीच्या निर्लज्ज बचावाची गोष्ट ऐकली.

आणि माझ्या डोळ्यातून अश्रू निघाले.

# २२. डॉ. अंसारींचा मृत्यू

नंदी १० तारखेला सकाळी आले, आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे सोमवारी त्यांच्या मृत्यूची बातमी कळली. प्रेसला तार केली. बेगमला तार केली. झोराला पत्र लिहिले.

झाकीरला पत्र लिहिले. त्यात लिहिले -

तुमची तार मिळाली. त्याआधीच मला डॉक्टरच्या अवसानाची गोष्ट कळली होती. बेगमसाहबांना मी तार केली आहे आणि वर्तमानपत्रांना संदेश पाठवला आहे. झोहरालासुद्धा लिहिले आहे. काय झाले ते सर्व लिहाल असे समजतो. त्यांच्या दवाखान्याची आणि घराची काळजी कोण घेतो हेसुद्धा लिहाल.

या मृत्यूने मी जितका अस्वस्थ झालो तितका फार कमी मृत्यूने झालो असेन. मला आशा होती की आणि माझ्या मनातही होते की डॉ. अंसारी शंभरी गाठतील. यामुळे जेव्हा प्रेसची तार मिळाली तेव्हा माझा त्यावर विश्वासच बसत नव्हता.

अनेकांच्या जीवनासंबंधात असे होत असते. परंतु ईश्वर महान आहे. तो जे देतो ते तो परत घेऊन टाकतो. त्याचा हेतू आपल्याला कधीही कळत नाही. तो जी काही व्यवस्था करतो त्याच्या सुज्ञपणाबद्दल आपण वाद घालू नये.

त्यांच्या जीवनादरम्यान चांगल्या गोष्टींशिवाय दुसरे काहीही झाले नाही. यामुळे त्यांच्या मृत्यूतूनही काही तरी चांगला परिणाम निघेल अशी आशा ठेवली पाहिजे आणि मान्य केले पाहिजे.

जामिया मिलिया इस्लामियाची त्यांच्या मृत्यूमुळे किती हानी होईल याची मला कल्पना आहे.

तुम्हा सर्वांना अंतःकरणापासून माझ्या सद्भावना.

**२.**

प्रिय जवाहरलाल,

ऍगाथाच्या हस्ते मी माझे उत्तर तुला दिले कारण तुझ्या दृष्टिकोनाचे मी योग्य चित्रण केले की नाही हे जाणून घेण्याची माझी इच्छा होती.

परंतु तू माझ्यावर तुटून पडला याचा मला आनंद होतो. सतत सुरू राहील आणि विनाश होत राहील असा वर्गविग्रह ज्यातून उद्भवेल अशा व्यवस्थेला पाठिंबा देण्याचा अपराध मी केलेला नाही. मी असे म्हणालेलो नाही की जो समाज हिंसेवर आधारलेला असेल त्याचा मी पुरस्कार करतो. निरर्थक चुकांकरिता लोकांनी केलेल्या टीकेची आणि त्यांनी काढलेल्या दोषाची तसेच लोकाना खूप अपयश आले असेल आणि त्याकरिता तेच जबाबदार असतील तरीही त्याची प्रशंसा करण्याचा अपराधही मी केलेला नाही.

माझ्यावर तू जे आरोप करतोस त्याकरिता शक्य आहे की मी जबाबदार असेनही परंतु याबद्दल नाही. असे असेल तर तू त्यांना निश्चितच दाखला द्यायला पाहिजे. माझ्या दृष्टीने माझी काम करण्याची पद्धत तुझ्यापेक्षा वेगळी आहे हे तर मी आधीच मान्य केलेले आहे. परंतु वर्तमान आर्थिक व्यवस्थेबद्दलच्या दृष्टिकोनासंबंधात नाही.

डॉ. अंसारींच्या मृत्यूमुळे मला जोरदार फटका बसला आहे. राजकारणातून झालेले या मित्राचे मूल्य तर माझ्याकरिता असीम होते.

मी आशा करतो की थंड हवा खाण्याकरिता तू थोडा खाली जाशील वा इथे माझ्याजवळ येशील. स्वरूपला सांगशील की तिची दोन पत्रे मिळाली.

सर तेजबहाद्दूर सप्रूंना लिहिशील.

सप्रेम बापू

१८ मे १९३६

## ३.

डॉ. अंनसारींच्या मृत्यूबद्दल बापूंनी एक हृदयद्रावक लेख लिहिला. बेगमला तारसुद्धा केली आणि झाकीरसाहेबांना लिहिले.

त्यानंतर मीराबहेन आणि राकुमारीला पत्रे लिहिली. मीराबहेनला असे लिहिले -

हो. डॉ. अंसारींच्या मृत्यूमुळे माझी फार हानी झाली आहे. जन्म आणि मृत्यू या दोघांमध्येही फार मोठे रहस्य भरलेले आहे. मृत्यू जन्मापूर्वी आलेला एक प्रसंग आहे असे जर आपण मान्य केले नाही तर

जन्ममरणाधील काळ क्रूर थट्टाच होऊन जातो. मृत्यू कोणाचाही असला आणि तो कसाही असला तरीही त्याबद्दल कधीही शोक न करण्याची कला आपण शिकायला पाहिजे.

माझ्या हिशेबाने आपण आपल्या स्वार्थाविषयी शक्य तितके बेफिकीर राहणे शिकायला पाहिजे. आणि ही उदासीनता तर तेव्हा येते की जेव्हा या जीवनात आपण जे काम पूर्ण करायचे ठरवले आहे त्याचे आपल्याला क्षणोक्षणी भान असते. परंतु आपल्याला कोणते काम करायचे आहे याची पारख कशी करायची? ईश्वराच्या इच्छेचे भान ठेवून. आणि ईश्वराची इच्छा काय आहे हे आपल्याला कसे कळेल? प्रार्थना आणि सदाचरणाने. खरे सांगायचे तर प्रार्थनेचा अर्थच सद्वर्तन, सदाचरण आहे. रामनाम सुरू करायचे त्याआधी दररोज आपण एक भजन म्हणत असतो. त्याचे धृपद असे आहे - हरिने भजता नथी कोईनी लाज जती जाणी रे । प्रार्थना म्हणजे ईश्वराबरोबर एक होऊन जाणे.

## ४.

राजकुमारीला याप्रमाणे,

डॉ. अंसारींबद्दल मी जे लिहिले ते सर्व तू पाहिलेच असशील. स्वार्थामुळे त्यांच्या मृत्यूबद्दल मी रडलो, परंतु त्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्याची काहीही आवश्यकता नाही. मला वाटते त्याप्रमाणे आपण जर यात्रेकरू असू तर हे नश्वर शरीर जरी नष्ट झाले तरी त्यातील अविनाशी आत्मा नष्ट होत नाही. तो जुने वस्त्र काढून टाकतो आणि नवीन घालतो.

त्यांनी जी सेवा केली तिचा लोप होत नाही. श्रद्धा असेल तर ते अदृश्यपणे अजूनही सेवा करत आहेत असे आपल्याला वाटायला पाहिजे. आपल्या इंद्रियांच्या मदतीने आपण आपल्याला (सापडलेल्यासुद्धा) दुर्बल आणि अनेकदा विश्वास बसणार नाही अशा पुराव्याचा वापर करण्याच्या सवयीमुळे आपल्या याच जाणीवेवर हे जग चाललेले आहे हे आपण मान्य करणार नाही. आपल्याला कळतात अशा बदलत्या दृश्यांपेक्षा ही गोष्ट जास्त टिकाऊ आणि उपयोगी आहे. आपली बुद्धी या जगात घडणाऱ्या घटनांची नोंद घेत असते आणि आपल्याला कधी हसवत आणि कधी रडवत असते.

कताईची वेळ झाल्यामुळे आता शहाणपणाच्या या गोष्टी पुरे.

# २३. गुरूचा शोध

१९ मे १९३९

एका माणाने लिहिले - मद्रासजवळ अमुक एक गुरू आहे. त्याला तुम्ही गुरू करा. बापूनी लिहिले -

गुरूचा माझा शोध बहीर्मुख नाही. अंतःस्वभावातून आहे. कदाचित शोध सुरूच राहील. हेच याचे बक्षीस आहे. कोणत्या तरी शरीरधारी गुरूला माझ्या जीवनात जर स्थान असेल तर ईश्वर त्याला माझ्याकडे पाठवील.

तुमचा अंतःकरणपूर्वक,

मो. क. गांधी

**१९-५-१९३६**

परमहंस प्रज्ञानेश्वर यतीने पंढरपूरच्या मंदिराकरिता प्रयोपवेशन करण्याचा विचार गांधीजींना सांगितला.

बापूंनी त्यांना अडवले आणि सांगितले की हिंदूंमध्ये पूर्ण जागृती होईपर्यंत तुम्ही अशी तातडीची उपाययोजना करू नका.

# २४. धर्मग्रंथांमध्ये स्पर्धा नाही

एका फतेउल्लाखानने पत्र लिहिले. कुराणात आधुनिक प्रश्नांची सोडवणूक करण्यात आलेली आहे की नाही?

या प्रश्नाच्या उत्तरात -

२० मे १९३६

बायबल म्हणा की झेंद अवस्ता म्हणा की पवित्र कुराण म्हणा या सर्वांना मी आध्यात्मिक अनुभवाचा आलेख असलेले पुस्तक समजतो. आजच्या समस्यांच्या सोडवणुकीकरिता जगातील इतर धर्मग्रंथांमध्ये जसे आजच्या समस्यांचे निराकरण आढळते तसे कुराणमध्ये आढळते की नाही हे मला माहीत नाही. आज वेगवेगळ्या धर्मग्रंथांत स्पर्धा नसून धर्माचे प्रतिनिधित्व करणाऱ्या धर्माचे मालक झालेल्या लोकांमध्ये आहे. अशीच दुसरी स्पर्धा धर्माचे प्रतिनिधित्व करणारे आणि इतर धर्मग्रंथांचे प्रामाण्य मान्य न करणाऱ्या लोकांमध्ये आहे.

# २५. डॉक्टर अंसारींची जागा घ्याल?

**२५-५-१९३६**

डॉ. अंसारींच्या मृत्यूविषयी डॉ. झाकीर हुसेन यांना पत्र लिहिले होते त्याचे उत्तर आले. तेव्हा त्यांनी आपले दुःख असे व्यक्त केले - डॉक्टरच्या कुटुंबाच्या स्थितीचे वर्णन केले. मी स्वतः त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी घेईन असे लिहिले.

याचे प्रत्युत्तर म्हणून बापूजींनी लिहिलेले पत्र -

प्रिय भाई झाकीर,

आताच तुमचे पत्र मिळाले. नागपूरहून निघणाऱ्या भारत सेवक समाजाच्या वर्तमानपत्रात - 'हितवाद'मध्ये डॉक्टरसाहेबांविषयी ऍगाथाने जो लेख लिहिला आहे त्याची प्रतही आजच्या टपालात आली. माझ्या मनात त्यांची किती महत्ता होती हे कळावे म्हणून तो लेख पाठवत आहे.

युरोपची यात्रा त्यांनी मध्येच सोडून दिली होती याची मला कल्पना आहे. हा प्रवास सुरू ठेवा म्हणून मी जी विनवणी करत होतो ती वाया गेली. न सांगता ते माझ्याकडे धावून आले होते. आणि त्यांनी त्याच्या ओळखीच्या सर्व प्रख्यात डॉक्टरांना गोळा करून टाकले. प्रेमाचे हे असामान्य प्रदर्शन पाहण्याकरितासुद्धा उपवास करणे आवश्यक झाले असते. यांकडे दुसऱ्या दृष्टीनेसुद्धा पाहता येते. असेही म्हणता येते की या तीन आठवड्यात रुग्णांच्या शुश्रूषेकरिता या निष्णात डॉक्टरांची फार आवश्यकता होती. असे असेल तर माझे उपवास करणे मूर्खपणाच ठरते. प्रेमाच्या अशा प्रदर्शनाचा कसा अर्थ करायचा हे कोण सांगू शकतो? जीवनाच्या क्षणाक्षणावर ज्याचे नियंत्रण आहे त्याची इच्छा काय आहे हे जर आपल्याला कळले असते तर आपण ती इच्छा खूप नम्रपणे शिरसावंद्य मानली असती इतके मात्र जाणवते.

माझी मनस्थिती कशी आहे ते तुम्हाला या लांब परिच्छेदावरून कळेल. दररोजचे काम करण्याकरिता वेळ आहे की नाही वा ते केल्याने वेळ वाचतो काय हे सांगता येत नाही. परंतु बिचाऱ्या झोहराच्या स्थितीत मी आहे. एका क्षणापासून दुसऱ्या क्षणापर्यंत पोहोचण्याच्या काळातही कोणत्या ना कोणत्या कर्तव्याने साद घातली नसती तर मीसुद्धा झोहरासारखाच व्याकूळ झालो असतो.

तुम्हाला पत्रात काय लिहावे याचाच विचार तीन दिवसांपासून माझ्या मनात घोळतो आहे. आणि मग माझ्या मनात श्वाईबचा, नंतर ख्वाजाचा आणि नंतर शेरवाणीचा विचार आला. या वेळी लगेच लक्षात आले नाही की आता हे महापुरुष आपल्यामध्ये नाहीत. माझ्या ओळखीचे इतरही मुसलमान आहेत. परंतु या क्षणी तर यांचीच नावे स्पष्टपणे समोर येऊन उभी राहिली. परंतु इतके तर कळते की डॉ. अंसारी माझे असे मार्गदर्शक झाले होते की जे मला कधीही चुकीचे मार्गदर्शन करू शकत नव्हते. तुमच्यापैकी कोणीही असा होऊ शकेल असे मला वाटत नाही. हा पात्रतेचा प्रश्न नाही, श्रद्धेचा आहे.

लिहायला बसलो की केवळ तुमच्यापुरतेच हे लिहावे असे वाटते. मला जो प्रश्न विचारायचा होता आणि अजूनही जो समजून घेण्याची माझी इच्छा आहे तो प्रश्न असा आहे - हिंदू-मुसलमानांच्या प्रश्नासंबंधात माझ्या मनात डॉ. अंसारीचे जे स्थान होते ते तुम्ही घेऊ शकाल काय? या वेळी मला काय व्याकूळ करत असेल तर ती गोष्ट ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या आणि ईश्वराला घाबरणाऱ्या सज्जन मित्राच्या, डॉक्टरसाहेबांच्या (डॉ. अंसारी) आधाराचा अभाव. हिंदू-मुसलमान ऐक्यासंबंधात मार्गदर्शनात कधीही चूक न करणार नाही अशा सल्लागाराचा अभाव.

आजकाल मी या प्रश्नावर मौन धरले आहे. हे भावनाशून्यतेचे चिन्ह नाही. हिंदुमुसलमानात किती जरी विष पसरलेले असले, विसंवाद निर्माण झालेला असला तरी त्यांच्यात ऐक्य निर्माण झालेच पाहिजे अशी जी माझी मान्यता आहे ती दिवसेंदिवस अजूनच सखोल होत चालली आहे. हे त्याचेच चिन्ह आहे. यामुळेच मी तुम्हाला विचारतो आहे - तुम्ही अंसारींची जागा घेऊ शकाल काय? याचे उत्तर देत असताना तुमचे समजात किती स्थान आहे याचा विचार करू नका. आत्मविश्वास असेल तर तुम्ही हो म्हणा, नसेल तर नाही म्हणा. यामुळे काहीही गैरसमज होणार नाही. मी तुम्हाला इतका चांगला ओळखतो आणि तुमच्यावर इतके प्रेम करतो की गैरसमजाला वावच राहत नाही.

तुम्ही माझे सल्लागार व्हा अथवा होऊ नका, परंतु डॉ. अंसारींना मी शेवटच्या पत्रात जो प्रश्न विचारला होता त्यांचे उत्तर तुम्ही कृपा करून द्या. वायव्य सरहद्द प्रांतातील सरकारने उचललेले पाऊल असे आहे - शिखांच्या आणि हिंदू मुलींच्या ज्या कन्याशाळा आहेत त्यांच्यात गुरुमुखी आणि हिंदीत जे शिक्षण दिले जात होते ते बंद करायचे. हे बरोबर आहे काय? महिन्यांपासून मला यासंबंधातील माझे मत विचारण्यात आले आहे, परंतु याचे उत्तर देण्याकरिता मला जे आमंत्रित करण्यात आले होते ते मी आजपर्यंत स्वीकारू शकलेलो नाही. हा प्रश्न तर सिद्धांताचा आहे आणि याच्या उत्तरात गंभीर परिणाम दडलेले आहेत. साहेबजादा सर अब्दुल

कय्यूमनासुद्धा मी हा प्रश्न विचारला आहे. माझ्याकरिता दुःखद होईल असे उत्तर त्यांनी दिले आहे. तुमचे उत्तर देण्याआधी तुम्ही त्यांनी दिलेल्या उत्तराची नक्कल पाहू शकता.

हिंदी-हिंदुस्तानीच्या संबंधातील माझ्या वरील पत्राचे मुजीबनी जे मत दिले आहे ते तुम्हाला पटते की नाही हे मला माहीत नाही. मी ‘हरिजन’मध्ये दोन लेख लिहिले आहेत. ते तुम्ही, अकिलने आणि इतर मित्रांनी वाचले तर मला आवडेल. तुम्हाला जर या लेखांमधील विचार पटत नसतील तर तुम्ही यासंबंधात माझ्याशी वाद करावा अशी माझी इच्छा आहे. ही चर्चा ‘हरिजन’मधूनही होऊ शकते वा आपण ती आपसात खाजगीरित्याही करू शकतो. मला तर मतभेदाचे कोणतेही कारण दिसत नाही, परंतु जर ते असतील तर ते दूर करण्याकरिता आपण प्रयत्नशील असलो पाहिजे.

तुम्हा सर्वांना माझ्या प्रेमासह,

बापू

# २६. रेहाना तय्यबजींना पत्र

**२५-५-१९३६**

प्रिय बहेन रेहाना,

किती महिन्यांनी तुझे पत्र? आणि ते किती रसाळ गुजरातीत? तू तुझे गुजरातीचे ज्ञान वाढवत चालली आहेस असे दिसते. माझ्या उर्दूबद्दलही मी जर असे करू शकलो तर किती चांगले होईल? परंतु यात दोष शिक्षकाचा आहे की शिष्याचा?

अब्बाजानची कशी बातमी तू देते आहेस? खुदाला ज्याला वाचवायचे असेल त्याला तो कशाही प्रकारे वाचवतो. प्रसंगसुद्धा तो असा निर्माण करतो की काही सांगू नकोस. तो जबर सूत्रधार आहे. मनात येईल तेव्हा तो आपल्याला कठपुतळीच्या बाहुलीप्रमाणे नाचायला लावत असतो. आपण त्याच्या इच्छेप्रमाणे नाचू लागलो तर तो केव्हा दोरी ओढतो हेद्धा आपल्याला कळत नाही. आपल्याला जर त्याच्या इच्छेप्रमाणे नाचायचे नसेल तर तो दोरी अजूनच ओढू लागतो आणि आम्ही तक्रार करत राहतो. अब्बाजानजवळ जेव्हा हे वाचशील तेव्हा त्यांचा चेहरा पाहशील. पत्र ऐकण्याइतकी शक्ति नसेल, डॉक्टरांची परवानगी नसेल तर पत्र दाबून ठेवशील.

तू कुटुंबातील इतक्या सगळ्यांची नावे लिहिली आहेस हे खरे, परंतु मला त्यांचा नावांशिवाय इतर काहीही अर्थबोध होत नाही. मला कोणाचाही चेहरा आठवत नाही. नावेसुद्धा मुश्किलीने आठवतात. असे असले तरी मी कुटुबाचा एक सदस्य तर आहेचना? परंतु मी असा कसा कुटुंबाचा संदस्य आहे की मला माझ्या कुटुंबातील लोकांची नावेही आठवत नाहीत? आणि रूपही आठवत नाही. परंतु त्याचे काय? मोठ्या कुटुंबात एकजीव होणाराचे असेच हाल होत असतील ना? नाव आणि रूप जाणून काय करायचे आहे?

आपण सर्व एकाच आईची मुले आहो इतके नीट समजून घेतले तर नाव आणि रूपाशिवायही भागवता येऊ शकते ना? हे सर्वांना वाचून दाखवून माझ्यातर्फे माफी मागशील. माझ्या शुभेच्छा आणि आशीर्वाद सर्वांना सांगशील.

हो, डॉक्टर अंसारी गेल्यामुळे मोठीच पोकळी निर्माण झाली आहे. ती भरून काढणे कठीण आहे. बिचारी जोहरा अस्वस्थ आहे. माझ्या तुटक्याफुटक्या उर्दूत आज माझे तिला दुसरे पत्र जात आहे.

सरदारकाका इथेच आहेत. अब्बाजान, अम्माजानची सर्वच फार आठवण करत असतात.

माझा पत्ता - १५ जूनपर्यंत बंगलोर शहर

पत्र वाचू शकते ना? हमीदा आली?

श्री रेहाना तय्यबजी,

साऊथवुड

**११-६-१९३६**

बेटी रेहाना,

तू तार केली हे फार चांगले केले. आपल्याकरिता तर अब्बाजान नेहमीकरिती जिवंत आहेत. हा देह तर 'चंद रोज'चा (नजीर अकबराबादी यांच्या प्रसिद्ध गझलमधील हा शब्द सूचक आहे.) तमाशा आहे. परंतु त्यात राहणारा आत्मा आहे. त्यांचा देह तर कबरमध्ये दफन केला आहे. त्याच्याबरोबर क्षणिक संबंध होता. त्यात वसणाऱ्या देहधारीवर, ज्याला आपण आपले समजत होतो, प्रेम करत होतो तो तर आजही आपली काळजी घेतो आहे. तो आपल्या सर्व कामांचा साक्षीदार आहे आणि त्याच्या उपस्थितीमुळे आपण न करण्यासारखे कोणत्याही कामापासून वाचतो.

हे चांगले आहे की जवळपास संपूर्ण कुटुंब तिथे होते. सगळ्यांना माझ्यातर्फे आश्वस्त करशील. परंतु मला कोण करील?

बापूचे आशीर्वाद.

# २७. धर्मपरिवर्तन

## अ

ख्वाजाचे पत्र. पत्राबरोब अंसारींच्या स्मारकाकरिता १,००० चा चेक आला. त्याचे उत्तर देताना लिहिले-

अद्भुत. आज दुसऱ्या गोष्टीकरिता तुम्हाला लिहिणार होतो तेवढ्याच तुमचे स्वागतार्ह पत्र आले. जणू काय ते खूप दिवसांपासून हरवलेला भाऊ वा मित्र भेटायला आला. तुम्ही मित्र आहा की भाऊ हे तुम्ही तुम्हाला आवडेल त्याप्रमाणे पसंत करा. दोन्ही संबंध ठेवा.

अंसारींच्या मृत्यूनंतर कशातच बरे वाटत नव्हते. अशा वेळी माझ्या दुःखात मला तुमची, श्वाईबची आणि झाकीरची आठवण झाली. मी झाकीरला तर लांब पत्र लिहून टाकले, आणि आता त्याच्या उत्तराची वाट पाहतो आहे. कोणते तरी स्मारक उभारण्यासंबंधी असफ अलींनी मला लिहिले होते. अशा महान व्यक्तीचे स्मारक उभारण्याकरिता राजकीय दृष्टीने ही योग्य वेळ नाही असे मी त्यांना लिहिले होते. मोतीलाल वारले तेव्हासुद्धा मी असे मत दिले होते. पैशाची अडचण असल्यामुळे मी राजकारणाच्या वातावरणासंबंधी विचार करतो आहे. लोकांनी उत्स्फूर्तपणे पैसे दिले आणि मोठी रक्कम गोळा झाली तर तिचा आपल्याला स्मारकाकरिता काही उपयोग करता येईल. जवळच्या प्रशंसकांच्या आणि कृपावंताच्या मदतीने (योग्य शब्द सुचत नाही). तुमचे उत्तर आले की आपण भेटू. तोपर्यंत मी चेक जपून ठेवतो.

राजकारणाचा तुम्ही लावलेला अर्थ खूप रसाळ आहे. माझ्या म्हणण्याचा शब्दशः अर्थ करू नका. चांगल्या चांगल्या लोकांचेसुद्धा किती पतन झाले आहे? अंसारी हॉटेलमधील तुमचे कथन आठवते? परंतु मी तुम्हाला दोष देऊन राहिलेलो नाही. तुमच्या स्पष्ट प्रामाणिकपणाकरिता माझ्याजवळ प्रशंसेशिवाय दुसरे काहीही नाही.

हो, आपण अवश्य भेटू. सोळा जूननंतर तुम्हाला जमेल त्या दिवशी वर्धेला या. महिन्याच्या अखेरीस संपूर्ण कार्यकारिणी तिथे असेल हे तर तुम्हाला माहीतच आहे. परंतु मला वाटते की आधी तुम्ही माझ्याशी यासंबंधात चर्चा करायला पाहिजे. यामुळे तुम्ही जितक्या लवकर याल तितके चांगले.

आता मला लिहायचे होते ती गोष्ट. माझा सर्वात मोठ्या मुलाच्या धर्मपरिवर्तनासंबंधात तुम्ही माझे जाहीर पत्र जर पाहिले नसेल. त्याचे कात्रण सोबत जोडलेले आहे. ते वाचून तुमचे विचार मला लिहा. अशा

धर्मपरिवर्तनाची सूट आहे काय? आणि ते बरोबर आहे असे म्हणता येईल? जी जाहिरात गरीब बिचाऱ्या रंडिबाजाला मिळते आहे ती योग्य आहे काय? मला हरिलालचा मुळीच राग येत नाही. त्याच्या कृत्याकरिता त्याला क्वचितच जबाबदार धरता येईल. गेल्या तीन महिन्यात तो अनेक संकटातून गेला आहे.

तुम्हाला तर माहीतच असेल की जे घडले आणि घडते आहे त्याची जबाबदारी ठावठिकाणा नसलेल्या लोकांवर नाही. समाजाने ज्यांचा जबाबदार मुसलमान म्हणून स्वीकार केला आहे त्यांनी हे सर्व केले आहे.

या घटनेचा धर्माकरिता आणि या दुःखी देशाकरिता अभ्यास करा आणि यात रस घ्या. या घटनेचा जर वेगळा काही अर्थ काढत असाल तर तर मनमोकळेपणाने निःसंकोचपणे वर्ध्यात मला सांगा.

## आ. रामदास गांधींना पत्र

३०-५-१९३६

. . . हरिलालच्या पराक्रमाविषयी आताच वर्तमानपत्रात वाचले. तो ज्ञानपूर्वक निःस्वार्थ बुद्धीने मुसलमान झाला असता तर काही हरकत नव्हती. परंतु त्याला तर पैशाचा आणि विषयोपभोगाचा लोभ आहे. हे मिळाले तर त्याकरिता तो काहीसुद्धा करायला तयार होईल असा ठसा माझ्या मनावर नागपूरमध्ये उमटला होता. ही माझी मान्यता खोटी ठरली आणि आता तो नवीन पान फिरवत असेल तर मला मुळीच पश्चात्ताप होणार नाही. परंतु इथे तर दारूबरोबर मांसाहारही मिळाला आहे. त्याने मांसाहाराची सूट तर कधीचीच घेतलेली होती. असे जरी असले तरी तुम्ही कोणीही दुःखी होऊ नका. नशिबात असते ते होत असते. तो कोणत्याही धर्माचा राहिलेला नाही. आता मी इस्लामचे नाव घेतले याचा अर्थ मी इस्लामधर्मीय झालो असे नाही. आणि त्याने आता जर इस्लामची सर्व वैशिष्ट्ये जीवनात उतरवली तर आपण समाधानच मानायला पाहिजे. परंतु हा जरी देखावा असेल तरी आपण दुःखी होण्याचे कारण नाही.

या उदाहरणाने आपण सर्व सावध झालो पाहिजे. आणि आपण जो धर्म मानतो तो जर आपण समजून घेतला तर ते आपल्याला शोभेल.

हे देवदासला दाखवशील. याची प्रत मणिलालला पाठवशील.

## इ. बंगलोरमध्ये हिंदुस्थानी ख्रिश्चन मित्रांबरोबर असताना

**५-६-१९३६**

कमीपणा जाणवणार नाही अशा भाषेत तुम्ही हरिजनांना सांगायला पाहिजे की तुमचा उद्धार पुढाऱ्यांच्या गोष्टी ऐकल्याने होणार नाही. त्यांच्यामध्ये अध्यात्मिकता नाही. ते जनावराप्रमाणे श्रद्धाहीन असू शकतात. हरिजनांनी जर केव्हाही हिंदू धर्माचा त्याग केला, तर मी हिंदूंना सांगेन, 'हे तुमच्याच कर्माचे फळ आहे.' परंतु जसे मी ख्रिस्त्यांना सांगतो, तसेच तुम्हीही हरिजनांना सांगू शकता – 'जिथे आहा तिथेच राहा; तुमची सामाजिक उन्नती झाल्यानंतर सवर्णांशी लढा.' यामुळे आपण उलट क्रमाने बोलणे योग्य होणार नाही. त्यांना आपल्या मूळ भूमीपासून उपटून दुसऱ्या भूमीत रुजवणे तुम्हांला वाटते तितके सोपे नाही. हरिजनांच्या खूप मोठ्या वर्गाचे आंबेडकर प्रतिनिधी आहेत. ते लोकप्रिय आहेत. त्यांनी कधीही हरिजनांना वेगळे केले नाही. ते अनेक यातनांमधून बाहेर पडलेले असल्यामुळे त्यांच्या मनात खूप राग भरलेला आहे. यामुळे त्यांचा तोल जातो.

आध्यात्मिक विचारांनी भारलेला माणूस म्हणून मी तुम्हांला सांगेन की हवे तेव्हा धर्मपरिवर्तन करायची सोयच नाही. मधुसूदन दासचेच उदाहरण घ्या. ते म्हणत असत की ख्रिस्ती धर्म माझ्या निर्मात्याशी माझे जे संबंध आहेत त्याची गोष्ट आहे. परंतु ही व्यक्तिगत मोजमापाची गोष्ट सोडली, आणि आध्यात्मिक पद्धतीने बोलायचे तर तुम्ही गायीला ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याकरिता आमंत्रित करत नाही. येशूला सुळावर चढवले ते गायीला कळू शकत नाही. आणि काही हरिजनांची समजून घेण्याची शक्ती गायीपेक्षाही कमी आहे. मी तर हरिजनांना सांगत असतो की 'तुमच्यासमोर मी बायबल, गीता आणि सर्व काही ठेवतो. तुम्ही निर्णय घ्या.'

हरिजन म्हणतात 'ख्रिश्चन धर्माचे जे धोरण आहे ते आमचा उद्धार करील असे वाटते.'

सदाचार आत्मसात करू शकतील अशा प्रकारे हरिजनांच्या शिक्षणाचे धोरण कोणते असले पाहिजे? त्यांना कोणत्याही शिक्षणाची आवश्यकता नाही. सामान्य माणसाच्या संपर्काने त्यांच्या शरीराची, मनाची कौशल्याची क्षमता परत यायला पाहिजे.

केवळ साक्षरतेने माणसाची बुद्धी फुलत नसते.

## ई. हरिजनांचे प्रतिनिधीमंडळ

**११-६-१९३६**

हरिजन धर्मांतर करतील अशा धमकीमुळे घाबरून आपण काही करू नये. असे केले, तर जे काही आपण करू त्याचा खरा हेतू साध्य होणार नाही. हरिजनांना ज्या अडचणी आहेत त्या दूर करण्यासाठी आपण दुप्पट मेहनत घ्यायला हवी. परंतु आपण सामान्य माणूस आहो. यामुळे धर्मांतराच्या धमकीमुळे काय करायचे अशी प्रतिक्रिया निर्माण होतेच. यामुळे कोणी जर धर्मांतर करत असेल तर त्याची नोंद अवश्य घेतली पाहिजे, परंतु धर्मपरिवर्तनाच्या कारणामुळे आपण जर दुप्पट मेहनत केली तर ही भीती खरी होती असे आपण समजावे. आणि ही भीती जर खोटी ठरली तर लगेच आपल्या कामात ढिलेपणा येईल.

दोन्ही पद्धतीने पाहिले तर आपण जर कामात माघरलो तर आपल्या उद्दिष्टाची हानी होईल. हरिजनांना वाटेल की ही तर सोडा वॉटरची बाटली होती. तिच्यातून जसा फेस निघतो तसा तो नाहीसा होतो. आणि आता काही होणार नाही. आपण थकल्यामुळे जास्तीतजास्त आत्मसमर्पण व्हायला पाहिजे. हजारो कार्यकर्ते थोडासा ठराव मंजूर केल्यानंतर बाकीच्या कार्यक्रमाविषयी उदासीन असतात. हे पाहता आपण मूठभर कार्यकर्ते काय करू शकतो?

माहीत नाही का, परंतु असे वाटते नाही की त्यांनी आपल्या व्यक्तिगत विचारानुसार ठराव मंजूर करायला लावला आहे. वर्षांपूर्वी स्वदेशीवर धाराप्रवाही भाषणे व्हायची. परंतु बोलणारावरून असे वाटत नव्हते की तो जे बोलतो ते अंमलात आणायचा त्याचा विचार आहे. हे लोक शक्य तितका शब्दजालाचा आधार घेत असत.

त्रावणकोरमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठराव अंमलात आणण्याकरिता हजारो लोक उत्सुक असते तर मंदिरप्रवेश कोणीही अडवू शकला नसता.

कार्यकर्त्यांनी आपल्या सद्भावनेवर हरिजनाचा विश्वास संपादन केला पाहिजे. परंतु मला शंका आहे की जे कोणी आले आहेत ते सर्व कार्यप्रणालीने जितके ओतप्रोत व्हायला पाहिजे तितके ओतप्रोत झालेले नाहीत. यामुळे अनेक हरिजन स्वतःच्या मार्गातच अडथळे निर्माण करतात आणि परिणामी त्यांनी जितकी प्रगती केली पाहिजे तितकी प्रगती ते करत नाहीत.

असे म्हणतात की हरिजन सेवक संघाच्या कार्यक्रमापुरताच आम्ही अस्पृश्यता निवारणावर विश्वास ठेवतो. यामुळे या कार्यक्रमाच्या पुढे जाण्याची आवश्यकता नाही असे जे हरिजन कार्यकर्ते म्हणतात आणि आपण प्रामाणिक आहो याबद्दल हरिजनांना खात्री वाटत नाही. स्वाभाविकच आहे की दिवसेंदिवस आमची काय प्रगती होते आहे हे हरिजनांना जाणून घण्याची इच्छा आहे. हिंदू जाऊ शकतात अशा सर्वोच्च पदावर जाण्याची हरिजनांनाही इच्छा आहे.

आंबेडकरांनी पाहिले की मी माझ्या स्वतःच्या वर्तणुकीसंबंधात प्रामाणिक होतो. परंतु हा आपल्यासमोर मोठाच अडथळा आहे. ज्या ज्या अडचणी आहेत त्यांची चर्चा केल्याशिवाय ही सभा सोडू नका. सर्व कार्यकर्ते पूर्णपणे सेवा करू शकले आणि स्वेच्छेने पूर्णपणे हरिजन होऊ शकले तर आपले भलेच होईल. आता यावेळी माझी कोणालाही दोष देण्याची इच्छा नाही. परंतु सर्वांना ऐकू जाईल अशा मोठ्या आवाजात मी माझा विचार जाहीर करतो. आणि जेव्हा राजाजींना काय करावे हे मी सांगितले तेव्हा त्यापेक्षा जास्त ठामपणे मी काहीही सांगू शकलो नाही. ही गोष्ट आपल्याला स्पर्श करते की नाही, हा प्रश्न आहे. अस्पृश्यता नाहीशी झाली नाही, तर हिंदू धर्माचा नाश होईल. ही श्रद्धा असल्याशिवाय हे घडणार नाही.

मी इथे पुढे गेलो आहे. मी म्हणालो होतो की विशिष्ट जातीत जन्म घेतल्यामुळे एखाद्या माणसाला दोषी ठरवण्यात येत असेल तर तो धर्म नष्ट झाला पाहिजे अशी मी प्रार्थना करीन. दलित वर्गाच्या आकड्यात आणि नामावलीत किती फेरफार झाले आहेत ते तपासले पाहिजे. हे आपले शास्त्र होऊन जाते. यामुळे तुम्हांलाही माझ्यासारखेच जर वाटत असेल की धर्माचा नाश झाला पाहिजे तर तुम्ही प्रार्थना केली पाहिजे की मानवतेवरील हा काळा डाग जर दूर होत नसेल तर या धर्माचा नाश झाला पाहिजे.

यावरून असे दिसून पडते की हरिजन या शब्दाच्या पूर्ण भावार्थाप्रमाणे आपण हरिजन होणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा आहे काय की आपण सर्वांनी मेलेल्या जनावराचे मांस खाल्ले पाहिजे, दारू प्यालो पाहिजे आणि दुःखात खितपत पडून राहिलो पाहिजे? नाही, आपल्याला वाटले पाहिजे की यांचे दुःख कोणत्याही कर्मामुळे नाही. आपले ऋण तर आपणच फेडायला पाहिजे. इतके करायचे की नाही ते तुम्ही स्वतःला विचारा. असे जर करणार नसाल तर तुम्ही जे काही ठराव मंजूर केले आहेत निष्फळ ठरतील, ते प्रयत्न व्यर्थ ठरतील. इतके तर पूर्वतयारी म्हणून करायलाच पाहिजे.

आपण अस्पृश्यतेचे मूळ शोधू शकत नाही काय? अस्पृश्यतेचे मूळ शोधण्याचा अर्थ अस्पृश्यता नाहीशी करणे होत नाही.

जे ख्रिश्चन झाले आहेत त्यांना जर परत यायचे असेल तर त्यांना केवळ इतकेच म्हणा - अवश्य परत या. शुद्धीची मुळीच आवश्यकता नाही. समजूनउमजून धर्मपरिवर्तन केले असेल तर त्यांची शुद्धी करा. परंतु मी मात्र करणार नाही. मी तर केवळ इतकेच म्हणेन - शंभर वेळा रामनाम घ्या. शुद्धिसमारंभात जाण्याला विरोध करण्याचे मला काही कारण दिसत नाही. - मला जर माहीत असेल की तो स्वतंत्र मनाने काम करत होता आणि त्याकरिता कोणतेही प्रलोभन देण्यात आलेले नाही. त्यांना लालूच दाखवण्याकरिता ख्रिश्चन धर्मपरिवर्तन करणारांमध्ये जाऊ नका,

तुमची जर खात्री असेल की या माणसाला धर्मपरिवर्तन करायचे आहे तर तुम्ही त्याला मदत केली पाहिजे.

पूजेच्या असंस्कारी पद्धती.

तुम्ही ईश्वराचे अवतार आहा असे मी म्हणू शकतो?

मला तर हे समोर उभे असलेले अवडंबर वाटते. मी मातीचा पुतळा आहे. तुमच्या मनात जर घृणा असेल वा ते बंडखोरी करत असेल तर विचार करणे हाच माझा आदर्श असेल. राम आणि कृष्ण माझ्या मनात आशा भरून टाकतात. यामुळे मला अवतार समजण्याची गोष्ट पूर्णपणे नाकारली पाहिजे. तुम्ही जर मला अवतार समजत असाल तर तुम्ही हिंदूधर्मावरच नाही तर एकूण धर्मकल्पनेवरच अन्याय कराल.

प्रश्न - राम आणि कृष्ण सजीव माणूस होते काय?

उत्तर - युगांपूर्वी होऊन गेलेल्या राम आणि कृष्णाला विसरून जाण्याइतका मी मूर्ख आहे असे तुम्हाला वाटते काय? मी बेअक्कल आहे, परंतु इतका नाही. मी तर राम-कृष्ण जिवंत आहेत, ते माझ्या हृदयाची परीक्षा घेत असतात, ते मला योग्य मार्गावर ठेवण्याकरिता मार्गदर्शन करत असतात असे समजूनच त्यांची पूजा करत असतो. माझ्या दोन्ही बाजूला राम आणि कृष्णाचे अस्तित्व आहे याची जर मला खात्री नसती तर मला तर वेड लागले असते. सत्यमूर्ती, रामानंदन, आणि सदानंदच्या कारणाने विशेषतः तुमचे मत जर परिपक्व असेल तर तुम्ही पाहाल की एक दिवस असा येईल की जेव्हा मी बोलणार नाही. ज्याचे पुनर्जीवन झाले आणि ज्याने

स्वर्गात पोहोचवले त्या येशूची लोक पूजा करत असतात. जे रामकृष्णाला भजत असतात त्यांच्याकरिता रामकृष्ण सजीव आहेत. माझ्याकरिता तर हे पराकोटीचे सत्य आहे. हे रामकृष्ण आजही जिवंत आहेत आणि अनादीकाळ जिवंत राहतील.

ज्याला राम आणि कृष्णाच्या आदर्शाबद्दल घृणा वाटत असेल त्याने हरिजनाना हिंदू धर्म सोडण्याचा सल्ला दिला पाहिजे. मी तर म्हणेन की जो रामकृष्णाला ईश्वर मानत नाही तो हिंदू नाही. जो मुसलमान मी कशालाही मानत नाही असे म्हणत असतो त्याला दगडाने ठेचून मारून टाकत असतात. मी माझ्या कल्पनेतील रामाची पूजा करत असतो. असेही लोक आहेत की जे कृष्णाचे अस्तित्व नाकारत असतात. त्यांना हिंदू म्हणवण्याचा अधिकार नाही.

# २८. हरिजन सेवक संघाचे काम

**१०-६-१९३६**

डिसुझा - हरिजन सेवक संघात प्रामुख्याने हिंदूच आहेत ही काही अडचण नाही. परंतु हरिजन जे काम करत आहेत त्याचे मोजमाप हिशेबात नाही. ते स्वतःच्या लाभाकरिता पैसे मागत आहेत. यात परिपक्वता दिसत नाही. त्यात तऱ्हेतऱ्हेचे उद्दिष्ट आहेत असे समजले जाते. हरिजनांना वाटते की हरिजन सेवक संध विश्वासपात्र नाही. आपल्याला अधिक सहकार्य मिळाले पाहिजे असे हरिजनांना वाटते.

बापू - त्यांच्या मनात काय आहे त्याकडे आपण पूर्ण लक्ष ठेवले पाहिजे.

आदिकर्नाटक संघटना नेहमीच सक्रिय संस्था राहिलेली आहे. हिच्याजवळ १२ स्नातक आहेत. त्यांची हिला कार्यरत संस्था बनवण्याची इच्छा आहे. मी त्यांना सांगितले की ५०० रुपये गोळा करा. ते चांगल्या प्रकारे धर्मप्रचारकाचे काम करत असतात. हिंदूंनी जर त्यांना विरोध करणे सुरू ठेवले तर ख्रिश्चन धर्मप्रचारकांशी त्यांचे शत्रुत्व वाढेल.

इथे एक संमेलन झाले होते. त्यांनी डॉ. आंबेडकरांना पाठिंबा द्यायचा ठराव केला. परंतु मी त्यांच्याशी भांडलो.

आपल्या एकेका कार्यकर्त्याच्या मनात हरिजन आपले भाऊ आहेत आणि त्यांना युगायुगांपासून यातना सहन कराव्या लागल्या आहेत असा विचार असला पाहिजे. गुरुकुल किंगेरीत यांना दाखल केले आहे. ते हस्तकला विसरलेले असल्यामुळे हरिजन सेवक संघ त्यांना ते शिकण्याकरिता उत्तेजन देत आहे.

मंदिरप्रवेशाला काही अर्थ नाही. मी या लोकांना ५,००,००० एकर जमीन दिली. यांची राहण्याची व्यवस्था अतिशय वाईट आहे. ती सुधारण्याकरिता यांना पुरेशी मदत मिळत नाही. यांना कोणी उसने देत नाही. इतरांपेक्षा यांची राहणी फार वेगळी असायला नको. आधी आर्थिक प्रश्न हाती घ्या. हरिजन सेवक संघ आणि आदिकर्नाटक संघ याचे मंचावर एकमत असले पाहिजे.

प्रश्न - हरिजन सेवक संघाच्या खर्चाने किंगेरीची सभा झाली होती. परंतु आमच्या अडचणी सोडवण्याकरिता त्यांना वेळ मिळत नाही.

उत्तर - किंगेरी हरिजन संघाजवळ उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. रामचंद्रनचे दृढ मत आहे की ही सभा हरिजनांची आहे. हरिजन सेवक संघाची स्थापना झाली त्याआधीही त्यांना हरिजन आणि सवर्ण यांच्यात भेद आहे हे माहीत होते. संमेलनाचा खर्च हरिजन सेवक संघ देणार नाही आणि किंगेरीच्या खर्चाचा पैसा हरिजन सेवक संघ देत असतो.

आता दुसरा मुद्दा घेऊ. आपल्यामध्ये कोणकोणत्या उणिवा आहेत आणि आपले प्रभावक्षेत्र कोणते आहे हे समजून घेण्याकरिता हरिजनोद्धारात गुंतलेल्या सवर्ण कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्याचा त्यांचा विचार आहे. आपल्या वाडवडिलांनी केलेल्या पापांमुळे आपण या अडचणीत सापडलो आहो. यामुळे हा कौटुंबिक मेळावा भरवण्यात येणार आहे. कुटुंबाच्या अंतर्गत व्यवहारात हरिजन कोणत्या प्रकारची मदत करू शकतील? आपण तर देणेकरी आहो कारण सवर्ण हिंदूंनी फार वाईट वर्तन केले आहे. व्याजासहित हे कर्ज फेडण्याकरिता आपण इथे गोळा झालो आहो.

डिसुझा - कार्यकर्ते जसे हरिजन आहेत तसेच सवर्णही आहेत. ऋण कसे चुकवाचे हा विचार तर कदाचित प्रायश्चित्ताकडे जाईल. परंतु यात आम्हांला तर श्रेष्ठतेचा वास येतो. आपल्या कामात कोणत्या उणिवा आहेत हे समजून घेण्याकरिता जर ही सवर्णांची सभा असेल तर आपण यासंबंधात कोणताही आक्षेप घेऊ शकतो असे नाही. परंतु तरीही हरिजनांना दाबून ठेवण्याकरिता हे संसाधनांचा शोध तर घेत नाहीत ना अशी शंका तर मनात उभी राहतेच. यामुळे उलट हे चांगले आहे की तुम्ही आमच्या सभेत या आणि तुम्ही काय केले पाहिजे हे आमच्याकडून समजून घ्या.

बापू - ज्यांच्या अस्तित्वाकरिता काहीही कारण नाही अशा धमक्या जर कोणी देत असेल तर त्यांची मला पर्वा नाही. त्यांचे कामच बोलेल. आदिकर्नाटकाच्या लोकांच्या मनात शंका आहे कारण त्यांना सवर्णांच्या वर्तणुकीत दुसरे काही चांगले दिसत नाही.

एक हरिजन - कोणत्याही प्रकारची शंका नाही. आम्ही तर आमच्याबद्दल चर्चा करतो आहो.

बापू - तुम्हांला काय पाहिजे हे सांगण्याची आवश्यकता नाही. आम्हांला कल्पना आहे. हरिजनांची सर्व क्षेत्रात प्रगती झाली पाहिजे.

ही पाप्यांची सभा आहे. यात संतांची काही गरज नाही. तुम्ही जाल तर ती फार स्वागतार्ह गोष्ट होईल. परंतु सभेने वेगळेच रूपरंग धारण केले आहे. माझ्या घेणेकऱ्याला इतका राग येऊ शकतो की तो मला लात

मारून बाहेर कढू शकतो आणि चुकवलेला कर्जाचा हप्ताही माझ्या तों ंडावर परत फेकू शकतो. व्याजासहित मुद्दल चुकवायचे असल्यामुळे यांचे हे काम सहन केले पाहिजे.

डॉ. आंबेडकर मला जेव्हा शिव्या देत असतात तेव्ही मी याकरिताच पात्र आहे असे म्हणत असतो. काही वेळा ते म्हणत असतात की देणेकरी इतका मोठा होऊन जात असतो की तो देणेकऱ्याची पर्वा करत नाही. तुम्हांला यातना होतील इतक्या जोरात मी तुम्हांला फटके मारीन असे जेव्हा डॉ. आंबेडकर म्हणतात तेव्हा मला वाटत असते की आपली अशीच हालत व्हायला पाहिजे. शास्त्र म्हणत असतात की जेव्हा अन्यायाचा घडा पूर्ण भरतो तेव्हा आपला नाश होत असतो. अस्पृश्यतेचे विष जर काढले नाही तर हिंदू धर्म मेला असेच समजा.

कल्पना करा की ख्रिस्ती वा मुसलमान न होता काही थोडे हजार निवृत्त झाले. सुखसोयीच्या लाभाकरिता केलेले धर्मपरिवर्तन हे धर्मपरिवर्तन नसून तो एक सौदाच असतो. हे लोक नास्तिकही होऊ शकतात आणि ईश्वराला नाकारूही शकतात. या सभेतील सर्वांच्या हृदयात माझ्या अंतःकरणातील भावना असतील तर श्रेष्ठत्वाची मनोवृत्ती राहूच शकणार नाही. ईश्वर जर आपला सत्यानाश करू इच्छित असेल तर शक्य आहे की आपण खोट्या अहंकाराची भाषा वापरत असू. तो तर असा आहे की फूक मारूनही आपला नाश करू शकतो. आपली बुद्धी जर बधीर झाली तर जे काही आपण करू त्याने आपला अधःपातच होईल. अशाच प्रकारे सध्या आपण चिखलात खोलवर रुतत चाललो आहो. सवर्णांची स्थिती ही अशी आहे. इतरांचा स्वतःविषयी आणि शास्त्रांविषयी अतिशयच उच्च समज आहे. सध्या पाप्यांमधील एक फारच अपूर्ण असा वर्ग अंधारातून बाहेर पडण्याकरिता धडपडतो आहे. तुमच्यात जर करुणा असेल, तर त्यांच्याकडे दयेच्या भावनेने पाहा. आपण सवर्ण लोक त्यांच्या वाईट सवयींसाठी — जसे की मेलेल्या जनावरांचे मांस खाणे — जबाबदार आहो असे मी नेहमी सांगत आलो आहे. काही हरिजननिवास अगदी स्वच्छ असतीलही, परंतु काही नरकाच्या खाणीसारखे आहेत. मी स्वतःला भंगी म्हणवतो, परंतु भंगी करतात तसे माझ्याकडून करवणार नाही. ‘तुम्ही स्वच्छ राहा’ असा आग्रह धरणाऱ्या सवर्णांचा मला राग येतो. तुम्हांला स्वतःच्या पापाचे भानच नाही असे मी त्यांना सांगत असतो. (प्रश्नांचा निकाल लावत) मी लोकांना ताटकळत ठेवू शकत नाही. ही गोष्ट वेगळी आहे, परंतु माझ्या हेतूविषयी प्रश्न निर्माण व्हयला नको.

मी राज्यसरकारलासुद्धा विनंती करतो आहे.

डिसुझा - त्यांना आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व पाहिजे. जे लोक प्रौढ वयाचे झाले आहेत त्यांचा स्वीकार केला पाहिजे.

बापू - मग तुम्हांला तुमच्या दिवाणला काढून टाकावे लागेल आणि त्यांच्या ठिकाणी मला एक आठवड्याकरिता दिवाण करावे लागेल.

डिसुझा - हरिजन सेवक संघाने आपला बंधुत्वाचा हात हरिजनासमोर करायला लावण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. सवर्णांनी पाप्यासारखेच वर्तन करायला पाहिजे आणि देवाची सेवा करतो तशी हरिजनांची सेवा करायला पाहिजे. (हरिजनांकरिता) पैसे खर्च करताना त्यांचे म्हणणे काय आहे ते विचारायला पाहिजे.

(२) या लोकांची इच्छा आहे की आम्हांला विचारण्यात यावे.

(३) लक्षातही येणार नाही असे परिणाम व्हायला पाहिजे. तुमच्याजवळ भरपूर हरिजन कार्यकर्ते असले पाहिजे.

[?बापू?(मुळाप्रमाणे)] - अन्याय दूर करायचा असेल तर ज्या लोकांना इजा झाली आहे त्यांना विचारल्याशिवाय आणि त्यांची संमती असल्याशिवाय अन्याय दूर करता येणार नाही काय?

# २९. हरिजन सेवकांची सभा

**१०-६-१९३६**

किंगेरी आश्रम

बापू - व्यवस्थित भाषण करायचे नाही. ते केले तरी त्याचा लाभ होणार नाही. थोडेसे जरी शक्य असेल तरी मला तुमच्या अडचणी दूर करण्याची इच्छा आहे. तुम्ही काय करत आहा ते सांगा. तुमचे अपयशसुद्धा तुम्ही विशद करू शकता. प्रश्न विचारू नका. व्यावहारिक गोष्टी करा.

ज्यांच्या मनात ही सभा बोलवायचा विचार आला त्यांना चांगली गोष्ट सुचली याबद्दल मला शंका नाही. या मेळाव्याचा सदुपयोग केला पाहिजे. दक्षिणेकडील सर्व प्रतिनिधींना बोलावण्यात आले आहे, याशिवाय इतरही हजर आहेत. परंतु प्रतिनिधींना संबोधण्याऐवजी मी काही सर्वसामान्य सूचना केल्या पाहिजे अशी सूचना करण्यात आली आहे.

मी कबूल केले पाहिजे की इथे गोळा झालेल्या लोकांसमोर कोणती विचारधारा मांडावी आणि काय बोलावे याबद्दल मी खात्रीपूर्वक काहीही विचार केलेला नव्हता. परंतु स्वतःला उजळ म्हणजे उच्च वर्णाचे हिंदू किंवा सवर्ण समजणाऱ्यांना मी इतकेच सांगतो – आजूबाजूला जी अनेक आंदोलने सुरू आहेत त्यांच्यासारखीच ही अस्पृश्यतानिर्मूलनाची चळवळ नाही हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. माझ्यापुरते सांगायचे तर हे आंदोलन राजकीय चळवळ म्हणा वा हरिजनांचा आर्थिक उद्धार व्हावा म्हणून चालवले जाणारे आंदोलन नाही. तसेच हे आंदोलन हरिजनांच्या समाजात सुधारणा व्हावी म्हणूनही नाही. याचा अर्थ असाही नाही की हरिजनांची सामाजिक, आर्थिक वा राजकीय प्रगती होऊ नये. हे सर्व आवश्यक आहेच. प्रामाणिक प्रयत्न केला तर निश्चितच आपण पुढे जाऊ.

परंतु वर उल्लेखिल्याप्रमाणे या आंदोलनाचे ध्येय अगदी वेगळे आहे. मी आशा करतो की इथे आलेले प्रतिनिधी आणि इतर लोक मान्य करतील की अस्पृश्यता हिंदू धर्मावरील कलंक आहे. हा कलंक वेळवर दूर केला नाही तर हे विष हिंदू धर्माचा सत्यानाश करील. मला जाणीव आहे की मी जे सांगतो आहे त्याचे महत्त्व कार्यकर्त्यांच्या या जत्थ्याला कळलेले नाही. माझी अशीही मान्यता आहे की तुम्हांला याचे महत्त्व कळले नाही. परंतु मी तर माझे मत सांगतच राहिलो पाहिजे. आजकाल हिंदुधर्मातील संकुचितता वाढतच चालली

असल्याचे मी पाहू शकतो. माझ्याप्रमाणे तुम्हीही वस्तुस्थितीचा अभ्यास केला तर हिंदू धर्माचा हळूहळू ध्वंस होत चालला असल्याचे तुम्हांला दिसून येईल. आत्मनाशाकडील ही धाव इतकी काही आपला ताबा घेऊ लागली आहे की कार्यकर्त्यांनाही ती थांबवणे अशक्य होते आहे. अस्पृश्यता हा एक शाप, कलंक आणि असे जलद पसरणारे विष आहे की जो हिंदुधर्माचा लवकरच नाश करील असे मी का म्हणतो?

जन्माने कोणी अस्पृश्य आहे असे समजणे हे मानवी मूल्यांशी विसंगत आहे. जगातील धर्मग्रंथ तपासा आणि हिंदुस्थानातील लोकांचा व्यवहार पाहिला तर अस्पृश्यतेची तुलना करता येईल अशी एकही गोष्ट आढळणार नाही याकडे मी तुमचे लक्ष वेधतो. माणूस जर विशिष्ट प्रकारचे काम करत असेल तर त्याला इतर कोणालाही हे काम करता येऊ नये असे वाटत असते अशा गोष्टीची मी कल्पना करू शकतो. याचप्रमाणे कोणी आजारी अगदी असहाय असेल, त्याच्या शरीरातून रक्त टपकत असेल, त्याचे कपडे रक्ताने चिंब भिजलेले असतील, शरीरातून घाणेरडा वास येत असेल तर अशा अवस्थेत त्याची सुश्रूषा करणाराला असे वाटत असते की या वेळी आपल्याला कोणीही स्पर्श केला नाही तर बरे होईल. त्याच्या दृष्टीने तो त्यावेळी अस्पृश्य असतो हे वर्णन अगदी बरोबर आहे. परंतु त्याची परिचर्या करणारा आंघोळ वगैरे करून आला की तो आपल्याइतकाच स्पृश्य होत असतो. आपल्याप्रमाणे तोसुद्धा समाजात सर्वत्र मिसळू शकत असतो. इतकेच नाही तर सेवेच्या कामाचा व्यवसाय स्वीकारल्यानंतर तर तो माणूस भक्तीकरिता पात्र होत असतो. तो सन्माननीय होत असतो. आपल्यामधील उच्चनीचची भावना व्याप्त आहे ती पाहता अशा माणसाचे समाजात फार उच्च स्थान असते.

आता या चित्राची दुसरी बाजू घ्या. डॉ. आंबेडकरांचे उदाहरण घ्या. ते अस्पृश्यामधील आहेत. सवर्णातील हजारो लोकांपेक्षा ते जास्त बुद्धीमान आहेत. व्यक्तिगत स्वच्छतेत ते आपल्या इतकेच स्वच्छ आहेत. कायद्याचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ते गुरू आहेत. भविष्यकाळात ते उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाचे पदही सुशोभित करू शकतात. थोडक्यात सांगायचे तर देशात अशी कोणतीही सरकारी पदवी नाही की जिच्यापर्यंत रुढीग्रस्त ब्राह्मण पुढे जाऊन ती मिळवू शकतो परंतु आंबेडकर पोहोचू शकत नाहीत. तरीसुद्धा आंबेडकरांच्या स्पर्शाने आपण अपवित्र होतो असे मानणारे सनातनी ब्राह्मण असे समजतात की यांचा अस्पृश्य घराण्यातील जन्म अक्षम्य असे भयंकर पाप आहे. अस्पृश्यता हिंदुधर्माचा अविभाज्य भाग आहे असे समजण्याची जर आपल्यामध्ये प्रथा नसती आणि असा विचार करण्याची जर आपल्याला सवय नसती तर आंबेडकर सारख्यांशी आज आपण जसा व्यवहार करतो तसा केला नसता.

ही काही मी तुम्हांला नवीन गोष्ट सांगून राहिलेलो नाही. असंख्य वेळा यापेक्षाही जळजळीत भाषेत मी याबद्दल बोललेलो आहे. असे असूनही तुमच्या वर्तणुकीवर काहीही परिणाम होऊन राहिलेला नाही. यामुळे मी तुम्हांला सौम्य भाषेत हे जे सांगतो आहे ते अनावश्यक आहे असे समजू नका. तर्काने वा बुद्धिगम्य दृष्टीने ज्याचे कोणतेही समर्थन करता येत नाही, परंतु केवळ हिंदुधर्मातच आढळणारी कलंकरूप वैचित्र्य जाणवावी अशी ही प्रथा आहे. मी तर पुढे जाऊन असेही म्हणेन की अशा या शास्त्राचे कोणतेही समर्थन करता येऊ शकत नाही. माझा या शास्त्राचा थोडाफार अभ्यास आहे त्यावरून आणि या शास्त्रांचा सखोल अभ्यास ज्यांनी केलेला आहे आणि जे शास्त्रांच्या शास्त्रार्थाचे पालन करतात त्यांच्याशी माझी जी चर्चा झाली आहे त्यावरून हिंदुधर्मात जन्मजात अस्पृश्यतेला कोणताही आधार नाही. शास्त्रांमध्ये पारंगत असलेले जे पुरावे देतात त्याची चर्चा करण्याकरिता वेळ नाही. आणि आज तर तुम्हांला हे सर्व सिद्ध करून दाखवण्याचीही आवश्यकता नाही. आवश्यक इतकेच आहे की अस्पृश्यता कलंक आहे आणि हा काळा डाग दूर केला नाही तर हिंदुधर्माचा नाश होण्याची भीती आहे. इतकी गोष्ट जर तुमच्या गळी उतरली तर मग हा कलंक गेल्यासारखाच आहे. अस्पृश्यता कलंक आहे असे म्हटले की तुमचे कर्तव्य संपले असे जर तुम्हांला वाटले तर तो उपहासाचाच विषय होईल. उत्साहात येऊन तुम्ही हरिजनांमध्ये मिळूनमिसळून वागाल, त्यांच्याशी बरोबरीने वागाल, भेटीगाठी घ्याल इतकेसुद्धा पुरेसे नाही. हरिजनांच्या वस्तीत जाणेयेणे ठेवा असे त्याच्याशी नाममात्र ठेवलेले संबंधसुद्धा पुरेसे नाहीत.

हरिजनांकरिता आता फार चांगले दिवस आले आहेत असे दिसेल अशी यांच्यासोबत वर्तणूक करणे आवश्यक आहे. तर मग याची सुरुवात कशी करायची हे तुम्हांला माहीत आहे काय? हरिजनाला मंदिरात घेऊन जात असाल आणि अस्पृश्यता चूक आहे अशी माझ्याप्रमाणे तुमचीही मान्यता असेल तर तुम्ही जसे विंचवापासून वा आगी पासून दूर राहाल तसेच ज्या मंदिराच्या दारात हरिजनांना प्रवेश नाही त्या मंदिरांपासूनही दूर राहा. ज्या मंदिराचे दार हरिजनांकरिता बंद आहे त्या मंदिरात ईश्वराचा वास नाही.

जगात जे सगळ्यात महान मंदिर बनारस येथील काशी विश्वनाथ मंदिर आहे तेच उदाहरण म्हणून घेऊ. याला काशीविश्वनाथ याकरिता म्हणतात की तिथे ज्या देवाची स्थापना करण्यात आली आहे त्याला विश्वाचा सम्राट समजले जाते. असे असतानाही आज सवर्ण विश्वनाथाचे नाव घेऊन हरिजनांना 'तुम्ही आत येऊ नका' असे म्हणायचे धाष्ट्र्य करतात. इतर कोणत्याही खऱ्या आणि चांगल्या हिंदू इतकाच मीसुद्धा हिंदू आहे असा माझा दावा आहे. माझ्यात जी काही शक्ती आहे त्या सर्व शक्तिनिशी मी हिंदू धर्माच्या आदर्शांचे

अनुसरण करण्याचा प्रयत्न केला आहे. मी मान्य करतो की माझी शक्ती फार कमी आहे. परंतु यामुळे माझे हिंदू धर्मावरील प्रेम कमी होत नाही. हिंदू धर्माबद्दल खूप प्रेम वाटत असतानाही पूर्ण जबाबदारीने मी तुम्हांला सांगायला आलो आहे की काशीविश्वनाथ मंदिराचे एकसुद्धा दार जर हरिजनांकरिता बंद असेल तर तिथे देवाचे वास्तव्य नाही. या मंदिराच्या पावित्र्यावर श्रद्धा ठेवून तिथे पूजापाठ करून पाप धुवायला आणि माझ्यातील उणिवा दूर होतील असे समजून या मंदिराच्या जवळपासही फटकायची मला इच्छा होत नाही. काशीविश्वनाथ मंदिराबद्दल माझ्या मनात किंचितही धर्मनिष्ठेची भावना नाही इतके तर मी तुम्हांला सांगायलाच पाहिजे. हरिजनाच्या प्रवेशाला बंदी असलेल्या प्रत्येक मंदिराला ही गोष्ट लागू होते. इतके की गुरुवायुरसहित दक्षिणेतील प्रत्येक मंदिरालाही ही गोष्ट लागू होते.

मी ईश्वराची कृपा समजतो की गुरुवायुर मंदिराची दारे माझ्याकरिता बंद आहेत. माझी गणना तर हरिजनातच होते हेच याचे कारण आहे. परंतु कल्पना करा की मंदिराच्या विश्वस्तांनी माझ्याकरिता मंदिराची दारे उघडली तरीही मी त्या मंदिरात तोपर्यंत जाणार नाही जोपर्यंत हरिजनांनाही त्या मंदिरात जाण्याची परवानगी नाही. माझ्या आंदोलनात अनेक हरिजनांना रस नाही ही काही माझ्याकरिता समाधानाची गोष्ट नाही. सकाळीच हरिजनांना घेऊन डिसुझा आले होते. त्याच्यातर्फे आणि त्यांच्या उपस्थितीत ते मला म्हणाले की राजकीय, आर्थिक आणि आंशिक प्रमाणात सामाजिक सुधारणांमध्ये त्यांना रस आहे. यामुळे आम्हांला मंदिरप्रवेशात रस नाही. स्वाभाविकच हा सार्वत्रिक विचार आहे. आपल्यासारखीच त्यांच्यातील जी ऐक्याची भावना असायला पाहिजे होती ती मेलेली आहे. याकरिता जबाबदार आपणच आहो. सोबत बसून मंदिरात पूजा करायची इच्छा त्यांच्या मनात राहिली नसेल तर त्याचे कारण आपणच आहो. यामुळे ते हिंदू धर्म जरी मानत असले तरी त्यांच्याकरिता तर ईश्वर अस्तित्वातच नाही.

हे खरे आहे की इस्लाममधील अल्ला वा ख्रिश्चन धर्मातील ईश्वर वा हिंदुधर्मातील परमात्मा एकच आहेत. परंतु पूजापद्धत मात्र प्रत्येक धर्माची खास त्यांची आहे. आपल्या पापांमुळे आणि त्याबरोबरच्या अक्षम्य वर्तणुकीमुळे मंदिर आपल्याकरिता नाही असे हरिजनांना वाटू लागले. या सवयीमुळे ते मंदिरांबद्दल उदासीन झाले आहेत.

त्रावणकोरच्या हरिजनांमध्ये तसेच हिंदुस्थानच्या इतर भागातील हरिजनांमध्ये अजून हा भक्तिभाव आहे आणि माझ्या वा हिंदुस्थानातील इतर कोणत्याही हिंदूइतकेच त्यांनाही हक्क आहेत हे चांगले चिन्ह आहे. यामुळे आपण किती तरी आश्वस्त होतो. या लोकांच्या आग्रहामुळे तुम्ही जर मंदिर उघडत असाल तर तुम्हांला

कोणतेही पुण्य मिळत नाही, परंतु आपण पाप केले आहे असे जाणवल्यामुळे आणि त्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून तुम्ही मंदिर उघडत असाल तर तुम्ही धर्माचे काम कराल असा माझा जो युक्तिवाद आहे तो दुर्बल ठरत नाही. परंतु मोठ्या संख्येत हरिजनांनी हिंदू धर्म सोडला असेल आणि हिंदू धर्माचे पालन करणारा एकच हरिजन राहिला असेल तरीसुद्धा आपण हरिजनांचा मंदिरप्रवेशाचा हक्क मान्य केला पाहिजे. अशी मनोवृत्ती ठेवा की इतर प्रश्नांसंबंधात हरिजनांची समस्या ताबडतोब वेगळी केली पाहिजे. हा कार्यक्रम जर राजकीय धोरणाचा वा सोयीसवलतीचा भाग असेल तर माझ्या मते याला धार्मिक महत्त्व राहत नाही. माझे समाधान होईल अशा प्रकारे जरी अस्पृश्यांचा राजकीय आणि आर्थिक पुनरुद्धार करण्यात आला तरी या भूमिकेवरून मी ढळणार नाही. आणि मी जी भूमिका स्वीकारली आहे तिलाच मी बिलगून राहणार आहे. याचे कारण माझ्या आणि तुमच्याकरिता हा प्रश्न प्रायश्चित्ताचा आणि जो अन्याय करण्यात आला आहे त्याचा मोबदला चुकवण्याचा आहे.

यामुळे सध्या हिंदुमानसासमोर धर्मपरिवर्तनाची जी समस्या आहे तिने ते अस्वस्थ झाले आहे. याचा आणि हरिजनांबद्दल आपले जे कर्तव्य आहे त्याचा काहीही संबंध नाही इतके मात्र मी तुमच्याजवळ कबूल केले पाहिजे. हरिजन धर्मांतर करतील या धमकीमुळे, आणि उद्या कदाचित हे धर्मपरिवर्तन केल्यामुळे ही भीती नाहीशी होऊन ती वस्तुस्थितीही होऊ शकेल, आपण आपले कार्य कितीही वेगात केले तरी या गोष्टीचे धार्मिक महत्त्व कमी होत नाही. परिणामाचा विचार केल्याशिवाय तुम्ही असेसुद्धा म्हणून शकाल की लोक भीतीमुळे जरी मंदिर उघडत असतील तरी तुमचा काय आक्षेप आहे? माझे म्हणणे आहे की अशा उपायांनी हिंदू धर्माचे रक्षण होणार नाही. ते जर शुद्ध होतील तरच हिंदुधर्म वाचेल. हरिजनांना मोबदला देण्याकरिता याहून थोडेसेही कमी केले तर हिंदू धर्म वाचवता येणार नाही. याचे कारण लाभाच्या अपेक्षेने हरिजनांकरिता जर काही केले तर हृदयातील अस्पृश्यता जाणार नाही आणि हिंदू संस्थांमधील काही लोक असे असे विष पसरवतील की ज्यामुळे आपण दिङ्मूढ होऊन जाऊ. जर आपल्याला अस्पश्यतेची लाज वाटत असेल तर त्याचे चांगले परिणाम होवो न होवो आपण तिचा त्याग केला पाहिजे.

हरिजन मेलेल्या जनावराचे मांस खाणे सोडले, ते स्वच्छ राहू लागले की आम्ही अस्पृश्यतेचा त्याग करू अशी घोषणा उच्च व्यासपीठावर बसलेले थोडे सवर्ण हिंदू करत असतात. तेव्हा माझा धीर खचतो. अशी कल्पना करा की माझ्या वडिलांना, मुलीला वा पत्नीला कुष्ठरोग आहे. तेव्हा मी असे तर म्हणू शकत नाही की ते पूर्णपणे चांगले होतील तेव्हाच मी त्यांना जवळ करीन. त्यांना आवश्यकता असेल तेव्हा जर मी त्यांची सेवा करू शकलो नाही तर त्यांच्या आणि माझ्यामधील संबंध कायमचे तुटून जातील.

हरिजनांची परिस्थितीचे मी जे उदाहरण दिले त्यापेक्षा त्यांची परिस्थिती अनेक पटींनी वाईट आहे कारण त्यांची ही जी अवस्था झाली आहे तिच्याकरिता आम्हीच जबाबदार आहो. ते लोक घाणेरडे राहतात कारण आपण त्यांना तसे केले आहे. ते दारू पीत असतील तर त्याची सरळ जबाबदारी आपल्यावर आहे. यामुळे आपण जर खरोखर प्रामाणिक असू तर त्यांच्यात कितीही जरी दोष असतील तरी आपण त्यांच्यात मिळूनमिसळून राहायला पाहिजे आणि आशा केली पाहिजे - आणि ही आशा निराधार नाही - ज्या क्षणी आपण त्यांच्याशी भ्रातृभावाने वागू लागू त्या क्षणापासून त्याचे दोष कमी होऊ लागतील. आणि तुम्ही निराश व्हाल असे उदाहरण कृपा करून देऊ नका. तुम्ही एखाद्या हरिजन मुलाशी मैत्री केल्यानंतरसुद्धा शक्य आहे की त्याने दारू सोडली नसेलही. परंतु मी तर माझे हृदय पवित्र करण्याची गोष्ट करतो आहे. आपल्यामध्ये जी अस्वच्छता राहून गेली असेल ती दूर केल्याशिवाय आपण राहू शकत नाही.

सावधगिरीची इतकी सूचना दिल्यानंतर मी माझ्याजवळील पुरावे देऊ इच्छितो. सवर्ण हिंदूच्या घराशी हरिजनांचा संबंध स्थापित झाल्यानंतर हरिजनात सुधारणा झाली नाही असे एकही उदाहरण मला माहीत नाही. आणि याउलट होऊच शकत नाही. हरिजनांच्या मुलांना तर हा अनुभव खरा आहे की खोटा असे खूप वाटत असते. हा नवीन अनुभव त्यांना दारू पिण्याच्या तलफेपासून आणि मांस खाण्याच्या इच्छेपासून मुक्त करील. शारीरिक स्वच्छतेची सवय तर आपले पाहून त्यांना फार लवकर लागेल. त्यांनी स्वच्छ घरात प्रवेश केला, आंघोळ केली, कपडे बदलले की लगेच.

सवर्णांना अस्पृश्यतेच्या बचावासाठी तऱ्हेतऱ्हेचे निरर्थक युक्तिवाद करण्याची सवय असल्याचे दिसून येते. या युक्तिवादांचे मी उत्तर देणार नाही, परंतु एक महत्त्वाचा विचार मी तुमच्यासमोर मांडू इच्छितो. हरिजनांबद्दलच्या कर्तव्याविषयी मी बोललो आहे. आपल्या वैयक्तिक व्यवहारात सवर्ण बरेच काही करू शकतात. परंतु पैशाशिवाय काम कसे पुढे न्यायचे यासंबंधात हरिजन सेवक संघाच्या सदस्यात बरीच चर्चा झाली आहे. त्यांना भीती वाटते श्रद्धेच्या अभावाच्या कारणाची. आपल्याला केवळ आठदहा शिकल्यासवरलेल्या लोकांना समजावून सांगायचे नाही. आपल्याला लाखो सवर्णांचे हृदयपरिवर्तन करायचे आहे. अगदी गरीब असेल तोसुद्धा पाहत असतो की पैशाअभावी कोणतेही मंदिर बंद झालेले नाही. अशा भ्रमात राहू नका की करोडे लोक अंधश्रद्धेमुळे पैसे देत असतात. ही गोष्ट अंशतः खरी आहे, परंतु सत्याचा फार मोठा खरा भाग असा आहे की मंदिरात पैसा वा प्रसाद वा सुपारी जी वाहतात ती हे धर्मकार्य आहे अशी त्यांच्यात

अवर्णनीय श्रद्धा असल्यामुळे. या दानाला तुम्ही अंधश्रद्धा समजत असाल तर तुम्ही हिंदुस्थानवर आणि मानवजातीवर अन्याय कराल. तुमच्या गणितात मानवतेला स्थान नसल्यासारखे दिसते.

मला माहीत आहे की हा संशय दीर्घ काळापासून आहे. अशा काही राक्षसांनी ईश्वराला मोठेच जीवनदान दिले आहे. परंतु हा संशय कितीही काळ जरी कायम राहिला तरी कालचक्रात तो नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच अर्धसत्यामध्येही एक गोष्ट निःसंशय खरी आहे — ती ही की कितीही भ्रमित किंवा चुकीच्या वागणुकीतसुद्धा थोडीशी तरी पवित्रता आणि सत्य दडलेले असतेच. यामुळे मला तुम्हांला सांगायचे आहे की या मूक मानवसमाजावर श्रद्धा ठेवा आणि तुमच्या जीवनकार्यात जर श्रद्धा असेल तर प्रत्येक जण एक लहानसे मंदिर होईल. तुम्ही पैसा वा प्रसाद मिळवाल. इतरांवर तुम्ही अश्रद्धेचा आरोप करू नका.

आणि तुम्हांला आळसामुळे जर असा भ्रम झालेला असेल की घनश्यामदास बिरलासारखे करोडपती पैसा मिळवत राहतात आणि त्याविरुद्ध जर तुमचे आंदोलन सुरूच राहिले तर मी तुम्हांला सांगतो की या प्रवृत्तीचा नाश झाल्याशिवाय राहणार नाही. स्पर्शास्पर्शता मान्य करणे हे पाप आहे या भावनेचे चिन्ह म्हणून पैपैसा गोळा करणे तुमचा धर्म आहे असे तुम्हांला जोपर्यंत वाटत नाही तोपर्यंत हे आंदोलन यशस्वी होणार नाही. यश समोर येते आहे असे दिसल्यामुळे तुमचा चेहरा चमकू लागला आणि तरीही यश मिळायला वेळ लागू लागला तर काळजी करू नका. हिंदुधर्माच्या शुद्धिकरणाची, सवर्णांचे हृदयपरिवर्तन करण्याची आणि हिंदुधर्माद्वारे नवीन संदेश पोहोचवण्याची ही एकमेव पद्धत आहे इतकी श्रद्धा असली पाहिजे. मग हवे तर प्रकृतीला आपला प्रभाव दाखवण्याकरिता युगे जरी लोटली तरी हरकत नाही. इतके लक्षात ठेवा की काळ सत्याच्या पुढे जाऊ शकत नाही. एक तर अस्पृश्यता नाहीशी करायची आहे वा आपण स्वतः होमून नष्ट व्हायचे आहे हे एक सरळ सत्य आहे. जे लोक एखादा अनिष्ट हेतू मनात बाळगतात किंवा कामाच्या प्रामाणिकपणाविषयी किंचितही शंका बाळगतात, तेच अधीर होत असतात. श्रद्धा ठेवा की समोर जरी जबरदस्त शक्ती असली तरी ती संपूर्ण निष्प्रभ होईल आणि नंतरही हे आंदोलन सुरूच राहील आणि हिंदुधर्माला जो शाप लागला आहे त्यातून त्याला मुक्त करून त्याला शुद्ध करील. तुम्ही जर धीर सोडाल, तुमची आत्मश्रद्धा जर दुर्बल ठरत असेल, तुम्ही आळशी होत असाल आणि किल्ल्याचा पहारा करत असताना नेहमी सावधगिरी बाळगत नसाल तर मग ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांना दोष देऊ नका, स्वतःलाच दोष द्या.

वेगळ्या शब्दांत सांगायचे तर समोर येऊन उभे ठाकलेल्या शक्तीने नाही तर आपल्या आंतरिक दुर्बलतेमुळे असे होईल. इथे आलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रत्येक प्रश्नाकडे या दृष्टीने पाहावे असा माझा आग्रह आहे. माझे बोलणे संपले.

डिसुझा - माणसाला राहण्याकरिता योग्य नसलेली घरे.

[?बापू] - गेडिस म्हणतात की संस्कृतीची पातळी आपल्या घरांवरून मोजता येते. कोलारमध्ये सोन्याच्या खाणी चालवणारी पेढी ३० ते ४० टक्के व्याज मिळावे इतका नफा जाहीर करत असेल आणि खाणकामगारांना राहण्याकरिता अशा झोपड्या देत असेल तर तो दानवी व्यवहार होईल.

[?डिसुझा] काम करणाऱ्यां अविवाहित लोकांकरिता आणि संततिनियमनावर विश्वास असणाऱ्या लोकांच्या राहण्याकरिता विशिष्ट सोयी असलेल्या झोपड्या असल्या पाहिजे. घरात काय सुरू आहे हे कळू शकणाऱ्या वयात आलेल्या मुलांबरोबर पती आणि मुले एका खोलीत राहू शकत नाही. त्यांच्याकरिता एक मोठी खोली असली पाहिजे. काही थोड्याश्या फुटाची जमीन जर नगरपालिका देत असेल तर मला कळत नाही. असे करत राहिलो तर समाजाचा सत्यानाश झालाच म्हणून समजा. त्यांनी स्वतःमध्ये सुधारणा केली नाही तर समाजाचा विनाश होईलच.

[?बापू?] - सहा पैशापेक्षा जास्त खर्च होईल असा मसुदा मी वकील म्हणून कागदावर लिहून दाखवू शकत नाही.

संप करण्याची मी नवीन पद्धत शिकवतो. तुम्ही सर्व दुसरे काम शोधा आणि हे काम विसरून जा.

**११-६-१९३६**

# ३०. अस्पृश्यता

(प्रश्नोत्तरे)

सरकारमध्ये मंत्रीपद जरी मिळणार असेल तरी निडणुकीच्या कामाकरिता कोणी हरिजन सेवा सोडू शकत नाही, मेलेल्या जनावराचा निकाल लावणे वगैरे.

काही हरिजनांनी मेलेल्या जनावरांची निरवानिरव करण्याचे काम सोडून दिले आहे. यामुळे सवर्ण हिंदूंनी हरिजनांकरिता असलेल्या सोयीसवलती काढून घेऊन त्यांना त्रास द्यायला सुरुवात केली आहे. असे जिथे होते तिथे हरिजनांचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. त्यांचा जर छळ करण्यात येत असेल तर त्यांना जवळपासच दुसरीकडे कुठे तरी राहायला सांगता येईल. ते मेहनत करायला तयार असतील तर मजुरी मिळत राहीलच.

हे लोक जर ऐकायला तयार असतील तर आपण मेलेली जनावरे घेऊ. चांभार नाही तरी कातडी कमावत असतात. त्यांना मेलेल्या जनावराचे मांसही आवडत असते. असे करणे तर मूल्यवान धन वाया घालवणे आहे. मेलेल्या जनावरांची हाडे, कातडी कसे वापरावे याचे विज्ञान जर आपल्याला कळत असेल तर गाय जिवंत असताना जितका पैसा मिळतो त्यापेक्षाही जास्त पैसा मिळेल. मांस आणि स्नायूंचा उपयोग करता येईल. आणि हाडे भाजली असतील, परंतु त्यांचा कोळसा झाला नसेल तर त्यांचासुद्धा उपयोग करता येईल. हे काम करण्याकरिता हातात सुरा घ्यावा लागेल. चरबी तर गोळा करून ठेवावी इतकी मूल्यवान आहे. जनावरांच्या आतड्याचाही उपयोग होतो. त्यांच्यापासून पिंजाईची तार, रंगमंच, वाद्ये, खेळाचे साहित्य वगैरेंसाठी उपयोग करता येतो.

कवींकरिता स्थान नाही. त्रावणकोरमध्ये कामाशी काम ठेवणारे व्यवहारी लोक फार नाहीत. अश्रू आवरण्याचा हाच उपाय आहे.

प्रश्न - आम्हांला मंदिरांशी काही देणेघेणे नाही अशी भावना सवर्णांमध्ये निर्माण झाली आहे काय?

उत्तर - यामुळे मंदिरांवर आमची श्रद्धा नाही असे सवर्णियांना वाटते. तुम्ही असे म्हणत असल्यामुळे एक वेगळा प्रश्न निर्माण होतो. मंदिर आपले आहेत. ज्यांची मंदिरांवर श्रद्धा आहे त्यांना उद्देशून मी हे म्हणतो

आहे. मंदिरांमधील देव पळून गेला आहे असे म्हणून आपण सवर्णांमध्ये विरोधी भावना निर्माण करतो. मंदिरातील ईश्वर तर आपल्या कल्पनेची निर्मिती आहे. त्याची आपण मंदिरात स्थापना करतो म्हणून ईश्वर म्हणतो. 'मूर्खांनो, तुम्ही मला पूर्णपणे ओळखत नाही काय?' परंतु ईश्वर विसरतो की आपण बुद्धी नसलेले लोक आहो. आपल्या अंतःकरणातील घाण साफ करण्याकरिता आपण त्याची आपल्या हृदयात स्थापना केली आहे. जेव्हा आपले ज्ञानचक्षू उघडतील तेव्हा आपली कल्पनाशक्ती काम करू लागते आणि आपल्या कल्पनेतील ईश्वर नाही असे आपण म्हणतो. मी माझे औदासिन्य मंदिरात अर्पण केले आहेत आणि इथे श्रद्धा, धैर्य, आशा वगैरे आणले आहेत. आपण असेच म्हणत असतो. आता आपण असे करू शकत नाही. नाही तर मी उद्यापासूनच घेरावला सुरुवात करीन आणि मार्ग चुकलेल्यांना सावधगिरीची सूचना देईन की असे मत जाहीर करणारांमध्ये फार एकमत आहे. पण मी असा काही सल्ला दिला नाही. मी तर केवळ इतकेच सांगितले की प्रचार घराच्या अंगणात करावा - घराचे काम झाल्यानंतर बाहेर जाऊन ते पसरवावे. मी माझ्या पत्नीपासून सुरूवात केली आणि तिला सांगितले की मंदिरात जाणे म्हणजे पिंजऱ्यात अडकण्यासारखे आहे.

प्रश्न - रोटीबेटीच्या व्यवहाराची गोष्ट वेगळी आहे काय?

आजच्या नातेगोत्यांचे निर्मूलन होऊ नये म्हणून अस्पृश्यता हटवली जाऊन राहिलेली नाही. यामुळे आपल्याला परिचित असलेल्या जातिप्रथेला हरिजन सेवक संघाचा विरोध आहे. ध्येय हे आहे की अस्पृश्यतेचे पूर्णपणे निर्मूलन व्हावे. आणि हे काम सवर्णापुरते सीमीत ठेवले आहे. अस्पृश्यता सर्वत्र भरलेली आहे. ही अवस्था दूर करण्याकरिता आपण प्रयत्नशील आहो. हरिजन सेवक संघाने वर्णाश्रम व्यवस्थेवर सरळ हल्ला करण्याची आवश्यकता नाही.

प्रश्न - कोणत्या पातळीवर नात्यागोत्याचासुद्धा मोह सोडावा लागेल?

आपल्या प्रगतीचा मार्ग कोण अवरुद्ध करू शकतो? आत्मविश्वास येईल तेव्हा आपण पुढे जाऊ शकू. व्यक्ती एकटी जरी असली तरी ती लगेच काम सुरू करू शकते. हरिजन सेवकाकरिता तर नातलग तुटल्यासारखेच असतात. सोबत जेवायला बसणे वा आंतरजातीय विवाह करणे हा वर्णाश्रमधर्माचा भाग नाही. माझी तर पक्की मान्यता आहे की रोटीबेटीचा व्यवहार जरी झाला तरी तुम्ही वर्णाश्रमधर्म अखंड ठेवू शकता. परंतु कोणाबरोबर तरी जेवायला बसायलाच पाहिजे वा विवाह केलाच पाहिजे अशी बळजबरी तर कोणतेही शास्त्र करू शकत नाही. या दोन्ही गोष्टी व्यक्तिगत समजायला पाहिजे. हा सामाजिक प्रश्न नाही. या

दोन गोष्टींमध्ये मूलभूत अंतर काय आहे ते तुम्ही समजून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. हिंदुधर्माच्या मर्यादा मानणाऱ्या हिंदूला योग्य प्रकारे स्वीकारार्ह होईल असे शक्य तितके लांब पाऊल उचलण्याचा मी प्रयत्न केला आहे.

प्रश्न - तरीही मंदिर प्रवेशाच्या लाभाची आपण दखल घेऊ शकत नाही काय?

असहाय असल्यामुळे आपण सध्या हा प्रश्न बाजूला ठेवला आहे. परिस्थितीत सुधारणा झाली की हा प्रश्न परत हातात घेता येईल.

पैसे देऊन केलेल्या प्रचाराने काहीही साध्य होत नाही. माझ्या अनुभवभांडारातील एक वीट तुम्हांला देतो. काही शहाण्या म्हणा की मूर्ख लोकांना असे वाटते की मी जगातील सर्वात मोठा प्रचारक आहे. वेगवेगळ्या विरोधी तत्त्वांचीसुद्धा अशीच मान्यता आहे. यामुळे मलाही वाटते की माझी प्रचारक म्हणून गणना होऊ शकेल.

अर्थसंकल्पात मात्र प्रचाराकरिता पाच टक्केसुद्धा खर्च करण्याची सूट नाही. याच कारणामुळे नाताळ इंडियन काँग्रेस ही गुप्त संस्था असल्याचा एक वर्ष समज होता. खास प्रचाराकरिता केलेला खर्च तुम्ही मागू शकता, परंतु हरिजन सेवक संघ तुम्हांला त्याचा हिशेब मागेल.

म्हैसूर हरिजन संघाचे अध्यक्ष - म्हैसूरपुरते मी सांगेन की प्रचारामुळे लोकांची मनोवृत्ती बदलते. प्रचाराकरिता योग्य तितका खर्च करण्याची परवानगी द्या. आम्हांला प्रचाराकरिता जास्त आणि शाळांकरिता जास्त पैसा हवा.

राजाजी - प्रचाराकरिता लागणारा पैसा तुम्ही गोळा करू शकता.

प्रश्न - हरिजनांमध्ये लहानलहान जातीपाती आहेत. त्या कशा दूर कराव्या?

उत्तर - सवर्ण हिंदूत जातिपाती आहेत. त्या काढून. हरिजन तर मालकांची केवळ नक्कल करत आहेत. आणि नक्कल करणारा नेहमीच मूळ आकृतीत काही तरी भर घालत असतो. इतकी त्यामुळे विकृती निर्माण होते!

सरकारकडून बिनशर्त मदत मिळाली तर ती तुम्ही स्वीकारू शकता.

प्रश्न - हरिजन सेवक संघात काम करणारा हरिजन सांसदीय मंडळाच्या निवडणुकीकरिता उभा राहू शकतो काय?

उत्तर - आधी तर त्याला आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागेल. आपण निवडणुकांच्या गोंधळात सरळ वा आडमार्गाने भाग घेऊ शकतो. मी तर सांसदीय मंडळातसुद्धा हरिजन उमेदवाराने उभे राहण्याच्या विरुद्ध आहे.

प्रश्न - हरिजन कार्यकर्त्यांने काँग्रेसला पाठिंबा द्यावा वा देऊ नये?

उत्तर - याबद्दल तर मी स्पष्ट सांगितले आहे.

निवडणुकांमध्ये मला मुळीच रस नाही. त्या तर जे काम इतर करू शकत नाही ते आपणच करू शकतो आणि म्हणून आपणच सांसदीय मंडळाकरिता योग्य आहो हे दाखवण्याकरिता असतात.

आजीवन कार्यकर्ते निर्माण कराल तर मी तुमचे अभिनंदन करीन आणि तुम्हांला आशीर्वाद देईन.

(मूळ प्रश्न इथे दिलेला दिसत नाही.)

उत्तर - हिंदुस्थानातील मैदानी प्रदेशात गरम कपडे नेसायला माझा विरोध आहे, परंतु हिमालयात राहणाऱ्या लोकांकरिता नाही.

इथे तर मी हरिजनांचा प्रश्न घेऊन बसलो आहे. कदाचित तुम्ही आर्थिक प्रश्न विचारत असाल. तुम्ही कदाचितही हरिजनांची समस्या सोडवू शकत नसाल ही दुःखाची बाब आहे. आंबेडकरांची आपल्यापेक्षा आर्थिक परिस्थिती उच्च आहे. असे असूनही ते महार म्हणजे अस्पृश्य आहेत.

# ३१. हिंदी पदवीदान समारंभ

टाऊन हॉल

१२-३-१९३६

इतक्या बंधुभगनींना पाहून आनंद होतो. इथे अध्यक्ष व्हावे लागेल हे मला माहीत नव्हते. अर्धा तास देण्यासंबंधी गोष्टी झाल्या होत्या. मला तर दोन तास जरी दिले असते तरी मला मनातून आनंदच झाला असता, आणि दोन तास वेळ असता तर त्यात कामही भरपूर झाले असते. तुमच्या हिंदीची परीक्षासुद्धा घेता आली असती, तुमचे दागिने काढायला लावले असते आणि कागदाचे तुकडे काढायला लावून तुम्हांला हिंदी प्रचाराच्या कामाला लावले असते. परंतु मला आजच जायचे असल्यामुळे तुमच्या आणि माझ्या सद्भाग्यात हे नव्हते.

याचा अर्थ असा घेऊ नका की ज्याला द्यायचे असेल त्यानेच द्यावे.

विद्यार्थ्यांचे आभार. ज्यांनी हिंदीचे ज्ञान मिळवले ते आपल्या ज्ञानात भर घालत राहतील. अशी आशा आहे. पैसा कमावण्याकरिता जे महाविद्यालयात शिकायला जातात ते केवळ परीक्षेकरिताच शिकत असतात आणि मग ते पुस्तक विसरून जात असतात आणि ज्ञानही विसरून जात असतात. अनेकांचा तर ज्ञानाशी संबंधच नसतो, पदवीशीच असतो. इथे जे आले आहेत त्यांनी पदवी मिळवण्याकरिता परीक्षा दिलेली नाही. आणि हिंदी प्रचाराचा हेतूसुद्धा असा नाही की या परीक्षांच्या आधारे लोकांना आजिविका मिळावी. उपाधी अपाय आहे याचे कारण समजून घेण्याकरिता शिक्षक आणि विद्यार्थी कोणते काम करत आहेत? ते कोणत्या सीमेपर्यंत जात आहेत हे पाहावे लागेल. विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना माहीत आहे की परीक्षेच्या चाचणीत कशा प्रकारे उत्तीर्ण व्हावे. याद्वारे त्यांना थोडी आजिविका मिळवायची असेल तर तीही एका सीमेपर्यंत मिळू शकते. परिक्षेचा उद्देश हा नाही.

हे पाहून आनंद होतो की विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा विद्यार्थितींनींची संख्या जास्त आहे. हिंदीच्या प्रचाराकरिता आणि हिंदुस्थानकरिता हे एक शुभचिन्ह आहे.

माझा दृढविश्वास आहे की हिंदुस्थानचे कल्याण स्त्रियांच्या त्यागाने आणि ज्ञानानेच होणार आहे. मी अनेक सभांमध्ये - पुरुषांच्या सभांमध्येही - सांगितले आहे की सीता नसती तर राम कुठून मिळाला असता? यामुळेच सीतेचे आणि रामाचे नाव घ्यावे लागत असते. ही गोष्ट सहज होऊन गेली असेल असे नाही. यात

फार मोठे रहस्य आणि कारण आहे. मला असे वाटते की त्या काळात स्त्रियांना फार मोठे स्थान देण्यात आले होते.

आता हिंदी भाषेला राष्ट्रभाषा बनवण्याकरिता एकदोन विचार सादर करतो. ज्याअर्थी तुम्ही कर्नाटकात राहता आणि तुमची दृष्टी कर्नाटकाबाहेर जात नाही त्या दृष्टीने तुमच्याकरिता कानडी भाषेचे ज्ञान पुरेसे आहे. परंतु आज आपण एका गावात जरी गेलो तरी तेथील लोकांची दृष्टी हिंदुस्थानपर्यंत पोहोचलेली असते. परंतु हे आपले ज्ञान आपल्याला फार दूर घेऊन जात नाही. याचे कारण इथे आपण कर्तव्यपालन करू शकत नाही. कर्नाटक निवासींची इच्छा तामिलनाडूशी संपर्क ठेवायची असली वा त्यांना आग्रा, दिल्ली, सिंधशी संपर्क करायची इच्छा असली तर ते कशा प्रकारे संपर्क करतील हा प्रश्न आहे.

काही लोक म्हणतात की आम्हांला या कामाकरिता इंग्रजी भाषा चालते हे जाहीर आहे. ज्यांना काही हजार लोकांशी वा असे म्हणा की एखाद लाख लोकांशी संपर्क करून समाधान होते त्यांच्याकरिता हे म्हणणे खरे आहे. परंतु मला विश्वास आहे की या हॉलमध्ये जे बसलेले आहेत त्यांचे या भूमिकेने समाधान होणार नाही. करोडो लोकांना इंग्रजी भाषा समजू शकत नाही. लाखो लोकांना एकमेकांना समजून घेणे हे सुलभ व्हायला पाहिजे. अनुभवांती आपल्याला कळले आहे की ही गोष्ट शेकडो वर्षे शक्य नाही. लाखो लोकांनी इंग्रजी शिकण्याकरिता असे कोणतेही कारणसुद्धा असू शकत नाही. आणि इतके लाखो लोक इंग्रजी शिकल्याने काही मोठे आजिविका मिळवून देणारे साधन निर्माण होऊ शकेल असेही नाही. जोपर्यंत थोडे लोक इंग्रजी शिकतील तोपर्यंतच इंग्रजीची आर्थिक किंमत आहे.

परंतु हिंदी वा हिंदुस्तानी भाषेत या अडचणी येत नाहीत. याचे कारण इंग्रजी शिकण्यात जितका वेळ जातो तितका वेळ हिंदी शिकण्यात जात नाही. अशी कोणती तरी भाषा आहे काय की जी विशिष्ट मर्यादित राष्ट्रभाषा होऊ शकते? भाषाशास्त्री म्हणतात की हिंदू आणि इतर भाषांची तुलना केली तर हिंदुस्थानात हिंदी-हिंदुस्तानी बोलणारे आणि समजणारे लोक २१ कोटी असतील. कर्नाटकची लोकसंख्या स्त्रीपुरुष मिळून एक कोटी दहा लाख आहे. त्यांना हिंदी भाषा शिकाविशी वाटणार नाही काय? प्रत्यक्षात तर तुम्ही जे ऐकता तेच तुम्हांला ऐकावेसे वाटत असते.

लेडी रामनचे लहानसे व्याख्यान हिंदीत होते. माझ्या विनंतीमुळे त्या काय बोलल्या त्याचा अनुवाद करून तो समजावून सांगण्यात आला. मी तर दोन्ही फार लक्ष देऊन ऐकत होतो. लेडी रामनने हिंदीत वापरलेले अनेक शब्द कानडी भाषेतही होते. प्रेमी, संघ, सभा, अध्यक्षपद, अनंत प्रेम, भक्ती, स्वागत, अध्यक्षता,

संमेलन हे सर्व शब्द त्यांच्या भाषणात आले होते. ते कानडीतील अनुवादातही ठेवावे लागले होते. हे शब्द समजून घेण्यात अडचण तर जाऊच शकत नव्हती. कारण यांच्यात फरक व्याकरणाचाच होता. त्या भाषणाचा जर इंग्रजीत अनुवाद केला असता तर यातील एकही शब्द इंग्रजीत आला नसता.

यामुळे कानडी लोक जेव्हा हिंदीला कठीण म्हणतात तेव्हा मला हसू आल्याशिवाय राहू शकत नाही. रागसुद्धा येतो. जे लोक हिंदी प्रचाराला विरोध करतात त्यांनी निदान आठ मिनिट बसून हिंदीचा अभ्यास करावा. मी ६७ वर्षांचा झालो आहे. आता दोनचार दिवसांचा प्रवासी आहे. परंतु जेव्हा मी हा अनुवाद ऐकला तेव्हा मला वाटले की मी जर कानडी शिकायला सुरुवात केली तर आठेक दिवसात शिकू शकेन. तुम्ही तर तरुणतरुणी आहा. महिनाभर चारचार तास अभ्यास करायचे ठरवा. मग पाहा तुम्ही शिकू शकता की नाही? तर तीस कोटी लोक केवळ एका महिन्यात चार चार तास संपर्क वाढवण्याकरिता देऊ शकत नाहीत काय? आता जर तुम्ही इंग्रजी शिकायला सुरुवात केली तर तुम्ही एका महिन्यात इंग्रजी शिकू शकाल काय?

हिंदी शिकणे इतके सोपे आहे याचे सबळ कारण आहे. जितके हिंदू हिंदुस्थानातील भाषा बोलणारे आहेत त्या सर्व भाषांत दक्षिणेकडील चार भाषांचाही समावेश आहे. या सर्व भाषा संस्कृत शब्दांनी भरलेल्या आहेत. आणि त्यांच्यात दुसरे काय असू शकते? हे ऐतिहासिक सत्य आहे की संस्कृतद्वारेच दक्षिणेचा उत्तरेशी संबंध चालत आला आहे, आणि आजसुद्धा उत्तरेकडील शास्त्रीलोक दक्षिणेशी संस्कृत द्वारेच व्यवहार करत असतात. उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील भाषांत जो भेद आहे तो व्याकरणाचा आहे. उत्तरेकडील भाषांचे व्याकरण जवळपास सारखे आहे. दक्षिणएकडील भाषांचे व्याकरण मात्र निश्चितच वेगळे आहे. परंतु दक्षिणेवर संस्कृतचा जेव्हा परिणाम नव्हता तेव्हा ते जे शब्द वापरत होते ते शब्द नवीन होते. परंतु मी तर चारही प्रांतात गेलो आहे आणि प्रत्येक प्रांतातील भाषेचे तात्पर्य समजून घेण्यात मला अडचण जात नव्हती. याचे कारण त्यांच्यात भरपूर संस्कृत शब्द भरलेले आहेत.

आता राहिले मुसलमान. ज्या प्रांतात मुसलमान राहतात त्या प्रांतातील भाषा तर त्यांना येतच असते. बाकी त्यांना उर्दू येत असते. मी तुम्हांला सांगू इच्छितो की उर्दू आणि हिंदी-हिंदुस्तानमध्ये काहीच फरक नाही. अर्थात यांचे व्याकरण एकच आहे. दीर्घ दृष्टीने पाहिले तर या तिन्ही भाषा एकच असल्याचे जाणवेल. यांचे शब्दकोश घेऊन बसलो तर लक्षात येईल की बहुतेक शब्द सारखेच आहेत. यामुळे मी जे सुरुवातीला सांगितले होते त्यावर तुम्ही विश्वास ठेवावा.

यामुळे तुमची सीमा उत्तरेकडे श्रीनगरपर्यंत आणि दक्षिणेकडे कन्याकुमारीपर्यंत वाढत असेल तर तुम्ही हिंदी शिकायलाच पाहिजे. हिंदुस्थानची राष्ट्रभाषा कोणत्याही प्रकारे इंग्रजी होऊ शकत नाही हे मी तुम्हाला दाखवून दिले आहे अशी मला आशा वाटते. इंग्रजीबद्दल माझ्या मनात द्वेष नाही. तिचे ज्ञान काही मोजक्या लोकांकरिता अत्यावश्यक आहे. संपूर्ण जगाशी संबंध ठेवण्याकरिता आवश्यक आहे. आणि पश्चिमेकडे तयार होणाऱ्या गोष्टींचे ज्ञान इंग्रजीशिवाय मिळू शकत नाही. परंतु इंग्रजीला जे स्थान मिळू शकत नाही ते तिला देण्यात येत असलेले पाहून मला दुःख होते. हा प्रयत्न निष्फळ होणारच आहे. प्रत्येक गोष्ट आपापल्या ठिकाणी शोभते.

अजून एक भ्रम दूर करतो. हिंदी कानडी भाषेला पदच्यूत करण्याचा प्रयत्न करायला शिकवते आहे काय? राष्ट्रभाषा प्रचाराचा हा उद्देश कधीही होऊ शकत नाही. माझा दावा आहे की राष्ट्रभाषेचा जितका प्रचार होईल तितक्याच प्रमाणात प्रांतिक भाषांची शक्ती वाढेल. मी हिंदी भाषेत जेव्हा रममाण होतो तेव्हा माझ्या लक्षात येते की जिथे हिंदीचा प्रचार भरपूर झाला आहे तिथे प्रांतिक भाषांची शक्तीही वाढली आहे.

आता लिपीची गोष्ट घेऊ या. दक्षिण आफ्रिकेत मी होतो तेव्हापासून माझा विश्वास आहे की ज्या भाषा संस्कृतोद्भव आहेत त्यांची लिपी एकच असू शकते. असे जर झाले तर सर्व भाषा शिकणे आपल्याकरिता सुलभ होईल. तमिळ लिपी शिकायचा मी प्रयत्न केला आहे. काही दिवस तेलगू भाषेचासुद्धा. मल्याळम लिपीद्वारे ती भाषा शिकायचाही मी प्रयत्न केला आहे. आणि हीच गोष्ट कानडी भाषेसंबंधीही आहे. यामुळे मला या चारही प्रांतातील भाषाशास्त्रज्ञांचा राग येतो. मला असे वाटते याचे कारण या चारही भाषा समजून घेण्याकरिता उत्सुक असलेल्या माझ्यासारख्या माणसावर इतके जास्त ओझे कशासाठी? या लिप्यासुद्धा येणे आवश्यक आहे काय? इतकी संकुचित दृष्टी का?

यामुळे एक लिपी कबूल करायची असेल तर ती नागरी लिपीच असू शकते. आणि ही आपल्याकरिता सुलभही आहे. परंतु या गोष्टीचा हिंदी प्रचाराशी इतका संबंध नाही.

परंतु ज्याला हिंदी भाषा शिकायची असेल त्याच्यासमोर असलेल्या अडचणींसंबंधी बोलू.

मला जितके सांगायचे होते त्यापेक्षा मी जास्त सांगितले आहे.

शहराच्या नगरपालिकेने दर वर्षी ५०० रुपये देण्याचा ठराव केला आहे. तिचे आभार मानावे असे मला सुचवण्यात आले आहे. त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले याकरिता त्यांचे आभार मानण्याची काय आवश्यकता?

# ३२. सेवाग्रामकरिता प्रयाण

**१६-६-१९३६**

**१**

सेवाग्रामकरिता प्रयाण. पावसापाण्यात, चिखलात छत्रीशिवाय भिजत भिजत बापू सेगावला गेले. पोहोचायला अडीच तास लागले. काहीही अडचण आली नाही असे लिहिले. इथून दररोज पाच वाजता निघण्याची मला सूचना केली. आणि मला रोज ११ मैल चालायचे होते. याकरिता चार तास देणे चांगले आहे असे मला वाटले.

रामेश्वरीची रेंगी रस्त्यात तुटली. बिचारी कशी तरी वाचली आणि चिखल तुडवत नऊ वाजता जमनालालजींच्या घरी पोहोचली.

**२**

**[जुलै १९३६]**

## राजकुमारी अमृतकौरला पत्र

एखाद्या मित्राकरिता तयार करावी तशी इथे झोपडी तयार करण्यात आली आहे. एवढ्यातच एक तरुण साधू राहायला आला आहे. स्वतः तयार केलेले भजन तो फार रसाळ पद्धतीने म्हणतो. एखाद महिना राहील.

झोपडीचा एक कोपरा माझ्या ताब्यात आहे. दुसरा कोपरा या साधूने घेतला आहे आणि तिसऱ्या कोपऱ्यात सहकार्यकर्ता मुन्नालालकरिता ठेवला आहे. तू पाहिले आहे की लाकडाच्या फळ्या असलेली खाट पहिल्या कोपऱ्यात आली आहे. जर तू आली तर हा कोपरा बा आणि तू मिळून वापरशील. अशा प्रकारे तू स्वतःला खऱ्याखुऱ्या ग्रामीण जीवनाकरिता तयार करशील. न्हाणीघराशिवाय इतर कोणतीही खाजगी जागा नाही. आणि पायखाना तू आणि मी वापरू.

जे नशिबी आले आहे ते पाहून तू थरकापशील. येथील नाविन्य तुला आवडेल. खोली पाहिल्याबरोबर ती भरगच्च भरलेली असल्याचे तुला आढळेल. परंतु आवाज मुळीच नाही. चारही बाजू मोकळ्या आणि सुंदर

आहेत. दिवसभर ताजा वारा वाहत असतो. थंडी चांगलीच आहे. सर्व दिशांना फिरायला जाण्यासारखे सुंदर वातावरण आहे. दोन दिवस इथे घालवल्यानंतर काय फेरबदल करण्याची आवश्यकता आहे ते मला सांगशील.

इथे राहशील तर आपण फार गर्दीत राहत आहो असे कदाचित तुला वाटेल. आम्ही सर्व आकाशाखाली झोपत असतो. मध्ये कोणतेही छप्पर नसते. तरीसुद्धा मच्छरदाणी घेऊन येशील. आणि माझ्याकरिता थर्मासचे जे झाकण आणायला विसरली होतीस तेसुद्धा आणशील.

# ३३. हिंदूंना एक संदेश

**१७-६-१९३६**

**१**

हिंदूधर्मीयांची प्रत्येक सभा हे पाच काम सहज करूशकते -

१. पाप समजून अस्पृश्यता काढून टाका;

२. अज्ञानामुळे गोसेवेत जे शैथिल्य आले आहे ते दूर करून ज्ञानपूर्वक गोसेवा करावी;

३. खादीचा स्वीकार करून दरिद्रनारायणांची किंचितशी सेवा करा;

४. गावकऱ्यांचा माल घेऊन त्यांची सेवा करा;

५. धर्मनाशक जातिबंधने तोडा.

मो. क. गांधी

## २. हिंदुधर्माचा आजार

**२७-६-१९३६**

पंजाबमधील एका हरिजन सेवकाला -

मानव धर्म आणि हिंदू धर्मात विरोध  नाही. अस्पृश्यता हिंदू धर्माची व्याधी असल्यामुळे आमची सेवा हिंदूंपर्यंत सीमीत असली पाहिजे.

‘मुसलमान अस्पृश्य’ असा प्रयोगच होऊ शकत नाही. तुमच्यासमोर ज्या अडचणी आहेत त्या तेथील कारणामुळे आहेत.

काल जो हरिजन होता तो आज ख्रिश्चन झाला आहे. त्याची नोंद घेणे आपले कर्तव्य नाही. जोपर्यंत त्याला आमचा आधार मिळतो आहे आमच्या दृष्टीने तर तो हरिजनच आहे.

हो, शिकल्यासवरलेल्या माणसाची गोष्ट वेगळी आहे. उदाहरणार्थ महाविद्यालयात जाण्याकरिता कोणी जर मदत घेत असेल तर धर्मपरिवर्तन केल्यानंतर त्याला ही मदत मिळू शकणार नाही.

तुमचा,

मो. क. गांधी

# ३४. पत्रे

## (कुठे अध्यापिका? कुठे संपादिका?)

**२६-६-१९३६**

चि. शन्नोदेवी,

तुम्हाला काय सांगू? हो, दैनिक शक्तीचा अपव्यय निश्चितच होईल. कुठे अध्यापिका? कुठे संपादिका? ज्या गोष्टीत मला मुळीच रस नाही तिच्यात तुमचा हितेच्छू असतानाही आशीर्वाद कसा पाठवू?

बापूचे आशीर्वाद

## २. ईश्वरावर श्रद्धा

प्रेमा बहेन,

एखाद्या श्रद्धावंत माणसाला जगण्याची इच्छा नाही म्हणून लगेच त्याला मृत समजून त्याचा अग्नीसंस्कार करण्याच्या प्रयत्नात जितके तथ्य असेल तितकेच तथ्य ईश्वरावर श्रद्धा बसताच नास्तिक होण्यात आहे. भावना आणि श्रद्धा यांच्यात जर भेद असेल तर भावना नसतानाही श्रद्धा निर्माण होण्याकरिता प्रामाणिकपणे प्रार्थनेत बसण्याचा लाभ आहेच.

आपण जर जंगली लोकांमध्ये राहत असलो तर आपण आपल्या धर्माचा प्रचार न करता नीतिधर्माचा प्रचार केला असता. जसजशी तुमच्या हृदयाची दारे उघडत जातील तसतशी तुम्हांला जर एखाद्या धर्माला पसंती द्यायची असेल तर ती देऊ शकता. नीतिधर्माने आपल्याला सर्व धर्मांचे सामान्य ज्ञान दिलेले असेल.

# ३५. जवाहरलाल नेहरू आणि कार्यकारिणी

**१**

**२८ मे १९३६**

जवाहरलालने लिहिलेल्या पत्राचे हे उत्तर. बापूजींनी त्याचे उत्तर पुढीलप्रमाणे दिले -

२५ तारखेचे पत्र मिळाले. ताप यावा तितक्या वेगाने तू गावोगावी फिरतो आहेस. तुझी शक्ती टिकून राहावी अशी प्रार्थना करतो. या कार्यक्रमात तुला एका आठवड्याची जरी विश्रांती मिळाली तरी मी ती ईश्वराची कृपाच समजेन.

खादीबद्दलच्या तुझ्या वक्तव्याचा मी सार्वजनिक उपयोग करण्याचा विचार करतो आहे. खादीवर श्रद्धा असलेल्या आपल्या लोकांच्या वक्तव्यांना विकृत रूप देण्यात आल्यामुळे काही लोक अतिशय व्याकूळ झाले आहेत. आणि तुझे संपूर्ण वक्तव्य पाहिले तर त्यामुळे परिस्थिती काहीशी सुधारेल अशी आशा वाटते.

कार्यकारिणीत एकाही भगिनीला का घेतले नाही यासंबंधातील खुलाशामुळे माझे समाधान झाले नाही. समितीत एक तरी स्त्री असली पाहिजे अशी थोडी जरी इच्छा तू व्यक्त केली असती तर जास्त वयाच्या एखाद्या सदस्याला बाहेर ठेवणे काही कठीण झाले नसते. असे म्हणतात की असे दडपण भूलाभाईसंबंधात आले होते. आणि यांचे पहिल्यांदाच नाव पुढे आले तेव्हा तर तुझी कोणत्याही प्रकारची तक्रार नव्हती. दुसऱ्या कोणत्याही सदस्याबद्दल दडपण नव्हते. एखाद्या समाजवाद्याचे नाव काढून तू जर एखाद्या भगिनीला घेतले असते तर तुझ्या पसंतीला धक्का लागला नसता. परंतु मला आठवते त्याप्रमाणे सरोजिनीदेवीच्या ठिकाणी दुसऱ्या स्त्रीला घेण्यात तुलाच संकोच वाटत होता. यांना घेतले नाही तर बरे होईल असे तुला वाटत होते. मी तर तुला इथपर्यंत सांगितले होते की एका स्त्रीला आणि एका मुसलमानाला कार्यकारिणीत ठेवण्याची जी परंपरा होती तीसुद्धा तुला मान्य नाही.

यामुळे त्या भगिनीचे नाव मागे घ्यायला लावण्याचेसुद्धा तुझ्या पसंतीवरसुद्धा कोणतेही बंधन नव्हते. ही परंपरा तोडण्याची इच्छा वा हिंमत दुसऱ्या कोणत्याही सद्स्यामध्ये नव्हती. मला असेसुद्धा वाटले की काँग्रेसच्या एका विशिष्ट वर्तुळात या सर्व गोष्टीचे खापर माझ्या डोक्यावर फोडण्याची इच्छा होती. श्रीमती नायडूंना बाहेर ठेवणारा मीच आहे असे लोक म्हणतात हे याचे कारण आहे. ते असेही म्हणतात की एकाही

भगिनीला न घेण्याचा आग्रह माझाच होता. जेव्हा की वास्तवात मी तुला म्हणालो होतो की असे पाऊल उचलण्याची माझी तरी हिंमत नाही. स्त्रियांची गोष्ट जाऊ दे, मी तर श्रीमती नायडूंनासुद्धा बाहेर ठेवू शकलो नसतो.

आपल्या ध्येयाकरिता जे योग्य होते ते लक्षात ठेवून इतर सदस्यांना पसंती दिली असा ठसा माझ्या मनावर उमटला होता. 'निर्लज्ज', 'इज्जतदार' हा प्रश्नच निर्माण होत नाही कारण उत्तम उद्देशाने आपले ध्येय साध्य व्हावे म्हणून प्रत्येकजण प्रेरित झालेला असतो आणि तो आपापल्या बुद्धीने काम करत असतो. तुझ्या पत्रावरून याचे समर्थन होते, परंतु तुझ्या वक्तव्यामुळे मात्र राजेंद्रबाबू, राजाजी आणि वल्लभभाई हे दुखावले आहेत इतके तर मी म्हणेनच. त्यांना वाटते की, आणि याबाबतीत मी त्यांच्याशी सहमत आहे, त्यांनी उदार अंतःकरणाने तुझ्याबरोबर प्रामाणिकपणे वागण्याचा प्रयत्न केला होता. तुझ्या वक्तव्याचा सार हा आहे की तुझ्याकडून अन्याय झाला आहे. हा दृष्टिकोन तू समजून घ्यावा आणि शक्य असेल तर प्रकाशित अहवालात तू दुरुस्ती करावी अशी माझी इच्छा आहे.

तिसऱ्या गोष्टीसंबंधात स्पष्टीकरण करण्यात आले तर फार चांगले. तुला काय म्हणायचे आहे याची मी कल्पना करू शकत नाही. परंतु आपली भेट झाल्यानंतरची ही गोष्ट आहे. तुझ्या डोक्यावर जे ओझे आहे त्यात मी भर घालायला नको.

डॉ. अंसारींच्या स्मारकाचा योग्य वेळ येईल तेव्हा विचार करता येईल हे स्मारकाविषयीचे  माझे स्पष्ट मत मी असफअलींना सांगितले आहे. पपांच्या (मोतीलाल नेहरूंच्या) स्मारकासंबंधातही राजकीय कारणासाठी असे करावे लागले होते. यासंबंधात तुझे काही वेगळे मत आहे काय?

कमलाचे स्मारक हळूहळू पुढे जात आहे. हिंदुस्थानचा उल्लेख असलेले राजकुमारीचे एक वक्तव्य यासोबतआहे.

बंगलोर शहरात १० तारखेपर्यंत.

सप्रेम बापू

# २. जवाहरलाल नेहरूंच्या ५ जुलैच्या पत्राचे उत्तर

**८ जुलै १९३६**

आताच तुझे पत्र मिळाले. (याचा संबंध ५ जुलैच्या पत्राशी आहे. त्यात जवाहरलाल नेहरूंनी कार्यकारितील त्या सदस्यांच्या धोरणावर टीका केली होती ज्यांच्याशी त्यांचे मतभेद होते. २९ जूनला वर्ध्यात कार्यकारिणीची बेठक झाली होती. तिच्यात हे मतभेद स्पष्टपणे समोर आले होते. राजेंद्रप्रसाद, चक्रवर्ती राजगोपालाचारी, जयरामदास दौलतराम, जमनालाल बजाज, वल्लभभाई पटेल, जे. बी. कृपलानी, शंकरराव देव या समितीतील सात सदस्यांनी आपला राजीनामा दिला होता आणि नंतर गांधीजींच्या मध्यस्थीनंतर त्यांनी ते राजिनामे परत घेतले होते. परंतु एक जुलैला राजेंद्रप्रसाजनी जवाहरलाल नेहरूंना एक व्यक्तिगत पत्र लिहिले. त्यातून त्या सदस्यांनी राजिनामा का दिला याचे कारण विस्ताराने समजावून सांगितले होते. २९ जूनला देण्यात आलेले हे राजीनामे, १ जुलैला जवाहरलाल नेहरूंना राजेंद्रप्रसादनी लिहिलेले पत्र, ५ जुलैला जवाहरलाल नेहरूंनी गांधीजींना लिहिलेले पत्र हे तिन्ही इथे दिलेले नाहीत, परंतु 'अ बंच ऑफ ओल्ड लेटर्स'मध्ये ते आढळू शकतात.

लखनौ काँग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरूंची अध्यक्ष म्हणून जेव्हा निवड झाली तेव्हा कार्यकारिणीतील हा अंतर्गत मतभेद स्पष्ट झाला होता. ज्या प्रश्नामुळे हे मतभेद झाले होते तो असा होता - काँग्रेसची आपल्या कार्यक्रमात समाजवादाशी कितपत बांधिलकी असू शकते.पट्टाभी रामैय्यांच्या शब्दांत "अध्यक्षांचे मत कार्यकारिणीतील बहुतेक सदस्यांशी जुळत नव्हते.") (ही टीप संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ६३ पृष्ठ १३९ वरून घेतली आहे.)

वर्ध्यातील घटनांविषयी लिहायला वेळच शोधत होतो. तुझ्या पत्रामुळे ही गोष्ट थोडी कठीण झाली आहे. परंतु ज्या वेळी तुला पत्र पाठवले त्या वेळी त्याचा तू जो अर्थ केला असशील तसा अर्थ आता होत नाही इतकेच मला सांगायचे आहे. मी ते पाहिल्यानंतरच हे तुला पाठवण्यात आले होते. राजीनाम्याऐवजी असे पत्र पाठवावे अशी माझी सूचना होती. या पत्राचा तू न्याय्य अर्थ काढावा अशी माझी इच्छा आहे.

तू हवे ते म्हण, परंतु माझे निश्चित मत आहे की वर्षाच्या उर्वरित भागाच्या दरम्यान सर्व भांडणे थांबवावी आणि कोणीही राजीनामा देऊ नये. असे केले नाही तर हिंदुस्थान काँग्रेस समिती बधिर होईल आणि ती संकटाचा सामना करण्याची ताकद हरवून बसेल. दोन वेगवेगळ्या भावनांमध्ये ओढाताण वाढेल. लोकशाहीचे नाव घेण्याआधीच अशी परिस्थिती निर्माण होईल की जिचा सामना आपण कधीही केलेला नाही. अशी वेळ येण्यापूर्वीच समितीला राजीनामा सोपवणे अगदीच अयोग्य होईल.

पत्राच्य साराला तू जास्तच महत्त्व दिले आहे. मी त्याबद्दल काहीही बोलायला नको. परंतु शांततापूर्वक परिस्थितीचा विचार केला पाहिजे इतकाच माझा आग्रह आहे. शोभणार नाही अशा प्रकारे उदास होऊन बसू नकोस. तुझ्या खेळकर स्वभावाचे दर्शन कार्यकारिणीच्या सभेत वा बाहेर व्हायला नको. वर्षांपासून

कोणत्याही कटकटीशिवाय आपण काम करत आलो आहो. तसेच पुढे सुरू राहू देण्यात तुला कोणत्या कारणामुळे अडचण जाणवते?

त्या लोकांनी जर असहिष्णुता दाखवण्याचा गुन्हा केला असेल तर तुझ्या नशिबी आलेल्या असहिष्णुतेपेक्षा तू जास्तच असहिष्णुता दाखवली आहेस. तुम्ही एकमेकांना माफ करू शकत नसाल तर तेवढ्यामुळे देशाला सहन करावे लागण्याची वेळ येऊ नये.

मला आशा आहे की जर्मन डॉक्टरने योग्य सल्ला दिला असेल. तो तू मान्य केला असशील.

बापू

## ३

जवाहरलाल नेहरूंची दोन लांब पत्रे आली होती. त्यांच्या आणि अजून एका पत्राच्या उत्तरात बापूंनी लिहिले -

सेगाव,

**१५ जुलै १९३६** (ठिकाण आणि तारीख संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ६३मधून घेतली आहे.)

प्रिय जवाहर,

(१) 'टाईम्स ऑफ इंडियात' प्रकाशित झालेल्या पत्राच्या संबंधात माझी तार मिळालीच असेल. ती मिळवी म्हणून मी काल दिवसभर वाट पाहिली. यासंबंधात मी कोणालाही कधीही लिहिले नाही. पत्र वाचल्यानंतर माझे दृढमत झाले आहे की बदनामीच्या कायद्याच्या दृष्टीने पुढील पावले उचलायला पाहिजे -

(२) माझ्या म्हणण्याचा गैरसमज करणार नसशील तर मला नागरी स्वातंत्र्य संघटनेपासून (सिव्हिल लिबर्टीज युनियन) मला अलिप्त ठेवलेले आवडेल. सध्या कोणत्याही राजकीय संस्थेशी जोडल्या जाण्याची माझी इच्छा नाही. आणि सविनय प्रतिकारात तापून निघालेल्या माझ्यासारख्या माणसाने अशा गोष्टीत पडण्याला काही अर्थ नाही. मी त्यात सामील होतो की होत नाही ही गोष्ट बाजूला ठेवून जर खोल विचार केला तर माझे निश्चित मत आहे की सरोजिनी नायडूंनंतर कोणत्याही सत्याग्रहीला अध्यक्ष बनवणे ही चूक होईल असे माझे निश्चित मत आहे. माझी तर अजूनही मान्यता आहे की अध्यक्ष कोणी तरी घटनातज्ज्ञ असला पाहिजे.

हे जर तुला पटत नसेल तर कायदेभंग करणाऱ्या कोणत्याही लेखकाला घे. सदस्यांची संख्यासुद्धा कमी ठेवशील. संख्या नाही, सर्व गुणधर्मवाले लोक हवे.

(३) तुझे पत्र मर्मस्पर्शी आहे. तुला वाटते की इतरांनी केलेल्या हल्ल्याचा मारा सर्वात जास्त तुलाच सहन करावा लागला आहे. वास्तवात कार्यकारिणीच्या तुझ्या सहकाऱ्यांमध्ये तुझ्यासारखी हिंमत आणि स्पष्टवक्तेपणा नाही. यामुळे फार मोठा अनर्थ होऊन राहिलेला आहे. माझ्याशी त्यांनी न घाबरता मनमोकळेपणाने चर्चा करावी असा आग्रह मी नेहमी धरत आलो आहे. पण ते जेव्हा बोलतात तेव्हा धैर्य वा हुशारी नसल्यासारखे बोलतात आणि यामुळे तुला चिड येते. मी तुला खरे सांगतो की तुझ्या चिडखोर स्वभावामुळे ते तुला घाबरतात आणि बोलत असताना तू धीराने ऐकून घेत नाही. तुझे झिडकारणे आणि तुझी हुकूमशाही वृत्ती त्यांना अस्वस्थ करते. आणि विशेषतः स्वतःची चूक होऊच शकत नाही अशी तुझी मान्यता असून इतरांपेक्षा आपल्याला जास्त कळते असे समजून तू त्यांच्यावर लक्ष ठेवतोस असे त्यांना वाटते. यामुळे ते त्रस्त होतात. तुझे त्यांच्याशी वर्तन सौजन्यशीलतेचे नाही. समाजवादी त्यांची चेष्टा करतात आणि त्यांचे विचार चुकीच्या पद्धतीने मांडतात. अशा वेळी तू त्यांचा बचाव करत नाही असे त्यांना वाटते.

तुझी तक्रार आहे की तुझ्या कामाची हानी होईल असे हे लोक बोलतात. याचा अर्थ असा नाही की तू जे करतोस ते हानिकारक आहे. यांच्या पत्रात तुझ्या गुणाचा वा सेवेचा उल्लेख करण्याची संधी त्यांच्या पत्रात नव्हती. तुझ्यातील उत्साहाची आणि देशातील तरुणावरील तुझ्या प्रभावाचीसुद्धा त्यांना पुरेपूर जाणीव आहे.

ही संपूर्ण गोष्ट मला करुण रस आणि हास्यरसाच्या मिश्रणासारखी वाटते. यामुळे तू याकडे थोड्या शांतचित्ताने पाहावे अशी माझी इच्छा आहे. तू याबद्दल अ. हिं. काँ. समितीला सुचीत केले तर त्याबद्दल माझा आक्षेप नाही. परंतु तू या आपसातील भांडणाचे ओझे आणि तू अथवा ते अशी निवड करण्याचे असह्य जबाबदारीचे ओझे काँग्रेसवर टाकावे अशी माझी इच्छा नाही. तू काहीही कर, परंतु काँग्रेससमोर तू सर्व गोष्टी आपसात तडजोड करूनच ठेवल्या पाहिजे.

सर्व समित्यांमध्ये जर त्यांचे बहुमत दिसत असेल तर तुला राग येण्याचे कारण काय? या सगळ्या स्वाभाविक गोष्टी नाहीत काय? तू त्यांना सर्वानुमताने पसंत केले आहे, परंतु अजून तुझ्या हाती सत्ता आलेली नाही. तुला काँग्रेसचे अध्यक्षपद देणे हा तुझ्या हाती सत्ता सोपण्याचा प्रयत्न आहे. अजून कोणत्याही प्रकारे असे करता येऊ शकत नव्हते. असो, ते काहीही असले तरी मी जेव्हा हा काटेरी मुकूट तुझ्या डोक्यावर

चढवण्याची सूचना केली होती तेव्हा माझ्या मनात हीच गोष्ट होती. यानंतर तुझ्या डोक्यावर जरी आघात होत असतील तरी तू हा मुकूट धारण करून राहा. समितीत हास्यविनोदाचे वातावरण परत निर्माण कर. हीच गोष्ट तुला अनुरूप आहे. चिंताग्रस्तता, चिडखोरपणा, थोड्याशा गोष्टीवर चिडणे हे तुझे खरे रूप नाही. तुझ्याकरिता हे योग्य नाही.

माझी तर खूप इच्छा आहे की माझे पत्र पूर्ण वाचल्यानंतर तू मला तार करून सांगावे की मी परत तितकीच प्रसन्नता अनुभवतो आहे जितकी प्रसन्नता लाहोरमध्ये नववर्षादिनी मी अनुभवत होतो. असे म्हणतात की तू त्या दिवशी तिरंग्याच्या सभोवती नाचला होतास.

तू तुझा घसा तरतरीत ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे.

मी माझ्या जाहीरनाम्यात परत सुधारणा करतो आहे. तू पाहिल्याशिवाय मी तो छापणार नाही हे निश्चित.

महादेवशिवाय इतर कोणीही आपला पत्रव्यवहार पाहणार नाही अशी मी व्यवस्था केली आहे.

सप्रेम बापू

## ४. नटराजनला पत्र - असामान्य लेख

**७ जुलै १९३६**

महादेवने आताच तुमचे पत्र पाठवले.

तुम्ही मला 'यनिटी' पत्राचा जो संपादकीय लेख पाठवला आहे तो धक्कादायक आहे. त्यात माझ्या तोंडी जे विधान घातले आहे आणि जे अवतरण चिन्हात दाखवले आहे ते मी कधीही काढलेच नाहीत. आणि याहून मोठी गोष्ट अशी आहे की माझे असे विचार कधीही नव्हते. आणि जवाहरलालच्या तोंडून मी जे काही ऐकले आहे त्यावरून ते हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता हिंसेच्या उपयोगाचा विचार करत आहेत अशी शंका मला कधीही आली नाही. आश्चर्य आहे की डॉ. होल्म्स यांचा कसा गैरसमज झाला आणि मी असे बोललो असेन यावर त्यांनी कसा विश्वास ठेवला?

तुम्ही या पत्राचा हवा तसा उपयोग करू शकता. वेळ वाचावा म्हणून तुम्ही हे पत्र डॉ. होल्म्सलासुद्धा पाठवा.

# ५. जवाहरलालशी स्पर्धा

जवाहरलालशी स्पर्धा माझी स्पर्धा सुरू आहे ही खरी गोष्ट आहे काय असे एका जणाने विचारले.

बापू म्हणाले -

सध्या तर आम्हा दोघाचाही एकमेकांना विजयी करण्याचा प्रयत्न सुरू आहे, एकमेकांशी युद्ध करून मात करण्याचा नाही.

प्रश्न - तुमच्याकरिता ही खरी गोष्ट असेलही परंतु जवाहरलालचे काय?

मी म्हणतो ते त्यांच्याबद्दलही खरे आहे हे मला माहीत आहे. माझ्यावर विजय मिळवण्याचा त्यांचा मुळीच विचार नाही.

# ३६. भाईसोर संस्थान

**२९ मे १९३६**

भाईसोर संस्थान - क्षेत्रफळ - २९४७४ चौरस मैल. स्कॉटलंड इतके.

हिंदी संस्थाने आणि एजन्सीचा १/२४ भाग.

हिंदुस्थानचा १/६० भाग

१९२१ मध्ये लोकसंख्या जवळपास ६० लाख . (५,९७८,८६२)

हिंदुस्थानच्या १/६० भागाइतका प्रदेश हिंदुस्थानच्या १/५३ लोकसंख्येचे भरणपोषण करतो.

हिंदुस्थानच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत देशी संस्थानांचे क्षेत्रफळ १/३, परंतु लोकसंख्या १/४ लोकांचे तिथे पालनपोषण होते. ही लोकसंख्या ७६५६८ गावात आणि १०६ शहरात राहते.

लोकवस्तीची घनता २०३ (१८८१ मध्ये १४२ आणि १९२१ साली २०३ होती)

| | |
|---|---|
| म्हैसूरमध्ये हिंदू | ५४ लाख |
| मुसलमान | ३.४ लाख |
| ख्रिश्चन | ९१ हजार |
| ॲनिमिस्ट (जीववादी) | ६३ हजार |
| जैन | २१ हजार |
| अल्पसंख्याक धर्म | २ हजार |

# ३७. नीतीशिवायची बुद्धी

**२६ जुलै १९३६**

छगनलाल जोशींना एका पत्रात -

तुला पत्र लिहिण्याचा विचार अनेकदा मनात येत असतो. हा उल्कापाताचा काळ आहे. यात आपले पायही स्थिर ठेवणे कठीण असते. यामुळे सावध राहा.

नीतीशिवायची बुद्धी वेश्येसारखी असते. बाहेरून ती लकाकत असते, नाचत असते, गात असते, आकर्षत असते, परंतु ती आपल्याला खड्ड्यात उतरवत असते. तसेच वेश्येसारखी ही बुद्धीरुपी वेश्या आज अनेकांचा अधःपात घडवत आहे.

आश्रमातील लहानात लहान नियमाचासुद्धा तू उल्लंघन करू नको.

बापूचे आशीर्वाद

# ३८. पत्रे

**२८ जुलै १९३६**

(१) उत्तमचंदला

तुझ्या दानाची तू पावसाचा थेंब म्हणून ओळख करून देतोस आणि या विषयात मौन का असेही विचारतोस. याचा अर्थ मला कळला नाही. मी तुला सांगू इच्छितो की सध्या मी जे कोणते मदत कार्य करतो आहे त्यांतील एकेक काम महासागरातील थेंबासारखे आहे. तू सध्या पाठवलेला धनादेश स्वागतार्ह आहे.

कमला स्मारकाबद्ल सावध राहण्याचे जे तू म्हणालास ते मला आवडले. शिवाय विश्वस्त आहेतच. ते यावर नियंत्रण ठेवतील. आजारी स्त्रिया आणि मुलांकरिता हे घर तयार होते आहे अशी मी आशा करतो.

**२**

श्रीमती तंद्रादेवी (मॉड मॅकार्थी) बरेच लेख लिहीत आहेत. त्यांना बापूंनी लिहीले -

तुमचे लेख खूप रस घेऊन पाहिले, परंतु ‘हरिजन’मध्ये छापण्यापूर्वी तुमच्याबद्दल तुम्ही जे पोस्ट कार्डात लिहिले आहे त्यापेक्षाही बरेच काही जाणून घेऊ इच्छितो. तुन्ही कोणता व्यवसाय करता? तुमचे वय काय आहे? हिंदुस्थानात तुम्ही कधी आला? आणि हिंदुस्तानी नाव का स्वीकारले? तुमचा धर्म कोणता आहे? स्वतःचा उदरनिर्वाह कसा करता? आशा आहे की हे प्रश्न तुम्हाला तुच्छतादर्शक वाटणार नाहीत.

सामान्यपणे ‘हरिजन’ ज्यांना ओळखतो त्यांचेच लेख घेत असतो. हे लोक जे लिहितात ते जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करत असतात. गत पन्नास वर्षात माझ्या असे लक्षात आले आहे की खरोखरी अंतःकरणापासून लिहिणाराच्या अगदी साध्या शब्दांचासुद्धा प्रभाव पडत असतो. तसा परिणाम विद्वान लोकांच्या उत्कृष्ट भाषाशैलीचाही प्रभाव पडत नाही. लेखकाचे वा वक्त्याचे दर्शन त्याच्या शब्दांमधून झाले पाहिजे. आणि तुमचा लेख जर मी स्वीकारला तर त्याचा भावार्थ न बदलवता त्यात काटछाट करण्याचा मला अधिकार असला पाहिजे.

तुमचा,

मो. क. गांधी

## ३

# मृत्यू मुक्ती आहे

प्रिन्स एली (एफी एरीस्टार्शी) यांना पत्र -

**२८ जुलै १९३६**

प्रिन्स एलींना त्यांच्या काकांच्या मृत्यूबद्दल लिहिले -

तुला पत्र लिहून युगे लोटली, आणि तुझे काकासुद्धा वारले. ईश्वराचा शोध घेणाराकरिता प्रत्येक हानीतसुद्धा कोणता तरी लाभ दडलेला असतो. वियोग नावापुरता आणि काही थोड्याशा काळाकरिताच असतो. अपवाद न करता प्रत्येकाकरिता मृत्यू ही मुक्ती आहे.

परंतु तुला माझ्या उपदेशाची गरज नाही. काकांच्या मृत्यूविषयी लिहायचे होते म्हणून मनात जे खोलवर विचार सुरू होते आणि ज्यांना मी बिलगून असतो ते लिहून टाकले.

या लहानशा गावात जे काही सुरू आहे त्याचे विवरण देण्याकरिता वेळ काढण्याचे साहस मी करू शकत नाही.

# ३९. तप करायचा विचार

२९ जुलैला अकर्ते वकील आपल्या चारपाच मित्रांना घेऊन तुकडेबुवांवर मोठे आरोपपत्र घेऊन आले होते. ज्या दोन मुलांवर अत्याचार झाला होता त्या मुलांनाही त्यांनी सोबत आणले होते.

माझ्या सूचनेनुसार ते बापूंना म्हणाले - मी जर खोटा ठरलो तर तुम्ही म्हणता ते प्रायश्चित्त घ्यायला मी तयार आहे. परंतु तुम्ही जर खोटे ठरला वा बुवा वाईट आहे असे सिद्ध झाले तर तुम्ही प्रायश्चित्त घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

बापू म्हणाले - ही जबाबदारी मी आनंदाने स्वीकारतो. एखाद्या व्यक्तीने केलेल्या पापाकरिता प्रायश्चित्त घेण्याचे दिवस संपले. मी किती लोकांकरिता उपवास करीन? असे असतानाही जनतेला त्रास होत असेल अशा प्रश्नाकरिता उपवास करण्याचा विचार माझ्या मनात खोलवर आहेच.

# ४०. इतर धर्मांतील व्यक्तीशी लग्न करण्याविषयी

**२०-८-१९३६**

इतर धर्मांतील व्यक्तीशी लग्न करण्याविषयी बापूंचे विचार -

तुझे पत्र मला विचार करण्याकरिता बाध्य करते आहे. प्रमुख सख्यासोयऱ्यांचा आक्षेप नसेल, पत्नी जर स्वतःचा धर्म पाळायला स्वतंत्र असेल आणि खरोखरी ती आपल्या मुळ धर्माला धरून राहत असेल आणि त्यांना एकमेकांच्या धर्माबद्दल आणि आचरणाबद्दल आदर वाटत असेल तर आजपुरता विचार केला तर मी म्हणेन की अशा जोडप्याला आशीर्वाद देण्यात मला मुळीच अडचण वाटत नाही.

# ४१. पत्रे

**१**

**३० जून १९३६**

**(?महादेवभाईंना?)**

‘हरिजन’ची पाने फिरवाल तर चांगले होईल.

यंग मेन्स ख्रिश्चन असोशिएशन काय करते आहे?

**२**

वर्धा,

**३ जुलै १९३६**

प्रिय भाई सुभाष,

आताच पत्र मिळाले. आशा आहे की जितक्या वेळा तुझी पत्रे येतील तितक्या वेळा मी उत्तर देऊ शकेन. कैद्यांना आणि स्थानबद्धांना त्यांच्या मित्रांची जी पत्रे मिळतात त्यांचे काय मूल्य असते हे मला माहीत आहे.

दर आठवड्याला (तुझ्याकडे) ‘हरिजन’ पाठवत जा असे मी महादेवला सांगितले आहे.

अधिकाऱ्यांना असे सांगून जर काही फायदा होणार असेल तर तुम्ही निश्चितपणे सांगा राजकीय प्रश्नाशिवाय इतर प्रश्नावर जर तुम्हांला काही लिहायचे असेल तर तुमच्या अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ते प्रकाशित करण्याची माझी इच्छा नाही.

सप्रेम,

मो. क. गांधी

## ३

खुरशेदबहेनला लिहिले -

**७ जुलै १९३६**

प्रिय बहेन,

तुमच्या वक्तव्यात सनातन सत्य सामावलेले आहे. परंतु तुमच्या मागील पत्रात एक तक्रार होती आणि तशी तक्रार करण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. उलट तसे करणे तुमचे कर्तव्य होते. गुन्हेगार कोण आहे आणि त्याने काय केले इतके मात्र तुम्ही मला सांगायला पाहिजे. भूतकाळात घडलेल्या लहान लहान घटना तपासूनच आपण सत्याजवळ पोहोचू शकतो.

कमीतकमी मला तरी सत्याचा जो कवडसा पाहायला मिळाला आहे तो पूर्णपणे जरी नाही तरीही प्रामुख्याने त्या महान उद्देशाला समोर ठेवून भूतकाळात घडलेल्या लहान लहान घटनांची काळजीपूर्वक चिकित्सा करून मिळालेला आहे. यामुळेले तुम्ही मला मदत केली पाहिजे.

## ४

खुरशेद बहेनने सूचना केली की वायव्य सरहद्दीवरून निमंत्रण आलेले आहे आणि तुम्ही गुपचूप निघून जायला पाहिजे. 'समाधानाने कोणताही आवाज न करता तुम्ही तिथे राहू शकत नाही काय?'

याचे उत्तर -

**१६ जुलै १९३६**

प्रवास करण्याची परिपक्व वेळ केव्हा असते? तुझ्या मनात खानसाहेबांचा जाहीरनामा असेल तर त्यात माझ्याकरिता असा कोणताही संदेश नाही. ही घटना इतकी निर्माल्याप्रमाणे झाली आहे की तिची नोंद घेण्याची आवश्यकता नाही. मी त्या दोन्ही भावांना वचन दिले आहे की तुम्ही बोलावल्याशिवाय किंवा मला अंतरात्म्याची हाक ऐकू आल्याशिवाय मी तिथे धावत येणार नाही,

संत खरे आणि खोटे दोन्ही असतात. खऱ्या संताला आपल्या आजूबाजूला गोंगाट सहन होत नाही. परंतु अशा दुर्दैवी लोकांच्या नशिबी हीच गोष्ट येऊन पडते.

नकली संत आपल्या आजूबाजूला गर्दी असल्याशिवाय राहूच शकत नाहीत.

## ५

## राजकुमारी बहेनला

**५ ऑक्टोबर १९३६**

मधासहित सफरचंदच्या दोन टोपल्या पोहोचल्या. सोबत दोन पेलेसुद्धा.

मला आशा आहे की देशमुख तुला परत भेटेल. अर्थातच आता मी मांसाबद्दल फार चौकश्या करत बसणार नाही. तुझ्या मनात उचित-अनुचितची भावना निर्माण झालेली असल्यामुळे मी तुझ्या विचारांचा सन्मान निश्चितच करायला पाहिजे.

दक्षिण आफ्रिकेच्या प्रतिनिधी मंडळाचा तुला काय अनुभव आला हे माहीत करून घेण्याकरिता मी पत्राची वाट पाहतो आहे.

आजकाल माझ्याकडून तू लांब पत्राची अपेक्षा ठेवू नकोस. माझ्याजवळ दोन लोक गंभीर आजारी आहेत. आणि मीरालासुद्धा आजाराने परत पछाडले आहे. पथ्यासंबंधी कोणते नियम ठेवले पाहिजे ते कळत नाही. कोणाला कळते? मूर्खांना कळत असेल तर माहीत नाही.

## ६

थर्मासची खरेदी करण्यात तर पैसे उधळलेच गेले. सफरचंद काय मजेदार होते? परंतु तू जर असे पैसे उधळणार नाही तर तुला कोणी राजकुमारी म्हणणार नाही. असे असले तरी तू प्रामाणिक आहेस कारण तू इतरावर पैसे खर्च करतेस.

तू जर स्वतःला विश्वस्त समजत असशील तर मग शरीरासह जे काही आहे ते सर्व तू इतरांकरिता वापरत राहशील. या साध्या सत्याला तत्त्वज्ञानाची गोष्ट समजून हसू नकोस. गरिबांच्या दृष्टीने रुपयाची काळजीपूर्वक म्हणजे ६४ पैशांची किंमत करशील. याचा अर्थ हा आहे की पैसा लाखांनी जरी मिळत असला तरी ६४ पैशांत पूर्ण जेवण जेवण व्हायलाच पाहिजे. सेगावमध्ये अनेक लोक एक रुपयात आपले काम भागवत असतात. इतके की ते दोन वेळेचे जेवण एक पैशात करतात. परंतु लाखोंना इतकेही मिळत नाही. यामुळे आपण लक्षात ठेवले पाहिजे की मी हे जे लिहितो आहे त्यानंतरही आपण चुकीच्या गोष्टीकरिता पैसा कसा

खर्च करू शकतो? थोडा वेळ तरी तू शहाणी होणार नाही काय? जर या अथवा माझ्या कल्पनेप्रमाणे तुला स्त्री व्हायचे असेल तर तुला तुझी सर्व शक्ती विकसित करावी लागेल. हिशेब ठेवणे न थांबवता.

तुझी हिंदी कशी आहे?

# ४२. हिंदी-हिंदुस्थानी

प्रिय भाई महमूद,

ज्यांचे जीवन फार मूल्यवान आहे अशा रुग्णांमुळे माझा पत्रव्यवहार बंद आहे. हेसुद्धा फार ओढाताण करून लिहितो आहे.

हिंदी-हिदुस्तानीबद्दल माझा जो दृष्टिकोन आहे त्याच्या बचावाकरिता फारसे सांगण्याची आवश्यकता नाही. मला भीती वाटते की तुम्हाला पूर्ण इतिहास माहीत नाही. मौलाना महमूद जे म्हणतात ते विकृत चित्र आहे.

हिंदी संमेलनात मी काही एक वर्षापूर्वीच सामील झालेलो नाही. त्यांनी पहिल्यांदा अध्यक्ष होण्याकरिता मला जे आमंत्रण दिले होते त्याला जवळपास दहा वर्ष झाली आहेत. तेव्हाही माझा आग्रह होता की उर्दूला हिंदीचाच भाग समजण्यात आले पाहिजे. हे जे मत मी जाहीर केले होते ते मी १९०८च्या आधी केले असावे असे मला वाटते.

नंतर एक पाऊल पुढे टाकून गेल्या वर्षी इंदोरमध्ये जी सभा झाली तिच्यात मी त्यांना उर्दू लिपीचा आणि बोलीचाही हिंदी भाषेत समावेश होईल अशी व्याख्या मान्य करायला लावली. ही माझ्या गुन्हाची सुरुवात आणि शेवट आहे. हे सर्व तुम्हाला माहीत आहे काय? जर माहीत असेल तर तुम्ही मला समजून घेऊ शकत नाही हे कसे शक्य आहे? या सभेने हिंदी-उर्दूचा म्हणजे हिंदुस्थानीचा स्वीकार केला नाही तो केवळ गैरसमज आहे काय?

या प्रश्नाची ‘हरिजन’मध्ये चांगल्या प्रकारे चिकित्सकपणे चर्चा करण्यात आलेली आहे. ती वाचा आणि मी केलेला युक्तिवाद जर तुमच्या गळी उतरला नाही तर मला लिहा आणि मी तुम्हाला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीन. मी जर इतकी साधी गोष्ट तुम्हाला समजावून सांगू शकत नसेन तर मला तर स्वतःबद्दलच निराशा वाटेल.

सप्रेम बापू

डॉ. महमूद, बार ऍट लॉ

छपरा, बिहार

# ४३. माघार घ्यायला नको

चि. शंकरलाल,

मजूर महाजन तर्फे नोटीस वाचली. बरोबर आहे. फुंकून फुंकून पाऊल टाक. एकदा पाऊल टाकल्यानंतर माघार घ्यायला नको.

बापूचे आ.

७-११-१९३६

सेगाव, वर्धा

# ४४. रागावू नका

२३-११-१९३६

सेगाव, वर्धा

प्रिय भाई सी. आर.,

रागावू नका. त्रावणकोरच्या कायद्यासंबंधात तुम्ही जी नोंद पाठवली होती तिच्यात मी सुधारणा केली आहे. तुमच्या लेखनात यापूर्वी मी अशी सूट घेतल्याचे मला आठवत नाही. मी जे फेरबदल केले आहेत आणि त्यात जी काही भर घातली आहे त्याचे कारण तुम्हाला सहजपणे कळू शकेल. अशाच प्रकारे मी जर भविष्यकाळात काही फेरबदल केले आणि तुम्हाला ते योग्य वाटले तर ते स्वीकाराल.

तुम्ही काहीही म्हणा परंतु आपल्या ध्येयाकरिता या सुधारणा करणे मला माझे कर्तव्य वाटले.

सप्रेम बापू

# ४५. विदेशातील मित्रांना पत्रे

## १

२४-९-१९३६

वेस्टला लिहिले -

फिनिक्स आश्रमात जे प्रयोग केले ते माझ्याकरिता तर जीवनभराचे काम होते. यामुळे तू कधी हिंदुस्थानात आला तर तुला इथेही तितकेच साधेपणाने भरलेले वातावरण आढळेल. याचे कारण जुना जो आदर्श होता तो इथेही टिकून राहिलेला आहे. परंतु आज याचा अर्थ अजूनच व्यापक झाला आहे.

## २

## तुमच्या उणिवांचा स्वीकार करा

२६ सप्टेंबर १९३६

प्रिय आईस,

तुम्हाला काय सांगू?

माझ्याबरोबर असता तर मला फार आवडले असते. तुमचा चांदण्यांच्या भ्रमणावर इतका जरी विश्वस असला तरी माझा तुमच्या उपचारपद्धतीवर मुळीच विश्वास नाही. तुमच्या उपचारपद्धतीमुळे मला फायदा झाला हे तुमचे मतही पूर्णपणे खरे नाही. तुमच्या इतक्या मेहनतीनंतरही मला तर अखेरीस शस्त्रक्रिया करवून घ्यावी लागलीच होती. साबरमतीत तुम्ही पुष्कळ रुग्णांची शुश्रूषा केली. परंतु लहानग्या मनूशिवाय, जिने कच्ची अंडी खाल्ली होती, अजून कोणालाही कायम लाभ झाला नाही.

तुमच्या हातून काही तरी ठोस काम व्हावे म्हणून तुमच्याकरिता काही तरी व्यवस्था करण्याचा प्रयत्न मी वर्षांपासून करतो आहे. परंतु अजून तुम्ही एखाद्या दगडासारखे राहिलेले आहा. तुम्ही स्वतःच कोणत्या तरी भ्रमात आहा अशी मला खरोखर भीती वाटते. तुम्ही तुमच्या उणिवा कबूल करण्याची वेळ आली आहे. मला

असे वाटते की तुमच्यात विशेष काही तरी कौशल्य आणि शक्ती आहे. आणि ती वाया जात असल्याबद्दल मला दुःख होते.

**३**

२६ सप्टेंबर १९३६

अहिंसेचा एक गुण लक्षात ठेवा. तो हा आहे की खूप आवश्यक असेल तरच बोला. अगदी साध्या शब्दांत आणि गुपचूप काम करून उत्तर दिले पाहिजे. अहिंसा बुद्धीला उद्देशून काही करत नाहीत, सरळ हृदयाचा वेध घेते. माणूस जितका अधिक बोलतो आणि युक्तिवाद करतो तितका त्याचा प्रभाव कमी पडतो. यामुळे पडते घेतल्यामुळे तुम्हांला तुमची बाजू गमावल्यासारखी  वाटत असेल तरी संकोच करू नका. दर्शनी हारसुद्धा विजयाची प्रभात असू शकेल.

खूप बोलावे लागणे हे निर्बलतेचे चिन्ह आहे.

## ४. हातकागद आणि बोरूचा टाक

भाई हाफमेयर,

तुमचे उबेने भरलेले पत्र पाहून आनंद झाला. आशा आहे की या देशात फिरण्यामुळे तुमच्या वेळेचा सदुपयोग होईल. आणि येथील लोकांना जर तुम्ही भेटाल तर ते तुमचे आगतस्वागत करतील.

हिंदुस्थानात तुमचे अनेक मित्र असल्यामुळे आपली कदाचित भेट होऊ शकणार ही दुःखाची गोष्ट आहे.

मी वापरतो ते कागद हाताने तयार केलेले आहेत, आणि टाक बोरूचे आहे. या गोष्टीत तुम्हाला कदाचित रस वाटेल. उदाहरण म्हणूत तरी काही गावे पाहिल्याशिवाय हिंदुस्थान सोडू नका. वर्ध्याला आणि सेगावला याल आणि आम्ही लहान लहान पाऊल टाकून कसे काम करत आहो ते तुम्ही पाहावे अशी मी अपेक्षा केली तर तो मूर्खपणा ठरू नये.

तुम्हाला आणि तुमच्या सहकारी सदस्यांना शुभेच्छा.

अंतःकरणपूर्वक तुमचा,

मो. क. गांधी

५ ऑक्टोबर १९३६

सेगाव, वर्धा

## ५. कुमारी चोकलीनच्या अटी

**१३ एप्रिल १९३६**

कुमारी चोकलीनचे एक पत्र आले आहे. त्यांनी बापूंना संत फ्रॅन्सिस वगैरेंच्या खालच्या वा बरोबरीच्या स्थानावर ठेवण्याकरिताच्या अटी सांगितल्या आहेत.

# ४६. रचनात्मक क्रांती?

**२४-११-१९३६**

### बेसिल मॅथ्यूज इत्यादींबरोबर चर्चा

बे. मथ्यूज - ग्रामविकासाचे समग्र दर्शन कसे होईल?

बापू - स्टॅलीन वा हिटलर ज्या विश्वासाने बोलतात त्या विश्वासाने मी बोलू शकेनच असे नाही. पूर्णपणे अंमलात येऊ शकेल असा तयार कार्यक्रम द्यायचा आणि तो अंलात आणून दाखवायचा असे होऊ शकत नाही. या योजनेची मुळे जर गावात रुजू शकत असतील तर आपल्या दृष्टिकोनात खरोखरच परिवर्तन होईल. कार्यक्रमाचे केंद्र शहरातून गावात जाईल. गावकऱ्यांना आपल्या शक्तीची जाणीव होईल. बोट जरी उंच केले तरी हे लोक प्रतिकार करू शकत नाही अशी परिस्थिती आहे. याचे कारण पैसा, शक्ती अशा प्रत्येक गोष्टीत जी विषमता आहे तिचा निवाडा आधी करावा लागेल. आम्हांला कोणकोणत्या अडचणी सहन कराव्या लागतात हे तुम्हाला सांगतो; पण कामे जेव्हा स्वयंसेवकांवर सोपवावी लागतात तेव्हा ती साकार करणे अशक्य नसते.

आमच्याकडे सेगावसारखी अशी अनेक लहान लहान खेडी आहेत की ज्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. परंतु हे सर्व नमुना म्हणून सांगतो आहे. खालच्या भागातील ओलसर जमिनीत वसलेले, बेटासारखे एका गावात – जिला आपण 'संस्कृती' म्हणतो तिची नावनिशाणीही पोहोचलेली नाही. सुमारे ६०० लोकसंख्या, त्यापैकी जवळजवळ निम्मे हरिजन. हिंदुस्थानात क्वचितच आढळतील इतके अंधश्रद्धाळू, अस्पृश्यतेला घट्ट चिकटून राहणारे; बहुतेक अगदी अशिक्षित लोक.

प्रश्न - अस्पृश्यतेवर विश्वास ठेवतात असे तुम्ही कशावरून म्हणता?

उत्तर - हरिजनांनी दिलेले पाणी त्यांना चालत नाही, त्यांना मंदिरात येऊ देत नाहीत, परंतु मी जाऊ शकतो. मी त्यांना विचारले की मी इथे राहायला आलो तर तुम्ही नाराज व्हाल? तर ते नाही म्हणाले. परंतु मी सांगितल्यामुळे त्यांचे मतपरिवर्तन होईल अशी आशा ठेवता येत नाही. माझी विहीर बिगर हरिजन वापरत नाहीत. आता हरिजन यातून पाणी घेतात. माझ्या चोहोकडे हरिजन राहत असतात. मी त्यांची मदत घेत असतो.

हा तर या समस्येचा एक भाग झाला. सामाजिक क्रांती - विषमता दूर करणारी. परंतु मी त्यांना वाया जाणारा वेळ उपयोगात आणण्यासंबंधी आणि आजूबाजूला जे काही वाया जात असते ते उपयोगात आणण्याचे शिकवून मी यांच्या खिशात हजारो रुपये टाकत असतो.

त्यांना खजुरीचे झाड, त्यापासून तयार होणाऱ्या साखरेचा नमुना दाखवला.

सरकारकडे अर्ज केला आहे की खजुजीच्या झाडांचा आम्हांला उपयोग करू द्या. २५ झाडांचा रस काढण्याची सरकारने परवानगी दिली आहे. आम्हांला जर यात यश मिळाले तर या लोकांना अजून काही हजार रुपयांची आम्ही भेट देऊ शकू.

प्रश्न - आता जे लेडन स्ट्रीटवर चॉकलेट मागतात त्यांना तुम्ही हा ताडगूळ विकणार आहा काय?

श्रीमंतांचे दररोजचे उत्पन्न तीन आणे आहे. झाडातून रस काढणारे म्हणतात की १० रुपयांपेक्षा कमी घेणार नाही. पंचवीस झाडांचा रस काढायचे यांना दहा रुपये मिळत असतात.

सार्वजनिक आरोग्य -

किंचितही अतिशयोक्ती न करता लॉयनल कर्टिस म्हणाले होते की यांचे गाव पाहिले. ते उकिरड्यावर बांधलेले तुटक्याफुटक्या घरासारखे आहेत. दक्षिण आफ्रिकचे जो मोठा लढा द्यावा लागला होता तेव्हा त्या लढ्याकरिता हीच गोष्ट जबाबदार होती. ज्या कायद्याविरुद्ध आम्ही कंबर कसली होती ते इथेही घडते आहे.

जमिनीत खड्ड्याचे पायखाने -

पावसाळ्यात ते वापरणे ही व्यावहारिक गोष्ट नाही. तिथे पोहोचण्याकरिता पाऊलवाट तयार करावी लागेल. खोल खड्ड्याच्या पायखान्याचा विचार सोडून द्यावा लागेल.

मॅथ्यू - रचनात्मक क्रांतिकरिता इतका पैसा देणाऱ्याच्या धीराचासुद्धा सामना करावा लागेल.

बापू - एवढेच नाही. पैसेवाले लोकसुद्धा पळून जातात. आज त्यांचे वर्तन कितीही जरी क्रूर असले तरी त्यांची गरज आहे.

माझे असे म्हणणे नाही की सहकारी बँका बेकार आहेत. परंतु मी इतका दूर जाऊ इच्छित नाही. आर्थिक दृष्टीने जे लोक खोलवर बुडालेले आहेत ते सहकारी बँकेचा लाभ घेऊ शकत नाही.

यांच्या मागे लागायची गरज नाही. हरिजनांना जर मी अशी कला शिकवली तर त्यांना रोख रकमेची गरजच वाटणार नाही. वरणभाकरीबरोबर त्यांना थोडे तूपही मिळावे याचीच मला काळजी आहे. या लोकांनी या करिताच्या अटी मान्य कराव्या अशी माझी इच्छा आहे. आळसात घालवलेल्या वेळेचा उपयोग केला तर आपल्याला अधिक पैसे मिळतील असे जर या लोकांना कळले तर परिस्थितीत बराच बदल होऊ शकेल. जमीनदारांचे मला कोणतेही स्थान दिसत नाही, परंतु मला जमीनदारांचा नाश करायचा नाही. जमिनीचा पाऊण भाग जमनालालचा आहे. त्यांनी ही जमीन विकत घेतली आहे. मी तर इथे कोणतीही पूर्व योजना न आखता अकस्मात येऊन पडलो आहे. जमनालालशी माझा असा करार आहे की सेगावमधून त्याला जो काही नफा येईल तो माझा असेल. याचा उपयोग मी गावातील लोकांचे भले करण्याकरिता करू शकेन.

या शोषणापासून सरकारला कसे दूर ठेवावे ही दुसरी एक समस्याच आहे. हे अनिष्ट अनिवार्य आहे असे मला दिसते.

प्रश्न - नेहरूंच्या आर्थिक धोरणापेक्षा तुमचे धोरण वेगळे आहे काय?

बापू - त्यांना जमीनदारांना संपवून टाकायचे आहे. हा थोडासा मतभेद आहे. ग्रामविकास कार्यक्रमाचा स्वीकार करण्याइतकी जिवंत श्रद्धा त्यांच्यात नाही. दोन्ही अनिष्ट - जमीनदारी आणि आर्थिक साम्राज्यवाद - माझ्या पद्धतीने ते निःसत्व होतात आणि वर्गविग्रह अपरिहार्य असण्याची आवश्यकता राहत नाही. अहिंसेचा हा अत्यावश्यक भाग आहे. परंतु लोकांना जर आपल्या शक्तीचे भान झाले तर हे दोन्ही अनिष्ट नसल्यासारखे होतील. मजुरांना आवश्यक तितकी मजुरी मिळाली नाही तर ते आपल्या शेतीत काम शकणार नाही हे जर बिचाऱ्या जमीनदारांना कळले तर त्यांचे काय होईल? मजूर मालक होतील. त्यांनी जर संप केला तर मजुरांसमोर जमीनदार उभे राहू शकणार नाही अशी शक्ती मजुरांमध्ये निर्माण होईल. याचबरोबर त्यांना पैशाची गरज पडेल तेव्हाही असेच होईल.

वर्गविग्रह अपरिहार्य आहे यावर माझा विश्वास नाही. मला वाटते की वर्गविग्रह जर टाळताच येत नसेल तर मीच मजुरांना पाठ शिकवीन - परंतु वर्गविग्रह टाळण्याचा खास मार्ग आहे. बिहारमध्ये सरकारी बंदुकीचा बिनसरकारी उपयोग करता येत नाही त्याचप्रमाणे आम्ही प्रयत्न केला पाहिजे. शंभर वर्ष जुन्या अन्यायी व्यवस्थेत दहा महिन्याच्या आत बदल झाला. सरकारने जिथे मदत केली तिथेच हे शक्य झाले असे नाही. परंतु याचे कारण तर हे आहे की सरकार दुसरे काही करूच शकत नव्हते.

प्रश्न - गावातील जनतेच्या हाती सत्ता कशी केंद्रित होईल?

हरिजनांमध्ये -

माझी कार्यपद्धती कायम राहील इतक्या सीमेपर्यंत प्रतिकार करायचा आणि अस्पृश्यतानिवारणाकरिता शांतपणे क्रांती घडवून आणायची. याकरिता कोणताही प्रचार केला नाही आणि कोणत्याही प्रश्नावर नमते घेतले नाही. आधी कपडे धूत नव्हते, आता धूत आहेत. आजाऱ्यांची रात्री सेवासुश्रूषा करण्याकरिता मी यांना थांबवून घेतले. परंतु त्यांनी पैसे घ्यायला नकार दिला.

तुम्ही दिलेल्या उदाहरणाच्या आधारावर किती प्रमाणात अनुकरण होते आहे?

अनुकरण होते आहे.

# ४७. मिशन कॉन्हेंट

आर्चबिशपचे भाषण - राजकीयेतर बाजूवर भर.

या प्रश्नावर मी चोहोबाजूने भरपूर विचार केला आहे. ज्यांचे ख्रिश्चन धर्मसंस्थेत अंतःकरणापासून मन लागत असेल, मग सर्वसामान्य नीती काहीही असो, तर त्यांनी धर्मप्रवर्तनाच्या प्रवृत्तीनुसार पूर्णपणे वागायला पाहिजे. याशिवाय ते 'न्यू टेस्टॅमेंट'मधील तथ्यांवरही अंमल करू शकणार नाही. आर्चबिशपची आणि युरोपमध्ये राहणाऱ्या लोकांची काहीही जरी इच्छा असली तरी इथे धर्माच्या नावाने जे वर्तन केले जात आहे ते पूर्णपणे वेगळे आहे.

सत्याला वाहून घेतलेला माणूस म्हणून मी म्हणेन की हे पाहा ख्रिस्ती मिशनच्या संस्थांमध्ये काही फरक असेल तर तो केवळ प्रमाणाचाच असेल पद्धतीचा नाही. एकाच व्यासपीठावर उभे राहून वेगवेगळ्या ख्रिश्चन पंथाचे प्रतिनिधी हरिजनांना आपल्याकडे ओढण्याकरिता स्पर्धा करत असताना मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. माझी तर फार इच्छा आहे की याकडे लक्ष वेधले जावे. धर्मपरिवर्तनाच्या या आंदोलनाने आध्यात्मिक भूक शमवून आपल्याला बहुमान मिळवून देईल असे म्हणणे म्हणजे सत्याची चेष्टा करणे होईल. मला तर वाटते की ही प्रवृत्तीचे दोष दाखवण्याकरिता कडक शब्द वापरले पाहिजे.

महारांवर मजबूत पकड आहे. डॉ. आंबेडकरांचे अनुयायी महार आहेत. त्यांना या धर्मपरिवर्तनाच्या प्रवृत्तीची काही माहिती नाही.

मी ही गोष्ट सर्वांत उच्च स्तरावर नेऊन डॉ. मॉट यांना सांगितली आणि म्हणालो की, तुम्हाला जर हरिजनांचे धर्मपरिवर्तन करायचे असेल, तर सुरुवात माझ्यापासूनच का करत नाही? मी थोडा अधिक बुद्धिमान आहे आणि माझ्यावर कोणतेही दडपण आले तरी त्याचा परिणाम अधिक चांगल्या प्रकारे सहन करू शकतो. पण हे लोक मात्र जणू हाताला पक्षाघात झाल्यासारखे, परियांसारखे पुढे सरकतात. त्यांच्या डोळ्यांत मुळीच तेज नाही.

परियाचे वर्णन ऐकून रडू यावे अशा असे त्यांचे वर्णन त्यांनी केले आणि म्हणाले की हिंदू धर्मामध्ये राहिल्याने यांची अशी दशा झाली आहे. सुधारकांनी यांना कबर खोदून बाहेर काढले आहे.

मला सर्वात जास्त दुःख जे झाले ते यामुळे की यांनी इतक्या विचारपूर्वक केलेल्या भाषणाचेही मद्रासच्या बिशपने त्याचे खंडन केले आणि ते म्हणाले की हे तर त्यांचे स्वतःचेच कर्तव्य होते. डोर्नाकलच्या बिशपचे असे धार्ष्ट्य होते की अस्पृश्याना न कळणाऱ्या भाषेत त्यांनी पत्र पाठवले.

हॉज - हे तर भाषांतर आहे.

बापू - भाषांतर खूप वाईट आहे असे जर मला कोणी म्हणाले तर मला आनंद होईल.

मॅथ्यू - कल्पना करा की कोणी जर असे म्हणाला की हिंदू धर्मामुळे यांची अशी अवदशा झाली आहे, आणि यांचा उद्धार करण्याकरिता कोणी जर हात पुढे केला तर त्याला धार्ष्ट्य म्हणायचे काय?

बापू - नाही, मोठे आंदोलन जर सुरू असेल तर त्या वेळी धार्मिक प्रवृत्तीच्या माणसाने तर म्हणायला पाहिजे की चला यांच्या कामात मदत करू या. आरोग्यस्वामी म्हणतात की या आंदोलनाने अद्भुत काम केले आहे, परंतु यामागे राजकीय हेतू आहे. असे म्हणण्याकरिता त्यांच्याजवळ कोणताही आधार नाही. अगदी सुरुवातीपासून हे आंदोलन अराजकीय आहे.

मॅथ्यू - या आंदोलनाची मुळे लांबवर पसरलेली आहेत.

बापू - हो.

मॅथ्यू - धर्मपरिवर्तनाची चळवळसुद्धा समाजसुधारकांना सावध करून ठेवण्यापुरती आणि हरिजनांमध्ये हालचाल निर्माण करण्यापर्यंतसुद्धा पोहोचू शकलेली नाही ना?

बापू - या चळवळीतरिता ते अपेक्षेइतके जबाबदार होते असा माझा दावा नाही. समाजसुधारकांना धक्का लागून त्यांना कर्तव्याचे भान या चळवळीने करून दिले आहे इतके मात्र खरे. हे लोक चांगले काम करत आहेत. आणि यांची प्रशंसा होते आहे. आणि हे नको तशी नक्कलही करत आहेत.

मॅथ्यू - ते जसा युक्तीवाद करत आहेत तसे ते वागत नाहीत असे वाटते. तुम्ही साक्षरता आणि आजाऱ्यांची सुश्रूषा यासंबंधी बोलता. हे काम आम्ही सुरु ठेवायला नको काय?

बापू - हो, मी असे म्हणालो. तुम्ही हे काम सुरू राहू द्या. परंतु ज्यामुळे तुमच्याबद्दल शंका निर्माण होते आणि तुमचा धीर सुटतो ते काम सोडून द्या. चांगली शस्त्रक्रिया व्हावी म्हणून मी नडियाडला जावे, परंतु ख्रिश्चन डॉक्टरांच्या मनात खोलवर जे असते त्याकडे वळण्याच्या इच्छेशिवाय मी जात असतो. बायबलच्या वर्गात

आमची मुले जातात आणि नंतर त्याची चेष्टा करतात. या मिशनरी महाविद्यालयांसंबंधी घरात जी चर्चा चालते ती फारशी आल्हाददायक नसते.

याशिवाय हे मिशन सरकारच्या जुलमी कृत्याविरुद्ध बोलू शकत नाही. सरकारच्या हिंसेचा जर ते प्रतिकार करू लागले तर यांना इथून निघून जायची सूचना मिळते. यांची संस्था यांना मनातील बोलू देत नाही म्हणून यांना हिंदुस्थान सोडावा लागला होता. यात क्वेट्टाहून, टकर आणि फिशरसुद्धा होते. पोर्टा नोव्हात मेरिया पिटर्सन फार चांगली शाळा चालवत होती. ती आदर्श ख्रिश्चन होती. तीच्या संस्थेचे काम सुरू ठेवण्याकरिता मिशन पैसे देत होते. हिचे पटले नाही म्हणून ही डेनमार्कला गेली. आता  ती परत येऊ शकेल असे वाटत नाही. हिंदुस्थानात येण्याकरिता एल्विनला खुप लाजिरवाणी कबुली द्यावी लागली होती. आपले शब्द पाळणारा, कोणत्याही प्रकारे भ्रष्ट न होणारा हा माणूस आहे. असे असतानाही एल्विनच्या मागे पोलीस परत परत फिरत असतात.

हॉज - त्यांचे काम बिघडत नाही, त्यांचे क्षेत्र तर आहेच.

बापू - परंतु यांच्या आजूबाजूला भीषण शोषण सुरू असेल तर हे तोंडाला कुलुप कसे लावू शकतील? खऱ्या राजकारणात तर हे लोक पडतच नव्हते. आणि कुत्र्या मांजरीच्या भांडणांमध्येही हे भाग घेत नसत हे जरी खरे असले तरी आम्ही जेव्हा स्वातंत्र्यासाठी लढत होतो तेव्हा या लोकांनी सहकार्य करायला पाहिजे होते.

हॉज - जे समाजसेवक असतात त्यांच्याबद्दल पाद्र्यांचे कर्तव्य असते. परंतु जी संस्था यांच्याकरिता पायाभूत असेल तिच्याबद्दलच्या कर्तव्यात आणि या कर्तव्यात जर विरोध असेल तर यांनी काय करावे?

बापू - मी तर त्या संस्थांबद्दल बोलतो आहे ज्यांनी आपले जीवन येशूला वाहिलेले आहे. यांना जो स्पष्टपणे बोलण्याचा अधिकार आहे त्यावर त्यांनी टिकून राहायला पाहिजे.

हॉज - अडचण ही आहे की खरोखर कोणत्या अडचणी येतील हे कळतच नसते.

बापू - हिंदुस्थानींना स्वातंत्र्य मिळवण्याचा हक्क आहे इतके म्हणायचा तर त्यांना निश्चितच अधिकार होता. सध्या तर प्रच्छन्न पद्धतीने वटहुकुमाद्वारे राज्य चालले आहे. आज कोणीही बंगाली परवानगीचे पत्र असल्याशिवाय दार्जिलिंगला जाऊ शकत नाही. मी तुम्हांला सांगितले पाहिजे की माशी मारण्याकरिता

स्मिथच्या हातोड्याची आवश्यकता नाही. क्रांतिकारक फार कमी आहेत. पंजाबमध्ये हे लोक शंभरेक असतील, परंतु बंगालमध्ये नाहीत.

हॉज - पूर्ण स्वराज्याच्या पायावर आम्ही स्वतःहोऊन साम्राज्यात सामील व्हायला तयार आहो असे तुम्ही म्हणाला आहा हे खरे आहे काय?

बापू - हो, हिंदुस्थानला जर वेस्टमिन्स्टर स्टॅच्यूटच्या कायद्याखाली आणले गेले तर हिंदुस्थानचा फायदा होईल. मी एकटाच जरी असे बोलणारा हिंदुस्थानी असलो तरी मी याचा आग्रह धरेन. अशीच गोष्ट जेव्हा मी मांडली, तेव्हा ते म्हणाले की की वेस्टमिन्स्टर स्टॅच्यूटच्या कायद्याशी संबंधित बाबतीत माझ्याकडून काहीही भ्रष्ट केले जाणार नाही. आता 'डॉमिनियन स्टेटस' हा शब्द कोणी वापरू शकत नाही. अर्विनने हा शब्द उच्चारला असेल, परंतु लिटन म्हणाले की कानांत जरी वचन दिले तरीही अंतःकरणातून ते मोडून टाका.

मॅथ्यू - ही काय पद्धत आहे?

बापू - योगाचा व्यायाम मला माहीत नाही. माझ्या दाईने शिकवला तो व्यायाम मला माहीत आहे. ती म्हणाली की भूतप्रेत वगैरे काहीही नाही. परंतु भीती वाटत असेल तर रामनाम घे. लहानपणी मी हे शिकलो. त्यांचा आता एक महावृक्ष झाला आहे. हा असा एक सूर्य आहे की ज्याने  माझ्या अंतःकरणात खोलवर दडलेल्या काळोखाला प्रकाशात परिवर्तित केले. कोणी ख्रिश्चन म्हणत असेल की मी स्वतःला येशूच्या हवाली केले आहे तर या सर्व गोष्टींचा एकच परिणाम होईल. अर्थात परिस्थिती समान असेल तर. एवढे मात्र खरे आहे की हे रामनाम केवळ ओठांपासून नको. तो तुमच्या अस्तित्वाचा भाग असायला पाहिजे.

[?] - मनाला आणि आत्म्याला मदत करील असे तुम्ही काही विशेष वाचले आहे काय?

बापू - हो, मी 'गीता' वाचली आहे. आता आम्ही एका आठवड्यात पूर्ण 'गीता' वाचून होईल इथपर्यंत पोहोचलो आहो. गीतेतील दुसरा अध्याय प्रार्थनेत म्हणत असतो. थोडे ख्रिस्ती भजन म्हणत असतो. 'कुराण'मधील आयतीसुद्धा वाचत असतो. याचे कारण सर्वधर्मसमभावावर आमचा विश्वास आहे. 'तुलसीरामायण' वाचून मला सर्वाधिक मनःशाती मिळते. 'न्यू टेस्टॅमेंट' वाचूनसुद्धा मन शांत होते. याचे कारण यांच्याकडे मी टीकात्मक दृष्टीने पाहत नाही. माझ्या दृष्टीत हे ग्रंथ 'भग्वदगीता'इतकेच महत्त्वाचे आहेत. याचा अर्थ असा नाही की त्यातील मला सर्व काही रुचते. मग ते संत पोलमांचे गॉस्पेल असो की तुलसीदासचे

'रामायण' असो. 'गीता' तर आत्म्याच्या यात्रेचे वर्णन करत असते. बनियनच्या 'पिलिग्रिम्स प्रोग्रेस'मध्ये मला न आवडण्यासारखे काहीही नव्हते.

मॅथ्यू - खरे पाहता तुम्ही प्रॉटेस्टंटच आहा.

बापू - असे म्हणता खरे, परंतु मला स्वतःलाच मी खरोखर काय आहे आणि काय नाही हे माहीत नाही.

हॉज - सत्तेचे केंद्र तुम्हाला कुठे आढळले?

बापू - शासनाचे तर सोपे नाही. (छातीकडे बोट दाखवत) गीतेतील जर काही माझ्या गळी उतरत नसेल तर मी नाही म्हणेन? प्रत्येक धर्मशास्त्राबद्दल मी माझी विवेकबुद्धी वापरत असतो. गीतासुद्धा माझ्या बुद्धीच्या वर जाऊ शकत नाही. माझा विश्वास आहे की सर्व प्रमुख धर्मग्रंथ ईश्वरप्रेरित आहेत. आणि हे आपल्यापर्यंत दुहेरी चाळणीतून आलेले आहेत. आधी ते पैगंबराकडून आले. मग त्यांतील गूढार्थ समजावणारांकडून ते आले. आपल्यापैकी कोणालाही ईश्वराकडून आलेला संदेश सरळ मिळत नाही.

मॅथ्यू - हे मला मान्य आहे.

मॅथ्यू - माझा बायबलसुद्धा दैवी प्रेरणेतून आले आहे यावर जरी माझा विश्वास असला तरी तर्कशक्ती मी बाजूला ठेवत नाही. वेदातील सर्व ऋचा मला माहीत नाहीत. त्या लिहिण्यात आल्या होत्या तेव्हा कोणत्या अर्थाने लिहिण्यात आल्या होत्या हे कोणालाही माहीत नाही. परंतु 'शब्दांना बिलगून मृत्यू येत असतो.' त्यातील आशय आत्म्याला जीवन देत असतो. 'ईश्वराने हे जग सात दिवसात निर्मिले' . . . परंतु माझ्या भूमिकेबद्दल गैरसमज करून घेऊ नका. माझा श्रद्धेवरसुद्धा विश्वास आहे. आणि बुद्धीवरसुद्धा. जसे की ईश्वराचे अस्तित्व. लहान मुलगी ज्याप्रमाणे आम्ही सातच आहो असे म्हणते त्याचप्रमाणे ईश्वर आहेच असे मी म्हणेन.

२४ नोव्हेंबर १९३६

आर्चबिशपच्या भाषणाने माझे डोळे उघडले. 'हा जर धर्म असेल तर ईश्वर जगाला वाचवो.' त्यांच्या भाषणाबद्दल मला इतकेच म्हणायचे आहे.

ऍगाथा म्हणत असते "संमेलन बोलावा".

संमेलनाचा फायदा तर तेव्हाच होत असतो जेव्हा लोक ऐकून घ्यायला तयार असतात. लोक जर आपले हृदय वा मन घरी ठेवून येत असतील तल संमेलनाला काही अर्थ नसतो.

त्रावणकोरचा कायदा प्रार्थनेला उत्तरासारखा आहे, परंतु चमत्कार नाही.

प्रश्न - पूर्ण हृदयपरिवर्तन केव्हा होते?

रामस्वामींनी राजकीय हेतूने जरी हे पाऊल उचलले असेल तरी हे एक धार्मिक पाऊल आहे. हे सर्व जरी राजकीय वृत्तीने असतील तरी राजा, राणी आणि दिवाण यांच्यासमोर ईश्वर येऊन उभा राहिला असेल. यामुळे खूप उत्साह वाटण्यासारखी माझी मनःस्थिती नाही. मेहनतीबद्दल म्हणाल तर आम्ही फार कमी केले आहे. परंतु या निष्क्रिय युगात लहान गोष्टसुद्धा मोठी होत असते.

जेव्हा विलायत निःशस्त्रीकरणाच्या धोरणाचा अवलंब करील आणि अनेक विरोधाभासी घटक असूनही ही नीती स्वीकारली असल्याचे जाहीर करील तेव्हा मी तुमच्यासोबत आनंदाने नाचेन.

त्रावणकोर परत यांच्या चांगुलपणाच्या यादीत आले आहे.

# ४८. उपवास

कौटुंबिक कारणाकरिता तर उपवास करतच असतात. परंतु मजुरांच्या सार्वजनिक कारणाकारिता आणि तोही अनिश्चित कारणाकरिता मी उपवास केला होता. परंतु मला एक उपवास आठवतो: मी आफ्रिकेच्या तुरुंगातून शेवटच्या वेळी जेव्हा बाहेर पडलो तेव्हा मला कळले की ठीकठिकाणी मजुरांनी संप सुरू केला होता. हे काम मजुरांकरिता सुरू करण्यात आले होते. इसीपिगो, वेरुलम इथेसुद्धा संप पुकारण्यात आला होता. इसीपिगोमध्ये गोळीबारसुद्धा झाला होता. आदिवासी जसे शिकार खेळतात तसे ते शिकार करत होते.

तुरुंगातून निघताच मला ही बातमी कळली आणि मला धक्काच बसला. यामुळे मी तीन गोष्टींचा निश्चय केला.

१. मजूरासारखा पोषाख करायचा म्हणजे - लुंगी, उघडे डोके आणि

२. अनवाणी चालायचे.

३. एकदाच जेवायचे. जोपर्यंत तीन पौंडाचा कर निघत नाही तोपर्यंत. ४५ रुपये एवढा कर एक माणूस कसा देईल?

यानंतर तडजोड झाली.

असा उपवास मी का केला ते मला माहीत नाही. आणि ईश्वरावर ज्यांची श्रद्धा आहे ते निश्चितच म्हणतील की या गोष्टीचा तडजोडीत भाग होता. आमच्यामध्ये आत्मशुद्धी, समाजशुद्धी आणि 'निर्बल के बल राम' हाच भाव होता. प्रार्थनेचा अर्थ जडवाद की गोड शब्दांनी गाणे? की कुराण सुंदर पद्धतीने वाचणे?

शरीराला मारायचे असेल, इंद्रियांना नियंत्रणात आणायचे असेल तर उपवास हाच उपाय आहे. खरा उपवास अंतःकरणाचा असतो.(निराहारस्य देहिनः). उपवासात तर मजा यायला पाहिजे. माणूस निस्तेज वाटायला नको. अनेक विकार असलेले, कुदृष्टी असणारे उपवास करण्यासाबंधी बोलत असतात. मी त्यांना म्हणत असतो अंतःकरणाचा उपवास करा. उपवासाशी अंतःकरणाचा संबंध असायलाच पाहिजे.

मजुरांनी २१ दिवस संप केला होता. या लोकांनी एक प्रतिज्ञा घेतली होती. ना कोणाला शिवी दिली, ना दगड फेकले, ना कोणाला त्रास दिला. माझ्याशी लढणारे अंबालाल साराभाई होते. ते पंचाचे (लवादाचे) तत्त्व मान्य करत नव्हते.

एकदा असे वाटले की मजुरांचा धीर सुटतो आहे. ईश्वरावर माझा शब्दशः विश्वास होता. तडजड होईल वा मरण पत्करायचे याकरिता उपवास केला होता. मजूर तर गहिवरून आले. रडले. मी त्यांना म्हणालो - या उपवासात एक दोष आहे. आपण ज्यांच्याशी लढतो आहो त्यांच्यासमोर उपवास करायला नको. धरणे धरण्याचे काहीही जरी झाले तरी ती हिंसाच असेल. व्हाईसराय एकदा म्हणाले होते, “करा नाही तर मरा” हा बलात्कार आहे. परंतु उपवास करून कोणाला दारू सोडायला लावणे ही चांगली गोष्ट आहे. मजुरांकरिता असे करणे अपरिहार्य होते. हे सर्व आठवले की मी काही तरी चूक करतो आहे असे मला वाटत नाही.

नंतर रेल्वेमार्गावरील फळ्या काढणे, लष्कराला येण्यापासून अडवणे असा कार्यक्रम सुरू झाला. एका सैनिकाला अमदाबादमध्ये मारले. विरमगावमध्ये एका माणसाला जिवंत जाळले. या सर्वांकरिता मी स्वतःला जबाबदार समजत होतो. अमदाबादला पोहोचलो तेव्हा मार्शल लॉ सुरू होता. मी पोहोचलो, आयुक्तांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्यासमोर मी माझी चूक कबूल केली आणि सभेत जाऊन तीन दिवसांचा उपवास जाहीर केला. आणि लोकांनाही उपवास करायला लावला.

अशा प्रकारे हा उपवास आत्मशुद्धी आणि लोकांच्या हृदय हेलावून सोडण्याकरिता होता. हा काही मुलांचा खेळ नव्हता. एक गोष्ट करायची आणि नंतर ती मागे घ्यायची असे सार्वजनिक जीवनात चालत नाही हे समजावून सांगण्याचा उद्देश होता.

शिवाय प्रायश्चित्त म्हणूनही उपवास करत असतात, जसा लालनाथकरिता उपवास केला होता. त्याचासुद्धा लोकांवर बराच परिणाम झाला होता, उपवास करणाराचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास असतो. जेव्हा त्याच्याकडून काही होत नाही तेव्हा मदत करणारा ईश्वरच असतो. अंतःकरणाची शुद्धी आणि लोकशुद्धीकरिता उपवास असतो. परंतु ज्याने शिलारस घेतलेला असतो त्याचा अहंकार गेलेला असतो.

उपवासामुळे अहंकारी होण्याऐवजी नम्रता आणि सात्विकता यायला पाहिजे. दगड फोडण्याकरिता पर्वत आणू नका. असे मी म्हणालो, परंतु याचा असा अर्थ करू नये की प्रत्येकाने वाटेल तेव्हा उपवास केला पाहिजे. याकरिता माणसाने तपश्चर्या केलेली असली पाहिजे, त्याची ईश्वरावर श्रद्धा असली पाहिजे. रामचंद्र शर्मांनी अशा मूर्खपणाबद्दल बरेच काही सांगितले आहे. अशाच प्रकारे मिश्रीलालजींनी हृदयपरिवर्तनासाठी असाच विचार मांडला आहे. हृदयपरिवर्तनाचे मोजमाप कसे करायचे? यामुळे आजकाल उपवासाचा जो प्रवाह सुरू आहे त्याच्याही मी विरोधात आहे. उपवास फार जबरदस्त गोष्ट आहे. याचा संबंध सरळ अंतःकरणाशी

नसेल तर हा उपवास एखाद्या खड्ड्याप्रमाणे बेकार असतो. यामुळे मी कोणालाही उपवास करण्याकरिता उत्तेजन देत नसतो.

ज्यांच्यात अंतःकरण शुद्ध करण्याइतका विवेक नाही ते उपवास कसा करू शकतात? उपवास ही आगळीवेगळी गोष्ट आहे.

हं, डोके दुखत असेल, पोट दुखत असेल कॅन्सर झाला असेल तर अवश्य उपवास करा.

# ४९. धर्माचे कुंपण आणि त्यांचे वर्णन

२७-११-१९३६

अखेरीस संयुक्त कुटुंब ही स्वार्थी व्यवस्थासुद्धा असू शकते. हिंदू धर्माचा पाया साम्यवाद आहे. हे तत्त्व कळत नसतानाही करोडो लोक या तत्त्वानुसार जीवन जगत आहेत, वर्तनात त्याचे पालन करत आहेत. हिंदू धर्माची चाबी म्हणाल तर त्याग करून भोग घेणे आहे. मार्क्सच्या आर्थिक सिद्धांतामुळे नाही तर ईशावास्य उपनिषदात सांगितलेल्या महान तत्त्वामुळे आहे. या जगात जे काही आहे ते, अगदी प्रत्येक कण, प्रत्येक अणू, विश्व आणि आकाशगगेच्या काळ्या विवराच्या पलीकडील विश्वातही या सर्वात ईश्वराचा वास आहे. तुम्ही तुमच्या पत्नीच्या (पतीत्वाचा त्याग) त्याग करून तिला आपलीशी करू शकता.

कोणी दुसऱ्याचे घेत नाही. 'मा गृधः कस्यजित् धनम्'. कोणीही इतरांचे वाईट इच्छिणार नाही. कारण हिंदुधर्म साम्यवादच आहे. सर्व काही हरवले, गमावले आणि हे एकच पद पवित्र, अमूल्य रत्नाप्रमाणे जपून ठेवले तर मला तर आनंदच होईल. गीता तर केवळ भाष्य आहे.

रशियात साम्यवाद आहे याचे मला हसू येते. हे निर्जीव सूत्र नाही. करोडो लोक याचे अनुसरण करत असतात. आपल्या संस्कृतीची ही दुर्बलताही आहे आणि त्याचबरोबर प्रतिकार करता येणार नाही अशी अशी ही हिंदू धर्माची शक्तीही आहे.

आपला मध्यमवर्ग सर्वसामान्य जनतेच्या पाठीवर स्वार झालेला आहे. यामुळे मी यांना सांगत असतो की तुम्ही इतरांशी एकरूप व्हा. साध्या तर्काची गोष्ट आहे की जर अस्पृश्यता टिकून राहिली तर हिंदुस्थान मृतप्राय होईल.

यामुळे हे सज्जन जेव्हा केव्हा येतात तेव्हा यांना ही गोष्ट परत परत सांगावी लाiत असते. या लोकांना माझ्याकडून गहू मिळाला नसेल, परंतु वा तो मिळवण्याचा यांचा हेतू असावा त्यात हे यशस्वी झाले नसावे. इथेच माझी अहिंसा काम करत असल्याचे तुम्हांला दिसू शकेल.

एक रुपया द्या आणि तुम्ही पाच रुपयांवर नियंत्रण मिळवा.

संस्था त्यांच्या हाती द्या.

शिपाई ढवळाढवळ करू शकत नाही. गोळी लागून मरून जाण्याची भीती वाटते.

*  *  *

मी हिंदू का आहे? कारण मी 'ख्रिश्चन' झालो होतो. आज किती तरी ख्रिश्चन तरुण आहेत. या लोकांचा विश्वास आहे की ख्रिश्चन धर्म स्वीकारून हिंदू धर्माला आपण जो विरोध केला तो गुन्हा होता असे आता त्यांना वाटते. जसे की येसुदास.

तुम्ही वर्णन केलेल्या चिठ्ठ्या, उद्धृत केलेले लेख बाजूला ठेवू? तात्त्विक सिद्धांताच्या दृष्टीने इतके खरे आहे की जीवन विविध आकारात - साप, विंचू, गाय, म्हैस, माणूस यांच्यात असे काही नाही की जे इतर जीवांमध्ये नाही. आणि जे सर्वत्र आहे, ज्याचे अस्तित्वच नाही, त्याचेही 'माणूस' मोजमाप करतो. आपण नावे नसलेल्यांना नाव देत असतो — जसे की विषारी साप. 'मानवजात' हे आपण सोयीकरिता केलेले वर्णन आहे. आपण या शब्दाला प्रादेशिक नाव देतो. आपण यांना आपल्या मान्यतेनुसार ओळखतो — जसे ख्रिश्चन — आणि मग त्यांच्यातील लहान-लहान कुंपणांना नावांनी संबोधतो. असेच काळाच्या अंतापर्यंत चालत राहील. 'मी मानवजातीचा मालक आहे' किंवा 'मी जगाचा रहिवासी आहे' असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा त्याला काही अर्थ नसतो. अशाने त्यांना अनुयायी मिळणार नाहीत असा जो दावा ते करतात ते ब्रह्मसत्य आहे.  जग माया आहे असे आपण म्हणत असतो. याचा अर्थ जग हे गुणधर्म असलेले नाव आहे. आपल्याला परत याला दुसरे नाव का द्यावे लागते? अथवा आज जगाचे जसे वर्णन करतो त्यानुसार त्याला वेगळे नाव द्यावे लागेल. सापाशी मैत्री कशी करावी हे मात्र आपल्याला समजून घ्यावे लागेल. मी तर म्हणेन की माहितीपत्र आणि लेख हे सर्व एकच आहेत. सर्व वर्ण एक आहेत, सर्व धर्म एक आहेत असे जर लोकांना मान्य करायला सांगितले तर तो प्रयत्न वाया जाणार नाही. यामुळे सर्व लोक जर एकच धर्म स्वीकारतील तर दुसरे काही साध्य करणे अशक्य होईल. धर्माचे वेगवेगळे नाव आणि प्रकार आहेत. तसे त्यांचे वर्णनही आहे. परंतु हे सर्व सारखेच आहेत. आपल्यामध्ये जर वैरभाव नसेल तर मी एक दिवस शिवालयात, दुसऱ्या दिवशी मशिदीत आणि तिसऱ्या दिवशी चर्चमध्ये जाणे सुरू करीन.

प्रश्न - सर्प तर सर्पामध्ये जे गुण आहेत तेच गुण असलेला प्राणी असू शकतो. तो आपली घडण बदलू शकत नाही. आपण राक्षस व्हावे की संत यासंबंधात माणसाला स्वातंत्र्य आहे. त्याचे मन उदात्ताहून उदात्त गोष्टीपासून तर हास्यास्पद गोष्टीपर्यंत कशातही रमू शकते. प्रत्येक धार्मिक संस्था आपले धोरण ठरवत असते,

आणि कोणते दार उघडे आहे याचा शोध घेत ते फिरत असतात. मी जेव्हा म्हणतो की मी हिंदू आहे तेव्हा माझ्या सभोवती मी एक रेषा ओढत असतो. श्रीलंकेतील जाफना येथे मोठे शिवमंदिर आहे. ते आमचे आहे असे नंतर आपल्याला वाटू लागते. माझे आजोबा ख्रिश्चन शळेत शिकले होते. यामुळे त्यांना जातीबाहेर काढण्यात आले होते. माझ्या काकांची सर्व मुले आम्हांला हसायची आणि अस्पृश्य समजायची.

उत्तर - याचा अर्थ काय करायचा? नाव दिल्याने काही नुकसान झाले काय? नाही, नाव दिले याचा अर्थ काय करावा यावर सर्व काही आधारलेले असेल. तुम्ही म्हणू शकता की नाव काढून टाका. नातीजातीचे नामाभिधान काढून टाकल्याने हिंदू चांगली माणसे झाली काय? तुम्ही लोक जे नातीजातीचे कुंपण तोडायला शिकवत आहा त्या गोष्टीत तुम्ही यशस्वी होणार नाही. मी असे म्हणायचा प्रयत्न करतो आहे की या विशेष गोष्टीवर जोपर्यंत विश्व टिकलेले आहे तोपर्यंत हे वर्गीकरण राहणारच आहे. शिक्षक, वकील, डॉक्टर असे विभाग व्यक्तींमध्ये नाहीत काय? एके दिवशी ते समोरासमोर गोळा झाले तर वर्गीकरणामुळे झालेल्या विभाजनामुळे तुकड्या तुकड्यातसुद्धा याचे वर्णन करता येणार नाही. यामुळे भेदभाव दूर करायला हवे. यामुळे काही उपद्रव होत असेल तर तो स्वभावात असल्यामुळेच झाला असे म्हणावे लागेल. सापाला विशेष नामाभिधान दिले म्हणून नाही, भेदभावाचा स्रोत आपल्या अंतःकरणात आहे म्हणून. आपण तर नाग आणि अंध चाकर यांच्यातही भेद करू शकत नाही. नाव देऊन आपण एखाद्याला ओळखतो तेव्हा त्यात क्वचितच काही अडचण येत असते. तसेच हे. आपल्या मनात हे जे संबंध जोडले गेले आहेत ते बदलायला पाहिजे.

याबद्दल तुम्ही म्हणाल की त्यात एक सुधारणा करा. सर्पांचासुद्धा स्वभाव बदलत असतो. मानवतेचा स्पर्श झाला, निर्भयता असली तर याचे उत्तर मिळेल. ॲन्ड्रोक्लिस आणि सिंहाची गोष्ट. कुत्री समंजसपणात किती पुढे जाऊ शकतात आणि किती नाही ते आपल्याला अजून पूर्णपणे कळू शकलेले नाही. (झवेरभाईंच्या गायीचे उदाहरण.)

प्रश्न - नामाभिधानाबद्दल माझा मुळीच वाद नाही. आजकाल यांचा जो अर्थ आहे तो पूर्णपणे लुप्त होऊन गेला आहे. ज्याप्रमाणे पूर्वी स्वतःला जे उदारमतवादी पुढारी म्हणवत होते त्याप्रमाणे. आज ख्रिश्चन म्हणून नाही तर गांधीवादी म्हणून कोणी ओळखले तर मला आवडेल. तर मग तुम्ही नवीन वर्गीकरण मान्य कराल काय?

उत्तर - यामुळे अजूनच त्रासदायक गोंधळ होईल. मी तर म्हणेन की आपण नामाभिदानाला जो अर्थ दिला आहे त्यात नवीन अर्थसूचकता आणली पाहिजे. ख्रिश्चनधर्म काही काही नवीन सिद्धांताची वा विश्वासाची संहिता नाही. ही दृष्टी मला अधिक स्वाभाविक वाटते. तुम्ही म्हणता की 'गांधीजींच्या' शब्दांचा अर्थ आम्हांला आज कळू शकला. परंतु वाट पाहून विचार केला तर हे शब्द उच्चारताल त्यांचा वाईट वास येतो.

यामुळे उपनिषदांचा पहिला श्लोक हा हिंदू धर्माच्या मूलतत्त्वाचा / श्रद्धावाक्याचा सार आहे.

हिंदुधर्म, इस्लाम, ख्रिस्तीधर्म यांच्याकरिता आम्ही सर्वांनी काही कारणाकरिता रक्ताच्या नद्या वाहवल्या आहेत. इस्लाम, ख्रिश्चन धर्म हे नामाभिदान कसे बदलवाल? माहिती जर करून घेतली तर नामाभधिधानाच्या मुळात काही वाईट नाही. परंतु यांचा आपण अनर्थ करतो तेव्हा नुकसान होऊ शकते.

# ५०. कुमारी वुडसोल यांना दिलेली मुलाखत

**१-१२-१९३६**

प्रश्न - पश्चिमेतील ख्रिस्ती सेवक हिंदुस्थानात काम करून आपला वाटा उचलत आहेत याचे काही कारण दिसते काय?

उत्तर - ज्या प्रकारे ते काम करत आहेत ते पाहता त्यांना हिंदुस्थानात कोणतेही स्थान नाही. यांना कल्पनाही नसेल की ते स्वतःला आणि आम्हांलाही नुकसान पोहोचवत आहेत. ते स्वतःचीही हानी करत आहेत हे विधान धार्ष्ट्याचे होईल. परंतु ते आमची कुसेवा करत आहेत असे म्हणणे तर भागच आहे. ज्या लोकांमध्ये ते काम करत आहेत आणि ज्यांच्यात ते काम करत नाहीत त्या सर्वांचे ते नुकसान करत आहे. तुम्ही ख्रिश्चन धर्माचा प्रसार करत आहा असे तुम्हांला वाटत असले तरी मला मात्र असे वाटते की अशा प्रकारे येशूचा संदेश चोहोकडे पसरवता येऊ शकत नाही. तुमच्या कामाचा मी जसजसा अभ्यास करतो तसतसे मला दुःख होत जाते. हे लोक बुद्धिमान आहेत, पुढे गेलेले आहेत. यांच्या चांगल्या हेतूबद्दल प्रश्न विचारायला नको. ते स्वतःला खूप संस्कारी समजतात. परंतु त्यांचा धर्माबद्दल फार मोठा गैरसमज आहे.

मानवकुटुंबात घडलेली ही फार करुण घटना आहे.

प्रश्न - त्यांचा दृष्टिकोन बदलेल अशा परिस्थितीची तुम्ही काही कल्पना करू शकता काय?

उत्तर - तुमच्या काही शक्तीबद्दल कोणीही शंका घेऊ शकत नाही. हिंदुस्थानच्या सेवेत तुम्ही ही सर्व शक्ती खर्च करता आहा. हिंदुस्थानलासुद्धा या सेवेचे महत्त्व माहीत आहे. याबद्दल तर कोणाच्याही मनात शंका नाही. शिक्षण द्यायचे असेल तर ते हिंदुस्थानी पद्धतीने द्या. हिंदुस्थानात येता तर शिकण्याकरिता, अभ्यासकरण्याकरिता या. आमच्या संस्थांना, व्यवस्थेला समजून घ्या. तुमच्या आजूबाजूला जे सुरू आहे त्यावर कोणताही पडदा टाकलेला नाही. तुमच्या संस्था पाश्चात्य पद्धतीच्या असतात आणि त्यांत किंचितसा जरी फरक पडला असेल तर तो अज्ञानाच्या कारणाने.

मी जे सांगतो आहे त्यात नकळत अतिशयोक्ती असू शकते. मी पाद्र्यांच्या महाविद्यालयात शिकलेलो नाही. लहान असताना मी पाद्र्याचे एकमेव भाषण ऐकले होते आणि त्यामुळे मला घृणा वाटली होती. हिंदू धर्मातील ते प्रत्येक गोष्टीची निंदा करत होते. त्यांच्या खाण्यापिण्याची पण चेष्टा करत होते. ते म्हणतात की

प्रमाणात घेतली तर दारूमुळे नुकसान होत नाही. परंतु दारूच्या पेल्याची गोष्ट काढळी की हसू येते. काही पाद्र्यी दारू घेत नाहीत, परंतु बरेच लोक घेतात. आपण अल्पप्रमाणात घेतो असे म्हणणारे पाद्री मला माहीत आहेत.

हिंदुस्थानने ठेवलेल्या अटी मान्य करून जर पश्चिमेतील पाद्री आले तर देशाला ज्याची गरज आहे त्याची परिपूर्ती होईल. काही श्रीमंत अमेरिकी माझ्याकडे आले आणि 'आम्ही कोणती सेवा करू शकतो?' असे ते मला विचारू लागले.

तुमचा पैसा घेऊन या असे मी त्यांना म्हणेन अशी त्यांना अपेक्षा होती. परंतु मी त्यांना म्हणालो की आमच्यासमोर तुम्ही जर संपत्तीचे भांडार ठेवाल तर आम्ही भिकारी होऊ आणि देशाचा आणि आमचाही आत्मविश्वास हरवला जाईल. तुम्ही तुमचे वैज्ञानिक कौशल्य आम्हांला द्या इतकेच मी विनंती करीन. तुमच्या अभियंत्यांची आणि कृषीविशेषज्ञांची सेवा आम्हांला देऊ शकता, तुम्ही आमचे मालक होऊन राहणे आवश्यक नाही. तुम्ही स्वैच्छिक स्वयंसेवक म्हणून इथे या. पगारी नोकर तर कोणत्याही दिवशी नोकरी सोडू शकतो परंतु स्वेच्छेने आलेला माणूस परत जाऊ शकत नाही. असे लोक आले तर ते जितके जास्त येतील तितके चांगले. अधिकस्य अधिक फलम.

जसे की (मॉरीस) फ्राईडमन. यांनी अवजारे बनवून देण्याचे वचन दिले आहे. कोणतेहीअवजार वापरायचे असेल तर ते त्याच ठिकाणी तयार केले पाहिजे. (अवजारांचा इतिहास) असे वर्तन करणारे अभियंते हिंदुस्थानात आले तर ते आमच्या अवजारांचा अभ्यास करतील आणि त्यात काय सुधारणा केल्या पाहिजे हे सुचवील तर ती आमची किती मोठी सेवा होईल.

तुम्ही जर हे काम धर्मभावनेने कराल तर तुम्ही इथे येशूचा संदेश पोहोचवाल. बायबलमध्ये जॉनच्या नावाने केलेल्या लेखनात जी श्रद्धा आहे त्या श्रद्धेचा उच्चार न करता तुम्ही हे काम करू शकता.

प्रश्न - जगात आध्यात्मिक वृत्तीची आवश्यकता आहे काय?

उत्तर - धर्मप्रचारकाच्या वृत्तीसारखी नाही.

प्रश्न - ख्रिश्चनांची संख्या वाढत गेली तर त्याचा काय परिणाम होईल?

उत्तर - तर हिरिजनांमधील अंतर्गत भांडणे वाढतील. हिंदू आणि मुसलमान अंधारात सुरा भोसकण्याचे काम करतात त्याप्रमाणे. आजपेक्षा अनेक पटींनी पाशवी हिंसा वाढेल. धर्माच्या उन्मादात खोट्या भावनेसह वादळी तत्त्व परत घोंघावू लागतील. कोणाला मारून टाकायचे आणि मारता मारता मेलो तर स्वर्गात जाईन अशा भावनेने लोक परत भारले जातील. असे नाही की प्रत्येक हरिजन असंतुष्ट आहे. समाधानी राहण्याची कला अजून ज्यांना कळलेली नाही असे पन्नास टक्के असतील. सेगावमध्ये एकूण जनसंख्येत पन्नास टक्के हरिजन आहेत. कल्पना करा की दहा हरिजनांना तुम्ही ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली आणि त्यांच्याकरिता एक चर्च बांधले. अशा अवस्थेत वडील आणि मुलामध्येही शत्रुत्व निर्माण होईल. आणि याच्या समर्थनार्थ तुम्ही बायबलमधील एखादे वचनही शोधून काढाल. हे तर ख्रिश्चन धर्माचे एक व्यंगचित्रच असेल.

आंबेडकर तर पुढारी आहे आणि त्यांच्यात असामान्य शक्ती आहे. ते म्हणतात की मला माझे जीवनकार्य पूर्ण करायचे आहे. त्यासंबंधीच ते विचार करत आहेत. त्यांच्यामागे जर बरेच लोक गेले तर परिणामी फार भयंकर संकट निर्माण होईल. आज असे काहीही होऊन राहिलेले नाही. ख्रिश्चन मिशनरी सोसायटीच्या वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या भयानक असतील, जर लाखो, करोडो लोकांनी धर्मांतर केले आहे असे जरी म्हटले तरी त्याचे काय? बिशप पिकेटचा जाहीरनामासुद्धा अतिशयोक्तीने भरलेला आहे. ते म्हणतात की उच्च वर्णाच्या शेकडो लोकांना धर्मांतर करायची इच्छा आहे.

करोडो लोक धर्मांतर करण्याकरिता उत्सुक आहेत याचा काय पुरावा आहे हे मी जाणून घेऊ इच्छितो. येशूचा संदेश ४५ लाख लोकांनी स्वीकारला आहे आणि बिशप पिकेटच्या म्हणण्याप्रमाणे ९० लाख लोकांनी तेलगू प्रदेशात ख्रिश्चन धर्माचा अंगिकार केला आहे.

प्रश्न - विज्ञानाच्या सिद्धीच्या क्षेत्रात काम करण्याचा हिंदुस्थानच्या विकासात कितपत वाटा आहे?

पूर्व आणि पश्चिमेच्या संबंधाच्या दृष्टीने तुम्हांला धर्मप्रचार अस्थानी वाटतो काय?

उत्तर - इतके निश्चितच म्हणेन की - यासंबंधात मनाची थोडी कुतरओढ होते. माझे मात्र एवढ्याने समाधान होत नाही. वस्तुस्थिती म्हणून मी हेसुद्धा मान्य करतो. एखादी गोष्ट जर नैसर्गिक असेल तर तिच्या संबंधात असे नाही, असे पाहिजे होते असे म्हणणे व्यर्थ असते. गुरुत्वाकर्षण शक्ती आहे, परंतु ती नाही असे म्हणणे व्यर्थ असते. मी हे सहन करू शकत नाही, उलट मला गुरुत्वाकर्षण शक्ती मान्य करावी लागेल. तुम्हांला जेव्हा असे वाटेल की तुम्हांला 'बायबल'च्या विशिष्ट व्याख्येप्रमाणे जर मनःशांती मिळते तर तुम्ही ते

लोकांना सांगू शकता. परंतु तुमच्या अनुभवाची शाब्दिक अभिव्यक्ती करणे आवश्यक नाही. तुम्ही कशा प्रकारे जीवन जगता यातून तुमच्या जीवनाची संपूर्ण अभिव्यक्ती होत असते, तुम्ही उच्चारलेल्या शब्दांमधून नाही. जीवनाचाच सर्वाधिक प्रभाव पडत असतो. भाषेला तुर तुमच्या विचारांनासुद्धा पूर्णपणे अभिव्यक्त करता येत नाही. श्रद्धापूर्वक बायबल वाचण्याऱ्या माणसाला बायबल कसे वाचावे हे शिकवता येईल काय? तुम्हांला जो प्रकाळ दिसतो तो तुम्ही इतरांच्या मनात कसा रुजवू शकाल?

प्रश्न - परंतु माणूस नम्रपणे असे म्हणू शकत नाही काय की - माझ्या धर्माच्या उच्चतम आदर्शापर्यंत माझे जीवन पोहचू शकत नाही हे खरे आहे. परंतु माझा आदर्श कायआहे हे मी तुम्हांला सांगू इच्छितो.

उत्तर - मी जास्तीत जास्त इतकेच म्हणेन की जीवन किती तरी उच्च पातळीवर जाऊ शकते. तुम्ही जेव्हा म्हणता की जितके आयुष्य आहे तितकेत पुरत नाही तेव्हाच तुम्ही नम्रपणाचा त्याग करत असता. जनावराजवळ जाऊऩ मी माणूस आहे असे सांगायची माणसाला आवश्यकता नसते. हे तर अनेकपटींनी खरे आहे. आत्म्याची भाषा शब्दांमधून व्यक्त करता येऊ शकत नाही. ही शरीराच्या वरील स्तरावरून निघून जात असते. भाषा सत्याला सीमीत करत असते, जीवनच सत्याची अभिव्यक्ती करू शकते कारण सत्याची प्रचिती जीवन जगतानाच येत असते.

प्रश्न - येत्या पिढीला अनुभवाचा वारसा कशा प्रकारे देता येईल?

उत्तर - वाचाशक्तीच्या अभिव्यक्तीला इथे स्थान नाही. जीव ही एक अभिव्यक्तीच आहे. गुलाबाचा सुगंध आपोापच पसरत असतो. त्याकरिता ना तर त्याचा प्रचार कराव लागतो ना पुस्तक लिहावे लागते, ना उपदेश करावा लागतो. त्याचे सौंदर्यच वाक्पटुत्वाची गरज संपवतो परंतु गुलाबाच्या सौंदर्यापेक्षा आध्यात्मिक जीवन किती तरी श्रेष्ठ आहे. माझा तर दावा आहे की जीवनात आध्यात्मिक अभिव्यक्ती आली की की वातावरणात आपोआपच प्रतिध्वनित होत असते. बायबल, गीता, भागवत यामध्ये असेच लिहिलेले आहे. 'जेव्हा जेव्हा कृष्णाचे दर्शन होते तेव्हा तेव्हा लोकांमध्ये दैवी संचार झाल्यासारखे लोक वागत असतात.'

लोकांना माहीत नाही की जवाहरलाल नेहरू आलेले आहेत, परंतु लोक जादुई प्रभाव पडल्यासारखे वागत आहेत. असाच सूक्ष्म परिणाम पसरत असतो. यात आध्यात्मिक काहीही नाही. त्यांना मात्र जवाहरला पाहिल्यासारखेच वाटते. लाखो लोक असे आहेत की जे वेगळ्या प्रकारे वागूच शकत नाहीत. आध्यात्मिक जीवन मार्कोनीच्या बिनतारी सॅदेशापेक्षाही अधिक संवेदनशील असते. थिऑसॉफिस्ट अध्यात्माबद्दल

बोलतात खरे, परंतु ते त्या अर्थाने बोलत नसतात. माझ्यात आणि माझ्या ईश्वरामध्ये कोणीही मध्यस्थी करणारा नसतानाही मी त्याची अशी घागर होईन की त्याचे सर्व गुण मी त्यात गोळा करून ठेवू शकेन. त्या वेळी गंगेप्रमाणे ते पाणीही इकडे तिकडे ढवळत राहील. यामुळे अशा परिस्थितीत मी नम्रपणाची भाषा वापरू शकत नाही. जेव्हा तुम्ही सत्यमय जीवन व्यतीत करता तेव्हा तुम्हाला बोलायची इच्छा राहत नाही. सत्य तर फारच मितभाषी असते.

प्रश्न - असे जीवन जगून दाखवण्याशिवाय धर्मप्रचाराचा दुसरा मार्ग नाही हे खरे आहे काय?

बापू - कोणी असे विचारले तर तुम्हांला बोलावे लागेल हे खरे आहे. तुम्ही तुमचे शब्द पूर्ण विचार करून वापरायला पाहिजे. परंतु तरीही तुम्ही म्हणाल की माझी अभिव्यक्ती अर्धवट आहे. तुम्ही माझे जीवन पाहू शकत नाही काय?

परंतु असा माणूस सत्यशोधक असतो. लोक त्याच्याकडे स्वाभाविकपणे आकर्षिले जातात आणि मग तो त्यांच्याशी बोलतो. जगात त्याची ख्याती इतकी काही पसरते की जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक त्याला पाहायला येतात. महर्षी अरविंद वर्षातून केवळ दोनदा बाल्कनीत येऊन उभे राहतात. कधीही बोलत नाहीत.

जानकीदास पत्रात लिहितात, 'जगातील अनेक भागातून लोक आले होते.' यांना संपूर्ण सत्याचा शोध लागला होता असे आपण म्हणतो कारण सर्व जग त्यांच्याकडे आकर्षित झाले होते.

रोग्याचा वास येतो. तोसुद्धा लोकांमध्ये खोलवर पसरत असतो.

प्रश्न - तुम्हाला असे काही चिन्ह दिसले आहे काय की ज्यांना अशा उच्चतम जीवनाची सूचना मिळालेली असते ते लोक एकत्रित येतात?

उत्तर - हो, परंतु अशा संस्थांद्वारे नाही. संस्था तर प्रगती अवरुद्ध करत असतात.

इतर प्रकारचे आंदोलन भयग्रस्त आहे. इथेच तुम्हांला अंतर दिसेल. आत्मीयता स्थापित होण्याकरिता यांत्रिक साधने बेकार आहेत अशी माझी मान्यता नाही. अशा संस्था लोकांना प्रशिक्षत करण्याकरिता उपयोगी पडत असतात.

मी सेगावमध्ये येऊन का राहिलो? माझा संदेश जर संपूर्ण जगात पसरवायचा असेल तर त्याआधी तो हिंदुस्थानच्या जनमानसात पोहोचला पाहिजे. मगच तो संपूर्ण जगात पोहोचण्याची शक्यता आहे.

एका ठिकाणी गाडून घेऊन राहण्याची माझ्यात शक्ती नाही. मी इतका काही स्वाभाविकपणे वागणारा माणूस आहे की मी एखाद्या दिशेने एकदोन पाऊल टाकल्यानंतर मला जर जे ते योग्य दिशेने आहेत असे वाटले तरच मी पुढील पाऊल टाकतो. यानंतर काहीही झाले तरी मी त्याची फिकीर करत नाही. कळू शकेल अशा प्रकारे बोलायचे तर 'मी लोकांना भेटणार नाही' असे म्हणायची माझ्यात हिंमत नाही.

हाफमेयरची भेट घेण्याकरिता मी कोणतीही विशेष मेहनत केली नव्हती. असे करण्याचे कारण मी अहंकारी होतो असे नाही. माझ्याबद्दल ते सार्वजनिक ठिकाणीसुद्धा फार चांगले बोलायचे. मरंतु मी त्याबद्दल काहीही बोललो नाही. हे ते समजू शकत होते. शब्दांची आणि वर्तनाची अशी मितव्ययिता दाखवण्याचेही एक मूल्य असते. परंतु ही गोष्ट स्वाभाविक असली पाहिजे.

# ५१. सरकारशी सहकार्य

प्रश्न -

परिस्थितीचे आकलन

सर्वमान्य ध्येय साध्य करता यावे म्हणून ज्यांच्याशी सहकार्य करता येणे शक्य असेल त्यांच्याशी सहकार्य करता येईल अशा राजकीय प्रथा इंग्लंडमध्ये आहेत हे खरे आहे काय?

उत्तर - आहेत, कोणत्या ते मी सांगू शकणार नाही, परंतु आहेत हे मात्र खरे आहे. असे सहकार्य शक्यही आहे आणि वांछनीयही आहे. आणि असे सहकार्य मिळत असते हेही मला मान्य आहे. परंतु केव्हा ते मला माहीत नाही.

मग त्यांना विचारले - यासंबंधात तुम्ही निराश आहा काय?

प्रश्न - विरोधक आणि सरकारमध्ये समोरासमोर लढाई सुरू असेल त्याच्या परिणामी वा काही तडजोड झाली म्हणून असे सरकार निवडून येत असते?

उत्तर - मला वाटते की समस्येवर काही तोडगा निघत असतो. परंतु सत्याग्रहाच्या वेगळ्याच मार्गाने असहकार करण्याची माझी तयारी असेल. पहिल्या ध्येयाकरिता मी प्रयत्न केला पाहिजे आणि दुसऱ्या विकल्पाकरिता माझी तयारी असली पाहिजे.

प्रश्न - परिस्थितीत आता इतका बदल झाला आहे की दहा वर्षांपूर्वी जो तोडगा शक्य होते तो आता स्वीकारार्ह राहिलेला नाही.

उत्तर - स्वीकारार्ह तर तेव्हा होईल जेव्हा संपूर्ण व्यवस्था स्वेच्छेच्या भागीदारीवर आणि वेस्टमिनिस्टरच्या परिनियमाच्या आधारावर शब्दांकित केलेली असेल. गोलमेज परिषदेत मी याचा उल्लेख केला होता. आता असे होण्याची मुळीच भीती नाही. कारण राजदुतांच्या भाषेत हे शब्द येऊ लागलेले दिसतात.

प्रश्न - स्वातंत्र्य. कल्पना करा की स्वातंत्र्य आले तर संबंधात बदल होतील हे खरे ना?

उत्तर - सर्वात मोठा बदल तर शांतता जर आधी जपली गेली तरच घडेल. बाकीच्या सगळ्या प्रश्नांचे निराकरण मग आपोआप होईल. आर्थिक प्रश्न सोडवणे सोपे होईल. विकासाची साधने व पुरेसे भांडवल

यासाठी आपण स्वावलंबी आहो. जर आपल्याला विषारी वायूने ठार मारले तर वेगळी गोष्ट; पण नाही तर व्यापारबंदीचे दु:ख तर आपण अनेक वर्षानुवर्षे सहन करू शकतो आहो. अशा प्रसंगी एकही व्यक्ती उपस्थित नसली तरी मी मुसोलिनी किंवा हिटलरचे स्वागत करीन. हे जगासाठी घडलेले मोठे प्रकरण मानले जाईल. आज भुकेची व शोषणाची परिस्थिती आहे; पण मुख्य प्रश्न आंतरिक शांततेचा आहे — ती टिकत नाही. इंग्रज सरकार येथे ठिय्या मारून बसण्यात यशस्वी झाले आहे. इंग्रज म्हणतात की साम्राज्यात जशी शांतता आहे; तशी मुंबईत आहे कय? ह्याच लोकांनी शत्रुत्वाच्या भावनेचे पोषण केले आहे.

हॅरिसन - हा तर फार गंभीर आरोप आहे.

बापू - मी हा विचारपूर्वक करतो आहे. सरहद्दीच्या प्रांतातसुद्धा दंगली घडवून आणत आहेत. आणि शिक्क्याची दुसरी बाजू. कोणी तरी लिहिले आहे - 'अफगाणीस्तानमधील लढाया?' आज तुर्की या खेळात रत आहे? युरोपमध्ये तुर्की कसे शांतपणे मिळवणुका काढत आहेत?

सरहद्द प्रांतातील जातीजमातींना काय कळते? त्यांना इंग्रजी भाषा कुठे येते? 'पाठ शिकण्याची' यांना काय फिकीर? कोणी काही धोका देतो की काय? त्यांना धोका देणाराचा बदला घेण्याची गोष्ट कळते? शपथ घेऊन नाव घेण्यापुरतेही शिक्षणसुद्धा यांनी निवडलेल्या प्रतिनिधींना मिळालेले नाही. त्यांना मानाची वागणूक मिळेल अशी अपेक्षा कशी करता येऊ शकते. राज्याच्या सत्तेबद्दल त्यांच्या मनात सन्मानाची भावना राहील असे केले पाहिजे. लष्कर आणि वायुदल यांच्या सहकार्याने इथे स्पेनमध्ये पुनरवृत्तीशिवाय दुसरे काही होऊ शकेल असे तुम्हाला वाटते काय?

किम्बर्लीवर विजय मिळवला होता तेव्हा सेनापतींनी तार केली होती की मुजुबाचा बदला घ्यायला गेलो होतो.

प्रश्न - लोकांना आपसात भांडायला लावण्याकरिता लष्कर आहे काय?

उत्तर - ग्रामीण प्रदेशात शांततेकरिता मिरवणूक. शांतीकूच यांमागील उद्देश काय आहे हे मला माहीत आहे.

प्रश्न - तुमची मान्यता आहे की अत्यल्प वक्तव्य देऊन जगाची फसवणूक करण्यात येत आहे. असे असताना तुमच्यात शक्ती असूनही तुम्ही गप्प बसला हे योग्य आहे काय?

उत्तर - माझ्यात शक्ती आहे की नाही हे तर मला माहीत नाही, परंतु माझ्या प्रभावक्षेत्रातील जर ही गोष्ट असेल तर मी मौन ठेवणार नाही. मग हिंदुस्थानात क्रांती जरी झाली तरी मी त्याची फिकिर करणार नाही. मी तर तुम्हांला जसा सांगतो आहे तसाच विचार जाहीर करत असतो. तुम्ही जरी इंग्रजांचे दूत असाल तरी मला त्याचे काही करायचे नाही. माझ्या म्हणण्याचा जे सरळ अर्थ घेतील ते तर म्हणतील, “याला तर सरकारची लाजिरवाणी परिस्थिती करायची नव्हती म्हणून हा गप्प होता.”

माझी वेळ येईल तेव्हा मला कोणत्याही आमंत्रणाची आवश्यकता नसेल. मी जेव्हा बाहेर पडेन तेव्हा जग थक्क होईल. तुम्ही गेला की मी लगेच वकिलीची सनद पेटीत ठेवून देईन. माझी चांगल्या वकिलात गणना होत होती.

प्रश्न - परंतु ही गोष्ट लिनलिथगोला का सांगत नाही?

उत्तर - ईश्वर जेव्हा सांगेल की या गोष्टीकरिता ही वेळ परिपक्व झाली आहे तेव्हा मी सांगेन. परंतु या क्षणी तर या दोन्ही बाजू मी सोडून देतो आहे. असे केले नाही तर मी व्यर्थ बडबड करणारा मूर्ख ठरेन.

प्रश्न - हिंदुस्थानचा हे जग घडवण्यात तुमचा कोणता सहभाग असेल?

उत्तर - कल्पना करा की इंग्लंडशी लढल्यासिशिवायच आम्हांला स्वातंत्र्य मिळाले आणि अहिंसक क्रांतीमुळे सर्वत्र सन्माननीय शांतता नांदत असेल तर हीच शांतता सरहद्द प्रांतातही जाणवण्याकरिता आम्ही मदत करू.

आम्ही नौदल वा वायुसेना ठेवणार नाही. त्या वेळा या गोष्टीचा सर्वांना स्तब्ध करतील असा त्या शांततेचा प्रभाव पडेल. आज मी जे हे म्हणतो आहे ते तुम्हांला पटत नाही. मी तर म्हणेन की दीनदुबळे होऊन राहण्यापेक्षा रक्त वाहू देणे चांगले. तुम्ही ज्या हिंसेचा विचार करता ती हिंसक प्रवृत्ती फार वाईट आहे.

# ५२. ग्रामसेवा

**३-१२-१९३६**

परावलंबी माणसाला गावात स्थान नाही.

बेरोजगारीचा प्रश्न - एक प्रकारे इतर ठिकाणाइतका हा प्रश्न इथे उग्र नाही. त्यांचे राहणे वागणे, बूटमोजे, टेबल, खुर्ची, थंड हवेकरिता करण्यात आलेली व्यवस्था अशा गोष्टींमुळे बेकारीची समस्या फार कठीण होत असते. इथे बेकारीचा त्रास इतका नसतो. हे पाहून मला रडू आले. परंतु याकरिता आपली बेफिकीर वृत्तीच जबाबदार आहे. आपले अज्ञानसुद्धा आहे. मोची दगड उचलायला तयार होत नाही. त्याला हाताने काम करणे कमीपणाचे वाटते. ही गोष्ट आपण विसरायला पाहिजे.

भाकरीकरिता श्रम करणाराला हिंदुस्थानात नेहमीच स्थान आहे. हा ईश्वरी कायदा आहे. माणूस जे खातो त्यापेक्षा जास्त मेहनत करण्याची त्याच्यात जर शक्ती असेल तर त्याला नेहमीच काम मिळत असते. झाडझूड करणारा माणूस जर आठ तास मेहनत करत असेल तर त्याला खायला मिळत राहील. माझ्यासारख्याकरिता ही गोष्ट नाही. परंतु ज्याचे मन मजुराचे झाले असेल, आणि ज्याच्या शरीराची बांधणी तशी झालेली असेल त्याला कोणतीही अडचण जाणार नाही.

दोन हातांनी आणि दोन पायांनी काम करणाराला भाकरी मिळायलाच पाहिजे.

मी शिंदीत भंग्याचे काम करत असतो. मला सांगण्यात आले आहे की घरी येऊन जर हे काम कराल तर फार अडचणीत पडाल. बहिणींचे लग्न होणार नाही.

मी तर तुमचे आभार मानतो. मजुरी करायला मिळेल. लग्न तर होईलच. बहिणीचे लग्न का होणार नाही? घरात राहणार नाही. परंतु जातीत बहिणीचे लग्न होणारही नाही.

'मला माझ्या जातीचे लोक मारतील.'

जे सेवाभावनेने काम करतील ते ज्ञानी झाले. आईवडिलांना त्यांनी सांगावे, 'मी तुमचा मुलगा राहिलो नाही, मी ईश्वराचा मुलगा झालो आहे. तुम्ही जर खायला देणार नाही तर मी मिळवीन. कुत्र्यालासुद्धा खायला

मिळते, मग मला का नाही मिळणार? रस्त्यात जे धान्याचे दाणे पडलेले असतात ते तर मिळतीलच. अंत्यजांचे आंगणसुद्धा साफ करीन. भंग्याचे काम करीन.'

* * *

ग्रामसेवकांना देशी राजांनी घाबरण्याची आवश्यकता नाही. ग्रामभक्षकांना त्यांनी अवश्य घाबरावे.

राज्य मिटायचा वा मिटवायचा प्रश्नच नाही. आपण या लोकांच्या बेकारीचा सामना करतो. स्पर्शास्पर्शतेविरुद्ध बोलतो, घाणीविरुद्ध बोलतो.

* * *

एक वर्ष इथे राहूनही नालायक?

अहो भाऊ, सहा वर्ष काम केल्यानंतरही पाप करणारी, व्यभिचार करणारी माणसे मला माहीत आहेत. आता ते म्हणतात की मी प्रायश्चित्तही पूर्णपणे करू शकलो नाही. आता त्यांची प्रायश्चित्त घेण्याची भाषाही राहिलेली नाही.

मला तर भाषेवर नियंत्रण ठेवायची सवय लागली आहे. खुन्याच्या पश्चात्तापावर टॉलस्टॉयची कादंबरी आहेच. फाशीपेक्षा अधिक कठोर शिक्षा म्हणजे स्वतःच्या गुन्ह्यातच जळण्याची शिक्षा. पाप्यावर जग थुंकतही नाही. याचेसुद्धा याला वाईट वाटते. हीच स्थिती रामनारायणची आहे. आता मला सांगा की रामनारायण नालायक आहे की लायक? तो जर असा असेल तर तू असा कोण आहेस की एका वर्षात लायक होऊन जाशील?

शक्य आहे की रामनारायण परत माघार घेईल आणि म्हणेल की 'तुमच्या विचाराप्रमाणे मी वागेनही, परंतु माझे विचार वेगळे आहेत. स्त्रीपुरुषांनी ठराविक रीतीनेच राहिले पाहिजे, असे थोडेच बंधन आहे? जनावरे जशी राहतात तसे माणसांनी का राहू नये? आता माझे विचार बदलले आहेत.'

हा माणूस वाईट नव्हता. त्यागी होता. परंतु आज त्याचे पतन झाले आहे. यामुळेच महात्मा, महात्मा म्हणू नका. मेल्यानंतर म्हणा. सैतानाच्या तोंडी पडलो आहो. आपल्याला खाणे हे सैतानाचे काम आहे, आणि सैतानाच्या तोंडातून आपला बचाव करणे हे आपले काम आहे.

भंग्याने आधी आपल्या अंतःकरणाची सफाई करावी, मग गावाची करावी.

तुझा आदर्श आठ तास काम करायचा आहे काय?

नाही, चोवीस तास करायचा आहे. बाकी आपल्यामध्ये तितकी शक्ती नसेल तर ती वेगळी गोष्ट आहे. मगनवाडीत आठ तासांपेक्षा जास्त काम घेतात आणि त्या मजुरांना मारही खावा लागतो.

यांच्या दहापट अपराध तर मी केलेला आहे.

# ५३. हीथ, ॲन्ड्र्यूज आणि ॲगाथा यांच्याबरोबर चर्चा

व्हाईसरायना गावांमध्ये होणाऱ्या कामाची अंतःकरणापासून काळजी वाटत होती.

असा कोणताही मार्ग आहे काय की ज्यामुळे गावातील कामांचे केंद्रीकरण करता येईल?

बापू - हो, सरकारची इच्छा असेल तर काही हरकत नाही. मीराबहेनने शेतीच्या निदेशकाला पत्र लिहिले आहे. काही उत्तर नाही. उत्तर येईल याबद्दल मला शंका नाही.

मला कोणतीही अडचण दिसत नाही: हे लोक मला या कामात गुंतवणार तर नाही केवळ इतकीच अडचण आहे. या लोकांपेक्षा मी गावकऱ्यांना अधिक चांगला ओळखतो. या लोकांची इच्छा आहे त्याप्रमाणे केले तर हिंदुस्थानच्या लोकांच्या गरजांची परिपूर्ती होईल असे जर त्यांना वाटेत असेल तर त्यांनी तसे मला पटवून दिले पाहिजे.

माझा तर विश्वास आहे की सर सॅम्युअल होर स्वच्छ अंतःकरणाचे गृहस्थ आहेत. मनात विचार येतात ते सांगून टाकतात, आणि जे मनात असते तेच सांगतात. माझ्या नजरेला नजर मिळवत ते म्हणाले की माझ्यासमोर हा प्रश्न आहे. बिरला, पुरुषोत्तमदास ठाकुरदास उद्योग खात्याचे तज्ज्ञ म्हणून या दोघांनीही निमत्रण स्वीकालेले होते. यामुळे हे दोघेही तिथे आलेले होते. सर फिरोज शेठसुद्धा होते. ही चर्चा परिषदेत झाली होती. सर हेन्री स्टेकोशसुद्धा होते. आणि काळ्या फळ्यावर आकडे लिहिले जात होते. ते तर समजूनच चालले होते की आम्हांला अर्थशास्त्राची पायाभूत माहिती आहे.

मी म्हणालो इंग्रजीचे तुम्ही तज्ज्ञ विशिष्ट प्रकारे विचार करता. तुमची दृष्टी वेगळी आहे. आम्ही काय करायचे? हिंदुस्थानी यंत्रणेनुसार जबाबदारी घेण्याच्या तयारीची जर गोष्ट असेल तर आमच्या माहीतगार लोकांच्या सल्ल्याप्रमाणे आम्हांला काम करावे लागेल. आणि तुम्ही आम्हांला जबाबदारी घेऊन प्रयोग करायला सांगण्याचा प्रयत्न करत आहा. अशा परिस्थितीत तुमच्या तज्ज्ञांची शिफारस आम्ही स्वीकारली पाहिजे. हे कसे शक्य आहे?

ते मनमोकळेपणाने म्हणाले, “आम्हांला तर आमच्या तज्ज्ञांचाच सल्ला घ्यावा लागेल.”

हे पाहा, ही हिंदुस्थानच्या हिताचीच गोष्ट होती. लिनलिथगोंचा गोसंवर्धन, धान्य, वगैरे गोष्टीत रस होता. परंतु एक सल्लागार निष्णात होता. आमच्यापैकी बरेच लोक त्यांच्या शिफारसी हास्यास्पद ठरवत होते.

अशा प्रकारे त्यांच्या शिफारशींचा जो अंमल होत होता तो हास्यास्पद होता. आमचा सल्ला स्वीकारून काम सुरू केले असते तर अशा अडचणी आल्या नसत्या. विधिसमितीत सरकारी अधिकाऱ्यांचा जो गट होता त्यात ते एकमेव अशी व्यक्ती होते की ज्यांच्या मताचे अनुसरण होत होते.

सर्व साम्राज्यवादी राज्यांचा हाच इतिहास आहे. त्यांच्याशी सहमत होतील असे फार कमी लोक आमच्यामधून त्यांनी शोधून काढले होते. काँग्रेसला अनेक प्रकारच्या शिव्या देणारे, भांडखोर लोक वगैरे म्हणा ना. काँग्रेस जनतेची प्रतिनिधी आहे हा दावा ते नाकारत होते. नंतर वाटेल तर हेच लोक काँग्रेसच्या नावाने शपथसुद्धा घेत असतात.

प्रश्न - परंतु सहकार आवश्यक नाही काय?

उत्तर - निश्चितच आवश्यक आहे.

प्रश्न - परंतु त्यांच्याबरोबर काम करायचे तर अडचणी उभ्या राहत नसतात काय?

उत्तर - नाही, परंतु असे होत आले आहे खरे. यांच्याबरोबर सहकार करण्याकरिता मला त्यांच्याशी असहकार करावा लागला.

प्रश्न - सध्या तर त्यांना तुमची भीती वाटते. परस्परांशी जुळवून घेऊन शांतपणे हे करायचे आहे.

बापू - परंतु यांना जवाहरलाल नेहरूंची भीती का वाटावी? ते तर इंग्रजीत बोलत असतात.

हीथ - सामाजिक प्रश्नात सहकार केला तर राजकीय प्रश्नातही सहकार करावा लागेल असे ते म्हणतात.

बापू - याचा अर्थ हाच होतो की आपण बरोबरीचे नाही तर लाचार आहो. ते जेव्हा डाव खेळतात तेव्हा सोंगट्या विशिष्ट प्रकारेच पडाव्या अशा प्रकारे खेळतात.

हीथ - त्यांना तुमची भीती वाटते, परंतु तुम्हाला त्यांची भीती वाटत नाही.

बापू - मानवस्वभावावर माझा विश्वास असल्यामुळे मला कोणाचीही भीती वाटत नाही. परंतु मला त्यांची भीती वाटत नाही याचा अर्थ असा नाही मी त्यांच्याबरोबर सहकार करायला मी तयार आहे.

हीथ - काँग्रेसने नक्की करावे की सत्ता स्वीकारायची आणि घटनेप्रमाणे काम करायचे. असे केले तर आपण इच्छितो तसे परिवर्तन होईल. दोन मार्ग आहेत. एक बंडखोरीचा म्हणजे बळजबरीचा आणि दुसरा एकमेकांना समजून घेऊन मिळूनमिसळून काम घ्यायचे असेल तर ब्रिटन आणि हिंदुस्थानातील जनमानसाला शिक्षित करायला पाहिजे.

ब्रिटनमधील लोकांना शिकवण्याकरिता तुम्ही अधिक काय करू शकता? ब्रिटनमध्ये हिंदुस्थानबद्दल समजूनउमजून तयार करण्यात आलेली अशी कोणतीही विचारधारा नाही. ब्रिटनमधील लोकांचा हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याला किंचितही विरोध नाही. इंग्रज जनतेत अज्ञान आहे. परंतु त्यांच्याबद्दल सहानुभूती ठेवणारांनी समंजसपणे काम करण्याची आवश्यकता आहे. हिंदुस्थानातील विचारवंतांनी ब्रिटिनमध्ये येऊन ब्रिटिश जनतेशी हिंदुस्थानातील जीवनासंबंधी बोलल्याने असे होऊ शकेल काय? सध्याच्या परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा माझ्या मते तरी हाच मार्ग आहे.

बापू - माझे जे मत होते तेच मत आज यांचेही आहे. तुम्हांला माहीत नसेल परंतु होते. ब्रिटनमध्ये काम करणाऱ्या काँग्रेसच्या प्रतिनिधीसारखी हिंदुस्थानी समितीच्या कामाचा प्रसार करण्याकरिता मी एकमेव जबाबदार होतो. या संस्थेची स्थापना दादाभाईंनी आणि वेडरबर्ननी केली होती. मी त्यांची पूजा करत असे. परंतु या समितीची उपयोगिता मला दिसली नाही. मी काम करत असताना ती होती, परंतु तुलनात्मक दृष्टीने विशेष काम होत नव्हते. ती समिती बरखास्त केली आणि तेथील ग्रंथालय इथे आणले. ब्रॉकवे तिच्यात होते. आणि इतरही थोडे लोक.

माझा अर्ज फेटाळून लावण्याकरिता त्यांनी खूप मेहनत केली, परंतु ठराव प्रचंड बहुमताने मंजूर करण्यात आला. या निर्णयाचा मला पश्चात्ताप होत नाही. मला वाटते की हिंदुस्थानी जनतासुद्धा इंग्रजांनी सांगितलेले काम करत नाही तसेच इंग्रज श्रोत्यांची मानसिकतासुद्धा हिंदींकडून काही पाठ शिकण्याची नसते हे याचे कारण आहे. मी तुमच्या आणि इतरांबरोबर बसून चर्चा करण्याची आवश्यकता आहे. लोक तर आपल्या आवडीनिवडीप्रमाणे मार्ग काढतच असतात. लोकांना वाटत असते की विशिष्ट गोष्ट खानसाहेबांनाच सांगितली पाहिजे. बॉल्डविन येऊन सांगतात की इंग्लंडमध्ये मधाच्या, दुधाच्या नद्या वाहत असतात. आणि खानसाहेब सांगत असतात की हा देश तर कंगाल झाला आहे. असे असेल तर इंग्रजांनी बॉल्डविनचे आणि हिंदुस्थानींनी खानसाहेबांचे म्हणणे ऐकून घ्यावे काय?

हीथ - मी सभा भरवण्याविषयी बोलून राहिलेलो नाही. परंतु जवाहरलाल इंग्लंडमध्ये आले होते तेव्हा त्यांनी जशी सभा आयोजित केली होती तशा सभेत लहान लहान विविध समूहांना संबोधित करण्यासंबंधी मी बोलतो आहे.

बापू - ही वेगळी गोष्ट आहे. सर्वसामान्य जनता काही हट्टी नसते. बॉल्डविन आणि त्यांच्या बंधूंना जेव्हा समजावून सांगता येऊ शकेल तेव्हाच मी यांच्यासुद्धा ही गोष्ट गळी उतरवू शकेन. हे काम आम्ही विलायतचा प्रवास करून करू शकत नाही. तेथील लोकांनी आम्हांला बोलावले तरच होऊ शकते. जवाहरलालने फार मोठे काम केले आहे. त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची अनेक लोकांची तयारी होती हे त्याच्या यशाचे कारण आहे. परंतु तुम्ही तर जणू अस्तित्वात नगण्य अल्पसंख्य आहा.

हीथ - अलेक्झॅन्डर आणि माझ्याशी नेहरूंनी विस्ताराने चर्चा केली.

बापू - माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की बॉल्डविन आणि त्यांचे मित्र बोलावतील तेव्हाच त्यांनी विलायतेत प्रवास करायला निघावे. हीथ आणि त्यांचे मित्र बोलावतील तेव्हासुद्धा त्यांनी विलायतेत जायला पाहिजे. परंतु आमंत्रणाशिवाय जाणे मूर्खपणाचे होईल. दीनबंधू ऍन्ड्र्यूजनी मला विचारले होते की तू विलायतेत कोणत्या अटीवर येशील? प्रधानमंत्री वगळता इतर कोणाचे आमंत्रण आले होते काय? मी म्हणालो की कॅन्टरबरीच्या आर्चबिशपचे आणि इतर धर्मपंथियांची पत्रे तर होती. जेव्हा की आर्चबिशपचा बराच प्रभाव पडत असेल असे मला वाटत नव्हते.

हीथ - परत परत सांगायचे तर आर्चबिशप आणि होरच्या हृदयपरिवर्तनाचा माझ्या मनात विचार नाही. परंतु आमच्या आमंत्रणाचा हिंदुस्थानीं ंवर दडपण येईल आणि आम्हा लोकांबरोबर त्यांनी चर्चा करावी असा आग्रह माझा असेलच.

बापू - तुमचे म्हणणे आम्हांला मान्य झाले नाही असे कधीही झाले नाही. या समस्येची अहिंसक पद्धतीने जर सोडवणूक करायची असेल तर भेटीगाठी घेऊन चर्चा करणे हाच योग्य मार्ग असल्याबद्दल कोणताही वाद असू शकत नाही. मी तर एकमेकांवर पूर्ण विश्वास ठेवत असतो आणि कोणत्याही प्रकारची मानसिक अट न ठेवता मनमोकळेपणाने बोलत असतो.

आम्ही परत येऊ तेव्हा आमची अशीच इच्छा असेल. आणि इतर लोकांनीसुद्धा तुमच्या या विचाराला उत्तेजन दिले पाहिजे.

ॲगाथा - निकटच्या भविष्यकाळात या लोकांची येण्याची शक्यता आहे काय?

बापू - अशा आमंत्रणाची खरोखर काही शक्यता आहे काय?

हीथ - आम्हांला असे वाटत होते की हिंदुस्थानची परिस्थिती अशी आहे की एकाही हिंदुस्थानीला याकडे लक्ष केंद्रित करायला आणि विलायतेत यायला वेळ नाही.

बापू - ॲगाथा राजकुमारी अमृतकौरचा विचार करत होती. मला म्हणाल तर इथले काम सोडून तिकडे येणे कठीणच असेल. पण मी धीर धरून, आवाज न करता अढळ श्रद्धेने इथे काम करत राहिलो तरी त्याचा परिणाम तोच होईल. परंतु असे बरेच जण आहेत की जे जाणे पसंत करतात. अडचणी तर असणारच. पण इंग्लंडमध्ये उत्कृष्ट विचारवंतांशी अगदी निकटचे मैत्रीसंबंध जोडण्याच्या बाबतीत मात्र एकाही हिंदुस्थानीच्या मनात इच्छा नसेल असे शक्य नाही.

हीथ - टिळक महाराज विलायतेत होते तेव्हा तेथील विविध विचारवंतांशी संपर्क करून त्यांना आपले मत समजावून सांगूण्याचा फारसा प्रयत्न का झाला नाही हा प्रश्न मला अस्वस्थ करतो. तुम्ही जबाबदारी घ्याल तर असे एक केंद्र तिथे उभारले पाहिजे. तुम्ही तुमचे दूत तिथे पाठवत जा. आम्हांला आमंत्रित केलेच पाहिजे असे नाही. जवाहरलाल नेहरू सांगत होते की पैशाची चणचण आहे. तुम्ही त्यांच्याशी सहमत आहा काय?

बापू - नाही. इंग्लंडमध्ये काँग्रेसचे इंडिया हाऊस बंद केले तेव्हा ते सक्रीय सहकार्यकर्ता होते. परंतु जवाहरलाल कोणत्याही मताचे असले तरी केवळ विलायतेतच नाही तर ठीकठिकाणी कार्यालये उघडली पाहिजे. माझ्या मनात हे भीतीदायक पाऊल उचलण्याचा विचार आहे. आमच्याजवळ पुरेशी माणसे नाहीत.

आपण माणसे पाठवायला सुरुवात केली, तर ते केंद्र सोडून परिघावर भटकंतीसारखे काम करू लागतील. प्रत्यक्षात काम तर अगदी केंद्रातच करायचे आहे की जिथून आजूबाजूला पसरलेल्या भागात किरणोत्सर्ग पसरतो. अशा संघटनेतूनच प्रेरणा मिळेल. अजून अशा केंद्राकरिता वेळ परिपक्व झालेला नाही. मला कळत नाही की या समस्येची सोडवणूक यात असेल की केंद्र तुमच्या कामात जी मदत करेल त्यात असेल. या विषयावर होम्सनेही चर्चा केली होती आणि अशा केंद्रातून काही साध्य होणार नाही असे त्यांचे मत आहे; यामुळे अनपेक्षित अडचणी उभ्या राहतील. होम्स विचारतात : ‘अमुक गृहस्थ आले आहेत तर त्यांच्यावर विश्वास ठेवायचा?’ — हे खूपच निरर्थक आहे.

हीथ - मार्ग सुचवू? इथेच आजूबाजूला तुम्ही कोणती तरी जबाबदारी घ्या. ही गोष्ट तुम्हाला कशी वाटते? 'तुम्ही विलायतेत जे काम करत आहा त्यात मला फार रस वाटत असल्यामुळे तुम्ही मला मदत करा' असे तुम्ही म्हणता खरे.

बापू - रस एकपक्षी नसावा. परंतु आपसातील संबंध इतक्या काही वाईट अवस्थेत पोहोचले आहेत की काळजीचे काही कारण नाही असे तर त्याबद्दल म्हणता येत नाही. प्रत्येक हिवाळ्यात पन्नासेक इंग्रजांना आमंत्रित करून बोलावणे आम्हांला परवडू शकत नाही. असे म्हणणे उद्धटपणाचे वाटेल, परंतु मला जे वाटते ते तर मी सांगेनच. हा प्रश्न समजून घेण्याची तुमच्यातील वृत्ती जागी झाली पाहिजे. अन्याय करणाऱ्या लोकांचे तुम्हीसुद्धा काही प्रमाणात प्रतिनिधी आहा. ज्यांना अन्याय सहन करावा लागला आहे त्यांचा मी कमीअधिक प्रमाणात प्रतिनिधी आहे. आमचा पराजय झाला आहे आणि तुम्ही स्वतःला विजयी समजता आहा. ज्या क्षणी आमच्या दुर्बलतेमुळे हे आक्रमण शक्य झाले ती दुर्बलता जर आम्ही झटकून टाकली तर परिस्थितीत बदल होईल. ज्या दुर्बलतेमुळे आम्ही तुमच्या ताब्यात आलो ती दुर्बलता जोपर्यंत आमच्यामध्ये काय आहे तोपर्यंत तुम्ही आम्हांला पारतंत्र्यातून कसे मुक्त कराल? आमची दुर्बलता आम्हीच दूर केली पाहिजे. यामुळेच या आंदोलनाला मी स्वतःला पवित्र करणारी प्रवृत्ती म्हणतो.

परंतु तुमचे म्हणणे आहे की 'आम्ही तुमच्या या दुर्बलतेचा लाभ घेतलेला असल्यामुळे आमचेही काही कर्तव्य आहे'. आमच्यात सुधारणा करण्याचा आम्हीच प्रयत्न केला पाहिजे. असे झाल्याशिवाय राहणार नाही कारण ही दुर्बलता आम्ही सहन करू शकत नाही: यामुळेच इंग्रज आजही इथे आहेत. परंतु याचा अर्थ असा नाही की याकरिता वेळोवेळी आमंत्रण येईल. इतरांच्या दुर्बलतेचा चुकीचा लाभ घेऊन त्यांचे शोषण करणाऱ्या लोकांपैकी तुम्ही एक आहा. यामुळे तुमचा अधःपात झाला असल्याची तुम्हांला जाणीव व्हायला पाहिजे.

हीथ -स्वतःला शुद्ध करायची प्रवृत्ती दोघांमध्येही विकसित व्हायला नको काय?

बापू - हो, पण थोडा वेळ आहे. दुसऱ्या देशाला गुलाम करण्याची प्रवृत्ती निश्चितच फार वाईट आहे. परंतु दुसऱ्या देशाला गुलाम ठेवणे हा तर घोर अन्याय आहेच; पण ज्या पक्षाने दुसऱ्या देशाचा ताबा घेतला आहे तो आपण अन्यायकार केला आहे असे मान्यच करायला तयार होतच नाही. आमच्यावर तुम्ही विजय मिळवू शकला हा तुमचा गुण आहे असे तुम्ही समजता. तुम्ही पराजित असा की विजेता, परंतु तुम्ही एकाच प्रकारच्या शंकेचे शिकार असता असा विचार करणे मी शिकलो आहे. लाखो हिंदुस्थानींना वाटत असते की

इंग्रजांच्या जागी आम्ही असायला पाहिजे. परंतु इंग्रजांना वाटत नाही की जसे हिंदुस्थानी आहेत तसे आम्ही असायला पाहिजे. यामुळेच हिंदुस्थान आणि ब्रिटन यांच्यात जे संपूर्ण सामंजस्य व्हायला पाहिजे ते होत नाही. मी जितका माझ्या देशबांधवांना ओळखतो तितके तुम्ही तुमच्या देशबांधवांना ओळखत असाल अशी शक्यता मला वाटत नाही. क्लबमध्ये इंग्रज वेगळी भाषा बोलतात. अंमलदार आपसात वेगळे बोलतात. सर जेम्स ग्रेगशी व्हाईसराय जसे बोलतात तसे ते झाफ्रुल्लांबरोबर बोलत नसतात.

हीथ - यावर काही उपाय आहे काय?

बापू - निश्चितच आहे.

हीथ - हेलीफास्ट तुमच्याबद्दल माझ्याशी जेव्हा बोलत होते तेव्हा तर काही अडचण आली नाही.

बापू - हा काही माझा विशेष गुण नाही. लिनलिथगोबरोबर जरी मी बोलत असलो तरी मी माझ्या मनात काय आहे ते मनमोकळेपणाने सांगितल्याशिवाय राहू शकत नाही. परंतु ही गोष्ट माझ्याकरिता स्वाभाविक झाली आहे. जेव्हा दोन हिंदुस्थानी या लोकांना भेटतात तेव्हा हे वेगळ्या पद्धतीने बोलत असतात. जीना, सप्रू, मोतीलाल, विठ्ठलभाई, व्हाईसराय - किती विविध प्रकारची मंडळी ! मी जिनांना नेतृत्व करण्याची विनंती केली तर मलाच नेता व्हायला सांगितले आणि मी मोठीच चूक केली.

इर्विन म्हणाले की माझ्या जाहीर व्याख्यानाच्या भाषेतून जितका अर्थ निघतो त्यापेक्षा तुम्ही किती तरी जास्त अर्थ काढला आहे. मी म्हणालो, “आम्ही फारच कमी अर्थ घेतला आहे हेच खरे नाही काय? परंतु चूक तुमचीच आहे.” मी मुत्सद्द्याप्रमाणे बोलत नव्हतो. परंतु लगेच मुद्द्यावर आलो. आमची भेट अतिशय दुर्दैवी वेळेवर झाली होती. स्वतःवर नियंत्रण ठेवणाऱ्या इंग्रजांपैकी ते एक होते. परंतु अस्वस्थतेतून त्यांची सुटका होऊ शकली नाही. बॉम्ब तर होताच; थोडक्यात ते वाचले होते. ही गोष्ट मात्र इंग्रजांच्या खास कौतुकास पात्र आहे की हे लोक सार्वजनिक प्रसंगांपासून मागे हटत नाहीत.

जणू काय मी एखाद्या मित्राला संबोधत आहे अशा प्रकारे मी त्यांच्याशी बोलत होतो. आम्ही दोघांनीही ठरवले की आम्ही परस्परांनी अधिकाधिक जवळ यायला पाहिजे. त्यांना वाटत होते की इंग्रज आणि हिंदुस्थानी या दोघांमधील मैत्री टिकाऊ असली पाहिजे आणि त्यामागील हेतू हे संबंध शोषणाकरिता नसावे तर संपूर्ण जगात सहकाराची भावना निर्माण करण्याकरिता असले पाहिजे.

हीथ - कैद्यांबद्दल?

बापू - व्हाईसरायबरोबर पत्रव्यवहार केला आहे. अजून काय करायला पाहिजे होते? असे करणे दडपण आणण्यासारखे झाले नसते काय? प्रश्न कठीण आहे. आशा आहे की सर जॉन ॲन्डरसन यांची भेट घेईन. या सर्व कैद्यांना सोडण्याची आग्रहपूर्वक मागणी असली पाहिजे. सराकारने सर्वांची एकाच वेळी सुटका करण्याची समस्या फार कठीण आहे.

हीथ - सरकार ज्या प्रशिक्षणाच्या योजनेचा प्रयोग करते आहे त्या सर्व वाईट वा निरुपयोगी आहेत काय? त्यात विशेष वाईट असे काय आहे?

बापू - विचार केल्याशिवाय सांगणे कठीण आहे. हा तर सर जॉन ॲन्डरसनच्या अनेक प्रयोगांपैकी एक प्रयोग आहे. सामान्यपणे तर यांच्या योजनेच्या विरोधात काही सांगता येऊ शकत नाही. परंतु यांच्या भूमिकेमागील इतिहास वाईट आहे. तो पाहिल्यानंतर यांना अजून काही करायला सांगणे शक्य नाही. यांच्या मनात येथील लोकांबद्दल द्वेषभावना भरलेली आहे. ते घाबरलेले आहेत. एखाद्या व्यक्तीबद्दल दुर्भावना असावी असे हे नाही.

परंतु देशाची गरिबी वगैरेची यांना काळजी आहे. मूळातील कारण दूर केले पाहिजे. तुम्ही जे काही सुचवाल ते मध्यंतरकालीन व्यवस्थेसंबंधी असले पाहिजे. अंदमानचा म्हणजे एकांतवासाचा हा तुरुंग तो़डून टाकला पाहिजे. आईवडिलांबरोबर पत्रव्यवहार करायचा नाही असे म्हणता आणि मग तिथे पृथ्वीवरील स्वर्ग आहे असे म्हणता याला काय अर्थ आहे? हीजलीचा तुरुंग, राजपुतान्यात भयंकर परिस्थिती आहे.

हीथ - होरेस अलेक्झॅन्डर यावर एक पुस्तिका तयार करत आहेत. जवाहरलाल नेहरू म्हणतात की क्रांतिकारकांचे आंदोलन संपले आहे. अंमलदार जे म्हणतात ते तर अजूनच भयानक आहे. या दोन मंतव्यांवरून समाधान कसे होईल?

बापू - मी इतक्या सीमेपर्यंत गेलेलो नाही. आतंकवाद वाईट आहे वा जवाहरलाल नेहरू म्हणतात त्याप्रमाणे आतंकवादाची भावना आता खरोखरच शमली आहे की नाही या सीमेपर्यंत मी गेलेलो नाही. परंतु लोकांना अंदमानमध्ये वा राजपुतान्यातील तुरुंगात पाठवणे हा प्रती आतंकवादच आहे. यामुळे बंगालमध्ये कैदी ठेवता येऊ शकत नाही. असे करून सरकारने आपल्या दुर्बलतेची कबुली दिली आहे. त्यांच्या कागदपत्रावर असामान्य अशी देखरेख का ठेवण्यात येते आहे?

हीथ - प्रश्न हा आहे की तुम्ही अंदमान का आणि केव्हा बंद कराल? या प्रश्नावर व्हाईसरायची भूमिका अतिशय सहानुभूतीपूर्ण आहे. त्यांची भूमिका या संबंधात समंजसपणाची आणि सहानुभूतीपूर्ण आहे. त्यांनी जो समंजसपणा आणि सहानुभूती दाखवली आहे त्याचे आम्हांला आश्चर्य वाटते. ॲन्डरसन समंजस नाहीत असे नाही. अंदमान आणि राजपुतान्यातील विशेष तुरुंगासंबंधात त्यांच्या मनात कटुत्व आहे.

# ५४. गुण असलेली द्रव्ये

या लेढी शयन समये मधुमिश्रं बीजपुरदलचुर्ण्
स तु लज्जाकरवातप्रसरनिरोधात् सुखं स्वपिति ।।

विगतधननिशीथे प्रातरुत्थाय नित्यं
पिबति खलु नरो यो घ्राणन्नन्ध्रेण वारि
स भवति मतिपूर्णश्च ताक्ष्र्यतुल्यो
बलिपलित विहीनः सर्वरोगैविमुक्तः ।।

लशुनस्तु रसोनः स्वादुग्रगंधो महौशधम्
अरिष्टो म्लैच्छ कन्दश्च यवनेष्टो रसोनकः ।।

यदामृतं वैनतेवो जहार सुरसत्तमात्
तदा ततोऽपदिन्दुः स रसोनोऽभवद्भुवि ।
पंचाभिमश्च रसैर्युक्तो द्रव्याणां नाम्लानवर्जितः
तस्माद्रसोन इतक्तो द्रव्याणं गुणवेदिभिः ।।

कटुकश्चापि मूलेषु तिक्तः पत्रेषु संस्थितः
नात्केलकषाय उद्दष्टो नालाग्रे लवण स्मृतः ।।
बीजे तु मधुरः प्रोक्तो रसस्तद्गुणवेदिभीः
रसोनो बृहणो वृष्यः स्निग्धोष्णः पाचनः सरः ।।

रसे पाके च कटुकस्तिक्ष्णोमधुरकोमतः
भग्न सन्धान कृत कण्ठ्यो गुरूः पितास्रावृद्धीदः ।
बलवर्णकरो मेघाहितो नेत्रयो रसायनः

हृद्रोगजीर्णज्वरकुक्षिशूल विबन्ध गुल्मारुचिका शोकान
दुर्नाम कुष्ठानलसाद जन्तु समीरणश्वास कफांश्च हन्ति
मद्यं मांसं तथाम्लं च अंहितं लशुनसेविनाम् ।।
व्याममातपं रोषमतिनीरं पयोगुहम् ।
रसोनमश्नन्युरुषस्त्यजेदेतान्नीन्नन्तिरम् ।।

पलाण्डुर्यवनेष्टभ्र दुर्गंधोर्गंधोमुखदुषकः
पर्लाडुस्तुगुणर्ज्ञेयो रसोन सद्दशा गुणैः ।
स्वादुः पाके रसेनुष्णः कफकुन्नातिपित्तलः
हरते केवलं वातं बलवीर्य करो गुरुः
युक्तः कल्को रसोनस्य तिल तैलेन सिन्दुना
वातरोगान्हरेत्सर्वां ज्वरां च विषमानापि ।।
क्षीरेण तैलेन घृतेन वापि मांसेन सार्धदूलशुनानि खादेत्
शाल्योदनेनापि च षष्टिकेन पलाद्रषवृध्यया दिवसानसिष्ट ।
वातोत्थरोगान्विष मज्वरांश्चशूलान्सगुल्मान्दहनस्य मान्द्यम्
प्लीहानमुग्रं भुजपार्श्वशूलं शिरोव्यथां कुन्ततिशुक्ल्कदोषान

(वरील श्लोकांचा चाटजिटीपीने दिलेला अर्थ असा आहे - लसूण (ज्याला रसोन, लशुन, अरिष्ट, म्लेच्छकंद, यवनेष्ट, पर्लाडु इत्यादी नावे आहेत) हे प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथांमध्ये महाऔषध मानले गेले आहे. गरुडाने अमृत घेऊन जाताना जमिनीवर पडलेल्या थेंबापासून तो उत्पन्न झाला, असे त्याचे पौराणिक वर्णन आहे. त्यामध्ये पाच रस आहेत (आंबट वगळता) आणि त्यामुळेच गुणवेत्त्यांनी त्याला ‘रसोन’ असे नाव दिले.

लसूणाचा कंद कटू आणि उग्रगंधी, पानं तिखट-तिक्त, बीज गोडसर असतात. तो उष्ण, स्निग्ध, पचनास मदत करणारा, पोषण करणारा व वीर्यवर्धक आहे. हाडे जोडतो, आवाज गोड व कंठ्य करतो, बल व वर्ण वाढवतो, डोळ्यांसाठी रसायन आहे. हृदयरोग, जुनाट ताप, पोटदुखी, बद्धकोष्ठता, गुल्म, अरुचि, मानसिक खिन्नता, कुष्ठ, आळस, कृमी, वायू, श्वास-कफ यांसारख्या अनेक विकारांवर तो उपयोगी आहे. लसूण नियमित

खाणाऱ्यांना मद्य, मांस, आंबट पदार्थ यांचा त्रास कमी होतो आणि उन्हातले काम, राग, पाण्याची कमतरता यांचा दुष्परिणाम सहन करता येतो.

लसूणाचा कल्क तिळतैल आणि सैंधवासोबत घेतल्यास वातरोग, विषमज्वर, शूल, गुल्म यांना आळा बसतो. दूध, तूप, तेल, मांस किंवा भातासोबत लसूण घेतल्यास वातजन्य रोग, ज्वर, प्लीहविकार, डोकेदुखी, शुक्रदोष इत्यादी विकार बरे होतात. पलांडु (कांदा) गुणांनी लसणासारखाच आहे पण तो दुर्गंधी आहे व मुखाचा वास खराब करतो.

रात्री झोपण्यापूर्वी मधात मिसळून बियांच्या सालींचे चूर्ण घेतल्याने वायू-दुर्गंध यांना आळा बसतो आणि शांत झोप येते. तसेच पहाटे नाकावाटे पाणी घेतल्याने (नेती क्रिया) बल, बुद्धी वाढते, पांढरे केस कमी होतात व रोगप्रतिबंधक शक्ती वाढते.)

# ५५. श्री साईटो, श्री आणि श्रीमती रीड

आर्थिक परिस्थितीत सुधारणा करा.हरिजनाला नोकर ठेवा. परंतु तो नोकर आहे अशा प्रकारे त्याच्याशी वर्तन करू नका.

प्रश्न - जीवनाचे धोरण उच्च पातळीवर नेण्याची यांची महत्त्वाकांक्षा आहे?

उत्तर - यांच्यात हा गुण स्वाभाविकपणे आहे.

प्रश्न - भविष्याकरिता ही फार मोठी आशा आहे.

उत्तर - सांगता येत नाही. परंतु स्वाभाविकपणे हळूहळू जर वृत्तीत बदल होत गेला तर फार चांगले. इतके तर त्यांना निश्चितच जाणवते की पुढे चांगले दिवस येतील.

प्रश्न - ग्रामीण विकासाच्या समस्या कठीण आहेत.

उत्तर - लेस्टर आणि कोरे कागदपत्र लिहित असतात.

प्रश्न - वस्तुस्थिती वेगळी असू शकते, परंतु अगदी समान्तर आहे. मी तरुणांच्या कामकाजाशी संबंध ठेवत असतो. जपानचे अनेक कठीण प्रश्न आहेत. एक तर धर्मनिरपेक्षता, नंतर राष्ट्रवाद, आणि तिसरे म्हणजे आपण कोणत्या दिशेने चाललो आहो हे स्वतःलाच विचारणे. आपल्या तरुणांना तो किती तरी सल्ला देऊ शकतो.

बापू - गोष्टीवरून ओळखतो. याशिवाय ज्यांच्याशी परिचय नाही त्यांना सल्ला देणे हे शुद्ध धार्ष्ट्यच होईल. माझी घडण अशी आहे की ज्यांना मी ओळखत नाही त्यांना मी सल्ला देऊ शकत नाही.

डेव्हिस - यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन या विश्वव्यापी संघटनेची एक समिती आहे. वेगवेगळ्या ४० देशातील १५० प्रतिनिधी इथे गोळा झाले आहेत. संपूर्ण जगाशी तुमचा विशेष संबंध आहे. आमचे लोक वेगवेगळे गट करून फिरत आहेत. यामुळे आम्ही काय चर्चा करतो त्यात हिंदुस्थानच्या लोकांना विशेष जिज्ञासा असेल.

बापू - मी जर चुकत नसेन तर मी म्हणेन की आर्थिक आणि आध्यात्मिक गोष्टींऐवजी यांना राजकारणात विशेष रस आहे. ही दुःखद गोष्ट आहे, परंतु परिस्थिती तर अशीच आहे.

डेव्हिस - राजकारणात आमचे ज्यांच्याशी भांडण आहे त्या साम्यवाद आणि फॅसिझम (फासीवाद) संबंधी तुम्ही ऐकले आहे काय?

बापू - स्पेनचा विचार केल्याशिवाय जवाहर आम्हांला शांत बसू देत नाही.

डेव्हिस - दुसरी गोष्ट. हे लोक अमेरिका, युरोप, दूर पूर्वेच्या प्रवासाकरिता जाणार आहेत अशा प्रकारे फिरत असताना कोणत्या गोष्टी विशेषत्वाने पाहिल्या पाहिजे हे जाणून घेण्यात त्यांना रस आहे. येथील संस्कृती नष्ट होणार नाही असे चिन्ह आहे. कोणत्याही गोष्टीचे वैशिष्ट्य आम्ही कसे ओळखावे?

बापू - प्रश्न अस्पष्ट जरी असला तरी उत्तर देणे कठीण नाही. तुम्ही जर मोठ्या शहरांकडे लक्ष देणार नाही तर तुम्ही हिंदुस्थानचा आत्मा पाहू शकाल. मोठी शहरे तर तुमच्या शहरांना शोभणार नाहीत अशी त्यांची भ्रष्ट नक्कल आहेत. याचप्रमाणे सरळ सरळ रेल्वेमार्गाशी जोडलेले नसतील अशा गावात तुम्हाला खऱ्या हिंदुस्थानचे दर्शन घेण्याकरिता जावे लागेल. सेगाव हे एक वाईट उदाहरण आहे असे तुम्ही म्हणू शकता. परंतु रेल्वे जात असेल तिथून वीसेक मैल दूर असलेल्या ठिकाणी तुम्ही गेला तर तुम्हांला हिंदुस्थानचे हार्द दिसू शकेल. अशा गावाला तारेचा वा टपालाचा स्पर्शसुद्धा झालेला नसला तरीही पश्चिमेत होणार नाही अशा संस्कारी जीवनाचे दर्शन तेथील लोकांमध्ये आढळू शकेल. तिथे तुम्हांला ही गोष्ट आढळेल. दुभाष्याच्या मदतीने का होईना तुम्ही अशा गावाला भेट दिली पाहिजे.

थोडे जास्त आतील भागात जा. तेथील पडलेल्या, मोडतोड झालेल्या घरात नष्ट न झालेल्या कलाकृतींचे दर्शन होईल. पश्चिमेत आढळते त्यापेक्षा अगदी वेगळ्या परंतु न मरणाऱ्या संस्कृतीचे तिथे तुम्हांला दर्शन होईल. तिथे घेण्यासारख्या किती तरी गोष्टी दिसतील. तुम्ही कोणत्या दृष्टीने पाहता यावर हे सर्व आधारित आहे.

प्रश्न - गावात आढळणाऱ्या ही जी संस्कृती आहे तिच्या लक्षणांचे तुम्ही कशा प्रकारे वर्णन कराल?

उत्तर - थोडे जास्त समजावून सांगा.

प्रश्न - उदाहरण सांगतो. तुम्ही सांगता की पश्चिमेत जशी संस्कृती आढळत नाही तशी संस्कृती गावात पाहायला मिळेल. ही संस्कृती जीवनाच्या तत्त्वज्ञानात आढळेल की कलेत की इतर कशात?

यावरून तुम्ही मला हिंदुस्थानच्या संस्कृतीत विशेष काय आहे त्याचे वर्णन करायला सांगत आहा. माझे तर म्हणणे आहे की ती आध्यात्मिक आहे, अपार्थिव आहे.

डेव्हिस - इथूनच आपण दुसऱ्या एका प्रश्नाकडे जातो. विश्वसंमेलनाकरिता पसंत करण्यात आलेला हा विषय आहे - ईश्वरेच्छा आणि तरुणांसमोर उभी असलेली कसोटी. एकाच धर्माचे लोक इश्वर संकल्पनेचा शोध वेगवेगळ्या प्रकारे घेतात. या गोष्टीवर काही प्रकाश टाकू शकाल काय? लोक जाणीवपूर्वक हे सर्व करत असतात की ते नकळत ईश्वराच्या इच्छेचे पालन करत असतात.

या दोन्ही गोष्टी सारख्याच नाहीत. मी तर ईश्वराचे उपकार मानतो की त्यांना या गोष्टीचे भान नाही. याचे कारण त्यांच्याकरिता ईश्वराचा हा शोध स्वाभाविक आहे. आपण श्वास घेतो, डोळ्यांचा वापर करतो, आपल्याला त्याचे भान नसते. प्रकृती चांगली असलेला माणूस आपल्या प्रकृतीचे वर्णन करत नसतो. आपण म्हणतो की ही गोष्ट असाधारण प्रकारे असामान्य आहे.

अशा प्रकारे ही आध्यात्मिकता सर्वांकरिता जाणीवेच्या समान पातळीवर नसते. वारसा म्हणून मिळालेले हे संस्कार आहेत. घरात कोणालाही माहीत नसते की नशा चढवणारी दारू ही काय गोष्ट आहे. तसेच दारूमुळे भान हरवले जाते याची दारू न पिणाराला कल्पनाच नसते. 'असा' आणि 'विशेष' हे शब्द तर माझ्या शब्दकोशात मला आढळणारच नाहीत.

साईटो - आमच्या जपानमध्ये जे आहे त्याच्याशी या गोष्टीचे खूप साम्य आहे.

बापू - असे तर पूर्व जी आहे ती पूर्वच राहील. परंतु आता असे राहिलेले नाही. याचे कारण जपानचे अमेरिकीकरण झाले आहे. आणि हिंदुस्थानचे शोषण करण्यात तो अमेरिका आणि विलायतेलाही मागे टाकील. जपानमधून कातडीच्या पट्ट्याची आयात होत असते !

साईटो - जपानमध्ये तयार होणाऱ्या स्वस्त गोष्टींचे काय? इथेही नुकसान होते?

बापू - त्या स्वस्त आहेत म्हणून नुकसान होते असे तर मी म्हणणार नाही. परंतु या गोष्टी आम्हांला अधिक गरीब करतात ही गोष्ट मात्र खरी आहे.

साईटो - वस्तु स्वस्त मिळतात हा फायदाच नाही काय?

बापू - नाही, यामुळे आम्ही आमचे हातपाय गमावून बसतो.

साईटो - याचा अर्थ तुम्ही या यंत्रयुगाच्या विरोधी आहा.

बापू - ही तर माझ्या मताची विकृती आहे. मी यंत्रांच्या विरोधी नाही, परंतु ते आपल्यावर जे प्रभुत्व गाजवतात त्याच्या मी विरोधात आहे. आज जपान म्हणा की अमेरिका म्हणा की ब्रिटन म्हणा हेच करत आहेत. हिंदुस्थान आणि जपानच्या समतेची गोष्ट करणे ही खोटी गोष्ट आहे. साम्य तर जपान आणि विलायतेत आहे.

ही स्पर्धा जपानने काढून टाकली पाहिजे. ही त्यांचे आणि शोषितांचेही नुकसान करते. आम्हांला गुलाम करते. असे करणे म्हणजे आमचा अपमानच करणे. थोड्याच वर्षांपूर्वी आम्ही आमचे कापड तयार करत होतो. आता आम्ही ते विलायतेतून आणि जपानमधून मागवतो. ही परिस्थिती कृत्रिम आहे. आमच्याकरिता आणि आणि संपूर्ण जगाकरिताही आम्ही कापड तयार करू शकतो अशी वस्तुस्थिती आहे. नैसर्गिक साधने आमच्याजवळ भरपूर आहेत. खरे म्हणजे रुई इथून निर्यात करणे आणि कापड बाहेरून बोलावणे याहून विचित्र अनिष्ट तर काहीही नाही. अकरा कोटी रुपये कातड्याची निर्यात होते आणि आम्ही पायात जे चपला, जोडे घालतो त्यांच्या रूपाने ते परत येत असतात.

प्रश्न - हिंदुस्थानचे उद्योगीकरण झाले पाहिजे काय?

उत्तर - हो. परंतु या शब्दाचा मी जो अर्थ करतो त्या अर्थाने. ग्रामीण जीवनात परत प्राणाचा संचार झाला पाहिजे. हिंदुस्थान आपल्या सर्व गरजांची पूर्ती गावखेड्यांद्वारे करत होता. आता शहरे गावांचे शोषण करत आहेत. आणि हे शोषण करणारे जेव्हापासून शहरात राहू लागले आहेत तेव्हापासून गाव भिकारी होऊ झाले आहेत.

प्रश्न - यामुळे तुम्हाला परत जुन्या अर्थव्यवस्थेकडे वळायचे आहे काय?

उत्तर - हो, नाही तर मला शहरात जावे लागेल. माझ्याकडून मोठा व्यवसाय चालवणे शक्य आहे, पण मी तो विचार सोडून दिला आहे — ते बलिदान म्हणून नाही तर माझे अंतःकरण त्याच्या विरोधात बंड करते म्हणून. रोजच्यारोज वाढत चाललेल्या माझ्या देशातील घाणीच्या वाढीत निदान माझा वाटा नसावा असे मला वाटते. लोकांना वाटते की इथे मी गूळ तयार करू शकतो हीच मोठी जादू आहे. परंतु मला माझा गूळ अमेरिकेतील टॉफीकरिता पाठवायचा नाही.

बहेन, तुम्ही तर मला अजूनच मोठ्या संकटात टाकत आहा.

साईटो आणि नोगुची - जपानी लोक. छत असलेली होडी.

कलेत तर तुमची बरोबरी कोणीही करू शकत नाही.

श्रीमती डेव्हिसचे लक्ष ताडाच्या हाराच्या चित्राकडे वेधले गेले. त्यावरून त्यांनी एक चित्र काढले. ताडाचे झाड आणि मोर. पाहा तर खरे. जर्मन लोक बिअरबद्दल दावा करतात की ती उन्हाळ्यात शीतल आणि हिवाळ्यात ऊबदार असते.

डेव्हिस - नवीन विश्व घडवण्याचा आमच्या प्रयत्नात तुम्ही संदेश देऊ शकाल काय?

बापू - केवळ इतके सांगा, माझ्या शक्तीप्रमाणे सतत पन्नास वर्ष अहिंसा अंमलात आणण्याचा प्रयत्न केल्यानंतर अहिंसेवरील माझा विश्वास कमी होण्याऐवजी वाढला आहे. याचे जर तुम्हांला काही मूल्य वाटत असेल तर तरुणांनी आपल्या मनात ढील पडू देता कामा नये. तुमची ही श्रद्धा जर सखोल होत गेली तर माझे जीवन सार्थकी लागले असे मी समजेन.

साईटो - पहाडावर जाऊन येशूने केलेला उपदेश मी वाचला होता. तुम्हाला ज्यामुळे आध्यात्मिक शक्ती मिळाली असा एखादा विशेष परिच्छेद तुम्ही सांगू शकाल काय?

मी धर्मपरिवर्तन करावे असे इच्छिणाऱ्या एका मित्राला एक परिच्छेद अनेकदा उद्धृत करून सांगितला होता. सर्वप्रथम ईश्वराच्या राज्याचा शोध घे; आणि तुझ्यामध्ये जे काही कमी आहे, ते सर्व तुला आपोआप लाभेल. टॉलस्टॉयच्या एका प्रकरणात या विचारावर विशेष भर दिला आहे. तो मी पाहिला — त्यामुळे मी मंत्रमुग्ध झालो, आणि त्या विचारामागील हेतूही ज्याप्रमाणे त्याने मांडला आहे, त्याने तर मी आणखीनच भारावून गेलो.

त्रावणकोरमध्ये या युगातील एक चमत्कार झाला आहे. तो स्त्रियांच्या प्रभावामुळे आहे. विशेषतः एक भगिनीमुळे, राज्याच्या राणीमुळे. मलबार हा एकमेव हिंदुस्थानातील असा भाग आहे की जिथे स्त्रियांना उच्च स्थान आहे. दुसरीकडे कुठेही नाही तसे स्थान मलबारच्या कायद्यांनी स्त्रियांना दिले आहे. आज जो राजा आहे त्याच्याआधी तिथे एक स्त्री राज्य करत होती. तिच्या सौंदर्यात आणि साधेपणात काही तरी असे होते ज्यामुळे पुरुष मुग्ध होऊन जात असे. असे असूनही महाराणी सन्माननीय पद्धतीने शांतपणे आपले काम करत होत्या. यामुळे मी घाबरलो. त्यांना पाहिले की असे वाटायचे की अत्यानंदाने माझा मृत्यू होणार आहे. मग मी आज ज्या

राणी आहेत त्यांनाही भेटलो. महाराजांनी खूप हिंमतीने आपले पाऊल उचलले आणि एक हुकूम केला की या कायद्याचा अक्षरशः अंमल करायचा आहे. वरून लादल्यासारखे यात काहीही नाही. यामुळे सर्व चुप बसले कोणीही काही बोलले नाही. असे ते दृश्य होते. यामागे एका स्त्रीचा हात होता.

उच्च वर्णीय हिंदूंचे हे आपोआप आणि स्वेच्छेने झालेले हृदयपरिवर्तन होते. मला वाटत होते की सरकारला पोलीस बसवावे लागतील आणि या टकरीत डोके फुटतील. परंतु असे काहीही झाले नाही. सुरुवात राजाच्या मंदिरापासून झाली. कोणत्याही प्रकारचे राजकीय दडपण नव्हते. हजारो लोकांना दाबूनही ठेवावे लागले नाही, मला तर माहीतच नव्हते की त्रावणकोरमध्ये २००० मंदिर आहेत. वायकोम येथील रस्ता ओलांडताच माझ्या हरिजन लोकांना मार खावा लागला होता. आता वायकोम मंदिरात कोणत्याही अडथळ्याशिवाय हरिजन प्रवेश करू शकतात. माझे तर मत आहे की हे सर्व ईश्वराच्या हातूनच झाले आहे. त्याच्या दर्शनासारखाच हा अनुभव आहे.

प्रश्न - ही सुधारणा संपूर्ण हिंदुस्थानात पसरेल?

उत्तर - असे झालेले पाहणे मला तरी फार आवडेल.

परंतु हे काम स्त्रियांचे आहे. हा कार्यक्रम पसरण्याबद्दल मी निःशंक आहे.

प्रश्न - महाराज तरुण आहेत?

उत्तर - हो. प्रेरणा त्यांच्या आईची आहे. जाहीरनामा पाहून मी फार उत्साहित झालो नव्हतो. हा अधिकृत मसुदा होता. हेतू राजकीय असू शकेल. तो हिशेबाने काढण्यात आला होता. परंतु रुढीग्रस्त लोकांनी इतके नमते घेतलेले पाहून नवल वाटले. मंदिराचा झालेला हा परिणाम पाहण्यासारखा आहे. एखादा अस्पृश्य वा पारिया दृष्टीस पडला तर स्त्रिया आकांडतांडव करत असत. हा सर्व चमत्कार पाहण्यासारखा आहे. माणसाच्या हातून जी गोष्ट अशक्य वाटत होती ती ईश्वराने करून दाखवली.

श्रीमती डेव्हिस - भगिनींकरिता असलेल्या पहिल्या महाविद्यालयाची शताब्दी. दुर्दैवाने आमच्यात काम करणाऱ्या भावनाशील आणि उत्तम स्त्रियांचे आणि मुलींचे हे प्रतिनिधित्व करू शकणारे नाही. अभ्यासक्रमात फेरबदल करून आपल्यामध्ये ज्या उत्तम गोष्टी आहेत त्यांचा त्यांना परिचय होईल आणि स्त्री पुरुषाची खरी

सहचारिणी होऊ शकेल असे होऊ शकेल काय? सध्या तर हे महाविद्यालय पूर्णपणे स्त्रियांचे आहे. मुलींच्या शिक्षणाबद्दल तुम्ही काय विचार केला आहे?

बापू - मुलींना पूर्ण शिक्षण दिले पाहिजे अशी माझी मान्यता आहे. मला खात्रीपूर्वक वाटते की पुरुषांची नक्कल करून स्त्रिया आपले कर्तव्य पार पाडू शकत नाही. स्त्रिया फार उच्च प्रतीची उपलब्धी मिळवू शकतात. पुरुष स्त्रीचा पूरक आहे. पुरुषाची नक्कल करून स्त्री पुरुषाला पूर्ण पुरुष करू शकत नाही.

# ५६. आर्यनायमबरोबर चर्चा

**१६-१२-१९३६**

लहान होतो तेव्हा प्रत्येक गोष्ट आश्चर्यजनक वाटावी अशी परिस्थिती होती. कळू लागलेल्या अवस्थेतसुद्धा मी ख्रिश्चन वर्तुळातसुद्धा वाढलो आहे. ईश्वरावरील श्रद्धा ही गोष्ट माझ्यात केंद्रस्थानी राहिली आहे. प्रलोभनाच्या वेळीसुद्धा ईश्वराचे अस्तित्व आणि माझ्या आईची आठवण डोळ्यासमोर राहत असे.

बौद्धिक कामाचा जीवनाशी संबंध राहिला पाहिजे. मी ब्रह्म आहे (अहं ब्रह्मासी) असे मानून बसलो तर जीवन व्यावहारिक नाही. कँटरबरीचे आर्चबिशप सर्व प्रकारे ख्रिश्चन धर्मविरोधी जीवन जगत आहेत. डोर्नाकलचे आर्चबिशप हरिजनांमध्ये राहतात आणि त्यांच्याशी सवर्णासारखा व्यवहार करतात. आर्चबिशपनी आशीर्वाद देऊन त्यांना पुढे आणलेले आहे आणि ते त्यांच्यात मिळूनमिसळून वागतात. ते बॅचलर ऑफ डिव्हिनिटी ही परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवून मी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. परंतु यांतील काही गोष्टी खटकत होत्या. त्यांच्या उदाहरणात वा प्रेरणेत काही विशेष आहे असे मला वाटत नव्हते.

मग रोमॉ रोलॉनी लिहिलेले तुमचे चरित्र हाती आले. मी स्वतःलाच म्हणालो की असे जीवन जर असू शकेल तर ते येशूच्या खूप जवळचे असेल. 'साधना' आणि रोमा रोलाने लिहिलेले तुमचे चरित्र वाचले. पुण्याहून गुरुदेव जेव्हा शांतिनिकेतनमध्ये परतले तेव्हा त्यांच्या ध्येयाकरिता मी स्वतःला समर्पित केले. मला येशूमय होऊन राहायचे होते. मी ज्या व्यक्तीचा अनुयायी आहे ते तुम्ही आहा.

मी हिंदूंसारखा जास्त आहे. मी माणसांचा शोध घेत असतो. आणि सत्य शोधण्याच्या कारणामुळे तुमच्याकडे आलो आहे. मी असे तर म्हणू शकत नाही मी सदाचारी ख्रिश्चन आहे. परंतु तसे होण्याची माझी इच्छा आहे. माझ्या लेखात मी कोणाला संबोधित करावे हे मी सांगू शकत नाही. तुम्ही माझ्या जीवनाजवळ आला आहा आणि मला समजावून सांगत आहा.

बापू - जर तुम्हाला असा अनुभव आलेला असेल तर तुम्ही तसे लिहून टाकायला पाहिजे. मी सांगितलेले आहे की हे जेव्हा आपण शब्दबद्ध होऊ तेव्हाच जग वाचू शकेल.

तुम्ही जे लिहाल ते तुम्हाला जर आवडले तरच त्याचा काही उपयोग होईल. माणूस दुसऱ्याचे ऐकतो, त्यावर विचार करतो आणि मग तो जे सांगतो त्यामुळे इतरांचे समाधान होते.

# ५७. कुमारी फिच

कुमारी फिच - पुस्तकामधून जे निघते ते शिकवण्यात फार हुशारी लागते असे नाही. मला हिंदू धर्म काय आणि कसा आहे हे समजून घेऊन शिकायचे आहे. सर्व मानतात की हिंदू धर्माचा जागृत आत्मा तुम्हीच आहा. हिंदू धर्माचे खरे मूल्य काय आहे ते मला समजून घ्यायचे आहे.

बापू - सर्व जीव एक आहेत (अद्वैत) ही मान्यता हिंदू धर्माचे विशेष वैशिष्ट्य आहे. एकाच विश्वव्यापी स्रोतातून जीवन उद्भवते - मग त्या ईश्वराला तुम्ही अल्ला म्हणा वा जिझस म्हणा वा परमेश्वर म्हणा की विष्णूच्या सहस्त्र नावाने ओळखा. इश्वराची नावे काही हजारात संपत नाहीत. जितकी देवाची नावे आहेत ती सर्व ईश्वराचीच नावे आहेत. तुम्ही ज्या नावाने जप करता ते नाव ईश्वराचेच असते. अशा प्रकारे तुम्ही त्याला वाटेल तितक्या नावाने संबोधू शकता. ईश्वर नामविहीनसुद्धा आहे. हे याचे वैशिष्ट्य आहे. याचे कारण ईश्वरामुळे केवळ माणसालाच मुक्ति मिळते असे नाही, तो सर्व प्राणीमात्रांना मुक्ति देतो. मग त्यांना माणसाचा जरी आकार मिळत नसेल तरी काही फरक पडत नाही. यामुळे हे कदाचित शक्य वाटतही नसेल. परंतु याचा अर्थ असा नाही की तो या सृष्टीचा सम्राट झाला आहे.

आपण जेव्हा विश्वबंधुत्वाबद्दल बोलतो तेव्हा आपण इथेच अडकतो आणि असे गृहीत धरून चालतो की इतर प्राणिमात्रांचे शोषण करण्याचा आपल्याला अधिकार आहे. तुम्ही किती बलिदान करू शकता याला काही मोजमाप नाही. परंतु तुमच्या गरजा तुम्ही निश्चितच सीमीत ठेवू शकता. आजच्या संस्कृतीच्या विरोधात जाणारी ही गोष्ट आहे. ती म्हणते की तुम्ही तुमच्या गरजा वाढवा. यामुळे तुमचे ज्ञान वाढेल. अशा प्रकारे तुम्ही अनंताला अधिक चांगले ओळखू शकाल. दुसऱ्या बाजूला हिंदू धर्म म्हणतो की स्वच्छंद इच्छा कधीही संपत नाहीत. सर्व गोष्टींचा उपयोग आपण आपल्या मौजेखातर करणे योग्य नाही. असे जीवन आदर्श आहे असे तुम्ही समजा.

कुमारी फिच - इथे तुमच्याजवळ काही वस्तू आहेत.

बापू - माझ्याकरिता लोक देतात. त्याऐवजी मीसुद्धा त्यांना काही देतो. ही मानवजातीची एक बाजू आहे.

कताईबद्दल आताच तुम्ही जे म्हणाला त्याचे भाष्य चरखा चालवणे आहे.

चरखा - गावांमध्ये वापरतात तोच.

कताई केलेले सूत - सामान्यपणे याचा व्यापार होत असतो.

प्रत्येकजण स्वतःपुरती कताई करत असतो. अखिल भारतीय कताई संघ विक्रीसंस्थेचे काम करत असतो. आम्ही लोकांपर्यंत जवळपास अडीच कोटी रुपये पोहोचवले आहेत.

प्रश्न - हरिजन आंदोलनाकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?

उत्तर - त्रावणकोरचे उदाहरण सर्वत्र पोहोचवणे. मी असे ऐकले होते की कोचीन, एर्नाकुलममध्ये हा बदल होतो आहे. परंतु ते याकरिता इतक्या लवकर तयार नव्हते. शारदा कायदा मृतवत झाला आहे. परंतु त्रावणकोरच्या राजाने काढलेल्या जाहीरनाम्याची शाई वाळते न वाळते तोपर्यंत लाखो अस्पृश्यांनी मंदिरप्रवेश केला होता. दुसरे काही होण्याकरिता वेळ परिपक्व होऊ द्यावा लागेल. इतका वेळ लागेलच. विहिरींची वाटणी करण्यात कोणत्याही अडचणी येणार नाहीत.

प्रश्न - हिंदूंकरिता मंदिरातील पूजेला फार महत्त्व आहे?

उत्तर - शिकल्या सवरलेल्या लोकांच्या मनात फार नाही. परंतु सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने या गोष्टीला फार महत्त्व आहे. लाखो लोक मंदिरात जातात. दक्षिणेतील मंदिरात जास्त लोक दिसतात. परंतु पश्चिमेत हे प्रमाण इतके नाही.

फिच - एका गोष्टीत मला फार रस आहे. पुढाऱ्यांची ओळख धर्माप्रमाणे होते. अशा प्रकारे धर्मांधता अजूनच पक्व होते ही अजूनच दुर्दैवी गोष्ट नाही काय? याचे काय कारण आहे?

बापू - विदेशी सरकारला वाटते की हे सर्व एकमेकांच्या भेटीगांठी घेण्याकरिता गोळा होत असतात. धर्मप्रेमाबद्दलचे वैमनस्य इंग्रज सरकार आल्यानंतर वाढले आहे. परंतु धर्मपरायणता वाढलेली नाही.

फिच - परंतु ब्रिटिश येण्यापूर्वी शत्रुत्व जास्त होते.

बापू - नाही, इथेच तू चुकते आहेस. हिंदूंना तलवारीच्या धारेवर मुसलमान बनवण्यात आले नव्हते. इंग्रजांची जशी तलवार आहे तशी मुसलमानांनीही साम्राज्याच्या स्थापनेकरिता तलवार वापरली होती हे खरे आहे. इंग्रजांना आपल्या तलवारीचे नांगर बनवू दे आणि मग काय होते ते पाहा. परंतु बाटाबाटीचा प्रकार

वर्तणुकीत आला नव्हता. इंग्रजांच्या बंदुकीच्या बळावर त्यांचे राज्य स्थापन होण्यापूर्वी पाद्री जास्त सिद्धी मिळवू शकले होते. आता त्यांना इतके यश मिळत नाही.

फिच - परंतु पाद्रीसुद्धा पूर्वीइतकी मेहनत करत नाहीत.

बापू - नाही, सोल्झबरी एक कंझर्व्हेटिव्ह राजकारणी व्यक्ती होते. ते त्यांना म्हणाले होते - 'तुम्हांला आमची मदत हवी असेल तर आमच्या अटींचे पालन करावे लागेल. तळहातावर जीव घेऊन तुमचे वडील, आजोबा फिरत होते.

मी मान्य केले पाहिजे की अनेक पाद्री कोणत्याही प्रकारच्या संरक्षणाशिवाय पृथ्वीच्या टोकापर्यंत जात होते, आफ्रिकेच्या जंगलात पोहोचले होते. ऑलीव्ह डोक सांगत होती की दक्षिण आफ्रिकेतील वन्य प्राण्यांमध्ये ती फार खुश राहत होती. मुसलमान मौलवी आफ्रिकेत एका टोकापासून तर दुसऱ्या टोकापर्यंत पायी मार्ग तुडवत जात असत. एकाही पाद्र्याला जंगली लोकांच्या हातून मारहाण झाल्याचे माझ्या ऐकिवात नाही. अनुयायांचा विचार केला तर त्यांना त्यांच्या कामाचे फळ जास्त मिळत होते. इस्लामचे बंधुत्व ते्व्हा जिवंत सत्य होते. जेव्हा की ख्रिश्चन धर्माचे बंधुत्व केवळ दाखवण्याची गोष्ट होती. जसे की प्राणिमात्रातील भ्रातृत्व ही गोष्ट जगण्याकरिताचा केवळ शब्दावडंबर होते त्याप्रमाणे.

फिच - मानवजातीचे बंधुत्व मुसलमानांकरिता तर मुस्लिम बांधवताच आहे.

बापू - संकुचित दृष्टीने हे खरे आहे, परंतु प्राणीमात्रातील बंधुत्वाची गोष्ट आपल्याकरिता इतकीशी खरी नाही.

फिच - हे पाहता शिखांमध्ये बिरादरी आहे हे खरे आहे.

बापू - हा हिंदू धर्मातून वेगळा झालेला एक मार्ग आहे. आता काही काळापूर्वीच शीख धर्म एक वेगळा धर्म आहे हे आपण मान्य करू लागलो आहो.

फिच - हे तर विशेषतः राजकीय हेतूमुळेच आहे ना?

बापू - हो.

फिच - हरिजनांची शीख धर्म स्वीकारण्याची प्रबळ इच्छा आहे हे खरे आहे काय?

बापू - मला कल्पना नाही. ही फार दुर्दैवी घटना आहे असेसुद्धा मी समजत नाही. हे लोक परत हिंदुत्वाकडे येतील. हे लोक जर खरोखर शीख होतील तर आतल्याआत विष पसरेल. माझी तर अशीच इच्छा आहे की हरिजनांनी अविभक्त असावे. नाही तर या लोकांचे विभाजन होईल. राजकीय दृष्टीने यांना हिंदू समजले जाणार नाही.

फिच - या लोकांची वेगळे मतदार म्हणून नोंदणी झाली तर?

बापू - हो, आजसुद्धा. इतर कोणत्याही धर्मात अस्पृश्यता नाही. हे ५०० शीख मतदारांमध्ये जोडले जातील. हरिजनांचे वेगवेगळे मतदारपत्रक असते. पण यांची निवडणूक सर्व हिंदू मतदार मिळून करतात. सर्व मतदार हरिजन उमेदवाराला मत देत असतात. अशी व्यवस्था आहे.

फिच - ही पद्धत सर्वांकरिता असू शकत नाही काय? अनामत रक्कम ठेवा, परंतु मतदारपत्रक सर्वांकरिता एक सामान्यच असले पाहिजे.

बापू - ही तर मोठीच प्रगती झाली असेल असे म्हणावे लागेल.

फिच - यात वादग्रस्त गोष्ट काय आहे?

बापू - प्रामुख्याने मुसलमानांकरिता. एक संयुक्त मतदारपत्रक असले तर उग्रवादी लोक निवडून येऊ शकणार नाहीत.

फिच - यासंबंधात अजून एक गोष्ट.

बनारसमध्ये कोणाला भेटू? कही सल्ला देऊ शकता? तिथे जाऊन यावे आणि खरोखर कोणाकोणाला भेटायला पाहिजे?

बापू - तू पंडित मालवीयजींना तर भेटायलाच पाहिजे. शिवप्रसाद गुप्त आणि भगवानदास यांनाही.

ग्लॅडिस ओवेन - काशी विद्यापीठसुद्धा.

# ५८. फैजपूर महासभेच्या वेळी लिहिलेली पत्रे

**१**

**२०-१२-१९३६**

नानाभाई मशरूवालांना पत्र -

भाई नानाभाई,

तुम्ही दोघांनीही पत्र लिहिले हे फार चांगले केले. मला लिहायला संकोच वाटायलाच नको.

मला वाटते की गुरुजन जसे असतील तसेच दिसणे चांगले: माझा अनुभव असा आहे की अनेकांबद्दल काहीही माहिती नसल्यामुळे त्यांच्याबद्दल आपले जे मत तयार झालेले असते ते बहुधा अतिशयोक्त असते. याचा परिणाम असा होतो की ब्रह्मचर्यादींचे महत्त्व कमी होत चालले आहे. मला लोक बालब्रह्मचारी समजतात तेव्हा ब्रह्मचर्याचे महत्त्व कमी होते. जो मन, वचन, काया आणि स्वभावाने शुद्ध आहे त्याचे तेज काही वेगळेच असते. असे ब्रह्मचारी आज कुठून मिळणार? गरुजन जसे आहेत तसे दिसले तर त्यांचा प्रभाव कमी होत नाही. परंतु त्यांचा दोष झाकण्याचा जेव्हा प्रयत्न करण्यात येतो तेव्हा त्यांचा प्रभाव आभासी असतो.

संततिनियमनासंबंधी तर माझे विचार कृत्रिम उपायांच्या विरोधातच आहेत. यामुळे माझ्याकरिता अशा सगळ्या मर्यादांचा प्रश्नच उपस्थित होत नाही. परंतु आपण भेटू तेव्हा मी तुमचे मत समजून घेईल. हे ज्ञान कोणाकरिता जरी आवश्यक असेल तरी याचा प्रचार मर्यादित राहूनच केला पाहिजे.

स्त्री-पुरुषांमधील सूट सीमीतच असली पाहिजे याबद्दल शंका असूच शकत नाही. परंतु मर्यादेची सीमा ठरवणे कठीण होत असते. ही सीमा स्वतंत्रपणे ठरवण्याची गोष्ट नाही.

तुमची प्रकृती चांगली असेल.

बापू

२

**२१-१२-१९३६**

चि. हरिलाल,

तू माझ्याकरिता आठ महिन्याकरिता दारू सोड. विजयशंकरजीकरिता नऊ महिने आणि तुझ्याकरिता परमेश्वर म्हणेल तितक्या काळाकरिता दारू सोडू शकशील काय?

बापू

## ५९. दंतमंजन

तीन पाव कडूनिंब + एक पाव खायची पाली +अर्धा पाव सरसूचे तेल. हे सर्व मिसळायचे.

निबाच्या काड्या उकळून घ्याव्या.

# ६०. फैजपूर महासभा - आठवणी

१) सकाळी स्वागत. स्वागताध्यक्षांनी बापूंना प्रार्थना सुरु करण्याकरिता सांगितले. दास्तानेंनी प्रार्थनेचे संचालन केले. देव आणि दास्ताने या दोघांनी गीतेचे पूर्ण श्लोक म्हटले.

२) सगळ्यांनी ओझे उचलायला मदत केली.

३) रस्त्यात गोष्टी. चतुर्थ श्रेणीच्या रस्त्यावर मोटारी कशा नेऊ शकता येतील आणि काँग्रेस भरवू शकाल? सरकारी नोकरांचा खोडसाळपणा. म्हाल्याला एका सुंदर मुलाला आणायला सांगितले. त्याप्रमाणे त्याने एका मुलाला आणले. त्यासंबंधी गोष्टी.

४) प्रेमाबहेनच्या स्त्री स्वयंसेविका.

५) आप्पासाहेबांनी भंगीखात्यासंबंधी अनेक सूचना काढल्या, शारीरिक व्यंग.

२१ तारखेला भंगी मंडळींशी चर्चा. सोमवारी.

# ६१. भंगीकाम

आप्पासाहेब, भंगीकाम तुम्ही आधी सुरू केले की मी? हे मला माहीत नाही.

आप्पासाहेब - माझा तेव्हा जन्मसुद्धा झालेला नव्हता. भंगी म्हणून जन्म तर पुण्य केले तरच होतो. राजा होण्यासाठी पूण्य करावे लागत नाही असे मला म्हणायचे नाही. कोणत्या कर्मामुळे माणूस भंगी वा राजा होतो हे मला माहीत नाही. परंतु भंगी होण्यात पुण्य आहे कारण भंगी झाल्यामुळे जास्तीत जास्त सेवा करण्याची संधी मिळते. भंग्याचे काम मुळीच कमी प्रतीचे नाही: नाही: डॉक्टर. डॉक्टरचे काम उच्च प्रतीचे का समजले जाते? जो भंग्याचे काम चांगल्या प्रकारे करू शकत नाही तो चांगल्या प्रकारे देशकार्य कसा करू शकतो?

महासभेचे काम जरी यशस्वीपणे सुरू असेल, परंतु त्याचे सफाईखाते काम नीट होत नसेल तर कॉलऱ्याचा स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही. खाल्ल्याशिवाय माणूस दोनतीन दिवस भागवू शकेल, परंतु भंगीकामाशिवाय तर एक दिवसही चालणार नाही. महासभेसारखा मेळावा भरवायचा तर त्याकरिता जास्तीत जास्त काळजी खाण्याच्या व्यवस्थेची आणि साफसफाईची घ्यावी लागते. स्वयंसेवकांना काम करणे कोणीही शिकवलेले नसल्यामुळे त्यांचे काम मला फार ढिले वाटते.

रामराज्य तेव्हा येईल जेव्हा भंगी आणि ब्राह्मण यांच्यात कोणी फरक करणार नाही. त्यांचे काम समाजाकरिता किती उपयोगी आहे हाच विचार केला पाहिजे. आणि स्वराज्यसुद्धा विधिमंडळात गेल्याने येणार नाही, परंतु आदर्श भंगी निर्माण केल्याने येईल. या आणि इतर स्वयंसेवकांनी आपले काम फलाशा न ठेवता करत राहिले पाहिजे. फैजपूरला आदर्श गाव करण्याकरिता प्रतिनिधींनी आणि इतरांनी प्रयत्नात कोणताही कसूर ठेवायला नको.

# ६२. खिरोदा गावातील मुलाखत

**२२-१२-१९३६**

मंगळवार

चार मैल चालत गेलो. चालत असताना सोबत प्रतापशेठ आणि विनोबाजी होते. विनोबाजींबरोबर बापूंनी संपूर्ण रस्त्यात खूप गोष्टी केल्या. आनंद शंकरभाईंकडून पुस्तक लिहवून घेत होते. त्यासंबंधात गोष्टी केल्या.

मग ईशोपनिषदवर आले आणि विनोबाजींना थोड्या स्पष्टीकरणासह त्याचा अनुवाद करायला सांगितला. कारण हिंदू धर्माच्या सर्व पुस्तकांना जरी आग लागली तर ईषोपनिषदात हिंदू धर्माचा अर्क आला आहे असे त्यांना वाटत होते. याच्या पहिल्या मंत्रात इतर सर्व श्लोकांवरील भाष्य आले आहे असे वाटते.

'अरविंदचे भाष्य मला मुळीच आवडले नाही.'

नंतर मनुस्मृतीची सुधारित आवृत्ती काढण्याची सूचना केली.

मी म्हणालो, "मणिलाल शर्मांची अनधिकृत आवृत्ती आहे."

बापू - असेल तर तिचा उपयोग करा.

पुढे बापू म्हणाले की बायबलसुद्धा संशोधित आवृत्ती आहे. अजूनही त्यात दंतकथा खूप भरलेल्या आहेत. कुराणचीसुद्धा हीच गोष्ट आहे. कुराणच्या इतर सर्व प्रती जाळून टाकण्यात आल्या आहेत आणि ही एकच प्रत ठेवण्यात आली आहे.

यानंतर सेगावचा संपूर्ण कार्यक्रम समजावून सांगितला. भंगीकाम, गोरक्षण, भाजीपाला, खजुरीचा गूळ. एवढ्याने संपूर्ण गाव आदर्श करण्याची योजना आहे.

गायीच्या दुधापासून तूप बनवण्यात प्यारेलाल यशस्वी झाले आहेत. अशा बाबतीत नवल वाटावे इतके ते हुशार आहेत. आम्ही एक शेर दुधातून पाच तोळे तूप काढत होतो, ते सव्वा सात तोळ्यापर्यंत पोहोचले आहेत.

खिरौंद्याला जाऊन धनाजी नाना चौधरींची सर्व हकिगत विचारली. महारवाड्यात गेले. महारवाड्याच्या बाजूलाच लोकल बोर्डाची एक मोठी विहीर जरी होती तरी महार एका लहानशा हौदावरूनच पाणी आणत होते. मोठ्या कुंडातून गायी म्हशी पाणी प्यायचे.

धनाजी चौधरींनी त्याग केलेल्या या गावात येत असताना आपण तीर्थयात्रा करत आहो असे गांधीजींना आणि आम्हांलाही वाटले. इतर ७५ ते ८० लोकही तुरुंगात गेले होते. परंतु माझ्यासमोर मी हेच पाहत होतो.

'विष्णुमय जग: वैष्णवांचा धर्म, भेदाभेद अमंगळ' आणि दुसरीकडे 'खरा हिंदुधर्म अस्पृश्यता जाणत नाही' या घोषणांचे फलक होते. परंतु या घोषणेवर अंमल होत होता काय?

तुमच्याकडे एकीकडे सवर्ण आणि दुसरीकडे हरिजन आणि गायी, म्हशी. बैलांना पाणी ओढायला लावता. हे पाणी तुम्हांला चालते, परंतु हरिजन चालत नाहीत. ही किती लाजेची गोष्ट आहे? भेदाभेद अमंगळ असल्याचे आपल्याला जाणवते आहे. मग आपण मंगल कसे? पशूंना वेगळे नाव आहे, हरिजनांना काही वेगळे नाव आहे काय? यामुळे आपण पारतंत्र्याने घेरले गेलो आहो.

पार्लमेंटमुळे स्वराज्य मिळणार नाही. महासभेचे सदस्य होऊनही मिळणार नाही. अस्पृश्यतेचा नाश करूनच स्वराज्य मिळेल. मला उद्याच कळवा की आम्ही ही विहीर हरिजनांकरिताही मोकळी केली आहे.

# ६३. प्रदर्शनाचे उद्‍घाटन

**२५-१२-१९३६**

शुक्रवार

वैकुंठ महेतांचे भाषण -

पूर्वीचे प्रदर्शन आणि आजचे यांच्यात थोडेसे अंतर आहे. लोकदृष्टीने, लाभदायक पद्धतीने हे प्रदर्शन भरवले आहे. पूर्वेची परिस्थिती - मोठमोठे व्यवसाय करणारे बराच खर्च करून येतात. लहान लहान व्यवसाय करणारांना यात स्थान नसते.

प्रदर्शनाचा आर्थिक आणि शैक्षणिक दृष्टीने उपयोग. आधी आपला भर आडंबरावर आणि तमाशावर होता. शैक्षणिक भाग मागे पडला होता.

बापू - वर्तमानपत्रात तुम्ही पाहिले असेल की महासभेची ही बैठक एका खेडेगावात होते आहे. याची जबाबदारी माझी आहे आणि प्रदर्शनाकरिता तर मी डिसेंबरच्या आधीपासून आलो होतो आणि सर्व काळजी घेतो आहे असे म्हटले तर ते अर्धसत्य होईल. परंतु प्रदर्शनातील उणिवांकरिता मीच जबाबदार आहे. ही नम्रपणाची भाषा नसून हे सत्य आहे. हा सत्याग्रहीचा शब्द आहे.

ए. आय. सी. सी. आणि ए. आय. एस. ए. यांनी ही व्यवस्था करायची होती. आणि मी त्यांना विनंती करत सांगितले होते की तुम्ही हे अधिवेशन खेड्यात न्याल तर फार चांगले होईल. महाराष्ट्रवाल्यांकडून तुम्ही जे काम घेत आहा त्याच्या मोबदल्यात तुम्ही जीव द्यायला तयार व्हायला पाहिजे.

दास्ताने आणि देव म्हणाले - ‘हो, आम्ही हे काम करू’. परंतु या दोन्ही गोष्टींकरिता मी कसा जबाबदार असेन हे मी सांगितले. खेडेगावात मुंबई, लखनो वा दिल्ली तयार करणे हा तर विचित्रपणा होईल. याकरिता पुण्यात हे अधिवेशन का भरवू नये? हे अधिवेशन एका खेडेगावात घेतल्यामुळे त्यात ज्या उणिवा निर्माण होतील त्यांची जबाबदारी माझी आहे असे समजा. चरखा संघाचा मी अध्यक्ष आणि उद्योग संघाचा मी मार्गदर्शक राहिलो आहे. यामुळे या लोकांनी माझ्या सूचनेप्रमाणे काम केले आहे.

मी तुम्हांला सांगतो की तुम्ही तर आजकालचे गावकरी आहा, मी तर वर्षांपासूनचा खेडूत आहे आणि आता तर मी सेगावमध्ये जाऊन बसलो आहे. परंतु हे शरीर तर शहरात वाढलेले असल्यामुळे खेड्याच्या लायक राहिलेले नाही.यामुळे मलेरिया झाला, परंतु त्यातून मी धडधाकट होऊन आलो. जवाहरवर सर्व ओझे टाकले आणि लिहायचे आणि इतर सोपे काम सरदारवर सोपवले. सरदार तर आजारी पडले आणि मी धडधाकट आहे. याचे खरे कारण हे आहे की माझे जिथे अंतःकरण आहे तिथे माझे शरीर आहे.

या प्रदर्शनातील चांगल्या गोष्टीचे श्रेय तर नंदबाबूंनाच द्यावे लागेल. मी तर त्यांना म्हणालो होतो की माझी लाज तुमच्या हाती आहे. मी तर कलाविहीन पशू आहे. हं, निसर्गाने काही कला माझ्यात टाकली आहे खरे, परंतु ती देणे माझ्या हाती नाही. नंदबाबूंनी मला सुरुवातीपासून निर्भय केले. ते तर मला म्हणाले होते की हे सर्व ओझे तुम्ही माझ्यावर टाका. मी तर जिथे कला नाही तिथेही कला निर्माण करू शकतो. यामुळे आत आल्यानंतर कला पाहाल. परंतु बाहेरूनसुद्धा तुम्हाला कलात्मकता आढळेल. सपूर्ण रचनाच कला आहे. म्हात्रे तर स्थपती - शिल्पकार आहेत. त्यांनी तर खूप केले आहे, परंतु त्यात कला तर नंदलालने टाकली आहे. यांनी बुद्धी स्वतःची वापरली आहे, परंतु गावकऱ्याच्या हाताचा त्यांनी उपयोग केला आहे. तुम्ही फुकटात प्रदर्शन पाहत आहा, परंतु आत जाण्याकरिता चार आणे खर्च करा.

माझ्या डोळ्यांनी तुम्ही काय पाहाल हे सांगतो. या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून तुम्हांला प्रदर्शन पाहायचे आहे हे कळले. मृतप्राय व्यवसायाला परत जिवंत करणे उद्योगसंघाचे काम आहे तर चरखासंघाला हिंदुस्थानला खादीधारी करायचे आहे. परंतु हे काम ते करू शकले नाही. असे असले तरी मला नाराजी नाही. इथे आजूबाजूला गिरण्या स्थापन होत असतीलही. त्यांच्याशिवाय उपाय नाही. आज तर इतर जे काही काम सुरू आहे ते बेकायदेशीर आहे. असे करून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची मुळे तुम्हांला कापून टाकायची असतील तर कापून टाका.

हे प्रदर्शन तमाशा नाही, खेळ नाही, लोकांचे डोळे विस्फारून टाकणारी गोष्ट नाही. तुम्हाला गैरमार्गाला नेणारी गोष्ट नाही. या गोष्टी तर गावकऱ्यांनी स्वतः तयार केल्या आहेत. शिकलेल्यासवरलेल्या लोकांनी तयार केलेल्या नाहीत. त्यांच्या हातात लेखणी घेण्याची शक्ती राहिलेली नाही. पक्षाघात झाला आहे. या गोष्टी त्यांनी शक्ती असलेल्या हाताने तयार केल्या आहेत.

या वस्तुंचा जिथे प्रवेश होईल तिथे दुप्पट लाभच होईल. राष्ट्रपतीला (काँग्रेसच्या अध्यक्षाला राष्ट्रपती म्हणून संबोधण्याची प्रथा होती.) मला म्हणाले की या गोष्टी संयुक्त प्रांतात पाठवा. तिथे मी या नवीन करून टाकीन. हवाई जहाजात जाऊन मी काही चंद्र आणायला सांगून राहिलेलो नाही. परंतु त्यांनी मातीचे पुतळे, त्यांची मुलेमुली, त्यांचे गवत तसेच त्यांनी तयार केलेल्या काही गोष्टी. जमनालालजींच्या पैशाने नाही तर त्यांनी आपल्या हाताने तयार केलेल्या. राष्ट्रपतींचे म्हणणे आहे की जमनालालजी लुटतील. इथे स्वाभाविकपणेच लोक गच्च भरलेले आहेत. हे पस्तीस कोटी लोक काय करतील हे मला माहीत आहे. कालजी गोष्ट तर देवाला माहीत. आपल्या युगातील गोष्ट आपल्याला माहीत असली पाहिजे. डोळे उघडे ठेवून तुम्ही जा. मग तुम्हांला काय दिसेल? हे लहानसे प्रदर्शनच दिसेल. हे सर्व कालच तयार झाले आहे. लोहाराची भट्टी तापते तसे. राष्टपती म्हणतात की शस्त्र नाही, अवजार म्हणा. अवजारे, हे गवत गुंटूरच्या सीतारामशास्त्रीनी तयार केलेले आहे. चश्म्याकरिता तयार केलेल्या या सुंदर गोष्टीला म्हणतात ऐनकखाना.

जुना झालेलो म्हातारा आहे पण शिकवायची बुद्धी राहिली आहे. तुम्हांला टूथब्रश मिळणार नाही, परंतु दांतण मिळेल. हा सर्व पाठ शिकवण्याकरिता ही शाळा तयार करण्यात आली आहे. सात दिवसात तुम्ही भरपूर शिकू शकाल. एक ब्राह्मण चांभार होऊन हे सर्व करतो आहे. या सर्व गोष्टी वर्ध्यात तयार झाल्या आहेत. कताई करणारीचे स्वराज्य. तीन पैशांऐवजी तीन आणे मिळतात म्हणून स्वराज्य. खेड्यात धुळीतून धान तयार करतात. आणि शहरात धानाची धूळ तयार करतात.

खेडुतांना फार मोठा पाठ मिळतो आहे. नंदलालनी शातिनिकेतनमधून काहीही आणलेले नाही. मी यांना सांगितले होते की महाग गोष्टी पावसात खराब होण्याची शक्यता असल्यामुळे कोणतीही महागडी गोष्ट आणू नका. यामुळे नंदबाबूंनी इथेच सर्व गोष्टी तयार केल्या. इथल्या लोकांना त्यांच्या नवीन डोळ्यांनी नवीन गोष्टी पाहायला मिळतील. तांदुळाची मोलाना आणि धिरूभाई धूळ तयार करत असतात. शहरी लोक गावांच्या खांद्यावर बसलेले आहेत. आणि त्यांना चिरडत आहेत.

शहरी लोकांना वाटले पाहिजे की सर्व पैसे गावात गेले पाहिजे. थोडी जास्त किंमत जरी असली तरी पैसे पाण्यात तर जाणार नाहीत.

वैकुंठ दिलगिरी व्यक्त करत म्हणाले होते की हे सर्व लहानशा पायावर उभारण्यात आले आहे. परंतु ही काही वाईट गोष्ट नाही. इथे जी कोणती वस्तु आहे ती नवीन तयार करण्यात आली आहे. कागद

रसायनशास्त्रज्ञांनी तयार केला आहे. गवतापासून तयार करण्यात आलेला कागद. वेळू आणि केळी. हे सर्व बिघडवून ते सुधारण्याकरिता तुम्ही इथे आला आहा.

राष्ट्रपतींना बैलाच्या रथात आणले. खेडूत होऊन इथे या असे म्हणण्यासारखे हे आहे.

राष्ट्रपतीला मोटर आणि इतरांना का नाही? हे तर तीर्थक्षेत्र आहे, मक्का आहे. इथे चालत या. चालत येऊन पूजाअर्चा करा. नमाझ पढा. तुमच्यावर लाचारीची जरी वेळ आणली जात असेल तरी दुःखी होऊ नका. कार्यकारिणीत कोणताही पक्षपात केला जाणार नाही. इथे सर्व सारखे आहेत. ना गरीब, ना श्रीमंत. आपण तर सर्व भंगी व्हायला आलो आहो. झाडू घ्यायचा, लाथा खायच्या, उष्टेखरकटे खायचे. यापेक्षा तर आपल्या मनासारखे, स्वच्छ हाताने केलेले चांगले. सुंदर हवा आहे, जमीन कसदार आहे, पाणी आहे, आणि पाणीसुद्धा कितीही घ्या. परंतु दोन विहिरी आहेत. तुम्ही गाकऱ्यांच्या खांद्यावर तर बसायला आलेला नाही? तुम्ही तर खुदाई खिदमदगार होऊन आला आहा.

# ६४. प्रदर्शनात

**२७-१२-१९३६**

मला खेद होतो की मी इथे ८।। वाजता ऐवजी आता - इतक्या उशीरा पोहोचलो. इतके जास्त लोक आले होते की प्रदर्शनाची व्यवस्था मोडकळीस आली. येथील संचालकांना अपेक्षित होते त्यापेक्षा जास्त लोक आले. याकरिता त्यांची तयारी नव्हती. असे असले तरा माणसाला जितके काही करणे शक्य असेल तितके या लोकांनी केले. अजून कोणी नाही तर माझी काळजी घ्यायला यायचे आणि चुकून कोणी खादी वा ग्रामीण कलेची गोष्ट घेतली तर त्यामुळे या लोकांना आणि मला तर पुण्यच मिळेल.

समासात - कोणी जर गांधीला मारायचा ठराव केला तर? . . . याच्या ६७ वर्षांच्या आयुष्यानंतर आता काय नवीन होणार आहे? परंतु गांधीचे सिद्धांत अडवले तर?

कॉंग्रेसचा संपूर्ण विस्तार म्हणजे एक प्रदर्शनच आहे. या प्रदर्शनाला आलेले यश नंदबाबूंचे आहे. त्यांनी निश्चय केला होता की प्रदर्शन आणि कॉंग्रेसकरिता एकच व्यवस्था ठेवायची. फार कमी खर्च झाला. इतक्या कमी खर्चात कॉंग्रेसचा कोणताही कार्यक्रम झालेला नाही. हं, इतके खरे की माझ्या दृष्टीने काही खर्च जास्त झाले. परंतु ही तर पहिली कॉंग्रेस. जमीन घेण्यात काही जास्त खर्च झाला. परंतु खेडेगावात कॉंग्रेस भरवण्याकरिता आपल्याला उत्तेजन मिळेल इतके तर आपण केलेच आहे. आज तुम्हांला अनुभव आला असेल की नवनवीन लोक पुढे येतच असतात. स्वयंसेवक भरपूर असूनही कमी होत आहे असे वाटत होते. खाणारे इतके आले होते की त्या सर्वांची व्यवस्था करणे कठीण जात होते.

नवीन काही सांगायची इच्छा नाही. आधीच जे सांगितले होते त्याची पुनरावृत्ती करतो. चरखा संघाला वा खादीला अठरा वर्ष झाली आहेत. ग्रामोद्योग संघाचा पाया १९३४ साली मुंबईत घातला. जेव्हा मी खादीची सुरुवात केली तेव्हा मी लोकांना खात्रीपूर्वक सांगत होतो की चरख्याच्या सुताच्या धाग्याद्वारे स्वराज्य मिळेल. लोकांना ही मूर्खपणाची गोष्ट वाटत होती, आणि आजसुद्धा यावर त्यांचा विश्वास बसत नाही. स्वराज - पूर्णस्वराज - वा पूर्ण स्वातंत्र्य म्हणजेच आझादी म्हणजे इतर कोणत्याही सरकारचे आपल्यावर राज्य नसावे.

हे स्वातंत्र्य चौफेर असले पाहिजे.

(१) अर्थसिद्धी. उपासमार होऊ नये याचा अर्थ असाही नाही की कोरडी भाकरी मिळावी. आपण तर सुखाने राहावे, तूप लावलेली भाकरी वा पोळी मिळेल, दूध-भाजी मिळेल आणि मांसाहारही मिळेल. आणि कपडे म्हणून केवळ लुंगी वा लंगोटच नाही तर गृहस्थासारखे कपडे मिळावे. अंगरखा, धोतर, साडी, चोळी वगैरे सर्व पाहिजेच. आज जसा फॅशनचा पोषाख मिळतो तसा नसला तरी चालेल. जुन्या काळात कसे कपडे मिळायचे ते तुम्ही पाहिले असतील. तेवढा शृंगार निश्चितच करू शकता.

(२) आता राज्यकारभारासंबंधी - राज्यसुद्धा हिंदुस्थानी असले पाहिजे. तो युरोपचा नमुना नसावा. इंग्रजांच्या पार्लमेंटसारखा, सोव्हिएट रशियासारखा वा पोर्चुगालसारखा वा इटलीसारखा नसावा.

मी कोणाचे अनुकरण करू? माझ्या राजकोटचे स्वातंत्र्य अशा प्रकारचे नसावे. हिंदुस्थानच्या भूमीला भावेल तसे असावे. तिथे राज्य असेल परंतु त्याचा कारभार कसा असला पाहिजे हे मी आज सांगू शकत नाही. गोलमेज परिषदेत मी सांगायचे धाष्टर्य केले होते की घटना पाहिजे असेल तर कॉंग्रेसला घ्या. उमराव जरी आला तरी तो झेंड्याला प्रणाम करील. परंतु ही व्यवस्था कशा प्रकारे येईल हे मी सांगू शकत नाही. पंच म्हणतात ते परमेश्वर. यामुळे हिंदुस्थानला ओळखणारे जे करोडो भले लोक आहेत ते म्हणतील ती राज्यव्यवस्था आली पाहिजे. हे राजकीय स्वातंत्र्य केवळ एका व्यक्तीला नसेल तर ते सर्वांचे राज्य असेल.समाजवादी बंधूंना माझे सांगणे आहे की -

सबै भूमी गोपालकी.

यात अडथळा कुठे आहे?

ज्याच्या मनात ही गोष्ट खटकते तोच अडथळे आणतो.

हे शासन जमीदाराचे नसेल, की गिरणी मालकाचे नसेल की गरिबांचेही नसेल. हे तर त्या गोपालांचे असेल जो गायींचे पालन करतो. तो तर ईश्वराचे नाव घेत असतो. हे स्वातंत्र्य ना तर जमीनदाराचे आहे ना माझ्यासारख्या लंगोट घालणाराचे. साधुसंन्यासी सांगतात की हे शरीरसुद्धा आपले नाही, केवळ आत्मा राहतो. हा खरा समाजवाद आहे. याची अंमलबजावणी होईल तर सर्व काही मिळेल.

(३) नैतिक स्वातंत्र्य की सामाजिक - माझी तर इच्छा आहे की हे दोन्ही मिळावे. हे चक्र असो वा चौकोन असो प्राचीन काळापासून जी चालत आली आहे ती नीती आहे. सत्य आणि अहिंसा आहे.

चौथा कोपरा धर्माचा. धर्माशिवाय हा पायासुद्धा उभारता येत नाही. कोणी म्हणेल की माझा तर सत्यावर विश्वास आहे. त्याला विचारा की तुझा जर सत्यावर विश्वास आहे तर ईश्वरावर आहे काय? मी तर म्हणेन की देवाचे नावच सत्यनारायण. माझे सत्य तर जिवंत सत्य आहे. इतके की जगातील सर्व जरी नष्ट झाले तरी हे टिकून राहील. सत श्री अकाल. सर्व काम सत्याच्या आधारे करा असे गीता सांगते. कुराण सांगते की खुदा हक आहे. मुसलमान हिंदूंचे आणि परस्परांचे, आणि शीख दोघांचेही गळे कापतील आणि ख्रिस्ती या तिघांचेही गळे कापतील तर हे चालणार नाही. कोणी जर म्हणेल की हा खुदाला मानत नाही हे बरोबर नाही. त्याच्या नकारामुळे त्याला थोडेच कोणी मारून टाकू शकतो?

या चारही कोपऱ्यांचे चांगल्या प्रकारे जतन केले पाहिजे. यांचे कोणी कानस लावून तुकडे करू शकत नाही. याचे तर सर्व कोपरे बरोबर ९० अंशाचे असले पाहिजे. यालाच पूर्ण स्वराज्य म्हणा की रामराज्य म्हणा.

मी म्हणालो - 'सुताच्या धाग्यावर जर स्वराज्य टिकलेले असते.' हेच यंत्र आज मला याची आठवण करून देते आहे. विधिसभेच्या कार्यक्रमावर माझा विश्वास नाही असे काही नाही. याला नाहीसा करणाराही मीच आहे आणि आणि अंसारीसाहेबांबरोबर याला परत जिवंत करणाराही मीच आहे. आपण कार्यक्रमाशिवाय शासन चालवू शकत नाही. शासन ना तर तुमच्याकरिता असते ना माझ्याकरिता. आपण सर्व जर विधिसभेत जाऊ तर आपण तिथे मावणार नाही. ३५ कोटी लोकांमधून १,००० प्रतिनिधी जाऊ शकतीलही. परंतु यांना हुकूम तर आपणच करायचा आहे. काँग्रेसमध्ये फार थोडे लोक प्रतिनिधी आहेत. परंतु मत सर्वांना नाहीच. मलासुद्धा मत नाही. सहा वर्षाची शिक्षा झाल्यामुळे नापास. ३१।। कोटी जे शिल्लक आहेत त्यांच्यासोबत मी आहे. सांगा ३१।। कोटी लोकांसोबत राहायचे की ३।। भावंडाबरोबर राहायचे? ज्यांच्या मांडीवर मी बसलो आहे ज्यांचे दूध मी प्यालो आहे त्याच्यावर मी स्वार कसा होऊ? बहिणींना सांगितले. त्या म्हणाल्या भावांबरोबर.

ही तर लोकाच्या हिशेबाची गोष्ट झाली. ३।। कोटी लोकांमधून काँग्रेसमध्ये किती जातील? हजार जागांकरिता आपण भांडलो तर स्वराज्याची आपण कत्तलच केली म्हणायचे. अशी कत्तल सुरू आहे. मी तर घाणेरड्या लोकांकरिता हा कार्यक्रम सुरू केला नव्हता, सज्जन लोकांकरिता केला होता. परंतु घाणेरडी माणसे आली तर मी काय करू? काँग्रेसच्या नावावर घाणेरडे लोक गेले. तर मग मी काय करू? परंतु बाकीचे नंतर काय करतील? आपण तर मत द्यायचे आहे, परंतु हिंदुस्थानात तर वटहुकुमाचे राज्य सुरू आहे आणि त्यात काँगेस सामील आहे. यामुळे इतिहासात सांगता येणार नाही. . . इतके पुरे आहे.

बदमाश पण निघून जातील. त्यांच्याबद्दल असे म्हणता येणार नाही. जवाहरलालला फाशी झाली तरी हरकत नाही. तो तर शौर्याने फासावर चढेल आणि हसेल. पण यावर महासभावाल्यांची सही मिळणार नाही.

सुभाषची सुटका झाली पाहिजे. कोणी बंगालमध्ये जाईल आणि स्थानबद्धांना कदाचित सोडायला लावील. हे सुद्धा शक्य नसेल तर निदान काँसवाल्यांकडून वाईट गोष्ट होणार नाही इतकी तर काळची घेता आलीच पाहिजे. घाणेरड्या गोष्टीत आपली सही कधीही मिळायला नको. वटहुकुमाने चालणारे राज्य म्हणजे बादशहा म्हणतील तसे करा. या राज्याला आपली मान्यता मिळू शकत नाही. परंतु यामुळे स्वातत्र्यही मिळणार नाही. स्वातंत्र्य सुताच्या धाग्याने मिळेल. हा सुताचा धागा सोडला तेव्हापासून स्वातंत्र्य गमावणे सुरु झाले. इंग्रजांचा दोष तर होताच.

आपल्याला वेड लागले आहे. चरखा सोडला आणि आपण बाहेरून कापड आणायला सुरुवात केली. आपल्याला जर बेकार राहायचे नसेल, खायला प्यायला मिळावे असे वाटत असेल आरामात राहायचे असेल तर सुताचा तागा घेणे पाप नाही. ऐकतो की आपण लँकेशायरचे कापड मागवतो आहो. याचा अर्थ आपण चौकोनाचे दोन कोपरे जाळणे आहे. या ताग्याऐवजी आपल्याला कोणतीही गोष्ट दिली तर आपण गुलाम होऊ. माझ्या जीवनात झाले तसे होऊ द्यायचे नाही. परंतु घडवणारा तर ईश्वर आहे.

सेगावला जाऊनसुद्धा ही गोष्ट सांगेन. बेकारीने आपण उपाशी मरत आहो, इंग्रजी राज्याच्या कारणामुळे नाही. या एका कारणामुळेच इंग्रजांच्या राज्याने बेकारी निर्माण केली आहे. जे होऊ नये ते झाले. परंतु दिवाळखोरीत माठा वाटा आपलाच आहे. बेकारी ईस्ट इंडियापासून आली. परंतु आज आपण जे आळशी झालो आहो तो आपला दोष आहे. घरी जाऊन जरी पैसे दिले तरी ते घत नसत. दारूच्या धंद्यातून पैसा मिळवणे हे नीतिविरोधी आहे. मी हाच प्रश्न विचारीन.

ताडाच्या झाडापासून ताडी बनते. त्याऐवजी मी गूळ बनवतो आहे. असा गूळ तुम्हांला कधीही खायला मिळणार नाही. यातून काही हजार रुपये मी उत्पन्न मिळवीन. आम्ही जर यांतून दारू काढली असती तर जास्त रुपये मिळाले असते हे मी कबूल करतो. परंतु यामुळे स्वातंत्र्य मिळणार नाही. आणि या लोकांनी यापासून दारू जर तयार केली तर यांच्यासमोर कडक सत्याग्रहही करता येणार नाही. परंतु काँग्रेसच्या धोरणाबरोबर चालणारी गोष्ट खादीशिवाय जर दाखवली तर ती नाहीशीच करावी लागेल. परंतु हे कोणाला सांगू नका.

इतके सांगतो की सुताच्या धाग्याने स्वर्ग मिळेल. परंतु यासोबत कोणी धोकेबाजी करत असेल, खून करत असेल आणि खादी घालत असेल तरी त्याची मानसिकता खादीची नाही असे म्हणावे लागेल. आपले अंतःकरण जर खादीने ओतप्रोत असेल तर स्वातंत्र्य अडवू शकेल अशी कोणतीही शक्ती नाही. आपण आपल्या ग्रामीणांनासुद्धा हे शिकवले पाहिजे. हे जर केले तर सांसदीय कार्यक्रमाचीसुद्धा गरज पडणार नाही. त्याआधीच स्वराज्य मिळेल.

एका वर्षात स्वराज्याबद्दल बोललो होतो. यात लाजेची काही गोष्ट नाही. जी अट पाळायला सांगितले होते तर आजसुद्धा स्वराज्य मिळवू शकेल. आज हिंदू-मुसलमान ऐक्य कुठे आहे? मुंबईत किती खोडसाळपणा सुरू आहे? आज एक कोटी चरखे कुठे आहेत? अर्धा तास कताई कुठे आहे? सर्व कातत नाहीत म्हणून आज तर पाच तास कताई करायला सांगतो आहे. खादी शास्त्र काय आहे? अस्पृश्यता गेली काय? त्रावणकोर तर समुद्रातील बिंदू आहे.

अस्पृश्यता गेली तर हिंदू-मुसलमान आलींगन देतील. अस्पृश्यतेचा पाळामुळापासून जर नाश केला तर ही सगळी तुमची भावंड होतील. हरिजनांनाच नाही तर सर्वांना अस्पृश्य मानले तर काय बिघडेल? अस्पृश्यता सोडायला तर मी हिंदूंना सांगितले होते ना? आपण दारू सोडली? मी तर शाळा, न्यायालये वगैरे सर्व सोडण्याविषयी बोललो होतो. तर मग पार्लमेंट सोडण्याचा आग्रह करायची काय आवश्यकता? मी तर बनिया आहे. जी गोष्ट लोकांना आवडली नाही ती सोडून दिली. धर्मनीतीला जी गोष्ट अनुकूल असेल ती ठेवली.

साध्या शब्दांत तुम्ही फारच मोठी गोष्ट सांगितली. जो चरख्याला आपलेसे करील त्याला सुताच्या धाग्यावर स्वराज्य लटकलेले दिसेल. आज तर मी व्याख्या करून टाकली आहे. ती अशी - एक मध्यबिंदू आहे. संपूर्ण हिंदुस्थान तर अल्ला म्हणा की ग्रंथसाहेबांचे चक्र आहे, सूर्यमंडळ आहे. याचा मध्यबंदू चरखा म्हणजे चक्र आहे. याच्या आजूबाजूला सूर्याचे ग्रह फिरत असतात. हे केवळ नऊ ग्रहच नाहीत, ते अनंत आहेत. आकाशात काय नऊ ग्रहच आहेत? अनंत आहेत. तारका तर अगणित आहेत.

हे ग्रह आहेत गृहोद्योग, हे चक्र जर तुम्ही मिटवाल तर सर्व ग्रह मिटून जातील. आज तर सूर्य सेवा करतो आहे. तसेच इतरही ग्रह सेवा करत आहेत. मी यांचा खगोलशास्त्रज्ञ आहे. मूळ सूर्य स्थिर कराल तर इतर ग्रह आपोआपच सूर्योभोवती फिरतील.

इथेच तुम्ही सुदर्शनचक्र अथवा सूर्यनारायण पाहाल. हा तर एक नमुना आहे. एक संपूर्ण हिंदुस्थान बनवल्यानंतर संसदेत जाण्याची गरजच पडणार नाही. स्त्रियांना तुरुंगात जावे लागणार नाही, आणि जावे लागलेही तरी ते आपल्या पापामुळे. माझ्यासारखा पागल अहिंसेबद्दल बोलतो आहे, परंतु दगड फेकाल तर ७०,००० इंग्रज मारू शकाल? मग ३५ कोटी लोकांबद्दल काय म्हणायचे? यामुळे स्वातंत्र्य मिळेल? ही भीती दूर करण्याकरिता सेगावमध्ये बसलो आहे. माझी तर अजूनही तुरुंगात जायची हिंमत आहे. ती हिंमत घेऊनच मी बसलो आहे. (टाळ्या.) परंतु टाळ्या वाजवू नका. मला तर ६७ वर्ष पूर्ण झाले आहेत. तुम्ही जागे व्हा.

माझ्यात हीच गोष्ट भरलेली आहे, म्हणूनच मी इतके सगळे बोलतो आहे. परंतु कोणत्या मुद्द्यावर तुरुंगात जाऊ? फासावरसुद्धा लटकेन? जवाहर तर हसतमुखाने फासावर चढेल. तसेच मी सुद्धा आश्वासन देतो. मी काही माझ्याकरिता आश्वस्त नाही. मी तर कदाचित रडेनही. परंतु याकरिता कारण निर्माण व्हायला पाहिजे. पस्तीस कोटी लोक हिंसेचे नाव सोडतील, चरख्यात अहिंसा वाचतील, आणि अहिंसा जर सोडतील तर मी सांगितलेल्या पद्धतीने चरख्यावर जर विश्वास ठेवतील आणि त्यावर अंमल करतील तर पार्लमेंट, तुरुंग, फाशी यांकरिता अर्ज करायची वा लिनलिथगोकडे जाण्याची आवश्यकता पडणार नाही.

लिनलिथगोंनी काँग्रेसमध्ये येऊन सांगावे की तुम्हांला काय हवे ते घ्या. ते विचारतील की मी कसा जाऊ? हा संदेश जर खेडोपाडी पोहोचला तर आज जे आपल्या मनात, कानाकोपऱ्यात इंग्रजांबद्दल जी शत्रुत्वाची भावना भरलेली आहे, साम्राज्यावादाची मूर्ती झालेले आहेत, तेच इंग्रजांचे प्रतिनिधी लिनलिथगो काँग्रेसमध्ये येऊन म्हणतील की ‘चूक झाली, तुम्ही हिंसक आतंकवादी नाही, उलट अहिंसक आहा. तुम्ही ठेवाल तरच राहू.’ यावर आम्ही म्हणू की अशा प्रकारे राहाल तर सगळ्या विदेशी लोकांनी बाहेर निघून जावे अशा कायद्याची आम्हांला गरजच नसेल. तुम्ही दुधात साखरेप्रमाणे एकजीव व्हाल तर तुम्हांला कोणीही वेगळे करू शकणार नाही. तुम्ही दुधात साखरेप्रमाणे हिंदुस्थानात एकजीव व्हा. हे माझे स्वप्न आहे. सेगावमध्ये राहूनही मला हे स्वप्न इतके काही स्पष्टपणे दिसत आहे की ते तुम्हांला सांगितले पाहिजे असे मला वाटले.

येत्या काँग्रेसमध्ये आपण भेटू की नाही हे कोणाला माहीत आहे? मी तर यमराजासमोर ठेवून बसलेलो आहे. आज थोड्याश्या शब्दांत इतकेच सांगायचे होते. मनुष्य, स्त्री, पुरुष, हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिस्ती सर्वांना स्वातंत्र्य आहे. सर्वांना समान अधिकार आहेत. सबै भूमी गोपालकी.

# ६५. भंगीसेना

३०० माणसे, १५ गुरातमधील, १० स्त्रिया महिलाश्रमात. खामगाव. अकोला राष्ट्रीय शाळा.

बापू - स्वयंसेवकांनी भंग्यांचे काम केले, त्यात मी भाषण काय करायचे होते? दोष नाहीसा होऊ शकत नाही. आता तर भविष्यातील गोष्ट राहिली आहे. गुजरातमध्ये जे करवून घ्यायचे होते ते तिथे सांगेन. तुमचे आभार मानायची काय आवश्यकता.

तुम्ही भंगीकाम करण्याकरिता जे नाव नोंदवले आहे त्याबद्दल मी आभार मानणार नाही. याचे कारण पाप धुण्याची प्रथा मीच तुम्हांला दिली आहे. तुम्ही जे काम केले ते सामान्य दृष्टीने आभाराकरिता पात्र ठरते.

आप्पांना (आप्पासाहेब पटवर्धन) तर पुरेशी माणसे मिळणार नाहीत अशी भीती वाटत होती. परंतु मिळाली. इतके की इतर प्रांतातील लोकाना नाही म्हणावे लागले. महिलाश्रम तर बृहन्महाराष्टातच आहे. गुजराती तर येणारच ना? कारण आप्पांनी गुजरातची सेवा केली आहे. खालच्या पातळीवरील काम केले म्हणून जर आभार मानायचे असतील तर मी ते मानणार नाही. काम चांगले केले असेल म्हणून आभार मानायचे असतील तर मानतो. बाकी ही तर कर्तव्यपालनाची गोष्ट आहे. असे म्हणून भंगी काम हे तुच्छ काम नाही असे मी सांगतो आहे. आणि हा उदरनिर्वाहाचा व्यवसाय करणे हेसुद्धा तुच्छ काम नाही. आपल्याजवळ या शास्त्राची पुस्तके नाहीत. भंगीकाम नीच मानले जाते, हरिजनातही भंगी नीच मानले जातात. मला सावडाला घेऊन गेले होते. तिथे भंगीवाडा फार दूर असल्याचे मला सांगितले. महार, मांग, चांभार आणि मग चौथा भंगीपुरा.

भंग्याचे पाणी पिता?

तर म्हणतात ‘नाही.’ मग महार हरिजन कसे म्हणवतात? या पवित्र व्यवसायातून आजीविका मिळवतात ही मोठी गोष्ट आहे. इतर व्यवसायात जितके काम मिळते त्यापेक्षा भंग्याच्या व्यवसायात अधिक काम मिळते. आमच्याकडे भंग्याला २० रुपये देत असतात. इतर कारागिरापेक्षा भंग्याचे काम खूप सहज असूनही त्याची किमत जास्त द्यावी लागत असते. बॅरिस्टर, पदवीधर यांच्या तोडीचा हा पगार असतो असे म्हटले तर आश्चर्य वाटायला नको.

इथे जो अनुभव मिळतो तो इथेच मिळतो. भंगी काम सोडून माणूस निघून गेला तर घाणच होणार नाही. यामुळे ते आपल्याजवळ आले असे म्हणता येत नाही. मी जे भंगी, भंगी करतो आहे ते तुम्ही सहन करता आहा खरे, परंतु ते तुम्हांला आवडते की नाही हे मला माहीत नाही. भंग्याची व्याख्या तर सफाईचे पुण्य काम करणारा तो भंगी. मलेरिया, कॉलरातून वाचवणारा तो भंगी.

महादेव सीताराम रणदिवे, वकील.

तुम्ही इतक्या कठीण प्रसंगी स्वयंसेवकांची जी सेवा केली आहे त्याबद्दल आभार. हा तर आपला पहिला प्रयोग होता. पावसाळ्यात काम जरी बंद झाले तरी तुम्ही ही भूमिका फार चांगली पार पाडली आहे. सगळे तुमची तारीफ करत आहेत. तुम्ही मूक सेवक असला तरी लोक असे म्हणत आहेत. तुम्ही सगळे स्वेच्छेने सेवक झाला आहा असेसुद्धा मला सांगण्यात आले आहे. स्वयंसेवकांकरिता ही काही लहानसहान गोष्ट नाही. महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे हे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रात खूप चांगले कार्यकर्ते मिळतात. त्यांच्यात सरदारकीची भावना नसते तर सेवेचीच भावना असते.

स्वराज्य आमचा जन्मसिद्ध हक्क आहे असे ज्याप्रमाणे टिळकांनी सांगितले तसेच स्वयंसेवक भावही त्यांनीच दाखवला. लोकमान्यांच्या युगापासून ही परंपरा निर्माण झाली. मौन राहून त्यागाच्या भावनेने काम करणाऱ्या या लोकांना ५०, १०० रुपये नको असतात. यांना तर केवळ १५ रुपयांची गरज असते. विकासाने विकृत न झालेल्या महाराष्ट्राला ही गोष्ट लागू पडत नाही. त्यांनी जर जास्त मागितले तर त्यांना गुजरातचा स्पर्श झाला असे म्हणावे लागेल. महाराष्ट्राच्या दृष्टीने तर यश मोठ्या कार्यकर्त्यांचे असते. यामुळे महाराष्ट्राची कीर्ती उज्ज्वल होते. तुम्ही तुमचा वेळ सेवेत व्यतीत करत राहा, आणि प्रसंग आला तर मूकपणे सेवा करत राहा.

समासात - एक रोमांचक कथा आणि ग्रामीण झोपडीचे दार.

गावातील शिस्त शहरात नेली पाहिजे.

मिरवणूक आणि स्वराज्य मिळवण्याची पद्धती.

# ६६. नगररचना समिती

झोपड्या तयार करणे, - पाणी - दिवाबत्ती - सजावट- - पावसामुळे कार्यकर्त्यांची फार मोठी कसोटी झाली. रामदासभाईंची सेवा. नंदलालनी फार कठीण परिस्थितीत काम केले. आप्पासाहेब, रणदिवेंनी हे सर्व ओझे आपल्या डोक्यावर उचलले. संस्कारांनी कार्य होते हे दाखवून दिले. लोकांच्या दृष्टीत या सर्व गोष्टी आणून देणारे नंदलाल. बंग भुसावळचे व्यापारी. देशपांडे मालाचा हिशेब ठेवणार. अभियंता आणि हिशेबनीस. आप्पासाहेब आणि भागवतांनी आपली झोपडी सोडली नाही.

अ. हिं. काँ. का. समितीच्या सभेत तुफान गर्दी लोटली होती. महासभेचे मुख्य काम प्रदर्शन तर अजून सुरूच आहे. तिथे जाऊन पाहा. बाकी काम तर तुमचे प्रतिनिधी करतील. प्रदर्शनात जाल तर तुमचे डोळे दिपून जातील.

नगररचनेविषयी -

नगररचनेबद्दल सांगतो, ते तर माहीतच असते. किती कष्टाने हे काम करावे लागले हे मला माहीत आहे. याबद्दल धन्यावाद दिले वा दिले नाही तरी काही फरक पडत नाही. हे तर स्वेच्छेने स्वयंसेवक झाले आहेत. कर्तव्यात बदल झाला म्हणून काही कोणी धन्यवादाची मागणी करत असतो? या सर्वांनी इथे मेहनत केली आहे. ते आले नसते तर सुशोभित होईल असे काम झाले नसते.

धन्यवादाला पात्र तर आहेतच. माझ्यासारखेच सेवक आहा, मग धन्यवाद कशाचे देऊ? तुम्ही मला आणि सरदार वल्लभभाईंना येथील काम किती कठीण होते ते लिहून द्या.

दोष हा आहे की आपण केलेल्या कामाचे गुणदोष आपण सांगत नाही. सांगितले तर चांगले होईल. प्रत्येक विभागाच्या लोकांनी आलेला अनुभव आणि खर्च सांगावा. नंदलालनी कलेतील रहस्य सांगावे. शांततापूर्ण स्वराज्य मिळवायचे असेल तर या सगळ्या गोष्टीं आवश्यक आहेत. सुरवातीला तर असे प्रशिक्षण मिळायलाच पाहिजे.

ही सुरुवात महाराष्ट्रापासून का होऊ नये? कार्यक्षमता आणि बुद्धी तर आहेच.

# ६७. श्री आणि श्रीमती हीथ

**१-१-१९३७**

श्रीमती हीथनी नूतन वर्षाभिनंदनाच्या निमित्ताने लिहिलेले एक सॉनेट कॅडबरीची स्पर्धा.

अनेक धर्मांच्या उपदेशाचे संकलन.

कैदी - जॉन ॲन्डरसन कार्ल हीथ यांना भेटायची मागणी करत होते..

ज्या गतीने हे सुटका करत होते त्या गतीने तर सर्वांना सोडायला शंभर वर्षे लागली असती.

बापू - लोक फसवणूक करणाऱ्या या ज्वलंत प्रश्नावरून दुसरीकडे लक्ष जावे म्हणून धूळफेक करणारी ही तुरुंगमुक्ती आहे. यामुळे मी जॉन ॲन्डरसनला सांगितले की मला बंगालमध्ये पिरू द्या आणि बंगालची ओळख करू द्या. ही तर चांगली गोष्ट आहे की कैद्यांचा इंग्रज अधिकाऱ्याच्या निष्पक्षपातीपणावर जसा विश्वास आहे तसाच माझ्यावरही आहे. त्यांनी थंड हृदयाने उत्तर दिले की मला सरकारी नियंत्रणात राहूनच काम करावे लागेल.

हीथ - आशा आहे की सुभाष बोस माझ्याशी साध्यासरळ भाषेत बोलतील.

बापू - एक सामान्य विचाराचे वा सिद्धांताचे प्रतिपादन तुम्ही करावे असा माझा तुम्हांला आग्रह आहे. जे तयार असतील त्यांच्याकडून मी काम घेईन. जर शक्य असेल तर त्यांना तुरुंगातून सोडलेले मला आवडेल. परंतु 'त्यांना सोडा' या ठरावाला मी विरोध केला होता.

सरहद्द (प्रांतासंबंधी) - मला सरहद्द प्रांतात जायचे आहे. वायव्य प्रांताबद्दल काँग्रेसने केलेला ठराव मला फारसा आवडला नाही. याचे कारण मी रचनात्मक पक्षाशी सहमत आहे. परंतु संपूर्ण धोरण साम्राज्यवादी शोषणाचे नाही. हे धोरण विलायतेतील सत्ताधारी लॉर्ड हेलिफॅक्स वा लॉर्ड झेटलॅन्डच्या धोरणानुसार नाही. लष्कारातील सेनापतींशी मी बोललो आहे, त्यावरून मी हे सांगतो आहे.

माझा अहिंसेवर विश्वास आहे की नाही ही गोष्ट अप्रस्तुत आहे. रचनात्मक कार्यक्रम म्हणजे मूळ रहिवासी जनतेला काम देणे.

हीथ - आपले ध्येय तर वाटाघाटी करण्याचे, समजावून आधुनिक संस्कृती पोहोचवण्याचा प्रयत्न करण्याचे आहे. इतरांवर प्रभुत्व गाजवण्याच्या एकाच मनिषेने प्रेरीत होतील असे हो लोक नाहीत. असे जरी असले तर यात आत्मवंचनेकरिता भरपूर वाव आहे.

बापू - लष्करी माणसाच्या मनात खोलवर मानवसेवेचे ध्येय नसते. हवी ती किंमत चुकवून लोकांमध्ये शांतता नांदावी अशी सरकारची इच्छा असते. इतके की ते लोकांना घाबरवून दाबून ठेवू इच्छित असतात. परंतु अशी परंपरा नाही. कोणाचे हित व्हावे म्हणून हिंसेचा वापर करणे हा आदर्श असू शकत नाही.

हीथ - मी काँग्रेसचा ठराव दाखवला तर तो त्यांना आवडणार नाही.

बापू - मला कल्पना आहे की इंग्रजांचे मानस यामुळे चिडेल.

हीथ - टीका करण्याकरिता वा विरोध करण्याकरिता रचनात्मक पद्धतीचा उपयोग करणे मला आवडत नाही,

बापू - जी काही वस्तुस्थिती आहे ती सरळ सरळ स्पष्टपणे सांगितली पाहिजे. तीसुद्धा इतकीच सेवा आहे. हा ठराव केला तेव्हा माझ्या मनात अनेक गोष्टी होत्या. अब्दुल गफ्फार खाननी आदिवासी प्रजेत जाऊन राहण्याची इच्छा दाखवली आहे.

हीथ - यांच्या मनात कपट आहे असे जरी गृहीत धरून चाललो तरीसुद्धा ही गोष्ट गळी उतरवण्याकरिता जनतेच्या मनात अहिंसेबद्दल श्रद्धा आहे की नाही याचा शोध घ्यावा लागेल.

बापू - जोपर्यंत हे जुळलेले आहेत तोपर्यंत साम्राज्य टिकवून ठेवण्याच्या विचाराला कपटीपणाचा हेतू म्हणता येणार नाही.

हीथ - परंतु एखाद्या माणसाचा हेतू वाईट आहे असे समजून आपण किती काळ पुढे जाऊ शकू?

बापू - नाही, परिणामाचा मी अशा प्रकारे अंदाज करणार नाही. आपला हेतू वाईट आहे असे या लोकांनी मान्य करावे अशी माझी इच्छा नाही. चांगल्या हेतूची किंमत तर ईश्वरासमोर होत असते, माणसासमोर नाही.

हीथ - सुरुवातीला घाबरवणारे शब्द सांगतात की हेतू अनिष्ट आहे.

बापू - एखाद्या गोष्टीचा हिशेब करताना कृतीवरून हेतूचा अंदाज करावा लागतो. न्यायाधीश जसे घडलेल्या कृतीवरून हेतूचा ताळमेळ लावतात तसेच. हजारो लोकांचे प्राण घेत असतानाही माझा हेतू उदात्ताहून उदात्त असू शकतो; परंतु मानवसमाज तो कधीही मान्य करणार नाही. सैन्य स्वतंत्रपणे मोर्चा काढत असेल तर वायव्य सरहद्द प्रांतातील लोक त्याला शांतिपूर्ण मोर्चा कसा समजू शकतील?

हीथ - याचा अधिक विचार करावा लागेल. तुम्ही जे पाऊल उचलता त्यावरून तुमच्या हेतूचा अंदाज करता येईल असे मला वाटत नाही.

बापू - असे जर करणार नाही तर लोकांशी संबंधित गोष्टी तुम्ही किमान संस्काराने चालवू शकत नाही. सापाला मारून टाकायचे तर त्याच्या हिताकरिताच, माझ्यासारख्या अहिंसक माणसाचा दुसरा कोणताही हेतू असू शकत नाही. परंतु मी भित्रा आहे हा आरोप मी मान्य केला पाहिजे. याचे कारण सापाला निर्माण करण्यामागेही ईश्वराचा काही ना काही चांगला हेतूच असला पाहिजे.

खूप क्लिष्ट अशा माझ्या तिसऱ्या प्रश्नावर आता मी येऊन पोहोचलो आहे. सामूहिक धर्मपरिवर्तनाची समस्या.

तुमच्या हेतूबद्दल माझ्या मनात पूर्ण श्रद्धा आहे. परंतु इतकाच बिशप आझरिया यांचाही हेतू स्वच्छ आहे. हे अंतःकरणापासून फार प्रामाणिक माणूस आहेत. त्यांनी अंर्तनादाविषयी बुद्धिगम्य आणि खरीखुरी अहिंसावृत्ती आत्मसात केली आहे, आणि समाधान वाटावे असे वातावरण तयार केलेले असल्यामुळे त्यांचा हेतू पवित्र आहे असे समजूनच सुरुवात करायला पाहिजे. संबंध मजबूत पायावर उभारलेले असले पाहिजे याकरिता काय केले पाहिजे? इथे दोन आध्यात्मिक हेतू प्रेरक आहेत. या दोघांचा मेळ कसा घालावा? आझरियाला तुम्ही किती ओळखता ते मला माहीत नाही. ते इतके चांगले ईश्वरभक्त असल्यामुळे हे सर्व ऐकल्यामुळे मी फार दुःख आहे.

बापू - हो, यांचे पत्र आले होते. हे मला भेटायला येऊ शकतात, परंतु भेटता भेटता फार वेळ होऊन गेला आहे. मी तर इथे ग्लॅडस्टनची वृत्ती स्वीकारेन. आपण एखाद्या कृत्याला वाईट म्हणू शकतो, परंतु त्याच्या कर्त्याला नाही. हेलिफॅक्स सज्जन माणूस आहे. परंतु त्यांची अनेक पावले इतकी वाईट आहेत की त्यांचा बचाव करता येऊ शकत नाहीत. यामुळे मी इतकेच म्हणेन की आझरियाची आध्यात्मिक दृष्टी आहे इतके मी मान्य करतो. परंतु त्यांची अनेक पावले कलंक लावणारी आहेत.

हीथ - तेसुद्धा तुमच्याबद्दल असेच म्हणतात.

बापू - आपण तडजोडीचा मार्ग काढू शकतो. कल्पना करा की हे मूलभूत धोरण स्वीकारतात की ते आपला संदेश पसरवण्याकरिता जे साधन हाती येते त्याचा लाभ घेतात. यावर मी इतकेच म्हणेन की तुमच्या हेतूबद्दल मला शंका नाही, परंतु तुमच्या कामाबद्दल मी सहानुभूती दाखवू शकत नाही.

हीथ - एकमेकांना समजून घेण्याकरिता पहिले पाऊल व्यक्तीने स्वतःहोऊन उचलू नये काय? मी काल रात्री आझरियांशी बोललो होतो. ते तुम्हाला भेटायला तयार आहेत.

श्रीमती हीथ - तुम्हा दोघांच्या संयुक्त सुज्ञपणाच्या परिणामी लवकर भेटीगाठी व्हायला पाहिजे. गोष्टी पराकोटीला पोहोचल्या आहेत. आणि आता जास्त कटुत्व, जास्त वितुष्ट आणि जास्त शत्रुत्व निर्माण होईल.

बापू मी - मी जे काही लेख लिहिले आहेत ते धर्मांतराच्या कामाकडून त्यांचे मन दुसऱ्या दिशेने वळवण्याच्या दृष्टीने लिहिले नाही. माझा जो वाद आहे तो गोष्टी अतिशय वाढवून सांगण्याबद्दल आहे. मी काय करू शकलो हे तुम्हांला माहीत आहे. आंध्रच्या पुढाऱ्यांना जागे करण्याचा प्रयत्न करतो आहे. जर मी अतिशयोक्ती केली असेल तर सांगा.

हीथ - आत्म्याचे ऐक्य आवश्यक आहे. अतिशयोक्तीने भरलेल्या गोष्टी खूप झालेल्या आहेत. त्यांची चौकशी केली पाहिजे.

बापू - तुम्ही जे म्हणता आहा ते मान्य करणे यामुळेच मला कठीण वाटते. हरिजनांचे धर्मांतर करणे हे आपले ईश्वरदत्त ध्येय आहे असे जर त्यांना वाटत असेल तर वाटो. ईश्वर त्यांना सद्बुद्धी देवो. अनेक ख्रिस्ती लोकांना वाटते की मी खादीबद्दल थापा मारतो आहे. येशूने मला मार्ग दाखवावा अशी त्यांची इच्छा आहे. याबद्दल एखादा मध्यममार्ग शोधून काढा असे म्हणण्याला काहीही अर्थ नाही. कोणी जर अतिशयोक्ती करत असेल तर त्याला अतिशयोक्तीने उत्तर देणे योग्य होईल काय? आझरियांच्या आध्यात्मिक सौंदर्याने मी प्रभावित आहे. परंतु त्यांनी जी जाहीर वक्तव्ये दिली आहेत ती सिद्ध करण्याकरिता मी म्हणेनच की त्यांनी मला भेटावे इतके तर आपण सर्वांनी मान्य केले आहे.

मला भेटावे म्हणून मी त्यांना प्रेमाच्या उबेने भरलेले आमंत्रण देतो.

# ६८. डिक शेपर्डचे कामकाज

काँग्रेसने शांतता स्थापित व्हावी म्हणून ठराव केला आहे. मी डिक शेपर्डला ओळखतो. त्यांच्या आंदोलनाने प्रभावित झालेल्या अनुयायांनाही मी ओळखतो. हे लोक सध्या अहिंसेबद्दल एक लेखसंग्रह वाचत आहेत. त्यांच्याबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे?

रोनल्ड डंकन - अभ्यास करणे चांगले आहे, परंतु काही कामही हाती घेणे आवश्यक आहे.

अखेरीस किंमत बौद्धिक मान्यतेची नसते तर अहिंसेवर ज्याचा पाया असतो अशा ठोस कामाची किंमत असते. याविषयाशी संबंधित आज दुपारीच झालेल्या गोष्टी सांगतो कारण आपण अनेकदा मोहात पडतो आणि आवश्यकतेपेक्षाही जास्त सावधगिरी बाळगत मित्रांसोबत गोष्टी करताना फार जास्त काळजी घेतो. या दोन्ही गोष्टी अहिंसेशी विसंगत आहेत. अतिशय  नम्र भाषा वापरणे हे त्यांच्या हृदयात असलेल्या हिंसेचे झाकण असते. आणि स्पष्ट बोलणे ही काही हिंसक प्रवृत्ती नाही.

सरहद्दीबद्दल जेव्हा ठराव झाला तेव्हा शंभरच्या शंभर टक्के मी . . . खानसाहेब माझ्याकडे ठोस सूचना घेऊन आले होते की मी त्यांना तुरुंगात जाऊ द्यायला पाहिजे. मी म्हणालो, ‘नाही.’

प्रदर्शनाच्या वेळी मी गोष्ट काढली. मी म्हणालो की माझ्यात आधीच आग आहे. परंतु भांडण्यासारखा मुद्दा पाहिजे ना? खानसाहेबांनी विचारले की तुम्ही तुरुंगात जावे अशी लोकांची इच्छा आहे काय? कारावासाचे निमंत्रण नाकारले तर तुम्हाला कोणी जर भित्रा म्हणाला तर ती गोष्ट मी समजू शकेनही. परंतु अशी काही मागणी तुम्ही केली नव्हती. यामुळे तुम्ही कोणत्याही प्रकारे चिडण्याचे मुळीच कारण नाही. दुःख सहन करण्याची गोष्ट असेल तर तुरुंगाबाहेर राहणे हीसुद्धा कारावासापेक्षा मोठी यातना आहे. माझे म्हणणे त्यांना पटले असेलच असे मी समजत नाही, परंतु त्यांनी माझा सल्ला मान्य केला.

मग ते म्हणाले की ठराव मान्य करा.

अशा घटनांचा सामान्यपणे मी अभ्यास करत नसतो. परंतु त्यांच्याकरिता केला आणि सांगितले की आपला ज्यावर विश्वास असतो ते सांगायलाच पाहिजे. तुम्ही अहिंसेवर चांगल्यात

चांगली पुस्तके वाचा, हृदयाचा प्रतिसादसुद्धा मिळेल, परंतु परिणाम म्हणून काही काम तर दिसायलाच पाहिजे.

ठराव असाच असायला पाहिजे ही गोष्ट मी तुम्हाला पटवून देऊ शकलो नाही. परंतु त्याचा मसुदा असा तयार झाला. त्या वेळी यात दोष दाखवणारे कोणतेही भाषण झाले नव्हते. कडक पाऊल उचलायचे होते हे खरे आहे, परंतु विचार तर शक्य तितका नम्रच असला पाहिजे.

# ६९. प्राध्यापक क्रेजन्स्की

हिंदुस्थानात आध्यात्मिकता फार जास्त दिसते. तरीसुद्धा माझा माझ्यापुरता दृढविश्वास आहे की रोमन कॅथॉलिक धर्मच एकमेव खरा धर्म आहे.

बापू - इतर धर्म खोटे आहेत असे तुम्ही खरोखर म्हणत असता काय?

प्राध्यापक - त्यांचा धर्म खरा आहे इतके जर त्यांना कळले तर त्यांचाही उद्धार होईल.

बापू - याचा अर्थ तुम्हाला असे म्हणायचे आहे की असत्याच्या मार्गानेसुद्धा प्रत्येक जण नरकात जाण्याचे टाळू शकतो. तुम्हाला सत्याचा शोध लागला आहे असे तुम्ही म्हणता याचा अर्थ ही तुमच्या दृढविश्वासाची गोष्ट झाली. तुम्हाला असे म्हणायचे आहे की सत्य एक आहे आणि यामुळे प्रत्येक व्यक्ती सत्याची प्राप्ती करू शकत नाही. परंतु तुम्ही असेसुद्धा म्हणता की एखादा माणूस अंतःकरणपूर्वक त्याला कळलेल्या सत्यावर विश्वास ठेवत असेल तर त्याला मोक्ष मिळू शकतो. तुम्ही इतकेसुद्धा मान्य करू शकत नाही की तुमचा मार्ग चुकीचा असू शकतो. असे जरी असले तरी संपूर्ण सत्य तुमच्या बाजूने आहे इतके तरी तुम्ही स्वतःपुरते मान्य करणार नाही काय?

तुम्ही जर सर्व धर्मांचा अभ्यास केला असेल तर इतरांनीसुद्धा वेगवेगळ्या धर्मांचा अभ्यास केला आहे.

प्राध्यापक - एखादा माणूस सत प्रवृत्तीवाला असू शकतो, परंतु . . .

बापू - त्याची स्थिती तुमच्यासारखीच असू शकेल.  मी तर पुढे जाऊन म्हणेन की धर्म एकच आहे, परंतु त्याच्या वेगवेगळ्या शाखा आहेत. सर्व धर्मांचे एकच मूळ आहे. वेगवेगळे धर्म त्यांच्या शाखांची पाने असू शकतात.

प्राध्यापक – मी मान्य करतो की असा कोणताही धर्म नाही की जो दैवी प्रेरणेने प्रेरित झालेला नाही. पण सर्व धर्म एकाच त्या सत्यापर्यंत पोहोचलेले नाहीत. सर्वांमध्ये एकसारखी प्रज्ञेची ज्योत नसते.

बापू - तुम्ही एकमेव सत्याचे सार्वभौम मालक आहा असे जे समजून चालत आहा ती निष्कारण असत्य वृत्ती धारण करण्यासारखे आहे. बिचाऱ्या खगोलशास्त्रज्ञांची आज काय परिस्थिती झाली आहे? त्यांना आपली

मान्यता दररोज बदलावी लागते आहे. आणि आईनस्टाईनबद्दल सांगायचे तर त्यांनाही आपला दृष्टिकोन बदलत राहावा लागत असतो.

प्राध्यापक - सर्व धर्मांमध्ये सत्य काय आहे त्यासंबंधीचे युक्तिवाद मी तपासून चुकलो आहे.

बापू - ही परीक्षा तुम्ही बुद्धी वापरून केली आहे. परंतु या मोजमापाकरिता तुम्हाला वेगळाच तराजू पाहिजे. कोणी जरी अशा प्रकारे सूक्ष्म तपासणी करत असेल तरी तो कधीही सत्याजवळ पोहोचू शकणार नाही. याचे कारण आपण सर्व जे काही सांगतो ते असत्य आहे असे तो गृहीत धरून चालत असतो. परंतु सत्य असत्यातून निर्माण होऊ शकत नाही. सर्व लोक स्वतःला सत्य समजत असतात असे म्हणणे उत्तम आहे, परंतु ईश्वर जो सत्याचा साक्षात्कार घडवतो तो आपण अपूर्ण साधन असल्यामुळे आपल्याला संपूर्ण सत्य सापडू शकत नाही.

आधिभौतिक क्षेत्रात जो कोणी अखेरचे मत देईल तर ते प्रकृतीने बनवलेल्या माणसाला सुचलेले असेल. पावसाच्या पाण्याचे शुद्ध थेंब पृथ्वीवर पडता क्षणीच ते घाणेरडे होत असतात.

माझी तक्रार ही आहे की तुम्ही कॅथॉलिक अहंकारी आहा. आपण सर्व सारखे असूनही तुम्ही तुमच्या आणि मी माझ्या धर्माला खरा धर्म समजत असतो. वृक्ष आपापल्या पद्धतीने उगवत असतात.

प्रोफेसर - प्रत्येक धर्माची तपासणी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे. कोणता धर्म जास्त सुसंगत आणि संपूर्ण आहे?

बापू - अशा प्रकारे तुम्ही गृहीत धरत आहा की धर्मांचा एकमेकांवर परिणाम होऊ नये असे कुंपण तयार झालेले आहेत. जेव्हा की खऱ्या अर्थाने तर प्रत्येक धर्माचा विकास होतो आहे.. ईश्वराच्या कर्तव्यावर मी सीमा घालू शकत नाही. तो स्वतः हजारो वेळा वेगवेगळ्या रूपात अवतार घेतो असे सांगतात.

प्राध्यापक - सत्य तर ईश्वर लगेच समजावून सांगत असतो.

* * *

युरोपमधील अनात्मवादाविषयी मी तुमच्याशी चर्चा केली होती. इथे विद्यार्थ्यांमध्ये हे थोड्या प्रमाणात पाहतो आहे.

बापू - थोड्या? खूपच. अध्यात्मवादी म्हणून जे आपली प्रशंसा करतात तेच लोक जडवादी असलेले आढळतात.

आपण जर सर्व ईश्वराची लेकरे आहो तर आपण सारख्याच प्रमाणात खरे वा खोटे असू. धर्मांतराचा जो विचार आहे तो मानवतेच्या स्रोताला बिघडवणारा सर्वात जलद पसरणारे विष आहे.

माझा खूप मानसन्मान आहे . . .

बापू - परंतु हवा तितका नाही. मलासुद्धा आधी असेच वाटत होते. सत्यप्राप्तीकरिता इतके पुरेसे नाही. एक दुसऱ्याबद्दल जर आदराची भावना असती तर मी या उकळत्या पाण्यात जिवंत राहू शकलो नसतो.

प्राध्यापक - श्रद्धेशिवाय धर्मांतरात स्पर्धा असेल तर मी तिला दोष देईन.

बापू – नाही, पण दुसरी गोष्ट आडवी येते; नोकऱ्या, पैसा वगैरे. मी तर इतकेच म्हणेन की मुसलमान किंवा ख्रिस्ती यांच्याविषयी माझ्या मनात कटुता नसावी, इतकेच नाही तर बायबल किंवा कुराणाविषयीही माझ्या मनात विरोध नसवा. ही पायाभूत गोष्ट तुम्ही जर मान्य केली नाही तर मग जडवादाचा सामना करण्यासाठी जे आध्यात्मिक बळ तुम्ही एकवटाल त्याचा पराभव होणारच. आपला धर्म अधिक समृद्ध व्हावा म्हणून मी बायबल, कुराण वगैरेंना मदतीला बोलावतो. आणि दुसऱ्या धर्मापेक्षा माझाच धर्म श्रेष्ठ आहे, असा दावा करण्याच्या अवस्थेत मी पोहोचू इच्छितो, असा आरोप माझ्यावर होऊच शकत नाही. मी मुसलमान किंवा ख्रिस्ती नाही, पण अंतःकरणात खोलवर अशी भावना आहे की मला मुसलमान किंवा ख्रिस्ती जरी म्हटले, तरी त्यात गैर काय  आहे?

प्राध्यापक - तुमचा आशय चांगला असल्याची माझ्या मनात खात्री पटली आहे.

बापू - हवी तितकी नाही.

प्राध्यापक - माझ्या मनात तुमच्याबद्दल सर्वाधिक आदर आहे.

बापू मी जर कॅथॉलिक शाळेत शिकलो असतो तर तुमच्या मनात माझ्याबद्दल अजूनच आदर निर्माण झाला असता.

प्राध्यापक - तुम्ही जर कॅथॉलिक झाला असता तर संत फ्रॅन्सिससारखे महान झाला असता.

*            *            *

# ७०. ऍगाथा हॅरिसन आणि मीराबहेन

१

**५-१-१९३७**

ऍगाथा - तुझे धर्मपरिवर्तन इच्छिणारे पाद्री म्हणतात की तुला परत हिंदू धर्माकडे जाण्याचे आकर्षण वाटू लागले आहे. तू म्हणतेस की हे लोक परतू इच्छितात.

२

**१०-१-१९३७**

चि. मीरा,

तुझी दोन्ही पत्रे सोबतच मिळाली. मला रडावेसे वाटले. तुझे सांत्वन कसे करू? तुला जर शांत वाटत नसेल तर तू निश्चितच वरोड्याला वा वर्ध्याला जा. थोडे दिवस उपयोगी पडून परत ये. मला दुसरा कोणताही व्यवस्थापक नेमायचा नाही. जोपर्यंत माझा विश्वास आहे की याचे हात स्वच्छ आहेत तोपर्यंत मी मुन्नालालवर समाधान मानायला पाहिजे.

मी नसताना गोंगाट होतो हे खरे आहे. परंतु सामान्य हिंदुस्थानी घरात ऐकू येतो इतका नाही. तू जर मनातून शांत असलीस तर हे सर्व बदलू शकेल आणि गोंगाटातही सुधारणा होऊ शकेल. सुज्ञ माणूस बडबड ऐकून अधीर होत नसतो. शरीरातून जात नाही असा हा आजार आहे असे तू माझ्याकरिता समज. सेगावात घरातच काही विकृती आहे असे समजून तू हे का टाळत नाहीस?

मला तर आशा आहे की सेगाव सोडून परत जावे लागणार नाही. बेळगाव जाण्याकरिता उभे ठाकले आहे, परंतु ते एप्रिलमध्ये.

मला आशा आहे की तुझा पाय चांगला झाला असेल. नाही तर वर्ध्याला जाऊन सी.एस.ला दाखवशील. टपाल दररोज मागवत जा.

# ७१. शरीर आणि मनोविकास

संपूर्ण शिक्षण उद्योगात उपयोगी पडेल असे असले पाहिजे. जीवन ही महान कर्मभूमी आहे. त्याकरिता स्त्री-पुरुषांना शिक्षण मिळायला पाहिजे. - चांगले नागरिक तयार करण्याचा हा महान व्यवसाय आहे म्हणून.

शरीराकरिता पुढील शिक्षण म्हणून - संपूर्ण आत्मनियंत्रण ठेवून शिकलेल्या शक्तीचा सुंदर परंतु आवश्यक तितकाच उपयोग करू तेव्हाच शरीर चांगल्यात चांगले कौशल्यपूर्ण साधन होऊ शकते असे मला वाटते. मी या मानसिक विकासाविरुद्ध नाही. हा एक खूप मूल्यवान पातळीवरील मानसिक संस्कारच आहे. आणि याचबरोबर या पायावर अजूनच उत्कृष्ट संस्कृती विकसित होऊ शकते.

जीवननिर्वाह करण्याकरिता विविध प्रकारचे व्यवसाय -

त्याच्या संपर्कात राहणाऱ्या इतर कुठल्याही व्यक्तीप्रमाणे, आधुनिक संस्कृतीच्या सोयीसवलतींचा उपभोग करणाऱ्या व्यक्तीबद्दल असे म्हणता येईल की संस्कृतीच्या दृष्टीने त्याची घडण उच्च आहे की खालच्या पातळीवरील, हे प्रामुख्याने त्याच्या व्यवसायावर अवलंबून असते. दरोरजच्या घडामोडीत त्याला टिकवून ठेवतात असे जर काही असेल तर तो त्याचा कामधंदाच असतो. ज्या व्यवसायामुळे समाजाला आधार मिळतो तो उद्योग आणि आधुनिक संस्कृती. ज्या उद्योगामुळे यांत्रिकीकरण होते वा जो नफ्याकरिताच चालवला जातो त्या व्यवसायात त्या युगाच्या वा काळाच्या दरम्यान त्या कालाला अनुरूप गुण शोधता येतात.

रिकाम्या वेळातील आराम म्हणून केलेल्या व्यवसायाद्वारे वा मजुरीद्वारे आपण जी कमाई करू शकतो वा जीवननिर्वाह करू शकतो त्याकरिता होणारा खर्च. ज्या प्रकारे मजुरी करून आपण काम करतो त्यावरून फुरसतीच्या वेळी आपण काय करू हे ठरते.

संपूर्ण वेळ जर कत्तलखान्यात डुक्कर मारण्यात जात असेल तर मग चौदा ओळींची कविता वा शेलीची कविता वाचायचा विचारच माणसाच्या मनात येऊ शकणार नाही. शक्य आहे की अनंताच्या शोधाकरिता तो दारू पिऊन पडून राहील वा भांडण करून शेजाऱ्याला सुऱ्याने भोसकेल.

आपण असा एक समाज घडवला आहे जो आरामाच्या वेळी मूर्खपणाचे काम करत असतो. यावरून आपण खात्रीपूर्वक सांगू शकतो की मजुरी म्हणून ज्या उद्योगाच्या आधारे हा समाज टिकलेला आहे त्यात जे काही गुण आहेत ते मूर्खपणाच्या परिणामीच आहेत आणि त्याच्या अनुरूपच आहेत. ज्या समाजाच्या

कामकाजात पुरुषत्व असते तो फालतु वेळ गाढव चारण्याच्या मूर्खपणाच्या कामात घालवत नसतो. आणि यांच्याकरिता जितके उलट काम असते तित्तकेच खरे असते.

बुद्धी दुर्बल होईल, चारित्र्य निस्तेज होईल अशी मजुरी माणूस करत असेल तर त्याची पडछाया तो रिकामा वेळ कशा प्रकारे घालवतो यावर पडते; आणि त्याच्यात निर्जिवित्व, ध्येयाचा अभाव आणि कौशल्यहीन कामात तो सतत जुंपलेला दिसतो.

त्याच्या आत्म्याला जे पोषण मिळते त्याचा आधार तो ज्या प्रकारे कमाई करत असतो त्यावर अवलंबून असतो. ज्या प्रकारे समाज दररोज जीवननिर्वाह करत असतो त्याच्या आधारावर त्याची संस्कृती जुळलेली असते.

एका टोकावर ज्याच्या आत्म्याचा उद्धार झालेला असतो त्यांची संख्या कमी असते आणि त्यांचीसुद्धा अधोगती होऊ शकते. तर दुसऱ्या टोकावर ज्या प्रकारे तो भाकरी कमावतो त्याच प्रकारे तो असे काही कालवण मिसळतो ते पौष्टिक नसते आणि कदाचित ते घातकही असू शकेल.

एखाद्या मोठ्या शहरातील दुकानांच्या अरुंद गल्लीत एक चक्कर मारा. ग्राहकांकरिता खिडकीत लटकवलेल्या वस्तु पाहा. अथवा अनेकदा तर पुष्कळ गोष्टी तर अशा असतात की ज्या सट्टाबाजारातील ज्या उद्योगाकरिता शेरांनी देवाघेव होत असते आणि इतरांच्या तुलनेत चॉकलेट वगैरे तयार करणाऱ्या उद्योगाचे शेराचे भाव पाहा. तुमच्या लक्षात येईल की गव्हाचे भाव कमी होत आहेत तर सिगारेटचे भाव वाढत आहेत. कृत्रिम रेशीम उर्ध्वगतीने वाढत आहे. कोळसा, लोखंड आणि पोलादाचे भाव गडगडत आहेत जेव्हा की सिनेमा, ग्रामोफोन आणि एकाधिकार असलेल्या औषधांची किंमत वाढत चालली आहे. मी ऐकले आहे की कुंटुंबनियोजनाच्या साधनांचा व्यापारसुद्धा वाढत चालला आहे. उसे उद्योग फळतातफुलतात. त्यांच्याकरिता सरकारच्या मदतीची कोणतीही गरज पडत नाही. आणि अनेक अनेक खेडूत घेतलेले कर्ज फेडण्याकरिता असमर्थ असल्यामूळे आपल्या सावकाराला तोंड दाखवू शकत नाहीत आणि राजाची जी मदत मिळते तीसुद्धा नाव घेण्यापुरतीच असते.

तुम्हांला रस असेल तर अशा साहसाच्या शेवटी जरी ध्येय बेढब वाटू लागते तरीसुद्धा आपण शिक्षण व्यवसायोपयोगीच केले पाहिजे.

# ७२. वाक्यसंग्रह

गांधीच्या विचित्र स्वभावासमोर टिकाव धरून राहील असे वेगळे चित्र उभे करणारा लहानसा आरसा मिळवणे अशक्य आहे.

त्यांनी लिहिलेले हे विचार रवंथ करण्यासारखे आहेत.

जो माझ्यासाठी महात्मा संत किंवा बदमाश 'राजकारणी' नाही, परंतु वर्णद्वेष, स्त्री-पुरुषभेद किंवा काळाच्या मर्यादांना ओलांडून गेलेले असे वात्सल्य ज्याने माझ्यावर आणि माझ्या आप्तस्वकियांवर ओतले असा माझ्यावर सख्या नातलगाप्रमाणे प्रेम करणारा महापुरुष.

माझ्या सारख्या सहकाऱ्याच्या संबंधाला सौंदर्य वाहिले.

दंडाधिकाऱ्याच्या कार्यालयात परवानगीची जाहिरात टांगलेली होती.

उड्या मारत?

मी वरच्या आवजात संतापात खूप चिडलो.

ही तर तुझ्या बोटातील अंगठी आहे.

याचा असा विश्वास होता की पुस्तकी ज्ञानाने अतर्यामी शांततेचा जरी नाश झाला नाही तरी ती झाकली जाते.

गांधी दादाभाईंच्या छायेत राहून डेविडची भूमिका निभावू शकले असता काय?

यांच्या लिहिण्याच्या टेबलाच्या मागील बाजूला भिंतीवर यांच्या डोक्याचा पुतळा ठेवला आहे.

सुशोभित करायचे कौशल्य - आपल्या कर्तव्याचा शांतचित्ताने विचार करण्याकरिता आणि दैनंदिन जीवनाच्या खटपटीपासून आणि झंझटीपासून मुक्त होण्याकरिता.

तर आपण सर्व एकत्रित गोळा होऊन तुटून पडायला पाहिजे.

परंतु तुम्ही असे कसे समजता की ईश्वराच्या दरबारात प्राण्यापेक्षा माणसाला जास्त महत्त्व आहे? असे म्हणून गांधीने एकदा विरोध केला.

लहानशा दोन खोल्याच्या लाकडांची आणि मातीची झोपडी.

या घरात कोणीही आपले कर्तव्य पार पडत असल्याचे ढोंग करू नये.

# ७३. पत्रे

## १

## दीनबंधू ॲन्ड्रूजचे एक जुने पत्र

जमशेदपूर

१ एप्रिल १९२८

मला सर्वात प्रिय असलेल्या महादेवा,

मी रोज काळजी करत असतो की बापूनी जाण्याचा जो निर्णय घेतला आहे त्याची काही बातमी कळावी. मला खात्री आहे की त्यांना खरीखरी प्रेरणा मिळेल. शक्य आहे की रोमॉरोलॉचे पत्र निर्णायक हकिगत होईल; 'द मॅन्चेस्टर गार्डियन'मध्ये मजेदार संपादकीय होते. आणि 'द डेली न्यूज'मध्येसुद्धा. बिशपने टीका केली तीसुद्धा खपू रसाळ होती. परंतु ख्रिश्चन धर्म कशा प्रकारे आत ओढतो त्याचे नवल वाटले.

जमशेदपूरमध्ये परिस्थिती जितकी बिघडू शकेल तितकी बिघडलेली आहे. रचनात्मक काहीही नाही. तुफान निर्माण करणारे विभाजन करू पाहणारे इथेच आहेत. यांचे एकमेव धोरण तोडफोड करून तुफान निर्माण करणे. असे किती दिवस चालेल हे सांगू शकत नाही. परंतु मला काही सुचतच नाही. परंतु तरीही मी जेव्हा कारखान्याच जाऊन काम पाहतो तेव्हा मला असे भीषण, यातनांनी परिपूर्ण दृश्य दिसते. तेव्हा दररोज किती ताण सहन करावा लागत असेल हे लक्षात येते. काही वर्षांतच जसा एखादा उधळपट्टी करणारा वारसदार आपली सर्व संपत्ती उधळून टाकतो, तसाच एका पिढीतच लागणारा कच्चा माल मिळवण्यासाठी तो संपूर्ण जगाची लूट करून त्याला नासधूस घडवतो. यंत्रांच्या संस्कृतीची खरी समस्या तर हीच आहे. इतर प्रकारच्या उडाऊपणाबरोबरच लोकवस्तीतील वाढसुद्धा येते. याचे कारण खूप पहाडी वस्तीत तर सर्व नवीन, काळ्याकुट्ट डागासारखे ठिकाणे तर कोळसा आणि लोखंडाभोवतीच आहेत.

शक्य आहे की माझ्या मते चीनची आणि हिंदुस्थानची वस्ती थोडी जास्तच आहे. याचे कारण काही मूलभूत चूक असली पाहिजे. निश्चित कारण काय आहे ते कळत नाही. आता कुटुंबनियोजन आणून एक चूक

सुधारण्याकरिता दुसरी चूक करण्यासारखे होत आहे. याचे कारणसुद्धा  तर्कविहिन परिस्थितीताचा परिणाम हेच आहे.

माझ्या मते ही समस्या अधिकाधिक कठीण होत चालली आहे. परंतु जमशेदपूर भीतीचे चिन्ह म्हणून लाल झेडा फडकवत आहे. गरीब बिचारे लोक भीतीचे चिन्ह पाहून अधोगतीकडे अजून ढकलले जात आहेत.

सर्वांना माझे प्रेम.

चार्ली

## २

## राजकुमारी अमृतकौरची एक चिठ्ठी

सिमला

**१८-१०-१९३५**

प्रिय मेरी,

काल पोहोचल्याच्या पत्राबद्दल खूप आभार. तुला पेळू पोहोचलेच नाही याबद्दल वाईट वाटते. त्याच दिवशी पाठवायला पाहिजे होते. ज्या दिवशी मी वर्ध्यात याविषयी लिहिले होते त्या दिवशी कदाचित पाठवले नसतील. कोणाची चूक झाली की टपालात चुकीच्या पत्त्यावर गेले हे मी सांगू शकत नाही.

इतके सगळे होऊनही उत्साहाने आणि सर्व शक्ती लावून तू कामाला लागली आहेस असे दिसते.

मला वाटते की माझ्या कार्यशक्तीचे पतन होऊ लागले आहे. थकले आहे आणि थोडी निराशही आहे. थकव्याकरिता तर माफ करता येईल, परंतु अस्वस्थतेकरिता माझ्यातील श्रद्धेचा अभाव आणि मानवजातीतील दुर्बलताच कारण आहे. येथील सुंदर हवामानामुळे तर मला शारीरिक तजेला यायला पाहिजे.

हिवाळ्यात भेटू शकू अशी आशा आहे. खूप शुभेच्छांसह.

सप्रेम तुझी,

अमृत

# ७४. मलेरिया

हिंदुस्थानातील मलेरिया नष्ट करण्याकरिताचे उपाय.

लेखक - लेफ्टनंट कर्नल हेहीर

# ७५. प्रसुतीदिवसाचा अंदाज

मे महिन्यात गर्भधारणा झाली असेल तर चार तारीख वाढवा;

परंतु मार्च आणि एप्रिल असेल तर पाच दिवस कमी करा;

लक्षात ठेवा की हे दोन महिनेच पाच इंग्रजी वर्णांचे आहेत.

जुलैत सहा मिळवा आणि डिसेंबरमध्येही इतकेच,

सात महिने बाकी राहिले त्यात जोडावे लागतील,

दुसरे सात प्रसूतीची तारीख मिळवण्यासाठी.

उदाहरण म्हणून मासिक पाळी दहा ऑगस्टला आली असेल. तर तीन महिने मागे जाऊन मेमध्ये पोहोचा. आता दहा दिवसात सात जोडा यामुळे मे सतरा येते.

परंतु मासिक पाळी वीस मेला आली असेल तर फेब्रुवारी चोवीसला दोनशेऐंशी दिवस पूर्ण होतात.

# ७६. अनुवादाबद्दल मत

सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी

मुंबई ४

१९-९-१९३५

प्रिय भाई,

आज तुम्हाला भेटायाचे मी पक्के ठरवले होते, परंतु पायाला जखम असल्यामुळे विशेष चालू शकत नव्हतो. भेटू शकलो नाही याबद्दल वाईट वाटते. असे असले तरी पुस्तक आणि त्याचा अनुवाद पाठवतो आहे.

संपूर्ण पाहू शकलो नाही. परंतु वरवर पाहिल्यानंतरही अनुवाद कसा आहे ते निश्चितच सांगता येते.

स्त्रीसंस्थांची ‘डिरेक्टरी’बद्दलचे मत अनुकूल वेळ मिळाला की विचार करून पाठवतो.

लिहिणार कृष्णदासचे प्रेमवंदन

# ७७. दोन कविता

## १

### ईश्वराच्या सानिध्यात सायंकाळ

कवी - एक विद्यार्थी

साज पडे चालुं ईश्वर साथे
बागमां मीठी छांय नीचे
वृक्षो वच्चे सांभळुं एनो साद, डर मने शानो?

राते भाणुं एने उभो, हैय धडकतुं रहे
पण नथी भो ए मीट मांडे तेनी के ईश्वरने सानिध्यनी.
पवननी झलकमां बोल पकडुं, दरेक तारामाथी एनुं हास्य झरे.
नथी ए करतो आंख आडा कान, नथू ्दृश्य, नथी सुदूर.
हाथ एनो मिची दे आंखो फूलोनी
छे फूलोनी झाकणमां शक्ति
मारा निर्बळ जीवने सकोरवानी,
अ साचवे छे शक्ति सौ शक्तिशाळीनी,
भले ए होय पृथ्वी पर के अवकाशमां
महुं खसुं दूर एना प्रेमनी
क्या पहोंचुं त्यां एनो प्रेम.
नथी रहेतोलांखुं अंधारपटमां, ज्योति प्रकटे बाजूमां
नथी खातो गोथां, नथी चडतो रवाडे,
क्या सुधी आ भोमिआने अनुसरुं.
आम वात करुं ईश्वरसाथे.
हरुंफरुं ईश्वर साथे.

वृक्षो वच्चे सांभळू एनो साद.

डर मने शानो?

(**ईश्वराच्या सान्निध्यात संध्याकाळ**

कवी – एक विद्यार्थी

सा ैज उलटते ईश्वरसोबत

बागेतील गर्द सावलीखाली,

वृक्षांमध्ये ऐकतो तुझी साद,

भीती कशाची मग मला?

रात्रीसुद्धा भानू उभा होता असा की, धडधडू लागले हृदय

पण मिळत नाही ती मिठीतील जवळीक ईश्वराच्या सान्निध्याची.

वा-याच्या झुळुकीत मी पकडतो त्याचा स्वर,

प्रत्येक तारकेमधून पाझरते हास्य त्यांचे.

नाही करत मी डोळ्यांआड, वा कानांआड,

नाही अदृश्य, नाही दूरवर.

हात त्याचा फुलांच्या डोळ्यांत सामावतो,

फुलांच्या पाकळ्यांत दडलेली आहे ती शक्ती

देते जी आधार माझ्या निर्बल जीवाला.

हीच तर आहे शक्ति सर्वशक्तीमानाची.

तो जरी असेल पृथ्वीवर किंवा आकाशात,

मी कितीही पडलो दूर त्याच्या प्रेमापासून,

तरी तिथेच जाऊन पोहोचतो असे आहे त्याचे प्रेम.

राहत नाही कधीही अंधारपटात

प्रकटतात ज्योती त्याच्या माझ्याच शेजारी.

तो नाही गुंतत गोंधळात, नाही करत धावपळ गडबडीत,

जिथवर मी अनुसरतो या भूमीला

तिथवर मी बोलतो त्याच्याशी—

करतो भटकंती ईश्वरसोबत.

वृक्षांच्या मध्ये ऐकतो त्याचा साद,

भीती कशाची मनात माझ्या?)

## २

चिरगाव, झांसी

**श्री राम**

**मंगलगान**

कवी - सीयाराम शरम गुप्त

वाणी के मंदिर में आकर

कर्म स्वयं झंकृत है आज.

गिरा अर्थ से, अर्थ गिरा है

सादर समलंकृत है आज.

भूत भविश्यत् का सकृती स्थल,

धन्य आज का है यह लघु पल

यह लघु विपुल बृंहत से उज्ज्वल

सीमित भी विस्तृत है आज.

वाणी के मंदिर में आकर

कर्म स्वयं झंकृत है आज.

एक राष्ट्र, यह एक प्राण मन

छिन्न भिन्न कर सौ सौ बंधन,
निखिल विश्व मे एक सूत्र बन
अनायास है उद्धृत आज
वाणी के मंदिर में जाकर
कर्म स्वयं झंकृत है आज.
हृदय हृदय की गांठ खोलकर
कंठ कंठ में ऐक्य घोलकर
पुण्य अतिथी का विजय बोलकर
हम में जय जागृत है आज.
वाणी के मंदिर में आकर
कर्म स्वयं झंकृत है आज.

मगनवाडी, वर्धा
चैत्र शुक्ल १३, १९९२

ता. ११-४-१९३५

(**वाणीच्या मंदिरात येऊन**

वाणीच्या मंदिरात येता
झंकारते कर्म स्वतःच आज.
वाणी अर्थपूर्ण, अर्थ भाषेत
सौंदर्याने सजते.

भूतकाळ भविष्याचे संगमस्थळ,
धन्य आजचा हा लघु क्षण.
लहानसा पण विपुल उज्ज्वल,
सीमित असून विस्तृत असतो तो.
वाणीच्या मंदिरात येता
कर्म स्वयं गाजते आज.

एक राष्ट्र, एकच प्राण मन,
बंधने होतात शतशः छिन्नभिन्न.
विश्वाला एक सूत्रात गुंफून
होतो उद्धृत आज अनायसे आज,
वाणीच्या मंदिरात येता
झंकारते कर्म स्वतःच आज.
हृदयातील गाठी सुटून,
कंठामध्ये ऐक्यरव दाटून.
अतिथीच्या पुण्य विजयघोषाने
आमुच्या अंतरी जागतो जयनाद.
वाणीच्या मंदिरात येता
झंकारते कर्म स्वतःच आज.)

# परिशिष्ट

## परिशिष्ट १ -गांधीजींची दैनंदिनी

(जानेवारी १९३६ - १९३७)

**जानेवारी १९३६**

१ ते ६ - वर्धा. प्रकृती नरमगरम

७ - वर्धा, म्युरिअल लेस्टर, जपानमधील एक भगिनी. (विकिपिडियाप्रमाणे इंग्रज)

डॉ. टॉमिको कोरा, आणि चिनी भगिनी श्रीमती तीयो भेटायला आले.

८ - १६ वर्धा. प्रकृती जास्त वाईट.

९ तारखेला दोन दात काढायला लावले.

१७ - २१ मुंबई. भूलाभाई देसाईंकडे उतरले. लंडनमध्ये शापूरजी सकलाचवाळांचा १७ तारखेला मृत्यू.

१९ तारखेला राहिलेले दात काढायला लावले.

२० तारखेला राजा पंचम जॉर्जचा मृत्यू.

२१ तारखेला सम्राटांच्या मृत्यूमुळे लंडनला शोकसंदेश पाठवला.

२२. अमदाबाद. आम्ही गुजरात विद्यापीठात उतरले.

२३ ते ३१ - अमदाबाद.

**फेब्रुवारी -**

१ ते १९ अमदाबाद.

५ तारखेला मीराबेन आल्या आणि ६ तारखेला गेल्या.

९ तारखेला म्युरिअल लेस्टर भेटल्या.

१२ तारखेला प्रभास शंकर पट्टणी भेटायला आले.

१६ ला हरिजन आश्रमाला मुलाखत.

१७ ला दिनशाह वाच्छांचा मुंबईत मृत्यू.

१८. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोर प्रवचन. दिनशाह वाच्छांना अंजली अर्पण करणारे निवेदन.

२०. बारडोली. तेथील आश्रम अजूनही सरकारच्या ताब्यात असल्यामुळे पाटीदाराच्या जीनमध्ये उतरलो.

२१. बारडोली, वेडछी.

अमेरिकेतील काळ्या लोकांचे प्रतिनिधीमंडळ भेटायला आले.

२२. ग्रामसेविकांबरोबर चर्चा.

२३ - २८ वर्धा

२८ तारखेला जिनेव्हात कमला नेहरूंचा मृत्यू. सावलीला पोहोचलो.

**फेब्रुवारी १९३६ सुरू -**

२९ सावलीत ग्रामोद्योग प्रदर्शनाचे उद्‌घाटन. ग्रामसेवा आणि गांधीसेवासंघाच्या सदस्यांच्या संमेलनात गांधीजींची उपस्थिती.

**मार्च १९३६ -**

१ ते ६ सावली संमेलन संपन्न. आणि तिथून कृष्णदास गांधी आणि मनोज्ञा यांच्या लग्नात उपस्थिती.

प्रत्येक गोष्ट घेताना- वापरताना आपण गावखेड्यांचा विचार केला पाहिजे अशा आशयाचे पत्र लिहिले.

७ वर्ध्याहून दिल्लीला.

८ ते २७ दिल्ली.

८ तारखेला निजामुद्दीन स्थानकावर उतरून हरिजन कॉलनीत उतरले. ऑल इंडिया रेडिओचे नियामक लायोनल फिल्डन रविवारी-सोमवारी तसेच ८-९; १५-१६ अथवा २२ - २३ तारखेला भेटले.

१० यीट्स ब्राऊन भेटायला आले.

११ तारखेला कमला नेहरूंच्या अस्थी घेऊन जवाहरलाल अलाहाबादला पोहोचले. या काळात गांधीजी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत मौन पाळत होते.

१७ दिल्ली. जवाहरलालला भेटायला आले.

२२. दिल्ली. हरिजन सेवक संघाच्या बैठकीला उपस्थिती. तारीख २१ ते २४.

२५ शांतिनिकेतनची आर्थिक अडचण आणि रविंद्रनाथ टागोरांबरोबर झालेल्या चर्चेत गांधीजी म्हणाले की 'या वयात तुम्ही भीक मागायला बाहेर पडायला नको. हे काम आमचे आहे आणि मी ते शक्य तोवर करीन'. पैशाकरिता त्यांनी दिल्लीत 'चित्रांगदा' नाटक केले.

२७. कविवर रविंद्रनाथ टागोरांना ६०,००० रूपयांचा धनाकर्ष पाठवला.

२८. लखनौ. कानपूरजवळील अजगेईन स्टेशनवर उतरले आणि गोमती नदीच्या काठावरील एक घरात मुक्काम.

स्वदेशी प्रदर्शनाचे उद्घाटन.

मोतीनगरमध्ये ग्रामोद्योग आणि खादी प्रदर्शनाचे उद्घाटन.

२९ ते ३१ लखनौ.

**एप्रिल १९३९**

१ ते ३ आणि ८ ते १६ लखनौ.

३. लखनौमधील हरिजन शाळेला मुलाखत.

४. अलाहाबाद.

५. अलाहाबाद. दक्षिण आफ्रिकेचे काँग्रेस प्रतिनिधी भवानीदयाळ भेटले.

अखिल हिंदुस्थान हिंदी साहित्य संमेलनाच्या पुस्तकालयाचे आणि संग्रहालयाचे उद्घाटन.

६. अलाहाबाद. हरिजन कॉलनीला मुलाखत. सप्रू भेटायला आले. कार्यकारिणीची सभा.

७. अलाहाबाद कार्यकारिणीच्या बैठकीला हजर. ८ तारखेला सुभाषचंद्र बोस मुंबईला आले आणि त्यांची धरपकड झाली. १२ तारखेला मुस्लिम लीगने ठराव केला की त्यांना १९३५ची घटना मान्य नाही. १३ तारखेला काँग्रेसनेही ठराव केला की त्यांनाही ही घटना मान्य नाही. ११ तारखेला खुदाई खिदमदगारांशी अहिंसेबद्दल चर्चा. काँग्रेसचे कार्यकारीणीचे सदस्य नसल्यामुळे तिकिट घेऊन हजर राहिले. आणि प्रदर्शनात स्वदेशीबद्दल भाषण.

१३. तारखेला मुलाखतीकरिता येणारात अमृतलाल शेठ आणि सैयद अब्दुल्ला बरेलवी.

१४. लखनौत बरेलवी आणि अमृतलाल शेठ तसेच बळवंतराव महेतांबरोबर चर्चा. जिथे उतरले होते तेथील जिल्हा बोर्डाने मानपत्र दिले. अखिल हिंदुस्थान दलित वर्गाच्या परिषदेला हजर राहिले. - आर्य समाज मंडळात.

१५. लखनौ प्रदर्शनात पूर्णाहुतीच्या वेळी भाषण.

१७ - २३  वर्धा. सेगावमध्ये गावकऱ्यांना भेटले.

२३, २४, २५, २६ - नागपूर भारतीय साहित्य परिषदेत अध्यक्ष. हिंदी साहित्य संमेलनात उपस्थित आणि भाषण. हरिलाल गांधींची भेट. ७ फेब्रुवारीला हरिलाल म्हणाले होते की ते ख्रिश्चन धर्म स्वीकारणार आहेत. २६ तारखेला जाहीर केले की मी ख्रिश्चन धर्म स्वीकारणार नाही आणि धर्मपरिवर्तनावर माझा विश्वास नाही.

२७, वर्धा.

२८. वर्धा. कार्यकारिणीच्या सभेला हजर.

२९. जयप्रकाश नारायण भेटले.

३०. सेगाव गावात राहायला गेले.

**मे १९३६**

१ ते ८ सेगांव

१ तारखेला भीमराव रामराव आंबेडकर आणि वालचंद हिराचंद वर्ध्यात भेटायला आले.

३. ग्रामोद्योग प्रदर्शनाचे उद्‌घाटन - वर्ध्यात

६. पवनार

७. सेगावातील अखिल हिंदुस्थान ग्रामोद्योग संघाच्या वार्षिक सभेत भाषण.

९. मद्रासकरिता प्रयाण.

१०. मद्रास - के. भाष्यम आय्यंगारकडे उतरले. डेहराडूनहून दिल्लीला जात असताना डॉ. अंसारींचे रेल्वेत देहावसान. बंगलोरात सरकारी भवन ‘कुमार पार्क’मध्ये उतरले आणि तिथून नंदीदूर्गकरिता प्रयाण.

११ ते ३० नंदीदूर्ग.

३१. नंदूहून चिकबालपूर, चिंतामणीहून कोलारच्या सोन्याच्या खाणीत काम करणाऱ्या मजुरांची त्यांच्या वसाहतीत मुलाखत. तिथून रॉबर्टसन पार्क आणि बंगलोर.

**जून १९३६**

१ ते ९ बंगलोर.

दोन तारखेला हरिलालच्या धर्मपरिवर्तनाबद्दल निवेदन.अनेक मुसलमान मित्रांना माझे सांगणे आहे की धर्मपरिवर्तन अंतःकरणापासून असेल तर माझा विरोध नाही. राजकुमारी अमृत कौर यांनी बोलावलेल्या हस्तिदंती वस्तूंना ४ तारखेला पसंती दिली. पाच तारखेला ख्रिश्चन धर्मप्रसाराबद्दल चर्चा. नऊ तारखेला मसुरीत अब्बास तैय्यबजींचे मसूरीत देहावसान.

१०. अब्बास तैय्यबजींच्या कुटुंबाला शोक संदेश. केंगरीत भरलेल्या दक्षिण हिंदुस्थानातील हरिजन कार्यकर्त्यांच्या परिषदेत भाषण.

११. केंगरी परिषद.

१२. केंगरी परिषदेत उपसंहाराचे भाषण. बंगलोरमध्ये सायन्स इंस्टिट्यूटला भेट. आणि हिंदी प्रचारसभेच्या पदवीदान समारंभाचे अध्यक्ष. स्थळ - पुतना चेट्टी हाऊस.

१३. मद्रासमध्ये हिंदी प्रचार सभेच्या इमारतीचे बांधकाम सुरू होते. त्याची पाहणी केली.

१४ ते १५ - वर्धा

१६ सेगावात स्वतःच्या झोपडीत राहायला गेले.

१७ ते २८ वर्ध्यात गेले होते.

२९ ते ३० वर्ध्यात जवाहरलालबरोबर चर्चा. कार्यकारिणीच्या सभेत गांधीजी अनुपस्थित.

## जुलै १९३९

१ ते ३ वर्धा

४ ते ३१ सेगाव.

४ तारखेपासून भारतीय साहित्य संमेलनाचे आणि हिंदी प्रचार सभेचे अध्यक्ष.

२३ तारखेला कमलनयन जमनालाल बजाज आणि सावित्री पोद्दार यांचा वाङ्‌निश्चय झाला.

## ऑगस्ट १९३९

१ ते ३१ सेगाव

४ तारखेला धर्मानंद कोसंबी आणि खान अब्दुल गफ्फारखान भेटायला आले.

११ तारखेला राजाजींनी कॉंग्रेसचा राजीनामा दिला.

१६ तारखेला भेट घेणारात राजाजी आणि जवाहरलाल.

२७. तारखेला वर्ध्यात चरखा संघाच्या बैठकीत उपस्थित.

२८. तारखेला गांधी सेवासंघाच्या बैठकीलासुद्धा हजर.

२९. तारखेला सेगावमध्ये गांधी सेवा संघाची बैठक सुरू.

३०. वर्ध्यात जयप्रकाश नारायण आले.

३१. सेगाव - ताप.

**सप्टेंबर १९३९**

१ ते ३०. सेगाव

३ ते ११. ताप न उतरल्यामुळे वर्ध्यातील रुग्णालयात.

६. तारखेला दंडाधिकारी (मॅजिस्ट्रेट) चौधरी काही साप घेऊन आले आणि ते त्यांनी गांधीजींच्या अंथरुणात तसेच त्यांच्या खाटेखाली सोडले.

१८. सेगाव. आज गांधीजींच्या जीवाला धोका आहे याची एका जोशीला पूर्वकल्पना होती.

**ऑक्टोबर १९३९**

१ ते २३. सेगाव

३. सेगावात जवाहरलाल, वल्लभभाई, राजेंद्रबाबू वगैरेंबरोबर चर्चा.

४. ते ११ आजारी आश्रमवासींची सेवा.

७. ग्रामोद्योग संघाच्या व्यवस्थापक मंडळाची बैठक.

१२. सेगाव - वर्धा येथील मारवाडी विद्यालयाचे शिक्षक आणि विद्यार्थी भेटायला आले.

२४. बनारस. बाबू शिवप्रसाद गुप्तांकडे उतरले.

२५. बनारस. त्यांनी बांधायला लावलेल्या भारतमाता मंदिराचे उद्घाटन. कवी मैथिलीशरण यांच्या सुवर्णजयंतीच्या प्रसंगी अभिनंदन ग्रंथाचा समर्पण विधी केला. मुलाखती - कलाभवनला आणि नागरी प्रचारिणी सभेला.

२६. बनारस.

२७. दिल्ली. डॉ. अनसारींच्या मृत्यूमुळे बेगम अंनसारींचे सांत्वन करायला गेले. ब्रिजकृष्ण चांदीवालाच्या आजारी आईची चौकशी. हरिजन निवासला मुलाखत.

२८. अमदाबाद.

२९. राजकोट - मोठे भाऊ खुशालचंदना भेटायला गेले.

३०. नडियाड - विठ्ठल कन्या विद्यालयाच्या 'मनसुखभाई हिंदू छात्रालयाचे' जमनालाल बजाज यांच्या हस्ते उद्घाटन विधी झाला. त्या वेळी आशीर्वादात्मक बोलले. सोबत खान अब्दुल गफ्फारखान हजर होते. अमदाबादला आले. सोमनाथ भूधरभाई सरस्वती मंदिराचे (नगरपालिका कन्या विद्यालयाच्या इमारतीचे) उद्घाटन विधी. या गृहस्थांच्या छायाचित्राचे अनावरण.

३१. अमदाबाद - गिरणीमजुरांसमोर व्याख्यान. कला प्रदर्शनाला भेट. बाराव्या गुजरात साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी.

## नोव्हेंबर १९३९

१. अमदाबाद - विद्यापीठातील पदवीदान समारंभाच्या अध्यक्षस्थानी. साहित्य परिषदेच्या विषय विचारिणी समितीच्या बैठकीत उपस्थित.

२. अमदाबाद - परिषदेच्या बैठकीत उपसंहाराचे भाषण. गिरणी मालकांच्या आणि मजुरांच्या प्रतिनिधींशी चर्चा. आश्रमात चर्चा - आश्रमवासींबरोबर आणि ज्योतीसंघाबरोबर. अब्बास तैय्यबजींच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करायला गेले.

३. रस्त्यात.

४ ते ३० सेगाव.

९. सेगाव - ऍंड्र्यूज आणि कालिदास नाग आले.

१७ तारखेला त्रावणकोर नरेशांनी आभार मानत निवेदन दिले. कॉंग्रेसच्या आगामी अधिवेशनसंबंधी नेताजींशी चर्चा.

२०. मानवेंद्रनाथ रायची सुटका.

२६. सेगाव - कॉंग्रेसच्या आगामी अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून पुढाऱ्यांशी चर्चा.

**डिसेंबर १९३९**

१ ते १९ - सेगाव.

२ ते ४ - अमदाबाद गिरणीमालकांच्या आणि मजुरांच्या प्रतिनिधींशी चर्चा.

५. सेगाव - ऍंड्र्यूज, ऍगाथा हॅरिसन आणि कार्ल हीथ आले. कॉंग्रेसच्या आगामी अधिवेशनाचे प्रमुख म्हणून जवाहरलाल नेहरूंची परत निवड.

२०. टिळकनगर - फैजपूरजवळ वसवण्यात आलेल्या गावात कॉंग्रेसची ही पहिली बैठक होती.

२१. टिळकनगर - कॉंग्रेसच्या सफाई कार्यकर्त्यांचे उद्बोधन. खिरोडा. टिळकनगर.

२२ ते २९. - टिळकनगर.

२३ ते २४ टिळकनगर - मानवेंद्रनाथ रायबरोबर चर्चा.

२५. खादी आणि ग्रामोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन. पुढाऱ्यांशी चर्चा.

२६. प्रदर्शनाला भेट आणि भाषण. चर्चा सुरू.

२७. प्रदर्शनासंबंधी जाहीर सभा. कॉंग्रेसच्या बैठकीत बोलले.

२८. हिंदी परिषदेला संदेश दिला.

२९. स्वयंसेवकांच्या छावणीला मुलाखत.

३० - ३१. सेगाव.

**जानेवारी १९३७**

१ ते ६. सेगाव. वर्धा.

३. पोलक आणि ऍगाथा हॅरिसन भेटायला आले.

७. पुणे - कल्याण स्थानकावर उतरून मोटारीने आले. पर्णकुटीत उतरले. अमदाबादच्या गिरणीमालकांच्या आणि मजुरांच्या प्रतिनिधींशी चर्चा.

८. पुणे - हरिभाऊ फाटक आणि बाळूकाका कानेटकर भेटायला आले. आधीच्या दिवसाची चर्चा पुढील दिवशीही सुरू होती.

१०. न्यायमूर्ती मडगावकरच्या घरी स्वागत समारोहात हजेरी.

११. मद्रास.

१२. त्रिवेंद्रम - स्वागतनगरपालिकेकडून मानपत्र.

१३. त्रिवेंद्रम - हिंदी पदवीदान समारंभाच्या अध्यक्षपदी. मुलाखती - अनंतपद्मनाभ मंदिराला आणि हरिजन छात्रालयाला. जाहीर सभा. मानपत्र. एस. के. जॉर्जच्या पत्नीच्या प्रकृतीची चौकशी करायला गेले.

१४. त्रिवेंद्रम. बलरामपूरम. नेय्याटिंकराई. वेंगानूर. टेकलाई. तिरुवट्टार. नागरकोईल - सभा, मानपत्र. कन्याकुमारी.

१५. कन्याकुमारी. त्रिवेंद्रम.

१६. त्रिवेंद्रम. आटींगल. वरकला - शिवगिरी मंडपात सभा. पारीपल्ली. किवलोन - सभा आणि मानपत्र.

१७. थथरामपल्ली. हरिपाद.

१८.तकाणी. शेरथालाई. वाईकोम - सभा, मानपत्र.

१९. एतमानूर. कुमारनेलूर. थीरवारपूरम; कोट्टयम - ख्रिस्ती धरमगुरूंबरोबर चर्चा. स्थळ - धर्मगुरू मूरचे घर. सभा स्त्रियांची आणि जाहीर..

२०. अंगनचेरी. थूरूवल्ला. चेंगानूर. आरनमुल्ला. एलथूर. पंदलम.

२१. कोट्टाराकराई.

२२. मद्रास.

२३. गुंटूर.

२४ ते ३१ - सेगाव.

# परिशिष्ट २ - व्यक्तिपरिचय

### अनसारी, एम. ए. (१८८० ते १९३६)

राष्ट्रवादी पुढारी. वैद्यक शास्त्रात स्नातक. दिल्लीत डॉक्टरचा व्यवसाय सुरू केला. १९२० साली तुर्कस्तानकरिता वैद्यकीय पथकाची व्यवस्था केली. १९२० साली मुस्लिम लीग अधिवेशनाचे आणि १९२७ साली मद्रासमधील काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

१९३० साली कारावासाची शिक्षा. गरिबांचे खास मित्र. महादेव देसाई गांधीजींबरोबर गोलमेज परिषदेत जाण्याची तयारी करत होते तेव्हा विलायतेतील थंडीचा सामना करता यावा म्हणून त्यांनी त्यांना आपला गरम कोट दिला होता.

### अमृतकौर, राजकुमारी (२-२-१८८९ ते ६-२-१९६४)

कपूरथला राजकुटुंबात जन्म. १९२७ साली अखिल हिंदुस्थान स्त्री परिषदेची स्थापना केली. गांधीजींबरोबर राहत होत्या, त्यांचे काम करायच्या आणि त्यांच्या विचारांचा प्रचार करायच्या.

गांधी स्मृती निधीच्या विश्वस्त. भारत सरकारमध्ये आरोग्य मंत्री, १९४७ - १९५७. इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या अध्यक्ष, आणि आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस सोसायटीच्या उपाध्यक्ष.ख्रिश्चन धर्माच्या अनुयायी.

### महर्षी अरविंद, (१५ ऑगस्ट १८७२ तो ५ डिसेंबर १९५०)

श्री अरविंद आणि अरविंद घोष या नावांनी प्रसिद्ध. विचारवंत, लेखक आणि आध्यात्मिक नेता. किंग्ज कॉलेज, कँब्रिज येथे शिक्षण. १८९३ साली परत आल्यानंतर बदोद्यात बडोदा महाविद्यालयात प्राध्यापक. क्रांतिकारक आंदोलनात भाग घेतला. अलिपूर बाँब खटल्यातील एक आरोपी. परंतु दीर्घकाळ खटला चालल्यानंतर सुटका. या काळात हिंदुस्थानातील पाँदिचेरी हे दक्षिण हिंदुस्थानातील गाव फ्रेंच सरकारच्या ताब्यात होते. तिथे आश्रमाची स्थापना केली.

## एम. असफ अली, (११ मे १८८८ - २ एप्रिल १९५३)

बॅरिस्टर. दिल्ली न्यायालयात वकिली सुरू केली. इंडियन होम रूल लीगचे सदस्य.

असहकार आणि खिलाफत आंदोलनात भाग घेतला. अरुणा गांगुलींशी विवाह. १९२८ साली भगतसिंगचे वकील झाले.

अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध, १९४२ ते १९४६. भारतीय घटनासमितीचे सदस्य १९३६ - १९४६. आझाद हिंद सेनेच्या बचाव समितीचे सचिव. मध्यंतरीच्या काळात मंत्री, १९४६. अमेरिकेच भारताचे पहिले वकील. १९४७ ते १९४८. ओरिसाचे राज्यपाल १९४८ते १९५२. स्वित्झर्लंडमध्ये भारताचे वकील १९५२ ते १९५३

## वेदनायक सॅम्युअल आझरीया (१८७४- १९४५)

वल्लासनविलैमध्ये जन्म. हिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि श्रीलंकेतील एँग्लिकन चर्चचे पहिले हिंदुस्थानी बिशप. आंध्रप्रदेशात डोर्नाकलयेथे बिशप - १९१२. हिंदुस्थानातील ख्रिश्चनांचे एक संयुक्त चर्च असले पाहिजे आणि त्याचे नेतृत्व देशातील लोकांच्या हाती असले पाहिजे अशी मान्यता. १९२९पासून हिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि श्रीलंकेच्या ख्रिश्चन परिषदेचे अध्यक्ष.

## इर्विन

लॉर्ड इर्विन आणि अर्ल ऑफ हेलिफॉक्स म्हणून प्रसिद्ध. पूर्ण नाव एडवर्ड फ्रेड्रिक लिन्डली वुड (१६ एप्रिल १८८१ - २३ डिसेंबर १९५९). शिक्षण इटन शाळा आणि ऑक्सफर्डच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयात. १९१० मध्ये ब्रिटिश संसदेचे सदस्य म्हणून पहिल्यांदा निवड. एप्रिल १९२६ - १९३१ या काळात हिंदुस्थानचे व्हाईसराय. मार्च १९३१मध्ये गांधी-इर्विन करार. १९४० मध्ये युनायटेड स्टेटमध्ये ब्रिटनचे दूत.

## अल्बर्ट आईनस्टाईन (१८७९ - १९५५)

अमेरिकेतील भौतिक विज्ञान शास्त्रज्ञ. १८७९ साली जर्मनीत जन्म. १९०५ साली सापेक्षतावादाचा सिद्धांत जगाला सांगितला. सापेक्षतावादाचा सामान्य सिद्धांत स्थापित केला, १९१६. न्युटनचा भूमितीतील

गुरुत्वाकर्षणचा सिद्धांत खोडून नवीन सिद्धांत प्रसिद्ध केला. १९१६. भौतिक शास्त्रातील नोबेल पारितोषिक, १९२१. गुरुत्वाकर्षण आणि विद्युत चुंबकशास्त्र यांच्या एकिकरणाचा सिद्धांत शोधण्याचा प्रयत्न केला. १९४८मध्ये गांधीजींच्या मृत्यूच्या वेळी गांधीजींना उज्ज्वल श्रद्धांजली वाहिली. ते लिहितात, “येणाऱ्या पिढ्यातील विज्ञानाचा विश्वासही बसणार नाही की असा माणूस जन्माला आला होता आणि त्याची पावले या भूमीवर पडली होती.”

## अबुल कलाम आझाद (१८८८ ते १९५८)

जन्म मक्केत. शिक्षण अल झिहु विश्वविद्यालयात. राष्ट्रवादी मुसलमान पुढारी आणि इस्लामचे धर्मशास्त्रज्ञ. संस्कृती आणि साहित्याचे सखोल ज्ञान. विद्वान. उर्दू नियतकालिक ‘वकिल’ (अमृतसर) चालवले. अल हिलाल आणि अल खलागचे (कलकत्ता) संपादन. पहिल्या विश्वयुद्धादरम्यान राचीत स्थानबद्ध करण्यात आले होते. असहकार आंदोलनादरम्यान १९२१ धरपकड. १९३१च्या मिठाच्या सत्याग्रहाच्या दरम्यान तुरुंगात. १९४२ - १९४५ अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध. कॉंग्रेसचे अध्यक्ष १९२३, १९४० ते १९४६. २२ फेब्रुवारी १९५८ रोजी मत्यू होईपर्यंत नेहरू मंत्रिमंडळात शिक्षण खात्याचे मंत्री.

## डॉ. भीमराव रामराव आंबेडकर (१४ एप्रिल १८९१ - ६ डिसेंबर १९५६)

मध्य भारतात महुवा येथे जन्म, १४ एप्रिल १८९१. १९०७ साली शालांत परीक्षा उत्तीर्ण. मुंबईत एलफिस्टन महाविद्यालयात शिकले. १९१२ बी.ए. झाले आणि बडोदा संस्थानात नोकरी. १९१३ साली कॅंब्रीजला गेले. आणि १९१६ पीएच.डी. नंतर बडोद्याच्या महाराजांचे लष्करी सचिव झाले. परंतु सवर्ण वर्गाच्या वर्तणुकीमुळे नोकरी सोडली, १९१७. मुंबईत सिडेनहॅम महाविद्यालयात राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्राचे अध्यापक, १९१८ ते १९२०. सप्टेंबर १९२० मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये कार्यरत. तसेच बॅरिस्टर होण्याकरिता ग्रेझ इनमध्ये दाखल. लंडन विश्वविद्यालयात विज्ञान पारंगत (एम. एससी.) (अर्थशास्त्र). अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात संघर्ष. मुंबई विधान परिषदेचे सदस्य, १९२६ ते १९३४. केंद्रीय विधिपरिषदेचे सदस्य, १९३७ - १९४२. सायमन कमिशनच्या वेळी मुंबई विधान परिषदेचे सदस्य १९२८. गोलमेज परिषदेत उपस्थिती, १९३० - १९३१. पुणे करार केला, १९३२. व्हाईसरायच्या कार्यकारिणीत मजूर मंत्री, १९४२ ते १९४६. अखिल भारतीय अनुसूचित जाती संघाची स्थापना, १९४३. घटनासमितीचे सदस्य,

घटनासमितीचे अध्यक्ष होते. भारत सरकारच्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री, १९४७ ते १९५१. भारताची घटना तयार केली. धर्मांतर करून बौद्ध धर्म स्वीकारला, १४ ऑक्टोबर १९५६. मृत्यू ६ डिसेंबर १९५६.

## लीलावती आशर

मुंबईत गरिबांची वैद्यकीय सेवा करणाऱ्या एक आश्रमवासी. बालविधवा झाल्यानंतर आश्रमात राहण्याकरिता गांधीजींची परवानगी मिळाली. त्यांची काळजी करणाऱ्या काकांचे म्हणणे होते की पुनर्विवाह करणार नाही असे वचन जर ही देत असेल तर आश्रमात गांधीजींजवळ राहायला जाऊ देईन. साबरमतीचे सत्याग्रहाश्रम विखुरल्यानंतर सेवाग्राम येथे जाऊन राहिल्या.

सुशिला नाय्यर डॉक्टर असल्यामुळे बापूजी त्यांना फार महत्त्व देतात असे त्यांच्या मनात ठसले होते. ही गोष्ट गांधीजींच्या गळी उतरू शकली नाही. परंतु यांना डॉक्टर व्हायची तळमळ लागली होती. तेव्हा त्या शालांत परीक्षासुद्धा उत्तीर्ण झालेल्या नव्हत्या. आणि तेव्हा त्या ३७ वर्षाच्या होत्या. गांधीजींनी डॉक्टरी शिकण्याची व्यवस्था केली.

## आर्यनायकम इ. व्ही. (१८९१ ते २२ जुलै १९६७)

श्रीलंकेतील. मूळ हिंदू. नंतर ख्रिश्चन झालेल्या कुटुंबात राहिले. रविंद्रनाथ टागोरांचे सचिव आणि नंतर शांतिनिकेतनमध्ये शिक्षक होते. आशादेवी या बंगाली ब्राह्मण महिलेशी विवाहित. गाधीजींसोबत काम करू लागल्यानंतर हिंदुस्थान तालिमी संघाचे काम करू लागले आणि वर्धेत वास्तव्य.

## चार्ल्स फ्रिझर एँड्र्यूज (१८७१ ते १९४०)

१९०४ साली ख्रिश्चन धर्मप्रचारक धर्मगुरू म्हणून हिंदुस्थानात आले. सेंट स्टिफन्स महाविद्यालय, दिल्ली येथे शिकवत होते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे समर्थन. अनेक पुस्तके लिहिली. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत होते तेव्हापासून त्यांचे मित्र. ते वारल्यानंतर त्यांच्याइतका जवळचा माझा दुसरा कोणताही मित्र नाही असे गांधीजी म्हणाले. परस्परांना ते 'मोहन' आणि 'चार्ली' म्हणून संबोधत असत.

## डॉ. जेम्स हेन्री कझिन्स (१८७३ ते १९५७)

कवी, प्रवासी लेखक, शिक्षणतज्ज्ञ, 'न्यू इंडिया'च्या संपादक मंडळात. मदनपल्ली येथील थिऑसॉफी महाविद्यालयाचे प्राचार्य. मद्रास विद्यापीठात सिनेट, ऍकॅडॅमिक कौन्सिल, आणि ललित कलेच्या अभ्यास मंडळाचे सदस्य. १९०३ साली मागरिट इ. गिलेप्सी यांच्याशी विवाह. पुस्तकांमध्ये 'अ वांडरिंग हिरो', 'अ बार्डिक पिलिग्रिमेज', 'अ स्टडी इन सिंथिसिस' आणि 'बेसिस ऑफ थिऑसॉफी' ही पुस्तके प्रख्यात.

## लिओनल जॉर्ज कर्टिस (१८७२ ते २४ नोव्हेंबर १९५५)

बॅरिस्टर. दक्षिण आफ्रिकेतील बोअर युद्धात सामील. जोहानिसबर्गमध्ये टाऊन क्लार्क. ट्रान्सवाल सरकारच्या स्थानिक शासनात सहायक वसाहत सचिव. ऑक्सफर्डमधील ऑल सोल्स महाविद्यालयाचे फेलो, आणि वसाहतींचा इतिहास या विषयात सह-प्राध्यापक. ब्रिटिश वसाहत कार्यालयात आयर्लंडच्या प्रश्नावर सल्लागार, १९२१ ते १९२४. पुस्तके - १९१६ - 'प्रॉब्लेम ऑफ द कॉमनवेल्थ'. १९२० - 'डायर्की'. १९२४ - 'प्रिव्हेंशन ऑफ वॉर'. १९३५ - 'दक्षिण आफ्रिकेत राखीव राज्ये'. १९५१ - 'मिल्नरबरोबर आफ्रिकेत'. आणि १९५४ - 'अवेकनिंग - अ रिव्होल्युशन'.

## दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर (१ डिसेंबर १८८५ ते २१ ऑगस्ट १९८१)

क्रांतिकारकांबरोबर सार्वजनिक जीवनाची सुरुवात. स्वामी आनंदच्या नेतृत्वाखाली हिमालयाचा प्रवास. शांतिनिकेतनमध्ये अध्यापक. पहिल्यांदाच साबरमती आश्रमात जेव्हा ते राहायला आले तेव्हा त्यांचे एक कुटुंब होते. सत्याग्रही म्हणून अनेकदा तुरुंगवास.

कुलगुरू गुजरात विद्यापीठ, १९२८ ते १९३५.

गांधी विचारावर आणि साहित्य, कला, निसर्गदर्शन, धर्म, तत्त्वज्ञान अनेक पुस्तकांचे लेखन. गुजराती साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, १९५९. राज्यसभेचे सदस्य १९५२ ते १९६४. 'जीवनप्रभात', 'मंगलप्रभात' चे संपादक.

## आचार्य जीवतराम भगवानदास कृपलानी (११ नोव्हेंबर १८८९ - १९ मार्च १९८२)

हैदराबाद, सिंधमध्ये (आता पाकिस्तानात) १८८९ साली जन्म. अमदाबादमध्ये मृत्यू, १९ मार्च १९८२.

हैदराबाद, मुंबई आणि पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण. १९१७ साली चंपारण सत्याग्रहात गांधीजींना सहकार्य. त्याआधी १९१२ साली मुझफ्फरपूरमधील जी. बी. बी. महाविद्यालयात प्राध्यापक. १९१८ साली मदन मोहन मालवीय यांचे सचिव. बनारस हिंदू विद्यापीठात १९१९-२० साली राज्यशास्त्राचे प्राध्यापक. नंतर काशी विद्यापीठात. काशीत गांधी आश्रमाची स्थापना.

गुजरात विद्यापीठात १९२२-२७ दरम्यान प्राचार्य. काँग्रेसचे महासचीव १९३४-४६. १९४६-४७, १९५० मध्ये 'व्हिजिल' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. १९५१ काँग्रेस डेमॉक्रेटिक फ्रंटची स्थापना. आणि नंतर लगेच 'किसान मजदूर प्रजा पार्टी'ची स्थापना. ऑक्टोबरमध्ये 'किसान मजदूर प्रजा पार्टी' समाजवादी पक्षात विलीन. १९५४ पर्यंत प्रजा समाजवादी पक्षाचे अध्यक्ष.

अनेकदा तुरुंगवास. घटनासमितीत सदस्य, १९४६-५०. तात्कालिक संसदेचे सदस्य १९५०-५२. लोकसभेचे सदस्य १९५३-५७, १९५७-६२, १९६३- ६७ आणि १९६७-७१.

पुस्तके - 'द गांधीयन वे', 'द नॉन व्हायोलंट रिव्होल्युशन', 'पॉलटिक्स ऑफ चरखा', 'इंडियन नॅशनल काँग्रेस', 'द फ्युचर ऑफ काँग्रेस', 'द फेटफुल इअर्स', 'द लेटेस्ट फॅड', 'व्हेअर आर वुई गोईंग?' 'बेसिक एज्युकेशन', 'द सेकंड प्लॅन', 'पॉम्प ऍंड पॉव्हर्टी', 'गांधी - द स्टेट्समन', 'सरप्लस व्हॅल्यू', 'आत्मकथा'.

## कुरेशी शोएब (१८९२-१९६२)

बरेली, अलीगढ आणि ऑक्सफर्डमध्ये शिक्षण. १९१२-१३मध्ये हिंदुस्थानचे तुर्कस्थानमध्ये पाठवलेल्या वैद्यकीय पथकाचे सदस्य. 'न्यू इंडिया'चे संपादक.तीन वर्ष तुरुंगात. १९२० मध्ये 'मुस्लिम आऊटलुक' आणि १९२२मध्ये 'यंग इंडिया'चे संपादक. त्याकरिता आणि खिलाफत आंदोलनात भाग घेतल्यामुळे तुरुंगवास, १९२२.अखिल हिंदुस्थान काँग्रेस पक्षाचे महासचिव १९२४-२५. सर्वपक्षीय परिषदेचे सदस्य १९२८. त्याच वर्षी काँग्रेसचा राजीनामा आणि मुस्लिम लीगमध्ये १९३४ पर्यंत. राष्ट्रीय योजना आयोगाचे सदस्य १९३९-४६. हिंदुस्थान सरकारचे आयोजन सल्लागार. १९४७मध्ये पाकिस्तानमध्ये गेले आणि

पाकिस्तानचे राजदूत म्हणून रशियात गेले, १९४९-१९५२. १९५२-५३ काश्मीरचा प्रश्न आणि शरणार्थ्यांच्या प्रश्नासंबंधात पाकिस्तानचे मंत्री. १९५३-५४. पाकिस्तानचे इराकमध्ये राजदूत, १९५५-५९.

## अब्दुल गफ्फार खान (६ फेब्रुवारी १८९०- २० जानेवारी १९८८)

सरहद्द गांधी म्हणून प्रख्यात. रौलेट कायद्याविरुद्ध आंदोलन. असहकार, सविनय आज्ञाभंगात आणि छोडो हिंदुस्थान आंदोलनात सहभाग. पुश्तु भाषेत 'पख्तून' हे मासिक नियकालिक सुरू केले, १९२८. खुदाई खिदमदगार संघटनेची स्थापना केली १९२८. १९३१च्या कराची काँग्रेसमध्ये उपस्थिती. लाल डगलेवाल्या स्वयंसेवक संघटनेचे संस्थापक पुढारी. पाकिस्तान घटनासमितीचे सदस्य १९४७. १९६०-८० दरम्यान अनेकदा त्यांना तुरुंगात जावे लागले. नेहरू पुरस्कार १९६७. भारतरत्न पुरस्कार १९८७.

## डॉ. खान अब्दुल जब्बार खान उर्फ खान साहेब (१८८३- ९ मे १९५८)

खान अब्दुल गफ्फार खान यांचे मोठे भाऊ. विलायतेत डॉक्टरीचा अभ्यास. मेरी नावाची इंग्रज पत्नी. केंद्रीय विधीसमितीचे सदस्य. वायव्य सरहद्द प्रांताचे मुख्यमंत्री, १९३७-३८आणि १९४६. ऑक्टोबर १९५५ मधील एकम योजने अंतर्गत एकीकरण करण्यात आलेल्या पश्चिम पाकिस्तानचे ते पहिले मुख्यमंत्री. ९ मे १९५८मध्ये त्यांचा खून करण्यात आला.

## खुदाई खिदमदगार

वायव्य सरहद्द प्रांतातील पठाणांनी अहिंसेचे पालन करावे म्हणून खान अब्दुल गफ्फार खान यांनी १९२९ साली लाल डगले घालणारी 'खुदाई खिदमदगारांची' म्हणजे ईश्वराच्या सेवकांच्या संस्थेची स्थापना केली होती. या संस्थेने काँग्रेसच्या कार्यक्रमाला पाठिंबा दिला होता आणि विभाजनाच्या वेळी विभाजनाच्या कल्पनेला विरोध केला होता.

## शिवप्रसाद गुप्त (१८८३- १९४४)

बनारसच्या केंद्रीय हिंदू महाविद्यालयात आणि अलाहाबादच्या म्यूर केंद्रीय महाविद्यालयात शिक्षण. वक्तृत्वकलेत प्रभूत्व. जमीनदार. दानधर्मात शूर. ज्ञान मंडळाचे संस्थापक. साहित्याशी संबंधित

नियतकालिक ‘मर्यादा’, मासिक ‘स्वर्थ’ आणि १९२० साली दैनिक ‘आज’चे संस्थापक. १९२१ साली काशी विद्यापीठाची स्थापना. ‘भारतमाता’ मंदिराचे निर्माता. काँग्रेसचे खजिनदार. कार्यकारिणीचे सदस्य. संयुक्तप्रांत राजकीय परिषदेचे अध्यक्ष, १९२४. सत्याग्रही म्हणून तुरुंगवास, १९३०-३२.

## गुप्त सियारामशरण (१८८५- १९६३)

मैथिलीशरण गुप्तचे लहान भाऊ. कवी.

यांची हिंदीतील ग्रंथरचना - बापू, उन्मत्त, नोआखाली

## जयरामदास दौलतराम (१८९२- १९७९)

‘भारतवासी’ १९१६, सिंधी वर्तमानपत्र ‘हिंदू’ १९२०, आणि इंग्रजी ‘हिंदुस्तान टाईम्स’ १९२५-२६, ‘यंग इंडिया’ १९३० मानद संपादक. अखिल हिंदुस्थान काँग्रेसचे महासचिव १९३१-१९३४. भारतीय घटना समितीचे सदस्य १९४६-१९४७, १९४८-१९५०, बिहारचे राज्यपाल १९४७-१९४८, भारत सरकारचे अन्न आणि कृषीमंत्री १९४८-१९५०, आसामचे राज्यपाल १९५०-१९५६, राज्यसभेत नियुक्त सदस्य १९५९-६४ आणि १९७०.

## लॉईड जॉर्ज (१८५३-१९४५)

पहिल्या विश्वयुद्धादरम्यान ब्रिटनचे प्रधानमंत्री झाले आणि ६ वर्ष या पदावर राहिले, १९१६-१९२२. वृद्धांना सेवानिवृत्ती वेतन देण्याचा हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या सदस्यांनी १९०९ साली फेटाळला त्यानंतर उमराव सभेतील बहुमत हा ठराव मंजूर करून घेण्याच्या दृष्टीने १९११ पर्यंत अपुरे होते. यांनी आजार आणि बेकारीच्या वेळी विम्याची व्यवस्था सुरू केली. फ्रान्सचे क्लेमाँसो आणि युनायटेड स्टेट्सचे विल्सन यांच्यासोबत, युद्धविरामानंतर १९१९मध्ये व्हर्सायच्या तहावर स्वाक्षऱ्या केल्या. १९४४ पर्यंत विधिमंडळाचे सदस्य होते. ओटोमन साम्राजाचे विभाजन न करण्याचे आश्वासन पाळू न शकल्यामुळे खिलाफत आंदोलन झाले. हिंदुस्थानात गांधीजींना यांनी पाठिंबा दिला होता.

## छगनलाल नथुलाल जोशी (१८९४-१९९२)

सत्याग्रह आणि साबरमती आश्रमात वास्तव्य. दांडीयात्रेत सहभाग. 'येरवडा जेलमां बापू साथे पांच मास' चे लेखक. यांची इतर पुस्तके - १.'सत्याग्रह आश्रम अने गांधी परिवार' २. 'अस्पृश्यता निवारण ए ज धर्म'.३. 'सत्याग्रह आश्रमनां संभारणा'. ४. 'गांधीजींनी भणाववानी रीत'. ५. 'सरदारनी आत्मीयता'. ६. 'गरीबी हटाववा दारूबंधी'. ७. 'गांधीजींना सानिध्यमां मारी जीवन साधना'. ८. 'मोरारजीभाईनुं जीवनदर्शन'. ९. 'वैष्णवजन तो तेने कहिये'. १०.'गांधीजीना हरिजन सेवामां पाठ' ११. 'आश्रम अने जेल जीवनमां यादगार प्रसंगो'. १२. 'गांधीजीना आश्रम साथीओ'. १३. 'गांधीदिक्षा - आश्रममां अने जेलमां'. १४. 'मोहनदास महात्मा केम बन्या?' १५. 'सौराष्ट्रनां खादीतीर्थो'. १६. 'गुजरातना खादीसेवको'. १७. 'मारा साथी ढेबरभाई'. १८. 'सदाचार निर्माण अने सहचिन्तन'. १९. 'खादीनिबंध;. २०. 'आपणा आर्थिक प्रश्नो'.

## बाळ गंगाधर टिळक (२३ जुलै १८५६-१ ऑगस्ट १९२०)

न्यू इंग्लिश माध्यमिक शाळा आणि फर्ग्युसन महाविद्यालय या प्रख्यात संस्थांचे संस्थापक. दैनिक 'केसरी' आणि 'मराठा' साप्ताहिकांचे संस्थापक, संपादक. संमतीवयाच्या विधेयकाला विरोध केला. काँग्रेसमध्ये जहाल मतवादी पक्षाचे पुढारी, आणि १९०७च्या सुरत काँग्रेसमध्ये फिरोजशाह महेतांसह इतर मवाळ पुढाऱ्यांना विरोध. टिळक देशद्रोह करत आहेत असा आरोप ऑक्सफर्डमधील अध्यापक आणि 'द टाईम्स'चे सहाय्यक संपादक व्हॅलेंटाईन चिरोल यांनी केला आणि त्यामुळे टिळकांना १९०८ ते १९१४ या काळात देशातून हद्दपारीची शिक्षा झाली. ब्रह्मदेशातील तुरुंगात त्यांना कारावास भोगावा लागला होता. १९१६ साली होमरूल आंदोलन सुरू केले. १९२० साली काँग्रेस डेमॉक्रेटिक पक्ष. 'गीतारहस्य' हा त्यांचा खूप प्रख्यात ग्रंथ त्यांनी मंडाले येथील कारागृहात लिहिला.

## रेहाना तय्यबजी

बडोद्यात २६ जानेवारी १९०१ साली. काँग्रेसचे अध्यक्ष बद्रुद्दिन तय्यबजी यांची नात आणि अब्बास तय्यबजींची मुलगी. बडोद्यात शिक्षण. कडी युवक संघाच्या अध्यक्ष. पाटणमध्ये विदेशी कापड व्यापाऱ्यांविरुद्ध सत्याग्रह केला. १९४२ साली कारावास. गांधीजींबरोबर सेवाग्राममध्ये बऱ्याचदा राहिल्या. कृष्णप्रेमी राधा. १७ मे १९७५ ला मृत्यू. ओखलात जामिया मिलियाजवळ त्यांची कबर आहे.

## वि. वि. दास्ताने ( १८८२-१९५७)

भुसावळ आणि धुळे इथे शिक्षण घेतल्यानंतर पुण्यात डेक्कन महाविद्यालयातील आणि फर्ग्युसन महाविद्यालयात विद्यार्थी. क्रांतिकारक आंदोलनाचे आकर्षण. १९०७ साली वकिली सुरू केली ती १९२१ साली असहकार आंदोलनाच्या वेळी सोडली. मुळशी पेठ सत्याग्रहादरम्यान तुरुंगात. खानदेशात रचनात्मक कार्याचे नेतृत्व केले.

## दादा (शंकर त्र्यंबक) धर्माधिकारी (१८ जून १८९९-१ डिसेंबर १९८५)

बैतुल जिल्ह्यात मुलताई तालुक्यात जन्म. हुशंगाबाद आणि नागपूरमध्ये शिक्षण. सत्याग्रहात भाग घेतला आणि तुरुंगवास - १९३०-४२. टिळक विद्यालय, नागपूरमध्ये शिक्षक, १९३५. 'सर्वोदय'चे उपसंपादक, १९४६. मध्यप्रदेश विधानसभेचे सदस्य, १९४६. १९४६-५२ घटनासमितीचे सदस्य, १९५१. गांधी सेवासंघाचे सदस्य, भूदान यज्ञाचे संचालक, मराठीत 'पत्रसंग्रह'. 'आपल्या गणराज्याची घडण', स्नेहाचे झरे'. तसेच हिंदीत 'सर्वोदय दर्शन', 'अहिंसक क्रांतीची प्रतिक्रिया', 'क्रांतिनिष्ठा', 'लोकतंत्र', 'लोकनीति विचार', 'विकास आणि भविष्य' या पुस्तकांचे लेखक.

## शंकरराव देव (४ जानेवारी १८९४- ३० डिसेंबर १९७४)

गांधीजींबरोबर चंपारण आंदोलनात होते. १९२० साली असहकार आंदोलनात सहभाग. 'स्वराज' या नियतकालिकाचे संपादक. मुळशी पेठा सत्याग्रहाचे नेतृत्व. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष. १९३५-३६ मध्ये फैजपूर इथे काँग्रेस भरली असताना स्वागत समितीचे अध्यक्ष. १९४१ मध्ये व्यक्तिगत सत्याग्रहात भाग घेतला. १९४२मध्ये अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध.

घटनासमितीत सदस्य १९४८-५०. भूदान आंदोलनात सहभाग.

## भूलाभाई जीवणजी देसाई (१३ ऑक्टोबर १८७७-६ मे १९४६)

मुंबई उच्च न्यायालयात अधिवक्ता (ऍडव्होकेट). बारडोलीत ना-कर सत्याग्रहाच्या वेळी (१९२२) मदत केली. १९२८ साली बारडोली तालुक्यात शेतकऱ्यांचा परिस्थितीची चौकशी करायला ब्रुमफिल्ड समिती आली

होती. तिच्यासमोर शेतकऱ्यांची बाजू मांडली. १९३० मध्ये काँग्रेसमध्ये सामील. कार्यकारिणीचे सदस्य १९३४-३५. तुरुंगवास १९३२. हिंदुस्थान विधिसभेचे सदस्य १९३५-४५. आझाद हिंद सेनेच्या अटक करण्यात आलेल्या सैनिकांना लाल किल्ल्यात ठेवण्यात आले होते आणि दिल्लीतील विशेष न्यायालयात त्यांच्यावर खटला चालवण्यात येत होता. तिथे भूलाभाईंनी त्यांची बाजू मांडली, १९४५.

## सरोजिनी नायडू (१३ फेब्रुवारी १८७९-२ मार्च १९४९)

कवियत्री आणि राष्ट्रवादी राजकीय पुढारी. रॉयल सोसायटी ऑफ लिटरेचरच्या फेलो, १९१४. इंग्रजीत पाच कवितासंग्रह प्रकाशित - १. 'इन द बझार्स ऑफ हैदराबाद' २. 'पॅलॅक्विन बेअरर' ३. 'व्हिलेज साँग' ४. 'गोल्डन थ्रेशहोल्ड' ५. 'द स्क्रिप्टेड फ्ल्यूट- साँग्ज ऑफ इंडिया'. भारतात स्त्रियांच्या आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाशी जुळलेल्या होत्या. हिंदुस्थान काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष, १९२५. गोलमेज परिषदेत प्रतिनिधी, १९३१. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल, १९४७.

## आनंदशंकर बापूभाई ध्रुव (२५ फेब्रुवारी १८६९-७ एप्रिल १९४२)

संस्कृत आणि गुजरातीत पारंगत. भारतीय संस्कृतीतील सनातन सत्यांचे ज्ञान असणारा आणि ते सत्य समजावून सांगणाऱ्या साक्षर गुजरात महाविद्यालयात संस्कृतचे प्राध्यापक. बनारस हिंदू विद्यापीठात पंडित मालवीयजींबरोबर कुलगुरू. अमदाबादमध्ये गिरणीमालक आणि मजूर यांच्यात महागाई भत्ता वगैरेसंबंधात पहिल्या महायुद्धानंतर जो वाद झाला होता आणि संप आणि ताळेबंदी सुरू झाली होती तेव्हा गांधीजींनी त्यांना मध्यस्थ म्हणून नेमले होते. पंडित युगाचे अग्रगण्य सारस्वत, विद्वान विवेचक आणि चिंतक. धर्म, तत्त्वज्ञानाच्या देशविदेशातील परिषदांमध्ये सन्माननीय स्थान. गुजरातमध्ये संस्कारांच्या घडणीत कार्य करणाऱ्या 'वसंत' मासिकाचे संपादक म्हणून अद्वितीय योगदान, १९०२-३९.

त्यांच्या समता आणि समन्वयवादी भावनेने परिपूर्ण लेखातून आणि पुस्तकांमधून आपल्याला स्वतंत्र परंतु मर्मग्राही विचार मिळतात. ग्रंथरचना - 'नीतिशिक्षण', १९११, 'धर्मवर्णन' १९१३, 'हिंदू धर्माची बालपोथी', १९१८, 'श्रीभाष्यनु सटीक भाषांतर' १९१३, 'आपणो धर्म' १९१६, 'काव्यतत्त्वविचार' १९४१, 'दिग्दर्शन' १९४२.

## नटराजन, कामाक्षी (२४ सप्टेंबर १८६८ - २९ एप्रिल १९४८)

पत्रकार. हिंदू या वृत्तपत्रात काम करू लागण्यापूर्वी कारकून आणि शाळेत शिक्षक होते. १८८९ मध्ये ‘इंडियन सोशल रिफॉर्मर’ हे साप्ताहिक सुरू केले. ‘टाईम्स ऑफ इंडिया’त लेख लिहीत असत. ‘इंडियन डेली मेल’चे संपादक. मुंबईत स्वराज पक्षाचे अध्यक्ष. गांधीजींच्या विचारांना, लेखनाला मदत करत असत.

## रामेश्वरी नेहरू (१० डिसेंबर १८८६ - ८ नोव्हेंबर १९६६)

राजा नरेंद्रनाथ यांची मुलगी. ब्रिजलाल नेहरूंशी विवाहित. संपादक ‘स्त्री दर्पण.’ अखिल भारत महिला परिषदेच्या सामाजिक सचिव. हिंदुस्थानी स्त्रियांची संघटना, लंडनच्या अध्यक्ष, १९३१-३३. लेनीन पीस पारितोषक, १९६१.

## दादाभाई नवरोजी (४ सप्टेंबर, १८२५-३० जून १९१७)

१८६५ साली लंडन इंडिया सोसायटीची स्थापना. १९१७पर्यंत तिचे अध्यक्ष. १८८३मध्ये ‘व्हाईस ऑफ इंडिया’ या वृत्तपत्राचे संस्थापक आणि संपादक. त्या आधी गुजराती वर्तमानपत्रांचे संपादक. १८८५ मुंबई विधान परिषदेचे सदस्य, आणि मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनचे उपाध्यक्ष. काँग्रेसचे अध्यक्ष १८८६, १८९३ आणि १९०६. १८८३साली हिंदुस्थानात होणाऱ्या खर्चाची चौकशी करण्याकरिता वेल्बी आयोगाची नियुक्ती करण्यात आली होती. त्याचे सदस्य. १९०२ साली उदारमतवादी पक्षाचे सदस्य म्हणून इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य म्हणून निवड. ‘पॉव्हर्टी ऍंड अनब्रिटिश रूल इन इंडिया’ या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक. भारतीय राजकारणाचे भिष्मपितामह.

## जयप्रकाश नारायण (११ ऑक्टोबर १९०२-८ ऑक्टोबर १९७९)

सिताबडियारा, जि. छप्रा, बिहार येथे १९०२ साली जन्म. १९२१ साली असहकारी आंदोलनात सहभाग. अमेरिकेत शिक्षण घेतल्यानंतर १९२९ साली हिंदुस्थानात परत. अ. हि. काँ. कमेटीचे मजूर सचिव, १९२०. काँग्रेस समाजवादी पक्षाचे संस्थापक सदस्य आणि त्या पक्षाचे आजीवन महासचिव, १९३४-५०. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य, १९३६. जमशेदपूरमध्ये अटक, १९४०. देवळी छावणीत स्थानबद्ध. हजारीबाद तुरुंगात भिंतीवर चढून उडी मारली आणि पळून गेले. भूमीगत राहून छोडो भारत चळवळीचे संचालन. अटक, आधी

लाहोर किल्ल्यात ठेवले, १९४६. भूदान आंदोलनात सामील, १९५३. १९७१ साली जीवनदान. गांधीजींनी स्वीकारलेल्या अहिंसक पद्धतीने आंदोलन केल्यामुळे १९७४ साली धाडपाडूजवळ आत्मसमर्पण करायला लावले. (जसे आहे तसे.) संपूर्ण क्रांतीचा मंत्र दिला, १९७५. आंदोलनाच्या दरम्यान २६ जून १९७५ला अटक. जनता पक्ष बनवण्याकरिता प्रेरित केले, १९७७. ८ ऑक्टोबर १९७९ला मृत्यू.

## नेहरू, पंडित जवाहरलाल (१४ नोव्हेंबर १८८९- २७ मे १९६४)

जन्म अलाहाबादमध्ये.. हॅरो आणि केंब्रिजमध्ये शिक्षण. बॅरिस्टर. ऍनी बेझंट यांच्या होमरूल आंदोलनात सामील. असहकार आंदोलनात सामील आणि अटक. सविनय आज्ञाभंग. १९३०, ३२, वैयक्तिक सत्याग्रह. १९४१ आणि छोडो हिंदुस्थान आंदोलनात सहभाग. तुरुंगात. मध्यंतरकालीन सरकार त्यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आले होते. भारताचे प्रधानमंत्री १९४६-६४. काँग्रेसचे अध्यक्ष १९२९, १९३६-३७, १९४६, १९५१-५४.

## सीताराम पुरुषोत्तम (आप्पासाहेब) पटवर्धन (४ डिसेंबर १८९४-११ मार्च १९९२)

कोकणचे गांधी म्हणून प्रसिद्ध. साफसफाई आणि स्वच्छतेच्या कामात अनेक स्वयंसेवकांना प्रशिक्षित केले. फैजपूर काँग्रेसमध्ये त्यांनीच प्रशिक्षित केलेले अनेक स्वयंसेवक आले होते.

१० वर्षांचे असतानाच शिक्षणाकरिता रत्नागिरीला आले. तिथे माध्यमिक शाळेत शिक्षण घेऊन मॅट्रिकची परीक्षा द्यायला मुंबईला आले. सगळ्या विद्यार्थ्यात पाचवे आले. (यांचे मोठेभाऊ रामकृष्ण पुरुषोत्तम पटवर्धन मॅट्रिकच्या परीक्षेत पहिले आले होते आणि त्यांनी जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवली होती.) १९१६ एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबईमधून वांङ्मय स्नातक (बी. ए.) झाले. १९१९मध्ये तत्त्वज्ञान विषयात वांङ्मय पारंगत (एम. ए.). मध्यंतरी हिंदुस्थान रक्षण दलात तीन महिन्यांकरिता भरती झाले लष्करी शिक्षणाचा अभ्याक्रम पूर्ण केला. पुण्यात सर परशुराम महाविद्यालयात तत्त्वज्ञान शिकवत होते, परंतु ते सोडून साबरमतीत गांधीजींच्या आश्रमात आले. 'यंग इंडिया'च्या प्रकाशनात मदतनीस.

गांधीजींच्या विचारांचा महाराष्ट्रात प्रसार करण्यासाठी गांधीजींची परवानगी घेऊन परत रत्नागिरीत. तिथे राष्ट्रीय शाळा सुरू केली. दापोलीचे बाबा फाटक, सावंतवाडी संस्थानातील आबासाहेब वालावलकर अशा सर्व कार्यकर्त्यांना प्रशिक्षित केले. चरख्याद्वारे गरिबांना भाकरी मिळावी आणि बेकारी टळावी म्हणून

व्यवस्था केली. या कामाकरिता त्यांनी सावंतवाडीचे राजा बापूसाहेब महाराजांची मदत मिळवली. १९३०च्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी महाराष्ट्रापुरते शिरोड्याला मिठाच्या सत्याग्रहाचे केंद्र बनवले होते. शंकरराव देव, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, मामासाहेब देवगिरीकर वगैरेबरोबर तुरुंगात गेले. या काळात तुरुंगातील कैद्यांना भंगीकाम देण्याचा रिवाज नसल्यामुळे तिथे भंगीकाम मिळावे म्हणून त्यांनी उपवास केला. तुरुंगात गांधीजींनी त्यांना भंगीकाम द्यायला लावून उपवास सोडायला लावला.

तुरुंगाबाहेर आल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की म्हाली हरिजनांचे केस कापायला तयार नसतात. यामुळे आप्पासाहेब ब्राह्मण-म्हाली झाले. ते चामडे कमावण्याची कलासुद्धा शिकले. सर्वत्र भंगीमुक्तीचा मंत्र पोहोचवला.

महाराष्ट्रात मागास वर्गात कुणबीही येतात. परंतु हे मागासलेले असूनही त्यांना हक्क मिळत नव्हते. यामुळे कुणबी सेवा संघाची स्थापना केली. लांजा आणि दापोलीत कुणब्यांकरिता छात्रालय काढले आणि या कामाकरिता सामंत गुरुजी आणि नानासाहेब वंजारेसारख्या कार्यकर्त्यांची मदत मिळवली. हिंडलगा (बेळगाव) तुरुंगात असताना त्यांनी 'सत्याग्रह व स्वराज्य' हे पुस्तक लिहिले. सुटका झाल्यानंतर ते गांधीजींना भेटायला पाचगणीला गेले. तेव्हा गांधीजी म्हणाले की महादेव देसाई नसल्यामुळे त्यांचे काम पूर्ण करण्याकरिता मदत करा. परंतु आप्पासाहेबांनी आपल्या जन्मभूमीलाच कर्मभूमी केली होती. ती मी सोडू शकत नाही असे त्यांनी गांधीजींना विनयपूर्वक समजावले.

रत्नागिरी जिल्ह्यात शेती, गोपालन आणि ग्रामोद्योग इत्यादींचे काम वाढावे म्हणून तिथे एक प्रशिक्षण केंद्र स्थापण्याची त्यांची अतिशय इच्छा होती. याकरिता त्यांनी कोल्हापुरचे, परंतु मुळातील कोकणातील देशभक्त व्यापारी प्रभाकरपंत कोरेगावकरकडून कणकवलीजवळ अठरा एकर जमीन मिळवली. ब्रह्मचारी आप्पासाहेबांकरिता गोपुरी त्यांच्या मुलीसारखीच झाली होती. तिथे पन्नास वर्षांपासून बायोगॅस प्लँट, सुलभ संडास, धुराशिवायची चूल, पवनचक्की, सूर्यचूल, वगैरे साधनांवर काम सुरू असून संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे फळ पोहोचवण्यात आले. १९५६ साली त्यांनी द्वीभाषिक महाराष्ट्राचे स्वागत केले. यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या उत्साही आंदोलकांनी गोपुरीत घुसून तोडफोड करून खूप नासधूस केली.

## सरदार वल्लभभाई पटेल (३१ ऑक्टोबर १८७५-१५ डिसेंबर १९५०)

१९१३ साली अमदाबादमध्ये वकिली सुरू केली. महात्मा गांधींचे सहकारी म्हणून सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. खेडा सत्याग्रहाचे पुढारी म्हणून प्रसिद्ध. गुजरात प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष, १९२१-४६. अमदाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष, १९२४-२८. बारडोलीत कर न भरण्याच्या आंदोलनाचे नेतृत्व केले, १९२८. कराची येथे भरलेल्या काँग्रेसचे अध्यक्ष. काँग्रेस सांसदीय समितीचे अध्यक्ष, १९३१. १९३५-४० मध्यंतरकालीन सरकारमध्ये मंत्री. भारताचे उपप्रधानमंत्री. तसेच त्यांच्याकडे गृह आणि संस्थानांचे खातेही होते, १९४७-५०. गांधीजींचे कार्यक्रम साकार आणि सफल करण्याकरिता आणि भारतातील संस्थानांचे एकीकरण करण्यात महत्त्वाचा सहभाग.

## प्रभाशंकर दलपतराय पट्टणी (१८६२-१९३८)

मोरबीत जन्म. मोरबी आणि राजकोटमध्ये मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण.

भावनगरचे दिवाण, १९०२-१२. मुंबईत प्रांतिक विधिसभेचे सदस्य १९१६. लंडनमधील इम्पेरिअल विधिसभेचे सदस्य, १९१७. गोलमेज परिषदेत भाग घेतला, १९३० आणि १९३१. गांधीजींचे १९१४-१५पासून मित्र आणि सहाय्यक. इग्रजांनी यांना ‘नाईट कमांडर ऑफ इंडियन एम्पायर. ही पदवी दिली. यामुळे सर प्रभाशंकर.

लीग ऑफ नेशन्समध्ये हिंदुस्थानचे प्रतिनिधी. गुजरात साहित्य सभेचे अध्यक्ष.

भावनगरच्या भावसिंहजीबरोबर राहायचे. संस्कृतचे अभ्यासू.

इंग्रजांचा आणि देशी राज्यांचा विश्वास संपादन केला होता. यांनी भावनगर राज्यात अनेक सुधारणा केल्या.

## बिपिनचंद्र पाल (७ नोव्हेंबर १८५८-२० मे १९३२)

लेखक, पत्रकार, संपादक आणि समाजसुधारक. ब्राह्मोसमाजाचे सदस्य. कटकमध्ये मुख्याध्यापकाच्या पदापासून नोकरीला सुरुवात केली. नंतर बंगलादेशमध्ये आलेल्या सिल्हटमध्ये १८८६त ‘परिदेशक’ नावाचे बंगाली साप्ताहिक सुरू केले. १८८६मध्ये ‘बंगाल पब्लिक ओपिनियन’चे सहसंपादक.

'ट्रिब्यून'मध्ये (लाहोर) सामील. १८८६मधील काँग्रेसच्या अधिवेशनात उपस्थित. 'वंदेमातरम' नावाचे दैनिक सुरू केले. लेखनाच्या कारणामुळे सात महिन्यांचा कारावास. 'इंडिपेंडंट'चे संपादक. हिंदुस्थान विधिसभेचे सदस्य.

लाल (लाला लजपतराय), बाव (बाळ गंगाधर टिळक) आणि पाल (बिपिनचंद्र पाल) हे त्रिकूट बंगभंग विरोधातील आंदोलनात प्रसिद्धीस आले.

## प्रभावती जयप्रकाश (१९०६-१५ एप्रिल १९७३)

श्रीनगर (सीवान जिल्हा, बिहार) येथे १९०६ साली जन्म झाला. प्रभावतीबहेन ब्रजकिशोरजींची पुत्री आणि जयप्रकाश नारायण यांची पत्नी होत्या. १९३२ साली तुरुंगवास. त्याआधीही साबरमती आश्रमात गांधीजींबरोबर राहत होत्या. १९४० साली पटण्यात महिला चरखा समितीची स्थापना केली. १९४२ सारी परत तुरुंगात गेल्या.

मृत्यू १५ एप्रिल १९७३

## पुरुषोत्तमदास ठाकोरदास (३० मे १८७९-१९६१)

मूळ सुरतचे. उद्योगपती. मुबईत रुई बाजार आणि कापड बाजारात अग्रणी. १९२२ २३मध्ये इंडियन रिट्रेन्चमेट समितीचे सदस्य. हिंदुस्थान विधिसभेचे सदस्य, १९२३-३०. हिंदुस्थान करन्सी ऍंड डिफेन्स च्या रॉयल कमिशनचे सदस्य, १९२९. १९३०-३२ च्या दरम्यान गोलमेज परिषदेचे सदस्य.

## विजयालक्ष्मी पंडित (सरूप नेहरू) (१८ ऑगस्ट १९००-१ डिसेंबर १९९०)

जवाहरलाल नेहरूंची बहीण. १९२१ साली राजकोटमध्ये रणजीत सीताराम पंडितशी विवाह. असहकार आंदोलनात तुरुंगवास. सुयुक्त प्रांताच्या मंत्रिमंडळात सदस्य, १९३७-३८ आणि १९४६. भारताच्या सोव्हिएत युनियनमध्ये राजदूत, १९४७-४९. अमेरिकेत राजदूत १९४९-५२. युनायटेड नेशन्स जनरल असेम्ब्लीच्या अध्यक्ष १९५३-५४. लंडनमध्ये भारतीय उच्चायुक्त १९५४-६१. महाराष्ट्राच्या राज्यपाल, १९६४-६८.

## प्यारेलाल (१८९९- २७ ऑक्टोबर १९८२)

दिल्लीत जन्म. पश्चिम पंजाबमधील गुजरात हे त्यांचे मूळ निवासस्थान. शासकीय महाविद्यालय लाहोर येथे शिक्षण. साबरमती आश्रमात राहण्याकरिता महाविद्यालयातील शिक्षण सोडले. आगाखान महालात १५ ऑगस्ट १९४२ला महादेव गांधींचा मृत्यू झाल्यानंतर गांधीजींचे स्वीय सचिव. अनेकदा तुरुंगवास. दांडीकूचमध्ये होते. गांधीजींबरोर गोलमेज परिषदेत गेले होते, १९३१. सांप्रदायिक शांतता स्थापित करण्याकरिता नोआखालीत काम केले. हरिजनचे संपादन १९४८. गांधीजींच्या मृत्यूनंतर मृत्यूपर्यंत गांधीजींच्या चरित्रलेखनात व्यग्र. अनेक पुस्तकांचे लेखक.

## जमनालाल बजाज (४ नोव्हेंबर १८८९-११ फेब्रुवारी १९४२)

कापसाचे व्यापारी आणि सावकार. राजकारणात प्रवेश १९२०. नागपूरमध्ये भरलेल्या काँग्रेसच्या स्वागतसमितीचे अध्यक्ष, १९२०. 'राव' ही पदवी परत केली. काँग्रेसचे खजिनदार. गाधी सेवा सेना, सस्ता साहित्य मंडळाची स्थापना. महात्मा गांधींचे 'पाचवे पुत्र'.

## घनश्यामदास बिरला (१० एप्रिल १८९४-११ जून १९८३)

उद्योगपती आणि परोपकारी व्यक्ती. भारतीय व्यापारी मंडळाचे प्रमुख, कलकत्ता, १९२४. हिंदुस्थान विधानमंडळाचे सदस्य, १९२९-३०. हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष, नाण्यासंबंधीच्या राष्ट्रीय आंदोलनाचे समर्थन केले. भारताच्या आर्थिक-औद्योगिक विकासासाठी मुंबई योजना तयार करणारातील एक.

## ऍनी बेझंट पूर्वाश्रमीच्या वुड (१ ऑक्टोबर १८४७- २० सप्टेंबर १९३३)

चार्ल्स ब्रॅडलॉबरोबर काम केले आणि समाजवादाकडे वळल्या. नंतर स्वतंत्र विचारवंत म्हणून जीवनाची सुरुवात. १८९३ साली हिंदुस्थानात आल्या. सेंट्रल हिंदू महाविद्यालय, बनारसची स्थापना. १९०७ साली थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष झाल्या आणि १९३३ पर्यंत त्या पदावर होत्या. इंडियन होम रूल लीगची स्थापना, १९१६. १९१७ उटकमंड येथे स्थानबद्ध करण्यात आले. कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या अध्यक्षपदी. गांधीजींबरोबर मतभेद, १९२०. लेखक आणि प्रतिभाशाली वक्ता. हिंदू धर्माच्या आणि हिंदुस्थानच्या महान सेवक.

## चार्ल्स ब्रॅडलॉ (२६ सप्टेंबर १८३३-३० जानेवारी १८९१)

इंग्लंडमधील सुधारक नास्तिकांच्या आणि अज्ञेयवादी लोकांच्या हक्कांकरिता लढणारे. त्यांच्या अंत्ययात्रेत गांधीजी उपस्थित होते.

## सैयद अब्दुल्ला बरेलवी (१८ सप्टेंबर १८९१-९ जानेवारी १९४९)

अखिल हिंदुस्थान वृत्तपत्रांच्या संपादकाच्या संघटनेचे संस्थापक आणि १९४५ साली अध्यक्ष. फिरोजशाह महेतांनी स्थापन केलेल्या ‘बॉबे क्रॉनिकल’चे संपादक. गांधीजींबद्दल जिव्हाळा. अखिल हिंदुस्थान काँग्रेस समितीचे सदस्य. काँग्रेसी आणि संपादक असल्यामुळे कारावास. वर्तमानपत्रांविषयीच्या कायद्यांची चौकशी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या लवादाचे सदस्य.

## सैयद महमूद (१८८९-१९७१)

सैयदपूर भित्री, जिल्हा गाझीपूर, संयुक्तप्रांत येथे जन्म. एम. ए. ओ. महाविद्यालय, अलिगढ येथे शिक्षण, १९०१-१९०८. लंडन येथील लिंकन्स इनमध्ये बॅरिस्टरीचे शिक्षण. ब्रिटिश कर्मचाऱ्यांच्या विरोधातील संपामध्ये भाग घेतल्यामुळे महाविद्यालयातून काढून टाकले. यानंतर परत १९०८मध्ये इनमध्ये दाखल झाले. पटण्यात वकिलीची सुरुवात, १९३१. ब्रिटनमध्ये १९०८ साली गांधीजींना भेटले होते. १९१५ साली मझरूल हक यांच्या मुलीशी विवाह. असहकार आंदोलनात सहभाग. केंद्रीय खिलाफत समितीचे सरचिटणिस. १९२१-२९- १९२९मध्ये मुस्लिम राष्ट्रवादी पक्षाची रचना करण्यात एम. ए. अंसारीबरोबर सहभाग. बिहारचे मंत्री, १९६३७-३८ आणि १९४६-५२.

## सुभाषचंद्र बोस (बसू) (२३ जानेवारी १८९७-१९४५)

कटक, कलकत्ता आणि केंब्रिजमध्ये शिक्षण, आणि १९२० मध्ये नागरी सेवेकरिता निवड. परंतु १९२१ मध्ये राजीनामा दिला. राष्ट्रीय आंदोलनात सहभाग. कलकत्त्यातील ‘फॉर्वर्ड’ वर्तमानपत्राचे व्यवस्थापक, १९२२-२४. कलकत्ता महानगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, १९२४, तुरुंगात १९२४-२७ आणि १९३०-३१. दरम्यान १९२९ बंगालच्या विधानसभेचे सदस्य म्हणून निवड. बंगाल प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष.

१९३८ साली नेहरू अहवालावर सही केली आणि हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष. १९३९ मध्ये गांधीजींनी पसंत केलेल्या पट्टाभी सीतारामैय्यांना पराभूत करून अध्यक्ष म्हणून निवड. पदाचा राजीनामा देऊन अखिल हिंदुस्थान फॉर्वड ब्लॉकची स्थापना केली. १९४१मध्ये भूमिगत होऊन जर्मनीत गेले आणि त्यानंतर जपानच्या मदतीने आझाद हिंद फौजेची स्थापना करून तिचे सरसेनापती झाले. जपानचा युद्धात पराभव आणि त्याच काळात विमान अपघातात मृत्यू, १९४५.

## विनोबा भावे (११ सप्टेंबर १८९५-१५ नोव्हेंबर १९८२)

विद्वान बुद्धिजीवी, तत्त्वज्ञानी, गांधीजींचे अढळ अनुयायी. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहात पहिले सत्याग्रही. १९५१ साली भूदान आंदोलन सुरू केले आणि भारतभर पदयात्रा.

## बळवंतराव गोपाळजी महेता (१९ फेब्रुवारी १९००-१९ सप्टेंबर १९६५)

श्यामळदास महाविद्यालय भावनगर आणि गुजरात महाविद्यालय, अमदाबाद येथे शिक्षण. देशी राज्याच्या प्रजेच्या आणि हरिजनोद्धाराच्या कार्यक्रमात सहभाग. अखिल हिंदू स्टेट्स पिपल्स कॉन्फरन्सचे सचिव, १९२८-३५. या संस्थेचे उपाध्यक्ष, १९४६-४८. अखिल हिंदुस्थान काँग्रस पक्षाचे आणि कार्यकारिणीचे सदस्य, भावनगर विधानसभेत विरोधी पक्षाचे पुढारी. सप्टेंबर १९४६-१५ जानेवारी १९४८. घटनासमितीचे सदस्य १९४७-५०. सौराष्ट्र घटना समितीचे सदस्य १९४९-५२. गुजरात प्रदेश काँग्रेसचे सचिव १९५०-५२. काँग्रेसचे सरचिटणिस १९५४-५५. लोकसभेचे सदस्य, भारत पाकिस्तानमध्ये युद्ध सुरू असताना १९५२-६२. मुख्यमंत्री गुजरात १९६३-६५. भारत-पाकिस्तान युद्ध सुरू असताना कच्छच्या सरहद्दीपलीकडे हे युद्ध पाहायला गेले असता पाकिस्तानने त्यांचे विमान पाडले. त्यात त्यांचा आणि त्यांच्या पत्नीचाही मृत्यू झाला.

## मदनमोहन मालवीय (२५ डिसेंबर १८६१-१२नोव्हेंबर १९४६)

प्रख्यात वकील आणि राजनितिज्ञ. 'हिंदुस्तान' १८८७-८९, 'द इंडियन युनियन' १८८९-९२, 'अभ्युदय' १९०७-०९ ही वृत्तपत्रे सुरू केली आणि त्यांचे संपादन केले. काँगेसचे अध्यक्ष १९०९, १९१८ दिल्ली; बनारस हिंदू विद्यापीठाची स्थापना, कुलगुरू, १९१९, २०.हिंदू महासभेचे अधिवेशन १९२३, २३, २४, २५ आणि २६मध्ये

झाले आणि ते त्यांच्या अध्यक्षपदांतर्गत झाले. हिंदुस्थान विधिमंडळाचे सदस्य १९२४-३०. राष्ट्रवादी पक्षाची स्थापना १९२९.

## मीराबेन (२२ नो्व्हेंबर १८९२ - २० जुलै १९८२)

मूळ नाव मॅडेलीन स्लेड. महात्मा गांधीवर रोमॉ रोलॉनी केलेल्या लेखनातून प्रेरित. गांधीजींच्या साबरमती आश्रमात दाखल, १९२५. पूर्णपणे साध्या जीवनाला पसंती. गुजराती स्त्रियांसारखे कपडे घालायच्या आणि केससुद्धा कापून टाकले होते.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य आंदोलनाबद्दल एकनिष्ठ. गांधीजींबरोबर गोलमेज परिषदेत गेल्या, १९३१. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता तुरुंगवास. आत्मकथेचे नाव 'एक साधिकानी जीवनयात्रा'. ऋषिकेशजवळ 'पशुलोकची स्थापना केली. भारत सरकारबद्दल समाधान न वाटल्यामुळे भारतातून गेल्या. व्हिएन्ना जवळील एका गावात २० जुलै १९८२ला मृत्यू.'

## चक्रवर्ती राजगोपालाचारी (१० डिसेंबर १८७८-२५ डिसेंबर १९७२)

वकील, राष्ट्रीय आंदोलनात सहभाग. हिंदुस्थान राष्ट्रीय काँग्रसेचे सरचिटणीस, १९२१-२२. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य १९२२-४७. मद्रास प्रांताचे मुख्यमंत्री १९३७-३८. काँग्रेसचा राजीनामा १९४२. मध्यंतरकालीन सरकारमध्ये मंत्री, १९४६-४७. पश्चिम बंगालचे राज्यपाल, १९४६-४८. भारताचे महाराज्यपाल, १९४८-५०. भारत सरकारमध्ये बिनखात्याचे मंत्री, मे-डिसेंबर १९५०. भारताचे गृहमंत्री १९५१मध्ये जानेवारी ते डिसेंबर. मद्रास प्रांताचे मुख्यमंत्री १९५२-५४. स्वतंत्र पक्ष स्थापण्यात पुढाकार. भारत रत्न, १९५४. अण्वस्त्रांचा विकास थाबांवावा म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी यांना भेटायला गेलेल्या प्रतिनिधीमंडळाचे प्रमुख.

## एम. सी. राजा (जन्मतारीख: १७ जून १८८३ मृत्यू तारीख: २३ ऑगस्ट १९४३)

दलित वर्गाचे पुढारी. मद्रास प्रांताच्या विधान परिषदेत नियुक्त सदस्य, १९१८-२६. केंद्रीय विधीसभेत सरकारने नेमलेले सदस्य, १९२७-३७. पुणे कराराकरिता वाटाघाटीत पुढाकार, १९३२. मद्रास सरकारमध्ये विकास मंत्री, १९३७. महायुद्धादरम्यान राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे आणि केंद्रीय मुलाखत मंडळाचे सदस्य.

## कनैयालाल माणेकलाल मुनशी (३० डिसेंबर १८८७-८ फेब्रुवारी १९७१)

लेखक, कादंबरीकार. १९३८मध्ये भारतीय विद्याभवनची स्थापना केली. मुंबई विधानपरिषदेचे सदस्य, १९२७-३०. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य, १९३०. अखिल हिंदुस्थान काँग्रेस समितीचे सदस्य, १९३०-३६ आणि १९४६. काँग्रेस सांसदीय पक्षाचे सचिव १९३४. मुंबई सरकारचे गृहमंत्री १९३७-३८. विधिमंडळाचे सदस्य १९३७-४६. घटनासमितीचे सदस्य, भारत सरकारचे कृषी तसेच अन्नधान्य विभागाचे मंत्री १९५०-५२. उत्तर प्रदेशाचे राज्यपाल १९५२-५७. १९५९ स्वतंत्र पक्षाची स्थापना झाल्यानंतर त्याचे उपाध्यक्ष.

## राधाकुमुद मुकर्जी (२५ जानेवारी १८८४-९ सप्टेंबर १९६३)

बऱ्हाणपूरमध्ये (मुर्शिदाबाद) वकिली करणाऱ्या गोपाळचंद्र मुकर्जींचे पुत्र. कलकत्त्याच्या प्रेसिडेंट महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. त्यांना डेक्कन मेडल आणि प्रेमचंद रायचंद शिष्यवृत्ती मिळाली होती. तसेच मेवात सुवर्ण पदकसुद्धा मिळाले होते. १९१५ साली कलकत्त्याहून वाङ्मय आचार्य (पीएच.डी.). श्री अरविंद ज्या महाविद्यालयात प्राचार्य होते त्या बंगाल नॅशनल महाविद्यालयात ते 'हेमचंद्र बसू प्राध्यापक' होते. १९१६ साली प्रथम 'मणींद्रचंद्र नंदी प्राध्यापक' होऊन बनारस हिंदू विद्यापीठात भारतीय इतिहास आणि संस्कृती हा विषय शिकवायला गेले. १९१७ साली म्हैसूर विद्यापीठात इतिहासाचे पहिले प्राध्यापक. १९२१मध्ये लखनौ विद्यापीठात इतिहास विषयाचे विभाग प्रमुख.

१९३७मध्ये रविंद्रनाथ टागोरांना सांप्रदायिक निर्णयाविरुद्धच्या समितीचे अध्यक्ष करण्यात त्यांचाच मुख्य हात होता. काँग्रेसकडून बंगाल विधान परिषदेत सदस्य, १९३७-४३. १९४७-४८ दरम्यान फुड आणि ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन उभारण्याकरिता पूर्वतयारी करणाऱ्या समितीत भारतीय प्रतिनिधी. राज्यसभेचे सदस्य १९५२-५८.

## राजेंद्र प्रसाद (३ डिसेंबर १९८४-२८ फेब्रुवारी १९६३)

वकील, राजनितिज्ञ. कलकत्ता उच्च न्यायालयात वकिली, १९११-१६. पटणा उच्च न्यायालयात १९१६-२०. राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष १९३४, १९४७-४८. भारत सरकारचे अन्न आणि कृषिमंत्री, १९४६-४८. भारतीय घटनासमितीचे अध्यक्ष, १९४६-५०. भारतीय प्रजातंत्राचे पहिले राष्ट्रपती, १९५०-६२.

## रोमॉ रोलॉ (२९ जानेवारी १८६६-३० डिसेंबर १९४४)

फ्रेंच लेखक.संगितज्ञ. 'ज्यां किस्टोफ' या नावाने कादंबरीकार म्हणून परिचित. १९०४-१२ या काळात १० ग्रंथ. आधुनिक समाजावर टीका करणारे लेखन. क्रांतिकारी पराक्रमावर नाटके. साहित्याचे नोबेल पारितोषक, १९१५. रविंद्रनाथ टागोर, गांधीजी आणि जवाहरलाल नेहरूंचे मित्र. गांधीजी, विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस यांचे चरित्र लिहिले.

## मोक्षगुंडम विश्वेश्वरैया (१५ सप्टेंबर १८६१-१४ एप्रिल १९६२)

बंगलोरहून ६० किलोमिटर अंतरावरील मुडनाहल्ली गावात सप्टेंबर १८६१ जन्म. पूर्वज आंध्रप्रदेशातील कर्नूल जिल्ह्यातील मोक्षगुंडम गावातून म्हैसूरमध्ये आले. वेस्लियन मिशन हायस्कूलमध्ये आणि सेंट्रल महाविद्यालयात शिक्षण. १९८० साली वाङ्मय स्नातक. पुण्यात एंजिनिअरिंगचे शिक्षण. मुंबई सरकारच्या बांधकाम विभागात (पी.डब्ल्यू.डी) विभागात सहायक अभियंता म्हणून नोकरी. १९०८ साली सेवानिवृत्त. पुण्यातील डेक्कन क्लब स्थापणारातील एक. म्हैसूर राज्याचे मुख्य अभियंता, १९०९-१२. सर टी. आनंदरावनंतर म्हैसूरचे मुख्य दिवाण, १९१२-१८. भारताच्या औद्योगिक आणि आधिक आयोजनाचा विचार करणारात सर्वप्रथम. 'रिकंस्ट्रक्टिंग इंडिया' १९२०, 'प्लॅन्ड इकॉनॉमी फॉर इंडिया'चे लेखक. जगाचा प्रवास, १९१९-२०.मुंबईत १९२२ सर्व पक्षीय संमेलन भरले. त्यात सहभाग. दहाव्या विज्ञान काँग्रेसचे आणि भारतीय अर्थशास्त्र संमेलनाचे (१९२४) अध्यक्ष. इंग्रज मुत्सद्दी मानेग्यू १९१७-१८मध्ये हिंदुस्थानात आले तेव्हा त्यांनी हिंदुस्थान सरकारसमोर देशी रियासतींना एक करण्याची योजना मांडली होती. तेव्हा त्यांनी रियासतींच्या स्वायत्ततेला धक्का न लागता वा ब्रिटिश सरकारने सुरक्षित ठेवलेल्या खास बाबींमध्ये हस्तक्षेप न करता प्रतिनिधींनी अखिल हिंदुस्थानचे हित लक्षात घेऊन निर्णय घ्यावा अशी शिफारस केली होती. काँग्रेसच्या हिंदुस्थान योजना समितीचे (१९३८) आणि शिवाय अनेक सरकारी समित्यांचे सदस्य. देशातील सिंचन आणि पाण्याच्या योजनांशी संपर्कात. भारतरत्नने सन्मानित. १९५५. शतायुषी. मृत्यू १४ एप्रिल १९६२.

## रोनेल्डशेना अर्ल (११ जून, १८७६ - ६ फेब्रुवारी, १९६१)

नाव लॉरेन्स जॉन लम्ली डंडस. ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य, १९०७-१९१६. बंगालचे राज्यपाल २६ मार्च १९१७-२८ मार्च १९२२. रौलेट समितीचे आणि बीचक्रॉफ्ट-चंदावरकर सदस्य. ढाका

विद्यापीठाची स्थापना केली, १९२१. श्रीरामपूर येथील ख्रिश्च धर्मगुरूंनी स्थापन केलेल्या महाविद्यालयाला शंभर वर्ष झाल्यामुळे त्याच्या शताब्दी समारोहात भाग घेतला. लॉर्ड कर्झनच्या जीवनचरित्रावर तीन ग्रंथ लिहिले. हिंदुस्थानचा इतिहास, तत्त्वज्ञान, जनतेची परिस्थिती वगैरेंचा अभ्यास. गांधीजी वायव्य सरहद्द प्रांतात जात असताना महादेव देसाईना यांनी एक पुस्तक - 'इंडिया, अ बर्ड्स व्ह्यू' दिले. ते त्यांनी वाचले होते. हे पुस्तक १९२४ साली प्रकाशित झाले होते. त्यात या प्रदेशाची तसेच या प्रदेशात राहणाऱ्या झक्काबल वगैरे जातींवर एक प्रकरण आहे. आचार्य जगदीशचंद्र बोसच्या वैज्ञानिक शोध आणि सिद्धींबद्दल बरेच लिहीत असत आणि भाषणे देत असत.

## अमृतलाल शेठ

सौराष्ट्रातील लिंबडीत श्वेतांबर जैन कुटुंबात जन्म. शिक्षण लिंबडी आणि सुरेंद्रनगरात. पी. एल. चुदगर आणि इंदुलाल याज्ञिक यांच्या प्रभावाखाली आले. नंतर गांधीजींच्या. लिंबडीत शिक्षक. नंतर रणपुरात 'सौराष्ट्र' साप्ताहिक सुरू केले. मुंबईत 'जन्मभूमी' दैनिक सुरू केले. आणि 'लोकमत' मराठी दैनिक आणि 'सन' इंग्रजी दैनिक सुरू केले. १९३७-३८मध्ये 'अखंडभारत' आणि १९४२मध्ये दुसरे गुजराती दैनिक 'नूतनभारत' सुरू केले. भारतीय भाषा वृत्तपत्र मंडळाचे अध्यक्ष, १९४५. असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आणि बारडोली कायदेभंग या आंदोलनांमध्ये भाग घेतला. गुजरात प्रदेश कॉँग्रेस समितीचे तसेच अ. हिं. कॉं. समितीचे सदस्य. देशी रियासतीतील जनआंदोलनाशी फार निकटच्या संपर्कात.

## तरद्दुक अहमद खान शेरवानी (१८८५-१९३५)

बॅरिस्टरी करून चलीगढमध्ये वकिली करत होते. १९१९मध्ये अखिल हिंदुस्थान कॉँग्रेस समितीचे सदस्य. असहकार आंदोलनात १९२१ साली तुरुंगात. जवाहरलालच्या आग्रहामुळे १९२४ पासून अलाहाबाद उच्चन्यायालयात वकिली करू लागले. संयुक्तप्रांत कॉँगेस समितीचे अध्यक्ष, १९३०. दरम्यान कॉँग्रेस कार्यकारिणीचे आणि साम्राज्य विधानसभेचे सदस्य १९३४ मध्ये विधानसभेवर निवड.

## सत्यमूर्ती एस. (१८८७-१९४३)

वकील. मद्रास विद्यापीठाच्या सिनेटचे आणि सिंडिकेटचे सदस्य १९२०-४२. मद्रास विधान परिषदेचे सदस्य, १९२३-३०. मद्रास महानगरपालिकेचे सदस्य, १९२६-३९. अध्यक्ष, स्वराज पक्ष, मद्रास. हिंदुस्थान विधीसभेचे सदस्य, १९३४-४३. इंडियन तामिलनाडू प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष, १९३५-३६. मद्रासचे महापौर, १९४०. व्यक्तिगत सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल तुरुंगवास. ऑगस्ट १९४१मध्ये सोडले, परंतु १९४२मध्ये परत तुरुंगात.

## सप्रू, तेजबहाद्दूर (८ डिसेंबर१८७५-२० जानेवारी १९४९)

कायदेतज्ज्ञ आणि वकील. भारतीय उदारमतवादी पक्षाचे पुढारी म्हणून प्रख्यात. महाराज्यपालांच्या समितीचे कायद्यातील तज्ज्ञ सदस्य, १९२०-२३. स्वातंत्र्यापूर्वी हिंदुस्थानातील वेगवेगळ्या स्तरावरील घटना तयार करण्याच्या कामात सहभाग. कायद्याच्या आणि घटनेच्या कसोटीच्य अनेक प्रश्नावर काँग्रेस आणि सरकारमध्ये मध्यस्थी.

## जॉन ख्रिश्चन स्मट्स (१८७०-१९५०) (२४ मे, १८७० -११ सप्टेंबर, १९५०)

दक्षिण आफ्रिकेत फिल्ड मार्शल. प्रधानमंत्री, १९१९-१९२४ आणि १९३९-१९४८. आशियायी लोकांशी संबंधित कायद्याबद्दल गांधीजींशी करार केला.

## झाकीर हुसेन (८ फेब्रुवारी १८९७-३ मे १९६९)

हैदराबादमध्ये जन्म. शिक्षण इस्लामिया हायस्कूल इटावा आणि अलीगढमध्ये. १९२३मध्ये जर्मनीत अर्थशास्त्राच्या पुढील शिक्षणाकरिता गेले आणि १९२६मध्ये सन्माननीय आचार्य (पीएचडी) पदवी मिळवली.

१९२९ ते १९४८ - जामिया मिलिया इस्लामियाचे कुलगुरू. अलिगढ मुस्लिम विद्यापीठात कुलगुरू, १९४८-१९५६. अध्यक्ष, हिंदुस्थान तालिमी संघ, सेवाग्राम, १९३८-५०. विद्यापीठ शिक्षण आयोगाचे सदस्य १९४८ आणि पहिल्या प्रेस कमिशनचे सदस्य, १९५२-५४. राज्यसभेचे सदस्य, १९५२-५७. युनेस्कोचे भारतातील प्रतिनिधी आणि मंडळाचे सदस्य, १९५६-५८. बिहारचे राज्यपाल, १९५७-६२. भारतरत्न १९६३. राष्ट्रपती १९६७-६९.

# परिशिष्ट ३ - महादेवभाईंचे भाषण - वृत्तविवेचन आणि वृत्तविवेचकांना

मित्रहो,

साहित्य परिषदेच्या घटनेबद्दल आणि तिच्या अनेक विभाग प्रमुखांच्या निवडीबद्दल खूप टीका होत असते. यांतील किती तरी टीका माझ्या पाहण्यात आली आहे. आणि किती तरी टीका माझ्या दृष्टीस पडली नाही. यांतील एक टीका तर अगदी योग्य आहे आणि ती मान्य करण्यासारखी आहे. यामुळेच मी इथे उभा आहे. मला माहीत नाही की मला वृत्तविवेचन विभागाचा अध्यक्ष बनवण्यात किती लोकांचा हात आहे - कोणत्याही मंडळाचा हात नक्कीच नाही हे मला माहीत आहे. माझ्याबद्दल पक्षपात असलेल्या काही मित्रांचा यात हात आहे हे मला माहीत आहे.

याला विरोध करणारांच्या इच्छेला वश होऊन मी जर इथे आलो नसतो तर मला ते आवडले असते. आतासुद्धा यांचा आवाज इथे ऐकू येत असेल तर माझी इथून निघून जाण्याची तयारी आहे. आवाज ऐकू येवो वा न येवो मी इथे तुम्हा सर्वांच्या इच्छेमुळे उभा आहे. आपल्या मुंबई गुजराती वर्तमानपत्रांनी प्रचलित केलेला 'रजामंदी' हा अरबी शब्द गुजराती संमती या शब्दापेक्षा सुंदर वाटतो.

हे तर मी मला इथे उभा करण्याच्या तुमच्या अधिकाराबद्दल बोललो. हा अधिकार संपूर्ण आणि अबाधित आहे असे जरी मी समजलो तरी इथे उभे राहण्याचा माझा अधिकार अतिशय अल्प आहे हे मी विसरू शकत नाही. वर्तमानपत्र' म्हटले की आपला विचार दैनिकांकडे वळतो; आणि पंधरा वर्षांहून अधिक काळ 'इंडिपेंडंट' या दैनिकाचा संपादक असूनही मला दैनंदिन वृत्तपत्र चालवण्याचा थोडाबहुतही अनुभव नाही असे वाटते. आणि हा अनुभवही किती एकांगी स्वरूपाचा होता हे मला माहीत आहे. त्या वेळी वातावरणात युद्ध होते, आणि दोन हजार रुपये जामीन मागितल्यानंतर ते पत्र छापणे मी बंद केले, आणि माझ्या हाताने लिहिलेल्या प्रतीची किंमत ३० रुपये इतकी पडत होती, तरीसुद्धा मला तुरुंगात जाण्याची तीव्र इच्छा होत होती. आणि दोन चार दिवस हाताने लिहिण्याच्या या उन्मत्त खेळानंतर मला पहिल्यांदाच तुरुंगात जाण्याचा आनंद मिळाला. तेव्हा मी जे आत्मनिरीक्षण केले त्याच्या आधारावर मी सांगेन की मी सत्य आणि अहिंसेचे पालन करतो की नाही अशी दररोज माझ्या मनासमोर जी शंका उभी राहायची तिच्यातून ईश्वराने मला वाचवले याकरिता मी त्याचे आभार मानतो.

यानंतर साप्ताहिक चालवण्याचा गांधीजीसारख्या गुरूच्या छायेत मी चांगलाच अनुभव घेतला आहे आणि घेतो आहे हे खरे, परंतु गांधीजींचे जे विशिष्ट प्रकारचे वृत्तविवेचन आहे ते पाहता इथे येऊन उभे राहण्याचा मला अधिकार आहे असे वाटत नसले तरी तो मर्यादित होतो. वृत्तविवेचनासंबंधीचे गांधींचे विचार अपरिचित नाहीत, शक्य आहे की ते अनेकांना जुनेपुराणे आणि प्रगतीविरोधी वाटत असतील. असे असले तरी गांधीजींना मुख्य अध्यक्ष करण्याऐवजी त्यांच्या सहकाऱ्यांना हा सन्मान द्यावा असे तुमच्यापैकी अनेकांना वाटले असावे असे मला वाटते. यामुळेच काकासाहेब आणि मी या मंडपात विराजमान झालो आहो.

बाकी हे खरे आहे की माझी अशी मान्यता आहे की वर्तमानपत्रकारांचे चांगले प्रतिनिधित्व करणारी एखादी परिषद असेल आणि तिथे वृत्तविवेचकांचे कर्तव्य आणि अधिकारांची चांगली चर्चा करायची असेल तर गांधीजींसारख्याने त्या परिषदेचे अध्यक्ष होणे सुयोग्य होईल. असे झाले तर त्यांच्याकडून वृत्तविवेचन कसे जिवंत करावे याबद्दलच्या अनेक रचनात्मक सूचना मिळाल्या असत्या.

माझा अधिकार कमी करणाऱ्या विशेषतः दुसऱ्यासुद्धा एकदोन गोष्टी आहेत. दैनिक वर्तमानपत्राचा मी मालक नाही इतकेच नाही तर दैनिक वा साप्ताहिक गुजराती वर्तमानपत्र मी क्वचितच वाचत असतो. हे मी अभिमानाने सांगत नाही तर हे सांगताना मला लाज वाटते. परंतु माझ्या अनेक व्यवसायात दुसरा काही उपाय नाही. आणि जो नियमिपणे वर्तमानपत्र वाचत नसतो त्याला वर्तमानपत्रांबद्दल अधिकार वाणीने बोलण्याचा कितपत अधिकार असू शकतो? हं, इतके खरे आहे की वर्तमानपत्रवाला वा त्यांचा संपादक नसतानाही थोड्याशा जबाबदारीशिवाय टीका करण्याची सूट मी उपभोगत असतो.

असे असले तरी अध्यक्ष झाल्यामुळे वर्षभर महासभेचे कार्यक्रम चालवण्याची जी जबाबदारी असते ती तर मी काही पार पाडणार नाही. ही जबाबदारी माझ्यावर येणार नाही ही खात्री करून घेण्याकरिता मी इथे यायला होकार दिला आहे. इतके सगळे असूनही माझे भाषण वाचण्याचे श्रेय कोणाचे असेल हे मला ठाऊक नाही. यामुळे मी इथे जो आलो आहे ते केवळ सौजन्यशील मित्रांनी मला देलेल्या सन्मानाची अवमानना होऊ नये एवढ्याकरिता.

वर्तमानपत्रकार रोजच्या रोज पानामागून पाने भरत असले तरी, देशातील मोठ्या तुरुंगांतील प्रमुख लोक हे कैदीच असतात, हेच माझा संकोच वाढण्याचे मुख्य कारण आहे. इतर कैदी तर स्वतंत्र विचार करू शकतात आणि एकदुसऱ्यासमोर ते अभिव्यक्त होऊ शकतात.परंतु आज वर्तमानपत्र चालवणारांचे तोंड

शिवलेले आहे. गांधीजी 'यंग इंडिया' आणि 'नवजीवन' बंद करून बसले ते बसलेच. अजूनही ही वर्तमानपत्रे सुरू करण्याची वेळ आली नाही.

गुलाम देशाची वृत्तविवेचनाची पोच कुठवर असू शकते? क्वेटात इतका मोठा भूकंप झाला परंतु तिथे किती वर्तमानपत्रवाले जाऊ शकले? भूकंपाची खरी हकिगत किती लोकांना कळू शकली? ज्या पत्रांनी तेथील थोडीबहूत हकिगत सांगण्याचा प्रयत्न केला ते पूर्णपणे बंद पडले आहेत. अशा परिस्थितीत स्वतंत्र वृत्तविवेचनाला कितपत स्थान आहे? जेव्हा सत्याग्रहाचा लढा सुरू होता तेव्हा महासभेची हाक थोड्याशा लोकांनी ऐकली आणि ती बंद पडली. इतरांनी कमीपणाच्या अटी स्वीकारल्या आणि ते कसाबसा श्वास घेत जिवंत आहेत. हिंदुस्थानातील एकाही वर्तमानपत्राने या अटी स्वीकारल्या नसत्या तर ही सर्व वर्तमानपत्रे सरकारने बंद केली असती काय? आणि बंद पडली असती तर काय वाईट झाले असते? परंतु परतंत्र देशातील वर्तमानपत्रांना स्वतत्र, संगठित पाऊल उचलण्याची हिंमत कशी असू शकेल? आपल्या अशा दयनीय अवस्थेत साहित्य परिषदेचा वृत्तविवेचनविभाग मला अगदीच अवास्तव- अनरिअल वाटतो.

गेल्या महिन्यात ब्रुसेल्समध्ये एक शांतता परिषद भरली होती, आणि तिच्यात युद्धज्वरामुळे गुलाम झालेले युरोपमधील काही शांतिप्रिय कार्यकर्ते गेले होते. परंतु ते तिथे युद्ध बंद करण्याची, स्पेनबद्दल वा स्पेनचा विनाश करणाऱ्या इतर देशांबद्दल बोलूसुद्धा शकले नाही. ही परिषद जितकी अवास्तविक होती तेवढीच अवास्तविक आपणा पत्रकारांची परिषद आहे असे मला वाटते.

परंतु ही पत्रकारांची परिषद नाही तर पत्रकारांना आधार देऊ इच्छिणाऱ्या साहित्यकारांची परिषद आहे. यामुळे परिस्थिती पूर्णपणे बदलून जाते, आणि माझे काम किती तरी सोपे होते. मला असे आढळले आहे की आधी ज्या परिषदा झाल्या होत्या तेव्हा साहित्यपरिषद स्वतंत्र होती. वृत्तविवेचन विभागाला साहित्य परिषदेचा एक भाग समजण्याची ही पहिलीच वेळ आहे. याचा अर्थ इतका तर निश्चितच आहे की वृत्तविवेचन हे साहित्य आहे, अथवा साहित्याच्या अनेक अंगातील एक एक अंग आहे असे मान्य करण्यात आले आहे.

एका इंग्रज लेखकाने वृत्तविवेचनाला 'उतावीळपणाने लिहिलेले साहित्य' संबोधले आहे. वृत्तविवेचनाची साहित्यात गणना करायला अनेक नकार देतात. प्रख्यात इंग्रज वृत्तविवेचक नेविन्सनच्या एका पुस्तकाचे समालोचन करताना एक लेखक या लोकांपेक्षा उलटच सांगतो. तो म्हणतो की वृत्त हे घटनांच्या अभ्यासानंतर स्पष्ट आणि स्वतंत्र विचारपूर्वक, मुद्देसूद जलद गतीने लिहिलेले लिखाण. हे साहित्य नाही तर

दुसरे काय आहे? अतिविलंबित गतीने चाचपडत अस्पष्टपणे लिहिलेले लेखन पाहिले की हा लेखक हवेत आहे की पृथ्वीवर हे मोठ्या मुश्किलीने केलेले लेखन एक पुस्तकात आहे म्हणून त्याला साहित्य म्हणायचे काय? मला वाटते की हा संघर्ष खोटा आहे. आणि याचे कारण साहित्याची अस्पष्ट व्याख्या आहे.

रस्किनने चिरंतन साहित्याची जी व्याख्या केली आहे त्या व्याख्येचा थोडा विचार करा. पुस्तकातून वा दैनिकातून वा साप्ताहिक वर्तमानपत्रातून प्रकाशित झालेले लेखन या व्याख्येत कितपत बसते? ही राहिली रस्किनची व्याख्या - 'मी लिहितो आहे ते सत्य असेल, जनहितकारी असेल, सुदर असेल अशा जाणीवेने केलेले लेखन ते साहित्य. अजून कोणी ही गोष्ट सांगितलेली नसली पाहिजे याची या लेखकाला जाणीव असते. याच्या मनात अशीसुद्धा भावना असते की ही गोष्ट इतर कोणी इतक्या सुंदर पद्धतीने सांगू शकणार नाही. त्याला त्याच्या जीवनातून अनुभवातून याच गोष्टीचे स्पष्ट दर्शन होत असते. जीवनात ईश्वराने याला दिलेल्या सूक्ष्म आणि स्थूल संपत्तीतून ते अमूल्य ज्ञान अथवा तत्त्वज्ञान सापडलेले असते. हे जे दर्शन झालेले असते ते नेहमीकरिता विस्मरणात जावे अशी त्याला इच्छा नसते. शक्य झाले तर हे दर्शन एखाद्या शीलेवर कोरून ठेवण्याची त्याला अभिलाषा असते, कारण यात आपण आपल्या जीवनाचे सत्व पिळून काढले आहे असे त्याला वाटत असते. बाकी तर जसे जगतात, खातातपितात आणि पृथ्वीवरून लुप्त होतात तसाच मी सुद्धा लुप्त होईल. परंतु हे जे मला लाभले आहे ते माझे अमोल ज्ञान आणि दर्शन आहे. हे तुमच्या आठवणीत जपून ठेवण्यासारखे हे लेखन आहे. हे असे लेखन आहे की ज्यातून ईश्वराचे अल्पांशाने का होईना दर्शन होते, आणि तितक्या प्रमाणात हा एक प्रकारचा शिलालेख आहे, शास्त्र आहे. हे पुस्तक एक चिरंतन साहित्य आहे.'

या उताऱ्यात 'साहित्य' हा शब्द मी माझा वापरला आहे. रस्किनने तर 'पुस्तक' आणि 'वर्तमानपत्रांचा' अथवा चिरंतन साहित्य आणि क्षणजीवी लेखन यांत भेद करत असताना चिरंतन पुस्तकाची ही व्याख्या केली आहे. क्षणजीवी लेखनाची याची व्याख्या अशी आहे की एखाद्या विशिष्ट घटनेचे अथवा स्थितीचे असे सुवाच्य वर्णन अथवा एखाद्या मित्राशी केलेली अशी सुवाच्य चर्चा वा भाषण की जी आपल्याला सकाळी न्याहरी करत असताना वाचायची इच्छा होते - आणि ते वाचले पाहिजे आणि वाचले नाही तर आपली लाजीरवाणी परिस्थिती होईल असे त्याला वाटत असते. ही गोष्ट क्षणजीवी लेखनात येऊन जात असते. हे कोणत्याही प्रकारे चिरंतन साहित्य असू शकत नाही.

रस्किनच्या चिरंतन साहित्याच्या व्याख्येत वर्तमानपत्रातील किती लेखन येऊ शकते? गुजरातीतील म्हणा की दुसऱ्या कोणत्यीही देशी भाषेतील वा इंग्रजी दैनिकांतील वा साप्ताहिकातील वा मासिकातील लेखन

या व्याख्येत कितपत बसू शकेल? फार फार झाले तर थोडेसे उत्तम लेख रस्किन ज्याला क्षणजीवी लेखन म्हणतो त्यात बसू शकतील. बाकी लहानसहान लेखनाची क्षणजीवी लेखनातसुद्धा गणना करता येणे अशक्य आहे. असे असतानाही ऍडिसन, गटे, अनातोले फ्रांस हे सर्व वृत्त विवेचक होते आणि त्याचबरोबर साहित्यकारही होते. अथवा ते साहित्यकार होते म्हणून वृत्तविवेचक होते. अथवा वृत्तविवेचक होते म्हणून साहित्यकार होते असेही म्हणता येईल.

एक प्रकारे रस्किनने पाडलेला भेद दाखवणारी रेषा फार सूक्ष्म आहे. या साहित्यात अमुक प्रसंगातील अमुक विषयासंबंधीची चर्चा येऊच शकत नाही. डॉ. जॉनसनच्या अनेक गोष्टीं वा संवादांचा संग्रह असलेले बॉस्वेलने लिहिलेले जीवनचरित्र आजही आपल्याला वाचावेसे कसे वाटते? आणि त्याची आपण उत्तम साहित्यात गणना कशी करतो? गटे आणि ऍकरमनच्या संवादांना आपण आजही कसे वाचतो आणि त्यांची उत्तम साहित्यात गणना का करतो? प्लेटोचे संवाद, जरी ते काल्पनिक असतील तरी ते शेकडो वर्षांनंतरही आपल्याला वाचावेसे का वाटतात? आणि अजूनही शेकडो व्र्षे ते का वाचावेसे वाटतील? यांतील अनेक संवादांचे विषय क्षणिक नव्हते तर शाश्वत होते. आणि हे सांगणाऱ्याची आणि लिहीणाऱ्याची शैली त्यांना चिरंजीव करील अशी होती. परंतु ही घटना घ्या. सॉक्रेटिसवरी खटला आणि त्याच्या मृत्यूचे वर्णन आपण आजही वाचत असतो. हे आजही संग्रहणीय आहे कारण हे उत्तम साहित्य आहे. १९२२ साली आग्रा तुरुंगात गांधीजी बसलेले असताना त्यांच्यावर अमदाबादमध्ये जो खटला भरण्यात आला होता त्याचे 'मॅन्चेस्टर गार्डियन'मधील वर्णन आजही आठवते. ते परत परत वाचताना मी थकत नाही. याला मी साहित्यच म्हणेन.

आपण स्वर्गीय मणिलाल नभुभाई आणि नवलराम याचे टिळक महाराज आणि गांधीजींवरील काही लेख पाहिले तर त्याची शुद्ध साहित्यात गणना केल्याशिवाय चालू शकत नाही. या लेखांमधील विचार वाचक आजही वाचत असतो, भविष्यातही वाचेल. काकासाहेबांच्या लेखांचा आज पुस्तकाच्या स्वरूपात संग्रह होतो आहे. हे सर्व लेख वर्तमानपत्रात आलेले आहेत. यामुळे यांतील बहुतेक लेखांचे साहित्यमूल्य कमी होत नाही.

यामुळे अशा प्रकारे साहित्याच्या व्याख्येत बसू शकतील असे आपले वृत्त विवेचन होण्याकरिता आपण काय केले पाहिजे? चिरंजीवी साहित्य लिहिण्याचा अधिकार अनेक सन्माननीय लोकांना आहे. रस्किनच्या अखेरच्या ओळींमधील सुवाच्य लेखनाच्या गणनेतसुद्धा आपल्या वृत्तविवेचनाचा साहित्यात कशा प्रकारे समावेश होऊ शकेल याची चर्चा करण्याची माझी तरी इच्छा आहे. या सुवाच्य लेखनाच्या व्याख्येत येण्याकरिता एक महत्त्वाची अट तर अशी आहे की ते बोधप्रद असले पाहिजे, आनंददायी असले पाहिजे आणि

सामान्यपणे ते लोकहितकारी असले पाहिजे. आणि त्याचे अनेक अंगोपांग लोकहिताच्या परम दृष्टीने लिहिलेले असले पाहिजे. आधुनिक वर्तमानपत्रे या उद्योगाची निर्मिती पश्चिमेने कारखान्यासारखी केली आहे. आणि आपण कारखान्यांप्रमाणे पश्चिमेतील कारखान्यांच्या आरंभकाळाचे अंधानुकरण करत आहो. यामुळे आपल्या देशी भाषेतील वर्तमानपत्रे इंग्रजी भाषेतील वर्तमानपत्रांच्या टीपकागदांप्रमाणे आहेत. आणि आपली इंग्रजी वर्तमानपत्रे मोठ्या प्रमाणात पाश्चात्य वर्तमानपत्रांचे अनुकरण आहेत. ही कला आपण परक्यांकडून शिकत असल्यामुळे अनुकरण तर अनिवार्यच आहे. हे जरी खरे असले तरी अनुकरण चांगले आणि सबळ असले तर काही अडचण नाही.

परंतु आपल्या पत्रांमध्ये मौलिकता असो की अनुकरण असो ते जर जनहितकारक असले तर ते पुरेसे आहे असे मी म्हणेन. यंत्रांचा ज्याप्रमाणे सदुपयोग आणि दुरुपयोग आहे तसेच वर्तमानपत्रांचाही सदुपयोग आणि दुरुपयोग आहे. याचे कारण यंत्रसुद्धा एक महाशक्ती आहेत. लॉर्ड रोझबरींनी वर्तमानपत्रांना नायगराच्या धबधब्याची उपमा दिली आहे. आणि गांधी या उपमेची कल्पना नसतानाही स्वतंत्र राहिले आहेत - 'वर्तमानपत्रे ही महान शक्ती आहेत. परंतु ज्याप्रमाणे निरंकुश पाण्याचा प्रपात गावामागून गावे बुडवून टाकतो आणि पिकाचा नाश करतो त्याचप्रमाणे लेखणीचा निरंकुश प्रपात विनाश करत असतो. आणि हा अंकूश जर बाहेरून आला तर तो निरंकुश पेक्षाही अधिक विषारी होतो. आतील अंकुश लाभदायी होऊ शकतो. ही विचारसरणी जर खरी असेल तर जगातील किती वर्तमानपत्रांचा निभाव लागू शकेल? परंतु बेकार वर्तमानपत्रे कोण बंद करू शकेल? कोणी कोणाला बेकार समजावे? कामाची आणि बिनकामाची वृत्तपत्रे सोबतच चालत असतात. यामुळे माणसानेच आपली पसंती ठरवली पाहिजे.'

वर्तमानपत्रांना दोन बाजू असल्यामुळे सर्वसामान्य वर्तमानपत्रे ही दुधारी तलवारीसारखी असू शकतात. वर्तमानपत्रे हा धंदा होऊ शकतो आणि कमावण्याचे साधन होऊन त्याचा व्यापारही करता येऊ शकतो, आणि होतही असतो हे आपल्याला माहीत आहे. दुसरीकडे वर्तमानपत्रे पाण्याच्या नळाप्रमाणे, सुधारणा खात्याप्रमाणे, टपाल खात्याप्रमाणे जनसेवेचे एक अमूल्य साधन होऊ शकतात. ज्याच्याकरिता हे कमाईचे साधन असते त्याच्याकरिता ते रात्रीच्या जेवणासारखे असते. स्वतःचा खर्च काढता काढता वर्तमानपत्रकार वर्तमानपत्राला जेव्हा सेवेचे साधन करतो तेव्हा ते लोकजीवनाचे आवश्यक अंग होते. यामुळे वर्तमानपत्रांचा प्राण वर्तमान वा बातम्या असतात. या बातम्या मिळवण्याची आणि प्रकाशित करण्याचीसुद्धा एक कला आहे. आणि ज्याला ही कला उत्तम प्रकारे साध्य झाली आहे तो जनसेवा तर करतोच परंतु स्वसेवाही

करत असतो. आज पृथ्वी दिवसेंदिवस लहान होत चालली आहे. यामुळे पश्चिमेतील दूरवरच्या बातम्या पूर्वेच्या दूरवरच्या कानाकोपऱ्यात थोड्याशा तासात पोहोचतात. अनेकदा तर असे होते की एका ठिकाणी राहणाऱ्या माणसाला त्या ठिकाणची बातमी कळण्याआधीच हजारो मैल दूर राहणाराला कळते. हे सांगताना मी अतिशयोक्ती करून राहिलेलो नाही. श्री रणजीत पंडित मसुरीत राहत होते. त्या वेळी गुजरातचे अब्बाजान अब्बास तैय्यबजी यांचा मृत्यू तिथेच झाला होता. श्री रणजीतनी ही बातमी तिसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात वाचली. परंतु अब्बास साहेबांच्या कुटुंबाला शेकडो मैल अंरावरून सांत्वनाच्या तारा केव्हाच येऊन पोहोचल्या होत्या.

अशा प्रकारे वर्तमानपत्रे महत्त्वाची सेवा करत असतात. परंतु याच वर्तमानपत्रानी खोट्या बातम्या दिल्या तर? यामुळे इतर काही नुकसान झाले नाही तर सरकारच्या तारटपालाची चांगलीच कमाई होते. गांधीजी २७ तारखेला मुंबईला जाणार आहेत अशी अफवा कोणत्या तरी वर्तमानपत्राने प्रकाशित केली. यामुळे विनाकारण ढीगभर लिखापढी करावी लागली होती! अशी बातमी सेवेऐवजी कुसेवा करत असेल तर? विविध संप्रदायांमध्ये विषाचा वर्षाव होत असताना त्यात दारूगोळ्याच्या ठिणगीचे काम अशा बातमीने केले केले तर? शांततेकरिता सुरू असलेल्या संघर्षाच्या या काळात भांडणे वाढण्याच्या हेतूने कोणी जर अर्धसत्य आणि संशय वाढेल अशा अफवा पेरत असेल तर? गिरणी मजूर आणि मालकात भांडण सुरू असताना मोठा सामुदायिक संप पेट घेईल अशा निराधार गोष्टी आणि गप्पा पसरवण्यात आल्या तर? असे झाले तर वर्तमानपत्रकार जनतेचा सेवक न राहता शत्रू होतो. सत्यरूपी अमृताचा वर्षाव करण्याऐवजी तो असत्याचे विष पसरवतो. लहानशा स्वार्थापोटी कृत्रिम हकिगती पेरणारी वर्तमानपत्रे या तत्त्वाची किती वेळा अवहेलना करतात? गांधीजी तुरुंगात असताना त्यांनी व्हाईसरायना लिहिलेल्या तथाकथित पत्राचा मसुदा एका वर्तमानपत्राने प्रकाशित करून लोकांच्या मनात किती गोंधळ निर्माण केला होता?

दुसऱ्या एका वृत्तपत्राने इतक्यातच थोड्या दिवसांपूर्वी लॉर्ड हेलिफॉक्स आणि गांधीजींमध्ये नव्या व्हाईसरायना भेटण्यासंबंधी पत्रव्यवहार सुरू आहे अशी खोटीच बातमी प्रकाशित करून स्वतःचे, स्वतःच्या वर्तमानपत्राच्या प्रतिष्ठेचे, आणि देशाचे किती अनहित केले? ज्याअर्थी सांप्रदायिक द्वेषाच्या लाटा आपल्याकडे सतत येत असतात आणि प्लेगप्रमाणे वेळोवेळी त्यांचा उद्रेक होत असतो त्याअर्थी आपण त्यांच्यापासून सावध राहिलो पाहिजे. विशेषतः उत्तरेत, किती तरी घाणेरडी वर्तमानपत्रे निघाली आहेत आणि त्यांतून ते खऱ्याखोट्या गोष्टी पसरवून समाजात किती जास्त विष पसरवत असतात? या विषामुळे किती खून झाले आहेत?

एवढ्यातच उर्दूतील एक निराधार पत्रक मंबईच्या एका वर्तमानपत्राने प्रकाशित केले. त्यात लिहिले होते की अमूक माणूस गांधीजींना भेटून आला. त्याच्या मुलाखतीत गांधीजींनी इस्लामची प्रशंसा केली आणि हिंदू धर्माची निंदा केरून कलमा वाचला. लखनौच्या एका वर्तमानपत्राच्या संपादकाला भेटायला मी एका मित्राला सांगितले आणि अशा ढळढळीत खोट्या बातम्या पसरवण्यामागे तुमचा काय उद्देश आहे असे त्याला त्यांना विचारायला सांगितले. माझा मित्र जेव्हा या संपादकाला भेटला तेव्हा तो बेशरमपणे म्हणाला की आम्हांला जी बातमी मिळाली ती आम्ही छापली. तुम्हांला पाहिजे असेल तर तुम्ही ती फेटाळून लावा. तुमचे म्हणणे प्रकाशित करायचीही आमची तयारी आहे. परंतु ही बातमी खरी नाही असे जर गांधीजी म्हणाले असते तर त्यांच्या मनात इस्लामबद्दल आदर नाही असा त्याचा अर्थ झाला असता. (एखाद्याने विचारले की तुम्ही तुमच्या बायकोला मारणे बंद केले काय तर त्याचे उत्तर काय द्यावे? हो म्हटले तर तर आपण आधी मारत होतो असा अर्थ होतो आणि नाही म्हटले तर मारत असतो असतो असा अर्थ होतो तसेच हे.) या संपादकावर टीका करण्याचे हे स्थान नाही, आवश्यकताही नाही. परंतु आपल्या दुर्दैवी देशाची किती अधोगती झाली आहे हे यातून सूचित होते. वर्तमानपत्रकार लोकमताचे अनुसरण करत असतात, लोकमत घडवत असतात. परंतु आपल्या पारतंत्र्याच्या अवस्थेत आणि विकासकाळात लोकमत घडवणे, लोकमताला ज्ञानाने, खऱ्या बातम्यांनी समृद्ध करणे हा वर्तमानपत्रकारांचा विशेष धर्म असतो.

आपल्या लोकांचे अज्ञान कोणत्या सीमेपर्यंत आहे याचे एक असे उदाहरण देतो की ज्यामुळे सत्य बातम्या देण्याची जबाबदारी किती गंभीर आहे याची कल्पना येईल. काही दिवसांपूर्वी एक चांगला पगार मिळवणारा व्यवसायी गांधीजींकडे आला होता. तो नियमितपणे वर्तमानपत्र कशाचा वाचतो, परंतु अधूनमधून वाचत असतो. तो एका प्रख्यात संस्थेत आहे. परंतु त्याला कामाकरिता बाहेर जावे लागत नसते. तो गांधीजींकडे आला तेव्हा खानसाहेब अब्दुल गफ्फारखान समोर बसलेले होते. सौजन्याने खानसाहेबांची त्यांच्याशी ओळख करून देत गांधींजी म्हणाले, “हे खान साहेब अब्दुल गफ्फारखान. यांचे नाव तर तुम्ही ऐकलेच असेल ना?” त्या गृहस्थांनी विनयाने जोरदार मान हलवली. नंतर माझ्याबरोबर परत जात असताना रस्त्यात त्यांनी विचारले, “हे तिथे बसलेले साहेब गांधीजींचे मुसलमान झालेले पुत्र अबदुल्लाच होते ना?” मी त्यांना खरी हकिगत सांगून त्याचा गैरसमज दूर केला. तेवढ्यात त्यांनी दुसरा प्रश्न विचारला, “आजकाल गांधीजी इथे बसले आहेत तर अमदाबादमध्ये त्यांच्या ज्या तीनचार गिरण्या आहेत त्या कोण चालवतो? आणि हा मोठा मुलगा मुसलमान झाला आहे तर त्यांच्या गिरण्या चालवायला अजून दोनतीन मुले आहेत काय?”

असा आहे आपल्या जनतेतील शिकला-सवरलेला सर्वसामान्य माणूस! याला जर खोट्या बातम्या सांगितल्या तर त्यामुळे किती अनहित होईल? आधीच्या उर्दू वर्तमानपत्राने खोटेपणाच्या ज्या बातम्या प्रकाशित केल्या होत्या त्या अनेक वर्तमानपत्रांनी परत छापल्या. आणि गांधीजी मुसलमान होण्यासंबंधी खरी बातमी काय आहे असे विचारणारी मला डझनांनी पत्रे आली आहेत.

सत्यनिष्ठा इतर कोणाहीपेक्षा वृत्तविचकांचा आणि वर्तमानपत्रकारांचा पहिला धर्म आहे. बाल्डविनने इंग्लंडचे पुण्यश्लोक वृत्तविवेचक सी. पी. स्कॉटचे शब्द एका वृत्तविवेचकांच्या मंडळासमोर उद्धृत केले आणि ते प्रत्येक वर्तमानपत्राच्या कार्यालयात मोठ्या फळीवर कोरून ठेवण्यासारखे आहेत असे त्याने सांगितले. ते शब्द असे आहेत - 'वर्तमानपत्र चालवायचे असेल तर सर्वात आधी माणसात पुढील गुण असले पाहिजे. - प्रामाणिकपणा, स्वच्छता, निर्भयता, न्यायबुद्धी, जनतेप्रती कर्तव्याचे भान. वर्तमानपत्र हा एक प्रकारचा जनतेशी केलेला असा करार आहे की ज्यापासून आपली कधीही सुटका होऊ शकत नाही. यामुळे वृत्तपत्रकारांचे पहिले कर्तव्य या व्यवसायात जे मोह होतात त्यांचा त्याग करणे आहे. वृत्त गोळा करणे हे याचे पहिले कर्तव्य आहे. या वृत्ताचे साधन आणि मूळ दुषित नसावे म्हणून त्याने जीवाची जोखीम पत्करूनही सावधगिरी बाळगली पाहिजे. जी बातमी तो देतो अथवा देत नाही अथवा ज्या प्रकारे तो ती बातमी देतो त्यामुळे सत्याच्या शुभ्र चेहरा कलंकित व्हायला नको. टीका करायचे स्वातंत्र्य सर्वांना आहे. परंतु बातमी ही पवित्र गोष्ट आहे. तिच्यात बदल करण्याचा वा तिची मोडतोड करण्याचा, कमीअधिक करण्याचा, भ्रष्ट करण्याचा कोणालाही अधिकार नाही. अशा हीन साधनांनी प्रचार करणे, ही घृणास्पद गोष्ट आहे. आपल्या पक्षाच्या लोकांना जितका पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे तितकाच अधिकार विरोधकांनासुद्धा आहे. टीका करतानासुद्धा आपण संयम ठेवला पाहिजे. स्पष्ट टीका उत्तम गोष्ट आहे, परंतु न्यायबुद्धीने टीका करणे हे सर्वोत्तम.'

कित्येक वर्तमानपत्रांना अतिशयोक्तीचे वा विशिष्ट हकिगतीला तिखटमीठ लावून ती सांगण्यात मोठेपणा वाटत असतो. अमेरिकी वर्तमानपत्रात तर अशी शोभेशिवायची शैली ही अशिष्टतेची निदर्शक समजली जाते. एक अमेरिकी वार्ताहर मला विचारत होता, "गांधीजींना मांजरी आवडतात?" मी म्हणालो, "हो, कुत्रेसुद्धा आवडतात, गायीही आवडतात आणि तूसुद्धा आवडतो. मांजरीच का?" तो वार्ताहर म्हणाला, "गांधीजींच्या अवतीभवतीच्या वातावरणाचे शब्दचित्र काढायचे आहे. त्यात मांजरीसारखा सरस प्राणी टाकता आला तर रंगत येईल." आणि त्याने गांधीजींजवळ दूध पीत बसलेली मांजर दाखवून रंग भरला.

स्लोकांबला तर वाटत होते की साधुत्वाने भरलेल्या नम्रतेचे चित्रण एक काल्पनिक दृष्टांत दिल्यानेच पूर्ण होऊ शकतो. यामुळे त्याने लिहिले, “प्रिन्स ऑफ वेल्स इथे आले तेव्हा गांधीजींनी त्याच्यासमोर साक्षात साष्टांग प्रणिपात घातला.” त्याला खडसावत गांधीजी म्हणाले, “तुझी ही थाप तर तुझ्या कल्पनाशक्तीलाही लाजवण्यासारखी आहे. मी तर भंग्यालासुद्धा प्रणिपात करीन आणि त्याची पायधूळ डोक्याला लावीन. याचे कारण त्याला धुळीत राबवण्याच्या कामात मीसुद्धा भागीदार आहे. परंतु मी प्रिंन्स ऑफ वेल्सलाच काय पंचम जॉर्जलाही प्रणिपात करणार नाही कारण ते एका जुलमी सत्तेचे प्रतिनिधी आहेत.” परंतु मी विदेशी वर्तमानपत्रांची गोष्ट काय करू? आपल्याकडेही अशी वर्तमानपत्रे हवी तितकी पडलेली आहेत.

खोट्या बातम्या तर दूर राहिल्या, अगदी ठावठिकाणा नसलेल्या बातम्या छापण्यात आपल्याला मोठेपणा वाटतो. जी आणि जशी काही बातमी हाती पडते ती काय तशीच छापून टाकायची असते? माझ्याजवळ एक वर्तमानपत्र पडलेले आहे. त्यात एक दोन स्तंभाचा मथळा असा आहे - ‘प्रसिद्ध सौंदर्यराणीचा अंतिम निश्चय - गरिबांमध्ये राहायचे.’ त्याबरोबर त्या महिलेचे एक चित्र आहे आणि चित्रावर लहानशा चौकटीत छापले होते - ‘चारदा लग्न’. दुसरा एक भडक मथळा होता - या नर्तिकेशी लग्न करण्याकरिता पाचशे लोक तयार - परंतु लग्न केले नाही ! अशा बातम्या अशा प्रकारे प्रकाशित केल्यामुळे कोणती सेवा करण्याचा हेतू असतो? दुसऱ्या एका वर्तमानपत्रात पाच स्तभाचा मथळा आहे, ‘बायकोला जबर मारहाण करून माहेरी पाठवून दिले !’ याकरिता पाच स्तभ कशासाठी? जबर मारहाण करणाऱ्या माणसाच्या शौर्याचे भान करून देण्यासाठी? दुसऱ्या एका वृत्तपत्रात आहे - ‘नाग साप संन्यासी झाला. दिङ्मूढ झाला पुजारी.’ ही बातमी ज्या वृत्तपत्राने छापली आहे त्याने त्या वर्तमानपत्राच्या संपादकाला क्वचितच विचारले असेल की ही तुम्ही पाहिलेली गोष्ट आहे की केवळ ऐकलेली अफवा आहे? दुसऱ्या वर्तमानपत्रांना तर या मथळ्याचीच नक्कल करायची असते, मग विचार करायची आवश्यकताच काय? दुसऱ्या एका वर्तमानपत्रात बातमी आहे - ‘प्रणयात रंगलेल्या जोडप्याने केलेला अपघात.’ ही बातमी वाचून असेच वेड लागलेले इतर तरुण उत्तेजित होणार नाहीत काय? स्टोने आग लागून मेलेल्यांच्या बातम्या वारंवार प्रकाशित केल्यानंतरही थोडीच अशी प्रकरणे थांबत आहेत? हे तर आपण दररोज पाहतोच. उलट अशी प्रकरणे वाढतच आहेत. याबद्दल काही शंका आहे काय?

यासंबंधात एक प्रसिद्ध अमेरिकन दैनिक ‘ख्रिश्चन सायन्स मॉनिटर’चे धोरण समजून घेण्यासारखे आहे. याचा लंडनमधील बातमीदार मला भेटला होता. जेव्हा केव्हा हिंदुस्थानबद्दल खोटी बातमी तेथील

वर्तमानपत्रात यायची तेव्हा तो माझ्याकडे यायचा आणि खरे काय ते समजून घेऊन ती बातमी तो अमेरिकेत पाठवायचा. हे वर्तमानपत्र आपल्या जनहिताच्या तत्त्वनिष्ठेकरिता प्रसिद्ध आहे. यासंबंधात विलिस ॲबट नावाचा प्रसिद्ध वृत्तविवेचक लिहितो - 'हे वर्तमानपत्र अपराधाच्या गुन्ह्याच्या बातम्या देतच नाही - अपवाद इतकाच की सरकारच्या वा समाजाच्या प्रगतीकरिता ही बातमी विघातक असेल. या वर्तमानपत्रात मोठमोठ्या संकटाच्या वा भडकवणाऱ्या बातम्या मुळीच देण्यात येत नाहीत. या वृत्तपत्राचा मालक एक व्यक्ती नसून एक मंडळ आहे.' विलायतेतील प्रख्यात वर्तमानपत्र 'टाईम्स' आणि 'मॅन्चेस्टर गार्डियन'मध्ये मोठ्या प्रमाणात ही प्रथा पाळण्यात येत असते. आणि धक्कादायक मथळे देण्याच्या हानिकारक पद्धतीपासून ही वर्तमानपत्रे मुक्त आहेत. आपल्या अनेक वर्तमानपत्रांचा खप अशा गोष्टींवर अवलंबून आहे. वर्तमानपत्रे वाचण्याचा लोकांचा शौक वाढला आहे. पैशापैशाला खपणारी वर्तमानपत्रे हजारोंच्या संख्येत खपतात आणि त्यातून मालकांना मोठा नफा मिळतो. समाजाला चांगल्या गोष्टीच्या वाचनाची सवय लावण्याची जबाबदारीचे त्यांना भान नसते काय?

वर्तमानपत्रांच्या हाती समाजातील एकेका माणसाची अब्रू असते. आणि सभ्यतेचे नियम व्यक्तीला जितके लागू होतात त्यापेक्षाही अधिक वर्तमानपत्रांना लागू पडतात. परंतु किती वर्तमानपत्रे या नियमांचे पालन करतात? असे म्हणतात की पंजाबमध्ये वर्तमानपत्रे लोकांच्या अब्रूवर शिंतोडे उडवण्याची धमकी देतात आणि पैसे मिळवतात. खरी हकिगत सांगण्यातही अनेकदा अतिशय असभ्यपणा आणि अपमान असतो. एकदा एका शहरात हरताळ सुरू होता. त्याचे पुढारीपण एका भगिनीच्या हाती होते. त्या भगिनीचे नाव न सांगता एका वर्तमानपत्राने लिहिले, "बडतर्फ करण्यात आलेल्या एका कारकुनाची बायको या हरताळाचे नेतृत्व करते आहे." ही गोष्ट खरी होती, परंतु ती अशा प्रकारे छापणे त्या वर्तमानपत्राकरिता मुळीच शोभनीय नव्हते.

कोणाविषयीही मलीन अफवा छापणे ही तर निश्चितच अशोभनीय गोष्ट आहे. कोणत्याही व्यक्तीबद्दल कोणतीही बातमी आली तरी ती पुराव्याशिवाय स्वीकारू नये. आणि जरी पुरावा असला तरी तो खरा आहे की खोटा याची सूक्ष्मपणे चौकशी केली पाहिजे, आणि चौकशी केल्यानंतर ती छापण्यात जनतेचे हित आहे की अनहित याचा विचार करून ती छापायची की नाही हे ठरवले पाहिजे. हे सर्वसामान्य धोरण फार कठीण आहे काय?

आपण दूरदृष्टीच्या अभावामुळे अशा भांडणांच्या वर उठू शकलो नाही. किती तरी साप्ताहिकांनी, विशेषतः महाराष्ट्रातील, निंदानालस्ती करण्याचा आणि चिखलफेक करण्याचा जणू काही ठेकाच घेतला आहे.

महासभावादी न्यायालयात धाव घेणार नाहीत अशी खात्री असल्यामुळे चांगल्या चांगल्या पुढाऱ्यांची आणि संस्थांची बदनामी करताना त्यांना लाज वाटत नाही. चांगल्या गोष्टीचे वाईट स्वरूप दाखवण्यात यांना मोठेपणा वाटतो आणि महाराष्ट्रात ते पौराणिक ज्ञानाचा रूपक आणि उपमा देण्याकरिता वाईट उपयोग करतात. यांचे उदाहरण मी देणार नाही. परंतु चांगल्या गोष्टीला वाईट रूप देण्याचे एक उदाहरण मराठी वाचकाने मला पाठवले ते इथे देतो. या वृत्तपत्राने ही बातमी 'हरिजन'मधून घेतली आहे. परंतु त्याने हरिजमधील एकेक गोष्ट उलट केली आहे. मी लिहिले होते, "सेगाव" वर्ध्यापासून ५।। मैल अंतरावर आहे. यामुळे येण्याजाण्यात अनिवार्यपणे सगळ्याचा ११ मैल चालण्याचा व्यायाम होतो. त्या वर्तमानपत्राने लिहिले, "गांधी स्वतः तर सेगावमध्ये शांतपणे बसून मजा करतो आहे, दुसऱ्याला त्याकरिता धावपळ करायला लावण्याची त्याला लाज वाटत नाही काय?"

मी लिहिले होते, "ग्रामसेवा विद्यालयाचे विद्यार्थी गांधीजींकडे गेले आणि तिथे त्यांनी गांधीजींना गोड भजने म्हणून त्यांची करमणूक केली. ते आपला परिचय करून देत असताना गांधीजी म्हणाले, 'हे माझ्याप्रमाणे भाषणे करत नाहीत, भजन म्हणतात. आणि भजनांचा प्रचार करतात. मी तर बोलूनच प्रचार करू शकतो. मी ना तर गाऊ शकतो, ना भजन तयार करू शकतो हे याचे कारण आहे.'" यावर आधीच्या महाराष्ट्रातील वृत्तपत्राने लिहिले, "गांधी गावात गावाची सेवा करण्याकरिता गेले आहेत आणि तिथे शांतपणे बसून भजन ऐकत आहेत ! आणि भजन म्हणणारां असे टोचत वक्तव्य करून त्यांची स्तुती केली. ही कशाची स्तुती? आणि जर त्यांना गाताही येत नसेल तर महात्मा होऊन ते कशाकरिता बसले आहेत?"

परंतु महाराष्ट्रतील वर्तमानपत्रांना का दोष द्यायचा? गुजरातमध्ये अशी वर्तमानपत्रे पडली आहेत की त्यांच्या तोंडावर थुंकावेसे वाटावे. अंतर मात्र इतकेच आहे की महाराष्ट्रात बुद्धी आहे, जेव्हा की आपल्या वर्तमानपत्रांमध्ये दुष्टबुद्धीशिवाय दुसरे काहीही नाही. त्यांतील एखादा नमुना उद्धृत केला तर घृणा निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. तो नमुना देणे म्हणजे कागदाचा सदुपयोग होणार नाही, त्यामुळे तर कागद कलंकित करण्यासारखेच होईल.

आज अतिशय दुःखी अंतःकरणाने छापता येईल अशा कुटिलतेने भरलेला एक नमुना देतो - 'मंदिराला कुंटणखाना म्हणणाऱ्या गांधीजींचा सत्याग्रहाश्रम कुंटणखाना ठरला आहे. सहशिक्षणाच्या प्रभावाने मुलामुलींमध्ये भोगविलासाला वाव मिळाला आहे आणि परिणामी गांधीजींना उपवास करावा लागला आहे. अखेरीस त्यांना आश्रम सोपवण्याचा निर्णय घ्यावा लागला. . . . अखेरीस आता तर आश्रमात चांभार राहत

आहेत आणि ते चामडे कमावून जोडे तयार करत आहेत.’ ‘गांधीजींच्या मनात हिंदूधर्माबद्दल खुपच खुन्नस आहे, चीड आहे. ते म्हणतात की आफ्रिकेत मी जो लढा चालवला होता त्याला मुख्य पाठिंबा मुसलमानांचा होता. विचारवंत हिंदूंचा पाठिंबा फार कमी होता. तेव्हापासून त्यांच्या मनात हिंदू धर्माबद्दल चीड बसलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की खोटी हे तर ईश्वरालाच माहीत आहे. परंतु हिंदू धर्माचे दफन करण्यासाठी जितका प्रयत्न गांधीजींनी केला आहे तितका मुसलमानांनीही केला नाही.’

किशोरीलालभाईंनी ‘सहशिक्षणाची’ सर्वांगीण चर्चा करणारा एक लेख लिहिला होता. गुजरातमध्ये तो लेख पुष्कळ लोकांना आवडला. ते कठोरपणे मर्यादा पाळणारे आहेत हे सुविदित आहे. या लेखात स्त्रीपुरुष संबंधाबद्दल निर्माण होणाऱ्या दोषांचे उल्लेख करत त्यांनी लिहिले आहे -

सामाजिक तत्त्वज्ञानात पुढीलप्रमाणे विचारांचा प्रसार होतो आहे -

४. बापाने मुलीशी, आईने मुलाशी किंवा भावाने-बहिणीशी मर्यादित वागावे असे सुचवणाऱ्या स्मृतिकारांनी लिंगभावनेची कल्पना मनात धरलेली असते. ... जो बाप किंवा भाऊ मुलीचा किंवा बहिणीचा हात धरतो, तिच्यासोबत एकट्याने बसतो, तिच्या खांद्यावर हात ठेवतो, प्रेमाने तिचे चुंबन घेतो किंवा तिला वस्त्रहीन अवस्थेत पाहून विचारात पडतो — तो फारच उथळ मनाचा असला पाहिजे. . . .

‘शाळांमध्ये वा समाजामध्ये धार्मिक तत्त्वज्ञानाच्या निमित्ताने वा सामाजिक तत्त्वज्ञानाच्या नावाने वर सांगल्याप्रमाणे विचार पसरत आहेत. आज जे ब्रह्मचर्यासंबंधी दोष दिसतात त्याचे हे महत्त्वाचे कारण आहे.

या दृष्टीने या लेखकाने सुरुवातीच्या आणि शेवटच्या भागात गोंधळ केला आहे आणि हा सर्व दोष किशोरीलालच्या माथी मारला आहे. आणि मग तो त्यावर टीका करतो -

‘गांधीवेडे किशोरीलाल मशरूवालांचे दिवसेंदिवस अधम दिशेने किती पतन होत चालले आहे याचे चित्र वरील लेखामधून दिसते. मला इतकेच सांगायचे आहे की दुर्दैवाने सनातन धर्माच्या नावाला लाजवणारे हे मासिक आहे. यामुळे पैसे खर्च करून याचे विष पिणारे लोक फार हीन दर्जाचे असतील.’

आपल्या साप्ताहिक वर्तमानपत्रांमध्ये फार संकुचित आणि क्षुद्र दृष्टीपासून दूर राहणारी साप्ताहिके फार कमी राहिलेली आहेत. (याला अपवाद म्हणून स्थानिक बातम्या देणारे ‘प्रजाबंधु’ आणि ‘लोकवाणी’ आहेत असे म्हणता येईल.) या साप्ताहिकांमध्ये बातम्या तर नावापुरत्याच असतात. यांचा हेतू तर रविवारी

वाचणारांचे मनोरंजन करण्याचाच असतो. आणि मनोरंजन तरी कशा प्रकारचे? जे अप्रतिष्ठित साहित्य येते आहे त्यांतील कोणते उदाहरण सांगू? हे सोडले तर विदेशी साहित्यातही ऊटपटांग गोष्टी आणि चलचित्रपटांच्या गोष्टी तसेच त्यांच्यातील स्त्रियांचे फोटों याशिवाशिवाय अजून काहीही नसते.

आपल्याला जर अनुकरणच करायचे असेल तर चांगल्या प्रथेचे अनुकरण का करू नये? 'मॅन्चेस्टर गार्डियन' साप्ताहिक अनेक प्रकारे अनुकरणीय आहे असे म्हटले तरी चालेल. यात भरगच्च बातम्या असतात, निवडक असतात. समाज, राजकारण, अर्थशास्त्र वगैरे विषयाबद्दल त्यात माहिती असते. निवडक पुस्तकांचे मार्गदर्शक समालोचन असते, एकदोन शुद्ध साहित्यिक लेख असतात.

त्यातसुद्धा अनेकदा उथळ टीका असते, आणि भ्रामक बातम्या असतात हे खरे. परंतु त्यात दुरुस्ती करायची असेल तर ती ताबडतोब करण्याचा प्रामाणिकपणासुद्धा त्याच्यात आहे. त्याचे बातमीदार अनेकदा हिंदुस्थानात नोकरी करणारे लोक असतात, आणि ते त्याला चुकीच्या मार्गावर नेत असतात. परंतु कोणी जर पुराव्यासह बातमीत दुरुस्ती करत असेल तर ते दुरुस्तीसुद्धा प्रकाशित करते. बातम्यांविषयीच्या माझ्या कथनाचा उपसंहार मी रस्किनच्या उद्गाराने करीन - 'जे कोणते दैनिक वा साप्ताहिक शुद्ध निवडक बातम्या देत असेल आणि निवडक खरे प्रामाणिक विधान करत असेल, ज्या सीमेपर्यंत सिद्ध करता येईल त्या सीमेपर्यंत सिद्ध करून समाधान मानत असेल आणि त्यातूनसुद्धा जे समजून घेण्यायोग्य आहे ते शुद्ध भाषेत सादर करत असेल तर त्याची कमाई होईल की नाही हे मला माहीत नाही, परंतु ते वाचणाराची निश्चितच कमाई होईल.'

परंतु वाचणाराला काही मिळेल अशी किती वर्तमानपत्रे आहेत?

परंतु आता बातम्यांची गोष्ट सोडून आपण पुढे जाऊ या कारण भाषणे, अहवाल आणि मुलाखतीचे अहवालसुद्धा व्यापक प्रमाणात वर्तमानपत्रात येत असतात. या दृष्टीने अजून आपण बाल्यावस्थेतच आहो असे म्हटले तरी चालेल. या बाबतीत समाधान वाटावे असे एकच इंग्रजी वर्तमानपत्र आहे. ते आहे मद्रासचे 'हिंदू'. यांचे बातमीदार शहराशहरात आणि गावोगावी आहेत. आणि रिपोर्टर सिद्धहस्त संकेतलिपी जाणणारे आहेत. आता काही प्रमाणात बंगालमधील 'अमृत बझार पत्रिका' याच्या ओळीत येण्याचा प्रयत्न करते आहे. परंतु याबाबतीत समाधान वाटेल असे दुसरे एकही वर्तमानपत्र नाही. गुजराती वृत्तपत्रांचीसुद्धा अशीच अवस्था आहे. भाषणांचा अहवाल देण्याच्या कलेत सत्याग्रहाच्या काळानंतर काही सुधारणा झाली आहे. परंतु आपल्या विषयाला न्याय देणारा कोणी उत्तम मुलाखतकार अजून तरी माझ्या माहितीत नाही. याचे कारण याकरिता

आवश्यक अशी मेहनत करण्याची आपल्यामध्ये उणीव आहे. टिपण घेतल्याशिवाय समजून-उमजून मुलाखतीचा वा भाषणाचा सार देण्याचा आपल्या गुजराती म्हणा की इंग्रजी वर्तमानपत्रांत अभाव आहे.

ब्लोविट्झ नावाचा प्रसिद्ध बातमीदार 'टाईम्स'च्या संपादकाबरोबर व्हर्सायला १८७२ साली गेला होता. व्हर्सायचे फ्रेंच प्रधानमंत्री तियेरचे भाषण दोघांनीही ऐकले आणि ते परत फिरले. परतत असताना ब्लोविट्झ डिलेनला म्हणाला, "असे भाषण तर अक्षरशः यायला पाहिजे. आपल्या उद्याच्या अंकात ते आले तर किती चांगले होईल?" डीलेन लंडनला गेला. ब्लोविट्झने स्टेशनवरून लगेच तार कार्यलयात गेला आणि तिथे लिहायचे कागद मिळवले आणि लिहायला सुरुवात केली. तो डोळे मिटून संपूर्ण सभेचे चित्र डोळ्यांसमोर आणायचा आणि तिवेरचे हावभाव, त्याच्या भाषणातील चढउतार आठवायचा आणि लिहू लागायचा. थोड्याच वेळात संपूर्ण भाषण तयार झाले आणि ते लंडनला तारेद्वारे पोहोचले. डिलेनने दुसऱ्या दिवशी तियेरच्या भाषणाचे अडीच स्तंभ पाहिले आणि तो दिङ्मूढच झाला. आपल्याकडे कोणी ब्लोविट्झ झाल्याचे मला माहीत नाही. आशा आहे की हे माझे अज्ञान असेल. परंतु आजच्या काळात असे रिपोर्टर मिळवणे अशक्य तर असू नये. आवश्यकता मात्र विविध विषयांच्या अभ्यासाची आणि तन्मयतेची आहे.

माझ्याजवळ 'मॅन्चेस्टर गार्डियन'चा एक अंक पडलेला आहे. त्यात 'लिबरल समर स्कूल'च्या व्याख्यानमालेतील चारपाच दिवसांच्या धुरंधर व्याख्यात्यांच्या व्याखानांचा सार एका पानाच्या चार स्तभात दिलेला आहे. आजच्या अनेक व्यवसायांच्या काळात भाषणांचा अक्षरशः अहवाल घेण्याची सवड जरी असली तरी त्याला आधार कोणी देईल असे वाटत नाही. अनेकांना हे सगळे वाचण्याची इच्छाच नसते. याशिवाय वक्त्याला थोडासाही अन्याय होणार नाही अशा प्रकारे त्या भाषणाचा सार देण्याची कला आपण शिकणे आवश्यक आहे. अनेकदा वक्ता आवेशात येतो आणि तो चुकीने वा बेफिरपणे जे बोलायचे नाही ते बोलून टाकतो. अशा वेळी त्याला सांभाळून घेऊन त्याच्या अशा उद्गारांना सौम्य करण्याचे माजूक कामसुद्धा कुशल रिपोर्टरला करावे लागत असते.

परंतु इथेसुद्धा परत सत्यनिष्ठेचा प्रश्न उभा राहतो. न्यायबुद्धीचा प्रश्न पडतो. एक ताजा दृष्टांत देतो. हिंदुस्थानात नवयुगाची सुरुवात करण्यासाठी लंडनमध्ये एक सभा झाली. तेव्हा कॅन्टनबरीचे आर्चबिशप अध्यक्ष होते. त्याच्या भाषणाचे मी दोन अहवाल पाहिले. आणि त्याचा किती वेगवेगळा प्रभाव पडतो हे जाणवले. असा आहे रुटरचा अहवाल -

"“हिंदुस्थानच्या नवयुगाची सुरुवात” करण्याकरिता लंडनमध्ये एक सभा झाली. कॅन्टरबरीचे आर्चबिशप तिचे अध्यक्ष होते. अध्यक्ष म्हणून त्यांनी आपल्या भाषणात हिंदुस्थानातील ग्रामीणांचे जीवनमान उचावण्याकरिता श्रीयुत गांधीं जे प्रयत्न करत आहेत त्याची खूप वाखाणणी केली. या सभेत हिंदुस्थानात काम करण्याऱ्या अनेक मिशनरींना बोलावण्यात आले होते. त्या सभेतील वक्त्यात लखनौत काम करणारे बिशप पिकेट होते.

'अस्पृश्यांच्या उद्धाराकरिता सुरू असलेल्या कामकाजाचा राजकीय लाभ कोणी घेण्याचा प्रयत्न करील तर त्याला मुळीच संमती दिली जाणार नाही या गोष्टीवर कॅन्टरबरीच्या आर्चबिशपनी खास भर दिला.'

आता पाहा याच तारखेचे 'हिंदू' वृत्तपत्राच्या लंडनमधील बातमीदाराने पाठवलेला अहवाल -

'काल रात्री वेस्टमिनिस्टरच्या सेंट्रल हॉलमध्ये एक मोठी सभा झाली होती. तिच्यात अस्पृश्यांना ख्रिश्चन धर्मात घेण्याकरिता ख्रिश्चन मिशनरी मंडळींच्या योजना सांगण्यात आल्या. आणि परिणामी हिंदुस्थानातील अस्पृश्यांच्या भविष्याविषयी लोकांचा रस विशेषतः जागृत झाला.

'कॅन्टरबरीच्या आर्चबिशपनी मि. गांधींनी केलेल्या कामाची फार प्रशंसा केली आणि स्पष्टपणे सांगितले की अडाणी टीकाकार मि. गांधींबद्दल वाटेल तसे जरी बोलत असले तरी मि. गांधींचा जो भारी नैतिक प्रभाव पडला आहे आणि पडून राहिला आहे त्याविषयी त्यांना स्वतःला वा मिशनरींना कोणतीही शंका नाही. आर्चबिशप म्हणाले की सर्वांना, हिंदुस्थानच्या लोकमताच्या पुढाऱ्यांनासुद्धा स्पष्ट करून सांगितले पाहिजे की आज अस्पृश्यांमध्ये काम करणाऱ्या मंडळांपैकी कोणत्याही राजकीय क्रियाकलापाचा ख्रिश्चन धर्माच्या प्रचारासाठी दुरुपयोग करण्याचा कधीही प्रयत्न करू नये, तसेच हिंदुस्थानमधील कोणत्याही समाजाच्या आत्म्याचा लिलाव कोणताही राजकीय पक्ष करत असेल तर त्यात भाग घेण्याची इच्छा ठेवू नये. त्यांनी असासुद्धा खुलासा केला की कोणत्याही सामाजिक वा आर्थिक आवश्यकतेसाठी लोकांचे वेगवेगळ्या समूहात विभाजन करण्याचा प्रयत्न मुळीच करण्यात येऊ नये. परंतु ख्रिश्चन धर्मात ज्यांची येण्याची इच्छा असेल त्यांना ख्रिश्चन धर्माचा अर्थ आणि त्यासंबंधीचे कर्तव्य कळत असतील त्यांचाच ख्रिश्चन धर्मात स्वीकार करण्यात यावा.

आता रुटरच्या रिपोर्टरचा अहवाल खरा की 'हिंदू'चा? पहिल्या अहवालात 'ख्रिश्न धर्माच्या प्रचाराकरिता' हे शब्द उडवून लावून संपूर्ण भाषणाचा उलटाच ध्वनी ध्वनित होतो. यात गांधीजींच्या अस्पृश्यतानिवारणाच्या कामाची नाही तर ग्रामसेवाकार्याची स्तुती केली असे दाखवण्यात आले आहे.

अशा प्रकारे एकाच भाषणाचा थोडक्यात सारांश केला तर त्याच्या अर्थाचा अनर्थ अनेकदा होतो. गांधीजींनी हिंदुस्थानात केलेल्या भाषणाच्या सारांशामुळे दक्षिण आफ्रिकेत त्यांचा जीवावर बेतले होते. हेच लेख जेव्हा तिथे पूर्ण प्रकाशित केले तेव्हा त्यांच्यावर हल्ला केल्याबद्दल आफ्रिकावासियांना पश्चात्ताप झाला होता.

परंतु या क्षेत्रात आपल्यामध्ये उणीव असेल तर परिस्थितीचा अभ्यास करून तिचे विश्वासपात्र वर्णन करतानासुद्धा अतिशयोक्ती होत असल्याचे आढळते. हं, एवढे खरे की आपल्या मासिंकांमधील काही मासिके ही उणीव दूर करत असल्याचे दिसते. 'प्रस्थान' मासिकात आणि इतक्यातच मजूर सेवकांनी सुरू केलेल्या 'सर्वोदय' मासिकात विविध आर्थिक विषयावर अभ्यासपूर्ण आणि अनुभवपूर्ण लेख असतात. परंतु दैनिकात या गोष्टीचा दुष्काळ आहे. महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांपासून आपण बरेच शिकण्यासारखे आहे. 'केसरी'ची टिळकमहाराजांपासूनची फाईल घ्या वा केळकरांच्या वेळेची फाईल घ्या त्यात अनेक विषयांवरील बरेच अभ्यासपूर्ण लेख सापडतील.

या अभ्यासाची आज जितकी आवश्यकता आहे तितकी अधिक कधीही नव्हती. आज आपले राजकारण आणि अर्थशास्त्र व्यापक झाले आहेत. गत पंधरा वर्षात हिंदुस्थान गावात होता. खेडुतांत आणि मजूर वर्गात होता. परंतु आज आपली वर्तमानपत्रे शहरांमधून निघत आहेत. आणि फार फार तर जेव्हा कोणी पुढारी भाषण द्यायला गावात जातो तेव्हाच त्या भाषणाची नोंद तयार करण्याकरिता वर्तमानपत्रांचे रिपोर्टर गावांचा प्रवास करतात. गावांचे प्रश्न, खेडुतांची आर्थिक स्थिती, त्यांच्या हालअपेष्टा जाणून घेण्याकरिता त्यांच्यामध्ये राहून अभ्यास करणारा विरळाच. आपल्या वर्तमापत्राच्या कार्यकारी मंडळात असा कोणी क्वचितच आढळेल. मी असे ऐकले आहे की टिळक महाराजांच्या हाताखाली काम करणाराला पहिली पाच वर्षे कोणता तरी आर्थिक प्रश्न पसंत करून त्याचा अभ्यास केल्यानंतरच त्याच्याकडून लेख लिहिवून घेऊन त्याची परीक्षा घ्यायचे. सी. पी. स्कॉटचा उल्लेख मी आधी केला आहे. आणि आता विस्ताराने त्यांच्याबद्दल सांगायचे तर त्यांचे वर्तमानपत्र 'मॅन्चेस्टर गार्डियन' एक विद्यापीठच होते. यात ऑक्सफर्ड आणि केम्ब्रिजचे उत्तमोत्तम पदवीधर यायचे आणि त्यांचे खरे शिक्षण तर श्रीयुत स्कॉटच्या हाताखालीच व्हायचे.

एकदा सी. पी. स्कॉट यांनी आपल्या मुलाला, लॉरेन्सला, लेखन करणाऱ्या मदतनीसाची जागा घेण्यास सांगून पत्र लिहिले होते. ते आपल्या वर्तमानपत्रांमध्ये आजकाल काम करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येकाने वाचावे असे आहे, आणि त्यातील सूचनांची अंमलबजावणी प्रत्येकाने केली पाहिजे. — *"आजपर्यंत तुझे मन*

*चित्रकला आणि नाटक यात गुंतलेले होते. सामाजिक प्रश्नांना तू अद्याप फारसे हात घातलेला नाही; परंतु ज्या प्रकारे तू आपल्या एखाद्या आवडत्या विषयावर तनमनाने काम करतोस, त्याच प्रकारे आता या विषयांवर तुला लक्ष केंद्रित करावे लागेल. मी माझे जीवन मानवसेवेसंबंधी परम निष्ठेने सुरू केले, आणि त्याच मार्गाने मी पुढे टिकून राहिलो आहे; म्हणूनच माझी वृत्ती जीवनातील सर्व विषयांमध्ये रंगलेली आहे. तुझ्यासाठी कदाचित उलट मार्ग असेल — मी सामान्य समाजसेवेला निष्ठेने सुरुवात केली, तुला कदाचित विशिष्ट प्रश्न हातात घेऊन शेवटी त्या निष्ठेपर्यंत पोहोचावे लागेल. परिणाम नक्कीच मिळेल...*

*तू या टप्प्यावर पोहोचलास म्हणजे तुला श्रमिकांचा प्रश्न हातात घ्यावा लागेल, त्यांचा अभ्यास करावा लागेल — गरीब कसे राहतात, खातात, पितात, त्यांना कोणकोणत्या हालअपेष्टा सहन कराव्या लागतात — याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागेल, यामुळे तुझ्या विषयाला मदत होईल. श्रमिकांच्या संपाचा प्रश्न उभा राहिला, तर श्रमिकांच्या नेत्यांची चांगल्या प्रकारे भेट घ्यायला पाहिजे. आणि या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात तुला श्री. आणि श्रीमती वेब यांच्या 'मजूर संघांचा इतिहास' या पुस्तकापासून, तसेच सहकारितेविषयीच्या एखाद्या पुस्तकापासून करावी लागेल."*

विदेशी, विशेषतः युरोपीय, घटनांबद्दल आपला समज अधिक चांगल्या प्रकारचा असला पाहिजे आणि त्याची चर्चा आपल्याला ज्ञानपूर्वक करता येणे आवश्यक आहे. आपल्या इंग्रजी वर्तमानपत्रांमध्येसुद्धा उत्तम बातमीदारांचा अभाव आहे, मग गुजराती वर्तमानपत्रांबद्दल काय बोलायचे? या विषयाच्या अभ्यासाबद्दलसुद्धा आपण शून्यच आहो असे म्हणता येईल. महायुद्धाच्या काळात खाडीलकर युद्धविषयक अभ्यास आणि ज्ञानपूर्ण लेख लिहीत असत आणि त्यांची फार वाखाणणी होत असे. आज युरोपचा इतिहास आणि युरोपीय राष्ट्रसंघाच्या निकट ज्ञानाने भरलेल्या लेखांची फार फार आवश्यकता आहे. हा अभाव आपण पूर्ण केला पाहिजे.

शिवाय नाणेशास्त्राचा विषय आहे. आपल्याकडे पाहिजे त्या विषयाचे चांगले चांगले तज्ज्ञ आहेत. त्यांच्याकडून आपल्या गुजराती वर्तमानपत्रांनी वेळोवेळी लेख मागवले पाहिजे. खास विषयांवर (उदा. विलायतेत शांतीची प्रतिज्ञा घेणाऱ्या चळवळींची संख्या जोर धरू लागली आहे.) इंग्रजांद्वारे चालवल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रात ज्ञानपूर्ण आणि विवेचनपूर्ण लेख येत असतात. 'स्टेट्समन'मध्ये युद्धविषक हिसाअहिंसेविषयी लेखमाला सुरू होती. त्याबद्दल केटलींनी 'अमृत बझार पत्रिकेत' सुंदर उत्तर दिले होते. आपल्या गुजराती वर्तमानपत्रांना अशा गोष्टी अजून माहीतच नाहीत.

विशिष्ट घटनेचे अभ्यासपूर्ण विवेचन करण्याकरिता आपण खास लेखकांना विनवले पाहिजे. खूर्द-गोविंदपूर नावाचा अतिशय चकित करणारा मुकदमा कलकत्ता उच्च न्यायालयात सुरू होता. त्या खटल्यावर 'अमृत बझार पत्रिकेने' उच्च न्यायालयाच्या निकालावर कायद्याची इतकी अभ्यासपूर्ण टीका केली की तिची नोंद उच्च न्यायालयाला घ्यावी लागली. ते चिडले, पण त्यासंबंधात ते कोणतेही पुढील पाऊल उचलू शकले नाही. आणि या खटल्याची चर्चा संपूर्ण बंगाल करू लागला. बारडोली तालुक्यात दोन-चार गरीब राणीपरजानी दंड न भरता सजा भोगली. त्यामुळे सरकारने कधी नव्हे अशा प्रकारे त्यांचा छळ करायला सुरुवात केली आणि त्यांच्यावर राजकोप होऊन त्यांच्या मालमत्तेचा लिलाव करण्यात आला. त्यावर उच्च न्यायालयात भरपूर टीका झाली. आणि तेव्हा कुठे त्यांना खूप दिवसांनी न्याय मिळाला. परंतु या संबंधात जितकी चर्चा व्हायला पाहिजे होती, जशी चर्चा व्हायला पाहिजे होती तितकी आणि तशी चर्चा झाली नाही. आपल्यावर असे अन्याय ढीगभर झाले आहेत.

अशा प्रकारे वर्तमानपत्रांच्या प्रमुख अंगांची मी चर्चा केली. परंतु आता तर यांत नवीन विभागांचीही भर पडली आहे. सिनेसृष्टीबद्दल वर्तमानपत्रांमध्ये संपूर्ण पान भरलेले असते. आनंदप्रमोदाविषयीही असेच. याकडे माझे लक्ष जात नाही. परंतु इतक्यात तर माझ्या वाचनात एक लहानशी टिपणी आली आहे. त्यात एक लेखक लिहितो की साहित्य परिषद तर 'रिकामचोटांचा जलसा' आहे. परंतु 'सिनेमात तर साहित्याचा एक मोठ्यात मोठा विभाग आहे.'

या साहित्याबद्दलचे माझे अज्ञान मी कबूल करतो. परंतु सिनेमा पाहणारांची नजर फार तीक्ष्ण असली पाहिजे याबद्दल शंका नाही. कारण मी तर या जीवनात दोनचार वेळाच सिनेमा पाहायला गेलो आहे. असे मी चोखंदळपणाकरिता केलेले नसून माझी नजर तितकी सूक्ष्म नाही म्हणून केले आहे. परंतु चित्रपट सृष्टीत प्रवीण असलेल्या एका एकाने सिनेमाच्या यशाची एक अनिवार्य अट मला सांगितली. ती अशी - 'स्त्रीपुरुषसंबंधाबद्दल खूप उत्तेजक मसाला भरा. उत्तमोत्तम दृश्य दाखवा आणि त्याला अभिनयाची जोड दिली की गंगेत घोडे न्हाले'. या कबुलीनंतर मी अजून काही सांगावे असे राहत नाही.

वर्तमानपत्रांचे एक अंग राहून गेले आहे—आणि तेही आवश्यक 'जीवनदायी' अंग. मी त्याला 'जीवनदायी' म्हणतो आहे, कारण त्याशिवाय वर्तमानपत्रांचे भागूच शकत नाही असे म्हणतात. हेही आजच्या काळाचे एक विचित्र कोडे आहे, विष नाही. ही गोष्ट जीवनदायी का मानली जाते? पण मी चुकलो. वर्तमानपत्रांना काही ते विष प्यायचे नसते; ते तर ही गोष्ट विकण्याचा व्यापार करत असतात आणि त्यावर

जगतात. निसर्गाच्या नियमांचा कितीही भंग करा, तरी शरीराची किंवा मनाची कोणतीही हानी होत नाही असा या भरपूर पैसे देणाऱ्या जाहिरातींचा गाभा असतो. एका नामांकित दैनिकाच्या व्यवस्थापकाकडून समजले होते की एखादी लालभडक रंगात रंगवलेली सिगारेटची किंवा दारूची केवळ चार इंच लांबीची जाहिरात—त्यावर शेकडो रुपये मिळतात.

चांगले चांगले म्हणवणाऱ्या वर्तमानपत्रांत दारूच्या आणि 'नबाबी रतिशक्ती'च्या बिभत्स जाहीरातींचा पूर लोटला आहे. 'गुप्त वशीकरण मंत्र' आणि शंभर टक्के यशस्वी संततीनियमनाच्या साधनांच्या जाहिरातींनी यांची पाने सुशोभित होत असतात. अशा प्रकारच्या पाच हिंदी वर्तमानपत्रात आलेल्या पाच प्रकारच्या जाहिरातींची स्तुती एक सद्गृहस्थांनी माझ्याजवळ केली. एक वृत्तपत्राने तर त्याचा ग्राहक होणाऱ्याला त्याच्याच छापखान्यात छापलेले 'कामविज्ञान' हे पुस्तक देऊ केले आहे. आणि मुंबईच्या एका प्रतिष्ठित वर्तमानपत्राने तर एका संपूर्ण पानावर पसरलेल्या जाहिरातीतून शक्तीदायी म्हणून मद्यार्कांना प्रमाणपत्र दिले आहे. आणि आमचा प्रतिनिधी ही प्रमाणपत्रे पाहायला गेला होता आणि ती सर्व खरी आहेत त्यावर शिक्कामोर्तब केले आहे ! एका नामांकित मासिकात 'स्त्रीआकृतीमां कामोत्तेजक अंगो' नावाच्या पुस्ताकाची सचित्र जाहिरात दिली आहे. आणि तिच्यात भरगच्च बिभत्स वर्णन आहेत. ही संपूर्ण जाहिरात स्त्री जातीचा भयंकर अपमान आहे.

अशा जाहिरांतींशिवाय वर्तमानपत्रे जर टिकाव धरू शकणार नसतील तर आपण वर्तमानपत्रांना तिलांजली का देऊ नये? यासंबंधात काकासाहेबांचे (कालेलकर) तीक्ष्ण वाक्य टाकले नाही तर चालेल असे मला वाटत नाही - 'वर्तमानपत्रांमधील जेव्हा मी जाहिराती पाहतो तेव्हा माझ्या मनात विचार येतो की प्रभुसेवेकरिता एक उत्तम मंदिर बांधल्यानंतर त्याचा खर्च चालवण्याकरिता त्याच्या कुपणात मद्यपानाच्या गुत्त्याकरिता आणि कुंटणखान्याकरिता जागा भाड्याने देण्यासारखे हे होणार नाही काय?'

ही तरी अनीतिमान जाहिरातींची गोष्ट झाली. परंतु दुसऱ्यासुद्धा अशा चित्रविचित्र जाहिराती छापण्यात येत असतात की ज्या संबंधित वृत्तपत्राकरिता मुळीच शोभणाऱ्या नसतात. बिचाऱ्या एका माणसाने गांधीजींना पत्र लिहून विचारले -

"बेळगावमध्ये विधिमहाविद्यालयाविषयी अशी जाहिरात पाहण्यात आली होती - 'बेळगावमध्ये आपला कोणी ओळखीचा असेल तर विचारून खात्री करून घ्या. हे महाविद्यालय असे आहे की इथे सुरुवातीला ६० रुपये शुल्क द्यायचे आणि त्याच्या मोबदल्यात फुकट खाणेपिणे, पुस्तके, विशिष्ट महिन्यात

परीक्षा (उच्च न्यायालयातील वकिलीची की इतर काही हे तर मी विसरूनच गेलो आहे) उत्तीर्ण झाला तर दरमहा ६० रुपये आणि अनुत्तीर्ण झाला तर महिन्याला ५० रुपये पगार मिळेल!' या आणि अशा प्रकारच्या जाहिराती वर्तमानपत्रे थांबवू शकत नाही काय?"

या दुषित अंगात अजून एक नवीन गोष्ट आढळली आहे. अशा जाहीरातीत अनेक प्रश्न आणि त्यांची काही उत्तरे दिलेले असतात आणि त्याचे बरोबर उत्तर देणाराला बक्षीस म्हणून लॉटरीचे वा जुगाराचे तिकिट द्यायचे. परंतु उत्तर लिहिलेलेच असतात. एवढेच की त्यातून त्यांना हवे असलेले उत्तर निवडले तर लॉटरी लागेल. परिश्रमाशिवाय वा बुद्धीशिवाय श्रीमंत होणे कोणाला आवडणार नाही? अशा प्रकारे या लोभी लोकांनी भाऊगर्दीने दर्तमानपत्रांचा बाजार गरम झालेला असतो.

ही गोष्ट लोकांच्या सुरुचीकरिता पोषक आहेआहे काय?, रसिकवृत्तीकरिता उन्नतीकर आहे काय? बुद्धीचे अनुरंजन करणारी आहे काय? या गोष्टीं ंच्या ओझ्यापासून मुक्त एकही वर्तमानपत्र नाही. आपल्याला त्यात बिभत्स चित्रे आढळतात. परंतु चालू राजकीय वा सामाजिक परिस्थितीवर प्रकाश पाडणारी व्यंगचित्रे, उपहास चित्रे ते का देत नाही. व्यंगचित्रांची कला पश्चिमेत खूप फुललेली आहे. 'हिंदुस्तान टाईम्स' या वृत्तपत्रात शंकर नावाचा व्यंगचित्रकार उत्तम व्यंगचित्रे वा उपहासचित्रे काढत असतो. वर्तमानपत्रांना जर ही गोष्ट परवडत असेल तर अशी चित्रे काढणारे किती तरी निघू शकतील. चटकदार परिच्छेद लिहिण्याची कलासुद्धा फुलवण्यासारखी आहे. यामुळे वाचकाच्या बुद्धीला उत्तेजन मिळते आणि विनोदवृत्तीचे पोषण होते.

'हिंदुस्तान टाईम्स'मध्ये त्या वेळेचे संपादक जोसेफ या कलेत एकमेव होते. ऍबिसिनियावरील अत्याचारावर इटालीवर बहिष्कार टाकण्याच्या शिक्षेच्या उपायाच्या मोठ्या मोठ्या गोष्टी सुरू होत्या. परंतु त्या अंमलात आणण्याची कोणातही प्रामाणिक इच्छाशक्ती नव्हती. त्यावर कडूगोड टीका करणारा एक परिच्छेद या लेखकाने लिहिलेला आठवतो - 'सँक्शन सुरू झाल्यानंतर आता त्यावर किती कडक अंमलबजावणी होते ते पाहू! न्यू दिल्लीत जेवणाच्या वेळी मॅकरोनी आणि स्पागेटीवर (इटालियन खाद्यपदार्थ) बहिष्कार टाकला जाणार आहे. इटालियन दारूला तर काही अडचणच नाही. फ्रांस सॅक्शनची अंमलबजावणी सर्वात आधी करणार असल्यामुळे फ्रेंच मद्य शॅम्पेनच्या भावाचीच सर्व चोकशी करत आहेत. वर्तमानपत्रवाल्यांना दीर्घ सुट्या मिळायला पाहिजे कारण हे सर्व छापण्याकरिता रोमन टाईप पाहिजे. अथवा ते इटॅलिक्स मध्ये तरी असले पाहिजे. शब्दसुधा इंग्रजी भाषेतील असले पाहिजे. लॅटीन भाषा बरीचशी अत्याचारी जनतेच्या इटालीच्या भाषेतून आली आहे. यामुळे तिचासुद्धा बहिष्कार, बहिष्कार, बहिष्कार!'

व्यंगाच्या वा उपरोधाच्या भाषेत लांब बोधप्रद लेख लिहिणारे स्व. लल्लुकाकांचा पुत्र भाई गगनविहारी आहे. यांची उपरोधिक भाषा अतिशय मोहक आहे. यांच्या संपूर्ण लेखाचा उतारा तर मी काय उद्धृत करू? परंतु आपला भ्याडपणा, त्याग आणि उद्यम करण्याच्या अशक्तीचा दोष स्वतःवर घेण्याऐवजी दुसऱ्यावर ढकलण्याच्या प्रवृत्तीचे उपहासात्मक वर्णन त्यांनी केले आहे तसे 'दुसऱ्या कोणत्या' नावाच्या लेखात केला असेल तर ते वाचून कोणाला आत्मनिरीक्षणाची इच्छा होणार नाही आणि आनंद होणार नाही? या लाब लेखाचील एक लहानसा उतारा देतो -

'तुमच्या कामात हा अज्ञात माणूस असंख्य विघ्ने टाकत नसतो काय? तुमचे एखादे पुस्तक सापडत नसेल, एखादी वही वा फाईल हरवली असेल, एखादा कागद चुकीच्या ठिकाणी ठेवला गेला असले सर्व कारकून आणि पट्टेवाले सांगतील की ही चूक अजून कोणाची आहे. . . .

'सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात या अज्ञात माणसाची विनाशकारी शक्ती राहून राहून जाणवत असते. सर्व युद्धे दुसऱ्याच्या दुष्टपणामुळे झालेली असतात हे स्पष्ट आहे. दुसरे देशच शांततेचे उल्लंघन करत असतात. हिसात्मक वातावरण निर्माण करत असतात आणि युद्धाची सुरुवातही तेच करत असतात. आपला स्वतःचा देश तर नेहमी स्वरंक्षणार्थच लढत असतो. युद्धाच्या दरम्यान सर्व अधम कृत्ये, अत्याचार परदेशीच करत असतात . . .

'वर्तमानपत्रे वाचण्याचे अतिशय जड देशकार्य रोज ते सकाळी करत असताना असंख्य माणसांना वाटत असते की जर इतर सर्व कैदेत गेले असते, इतरांवर लाठीमार झाला असता आणि इतरांनी स्वदेशीचे व्रत घेतले असते तर पूर्ण स्वराज्य जरी नाही तरी त्याचे सत्व वा तत्त्व तरी मिळाले असतेच. मला अनेक देशबांधवांनी सांगितले आहे की जर एक लाख लोक मातृभूमीकरिता प्राण अर्पण करायला तयार असते तर निश्चितच स्वातंत्र्य मिळाले असते. . . .

'हिंदू आणि मुसलमान संप्रदायाच्या पुढाऱ्यांना ऐक्याकरिता आवश्यक एकमत झाले असते तर ऐक्य कसे निर्माण झाले नसते? हे गैरसमज आणि विष कोण पसरवत असतो? दुसऱ्या समाजाचे इतर लोक वा पुढारीच. येथील लोक इतर लोकांना वा पुढाऱ्यांना ऐकण्याकरिता सतत विनवणी करत असतात . . .

'अशा प्रकारे आपली राष्ट्रीय प्रगती हे अज्ञात लोक अडवत असतात. आपले सामाजिक जीवन विस्कळित करत असतात आणि ते आपल्याला आर्थिक उन्नती करू देत नाहीत. असे असले तरी ही गोष्ट

आपल्याला लागू होत नाही. कोणी शरलॉक होम्ससारखा कुशल गुप्तहेर जरी असला तरी वा सरकारचा गुप्तहेर जरी असला तरी तो याला पकडू शकत नाही. तसेच एखाद्या शक्तिशाली योग्याच्या समाधीपेक्षाही सर्वव्यापी असलेल्या या अगाध, गहन व्यक्तीच्या अस्तित्वाचे रहस्य कोणालाही कळू शकत नाही. . . .

'परंतु हे रहस्य' इतके गहन वाटते की कदाचित हा रहस्यभेद कधीही होणार नाही. हा दुसरा माणूस सर्वस्थळी वसत असतो आणि कोणत्याही ठिकाणी वसत नसतो. हा कदाचित तुमच्यात, माझ्यात आणि आपणा सर्वात तर वसत नाही?'

याच दिशेने परंतु अगदी वेगळ्या दिशेने आणि वेगळ्या शैलीचा गोड उपरोध 'स्वैरविहारी' रामनारायण पाठक यांचा आहे. घाण गोळा करून ठेवण्याच्या आपल्या प्रवृत्तीसंबंधीचा यांचा उपरोध -

"इथे मुंबईत आलेला जरी असलो तरी माझा प्रदेश सोडून आलो आहे असे मुळीच वाटत नाही. याचे कारण आपली भाषा, आपले मित्र हे सर्व परिचित रीतिरिवाजानेच वागत असतात हेच खरे. परंतु या सर्वात विशेष तर आपले उकिरडे आहेत. जसजसा मी हे उकिरडे पाहत जातो तसतसे मला वाटत असते, 'नाही, नाही, अजून तर मी गुजरातमध्येच आहे !' आणि मी गात असतो-

'जिथे जिथे वसतो एक गुजराती तिथे असतो सर्वकाळ गुजरात !'

"लोक विनाकारणच वाढत्या उकिरड्यांबद्दल तक्रार करत असतात. उकिरडे वाढवायचे नाही तर दुसरे काय करायचे? या मुंबईत सुधारणा करू इच्छिणारे लोक कचरा गोळा करण्याकरिता मोठे मोठे डबे ठेवत असतात. तसे तर आमच्या गावातही कचऱ्यासाठी ठिकाणे केलेली आहेत. परंतु उकिरडे तर पसरलेच पाहिजे. असे तर आमच्या गावातसुद्धा कचऱ्याच्या छत्र्या (कंटेनर/डबे) ठेवलेल्या आहेत. पण उकिरडा तर तसाच पडतो. समुद्र एकदा आपली सीमा ओलांडणार नाही, पण उकिरडा मात्र नक्कीच आपली सीमा ओलांडेल. त्याविरुद्ध तक्रार करणाऱ्या लोकांना हे कळतच नाही. याचे कारण समजले तर कोणीही याबद्दल तक्रार करणारच नाही. उकिरडा म्हणजे घाणीची जागा – हे खरेच ना? आता आम्ही इतक्या स्वच्छ माणसांनी इतक्या घाणेरड्या जागी जाऊन कचरा कसा टाकायचा? म्हणून मग आम्ही कचरा दूरून फेकतो. आता दूरून कचरा फेकत असताना तो नेमका कचऱ्याच्या डब्यात तर पडणार नाही. थोडा इकडेतिकडे पडेलच. टेनीस खेळणारा खेळाडू चेंडू फेकतो तेव्हाही दरवेळी नेमक्या चौकोनात त्याचा चेंडू पडतोच असे नाही. आणि कचरा काय एका चेंडूसारखाच आहे? त्यात तर लहानमोठ्या अनेक वस्तू असतात. आणि कचऱ्याचा डबा/छत्री काय

टेनिसच्या चौकोनाएवढी असते? म्हणून कचरा दूरून फेकला की थोडा भाग नक्कीच इकडेतिकडे विखुरणार. आणि या विखुरलेल्या भागामुळे उकिरडा आपला व्याप वाढवत नेणार. मग जो पुढचा माणूस येऊन कचरा टाकणार असतो त्याला त्या नव्या हद्दीबाहेर उभे राहून कचरा फेकावा लागतो. अशा रीतीने पुन्हा थोडा कचरा विखुरून पसरतो आणि उकिरड्याची हद्द वाढत जाते. आता यात बिचारे लोक काय करणार?”

असे रुचकर साहित्य मासिकातच बंदिस्त का असावे? त्याचा लाभ दैनिकांनाही का मिळू नये? परंतु दैनिकांना, साप्ताहिकांना आपल्या वाचकांची रसतृप्ती करवण्याचे सुचतच नाही.

परंतु आता या सर्व अंगोपांगांना गोळा करून त्यातून सजीव कृती निर्माण करणारे आणि वृत्तविवेचक पुढे येत आहेत. (१) काही संपादक केवळ लोकमताचे प्रतिबिंब आपल्या वृत्तपत्रातून दाखवत असतात. लोकमताच्या योग्यायोग्यतेचा विचार न करता ते जसे असेल तसे रुजू करत असतात. (२) दुसरे काही संपादक लोकमत समजून घेतात आणि ते समजल्यानंतर त्यात सुधारणा घडवून आणायचा प्रयत्न करत असतात. अशी सुधारणा करू इच्छिणाऱ्या संपादकावर जनतेचा जरी रोष झाला तरी तो ते सहन करत असतात, तिटकारा सहन करत असतात आणि अन्याय आणि दुराचणाविरुद्ध जबरदस्त संघर्ष करत असतात. (३) काही लोकशिक्षक असतात. ते आपल्या काळात परिवर्तन घडवून आणत असतात.

पहिल्या वर्गात येणारांची संख्या खूप जास्त असते. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्गात येणारे अगदी मोजकेच असतात.

विलायत आणि अमेरिकेसारख्या स्वतंत्र देशांत वृत्तविवेचनाची कला पूर्णपणे विकसित झाली आहे, आणि तिथे या तिन्ही प्रकारचे संपादक आढळतात. हे तिन्ही प्रकारचे संपादक आपल्या वृत्तपत्राला यशस्वी करत असतात. तिथे शिक्षण सार्वत्रिक आहे आणि यामुळे तिथे एकेका वृत्तपत्राच्या दहा ते वीस लाख प्रती खपत असतात. त्यांच्या कार्यालयात दीड ते दोन हजार माणसे काम करत असतात. एकट्या संपादकाच्या हाताखाली वेगवेगळ्या विभागांचे संपादक-उपसंपादक मिळून वीसपंचवीस लोक काम करत असतात. आणि त्याचे मदतनीस आणि कारकून मिळून ढीगभर लोक असतात. आपल्या निर्धन देशात हा सर्व खेळ बिचाऱ्या एकाट्या सूत्रधाराला खेळावा लागत असतो. देश परतंत्र असल्यामुळे ज्या लोकांच्या मनात याची चीड असते आणि ते स्वातंत्र्यसंघर्षाकरिता वर्तमानपत्र काढत असतात काय? अशी आपली विपरीत परिस्थिती असतानाही चिंतामणी जेवा, रामानंद चेटलर, मोतीलाल घोष, श्री नटराजन आणि काशीनाथ रायसारखे

संपादक निर्माण झाले आहेत ही ईश्वराची आपल्यावर कृपाच आहे. गांधीजी आणि टिळक महाराज हे तर कोणत्याही योगायोगात आणि परिस्थितीतही पहाड तोडणारे आहेत. असे लोक तर विरळच असतात. इतरही असे पत्रकार आहेत की ज्यांनी आपल्या वृत्तपत्राला यशस्वी केले आहे. यांनी जनतेला म्हणा वा सरकारला म्हणा न डिवचायचे आणि वारा जिकडे वाहतो तिकडे वाहायचे धोरण अवलंबिले आहे. अशा यशस्वी' पत्रकारांचा बोलबाला इंग्रजीत तर आहेच, इतकेच नाही तर गुजरातीतही आहे. अशा 'यशस्वी पत्रकारांची चर्चा करण्याची मला इच्छा नाही. माझ्या नजरेसमोर तर जनतेला घडवणारे, जनतेची सेवा करणारी वर्तमानपत्रेच आहेत. यामुळे मी या दुसऱ्या वा तिसऱ्या वर्गाच्या पत्रकारांचा मी विस्ताराने उल्लेख करीन.

अशा लोकशिक्षणविरोधी आणि राष्ट्रविघातक पत्रकारांविषयी सी. पी स्कॉट म्हणतात - "लोकमतावर प्रभावित करून त्याला मार्गदर्शन करण्याचे काम त्यांच्याकरिता महाभारतासारखे आहे. आणि कोणत्याही एका व्यक्तीपर्यंत वा वर्तमानपत्राला यांच्यापर्यंत पोहोचणे अतिशय मुश्किल काम आहे. या कामाकरिता उत्तमोत्तम कौशल्य, उत्तमोत्तम शिक्षणाचे संस्कार पाहिजे. कुशाग्र बुद्धिशक्ती पाहिजे. परंतु या सर्वांना सामर्थ्यशाली करणारी, प्राणवान करणारी धर्मभिरुता पाहिजे, सत्यनिष्ठा पाहिजे. हृदयाचीच नाही तर बुद्धीचीही सत्यनिष्ठा पाहिजे." या गुणांनी संपन्न असलेले संपादकच या दुसऱ्या आणि तिसऱ्या गटातून येऊ शकतात. दुसऱ्या विभागातील संपादकांच्या नावांचा शोध घेतला तर अमेरिकेतील लॉईड गॅरिसन, इंग्लंडमधील डीलेन, स्टेड आणि सी. पी. स्कॉट येतात. आणि आपल्याकडे गांधीजींचे लेखणी सर्वोत्कृष्ट आहे. तिसऱ्या विभागात गांधीजी आणि टिळक महाराज सोडून दुसरा कोणी दिसत नाही.

स्व. मोतीलाल घोष, श्री चिंतामणी, नटराजन, रामानंद चॅटर्जी आणि कालिनाथ रायची गणना मी समर्थ वृत्त विवेचकांमध्ये करतो. परंतु सद्यपरिस्थितीत देशाची सेवा करण्याची यांची शक्ती सीमीत राहिली आहे. स्व. मोतीलालची उपरोधाने भरलेली लेखणी एके काळी बंगाल सरकारकरिता जड झाली होती. परंतु त्यांना कधीही सरकार तरुंगात पाठवू शकले नाही. तुरुंगात डांबण्याकरिता पुराव्याचा जेव्हा काळ आला तेव्हा ब्रिटिश साम्राज्याचा सूर्य जिथे कधीही उगवत नव्हता त्या धामात ते पोहोचले होते.

श्री चिंतामणींचे ज्ञान आश्चर्यजनक आहे. असे म्हणता येईल की हिंदुस्थानचा पन्नास वर्षांचा इतिहास यांच्या बोटावर खेळत होता, आणि तारखेसह ते लहानात लहान घटनेसंबंधी बोलू शकत होते. मॉनेग्यू जेव्हा हिंदुस्थानात आले तेव्हा त्यांच्या ज्ञानाची आश्चर्यजनक शक्ती शिगेला पोहोचलेली होती. नटराजन हे एक

अनुभववृद्ध समाजसुधारक आणि सिद्धहस्त वृत्तविवेचक आहेत. रामानंद चॅटर्जी आणि कालिनाथ रायच्या सखोल अभ्यासामुळे त्यांच्यात अनेक लेखांना शिकवण्याचे सामर्थ्य आहे.

परंतु गांधीजी आणि टिळकमहाराजांचा वर्ग काही आगळावेगळाच आहे. त्यांच्या वृत्तविवेचनावर त्यांच्या लोकनेतृत्वाची छाप पडली आहे. दोघेही राष्ट्राला घडवणारे आणि लोकशिक्षक होते. परंतु गांधीजी अन्यायाकरता राजा आणि प्रजा या दोघांशीही आमरण झुंजणारे होते तर लोकमान्य प्राधान्याने लोकशिक्षक होते. परंतु इथे मी यांची गोष्ट कशासाठी करतो आहे? यांचा अधिकार आणि प्रभाव यांचा आज पाहतो आहो, अनुभवतो आहो. अनुभवत राहू, आणि यांच्या लोकशिक्षणाचा परिणाम आपल्या डोळ्यांसमोर तरळतो आहे.

विदेशातील वृत्तविवेचकांसंबंधी बोलणे सोपे आहे. वृत्तविवेचन आपली कला नसून विदेशी कला असल्यामुऴे विदेशी लोकांकडून आपल्याला जितके शिकता येईल तितके आपण शिकायला पाहिजे.

लॉईड गॅरिसनचे नाव घेताच त्यांच्यासंबंधी बोलण्याकरिता तोंड भरभरून येते. गुलामगिरीच्या अघोर आणि अन्यायाचा विरोध, भयानक परिणामाची पर्वा न करता झुंजणाऱ्या या योद्ध्याला कोणताही सत्याग्रही विसरू शकत नाही. गुलामगिरी हळूहळू संपायला पाहिजे असे एकदा हे म्हणून तर गेले होते, परंतु लगेच त्यांना या विधानाचा पश्चात्ताप झाला आणि त्यांना त्याकरिता जाहीर माफी मागण्यात संकोचही वाटला नाही. अशा प्रकारे पश्चात्ताप जाहीर करणे त्यांना आपला धर्म वाटला. यावेळेचे त्यांचे उद्गार इतिहासात प्रसिद्ध आहेत. “पार्क स्ट्रीट चर्चमध्ये हळूहळू गुलामगिरी नष्ट करण्याच्या लोकप्रिय परंतु दुषित सिद्धांत मी अविचाराने स्वीकारला होता. आज हा विचार पूर्णपणे आणि माझ्या म्हणण्याचा कोणताही अनर्थ करता येऊ नये अशा प्रकारे मागे घेण्याची संधी मी घेतो आहे. आणि ईश्वराची, माझ्या देशाची आणि माझ्या गुलामगिरीत असलेल्या गरीब भावंडांची मी जाहीररित्या क्षमा मागतो. मी भिरुतापूर्ण अन्यायाने भरलेल्या अविचाराने परिपूर्ण विचाराला माझ्या मनात प्रवेश दिला आणि तो प्रगटही केला. आता ही जाहीर माफी मागून माझ्या मनावरील दडपण दूर करतो आहे. असे केल्यानेच माझ्या मनाला दिलासा मिळतो. माझ्या भाषेतील कठोरपणा अनेकांना आवडत नाही हे मला माहीत आहे. परंतु कठोर भाषेची आवश्यकता नाही काय? निश्चितच मी सत्याकरिता कठोर होत असतो. न्यायाकरिता अस्वस्थ होत असतो. या विषयावर मला मवाळपणे बोलण्याची वा लिहिण्याची मुळीच इच्छा नसते. नाही असे चालणार नाही ! आग लागलेल्या घरमालकाला थोडे हळू घे असे म्हणण्याचे तुमच्यात धैर्य असेल तर अवश्य म्हणा ! ज्याच्या बायकोवर बलात्कार होत असतो तिच्या पतीला हळू हळू वाचव असे म्हणायची तुमची छाती असेल तर म्हणा ! आगीत पडलेल्या बालकाला हळूहळू वाचवा

असे म्हणण्याइतके तुमचे हृदय कठोर असेल तर म्हणा ! परंतु ही गुलामगिरी हळूहळू दूर करण्याचा कोणी माझ्यासमोर उच्चारही करू नका. मला हिचा नाश करण्याचे वेड लागले आहे. ही गुलामगिरी दूर करण्याकरिता माझ्या अंतःकरणात आग पेटली आहे. मी विचार करून करून बोलणारा माणूस नाही. कोणाचीही पर्वा करणारा माणूस नाही.  मी रतिभरसुद्धा मागे हटणार नाही. ऐकून घेतल्याशिवाय तुमची सुटका नाही.”

स्टेड अनेकदा जनतेच्या नाराजीचे काराण होत होता. बोअर युद्धात ब्रिटिशांची बाजू अन्याय्य आहे, ब्रिटिशांचा पराभव व्हावा अशी प्रार्थना आपण ईश्वराला केली पाहिजे असे उद्गार त्याने काढले होते. आणि ब्रिटिश लष्कराचे अत्याचार त्याने आपल्या वर्तमनानपत्रात निर्भयपणे आग्रहपूर्वक छापले. आणि एकदा अनिष्टाला विरोध करताना तो तुरुंगातसुद्धा गेला होता. डीलेन आणि सी. पी. स्कॉटची गोष्ट थोडी विस्ताराने सांगण्याची इच्छा आहे.

इंग्लंडमधील या दोन संपादकांच्या जीवनवृत्तांतातून प्रत्येक वृत्तविवेचकाने बरेच काही शिकण्यासारखे आहे. आणि दोघांमध्येही सी. पी. स्कॉटचे जीवनचरित्र तर एखाद्या कर्मयोगी संन्याशासारखे आहे असे वाटते. ते वाचून माणूस पवित्र आणि उन्नत होतो. डीलेन स्कॉटच्या आधीच्या काळातील होता. तो एक विलक्षण मूर्ती होता. असे म्हणतात की त्याच्या छत्तीस वर्षांच्या काळात त्याने ‘टाईम्स’मध्ये एकही लेख लिहिला नव्हता. एक तर ही बातमी अक्षरशः खरी नाही. असे असले तरी यांनी ‘टाईम्स’ला ना तर त्याने सरकारचे मुखपत्र बनवले होते, ना सरकारचे एक व्यवस्थापक घटक बनवले होते. त्याने बनवले होते ‘टाईम्स’ला लोकमत घडवणारा प्रभावी दुवा. आणि अब्राहम लिंकनसारख्यांकडून त्याने ‘टाईम्स’ ही जगातील महाशक्ती आहे, मीसीसीपीला वगळता जगात अशी एकही शक्ती नाही असे प्रमाणपत्र मिळवले होते. डीलेनचा जीवनवृत्तांत असाधारण प्रतिभेचा एक नमुना आहे. निर्भयता ही त्याच्या चेहऱ्यावरून दिसून पडत होती. मोठ्या राजाची वा प्रधानमंत्र्याची पर्वा न करता याने स्वतःचे तंत्र चालवले. राजकारणात धुरंधर लोकांचे कर्तव्य जरी चुप बसणे असले तरी वर्तमानपत्राचे कर्तव्य सत्य काय आहे हे उघड करणेच असते, अन्याय आणि अत्याचाराला तोंड फोडणेच असते. आणि जगाच्या न्यायासनासमोर ते मांडायचे असेते. . . . एखादे सरकार जर हवे तेव्हा काळ्याचे पांढरे करून सत्तेत आले असेल वा त्याने हवे तेव्हा क्रूरपणाचे वर्तन केले असेल तरी दुसऱ्या सरकारने त्या सरकारशी न्यायाचेच वर्तन केले पाहिजे असे त्याचे मत होते, त्याचे असेही मत होते की वर्तमानपत्रावर सरकारची बाजूच घेतली पाहिजे असे काही बंधन नाही. मुत्सद्दी एकमेकांशी जरी सौजन्याने

वागत असतील तरी वर्तमानपत्रांनी मात्र पांढरेशुभ्र वस्त्र परिधान करून काळे कृत्य करणारा जर कोणी असेल तर अशा धुरंधराचा मुखवटा फाडून त्याचे काळे कृत्य उघड केलेच पाहिजे. तसेच खून करून कोणी गादीवर बसत असेल तर त्याचे रक्तरंजित हात वृत्तपत्राने जनतेसमोर आणले पाहिजे. वृत्तविवेचकाचे कर्तव्य इतिहासकाराप्रमाणेच सत्यशोधन करणे आणि ते जनतेसमोर मांडणे असते.

असे विधान त्याने एका ऐतिहासिक प्रसंगाच्या वेळी केले होते. आणि याच तत्त्वाला बिलगून त्याने 'टाईम्स'चे संपादन केले होते. सत्याचा शोध घेण्याची त्याची पद्धतसुद्धा काही वेगळीच होती. दररोज दिवसभर समाजात राजनेत्यांच्या मंडळात फिरायचे, अनेकांना जेऊ घालायचे, अनेकांकडे जेवायला जायचे. इतिहासाचा कल समजावून घेऊन लोकमताला वळण लावायची तयारी करायची. रात्री दहा ते सकाळी चारपाच वाजेपर्यंत डोळ्याला डोळाही लावायचा नाही. वर्तमानपत्रातील एकेक बातमी पाहायची, एकेक ओळ तपासायची, सुधारणा करायची चूक करणाराचे कान धरायचे आणि वर्तमानपत्राची पहिली प्रत बाहेर पडत नाही तोपर्यंत कार्यालयातून बाहेर पडायचे नाही. युरोपमधील प्रत्येक जाणकार माणूस त्याची प्रशंसा करत असायचा. आणि व्हिक्टोरिया राणीलासुद्धा त्याचे लेख वाचण्याची आवश्यकता वाटत असे. असे असूनही त्याला त्याच्या पदामुळे जी प्रतिष्ठे मिळाली त्या शक्तीचा वा सत्तेचा त्याने कधीही दुरुपयोग केला नाही. कोणी जर त्यांच्यावर विश्वास टाकला असेल तर त्याचा हानिकारक उपयोग त्यांनी कधीही केला नाही. एखाद्या पक्षाला वश न होता आणि कोणाचीही फिकीर न करता आपल्या पत्राच्या प्रतिष्ठेला त्यांनी कधीही धक्का लागू दिला नाही. त्यांनी आपल्या पत्राची भाषा आणि पत्रातील विचार हे दोन्ही उच्च प्रतीचे ठेवले होते.

स्कॉट वेगळ्या प्रकारचे व्यक्तिमत्व होते. त्यांचे धीरगंभीर जीवन एखाद्या आचार्याला शोभेल असे होते. त्याच्या हाताखाली अनेक लोक शिकले होते. परिणामी जवळपास साठसत्तर वर्षात 'मॅन्चेस्टर गार्डियन'ची उदारता, न्यायप्रियता आणि निर्भयता यांच्यामुळे त्याच्या प्रतिष्ठेला कधीही धक्का लागला नाही. बातमीबद्दलचे त्यांचे उद्गार मी आधीच उद्धृत केले आहेत. त्यांचे जीवन अथांग परिश्रमाने आणि उग्र सत्यनिष्ठेने भरलेले होते.

यांचा चरित्रलेखक यांच्याबद्दल लिहितो की याने वयाच्या ७३ व्या वर्षी १९१९साली ११७ लांब लेख लिहिले होते. याशिवाय लहान लेख तर वेगळेच. आणि १९२० साली १२३ लेख लिहिले होते. एका पंधरवाड्यात त्यांचे पाच अग्रलेख तर असायचेच. शिवाय इतर सर्वांनी लिहिलेले तपासण्याचेही काम तो करायचाच. परिश्रम करण्याची त्यांची असीम शक्ती होती. ८० वर्षाच्या वयानंतर सर्व काम उरकवल्यानंतर सकाळच्या

वेळी स्वच्छ आणि विचारशक्तीपूर्वक त्यांनी आपला वेळ आकड्यांनी आणि हकिगतींनी भरलेल्या ब्ल्यू बुकच्या अभ्यासाला दिला.

याशिवाय लोकहिताच्या प्रश्नावर मित्रांबरोबर त्यांचा बराच पत्रव्यवहार सुरू असायचा. आणि ख्रिस्त, हॉबहाऊस, डिलेन, लोरबर्न सारख्या अग्रगण्य विचारवंत आणि राजकारणी लोकांना शेकडो पत्रे पाठवणे सुरुच असायचे. त्याच्या प्रखर सत्यनिष्ठेने भलेभले प्रभावित व्हायचे. आणि लॉईड जॉर्जला सुद्धा त्याने एकदा माफी मागायची यशस्वीपणे सूचना केली होती. त्याकरिता त्याने लिहिलेले पत्र जसे आहे तसे देतो - "तुम्हाला स्वतःला असे वाटते की जे झाले त्यासंबंधात काहीही करता येऊ शकत नाही. असे असेल तर तुम्ही स्वच्छ मनाने, मनात किंचितही किंतू न ठेवता माफी मागणे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही जे करायचे नाही ते केले आहे असे तर तुम्ही माझ्याजवळ कबूल केले आहे. कोणत्याही माणसाकडून जर काही चूक झाली असेल तर ती कबूल केल्याने तो काहीही गमावत नाही. परिणामी सर्व कटुता आणि रागद्वेष निघून जातो."

कोणत्याही प्रश्नावर स्कॉट बेधडक लिहायचे याची लॉईड जॉर्ज यांना पूर्वकल्पना होती. यामुळे ते स्कॉटना विनंती करत म्हणायचे की कृपा करून काही विशिष्ट प्रश्नावर माझे काय म्हणणे आहे हे ऐकल्याशिवाय लिहू तू लिहू नको. स्कॉटशी इतकी जवळची मैत्री असूनसुद्धा महायुद्धानंतर तिचाही लॉईड जॉर्जला उपयोग झाला नाही. आणि त्यांच्यावर सर्वात प्रखर टीका करणारे स्कॉटच होते. बोअर युद्धात न्याय्य पक्षाच्या बाजूने राहून त्यांनी युद्धाला जोरदार विरोध केला होता ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे. ते जेव्हा पूर्णपणे जनतेच्या आवेशाच्या आणि आकांक्षांच्या विरुद्ध बाजूला होते तेव्हा ते अल्पसंख्याकांच्या न्यायाकरिता झगडायचे. यामुळे लोक कदाचित त्यांच्या घराचे आणि कार्यालयाचे नुकसान करतील या भीतीने पोलिसांचा तिथे पहारा बसवण्यात आला होता. इतके निर्भय टीकाकार आणि योद्धा असूनही त्यांना सत्य इतके प्रिय होते की एका प्रसंगी त्यांच्याकडून हकिगत सांगण्यात चूक झाली असता त्यांनी माफी मागितली होती.

एकदा स्क़ॉटची गोष्ट निघाली असता श्री श्रीनिवास शास्त्री म्हणाले होते - "हिंदुस्थानसंबंधी एकदा त्यांचे विचार प्रगतीविरोधी होते. माझ्याबरोबर भरपूर चर्चा झाल्यानंतर त्यांचे विचार बदलले. त्याविषयी त्यांनी मला विशेष पत्र लिहून कळवले होते की आता माझे विचार पूर्णपणे बदलले आहेत." आयर्लंडमध्ये जेव्हा ब्लॅक आणि टॅन्सने हाहाकार माजवला होता तेव्हा स्कॉटच्या लेखणीच्या प्रखर प्रहारामुळे ब्रिटिश सरकारला जाग आली आणि त्यांनी ब्लॅक आणि टॅन्सचा हत्याकांड बंद करायला लावला होता. त्यांच्यावर कामाचे इतके ओझे असूनही कार्यालयात काम करणाऱ्या लेखकांना, उपसंपादकांना आणि इतर कारकुनांना त्यांच्या

विचारदोषाबद्दल आणि भाषादोषाबद्दल ते बंद लिफाफातून पत्र लिहायचे आणि सावध करायचे. आणि त्यांनी जी भाषेची सुश्लिष्ट, गंभीर आणि आवेशमुक्त शैली सुरू केली होती ती आजसुद्ध सुरू आहे. मायकल सेडलरने योग्यच सांगितले आहे की "'मॅन्चेस्टर गार्डियन' एक विद्यापीठ होते. यात प्रचलित विद्यापीठातून निघालेल्या स्नातकांना वृत्तविवेचन करण्याची नवीन कला शिकायला मिळायची."

यांच्या जीवनचरित्रात यांच्या क्रोधाचा वा रोषाचा एकाच ठिकाणी उल्लेख आहे. आणि ते इथेच सांगण्यासारखे आहे - "आपल्या वर्तमानपत्रात काही अनुचित वा अशोभनीय शिरू नये म्हणून पत्रात टाकण्याकरिता आलेल्या जाहिराती ते फार काळजीपूर्वक तपासत असत. ते अनेकदा म्हणत असत की जाहिरात खात्याचा आणि संपादकीय खात्याशी जितका कमी संपर्क असेल तितके चांगले. एक अविचारी तरुण एकदा म्हणाला होता की वर्तमानपत्राचा एक विशिष्ट भाग जाहिरातीकरिता दिल्याशिवाय आणि जाहिरातदाच्या आग्रहाला वश झाल्याशिवाय चालूच शकत नाही. हे ऐकून ते म्हणाले, 'याला लात मारून जिन्याखाली ढकलून द्यायला पाहिजे.. . .

असा माणूस जेव्हा ५७ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाला तेव्हा बादशाहानेसुद्धा त्यांच्या अप्रतिम सेवेबद्दल त्यांचे आभार मानले. आणि प्रधानमंत्री म्हणाले की स्कॉटने केलेल्या सेवेमुळे जग राहण्यासारखे जास्त झाले आहे. आणि सेनापती स्मट्स म्हणाले होते की यांच्या जीवनातून आणि कार्यातून यांनी अनेकांच्या जीवनाती सज्जनपणाची आणि सदाचाराची मुळे बळकट केली आहेत.

अशा माणसाच्या स्मृतीनेच माणूस धन्यधन्य होतो. यांनी वृत्तविवेचनक्षेत्र उज्वल केले असून भावी वृत्तविवेचकांसाठी यांचे जीवन मार्गदर्शक झाले आहे. योगायोगाने यांच्या देशात हे सर्व करणे तुलनात्मक दृष्टीने सोपे होते असे म्हणता येईल. आपल्याकडे टिळक महाराजांना आणि गांधीजींना राजा धन्यवाद देणार आहे काय? त्यांना तर राजाच्या कारागृहात पाहुणचार मिळत होता. परंतु वकिलीचा व्यवसाय प्रामाणिकपणे चालवणे जितके कठीण आहे तितकेच वृत्त विवेचकाला आपला व्यवसाय शुद्धतेने, सत्यतेने आणि निर्भयतेने चालवणे कठीण आहे. ही गोष्ट स्कॉटला साध्य झाली होती. वृत्तविचचनाकरिता टिळक महाराजांचा म्हणा की गांधीजींचा म्हणा की गॅरिसनसारख्यांचा आदर्श केवळ कठीणच नाही तर जवळपास अशक्य आहे. या दृष्टीने स्कॉटचा आदर्श तुलनात्मक दृष्टीने सोपा आहे.

कुठे हे वृत्तविवेचन आणि कुठे आपल्या गुजरातीतील वृत्तविवेचन? पंधरा वर्षांपूर्वी आपल्यामध्ये जो घाबरटपणा होता तो घाबरटपणा आता राहिलेला नाही. आपल्याला आपल्या विचाराप्रमाणे भाषेत जे

अभिव्यक्त करण्याची भीती वाटत होती ते आता आपल्याला परिपूर्ण जोमाने, किती तरी जास्त आवेशपूर्ण भाषेत अभिव्यक्त करणे आवडू लागले आहे. आधी आपल्याकडे भाषांतराला काही ठावठिकाणा नव्हता. त्याऐवजी आता आपल्याला चांगले चांगले अनुवाद मिळू लागले आहेत. परंतु आपल्या लेखांत अभ्यासाची आणि अधिकाराची उणीव आहे. मर्यादेच्या भानाचा अभाव आहे. आपल्याला शब्दांची फिकीर नसते. उतावीळपणा आणि निरर्थक आवेश सर्वत्र जाणवतो. लेख अनेकदा हेतूशिवाय असतात. कोणत्या उद्देशाने आपण लिहितो आहो याचे आपल्याला भानच नसते.

उदाहरणार्थ आपण विदेशातील प्रश्नाचे विवेचन करतो. परंतु आपण हे विवेचन आपल्या देशातील लोकांकरिता करतो आहो, विदेशातील लोकांना याचे ज्ञान मिळावे म्हणून नाही याची आपल्याला जाणीवच नसते. एका वृत्तपत्राने लिहिले आहे, “अरबी प्रजेकरिता गांधीजींनी आचरणात आणून दाखवलेला एकमेव मार्ग सत्य आणि अहिंसेचा आहे. मी तर इथपर्यंत म्हणेन की संपूर्ण जगाची मुक्ती गांधीवादात आहे. आणि लवकर म्हणा की उशिरा म्हणा जगाला या मार्गाचा स्वीकार करावाच लागेल. . . हिंसेतून सुटण्याचा आणि जगाला सोडवण्याचा एकमेव मार्ग अहिंसेचा आहे अरबांच्या पुढाऱ्यांनी याचा विचार केला पाहिजे.” अरबाचे पुढारी हे शब्द कुठे वाचणार आहेत?

दुसऱ्या एका वृत्तपत्रात साहित्य परिषदेतील भांडणांविषयी असे उद्गार आहेत, “परिषदेच्या घटनेत शिळेप्रमाणे घट्ट बसलेल्यांना परिषदेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न जणू तुकडे-तुकडे करून त्याची भुकटी करण्यासारखा आहे. याचा अर्थ संविधानाच्या किल्ल्यात बसलेली माणसे अजेय आहेत. आणि नंतर या व्यक्तींनाही तसेच वाटू लागते. ही तर मानसशास्त्राची अगदी सरळ गोष्ट आहे. जणू ते म्हणताहेत : 'अरे पोरांनो, आम्हांला आदेश द्यायला तुम्ही कोण? या, हिंमत असेल तर आम्हांला इथून उखडून टाका. पठाणांना बोलावून तुम्ही आम्हांला हाकलू शकाल, पण संविधानपूर्वक आम्हांला हटवण्याबद्दल बोलणे हे तर तुम्हांला खडीसाखर खाण्यासारखे वाटते! इत्यादी.”

काय ही भाषा आणि काय हा अवडंबर ! या दोन्ही उताऱ्यांमधील व्याकरण आणि अक्षरे तर मी सुधारून छापले आहेत. ते म्हणतात की गुजराती टाईपमध्ये शब्द अचूक लिहिणे कठीण जावे. हीच अडचण हिंदीत आणि मराठीत नाही काय? आपणच असे का लिहावे, “तमारे हिंदी खेडूत अने मजूरने हरदयमां उतरवुं पडशे.” आणि “समाजवाद तो पद्धती प्रत्ये ज घरूणा जगवे छे” असे लिहावे? मराठी आणि हिंदी वर्तमानपत्रात ‘हृदय’ आणि ‘घृणा’ छापायची अडचण का जात नाही?’ माझ्याजवळ दोनतीन हिंदी आणि मराठी वर्तमानपत्रे पडून

आहेत. त्यांतील अग्रलेख नियमितपणे सुरू असतात. त्यांची भाषा उत्कृष्ट असते. शब्दांतील अक्षरांची वा भाषेच्या व्याकरणाची कुठेही अडचण जात नाही. उतारा देण्याची इच्छा होते परंतु तुमच्यावर अधिक अत्याचार करावासा वाटत नाही.

असे जरी असले तरी मी आधीच सांगितल्याप्रमाणे आपण गत पंधरा वर्षांत बरीच प्रगती केली आहे. वर्तमानपत्रांशी संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला पूर्वी कधीही नाही इतकी आपली जबाबदारी कळते, आणि वाचकांना माहिती आणि ज्ञान देण्याकरिता आता ते अधिक चांगला प्रयत्न करू लागले आहेत आणि पूर्व तयारीसुद्धा जास्त करतात.

परंतु अजून बरेच लांब अंतर कापायचे राहिले आहे. त्यांच्याकडे जसे रसेल, प्राईस, ब्लोविट्झसारखे बातमीदार आहेत तसे आपल्याकडे नाहीत. स्पेंडर, गार्डीनर गार्विन क्रिसफर्ड, लास्की सारखे नित्याच्या विषयावर आणि प्रश्नांवर प्रकाश पाडणारे अभ्यास आणि मननचिंतन करून लेख लिहिणारे फार लेखक नाहीत. स्टेड आणि शीन सारखे मुलाखत घेणारे नाहीत.

यांच्यामुळे आपल्या सुशिक्षितांनी वृत्तविवेचन हा एक पवित्र आणि गंभीर व्यवसाय बनवला पाहिजे. आज तर 'जेव्हा अफवांचा बाजार अनुकूल असेल तर वर्तमानपत्र काढा.' किंवा 'जेव्हा काळ खूप अनुकूल आहे तेव्हा वर्तमानपत्र काढा' अशी गोष्ट आहे. यामुळे वर्तमानपत्रे आणि मासिके जिथेकुठे निघत असतात तिथे ते थोड्याच दिवसात लुप्त होत असतात.

परंतु आपल्या थोड्याशाच परंतु समर्थ लेखकांनी हा पवित्र व्यवसाय केला तर आपण वर्तमानपत्राला कमाईचा व्यवसाय करू शकू. हा असा व्यवसाय आहे की ज्यांच्यात शक्ती आणि प्रतिभा आहे. त्यांचा मुख्य व्यवसाय वेगळाच आहे. रामनारायण पाठकसारखे लोक आपल्या स्वैरविचारांचा एकेक लेख एखाद्या विशेष दैनिकाला वा साप्ताहिकाला देत असतात. गगनविहारी महेतासारखे आपल्या उपरोधपूर्ण भाषेचा लाभ नित्य नियमितपणे जसा देत असतात; जसा रॉबर्ट लिंड (वाय. वाय.) 'न्यू स्टेट्समन'ला वा 'नेशन'ला देत असतात; काकासाहेब आणि किशोरीलालभाईंसारख्या समर्थ विचारवंतांचा थोडा वेळ वृत्तविवेचनालासुद्धा मिळत गेला; जर गुजरात विद्यापीठात परिपक्व झालेले उमाशंकर जोशी, सोमाभाई भावसार, श्रीधराणीसारख्या प्रतिभावंत कवींनी आणि इतर कवित्वशक्ती असलेल्या लोकांनी गावांच्या सेवेकरिता आपल्या शक्तीचा उपयोग करून आपल्या दैनिकांना आणि साप्ताहिकांना त्याचा लाभ जर ते देत गेले आणि गावामध्ये राहून जे

लोक काम करून राहिले आहेत त्याच्याकडून लेख मिळवत गेले तर आपल्या वर्तमानपत्रांमध्ये अधिक वैविध्य आणि समृद्धी येईल. आणि असे जर झाले तर चिरंजीवी जरी नाही तरी क्षणजीवी परंतु सुवाच्य साहित्य आपण गुजराती जगताला देऊ शकू. आपल्या कामकाजातून निवृत्त झालेले आपले समर्थ विद्वान आनंदशंकरभाईसारखे आणि बळवंतराव सारख्याउदयमान लेखकांनी आपल्या जवळपासच्या लोकांना जर प्रशिक्षण दिले तर परिस्थितीत भरपूर सुधारणा होईल.

हे सर्व करण्याकरिता साहित्य परिषद काय आणि किती करू शकते याची मला कल्पना नाही. यावर विचार करण्याचे काम आपणा सर्वांचे आहे. जाहिरातींची आणि इतर प्रकारची घाण दूर करण्याचे काम बिकट आहे. यांत जे दोष आहेत त्यात चांगलेचांगले फसलेले आहेत हे याचे कारण आहे. 'सागरालाच जर आग लागली तर ती कोण विझवू शकेल?' सारखी ही गोष्ट आहे.

[१९३६ साली गुजराती साहित्य परिषदेच्या बाराव्या अधिवेशनात पत्रकारत्व विभागाचे अध्यक्ष म्हणून महादेवभाईंनी दिलेले वक्तव्य.]

# परिशिष्ट ४ - गांधीजी आणि देशी राज्ये

१४ एप्रिल १९३६ला गांधीजींना लखनौ येथे जे लोक भेटले त्यात श्री बळवंतराय महेता आणि अमृतलाल शेठ हेसुद्धा होते. त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चेचा विषय तर देशी राज्यातील स्वातंत्र्यसंग्राम कसा चालवावा हाच होता. प्रजापरिषदांनी राजांच्या विरुद्ध केव्हा सत्याग्रह करावा, देशी राज्यांना बाहेरून काँग्रेसला कशा प्रकारे मदत करावी हाच होता. गांधीजींचे मत वेगळे होते. त्याच काळात भरलेल्या काँग्रेसच्या ४८व्या अधिवेशनात देशी राज्यांसंबंधी एक ठराव मंजूर झाला होता. त्यात 'नैसर्गिक परिस्थितीला अनुसरून' या शब्दांऐवजी 'सामान्य पद्धतीने' हे शब्द टाकायला नकार देण्याच्या बाजूने राजेंद्रप्रसाद आणि जमनलाल बजाजसुद्धा होते. या ठरावाच्या शेवटच्या वाक्यात 'दे व्हेरी नेचर ऑफ द थिंग्ज' हे शब्द होते.

### हिंदुस्थानी संस्थाने

"१९२८ साली कलकत्ता येथील अधिवेशनात संस्थानांसंबंधी जो ठराव मंजूर करण्यात आला होता त्याला काँग्रेस पुन्हा एकदा मान्यता देते आणि ऑक्टोबर १९३५ मध्ये मद्रास येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात मांडलेल्या धोरणांनाही अनुमोदन देते. काँग्रेसला स्पष्टपणे सांगावेसे वाटते की तिच्या मते संस्थानांतील जनतेलाही उर्वरित हिंदुस्थानातील जनतेप्रमाणेच स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळाला पाहिजे, तसेच देशातील प्रत्येक भागातील जनतेला तेच राजकीय, नागरी आणि लोकशाहीवादी स्वातंत्र्य लाभले पाहिजे. असे असले तरी काँग्रेस निदर्शनास आणून देऊ इच्छिते की संस्थानांतील स्वातंत्र्यसंघर्ष हा तेथील लोकांनीच स्वतः चालवला पाहिजे."

[The Indian States

The Congress, while re-affirming the resolutions regarding Indian States passed in the Calcutta Session of 1928 and expressing its approval of the policies laid down in the statement issued by the A.I.C. C. in Madras in October 1935, desires to make it clear that, in its opinion, the people of the states should have the same rights of self-determination as those of the rest of India, and that the Congress stands for the same political, civil and democratic liberties for every part of India. The Congress however desires, to point out that the struggle for liberties within

the states has, in nature of things, to be carried on by the people of states themselves.]

या चर्चेदरम्यान गांधीजींचे जुने विचार काय होते, आताही ते कायम आहेत काय, तसेच वस्तुस्थिती पाहता व्यवहारात काही बदल केला पाहिजे काय यासंबंधीचीही चर्चा झाली. ६ फेब्रुवारी १९१६ ला बनारस हिंदू हिंदू विद्यापीठाच्या प्रांगणात श्रीमती ऍनी बेझंट आणि श्री मदनमोहन मालवीय यांच्या उपस्थितीत गांधीजींनी व्हाईसराय आणि नरेशांना उद्देशून जे भाषण केले होते त्याचासुद्धा चर्चेत उल्लेख झाला होता. हे भाषण पूर्ण होते न होते तोच नरेश उठून निघून गेले होते.

ते भाषण पूर्ण केल्यानंतर सभाध्यक्ष दरभंगाचे महाराजाधिराजांनी लिहिलेले पत्र, आणि ९ तारखेला दुपारनंतर मुंबईला पोहोचून असोसिएटेड प्रेसला दिलेल्या मुलाखतीत जे सांगितले होते ते 'अक्षरदेह'च्या तेराव्या खंडाच्या पृष्ठ १९३ते २०१वर जे आहे. ते इथे उद्धृत करत आहे -

बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटन प्रसंगी ६ फेब्रुवारी १९१६ ला दिलेल्या भाषणाचा संपूर्ण पाठ. या पाठाचे संपादन जी. ए. नटेसनसाठी गांधीजींनी केले होते. त्याविषयी त्यांनी लिहिले होते की -

मी यातील असे काही शब्द काढून टाकले आहेत की जे छापलेले भाषण वाचण्यात अडथळा आणत होते.

## बनारस हिंदू विद्यापीठाच्या सभेत दिलेले भाषण

फेब्रुवारी ६,१९१६

मित्रहो, इथे पोहोचत असताना रस्त्यात मला फार वेळ लागला. याकरिता मी तुमची नम्रतापूर्वक क्षमा मागतो. या उशिराकरिता तुम्ही मला आनंदाने माफ कराल कारण या उशिराकरिता ना तर मी स्वतः जबाबदार आहे ना कोणतीही मानवी शक्ती. (हशा) खरे सांगायचे तर मी पिंजऱ्यातील एक जनावर आहे आणि माझी अत्यधिक प्रेमामुळे काळजी घेणारे लोक जीवनाचा एका महत्त्वाचा पैलू म्हणजे शुद्ध योगायोगाची गोष्ट विसरून जातात. आजही आम्हा लोकांना, मला, माझ्या निरीक्षकांना आणि मला उचलून चालणाराला

एकानंतर एक ज्या दुर्घटनेचा सामना करावा लागला होता त्याची पूर्वकल्पना करून कोणतीही तरतूद करण्यात आलेली नव्हती. यामुळे इतका उशीर झाला.

मित्रहो, नुकताच भाषण देऊन ज्या भगिनी (बेझंट) बसल्या आहेत त्यांच्या अद्भुत वाक्शक्तीच्या प्रभावात येऊन तुम्ही लोक यावर विश्वास ठेवू नका की जे विद्यापीठ अजून पूर्ण बनून तयार झालेही नाही ते कोणती तरी परिपूर्ण संस्था आहे आणि अजून जे विद्यार्थी आलेलेही नाहीत ते इथे शिकून एका महान साम्राज्याचे नागरिक होऊन निघालेले आहेत. तुमच्या मनावर असा कोणताही ठसा उमटवून तुम्ही इथून जाऊ नका. आणि आज मी ज्यांच्यासमोर बोलतो आहे त्या विद्यार्थीवर्गाने तर क्षणभराकरिताही या गोष्टीला मनात स्थान देऊ नये की ज्या आध्यात्मिकतेकरिता या देशाची ख्याती आहे ज्या बाबतीत कोणीही त्याच्याशी समतुल्य नाही त्या आध्यात्मिकतेचा संदेश अतिशयोक्ती करून सांगितला जाऊ शकतो. तुम्हांला जर असे काही वाटत असेल तर कृपाकरून माझ्या या गोष्टीवर विश्वास ठेवा की तुम्ही हा जो विचार करत आहा तो चूक आहे.

मला आशा आहे की कधी ना कधी हिंदुस्थान हा संदेश जगाला देईल; परंतु केवळ शब्दांतून हा संदेश कधीही दिला जाऊ शकत नाही. मीसुद्धा अनेक भाषणांचा आस्वाद घेतला आहे. मला भाषणांचा आणि युक्तिवादांचा कंटाळा आलेला आहे. असे जरी असले तरी गत दोन दिवसात इथे जी भाषणे देण्यात आली आहेत ती या वर्गातील आहेत असा माझा विश्वास नाही. कारण ते आवश्यक होते. असे जरी असले तरी मी हे सांगण्याचे धाष्टर्य करतो आहे की आम्ही भाषण देण्याच्या कलेत जवळपास शिखरावर पोहोचलेलो आहो. आपल्या कानांना खाद्य मिळणे आणि आपल्या डोळ्यांना खाद्य मिळणे इतकेच पुरेसे नाही. आपल्या हृदयाचेसुद्धा पोषण व्हायला पाहिजे, आणि आपले हातसुद्धा चालायला पाहिजे. गेल्या दोन दिवसांत आपल्याला असे सांगण्यात आले आहे की हिंदुस्थानींच्या जीवनातील साधेपणा टिकवून ठेवायचा असेल तर आपल्या हातापायांच्या आणि मनाच्या गतीत सामंजस्य आणले पाहिजे. त्यांचा सूर एक असणे आवश्यक आहे.

परंतु हे तर प्रास्ताविक झाले. मी सांगू इच्छितो की मला या पवित्र शहरात, या महान विद्यापीठाच्या प्रांगणात माझ्याच देशात माझ्याच देशबांधवांशी विदेशी भाषेत बोलावे लागत आहे. ही गोष्ट आपल्या प्रतिष्ठेकरिता अतिशय लज्जास्पद गोष्ट आहे. गेल्या दोन दिवसात जी भाषणे झाली त्या लोकांची जर परीक्षा घेण्यात आली आणि मला जर त्यांचे परीक्षक नेमण्यात आले तर निश्चितच बहुतेक लोक अनुत्तीर्ण होतील.

का? कारण त्यांची भाषणे तुमच्या हृदयाला स्पर्श करू शकली नाही. मी गत डिसेंबरमध्ये राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनाला उपस्थित होतो. तिथे किती तरी अधिक प्रमाणात लोक उपस्थित होतो. तुम्हांला नवल वाटेल की उपस्थित असलेले सर्व श्रोते केवळ त्याच भाषणांनी प्रभावित झाले होते जी भाषणे हिंदीत दिली गेली होती. लक्षात ठेवा की ही सर्व भाषणे मुंबईत झाली होती. मुंबईच्या भाषेत आणि हिंदीत तितके अंतर नाही जितके इंग्रजी आणि हिंदुस्थानच्या प्रादेशिक भाषांमध्ये आहे. यामुळे तेथील श्रोत्यांना हिंदील भाषणे अधिक चांगले समजले आणि त्यांच्या हृदयाला ते अधिक निकटचा स्पर्श करू शकले. मी अपेक्षा करतो की या विद्यापीठात विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल. आमची भाषा हे आमचे प्रतिबिंब आहे आणि म्हणून तुम्ही जर असे म्हणत असाल की आमच्या भाषेत उत्तम विचार अभिव्यक्त करता येऊ शकत नाहीत तर मी म्हणेन की आपला नाश जितक्या लवकर होईल तितके बरे. हिंदुस्थानची राष्ट्रभाषा इंग्रजी व्हावी असा विचार करणारा कोणी आहे काय?

जनतेवर हे ओझे का टाकायला पाहिजे? थोडा विचार करा की किती विषम परिस्थितीत आपल्या मुलांना इंग्रज मुलांबरोबर पळावे लागत आहे? पुण्यात काही प्राध्यापकांबरोबर माझी चर्चा झाली. त्यांनी सांगितले की प्रत्येक हिंदुस्थानी मुलाला इंग्रजीतून शिक्षण घ्यावे लागत असल्यामुळे त्याच्या जीवनाचे कमीतकमी अमूल्य सहा वर्ष वाया जातात. आपल्या शाळांमधून वा कॉलेजमधून जी मुले बाहेर पडतात त्या विद्यार्थ्यांच्या एकूण संख्येला सहाने गुणले तर तुम्हा कळेल की जनतेचे किती हजार वर्षांचे नुकसान होत असते. आपल्यावर असा आरोप करण्यात येत असतो की आपल्यामध्ये सुरुवात करण्याची शक्ती नाही. आपल्याला जीवनातील अमूल्य वर्षे एक विदेशी भाषा आत्मसात करण्याकरिता द्यावी लागत असतात. मग आपल्यामध्ये ही शक्ती कशी काय असू शकेल? आणि इतके असून आपल्याला इंग्रजी भाषेवर हवे तसे प्रभूत्व मिळवता येऊ शकत नाही. काल श्री हिगिनबॉटमनी श्रोत्यांना जितके प्रभावित केले तितके दुसरा कोणताही वक्ता करू शकला काय? माझ्या आधी जे वक्ते बोलले ते श्रोत्यांना जिंकू शकले नाही. यात त्यांचा दोष नव्हता. त्यांच्या भाषणात मुद्दे तर भरपूर होते. परंतु त्यांचे शब्द आपल्या अंतःकरणार शिरू शकले नाही.

असे म्हणण्यात येत असते की ते काहीही असले तरी आपल्या जनतेला मार्गदर्शन करण्याचे काम हिंदुस्थानातील विचारवंत वर्गच करत असतो. देशाकरिता तेच सर्व काही करत आहेत. जर याच्या विपरीत गोष्ट असती तर परिस्थिती अजूनच भयानक झाली असती. याचे कारण आम्हांला शिक्षणाच्या नावावर केवळ इंग्रजीचेच शिक्षण मिळते. शिक्षणाचा काही ना काही लाभ तर होतच असतो. परंतु कल्पना करा की गत

पन्नास वर्षात आपल्याला देशी भाषांमधूनच शिक्षण देण्यात आले असते तर आपण कोणत्या परिस्थितीत असतो? असे झाले असते तर आज आपला हिंदुस्थान स्वतंत्र झालेला असता. आपल्याजवळ आपले शिक्षित लोक असते. आणि ते आपल्याच भूमीत विदेशी लोकांसारखे राहिले नसते. उलट ते देशाच्या हृदयाला स्पर्श करणारी भाषा बोलले असते. ते आज गरिबात गरीब लोकांमध्ये काम करताना दिसले असते आणि गत पन्नास वर्षात त्यांनी जे काम केले असते तो आपल्या संपूर्ण देशाचा वारसा झाला असता. आज आपल्या स्त्रियासुद्धा आपल्या उत्तम विचारात भाग घेऊ शकत नाही. प्राध्यापक बोस आणि प्रा. रॉय (प्रा. जगदीश चंद्र बोस आणि प्रा. प्रफुल्ल चंद्र रॉय) यांच्या शोधांचा विचार करा. त्यांनी लावलेले शोध आज जनतेची सार्वजनिक संपत्ती होऊ शकली नाही ही लाजेची गोष्ट नाही काय?

आता आपण दुसऱ्या विषयाकडे वळू.

काँग्रेसने स्वराज्याचा ठाव मंजूर आहे. आणि मी आशा करतो की अखिल हिंदुस्थान काँग्रेस समिती आणि मुस्लिम लीग आपले कर्तव्य करतील. त्याकरिता काही व्यावहारिक सूचना देतो. परंतु मनमोकळेपणाने मी कबूल केले पाहिजे की जे काही ते करतील त्यात मला इतका रस नाही. मला तर विद्यार्थी आणि जनता काय करते यात खरा रस आहे. लेखनाने आपल्याला कधीही स्वराज्य मिळणार नाही. कितीही जरी भाषणे दिली तरी ती आपल्याला स्वराज्याकरिता पात्र करू शकत नाही. आपले चरित्रच आपल्याला स्वराज्याकरिता पात्र ठरवील, स्वतःवर राज्य करण्याकरिता आपण कोणते प्रयत्न केले पाहिजे? माझी इच्छा आहे की आज सायंकाळी आपण यासंबंधी विचार करायला पाहिजे. मला भाषण करण्याची इच्छा नाही आणि आज सायंकाळी मी स्पष्टपणे बोलत असल्याचे जर तुम्हांला जाणवत असेल तर असे समजा की मी भाषण करत नसून तुम्हा सर्वांना ऐकू जाईल अशा प्रकारे विचार करतो आहे. आणि तसे करताना जर मी विवेकाचा भंग करत असेन तर त्याकरिता मला क्षमा करा.

काल सायंकाळी मी विश्वनाथ महादेवच्या मंदिरात गेलो होतो. मी जेव्हा तेथील गल्ल्यांमधून जात होतो तेव्हा माझ्या मनात अशा प्रकारचे विचार आले - या महान मंदिरात जर एखादा अज्ञात माणूस अकस्मात वरून उतरला आणि तो जर आम्ही हिंदू कशाप्रकारचे लोक आहो याबद्दल विचार करू लागला आणि त्याने आपल्याबद्दल जर कोणते तरी क्षुल्लक जरी असले तरी मत बनवले तर ते चुकीचे होईल काय? हे महान मंदिर आपल्या स्वतःच्या चरित्राचे प्रतिबिंब नाही काय? हिंदू म्हणून मला जे काही जाणवते ते मी बोलतो. आपल्या पवित्र मंदिराच्या आसपासच्या गल्ल्या इतक्या घाणेरड्या आहेत हे काय योग्य आहे? त्याच्या

आजूबाजूच्या गल्ल्या अरुंद आणि वाकड्यातिकड्या आहेत. आपली मंदिरेही जर विशाल आणि स्वच्छतेचे आदर्श नसतील तर आपल्याला स्वराज्य कसे मिळू शकेल? जर अशी वेळ आली की इंग्रजांना स्वतःहोऊन वा नाईलाजाने बाडबिस्तरा घेऊन जावे लागले तर तेव्हाच आपली मंदिरे पावित्र्याचे, शुद्धतेचे आणि शांततेचे स्थान होतील काय?

स्वराज्य मिळण्याआधी आम्हांला फार जास्त मेहन करावी लागेल या काँग्रेसच्या अध्यक्षाच्या मताशी मी सहमत आहे. प्रत्येक शहरात दोन भाग असतात. एक छावणीजवळचा भाग आणि दुसरा मूळ शहराचा. मूळ शहर तर बऱ्याचशा प्रमाणात घाणीचे आगरच समजा. आपण शहरी जीवनाशी अपरिचित नाही. परंतु आपल्याला जर शहरी जीवनाची इच्छा वा आवश्यकता वाटत असेल तर आपण त्याला लहरी आणि बेफिकीर ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब करू शकत नाही? मुंबईत ज्या गल्ल्यात हिंदुस्थानी राहतात तिथे अनेक मजली घरात राहणारा कोणी आपल्यावर वरून थुंकणार  तर नाही ना अशी भीती तिथून चालणाराला वाटत असते. असा विचार मनात येणे ही तर काही चांगली गोष्ट नाही !

मी रेल्वेने बराच फिरत असतो. तिसऱ्या वर्गातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होणाऱ्या त्रासाकडे माझे लक्ष जात असते. परंतु या सर्व गोष्टींची जबाबदारी अधिकाऱ्यावर तर टाकता येत नाही. स्वच्छतेचे प्राथमिक नियमसुद्धा आपण पाळत नाही. रेल्वेच्या डब्यातील खालच्या जागेवरही अनेगदा लोक झोपत असतात. हे माहीत असतानाही कोणताही विचार न करता आपण डब्यात वाटेल तिथे थुकत असतो.

डब्याचा वाटेल तसा उपयोग करतानासुद्धा आपण थोडासुद्धा विचार करत नाही. यामुळे वर्णन करता येऊ नये इतकी घाण डब्यात होत असते. ज्यांना आपण उच्चवर्गीय समजतो ते खालच्या वर्गातील लोकांना घाबरवून सोडत असतात. असे करताना आपण विद्यार्थ्यांनासुद्धा पाहतो. अनेकदा तेसुद्धा आपल्या गरीब सहप्रवाशांसोबत चांगले वर्तन करताना आढळत नाही. ते इंग्रजीत बोलतात, जॅकेट घालतात आणि डब्यात बळजबरीने शिरून गरीब बिचाऱ्या प्रवाशांना दरडावून बसण्याची जागा मिळवण्याचा प्रयत्न करतात. मी प्रत्येक काळोख्या कोपऱ्यात मशाल पेटवू पाहिले आहे आणि तम्ही मला बोलण्याची संधी दिलेली असल्यामुळे माझे अंतःकरण तुमच्यासमोर उघड करतो आहे. स्वराज्याकडे प्रगती करण्याकरिता आपल्याला निश्चितच या गोष्टीत सुधारणा करावी लागेल.

आता मी तुमच्यासमोर एक वेगळेच चित्र उभे करतो.

काल आपल्या सभेचे अध्यक्ष नामदार महाराज हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयी बोलले होते. इतर वक्त्यांनीसुद्धा यावर बराच भर दिला होता. परंतु शामियान्यात नामदार व्हाईसरायच्या हस्ते शिलान्यास सुरू होते. तेव्हा तिथे आपण काय पाहिले? एक असा भडक देखावा, दागिन्यांचे प्रदर्शन. ते दागिन्यांचे असे प्रदर्शन होते की पॅरीसहून इथे आलेल्या सगळ्यात मोठ्या जोहरीचे डोळेसुद्धा आश्चर्याने दिपावे. मी जेव्हा दागदागिन्यांनी नटलेल्या श्रीमंतांची गरिबांशी तुलना करतो तेव्हा मला या अमीरउमरावांना सांगावेसे वाटत असते की 'जोपर्यंत तुम्ही तुमचे दागदागिने उतरवणार नाही आणि गरिबांना जवळचे समजून त्यांची काळजी तुम्ही घेत नाही तोपर्यंत हिंदुस्थानचा उद्धार होणार नाही'. मला खात्री आहे की नामदार शहेनशाहची वा लॉर्ड हार्डिंग्जची अशी इच्छा नसेल की आपल्या नामदार शहेनशहाला त्यांच्याबद्दलची निष्ठा दाखवण्याकरिता आपण आपल्या दागदागिन्यांची तिजोरी रिकामी करून पायापासून तर डोक्यापर्यंत स्वतःला शृंगारून बाहेर पडायला पाहिजे. मी माझ्या जीवाची जोखीम पत्करूनसुद्धा बादशहा पंचम जॉर्जना असे काहीही नको आहे असा त्यांचा संदेश आणून द्यायला तयार आहे.

हिंदुस्थानच्या कोणत्याही मोठ्या शहरात, मग ते शहर ब्रिटिश हिंदुस्थानात असो की आपले देशी राजे अंमल करत असलेल्या हिंदुस्थानात असो. ते जेव्हा मोठा महाल बांधत असल्याचे मी ऐकतो तेव्हा मला फार दुःख होते. आणि मी विचार करू लागतो की "हा पैसा तर बिचाऱ्या गरीब शेतकऱ्यांकडून आला आहे." श्री हिगिनबॉटम आपल्या मधुर आवाजात आपल्याला संबोधत असताना ते काल सायंकाळी म्हणाले होते की हेच ते लोक आहेत की जे एका दाणा पेरून आपल्या मेहनतीने त्याचे दोन दाणे करत असतात. त्यांच्या मेहनतीचे जवळपास सर्व फळ आपण घेतो वा दुसऱ्याला घेऊ देत असू तर आपल्यामध्ये स्वराज्याची भावना असू शकत नाही. आपली सुटका खेडुतांद्वारेच होऊ शकते. वकील म्हणा की डॉक्टर म्हणा की मोठे जमीनदार म्हणा यांच्याकडून ते काम होऊ शकत नाही.

गत दोनतीन दिवस आपल्याला ज्या उद्देशाने अगत्याने इथे बोलवण्यात आले आहे त्यासंबंधी आता अखेरीस काही बोलणे हे मी माझे आवश्यक कर्तव्य समजतो. ज्या वेळी नामदार व्हाईसराय काशीच्या रस्त्यावरून जात होते तेव्हा आपण फार चिंतातुर झालो असल्याचे सर्वांना जाणवत होते. अनेक ठिकाणी गुप्त पोलीस ठेवण्यात आले होते. आपण घाबरलेलो होतो. आपल्या लोकाबद्दल इतक्या अविश्वासाचे कारण काय असे आपल्याला वाटत होते. अशा प्रकारे मरणांतक दुःख भोगत जगण्यापेक्षा लॉर्ड हार्डींग्जकरिता मरून जाणे श्रेयस्कर झाले नसते काय? परंतु एका बलशाली सम्राटाचे प्रतिनिधी अशा प्रकारे मरूही शकत नाही.

मृतकाप्रमाणे जगणे हेच कदाचित त्यांना आवश्यक वाटत असावे. परंतु आपल्यावर हे गुप्त पोलीस बसवण्याची आवश्यकता काय?

आपण कितीही संतापलेले असू, चिडलेले असू, हातपाय आदळत असू वा जे पाहिजे ते करत असू तरीही हिंदुस्थानात अराजक घटकांच्या उत्पत्तीचे कारण उतावीळपणाचा नशा आहे ही गोष्ट आपण विसरायला नको. मी स्वतःसुद्धा अराजक आहे, परंतु दुसऱ्या वर्गातील. आमच्याकडे अराजकांचा एक असा वर्ग आहे की ज्याला भेटण्याची जर मला संधी मिळाली तर मी त्यांना स्पष्टपणे सांगेन की "बंधूंनो, हिंदुस्थानला जर आपल्या विजेत्यांवर विजय मिळवायचा असेल तर तुमच्या अराजकाला इथे स्थान नाही." हे भित्रेपणाचे चिन्ह आहे. तुमचा जर ईश्वरावर विश्वास असेल, आणि तुम्ही त्याची भीती बाळगत असाल तर मग तुम्हांला कोणालाही घाबरण्याचे काही कारण नाही, मग समोरचा राजामहाराजा असो, व्हाईसराय असो, गुप्त पोलीस असो की शहेनशहा पंचम जॉर्ज असो. कोणालाही घाबरण्याचे काहीही कारण नाही. बंडखोरांचे राष्ट्रावर जे प्रेम आहे ती चांगली गोष्ट आहे अशी माझी मान्यता आहे. बंडखोरांमध्ये आपल्या देशाकरिता प्राणार्पण करण्याची जी जिद्द आहे तिच्यातील शौर्याबदल माझ्या मनात सन्मानाची भावना आहे. परंतु मी त्याना विचारू इच्छितो की कोणाचा जीव घेणे ही काय सन्माननीय गोष्ट आहे? सन्माननीय मरण मिळावे म्हणून खुन्याचा खंजीर हे कितपत योग्य साधन आहे? मी ही गोष्ट स्पष्टपणे फेटाळून लावीन.

कोणत्याही धर्मग्रंथात अशा प्रकारची परवानगी नाही. मला जर असे वाटले की हिंदुस्थानच्या सुटकेसाठी इंग्रजांनी इथून जायलाच पाहिजे, त्यांना हाकलून लावले पाहिजे, तर त्यांनी जायलाच पाहिजे असे घोषित करण्यात मी मागेपुढे पाहणार नाही. माझी खात्री आहे की माझ्या या दृढ मान्यतेकरिता मी मरायलाही तयार होईन; माझ्या मते असा मृत्यूच सन्माननीय मृत्यू असतो. बॉम्ब फेकणारांना गुप्तपणे कटकारस्थान करण्यात आनंद वाटत असतो, त्यांना उघडपणे बाहेर येण्याची भीती वाटत असते, आणि पकडल्या गेल्यानंतर ते आपल्या अयोग्य आणि अतिरिक्त उत्साहाचे परिणाम भोगत असतात. या लोकांचे म्हणणे असते की आम्ही जर असे कटकारस्थान केले नसते, जर आमच्या काही सहकाऱ्यांनी बऱ्याच लोकांवर बॉम्ब फेकले नसते तर बंगभंगाच्या आंदोलनात आपल्याला जे मिळाले ते मिळाले नसते.

श्रीमती बेझंट - 'कृपाकरून हा विषय बंद करा.'

हीच गोष्ट मी बंगालमध्ये सांगितली होती आणि त्या वेळी श्री लायन्स सभेचे अध्यक्ष होते. मला वाटते की मी जे काही सांगतो आहे ते सांगणे आवश्यक आहे. मला जर बोलणे थांबवायचे सांगण्यात येत असेल तर

मी माझे भाषण थांबवीन. (अध्यक्षाकडे पाहून) मी तुमच्या हुकुमाची वाट पाहत उभा आहे. जर तुम्हाला असे वाटत असेल माझ्या या अशा बोलण्याने मी देशाची आणि साम्राज्याची सेवा करून राहिलेलो नाही तर मी निश्चितच बोलणे थांबवीन. ('सुरू ठेवा' असे आवाज.)

अध्यक्ष - कृपाकरून तुमचा हेतू समजावून सांगा.

मी माझा हेतू समजावून सांगतो. परंतु . . . (मध्येच थोडा व्यत्यय.) मित्रहो या गोंधळाने तुम्ही चिडू नका. या सायंकाळी माझे असे बोलणे योग्य नाही असे श्रीमती बेझंटना वाटते. त्यांचे हिंदुस्थानवर फार प्रेम आहे, आणि त्यांना असे वाटते की तुम्हा तरुणांशी असे उघडउघड बोलण्यात मी चूक करतो आहे. असे जरी असले तरी मी इतकेच म्हणेन की माझी इच्छा आहे की हिंदुस्थानमध्ये या दोन्ही पक्षांमध्ये - राजा आणि प्रजामध्ये जे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे ते मला दूर करायचे आहे. आपल्याला जर आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचायचे असेल तर आपल्याला परस्परांवरील प्रेमावर आणि विश्वासावर आधारलेल्या साम्राज्याची आवश्यकता आहे.

आपण आपल्या घरात बसून बेजबाबदारीने हवे ते बोलतो. त्यापेक्षा या महाविद्यालयाच्या छताखाली बोलणे अधिक चांगले नाही काय? असे मी आधीही केले आहे आणि त्याचे उत्तम परिणाम आले आहेत. मला माहीत आहे की अशी कोणतीही गोष्ट नाही ज्याबद्दल विद्यार्थी वादविवाद करत नसतील. अशी कोणतीही गोष्ट नाही की जी विद्यार्थ्यांना माहीत नाही. यामुळे मी स्वतःवरच प्रकाशझोत टाकतो आहे, आत्मनिरीक्षण करतो आहे. मला माझ्या देशाचे नाव अतिशय प्रिय आहे. यामुळेच इथे मी तुमच्याशी विचाराचे आदानप्रदान करतो आहे. तुम्हा लोकांना नम्रतापूर्वक माझी विनंती आहे की आपल्या देशात अराजकाला मुळीच स्थान मिळायला नको. इथे बंडखोरीला स्थान नाही. आपल्या राज्यकर्त्यांना आपल्या राज्यकर्त्यांना जे काही सांगायचे असेल ते मनमोकळेपणाने स्पष्टपणे सांगितले पाहिजे. आणि आपण सांगितल्यामुळे जर राज्यकर्ते नाराज होत असतील तर त्याचे परिणाम सहन करण्याची आपली तयारी असली पाहिजे.

परंतु आपण त्यांच्याबद्दल अपशब्द बोलू नये. ज्या नागरी सेवेवर टीकेचा, निंदानालस्तीचा, भडिमार करण्यात येतो त्याबद्दल मी एका नागरी अधिकाऱ्याशी बोललो होतो. माझे या लोकांशी काही निकटचे संबंध नाहीत, माझ्यात आणि त्यांच्यात काही समानताही नाही. असे जरी असले तरी सौजन्य म्हणून ते माझ्याशी बोलत होते. यामुळे मी त्यांची प्रशंसा केल्याशिवाय राहू शकलो नाही. त्यांनी विचारले, "श्री. गांधी, तुम्हाला

क्षणभर तरी असे वाटते काय की सर्व सनदी नोकर वाईट आहेत? आणि ज्या लोकांवर आम्ही शासन करण्याकरिता आलो आहो त्यांच्यावर आम्ही जुलूम करत आहो?" मी म्हणालो, "नाही, मी असे समजत नाही." त्यावर ते परत म्हणाले, "असे असेल तर तुम्हाला जेव्हा केव्हा संधी मिळेल तेव्हा सनदी नोकरांबद्दल दोन शब्द सांगण्याची कृपा करा."

सनदी नोकरांबद्दल मी जे दोन शब्द बोलणार होतो ते आता इथे सांगणार आहे. मी कबूल करतो की हिंदुस्थानात सनदी नोकरीत बरेच लोक अतिशय अहंकारी, जुलमी आणि अविवेकी आहेत याबद्दल काही वाद नाही. अशा प्रकारची अजूनही किती तरी विशेषणे त्यांना लावता येऊ शकतात. हे सर्व मला मान्य आहे. परंतु इतकेच नाही तर इथे काही वर्षे राहिल्यानंतर ते अजूनच संकुचित मनोवृत्तीचे होतात. परंतु काय दिसून पडते? इथे येण्यापूर्वी ते चांगले लोक होते. आणि इथे आल्यानंतर जर ते नितीभ्रष्ट झेले असतील तर ते आपलेच प्रतिबिंब आहेत. ('नाही' असे आवाज.) तुम्ही थोडासा विचार करा. एक माणूस काल चांगला असेल आणि माझ्या सहवासात आल्यानंतर जर तो वाईट होत असेल तर त्याच्या या अधःपाताकरिता तो जबाबदार असेल की मी? हिंदुस्थानमध्ये ते आल्याबरोबरच त्यांच्या अवतीभोवती खुशामतीचे आणि खोटेपणाचे वातावरण निर्माण होते. या वातावरणामुळे आपल्यामधील अनेक लोक फार कमी किमतीचे होते, आणि होताहेत.

आपल्याला जर स्वराज्य हवे असेल तर ते आपण मिळवले पाहिजे. आपल्याला स्वराज्य कधीही देण्यात येणार नाही. ब्रिटिश जनतेचा इतिहास तपासा. ब्रिटिश जनता स्वातंत्र्यप्रिय आहे. जे लोक स्वतः स्वातंत्र्य मिळवत नाहीत त्यांना ते देण्यात ते कधीही भाग घेणार नाहीत. तुम्हां ंला पटत असेल तर बोअर युद्धापासून तुम्ही शिका. हे लोक काहीच वर्षांपूर्वी साम्राज्याचे शत्रू होते, परंतु आज मित्र झाले आहे.

(इतके बोलल्यानंर गोंधळ सुरू झाला. ॲनी बेझंट उठून निघून गेल्या. त्यांच्याबरोबर अजूनही मोठमोठे लोक निघून गेले. आणि तिथे व्याख्यान संपले.)

बनारसमध्ये विद्यापीठ सप्ताहासंबंधातील व्याख्यानमालेत काल रात्री श्री गांधी बोलत होते त्या वेळी व्हाईसराय बनारसमध्ये होते. त्या वेळी त्यांच्या रक्षणाकरिता उचलण्यात येत असलेल्या प्राथमिक पावलांचा श्री गांधींनी उल्लेख केला. श्री गांधी काय बोलणार आहेत हे स्पष्ट करण्याकरिता त्यांना त्यांच्या भाषणाचा सार थोडक्यात लिहून देण्याकरिता सांगण्यात आले होते. अखेरीस तिथे उपस्थित असलेले सगळे देशी राजे उठून निघून गेले. श्री मदनमोहन मालवीयनी समजावून सांगितले की श्री गांधींना इतकेच सांगायचे होते की

आज काही तरुण चुकीच्या मार्गाला लागून दुष्कृत्याकडे वळत आहेत. ही गोष्ट आपल्याकरिता लाजिरवाणी आहे. त्यांनी असे सांगिल्यानंतर सभेत गोंधळ निर्माण होऊन सभा उधळली गेली.

आजश्री गांधींनी दरभंगाच्या महाराजांना एक खुलासा करणारे पत्र लिहिले. त्यात काल रात्री झालेल्या घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त करत असे लिहिले -

## दरभंगाच्या महाराजांना लिहिलेल्या पत्राचा काही भाग

७ फेब्रुवारी १९१६

नामदार व्हाईसराय यांच्या बनारसला पोहोचण्याविषयी मी जो उल्लेख केला होता त्याचा एकमेव आशय हिंसा आणि अराजकता यांच्याबद्दलची घृणा व्यक्त करणे हाच होता. एक अतिशय उत्तम अंतःकरणाचे व्हाईसराय या पवित्र नगरात आपले खास सन्माननीय पाहुणे म्हणून आलेले असताना त्यांच्या जीवाच्या रक्षणार्थ असाधारण सावधगिरीने पाऊल टाकणे आवश्यक होत आहे हे पाहून मला आणि आपल्यामधील बहुतेक लोकांना या गोष्टीची खूप लाज वाटली होती. माझ्या जीवनाचे ध्येय निश्चितच माझ्या देशाकरिता अधिकात अधिक स्वातंत्र्य मिळवण्याकरिता प्रचार करणे आणि त्यानिमित्ताने होत असलेल्या कामाकरिता मदत करणे आहे. परंतु कोणत्याही माणसाच्या शरीराला इजा पोहोचवणे नाही. आणि त्याकरिता कितीही जरी चिथावणी मिळाली तरीही नाही. माझ्या भाषणाचा आशय नवयुवकांच्या हृदयात ही गोष्ट ठसवण्याचा होता.

## बनारस येथे घडलेल्या 'घटने'विषयी असोसिएटेड प्रेस ऑफ इंडियाला दिलेली मुलाखत

श्री गांधी काल दुपारी बनारसहून मुंबईला आले. बनारस येथील त्यांच्या भाषणात व्यत्यय आल्याची घटना घडल्याचे वृत्त एका वर्तमानपत्राने प्रकाशित केले होते. त्याविषयी प्रश्न विचारला. त्याच्या उत्तरात श्री गांधी म्हणाले की माझ्या कोणत्या शब्दांसंबंधी वाद उपस्थित करण्यात आला होता ते मला माहीत नाही; तसेच श्रीमती बेझंटनीसुद्धा माझ्या भाषणातील वादग्रस्त मुद्द्याचा निर्देश केला नव्हता. त्यांनी तर माझे भाषण

थांबवण्यात यावे अशी अध्यक्षांना विनंती केली होती. त्या दिवशी मी केलेल्या माझ्या भाषणात मी जे बोललो होतो ते कलकत्त्यात माननीय श्री लायन्सच्या अध्यक्षपदाखालील सभेत जे बोललो होतो त्याचीच जवळपास पुनरावृत्ती होती. या प्रसंगी श्रोत्यांनी मला माझे भाषण सुरू ठेवण्याचा आग्रह केला. परंतु मी म्हणालो होते की अध्यक्ष महाराज जोपर्यंत मला पुढे बोलण्याची आज्ञा करणार नाही तोपर्यंत मी पुढे बोलणार नाही. श्रोते श्रीमती बेझेंटनी उपस्थित केलेल्या वादाला विरोध करत होते. त्यांनी तसे करू नये म्हणून मी त्यांची समजूत घातली आणि म्हणालो होतो की एखाद्या व्यक्तीला भाषणातील विचार पटत नसतील तर तिला त्यासंबंधात अध्यक्षांना निर्णय देण्याची विनंती करण्याचा अधिकार असतो.

श्री गांधी पुढे म्हणाले,

दरभंगाच्या महाराजांना मला परवानगी दिली तेव्हाच मी पुढे बोलायला सुरुवात केली. महाराजांनी मला माझे विचार थोडक्यात समजावून सांगण्याची ताकीद दिल्यानंतरच ही परवानगी मला दिली होती. मी बोलायला सुरुवात केली होती. परंतु व्यासपीठावर थोडी चुळबूळ सुरू होती. माझ्या लक्षात आले की श्रीमती बेझंट त्यांच्याजवळ बसलेल्या राजांच्या कानात काही सांगत होत्या. त्या सांगत होत्या की गांधी ना तर आपले शब्द मागे घेत आहे ना त्याचे स्पष्टीकरण करत करत आहे. यामुळे आपण सर्वांनी इथे बसणे योग्य नाही. (न्यू इंडिया, तारीख १० फेब्रुवारी १९१६मध्ये या अहवालाबरोबर श्रीमती बेझंटचे असे निवेदनसुद्धा प्रकाशित केले होते की 'मी राजांना सभा सोडून जायला सांगितले नव्हते') दुसरी जी गोष्ट मी पाहिली ती अशी होती की राजे लोक एकामागून एक उठून जाऊ लागले. यामुळे मी माझे भाषण पूर्ण करू शकलो नाही.

श्री गांधींना जेव्हा असे विचारण्यात आले की तुम्ही सभेत जे बोलला होता त्यांतील काय परत घेण्याची मागणी करण्यात आली होती आणि का? त्यावर श्री गांधी ठासून म्हणाले की मी माझा शब्दंशब्द पूर्ण विचार करून आणि तोलूनमापून बोलत होतो. पुढे जाऊन ते असे म्हणाले -

मी हिंसक प्रवृत्तीला पाठिंबा देईन या गोष्टीची तर कल्पनाही करता येऊ शकत नाही. मी भाषण करण्याकरिता मुळीच तयार नव्हतो. मित्रांच्या अतिशय दबावाला वश झाल्यामुळे मला बोलावे लागत होते. त्यांना वाटत होते की विद्यार्थ्यांवर माझा थोडा प्रभाव आहे. मला आधी हिंसक कृत्यांबद्दल बोलायला सांगण्यात आले होते. याचे कारण दुर्दैवाने काही मुलांनी भावनेच्या भरात हिंसेला आपला सिद्धांत बनवले होते.

त्यांच्या या हिंसेच्या कारणामुळे आपल्या सन्माननीय पाहूण्यांच्या जीवाच्या रक्षणाकरिता असाधारण सावधगिरीचे पाऊल उचलावे लागत असल्याचे लाजीरवाणे दृश्य दिसून पडत होते. माझ्या या संपूर्ण भाषणात कोणत्याही ठिकाणी हिंसेचे समर्थन करणारा एकही शब्द उच्चारण्यात आला नव्हता. हं, भानावर नसलेल्या तरुणांच्या मनातील देशभक्तीच्या भावनेची प्रशंशा मी निश्चितच केली होती. परंतु मी त्यांना स्पष्टपणे सांगितले होते की हिंसात्मक कृत्य अजूनच निंदनीय आहे कारण त्यामुळे जी हानी होईल ती कधीही दूर होऊ शकणार नाही.

खरे पाहता माझ्या संपूर्ण भाषणाचा उद्देश आपल्या स्वतःच्या उणिवांवर प्रकाश पाडणे हा होता. मला असे सांगायचे होते की आपल्या अनेक अडचणींकरिता आपण स्वतःच जबाबदार आहो. माझे स्पष्ट मत आहे की श्रीमती बेझंटनी अधीर होऊन कोणताही विचार न करता हस्तक्षेप केला नसता तर कोणताही गोंधळ झाला नसता, आणि माझे पूर्ण ऐकल्यानंतर श्रोत्यांच्या मनात मला काय म्हणायचे आहे याबद्दल कोणताही संशय राहिला नसता.

श्री गांधींना असा प्रश्न विचारण्यात आला की ही सर्व घटना घडल्यानंतर पंडित मदन मोहन मालवीयनी सभेची माफी मागितली होती हे खरे आहे काय?

श्री मालवीयजींनी सभेत भाषण केले होते हे खरे आहे. परंतु त्यांच्या भाषणात मला क्षमा मागण्याचे कोणतेही चिन्ह दिसले नाही. ते असे मात्र म्हणाले होते की गांधी माझ्या खास आग्रहामुळे बोलले होते. आणि यांचा एकमेव उद्देश हिंसक पद्धती किती आत्मघातक असते हे दाखवून देणे हा होता.

# परिशिष्ट ५ - हरिलालभाई

खंड २७ मध्ये गांधीजींनी त्याचा सर्वात मोठा मुलगा हरिलालभाईंच्या धर्मपरिवर्तनाबद्दल लिहिले होते. याच काळात कस्तुरबांनी हरिलालभाईना आणि मुसलमान मित्रांना संबोधणारे अशी दोन पत्रे लिहिली होती. ती पत्रे श्रीमती वनमाला परीख नी 'अमारा बा'मध्ये (नवजीवन, अमदाबाद १४, १९६९) पृष्ठ ८०-८५ वर दिली आहेत. तिथून ही साभार उद्धृत करत आहे.

**१**

'चि. हरिलाल,

'माझ्या असे ऐकण्यात आले आहे की थोड्याच वेळेपूर्वी मद्रासमध्ये सार्वजनिक मार्गावर दारूमुळे तू खूप गोंधळ घालत असल्यामुळे पोलिसांनी तुला पकडले होते आणि दिवसा तुला दंडाधिकाऱ्यासमोर उभे केले असता तुला त्यांनी १ रुपया दंडाची शिक्षा केली होती. तुझ्याबद्दल त्यांनी इतकी अधिक दया दाखवली यावरून असे वाटते की ते फार सज्जन लोक असले पाहिजे. तुला इतकी नाममात्र शिक्षा करून दंडाधिकाऱ्यांनी तुझ्या वडिलांबद्दलसुद्धा सद्भावना दाखवली आहे. परंतु या घटनेनंतर काय झाले होते हे ऐकल्यानंतर मला तर फारच दुःख होत होते. मला माहीत नाही की रात्री तू एकटा होता की तुझ्या मित्रांबरोबर होता. परंतु तुझे हे वर्तन तर फारच अयोग्य होते.

'तुला काय म्हणावे हे मला सुचत नाही. किती तरी वर्षांपासून तू तुझ्या जीवनावर नियंत्रण ठेवावे अशी विनंती मी तुला करत आले आहे. परंतु तू तर दिवसेंदिवस जास्तच बिघडत चालला आहेस. आता तर मला जगणेसुद्धा कठीण होते आहे. तुझ्या आईवडिलांना त्यांच्या जीवनाच्या सायंकाळी तू किती दुःख देतो आहेस याचा तू थोडा विचार कर.

'तुझे बापूजी कोणाहीसमोर यासंबंधी बोलत नाहीत. परंतु तुझ्या वर्तनाच्या आघातामुळे त्यांच्या अंतःकरणाचा चुराचुरा होत असतो. अशा प्रकारे आमच्या भावना दुखवून तू फार मोठे पाप करतो आहेस. तू आमचा मुलगा म्हणून जन्मलास, परंतु तू शत्रूसारखा वागतो आहेस.

'माझ्या असे ऐकण्यात आले आहे की एवढ्यात तू तुझ्या बापूंवर फार टीका आणि निंदा करायला सुरुवात केली आहे. तुझ्यासारख्या बुद्धिमान मुलाला हे शोभत नाही. तुझ्या बापूजींची निंदा करून तूच उघडा

पडतो आहेस याचे तुला मुळीच भान नाही. त्यांच्या हृदयात तुझ्याबद्दल प्रेमाशिवाय दुसरे काहीही नाही. तुला माहीत आहे की चरित्राच्या शुद्धतेचे त्यांना फारच महत्त्व वाटते. परंतु या सल्ल्याकरिता ते मुळीच जबाबदार नाहीत. आणि असे असतानाही त्यांनी तर तुला सोबत ठेवण्याची, तुझ्या खाण्याची, कपड्यालत्त्याची आणि तुझी काळजी घेण्याची तयारी दाखवली आहे. परंतु तू तर नेहमीच कृतघ्न राहिला आहेस. संपूर्ण जगाच्या त्यांच्यालर किती जबाबदाऱ्या आहेत? तुझ्याकरिता दुसरा कोणीही इतके करू शकणार नाही. परंतु ते तर त्यांच्या या दुर्दैवाकरिता वाईटच वाटून घेऊ शकतात. ईश्वराने त्यांना बलवान इच्छाशक्ती दिली आहे. त्यांच्या जीवनाची आकांक्षा पूर्ण व्हावी म्हणून ईश्वराने त्यांना हवे तितके दीर्घायुष्य द्यावे. परंतु मी तर निर्बल म्हातारी बाई आहे. आणि तू ज्या मानसिक व्यथा निर्माण करतो आहेस त्या सहन करायला मी असमर्थ आहे.

'तुझ्या बापूजींना तुझ्या वर्तनाबद्दल तक्रारी करणाऱ्या अनेक लोकांची पत्रे दररोज येत असतात. बदनामीचे हे सर्व कडू घोट त्यांना प्यावे लागत असतात. परंतु माझ्याकरिता तर तू असे एकही ठिकाण ठेवले नाही जिथे मी जाऊ शकेन. लाजेमुळे मी मित्रांमध्ये म्हण की अनोळखी लोकांमध्ये म्हण वावरू शकत नाही. तुझे बापूजी तर तुला नेहमीच क्षमा करत असतात. परंतु ईश्वर काही तुझ्या वर्तनात सुधारणा करत नाही.

'मद्रासमध्ये तर तू कोणत्या तरी मानमरातब असलेल्या प्रतिष्ठित व्यक्तीकडे उतरला होतास. परंतु तू घर सोडून रस्त्यावर येऊन गैरवर्तन केले आणि पाहुणचाराचा दुरुपयोग केला. तू तुझ्या वर्तनामुळे किती बदनामी करून घेतली आहे? रोज सकाळी मला जेव्हा जाग येते तेव्हा माझ्या हृदयाची धडधड होत असते. आजही वर्तमानपत्रातून तुझ्या गैरवर्तनाची काही ताजी बातमी तर येणार नाही अशी मला दररोज भीती वाटत असते ! मी अनेकदा विचार करत असते की तू कुठे असशील? कुठे झोपला असशील? काय खात असशील? कदाचित तू निषिद्ध पदार्थसुद्धा खात असशील. अशा अशा किती तरी विचारांनी अनेक रात्री मला झोपसुद्धा येत नाही. तुला भेटायची अनेकदा मला इच्छा होत असते. परंतु तू कुठे भेटशील हेच मला माहीत नाही. तू माझ्या पोटी आलेला पहिला मुलगा आहे आणि आता तू पन्नास वर्षांचा झाला आहेस. तू कदाचित माझासुद्धा अपमान करशील अशा शंकेने तुझ्याजवळ यायला मला भीती वाटते.

'तू तुझ्या वडिलांचा धर्म का बदलवलास ते मला कळत नाही. ही तुझी वैयक्तिक गोष्ट आहे. परंतु मी असे ऐकले आहे की तू निर्दोष आणि अज्ञानी लोकांनाही तुझ्या पावलावर पाऊल टाकून चालायचा सल्ला देत असतोस. तुझ्या मर्यादाचे तुला कसे भान नाही? धर्माबद्दल तुला किती ज्ञान आहे? तुझ्या बापूजींचे नाव घेऊन लोक तुला गैरमार्गाने वळवत असतात. तुझ्यात धर्मप्रचार करण्याची लायकी नाही. तू पैशाचा गुलाम

झाला आहेस. जे लोक तुला पैसा देतात ते तुला आवडत असतात. परंतु तू तर दारूत पैसा वाया घालवत असतोस. आणि मग व्यासपीठावरून भाषणे करत असतोस. तू तुझी स्वतःला आणि तुझ्या आत्म्याला इजा पोहोचवतो आहेस. तू जर असेच करत जाशील तर सर्व तुझ्यापासून दूर पळतील. यामुळे विचार करून मी तुला तुझा मूर्खपणा सोडून देण्याची विनंती करते आहे.

'तू तुझा धर्म बदलवला हे मला आवडले नव्हते, परंतु तुझ्या जीवनात सुधारणा व्हावी म्हणून तू जे निवेदन केले होते ते पाहून मी समाधान मानले होते, आणि आता तू ठराविक जीवन जगशील या विचाराने मी मनातून खुश झाले होते. परंतु तू माझी ही आशासुद्धा धुळीत मिळवली. थोड्याच दिवसांपूर्वी मुंबईतील तुझ्या जुन्या मित्रांनी आणि शुभेच्छुंनी तुला आधीपेक्षाही वाईट परिस्थितीत पाहिले होते. तुला माहीत आहे काय की तुझ्या या अशा वर्तनामुळे तुझ्या मुलाला किती दुःख होते आहे? अशे असले तरी तुझ्या या विचित्र वर्तनातून तुला लागलेले शौकाचे ओझे उचलणे तुझ्या मुलीला आणि जावयाला अधिकाधिक कठीण होत चालले आहे.'

## २

हरिलालभाईंच्या धर्म बदलवण्यात आणि त्यानंतरच्या त्यांच्या वर्तनात रस घेणाऱ्या मुसलमान बंधूंना संबोधत बाने लिहिले होते -

"तुमचे काम मी समजू शकत नाही. जे माझा मुलाच्या वर्तनात भाग घेत आहेत त्यांना संबोधूनच मी हे म्हणते आहे. मला माहीत आहे आणि विचार करताना मला आनंद होतो की विचारशील मुसलमान जनतेच्या मोठ्या भागाने आणि आमच्या जीवनभराच्या मुसलमान मित्रांनी ही संपूर्ण घटना मला सांगितली आहे. आज मला महापुरुष डॉ. अंसारींची उणीव फार जाणवते आहे. त्यांनी माझ्या मुलाला तसेच तुम्हाला फार चांगला दिल्ला असता. परंतु असे इतरही अनेक उत्तम लोक पडलेले आहेत आणि मी आशा करते आहे की ते तुम्हाला योग्य सल्ला निश्चितच देतील. धर्म बदलवून सुधारण्याऐवजी माझा मुलगा कुसंगतीत कसा काय पडला आहे असे मला त्यांना विचारायचे आहे. तुमच्या अशा दुष्कृत्यामुळे त्यांच्यावर मला असा ठपका ठेवावा लागतो आहे. आणि तुम्हाला त्यांनी चांगल्या मार्गाने वळवायला पाहिजे. काही लोक तर इथपर्यंत गेले आहेत की माझ्या मुलाला ते मौलवीचे उपनाव देऊ इच्छितात ! हे योग्य आहे काय? तुमचा धर्म दारुड्याला मौलवी म्हणायची परवानगी देतो काय? मद्रासमध्ये याने गोंधळ घातल्यानंतरही याला स्टेशनवर निरोप द्यायला किती मुसलमान गोळा झाले होते !

“मला कळू शकत नाही की अशा प्रकारे याला महत्त्व देताना तुम्हांला कोणता आनंद मिळतो? तुम्ही जर याला सख्या भावाप्रमाणे मानत असाल तर तुम्ही याच्याशी असे वर्तन केले नसते. तुमचे वर्तन याच्याकरिता अगदीच हितकर नाही.

“तुमचा हेतू जगासमोर आम्हांला हास्यास्पद ठरवायचा असेल तर मला तुम्हांला काहीही म्हणायचे नाही. तुमच्याकडून जे काही होईल ते तुम्ही करू शकता.

“परंतु एका जखमी आईचा दुर्बल आवाज तुमच्यावर काहीसा प्रभाव असलेल्या एखाद्या माणसाचे अंतःकरण जागृत करील आणि ते कदाचित तुम्हांला समजावून सांगतील. परंतु माझ्या मुलाला मी जे सांगत आहे ते पुन्हा तुम्हांला सांगणे माझी जबाबदारी आहे — तुम्ही जे काही करत आहा ते खुदाच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही."

# परिशिष्ट ६ - देशी राज्यांबद्दल काँग्रेसचे धोरण

सोमवार तारीख ४ मेच्या 'जन्मभूमी'त सरदार पटेलच्या मुलाखतीचा एक अहवाल प्रकाशित झाला होता. खंड २१ मध्ये गांधीजींनी महादेवभाईंशी यासंबंधी चर्चा केली आहे. शक्य आहे की सरदारनी आपल्या मुलाखतीचे लेखन प्रकाशित होण्याआधी सरळ गांधीजींना पाठवले असेल. कारण मुंबईत ही मुलाखत प्रकाशित झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीच ही चर्चा झाली होती.

देशी राज्यांसंबंधी सरदारचे मत काय आहे त्यात तर गांधीजींचा रस असणारच आहे, परंतु त्याचबरोबर गांधीजींनी त्याचे विश्लेषण इतक्या तटस्थतेने केले की सरदारकडून आपल्या निवेदनात अमृतलाल शेठवर अयोग्य वक्तव्य दिले गेले की काय याचीसुद्धा गांधीजींनी सूक्ष्म चिकित्सा केली.

अमृतलाल शेठचे तीन लेख इथे उद्धृत केले नाहीत कारण खालील जाहीर वक्तव्यात, जे या लेखांच्या उत्तरासारखे आहे त्या लेखात अमृतलाल शेठचेच्या पाचही मुद्द्यांचा समावेश झालेला आहे. सरदारांचे हे उत्तर वाचकांसमोर ठेवत असताना त्याची पार्श्वभूमी समजावी म्हणून 'जन्मभूमी'त एक नोंद प्रकाशित करण्यात आली होती. ती याप्रमाणे आहे -

लखनौ महासभेच्या राजस्थानच्या ठरावाशी संबंधित श्री अमृतलाल शेठच्या तीन लेखांनी फार खळबळ माजवली होती. 'जन्मभूमी'त ही लेखमाला प्रकाशित झाल्यानंतर आमच्या खास प्रतिनिधीने श्री वल्लभभाईंची मुलाखत घेऊन या लेखां ंसंबंधी त्यांचे मत समजून घेण्याचा प्रयत्न केला. सरदार वल्लभभाईंबरोबर झालेल्या या विशेष मुलाखतीच्या दरम्यान सरदारश्रींनी दिलेले उत्तर खाली अक्षरशः उद्धृत केले आहे -

श्री अमृतलाल शेठनी माझ्या मताला विरोध करणारे लेख 'जन्मभूमी'मध्ये लिहिले आहेत. त्यासंबंधात माझ्या उत्तरांची अनेक वर्तमानपत्रांनी मागणी केली आहे. परंतु ज्या प्रकारे अमृतलाल शेठनी हे लेख लिहिले आहेत ते पाहता याचे उत्तर देणे मला योग्य वाटत नाही.

याशिवाय, राणपूरहून 'फूलछाब'ला इतर ठिकाणाहून बातम्या पुरवून माझ्यावर जणू एखादा एकत्रित हल्लाच सुरू करण्यात आला आहे. हे पाहता मला असे वाटते की मला जर या लेखांना उत्तर द्यायचे असेल, तर मीही त्यांच्याप्रमाणेच स्पर्धेत उतरायला पाहिजे.

मी मान्य करतो की माझ्याकडून हे होऊ शकत नाही. इतक्या हलक्या दर्जावर उतरण्यापेक्षा माझ्यावर होणारे हे सर्व प्रहार मौन राहून सहन करणेच उत्तम राहील असे मला वाटते.

मी जर या सर्वांना उत्तर द्यायला बसेन तर यामुळे राजस्थानमधील कार्यकर्त्यांना आणि विशेषेकरून अमृतलाल शेठ आणि त्यांचे सहकारी लोकांच्या नजरेतून किती तरी खाली पाडल्याप्रमाणे होतील.

श्री अमृतलाल सेठ माझे सहकारी आहेत. त्यांची शक्ती जितकी कमी होईल, त्यांचा प्रभाव जितका कमी होईल तितकी माझी शक्ती कमी होईल, माझा प्रभाव कमी होईल असे माझे मत आह. आणि असे केल्याने येथील सार्वजनिक हिताचे नुकसान होईल.

असे जरी असले तरी तुम्ही 'जन्मभूमी'तर्फे माझी मुलाखत मागत असाल तर अमृतलाल शेठनी २७ एप्रिल १९३६ च्या पहिल्या लेखात माझ्या भाषणामध्ये मी जे चार मुद्दे मांडले होते ते मी म्हणालो होतो असे म्हणून ते आपली सुटका करून घेत आहेत. ही गोष्ट मूळ स्वरूपात मी तुम्हाला सांगेन.

पहिली गोष्ट - 'राजस्थानचा मला जितका अनुभव आहे तितका दुसऱ्या कोणालाही नाही.'

खरी गोष्ट ही आहे की मी हे शब्द बोललेलोच नाही.

महासभेच्या प्रतिनिधीला संबोधून मी बोललेलो शब्द असे होते - राजस्थानचा मला जितका अनुभव आहे तितका दुसऱ्या फार कमी लोकांना असेल. हे वाक्य अनेक वर्तमानपत्रातील अहवालांमध्ये आणि 'जन्मभूमी'तसुध्या मी बोललो होतो त्या स्वरूपातच प्रकाशित करण्यात आले आहे. या शिवाय हे वाक्य तोडूनफोडून इतका काही कीस पाडून प्रकाशित करण्यात आले आहे की त्याचा मूळ अर्थ विकृत झाला आहे याचा मला खेद होतो.

असोसिएटेड प्रेस, 'हिंदू', 'क्रॉनिकल' वगैरे वर्तमानपत्राच्या प्रतिनिधींनी पाठवलेल्या माझ्या भाषणाच्या सारातसुद्धा हे वाक्य सुदैवाने त्याच्या मूळ स्वरूपातच आहे.

दुसरी गोष्ट -

'मी'सुद्धा काठियाडमध्ये काम करतो आहे. राजस्थानी प्रजेतर्फे बोलण्याचा दावा मला मान्य नाही.' यात दोन वाक्ये आहेत. यांतील पहिल्या वाक्यात तर एकाच शब्दाचा बदल करून त्याचा अर्थ उलटा करून टाकण्यात आला आहे.

'मी'सुद्धा काठियावाडमध्ये काम केले आहे असे म्हणालो होतो असे जे सांगण्यात येते त्याऐवजी अमृतलाल शेठ काठियावाडमध्ये काम करत असतात असेच मी म्हणालो होतो.

ज्या ठरावाच्या समर्थनार्थ बोलायला मी उभा होतो त्या ठरावावरील माझ्या भाषणाचा अगदी चांगल्यात चांगला ध्वनी निघत होता की मी आणि माझे सहकारी सध्याच्या परिस्थितीत अशक्त होतो. अशा परिस्थितीत 'मीसुद्धा काठियावाडमध्ये काम करत होतो' हे वाक्य माझ्या तोंडून निघूच शकत नाही.

आता तिसरे वाक्य -

'राजस्थानी प्रजेतर्फे बोलण्याचा दावा मी स्वीकारू शकत नाही.' या वाक्यातील माझे मूळातील दोन शब्द काढून टाकून अर्थाचा अनर्थ करण्यात आला आहे.

मी बोललेलो शब्द असे होते -

'राजस्थानानच्या सर्व प्रजेतर्फे बोलण्याचा अधिकार एकट्या अमृतलालचाच आहे हा दावा मी मान्य करू शकत नाही.'

प्रकाशित झालेल्या माझ्या भाषणाच्या अहवालात, 'सर्व राजस्थानींतर्फे' असेच शब्द छापलेले आहेत. यावरून सिद्ध होते की हे वाक्य जाणताअजाणता चुकीच्या स्वरूपात उद्धृत करण्यात आहे.

आणि या वाक्याच्या आजूबाजूचे वाक्य जोपर्यंत वाचणारा वाचणार नाही तोपर्यंत वाचणाराला माझ्या म्हणण्याचा आशय नीट कळणार नाही. माझे उद्गार ज्या परिस्थितीत काढण्यात आले होते तीसुद्धा तुम्हाला सांगण्याची माझी इच्छा आहे.

महासभेच्या ठरावात राजस्थानी प्रजेला मित्राचारपूर्ण नैतिक मदत कॉँग्रेस करू शकते. या गोष्टीवर टीका करताना अमृतलाल अतिशय आवेशात येऊन ठामपणे म्हणाले की अशा प्रकारे मैत्रीच्या भावनेने भरलेली नैतिक मदत आम्हांला नको आहे. त्यांनी अशीसुद्धा जाणीव करून दिली होती की राजस्थानमधील ८ कोटी प्रजेला देण्यात येणाऱ्या मदतीची मला घृणा वाटते. मी तिचा त्याग करतो.

श्री अमृतलाल शेठ असे म्हणाल्यामुळे माझ्या भाषणात याचे उत्तर देत मी म्हणालो होतो -

"श्री अमृतलाल शेठ काठियावाडमध्ये काम करतात. अखिल हिंद राजस्थान परिषद इतर देशी राज्यात काम करते आहे आणि फार चांगले काम करते आहे. असे असल्यामुळे संपूर्ण राजस्थानी प्रजेतर्फे अशा प्रकारे बोलण्याचा त्यांचा दावा मी मान्य करू शकत नाही."

दुसरी गोष्ट -

"अमृतलालचा जन्म देशी रियासतीत झालेला आहे. त्यांचे बहुतेक कार्य ब्रिटिश हिंदुस्थानातच आहे. असे बोलणे ब्रिटिश हिंदुस्थान शिकवत नाही."

माझी पहिली दोन वाक्ये किती तरी विकृत स्वरूपात मांडली आहेत. असे असल्यामुळे यातून कोणीही असा अर्थ काढू शकत नाही की जो माझ्या विरोधात सांगता येईल. या वाक्यांचा तर एवढाच अर्थ आहे की अमृतलालचा जन्म देशी राज्यात झालेला असला तरी त्यांचे सर्व सार्वजनिक कामकाज ब्रिटिश हिंदुस्थानातच होत असते.

परंतु या दोन वाक्यांबरोबर शेवटचे वाक्य जोडण्यात आले आहे. ते तर अगदीच खोट्यापद्धतीने जोडण्यात आले आहे. माझ्या भाषणातील इतरांना उद्देशून मी बोललेलो हे वाक्य इथे जोडून देऊन श्री शेठ असे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत की जणू काय हे वाक्य त्यांच्याच संबंधात आहे.

वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या अहवालावरूनही असेच दिसून येईल की मी तर असे म्हणालो होतो की -

"राजस्थानच्या प्रजेत आज बोलण्याची जी शक्ती आहे ती तर काँग्रसच्या शक्तीचेच प्रतिबिंब आहे."

माझे हे वाक्य श्री अमृतलाल शेठना किती तरी प्रकारे लागू पडते. हे वाक्य ते इतर वाक्यांशी कसे जोडू शकतात हे मला कळू शकत नाही.

चौथी गोष्ट -

"अमृतलाल, अवधेश प्रसाद वगैरे म्हणतात की महासभा देशी राज्यांकरिता काहीही करत नाही. उलट ती राजस्थानी प्रजेशी द्रोह करते आहे. ते महासभेला जबलपूरमध्ये बेईमान म्हणाले होते."

यांतील पहिले वाक्य अगदी बरोबर आहे. आजसुद्धा या दोन्ही भावांचा महासभेच्या विरोधात एकच आरोप आहे की महासभा देशी राज्यांचे काम करत नाही; आणि ते महासभेच्या ठरावात सुधारणा करण्याकरिता इतकी सगळी धडपडही करत आहेत. महासभा देशी राज्यांकरिता काम करत आहे असे जर त्यांना म्हणायचे असते तर या सुधारणा आणण्याचे कारणच नव्हते.

दुसऱ्या दोन वाक्यात शब्दरचनेत बदल आहे ही गोष्ट खरी आहे. खोटे इतकेच आहे की हे उद्गार मी अमृतलाल शेठकरिता नाही तर अवधेश प्रसादकरिता काढले होते.

आणि त्याचे कारण होते -

जबलपूरमध्ये श्री अवधेश प्रसाद म्हणाले होते की राजस्थानी प्रजेला वचन देऊनही महासभेने त्यांच्याशी बेईमानी आणि धोकेबाजी केली आहे. यामुळे अवधेश प्रसादच्या या शब्दांच्या विरोधात माझा पूर्ण विरोध मी जाहीर केलेला होता. आणि त्या अर्थाचा ठराव मी महासभेत सुरुवातीलाच मांडायला लावला होता.

जबलपूरच्या बैठकीनंतर स्वतः बाबू राजेंद्रप्रसादनी यासंबंधात 'मॉडर्न रिव्ह्यू'मध्ये एक लेख लिहून आपले स्पष्टीकरण देऊन माझ्या उद्गाराचे समर्थन केले होते. आणि विषय विचार संमितीनेसुद्धा यासंबंधी उघडपणे जाहीर केले होते की महासभेच्या सध्याच्या ठरावाकरिता अवधेश प्रसादच जबाबदार आहे.

असे असल्यामुळे हा चौथा मुद्दा अवधेश प्रसाद यांनाच लागू पडणऱ्या मुख्य गोष्टी अमृतलाल शेठना लागू पडणाऱ्या गोष्टींशी जोडून  फार मोठा अनर्थ केला आहे.

पाचवी गोष्ट -

"गुजरात-काठियावाडमध्ये सहाशेच्या अंदाजात रजवाडे (संस्थाने) आहेत. आणि तुम्ही सर्व जर यांची मागणी मान्य करत असाल तर हे देशी राज्यवाले लोक तुमच्या मागे लागतील आणि ठीकठिकाणी तुम्हांला यांना मदत करावी लागेल. असे जर झाले तर अशी परिस्थिती निर्माण होईल की आपल्याला ब्रिटिश हिंदुस्थानातील संघर्ष थांबवून देशी राज्यांची लढाई लढावी लागेल."

या पाचव्या गोष्टीची भाषा बदलवून टाकण्यात आली आहे. ती इतकी क्लिष्ट वाटत असली तरी जी गोष्ट मी माझ्या भाषेत सांगितली होती त्याच भाषेत ती सांगितली असती, मूळ भाषेत जर ती सांगितली असती तर माझ्याकरिता टीका करण्याचे काही कारणच राहिले नसते.

गुजरात प्रांतिक समितीच्या सीमेत जवळपास सहाशे रजवाडे आहेत. बऱ्याचशा रजवाड्यात कुठे ना कुठे जुलूम होतच असतो. याबद्दल अमृतलाल शेठना माझ्यापेक्षाही जास्त माहिती आहे.

इतकी सुधारणा जर शेठना मान्य असेल तर या सर्व रजवाड्यांकडे ज्या तक्रारी ऐकणे हे महासभेचे कर्तव्य होऊन जाईल. स्वाभाविकपणेच ते लोक महासभेकडे येतील.

अशा प्रकारे प्रत्येक रियासतीकडून दीड वर्षात जरी एकेक तक्रार आली तरी तक्रारींची संख्या जवळपास सहाशे होईल. आणि एका वर्षातील दिवस ३६५च आहेत. इतक्या तक्रारींपर्यंत पोहोचणे अशक्य होईल. महासभेची शक्ती आणि तिच्या मर्यादा पाहता राजस्थानच्या अंतर्गत कारभारात डोके न घालण्याचे धोरण आजच्या परिस्थितीत उत्तम आहे. आणि काँग्रेसच्या पुढाऱ्यांची शक्ती इतकीच आहे.

अशा प्रकारे पाचही गोष्टी मुळात खोट्या पायावर रचलेल्या आहेत.

माझे भाषण हिंदीत होते. त्याचा सार प्रत्येक वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीनीने त्याच दिवशी पाठवला होता. आणि हा इंग्रजी तारेचा अनुवाद आहे. यामुळे प्रकाशित झालेल्या अहवालात मुळ गोष्टीचा खराखुरा ध्वनी उतरला आहे.

या अहवालाबरोबरच श्री अमृतलालनी तयार केलेल्या साराची तुलना केली तर वाचकाला मूळ भाषणाचा किती अनर्थ करण्यात आला आहे हे कळेल.

तलवारीपेक्षा लेखणी बलवान असते. अमृतलाल ही गोष्ट मानणारांमधील आहे. त्यांच्या लेखणीत जोश आहे. ते म्हणाल्याप्रमाणे गंत पंधरावर्षात गोळा झालेला रोष आज त्यांनी माझ्यावर काढला आहे.

सामान्यपणे जी लेखणी ताजे-शिळे, खरे-खोटे या गोष्टी सारख्याच असतात ती लेखणी रागाच्या भरात काय करू शकत नाही?

श्री अमृतलाल म्हणतात, “मी त्यांचा सरदार नाही.” असे तर ते आज म्हणत आहेत. मी तर कधीचाच म्हणत असतो की मी, अमृतलाल आणि माझे सर्व सहकारी एकाच सरदाराचे शिपाई आहो.

“या सरदाराबद्दल माझी बांधिलकी जशी पूर्वी होती तशीच आजही कायम आहे, आणि ती दररोज वाढतेच आहे.” श्री अमृतलाल शेठ तर राजस्थानच्या संबंधात या सरदारलाही स्वीकारत नाहीत. आणि म्हणूनच त्यांना न्यायनिवाड्याकरिता युरोपपर्यंत जाण्याची आवश्यकता वाटते. श्री अमृतलालच्या अशा मानसिक अवस्थेत ते माझी सरदारकी स्वीकारतील असे मानण्याइतका मी मूर्ख नाही.

श्री अमृतलालच्या लेखात माझ्या सार्वजनिक जीवनाविषयी, राजस्थानच्या प्रकरणाविषयी, काठियावाड परिषदेविषयी, ध्रांगधा सत्याग्रहासंबंधी, पटणीजींकडे आणि रजवाड्यात मी स्वीकारलेल्या पाहुणचारासंबंधी जो उल्लेख आहे त्यासंबंधी काहीही बोलणे मला उचित वाटत नाही.

# परिशिष्ट ७ - टीपा

महादेवभाईंच्या डायरीच्या या ग्रंथात ७७ खंड केलेले आहेत. इतके विभाग वा खंड मूळ हातांनी लिहिलेल्या डायरीत नाहीत. परंतु वाचायला वा समजायला सुलभ व्हावे म्हणून हे खंड आहेत. असे खंड पाडताना काही काही कागद एकत्र केले आहेत. एकच गोष्ट जर डायरीत वेगवेगळ्या ठिकाणी आली असेल तर त्यांचा क्रम बदलवला आहे आणि त्या सर्व नोंदी एकत्र केल्या आहेत. यामागील हेतू हा आहे की गांधीजींचे विचार किती प्रकारे घडत होते आणि ते व्यक्त होत होते हे आपल्याला कळते.

डायरीत निम्मेपेक्षा जास्त लेखन गुजरातीत आहे. ते उद्धृत करताना शक्य तितके मुळाप्रमाणेच असावे हा प्रयत्न राहिला आहे. यामुळे काही ठिकाणी मध्येच जे इंग्रजी शब्द आहेत ते तसेच ठेवले आहेत. बाकीच्या इंग्रजी शब्दांचा, लेखनाचा आणि चर्चेचा गुजरातीत अनुवाद केला आहे. खंडांची संख्या ठळक अक्षरात दाखवली आहे, आणि पानाच्या डाव्या बाजूला असलेले सामान्य अंक डायरीचे पान क्रमांक आहे.

**१.**

१. ८ ते २७ मार्चपर्यंत महादेवभाई दिल्लीत होते. प्रत्येक दिवसाचा कार्यक्रम असा होता. पाहा दैनंदिनी.

सी. पी. स्कॉटचे (१८४६-१९३२) जीवनचरित्र हेमंडनी १९३१ साली लिहायला सुरुवात केली आणि ते १९३४ साली पुस्तकरूपाने प्रकाशित झाले. स्कॉट ५० वर्ष संपादकाच्या पदावर होते, आणि ते १९२९च्या जुलै महिन्यात निवृत्त झाले. इतक्या वर्षात त्याने एकच लेख स्वतःच्या नावाने प्रकाशित केला होता. तोही 'मॅन्चेस्टर गार्डियन'च्या १९२१ साली झालेल्या शताब्दी समारोहाच्या वेळी.

'मॅन्चेस्टर गार्डियन'चे हिंदुस्थानात घडणाऱ्या घटनांसंबंधीचे धोरण समंजस आणि उदारमतवादी होते. १८५५ साली त्यांनी 'दयावान' कॅनिंग याची व्हाईसराय म्हणून जी नियुक्ती झाली होती तिचे स्वागत केले होते. त्या वेळी स्कॉट म्हणाले होते की कॅनिंगला जर हिंदुस्थानी जनतेचा विश्वास संपादन करायचा असेल तर ते हिंदुस्थानातील सुशिक्षित लोकांबरोबर मैत्रीपूर्ण सामाजिक संबंध ठेवतील.

१८५७ च्या बंडाविषयी पहिल्या ऑगस्टला 'गार्डियन'ने लिहिले - "लष्करातील अधिकारी, शिपाई मित्र, सहकारी, साथी आणि सल्लागार होऊन राहण्याऐवजी अनेकदा खोटा भपका दाखवणारे उद्धट आणि मिथ्याभिमानी होऊन राहत असतात. ते लष्करातील नोकरीतून शासनात उच्च पदावर जाऊन बसण्याकरिता आणि शक्य तितक्या लवकर धनाढ्य होण्याकरिता आसुसलेले असतात. यामुळे त्यांना ही पायवाट चांगली वाटते." यानंतर ऑगस्टच्या मध्यात बंडाची कारणे शोधताशोधता 'गार्डियन' लिहितो, "मुत्सद्दी आणि राजकारणी तर धर्मपरिवर्ताच्या धंद्यात फार पडले नाहीत कारण ना तर यांना वेळ होता आणि नव्हती तेवढी शक्ती आणि नव्हती त्यांच्यात ती वृत्ती. परंतु असे वाटते की कर्नल व्हिलर विसरून गेला होते की त्यांना देशसेवक म्हणून काम करायचे आहे. धर्मपरिवर्तनाचे काम पवित्र आणि उदात्त आहे आणि देशी शिपायांच्या तुकड्यांच्या जबाबदार अधिकाऱ्यां ंचे कर्तव्य अगदी वेगळे असते."

१८५७ चे बंड जेव्हा जवळपास शमले तेव्हा १ एप्रिल १८५८ला 'गार्डियन'मध्ये असे लिहिले होते - आपण अपेक्षा केली पाहिजे की जो गुन्हेगार नसतील त्या कोणालाही कोणताही त्रास व्हायला नको. लोकांना निवडून निवडून वेगळे करणे ही सोपी गोष्ट नाही. परंतु लष्कराच्या सेनापतीवर आमचा पूर्ण विश्वास आहे की त्यांनी जसा आपल्या शक्तीचा परिचय करून दाखवला तसेच ते दयाळूपणाचाही आम्हांला अनुभव आणून देतील.

४. ऑक्सफर्ड महाविद्यालयात एक कॉर्पस क्रिस्टी आहे. तिथे स्फोट झाला होता. उद्योगधंद्यात कोणी - या परिच्छेदाची सुरुवात अवतरण चिन्हाने करा.

आर. सी. के एन्सर विद्यापीठात शिकायला गेलेल्यांमधील 'गार्डियन'मध्ये काम करणारे पहिले होते, आणि नियमितपणे लिहीत होते.

५. स्कॉटच्या तीन मुलांचे नाव होते लॉरेन्स, जोव्ह आणि टेड उर्फ एडवर्ड. मॅन्चेस्टरजवळील दाट लोकवस्तीत आणि झोपडपट्टीत राहणारांची सेवा करता करता सोरन्सला क्षय झाला आणि तो स्कॉटची जागा घेऊन संपादक झाला. त्या वर्षीच तो पोहायला गेला असता त्याचा बुडून मृत्यू झाला. स्कॉटच्या जावयाचे नाव सी. इ. मॉनेग्यू होते. त्यांनी अनेक वर्ष 'गार्डियन'मध्ये सपादकीय लेख

लिहिण्याचे काम केले. त्यांची दृढ मान्यता होती की वर्तमानपत्र वाचकांकरिता बाहेर पडत असते आणि पत्रकाराचा हा एकच नवरा असतो. याशिवाय अजून काहीही नाही.

६. वेब उर्फ सिडनी (१८५८-१९४७) आणि त्यांची पत्नी बीट्रिस (१८५८-१९४३) हे मूळ सरकारी अधिकारी होते. समाजसुधारणा, आर्थिक विकास, ओद्योगिक परिवर्तन आणि मजूर संघटनेवर दोघेही लिहीत असत. विलायतेतील प्रख्यात विद्यापीठ 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'चे संस्थापक. दोघेही १८८८साली फेबियन सोसायटीत सामील झाले. नतर 'न्यू स्टेट्समन'या साप्ताहिकाची स्थापना केली.

स्टीफेन योहनिस पालस क्रुगर (१८२५-१९०५) स्वतंत्र ट्रान्सवालचे डच भाषिक अध्यक्ष होते (१८८३-१९०२). सेसिल ऱ्होड्स आणि इंग्रज सरकारमध्ये युद्ध सुरू झाले (१८८८-१९०२).

जेकब एप्स्टाईन (१८८०-१९५८) विलायतेत शिल्पकार. अमेरिकेत रशियन- पोलीश आईवडिलांच्या पोटी जन्म.

रॉबर्ट गेस्काईन सेसिल सोल्झबरी (१८३०-१९०३) विलायतेतील सनातनी विचाराच्या कंझर्वेटिव्ह पक्षाचे पुढारी आणि प्रधानमंत्री (१८८५-८६, १८८६-९२ आणि १८९५-१९०२). विदेशनीती आणि ब्रिटिश साम्राज्यात फार रस घेत असत.

आल्फ्रेड चार्ल्स हार्म्सवर्थ हे व्हिसकाऊंट रॉथमिंचर यांचे भाऊ. या दोघांनी मिळून वृत्तपत्रांची शृंखला स्थापन केली. त्यात दैनिक 'डेली मेल' (१८८६), आणि 'डेली मिरर' (१९०३) हे मुख्य होते. १९०८ मध्ये यांच्या हाती आले.

७. स्टॅन्ली बोल्ड्वन (१८६७-१९४७). ब्रिटनच्या कंझर्वेटिव्ह पक्षाचे पुढाऱी, आणि प्रधानमंत्री, (१९२३-२४, १९२४-२८, १९३२-३७).

८. ख्राईस, डिलन आणि लोबर्न हे स्कॉटचे राजकारणातील मित्र. हे अभ्यासू आणि विद्वान होते.

लेनार्ड हॉब्जहाऊस (१८६४-१९२९), लंडन विद्यापीठात समाजशास्त्राचे पहिले प्राध्यापक.

डेव्हिड लॉईड जॉर्ज (१८६३-१९४५) ब्रिटनचे उदारमतवादी राजकारणी पुढारी. प्रधानमंत्री (१९१६-२२). हे नाणे मंत्री होते. (१९०८-१९२२) वृद्धांकरिता त्यांनी निवृत्ती वेतन आणले. हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये. १९०९ चा अर्थसंकल्प मंजूर होणे कठीण होते. यामुळे राजाकडून हाऊस ऑफ लॉर्ड्सची

संख्या पुरेशी वाढवून घेऊन अर्थसंकल्प मंजूर करवून घेईन अशी धमकी त्यांनी दिली होती. १९११साली बेकारांकरिता विमायोजना सुरू केली.

९. श्रीनिवास शास्त्रींचा कुंभकोणमजवळ वसंनाईमन गावात १९६९ साली जन्म झाला होता. मद्रास येथील ट्रिप्लिकेईनमध्ये येत असलेल्या हिंदू मध्यमिक शाळेत मुख्याध्यापक, १९०८ साली भारत सेवक समाजात सामील. १९१५ साली गोपाळ कृष्ण गोखले यांचा मृत्यू झाल्यानंतर त्याचे अध्यक्ष. काँग्रेसच्या पुढाऱ्यांशी मतभेद झाल्यामुळे १९१८ साली नॅशनल लिबरल फेडरेशनची स्थापना. परिचयाकरिता डायचीच्या १९व्या खंडातील पृष्ठ क्रमांक ३२३ पाहा. मृत्यू १७ एप्रिल १९४६.

८. एलुथिरीओस वेनिझलोल (१८६४-१९३६). ग्रीसचे प्रधानमंत्री १९१०-१९१५, १९१७-२०, १९२४ आणि १९२८. तसेच १९३२. यांनी ग्रीसचा खूप विस्तार केला.

गुग्लेम्यो मार्कोनी (१८७४-१९३७). इटालीमधील भौतिकशास्त्रज्ञ. रेडिओ टेलीग्रॅफीचा विकास केला आणि ऍटलँटिक महासागरापलीकडे संदेश पाठवले (१९०१). १९०९ साली भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषक.

१०. १७६९ आणि १७७२च्या काळात निनावी पत्रे लिहिणारे जुनिअस एसर फिलिप फ्रॅन्सिस (१७४०-१८१८) होते असे समजले जाते. विलायतेत तिसऱ्या जॉर्जच्या मंत्रिमंडळाच्या सदस्यावर आक्षेप घेणारे फ्रॅन्सिस युद्ध कार्यलयात काम करणारे कारकून होते.

थॉमस वुड्रो विल्सन (१८५६-१९२४) अमेरिकेतील डेमॉक्रेटिक पक्षाचे पुढारी आणि युनायटेड स्टेट्सचे २८वे अध्यक्ष (१९१३-२१). १९१७च्या विश्वयुद्धात जर्मनीविरुद्ध सामील व्हायचे ठरवले. १९१८ साली शांतता स्थापित करण्याकरिताच्या आणि ती अंमलात आणण्याकरिताच्या अटी त्यांनी जाहीर केल्या. लीग ऑफ नेशन्सच्या संस्थापकांमधील एक. १९१९ साली त्यांना शांततेचे पारितोषिक मिळाले होते.

जॉर्ज युजिन बेंजामिन कलेमांसो (१८४१-१९२९) फ्रांसचे राजकीय पुढारी आणि आणि प्रधानमंत्री (१९०६-१९०९, १९१७-१९२०) जर्मनीबरोबर १९१९ व्हसेलिस येथे शांततेचा तह करणारातील एक.

११. ब्लॅक ऍंड टॅन - आयर्लंडच्या स्वातंत्र्याकरिता लढणाऱ्या सिन्फिन पक्षाच्या लोकांना दाबून टाकण्याकरिता ब्रिटनने एक अर्धलष्करी तुकडी तयार केली होती. तिच्या गणवेशाचा रंग काळा भुरा होता. यावरून त्यांना ब्लॅक ऍंड टॅन हे नाव पडले.

जॉन ख्रिश्चन स्मट्स (१८७०-१९५०) दक्षिण आफ्रिकेतील राजकीय पुढारी आणि प्रधानमंत्री. (१९१९-१९२४;१९३६-१९४८) बोअर युद्धात इंग्रजांविरुद्ध लढले. या दोघांमध्ये तह घडवून आणण्यात यांचा फार मोठा वाटा होता. यानंतर ब्रिटिश कॉमनवेल्थचे फार मोठे मुत्सद्दी म्हणून मान्यता. १९११ साली गांधीजीं आले तेव्हा तेही दक्षिण आफ्रिकेत मजुरी करण्याकरिता आले होते. दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या हिंदुंशी करार. १९१४ साली गांधीजी दक्षिण आफ्रिका सोडून हिंदुस्थानात आले तेव्हा हे म्हणाले होते 'महात्मा जातो आहे, आणि हा परत आला नाही तर चांगले होईल'. तुरुंगात असताना गांधीजींनी आपल्या हाताने त्यांच्याकरिता चप्पल बनवली होती आणि ती त्यांना भेट दिली होती.

१५. विल्यम एवर्ट ग्लॅडस्टन (१८०८-१८६८) १८४६चे एक वर्ष वगळता १८३२-१८८५पर्यंत ब्रिटिश संसदेचे सदस्य. चार वेळा प्रधानमंत्री (१८६८-१८७४, १८८०-१८८५, फेब्रुवारी ते जुलै १८८६ आणि १८९२-९४) मुळात कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे सदस्य होते परंतु लॉर्ड जॉन रसेल नंतर ते उदारमतवादी लिबरल पक्षाचे पुढारी झाले. आयर्लंडमध्ये ख्रिश्चनांचे चर्च सरकारी संस्था असल्यासारखे झाले होते. १८६९ साली राजाच्या मदतीने त्या चर्चला या बंधनातून मुक्त केले. १८७०मध्ये शिक्षणपद्धतीत फार मोठे फेरबदल केले. नागरिकांनी शांततापूर्ण पद्धतीने आणि गुप्तपणे मतदान करता यावे म्हणून १८७२ साली कायदा केला.

१६. कवी सॅम्युअल कॉलरीज (१७७२-१८३४) १७९७ साली कवी वर्डस्वर्थचे मित्र झाले. केंब्रिजमध्ये शिकायला गेले होते परंतु पदवी न घेताच त्यांनी शिक्षण सोडले. त्यांच्या विवेचनावर आणि मान्यतांवर जर्मन विचारवंतांचा फार प्रभाव होता. यांच्या कवितेत 'एन्शन्ट मरिनर', 'क्रिस्टाबेल', 'कुब्लाखान' या प्रसिद्ध कविता. या तिन्ही कविता १८९७-९८ साली त्यांनी लिहिल्या होत्या. इंग्लंडच्या लेक जिल्ह्यात वास्तव्य करणारे कॉलरिज, साउथी आणि वर्ड्सवर्थ हे इंग्रजी भाषेतील विख्यात कवी म्हणून ओळखले जातात.

१७. या खंडाच्या पहिल्या भागात प्रामुख्याने स्कॉटच्या जीवनचरित्रामधील लांबलांब उतारे आहेत. मध्येमध्ये महादेवभाईंनी गांधीजी, श्रीनिवास शास्त्री आणि जवाहरलालला आणले आहे. ते उल्लेख गुजरातीत आहेत. १९३६ साली गुजराती साहित्य परिषदेत पत्रकारत्व विभागाचे अध्यक्ष म्हणून महादेवभाईंनी अध्यक्षीय भाषण दिले होते. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांवर हेमंडच्या पुस्तकाचा आणि स्कॉटच्या विचारांचा प्रभाव दिसतो. हे भाषण परिशिष्ट ३ मध्ये आहे.

## २

१८. मूळातील लेखन गुजरातीत वा इंग्रजीत आहे.

## ३

१९. खान अब्दुल गफ्फारखान उर्फ सरहद्द गांधी. अ मूळ गुजरातीत, आ आणि इ इंग्रजीत आहेत. शेवटच्या ओळीत 'होय' नंतर अजून कंस आहे.

२०. लॉर्ड रोनाल्डशेचे 'इंडिया - अ बर्ड्स आय व्ह्यू' हे पुस्तक १९२४ साली प्रकाशित झाले. हे २६ मार्च १९१७ ते २८ मार्च १९२२ पर्यंत बंगालचे राज्यपाल होते. १९०७ ते १९१६ ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य होते. त्या दरम्यान १९०९ साली इंडियन कौन्सिल्स ऍक्ट ब्रिटनच्या विधिमंडळात मंजूर झाले. ते हिंदुस्थानच्या प्रश्नात रस घेत होते. रौलेट आणि आणि बीचक्राफ्ट-चंदावरकर समितीचे सदस्य होते. बंगालचे राज्यपाल असताना त्यांनी श्रीरामपूर महाविद्यालयाच्या शताब्दी समारोहात भाग घेतला होता, आणि ढाका विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळी ते उपस्थित होते.

## ४

२१. सैयद अब्दुल्ला बरेलवी महादेवभाईंचे मित्र आणि फिरोजशहा मेहतांनी स्थापन केलेल्या 'बॉम्बे क्रॉनिकल'चे संपादक होते. डायरी २०, पृष्ठ २९१ (गुजरातीमधील) पाहा. मीनू रुस्तम मसानीचा परिचय डायरी १९, पृष्ठ ३१८ (गुजरातीमधील) वर आहे. सत्यमूर्ती (१८८७-१९४३) तामिळनाडू कॉंग्रेसचे अध्यक्ष. १९३५-३६.

केंद्रीय विधान सभेचे सदस्य नऊ वर्ष (१९३४-१९४३). मद्रास महानगरपालिकेचे सदस्य - १९२६-३८. मद्रास विद्यापीठ सिनेट आणि सिंडिकेटचे सदस्य १९२०-४२. महापौर - १९३९-४०. वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला. १९४० साली तुरुंगवास. ऑक्टोबर १९४१मध्ये सुटका. परंतु १९४२ साली परत तुरुंगवास. काँग्रेसने सत्ताग्रहण केले तेव्हा राजाजी मुख्यमंत्री झाले. त्यावळी लोकांनी ही सत्यमूर्तीची पसंती आहे असे वाटत होते.

## ५

मूळ गुजरातीत.

अमृतलाल शेठ, पाहा डायरी १९, पृष्ठ ३२३ आणि ३३०. बळवंतराय महेता देशी राज्यांच्या चळवळीत पुढारी होते. व्यक्तिपरिचय पाहा.

१९३६ च्या अखिल हिंदुस्थान काँग्रेस समितीची जी सभा झाली होती तिच्यात देशी राज्यांमधील आंदोलनांसंबंधी ठराव करून असे सागितले होते की १ ऑगस्ट १९३५ रोजी वर्ध्यात कार्यकारिणीने जो निर्णय घेतला होता त्यात सांगितलेले धोरण ती मान्य करत आहे. यापूर्वीचे १९२८ चे दोन ठराव असे होते -

देशी संस्थानांतील राजांना काँग्रेसचा आग्रह आहे की त्यांनी लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांच्या आधारे जबाबदार लोकशाही शासन व्यवस्था लागू करावी; आणि वेळ न घालवता नागरिकांच्या प्राथमिक आणि मूलभूत अधिकारांचे रक्षण होईल असे जाहीर वक्तव्य काढावे किंवा कायदे करावे, ज्यामुळे लोकांना मुक्तपणे एकत्र जमता येईल आणि चर्चा करता येईल, स्वतंत्र पत्रकारिता टिकून राहील आणि जनतेचा जीवित व संपत्ती यांचा सुरक्षिततेची जाणीव होईल. देशी संस्थानांमध्ये पूर्ण जबाबदार लोकशाही शासन प्रस्थापित होण्यासाठी तेथील जनता जी न्याय्य आणि शांततापूर्ण चळवळ चालवत आहे, तिला काँग्रेसकडून संपूर्ण सहानुभूती व पाठिंबा जाहीर केला जातो.

[राष्ट्रीय महासभा, ४३वे संमेलनाच्या अहवालाचे पृष्ठ क्र. १५६]

सत्याग्रहाचे लेखन इंग्रजीत आहे.

२२. लाहोरचा नबाब जनतेवर अन्याय करण्यासंबंधात कुख्यात आहे; जयपूरचा राजा जमनालाल बजाजला अटक करायला लावणार आहे.

२३. राजेवजवाड्यांना उद्देशून १९१६ साली गांधीजींनी बनारस हिंदू विद्यापीठात भाषण दिले होते. ते चौथ्या परिशिष्टात दिले आहे. ६ फेब्रुवारीला विद्यापीठाच्या उदघाटन प्रसंगी दिलेल्या या भाषणात, आणि समारंभाचे अध्यक्ष दरभंगाच्या महाराजांना लिहिलेल्या पत्रातील एक उतारा काशीहून मुंबईला पोहोचल्यानंतर असोसिएटेड प्रेसला मी ९ फेब्रुवारी १९१६ ला दिला होता तो आणि १० फेब्रुनारी १९१६च्या 'क्रॉनिकल' दैनिकात आलेले वक्तव्य हे सगळे इंग्रजीत होते.

श्रीमती ऍनी बेझंट आणि गांधीजींच्या बाजूला गांधीजींच्या 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास'चा इंग्रजीत अनुवाद करणारे आनंदशंकर बापूभाई धृवचे विद्यार्थी आणि काही वर्षांपूर्वी थोडा वेळ विद्यापीठात इंग्रजी शिकवत असलेले अध्यापक वालजी गोविंदजी देसाई (४-१२-१८९२ ते २०-१-१९८२). बसलेले होते. त्यांनी हा प्रसंग स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेला होता. त्यांना मी विचारले होते की व्हाईसरायला आवडणार नाही असे भाषण ऐकून राजेराजवाडे निघून गेले होते तेव्हा गांधीजी कोणत्याही प्रकारे क्षुब्ध झालेले दिसले काय? ते म्हणाले, "मुळीच नाही, गांधीजी नेहमीप्रमाणे शांत होते." ऍनी बेझंट काय म्हणाल्या होत्या की त्यामुळे गांधीजी बोलताना थांबले होते? ऍनी बेझंट म्हणाल्या होत्या, "श्री गांधी, हे तर मला फार अस्वस्थ करणारे आहे." याच्या उत्तरात गांधीजी म्हणाले होते की बहेन, तुम्ही अस्वस्थ व्हाल वा अडचणीत याल असे मी काही करेन असे तुम्हाला वाटते काय?

**६**

२४ मूळात हे इंग्रजीत आहे.

**७**

२५. मूळ गुजरातीत.

२६. जकात शब्द आहे. त्याचा काना उलटा छापला आहे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

२७. शेवटच्या परिच्छेदात 'बेकार' हा शब्द छपाईतील चूक आहे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

२८. मातीच्या इमारतीचा उल्लेख आहे. तिथे घर पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

## ८

**२९. प्राध्यापक होल्डेन विलायतेत विज्ञानशास्त्र आणि जीवशास्त्राचे विख्यात अध्यापक-संशोधक होते. ते हिंदुस्थानचे नागरिक झाले होते आणि ओरिसात राहत होते. त्या काळात रसायनशास्त्र फार विकसित होत होते.**

३०. नाऊरचे पहिले नाव प्लेझंट टापू होते. गिल्बर्ट बेटाच्या पश्चिमेकडील पॅसिफिक महासागराला अग्निप्रदेशात येणाऱ्या या बेटाची वस्ती जवळपास १०.००० होती. आणि याचे क्षेत्रफळ २१३० हेक्टर आहे. १९६८मध्ये स्वतंत्र झाल्यानंतर याने ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये सामील व्हायचे ठरवले. तो पहिला विश्वस्त प्रदेश झाला.

३१. बेरीबेरी रोग भातप्रधान आहारात व्हिटॅमीन बी वा थायमाईन कमी कमी असल्यामुळे उष्ण प्रदेशात होत असतो. नसांवर सूज, नसा दुखणे आणि कधीकधी यामुळे लखवाही होतो. हे याचे चिन्ह आहे. बेरी शब्दाचा सिंहल भाषेत अर्थ ‘अशक्तपणा’ आहे. या काळात पूर्व आणि दक्षिण आशियात हा रोग खूप पसरला होता.

## ९

३२. अ - गुजरातीत.

लखनौत पुस्तके पाहिली. त्यात प्रामुख्याने शब्दकोश, ‘राजतरंगिणी’, महाभारत आणि भावमित्र तसेच सुश्रुतने लिहिलेली पुस्तके होती.

ब, क, ड इंग्रजीत आहेत.

## १०

३३. मूळात गुजरातीत.

डॉ. मुरारीलालचे (१८७४-१९६१) मूळ गाव होते दिल्लीजवळील रोहतक. परंतु कानपूरमध्ये प्रख्यात डॉ. म्हणून वास्तव्य केल्यानंतर कुटुंबाला रोहतगी हे आडनाव पडले. ते मेरठ आणि लाहोरमध्ये शिकले होते. शासनात आरोग्याधिकाऱ्याची नोकरी होती. त्यानंतर १९०१मध्ये रावसाहेब ही पदवी दिली. त्यानंतर यांनी या

पदवीचा त्याग केला होता. १९०६ मध्ये सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. कानपूरमध्ये काँग्रसेची संघटना मजबूत केली.

१९१६मध्ये होमरूल लीगचे सदस्य. शहर काँग्रेस समिती आणि मजूर सेभेचे संस्थापक अध्यक्ष. नगरपालिका मंडळाचे सभापती, १९२३. १९२५ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन झाले त्या वेळी स्वागतसमितीचे अध्यक्ष. १९३६ च्या लखनौ कांग्रेसचेसुद्धा स्वागताध्यक्ष. संयुक्तप्रांत विधानसभेचे सदस्य, १९३६-३७. नंतर विधानपरिषदेत, १९४७-५१. राज्यसभेचे सदस्य, १९५२-५८.

३४. बिपिनचंद्रपाल, लाला लजपतरायआणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या त्रिकुटाला लाल, बाल आणि पाल म्हणून संबोधले जात असे.

३५. कमला नेहरू (१८९९-१९३६) जवाहरलालशी १९१६ साली विवाह. दिल्लीच्या राजपती आणि जवाहरलाल कौल यांची पुत्री. १९३० साली अलाहाबाद जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्ष. १९३१ साली तुरुंगवास. स्त्रीजागृतीकरिता काम केले आणि स्वराजभवनमध्ये रुग्णालयाची स्थापना.

## ११

३६. मूळ गुजरातीत आहे. भाग ३२ सुद्धा पाहा.

१९२९ मध्ये सत्याग्रहाश्रम, साबरमतीमध्ये डाह्याभाई विणकाम शिकायला यायचे. हा त्यांचा उल्लेख असू शकेल.

रामजीभाई हंसराज कमाणी असू शकतात. कलकत्त्यातील व्यापार सोडून (१९३४) अमरेलीवासी झाले. ठक्करबापाबरोबर (अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर) खादीकाम, शेतीकाम आणि हरिजनसेवेचा विकास केला.

३७. दोन्ही पत्रे इंग्रजीत.

जर्मन नागरिक कार्ल ब्यूटो थोडा काळ आश्रमात राहिले.

## १३

३८. पहिल्या परिच्छेदाच्या सहाव्या ओळीत ‘तो’ च्या एवजी ‘ते’ वाचा. शेवटच्या ओळीत ‘आशाओ’ चा काना उलटा छापला गेला आहे. (मूळ गुजराती आवृत्तीत)

मूळ गुजराती, विभाग १४ सुद्धा पाहा.

## १४

३९. मौलवी अब्दुल हक (१८७०-१९६२) पंजाबमध्ये मॅट्रिक झाल्यानंतर अलिगढमध्ये शिकायला गेले. निझामच्या हैदराबाद राज्यात गृहसचिवाच्या कार्यालयात भाषांतरकार आणि स्वीय सचिव म्हणून १८८५मध्ये काम सुरू केले. नंतर मदरसा-ए-आशीफ्रियामध्ये मुख्याध्यापक. हैदराबादहून निघाल्यानंतर उर्दू नियतकालिक ‘अफसर’चे संपादक. नंतर ते औरंगाबाद येथे शिक्षण मंत्रालयात फाईलींच्या अनुवादकाचे पर्यवेक्षक झाले होते.

१९३० साली स्थापन झालेल्या अंजुमन तरक्कीए-उर्दूचे १९११ साली सचिव झाले. हैदराबादमध्ये दारूल तर्तुमाचे निदेशक.आणि उस्मानिया विद्यापीठात उर्दू विभागाचे मुख्याधिपती झाले. देशाची फाळणी झाल्यानंतर पाकिस्तानमध्ये राहायला गेले. लोक त्यांना बाबा-ए-उर्दू म्हणून ओळखायचे.

## १५

४०. मूळ इंग्रजीत.

अनसुया काळे (१८६५-१९५८) मध्यप्रांताच्या विधानपरिषदेच्या सदस्य, १९२८; राजीनामा देऊन सत्याग्रहात सामील, १९३०; १९२९ साली आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेच्या कार्यालयात गेल्या होत्या. १९३२मध्ये अ. हिं. काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्य; नागपूर काँग्रेस समितीच्या सदस्य, १९३२; अध्यक्ष १९३५; प्रदेश हरिजन परिषदेच्या अध्यक्ष तसेच अखिल हिंदुस्थान महिला परिषदेच्या अध्यक्ष, १९३६. लोकसभा सदस्य, १९५२-१९५७.

४१. शेवटचा परिच्छेद - दुसरी ओळ ‘नाही’ ऐवजी ‘करत नाही’ पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत)

४२. नीला - सत्याग्रहाश्रमात राहायला आलेली एक भगिनी

**१६**

४३. १९३६ साली मार्च ८ ते २७ तारखेच्या दरम्यान महादेवभाई दिल्लीत होते. मूळ गुजरातीत.

**१७**

४४. मूळ इंग्रजीत प्रामुख्याने पंजाबमध्ये काम करणारांमधील एफ. एल. ब्रेइन हिंदुस्थान नागरी सेवेत होते. ग्रामविकासाकरिता शेतीत सुधारणा, पाण्याचा उपयोग वगैरेंकरिता गुडगाव आणि इतर जिल्ह्यात कार्यक्रम सुरू केले. ते गेल्यानंतर लोकांच्या उपेक्षेमुळे आणि पैशाच्या अभावामुळे हे कार्यक्रम अडकून पडले होते.

४५. गांधीजी रोममध्ये होते, १९३१ च्या १२-१३ तारखेला.

दक्षिण आफ्रिकेत १८९३-१९१४.

**१८**

४६. मूळ इंग्रजीत.

४७. वालचंद हिराचंद दोशी. महाराष्ट्रातील उद्योगपती. यांची मान्यता होती की आर्थिक आणि औद्योगिक आत्मनिर्भरतेद्वाराच स्वातंत्र्य टिकू शकते. यामुळे व्यापार आणि उद्योगाच्या बदलत जाणाऱ्या जगात हिंदुस्थानला असे स्वातंत्र्य भोगता यावे म्हणून दळणवळण, दूरसंचार यासारख्या नवीन क्षेत्रात त्याने उडी घ्यायला पाहिजे. यांनी विशाखापट्टण येथे जहाजवाहतुकीकरिता धक्का बांधला. स्वातंत्र्यानंतर सरकारने त्यांचे राष्ट्रीयीकरण केले.

वालचंद हिराचंद (१८९२-१९५३) सोलापूर, पुणे आणि मुंबईत शिकले होते. रेल्वे, वाहनव्यवहार आणि इतर सरकारी खात्यांकडून सार्वजनिक बांधकामाचा ठेका मिळवत असत. हळूहळू हिंदुस्थानात आणि श्रीलंकेत त्यांचे ३८ कारखाने झाले. त्यातून उद्योगोपयोगी वेगवेगळे साहित्य ते बनवत असत. इंडियन मर्चंट ऑफ चेंबर्सचे अध्यक्ष, मुंबई, १९२७. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, १९२७-१९३८. इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सचे हिंदुस्थानातील राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष,१९३१-३३. आणि पॅरिसस्थित संस्थेच्या मुख्य कार्यालयाचे उपाध्यक्ष. तसेच १९३७ साली बर्लिन आणि १९३९ साली कोपेनहेगनमध्ये भरलेल्या ९व्या आणि ११व्या परिषदेत हिंदुस्थानच्या प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व. १९३२-३३मध्ये फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्सस ऑफ कॉमर्स एँड इंडस्ट्री (फीफी) चे अध्यक्ष. इंटरनॅशनल लेबर कॉन्फरन्सचे जिनेव्हात अधिवेशन होत असे. तिच्यात १९३४-३५ आणि १९३६-३७मध्ये उद्योगपतींचे प्रतिनिधी. १९३३-१९३४मध्ये ऑल इंडिया ऑर्गानाईझेशन ऑफ इंडस्ट्रियल एम्प्लायर्सचे अध्य़क्ष.

## १९

५०. काका अथवा काकासाहेब अथवा बाळकृष्ण कालेलकर. यांच्या सुपुत्राचे नाव शंकर (सतीश) आणि बाळ होते. किशोरभाई म्हणजे किशोरिलाल घनश्यामदास मशरूवाला.

५१. ख्रिश्चनांच्या धर्मग्रंथाचे, बायबलचे दोन भाग आहेत - नवा करार आणि जुना करार. या धर्मशास्त्रात रोमन कॅथॉलिक ऍपोक्रिफाचा (बायबलमधील *Book of Tobit, Judith, Maccabees* वगैरे काही ग्रंथ काही परंपरांत "Apocrypha" म्हणून ओळखले जातात.) समावेश करत असतात.

## २०

५२. दादा (शंकर त्र्यंबक) धर्माधिकारी (१८९९-डिसेंबर १९८५) मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्यात मूळ तापी तालुक्यात जन्म. हुशंगाबाद आणि नागपूरमध्ये शिक्षण. १९३०-४२च्या दरम्यान राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभाग. १९३५मध्ये नागपूरच्या टिळक महाविद्यालयात शिक्षक. 'सर्वोदय'चे उपसंपादक, १९४६. मध्यप्रदेश विधानसभेचे सदस्य, १९४६-५२. घटनासमितीचे सदस्य, १९५१. गांधी सेवा संघाचे सदस्य. 'भूदान यज्ञ'चे (हिंदी) संपादक. आई सरस्वतीबाई.

यांच्या मराठीतील मुख्य पुस्तकांचे नाव ‘पत्रसंग्रह’, ‘आपल्या गणराज्याची घडण’, ‘स्नेहाचे झरे’. हिंदीतील पुस्तके - ‘सर्वोदयदर्शन’, ‘अहिंसक क्रांतिकी प्रतिक्रिया’, ‘क्रांतिनिष्ठा’, ‘लोकनीतिविचार’, ‘लोकतंत्र’ और ‘विकास और वुसका भविष्य’.

५३. पंढरपूरचे विठ्ठलमंदिर ६२ वर्षांपासून यात्रेकरूंना मोठ्या संख्येत आकर्षित करत आहे.

## २१

५५. चंद्रशंकर प्रभाशंकर शुक्ल, जन्म १९०१, १९२०मध्ये महाविद्यालय सोडून गुजरात विद्यापीठात शिकायला आले. १९२१ ते १९२३च्या दरम्यान ‘नवजीवन’च्या संपादकमंडळात काम केले. नंतर साबरमती आश्रमात आणि विद्यापीठात शिकवत होते, १९२४-३२. ‘हरिजनबंधु’ गुजरातीचे संपादक, १९३३-४०. ‘हरिजन’ इंग्रजी साप्ताहिकचे सहसंपादक, १९३५-४०. भारतीय विद्याभवनचे रजिस्ट्रार, १९४३. गुजराती दैनिक ‘हिंदुस्तान’चे सहसंपादक, १९४८-४९. यांचे हस्ताक्षर महादेवभाईंसारेखेच सुंदर होते. गुजरातीत त्यांनी चाळीसेक पुस्तके लिहिली आहेत. प्रामुख्याने इंग्रजीमधून अनुवादित. इंग्रजी पुस्तके - ‘कंव्हरसेशन्स ऑफ गाधीजी’, ‘गांधीजी ऍज वुई नो हिम’, ‘फेमस इंटरव्हूज ऑफ महात्मा गांधी’ ‘रिमायन्सेस ऑफ महात्मा गांधीजी’.

५६. वल्लभभाई, अमृतलाल शेठ आणि ‘जन्मभूमी’ - परिशिष्ट ६ पाहा.

५७. पाचव्या परिच्छेदात शेवटचे वाक्य असे पाहिजे - वल्लभभाईंना ‘स्टेट्समन’चे ज्ञान किती आहे म्हणावे? (मूळ गुजराती प्रतीत)

५८. प्रभावती - जयप्रकाश नारायणची पत्नी.

५९. झाकीर म्हणजे डॉक्टर झाकीर हुसेन. ऍगाथा हॅरिसन विलायतेत राहत होत्या. गांधीजींच्या अनुयायी भगिनी. पाहा डायरीचा विभाग १९, पृष्ठ १०९. १९३६ मे ११ ते ३१ गांधीजी विश्रींतीकरिता कर्नाटकमधील नंदिदूर्ग येथे होते.

६०. स्वरूप उर्फ विजयालक्ष्मी पंडित, जवाहरलाल नेहरूंची बहीण.

६१. हरिने भजता - श्यामळदासचे भजन.

## २३

६२ मूळ इंग्रजी तसेच गुजरातीत आहे.

झेंद म्हणजे भाष्य वा टीका. पारसी त्यांच्या धर्मग्रंथाला अवेस्ताला मूळ लेखन म्हणून ओळखतात.

## २४-२५

भाग २४-२५ इंग्रजीत.

६३. 'हितवाद' हे इंग्रजी दैनिक त्या वेळी भारत सेवक समाजाचे मुखपत्र होते आणि ते नागपूरहून निघत होते.

६५. शोएब कुरेशी १९२२ साली सत्याग्रही आणि 'यंग इंडिया'चे संपादक होते.

## २६

६६. रेहाना तैयबजी या अब्बास तैयबजींची मुलगी. पाहा भाग २० पृष्ठ २८१.

## २७

६७. भाग २७ अ, इ आणि ई २८, २९ आणि ३० मूळ इंग्रजीमध्ये.

६८. गांधीजींच्या दैनंदिनीत चंदुलाल दलाल यांनी तळटिपा लिहिल्या आहे. त्यावरून लक्षात येते की १४ मे १९३६च्या जवळपास हरिलाल गांधींनी इस्लामचा स्वीकार केल्याचे जाहीर केले होते. २९ तारखेला मुंबईच्या जुम्मा मशिदीत जाऊन त्यांनी आपले नाव अब्दुल्ला असल्याचे जाहीर केले. १० जूनच्या जवळपास लहान भाऊ रामदासला ते जनाब झकेरियांच्या घरी भेटले होते. आणि त्यानंतर टोपीवाला इमारतीत

हरिलालभाईंचा मुलगा कांतिलाल, त्याची नियोजित पत्नी सरस्वतीसह त्यांना भेटला होता. सेप्टेंबरच्या मध्यंतरी इस्लामचा प्रचार करण्याकरिता ते कालिकतला गेले होते. १७ तारखेला दारू प्याल्याच्या अवस्थेत ते रस्त्यावर सापडले होते आणि त्यांना दंड झाला होता. २७ तारखेला कस्तुरबांनी त्यांना पत्र लिहिले होते. त्याकरिता परिशिष्ट ५ पाहा. या पत्राच्या उत्तरात त्यांनी लिहिले होते की 'आता मी हरिलाल नाही, अब्दुल्ला आहे. आणि माझे दारूचे व्यसन सोडायला लावायचे असेल तर माझ्या आईवडिलांनी मुसलमान व्हावे.' १२ नोव्हेंबरला त्यांनी परत हिंदू धर्माचा स्वीकार केला.

६९. मधुसूदन दास ओरिसातील ख्रिश्चन पुढारी.

७०. पहिल्या ओळीत 'नाही काय' या शब्दांत जागा सोडली पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

हरिजन सेवक संघ - गांधीजींनी स्थापन केलेली संस्था.

७१. दुसऱ्या परिच्छेदात शब्द 'वाडामां' पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

**२९**

७२. पानाच्या मध्यंतरी शब्द 'सुश्रूषक' (बहुश्रुत) हा शब्द पाहा. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

७३. पॅट्रिक गेडिस इदोरमध्ये वास्तुशास्त्र शिकवत होत्या.

**३०**

७४. काँग्रेस सांसदीय मंडळाने निवडणुकीचे काम सांभाळले.

**३१**

७५. लेडी रमण या भौतिक विज्ञातील नोबेल पारितोषिक विजेत्या सी. व्ही. रमण यांची पत्नी. डॉ. रमणनी गांधीजींना विचारले होते की हिंदीत भाषण कसे झाले होते? गांधीजींनी उत्तर दिले सर्वार्थाने सुंदर. तुमच्या विज्ञानाच्या प्रयोगासारखेच.

## ३२

७६. राजकुमारीने लिहिलेला भाग इंग्रजीत आहे. २५ जूनला तुकडोजी महाराज गांधीजींबरोबर सेवाग्राम आश्रमात राहायला आले होते.

७७. मुन्नालाल वकिलीपर्यंत शिकून साबरमतीत सत्याग्रहाश्रमात राहायला आले.

## ३३

७८. मूळ हिंदीत.

## ३४

७९. प्रेमाबहेन कंटकचे पत्र गुजरातीत आहे. डायरी भाग वीस, पृष्ठ ३१४ पाहा.

## ३५

८०. संयुक्तप्रांतात अलमोडा शहराजवळ रिकाम्या वसाहतीचे मालक पंडित रणजीत आणि विजयालक्ष्मी पंडित होते.

८१. या विभागात पाचवा भाग गुजरातीत तसेच इंग्रजीत आहे. बाकीचे सर्व लेखन इंग्रजीत आहे.

## ३६

८२. इंग्रजीत. दुसऱ्या ओळीत स्कॉटलंड हा शब्द पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

## ३७

८३. गुजरातीत.

## ३८

८४ तिन्ही पत्रे इंग्रजीत.

## ३९

८५. इंग्रजीत.

## ४०-४१-४२

८६. महादेवभाईंच्या वरील पत्राशिवाश तिन्ही विभागातील लेखन इंग्रजीत.

८७. मौलाना अब्दुल हक - विभाग १४ पाहा.

## ४३

८८. पत्र गुजरातीत.

## ४४-४७

८९. विभाग ४५ मध्ये मिस चोकलींना लिहिलेले पाचवे पत्र डायरीत उतरवून घेण्याचे राहून गेले. परंतु याची प्रस्तावना गुजरातीत आहे. बाकी सर्व मुळात इंग्रजीत.

९०. यान हॉफमेयर दक्षिण आफ्रिकेतील राजकारणात असलेले व्यक्ती. नंतर प्रधानमंत्री.

९१. लंडनमधील एक मार्ग - लेडन स्ट्रीट

९२. डॉक्टर मॉट. ख्रिस्ती धर्मप्रचारक.

९३. डिक (रिचर्ड कैटन) गांधीप्रेमी अभियंता होते. डॉ. मॉट टकर, फिशर हे ख्रिश्चन धर्मगुरू. व्हेरिअर एल्विनसुद्धा रोमन कॅथॉलिक धर्मगुरू होऊन हिंदुस्थानात आले होते. नंतर मध्यभारतात बैतूलच्या जवळपास वस्ती केली आणि आदिवासींची सेवा करणे पसंत केले. मांडला जिल्ह्यात धर्मप्रचाराचे काम सोडून दिले. तिथे यांची पहिली पत्नी एक आदिवासी भगिनी होती.

९४. जे. झेड. हॉज स्कॉलंडहून आलेले नागपूरनिवासी पादरी. एडवर्ड जॉर्ज अर्ल लिटन बुलवर-लिटन (१८०३-७३) इंग्रजी नाटककार, कादंबरीकार आणि मुत्सद्दी. त्यांच्या ऐतिहासिक कथाकरिता ते प्रसिद्ध होते.

जॉन बन्यन (१६२८-१६८८) इंग्रज धर्मप्रचारक आणि लेखक. १६७८मध्ये प्रकाशित झालेल्या 'पिलिग्रिम्स प्रोग्रेस'करिता प्रख्यात.

## ४८

९५. दक्षिण आफ्रिकेतील इसिपिगो आणि व्हेरुलम शहरात हिदुस्थानींची खूप वस्ती होती. आणि गोपाळ कृष्ण गोखले तिथे गेले तेव्हा गांधीजींनी मोठ्या सभेचे आयोजन केले होते.

९६. अंबालाल साराभाई - गिरणीमालकआणि अमदाबादच्या उद्योगपतींचे प्रतिनिधी.

## ४९

९७ ४९, ५०, ५१ हे सर्व भाग मुळात इंग्रजीत आहेत.

९८. एन्डोक्लिस हा एक पळालेला गुलाम होता. ग्रीसच्या गुफांमध्ये तो लपलेला असताना तिथे एक सिंह आला. त्याच्या पायात एक काटा रुतलेला होता. तो एन्डोक्लिसने काढला. याकरिता सिंहाने आपला पाय उंच

केला होता. गुलाम परत पकडला गेला की त्याला खेळाच्या मैदानात सिंहाबरोबर कुस्ती खेळण्याची शिक्षा करण्यात येत असे. एन्डोक्लिस परत पकडला गेल्यानंतर त्यालाही हीच शिक्षा झाली. या शिक्षेच्या अंलबजावणीसाठी सिंहाला जेव्हा मैदानात आणले तेव्हा सिंहाने एन्डोक्लिसला ओळखले. आणि एन्डोक्लिसवर पंजाने हल्ला करण्याऐवजी तो एन्डोक्लिसला प्रेम आणि कृतज्ञता दाखवू लागला.

९९. या कथेचा लेखक आऊसस गेलियस आहे. यानंतर इसापच्या बालगोष्टीत आणि 'गेस्टा रोमारम'मध्येसुद्धा ही कथा आली आहे. बर्नार्ड शॉचे नाटक 'एन्डोक्लिस आणि सिंह' (१९१६) हे नाटक याच कथेच्या आधारावर रचले आहे.

## ५०

१००. अरविंद घोष - श्री अरविंद.

जानकी प्रसाद काँग्रेसचे पुढारी होते.

१०१. पहिली गोलमेज परिषद १२ नोव्हेंबर १९३० ते १९ जानेवारी १९३१ या काळात भरली होती. कॉंग्रेसचे एकमेव पुढारी म्हणून गांधीजी त्या सभेत उपस्थित राहिले होते. ते ७ सेप्टेंबर १९३१ ते १ डिसेंबरपर्यंत १९३१ त्याकरिता इंग्लंडमध्ये होते.

## ५१

१०२. वायव्य सरहद्द प्रांतात लष्कराच्या मदतीने आणि वायुसेनेच्या बाँबफेकीच्या बळावर तेथील जनतेला घाबरवण्याचा आणि तिच्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू होता. याचा उल्लेख गांधीजींनी केला होता.

१०३. स्पेनमध्ये अंतर्गत बंड सुरू होते. त्यात जर्मनीचे आणि इटलीचे समर्थन असलेल्या सैन्याच्या विरोधात आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटनांचे सदस्य होते आणि त्यांना सोव्हिएत संघाच्या सैन्याचा आणि प्रजासत्तावादींचा पाठिंबा होता.

लॉर्ड लिनलिथगो हिंदुस्थानचे व्हाईसराय होते. त्याना पशुपालनात आणि शेतीत खूप रस वाटत होता.

## ५२

१०४. वर्ध्याजवळ शिंदी म्हणून गाव आहे.

१०५. शक्य आहे की या गोष्टीचा उल्लेख रामनारायण नागरदास पाठक यांनी केला आहे.

१०६. पहिल्या ओळीत शेवटचा शब्द 'तारा' पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

## ५३

१०७. विलायतमधील क्वेकर पंथीय कार्ल हीथ हिंदुस्थान प्रेमी होते. एँड्र्युज म्हणजे चार्ल्स फ्रिअर एँड्र्यूज. डायरीचा भाग १९ पृष्ठ ३०९. हॅरिसन आणि अजून एक इंग्रज क्वेकर भगिनी गांधीजींच्या विचारांच्या समर्थक आणि प्रचारक होत्या. पाहा पान ८०. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

१०८. पानाच्या मधल्या भागात 'तमारा एक्सपर्टो' ऐवजी 'अमारा एक्सपर्टो' वाचावे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

१०९. दादाभाई म्हणजे दादाभाई नवरोजी.

११०. आर्किबॉल्ड फेनर ब्रॉडवे, (कलकत्त्यात जन्म १८८४-१९८८) शांतताप्रिय, समाजवादी विचारवंत. पत्रकार आणि विलायतेतील लेबर पार्टीचे क्रियाशील पुढारी. पहिल्या विश्वयुद्धात भाग न घेतल्यामुळे तीन वर्षांचा तुरुंगवास. राष्ट्रीय महासभेच्या ब्रिटिश समितीचे संयुक्त सचिव. १९२२साली इंडिपेंडंट लेबर पक्षाची स्थापना केली. तिचे कार्यवाहक सचिव. आणि १९२८ साली तसेच १९३३-३९ साली त्याचे महासचिव. मध्ये १९३१-१९३३ पक्षाचे नेतृत्व. 'न्यू लीडर'चे संपादक, १९२६-१९२९ आणि १९३१-४६. १९२७मध्ये महासभेचे मद्रासमध्ये जेव्हा अधिवेशन झाले तेव्हा तिच्यात ब्रिटिश लेबर पक्षाचे प्रतिनिधी मित्र. वसाहतींना स्वातंत्र्य दिले पाहिजे म्हणून प्रचार करणाऱ्या ब्रिटिश केंद्राचे अध्यक्ष, १९४२-४७. १९४९मध्ये इंडिपेंडंट लेबर पार्टीचा राजीनामा दिला. लेबर पार्टीत सामील. साम्राज्यवादविरोधी जनतेच्या काँग्रेसचे अध्यक्ष, १९४८. १९६४मध्ये ब्रिटिश सरकारने यांना आजीवन हाऊस ऑफ लॉर्ड्सचे सदस्य नेमले. १९७०मध्ये व्हिएतनाममध्ये शांतता स्थापन करण्याकरिता ब्रिटनमध्ये झालेल्या आंदोलनाचे अध्यक्ष.

पुस्तके - १९२० 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया', १९२१ 'नॉनकोऑपरेशन इन मदरलँड'. १९३० 'द इंडियन क्रायसिस', १९३३ 'ब्लडी ट्रॅफिक', १९४२ 'इनसाईड द लेफ्ट', १९४८ 'जोविटचे जीवनचरित्र' १९७७ आत्मकथा 'टूव्रड्स टुमारो'.

१११. होरॅस अलेक्झँडर हिंदुस्थान प्रेमी क्वेकर इंग्रज.

११२. राजकुमारी विलायतेच्या शाळेत शिकलेल्या. इंग्रजांमध्ये त्यांचे बरेच मित्र. डायरी २०, पृष्ठ २७० पाहा. होम्स - न्यूयॉर्कमध्ये राहणारे भारतप्रेमी गांधीभक्त पादरी. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

११३. सर जेम्स ग्रिग- व्हाईसरायच्या कार्यवाहक समितीचे अर्थमंत्री. याचे कायदेशास्त्री जाफरुल्ला खान होते. हेलिफॅक्स म्हणजेच लॉर्ड अर्विन. यांच्यावर दिल्लीत बॉब फेकण्यात आला होता, परंतु त्यातून ते वाचले.

११४. सर जेम्स एँडर्सन (८-७-१८८२ ला जन्म.) बंगालचे राज्यपाल - १९३२. वॉटसन महाविद्यालयात आणि लायब्झिग विद्यापिठात शिक्षण. १९०५ कॉलोनिअल कार्यालयात नोकरीला सुरुवात. उत्तर नायजेरियाच्या लँड्स समितीचे सचिव. १९११ साली वेस्ट आफ्रिकन करंसी समितीचे सचिव, १९१२-१३. विलायतेत इंशुरन्स कार्यालयात मुख्य कारकून आणि सचिव. विलायतेत मिनिस्ट्री ऑफ शिपींगमध्ये दुय्यम सचिव,१९१९ ते १९२२. बोर्ड ऑफ इनलँडचे अध्यक्ष. होमऑफिसमध्ये कायम अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट्स, १९२२-१९३२पर्यंत.

## ५४

११५ मुळात संस्कृतमध्ये.

विगतधन निशीथेने ऐवजी विगतधन निशीथे

घ्राणन्नर्त्रंध्रेणने ऐवजी घायमरन्ध्रेण

रसोनकः ऐवजी रसोमयः

११६. वैन तेवोने ऐवजी वैनतेयो

ततोऽप हिंदुः ऐवजी तपोऽपद्द विंदुः

नाम्लान वर्जितः ऐवजी नाम्लेनवर्जितः

इत्कतो ऐवजी इत्युक्तो

नाकत्तेल कषायने ऐवजी नालकषाय

बबृहणो ऐवजी ब्रुंहणो

गुल्मारु चिका शोकान ऐवजी गुल्मारचिकारु शोकान

अहित ऐवजी हितम्

पयो गुहम् ऐवजी पयोगुडम्

दरिगंधोर्गन्धो मुखदुषकः ऐवजी दुर्गंधो मुखदुषकः

गुयमझेर्योने ऐवजी गुणैर्झ्येयो

तिल तैलेन सिन्दुना ऐवजी तिलतैलेन सिन्धनः

विषमानापि ऐवजी विषमानपि पाहा आणि

शुवल्कदोषान् ऐवजी शुकलदोषान वाचा

## ५५

११७. मूळ इंग्रजीत.

१९३१ साली गांधीजी जेव्हा गोलमेज परिषदेत उपस्थित राहायला गेले होते तेव्हा म्युरिअल लेस्टर या त्यांच्या यजमान होत्या. गांधीविचारांच्या क्वेकर, प्रशंसक आणि प्रसारक. हिंदुस्थानात मध्यप्रदेशात हुशंगाबादमध्ये रसूलमियात राहत होत्या.

११८. नोगुची, जपानमधील ख्रिश्चन पुढारी.

११९. वायकोमचे मंदिर खूप पवित्र समजले जाते.

१२०. ईसुमयमां इ ऱ्हस्व पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

## ५६

१२१ मूळ इंग्रजीत.

रोमॉ रोलॉनी गांधीजींचे चरित्र १९२३ साली लिहिले होते. पाहा डायरी विभाग १९, पृष्ठ ३२१.

## ५७

१२२. दुसऱ्या परिच्छेदात दुसऱ्या ओळीत स्रोत वाचा (मूळ गुजराती आवृत्तीत.)

१२३. सॅलिसबरी ब्रिटनमध्ये विदेशमंत्री तसेच प्रधानमंत्री. पृष्ठ ६ (मूळ गुजराती आवृत्तीत.)

ऑलिव डोक या गांधीजींचे पहिले चरित्रकार रेव्हरंड डोक यांची पत्नी.

१२४. भगवानदास हे श्रीप्रकाशचे वडील.

## ५८

१२५. ११८६. नानाभाई (विठ्ठलदास) हे इच्छाराम रंगीलदास आणि मंगलाबेनचे पुत्र. तसेच किशोरीलाल घनशामदास मशरूवाला यांचे मोठे भाऊ. जन्म ३० एप्रिल १८८१. मृत्यू १९ फेब्रुवारी १९४२. मुंबईवासी. रुईचे व्यापारी. त्याचबरोबर फोटोग्राफीचा शौक. यांची पत्नी विजयालक्ष्मी. मुले शांतिभाई, सुशीलाबहेन, तारीबहेन, कांतिभाई, कनुभाई आणि भारती. सुशीलाबहेन गांधीजींचे दुसरे पुत्र मणिलालभाईंशी विवाहित. तारीबहेन माधानमध्ये कस्तुरबा सेवाश्रमाचे काम सांभाळत होत्या. कांतिभाईंचे लग्न वसंतबेन सुंदरजी देसाईंशी झाले. संपूर्ण मशरुवाला कुटुंबाचे वैशिष्ट्य सांगायचे तर कोणत्याही तरतुदीशिवाय किती तरी प्रकारे मदत करत होते. हे सर्व अतिशय प्रेमळ होते. नानाभाईंचे अकोला येथील घर नेहमी नवागतांकरिता उघडे राहायचे.

## ६३

१२६. अखिल हिंदुस्थान ग्रामोद्योग संघाची १९३४ साली स्थापना झाली होती. अखिल हिंदुस्थान चरखा संघाची स्थापना १९२५ च्या एप्रिलमध्ये झाली होती.

१२७. नंदलाल बसु शांतिनिकेतनमध्ये कला आणि हस्तोद्याग विभागाचे निदेशक. महान चित्रकार आणि कलाकार.

१२८. मौलाना अबुल कलाम आझाद काँग्रेसचे अध्यक्ष होते. पाहा डायरी भाग १९, पृष्ठ ३०१. भूलाभाई जीवणजी देसाई काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य.

**६४**

१२९. डॉ. अंसारी आणि गांधीजी यांनी माडलेला ठराव काँग्रेसने मंजूर केला. तो असा - घटनासमितीत निवडणुकीद्वारे जाण्यावर काँगेसद्वारा कोणताही प्रतिबंध नाही.

**६६**

१३०. रामदास गुलाटी अभियंता होते,

नंदलाल म्हणजे नंदलाल बोस.

**६७**

१३१ मूळ इंग्रजीत.

१३२. चौथ्या ओळीत 'जॉन' पाहिजे. (मूळ गुजराती आवृत्तीत.)

लार्ड झेटलँड ब्रिटिश सरकारच्या मंत्रिमंडळात हिंदुस्थानचा कारभार पाहणारे मंत्री होते.

विभाग ६८ ते ७५ इंग्रजीत.

१३३. खालून चौथी ओळ अशी वाचा - "आणि स्पष्ट गोष्ट की तिथे काही हिंसक आंदोलन झाले असेलच असे नाही." (मूळ गुजराती आवृत्तीत.)

## ६९

१३४. रोमन कॅथॉलिकांचा (ख्रिश्चन धर्माचे व्हॅटिकनच्या (रोम) पोपच्या अनुयायांचा) मोठा गट आहे. या धर्माचे आचरण कडक असून त्यातील विधी बरेचसे अवडंबरपूर्ण असतात. त्यांचा संततीनियमनाला, कृत्रिम उपायांना आणि स्त्रियांना धर्मगुरू बनविण्याला विरोध कायम आहे.

१३५. असीसीचे संत फ्रँसिसनी साधूंच्या पंथाची स्थापना केली. नम्रता आणि प्राणिमात्राच्या प्रेमाला प्राधान्य.

## ७०

१३६. सी. एस. म्हणजे सिव्हिल सर्जन

## ७१

१३७. १४व्या ओळीत काव्य हे सॉनेट. इंग्रज कवी पर्सी. बी. शेलीच्या (१७९२-१८२२) प्रसिद्ध कवितांमध्ये ‘क्वीन मेब’ (१८१३) आणि ‘द रिव्होल्ट ऑफ इस्लाम’ (१८१७), काव्यनाटक ‘प्रोमिथि्स अनबाऊंड’ (१८२०) हे आहेत. कविमित्र जेव्ह कीट्स वारल्यानंतर अंजली म्हणून ‘अडोनेईस’ (१८२१) लिहिली. १८२०मध्ये खूप प्रसिद्ध दोन गीतकाव्य लिहिले. ‘टू द वेस्ट विंड’ आणि ‘स्कायलार्क’. लेघॉर्नहून ला स्पेजिया येथे जाताना समुद्रात बुडाले.

## ७२

१३८. ही सुटी वाक्ये डायरीत एका पानावर लिहिली आहेत. हिब्रू लोकांच्या राजांमधील दुसऱ्या राजाचे नाव डेव्हिड होते. तो इसवीसन पूर्व १००० ते ९६२ दरम्यान जिवंत होता. त्यांने जेरुसलेमला राजधानीचे शहर बनवले होते. त्याने इस्त्राएलच्या राज्याची स्थापना केली होती असे समजले जाते.

शेवटून दुसऱ्या ओळीत गोल शब्द आहे तो गोलिएथ असा वाचला तर चपखल बसेल. याचा उल्लेख बायबलमध्ये जन्या करारात आहे. हा गाथ प्रदेशातील महाकाय फिलिस्तिन होता. आणि त्यांनी गोफणीने

दगडांचा मारा करून डेव्हिडला मारून टाकले. तेव्हापासून हे लोक हिब्रूंचा छळ करत आहे. (एक सॅम्युअल १७ पाहा.)

**७३**

१३९. यांचे मित्र मेरी बार यांचा हा उल्लेख असण्याची शक्यता आहे.

**७६**

१४०. कृष्णदास हे गांधीजींचा पुतण्या छबीलदास खुशालचंद गांधींचे पुत्र असायला पाहिजे.

**७७**

१४१. 'ईश्वराच्या सानिध्यात'. इंग्रजीत लिहिलेली कविता आहे. हिंदीत 'मंगलगान.'

* * * * *